श्री

श्रुतकीर्तिमंडलः ॥ गु-
रुखलुभाउदाजी ॥ १ ॥
...ः ॥ अधिगम्यब-

# माधवनिदान

ह्या संस्कृत मूळ ग्रंथाचें मराठी भाषांतर

लोककल्याणार्थ

## कृष्णाशास्त्री भाटवडेकर.

ह्यांनीं

केलें

तें

### मुंबईंत.

माहादेव गोपाळ शास्त्री अमरापूरकर ह्यांनीं
ज्ञानदर्पण छापखान्यांत छापिलें.

( हें सन १८४७ च्या २० व्या आक्ता प्रमाणें रजिस्तर केलें असे )

भाषांतर कर्त्यानें इतर भाषेंत भाषांतर करण्याचा हक्क आ-
पल्याहातीं ठेविला आहे.

सन १८६२

शके १७८४

# अर्पणं.

समस्तवैद्यप्रवरोगुणाढ्योदयापरोविश्रुतकीर्तिमंडलः ॥गु-
णानुरक्तोभुवनैकभूषा धन्यःसुशीलःखलुभाउदाजी॥१॥
योविद्यामनवद्यामिंग्लंडीयांश्चगौरकायेभ्यः ॥अधिगम्यब-
भूवपटुर्वक्तुंलिखितुंतदीयभाषांच ॥२॥ शारीरकौशल्यर-
सायनगर्भविद्याभैषज्यकल्पनमथोविविधंनिदानम् ॥शा-
स्त्रक्रियामपिचयंप्रकृतिंतथैव जानातियःसकलवैद्यकपार-
दृश्वा॥३॥

ग्रांटाख्यवैद्यशालायाः सौभाग्यतिलकोभवान् ॥आकारयं-
नित्वांलोकाजीजीएम्सीतिनामतः ॥४॥

विक्टोरियाधाराज्येऽस्मिन्न्यायाधीशपदंभजन् ॥तेनत्वंगी-
यसेलोकेजस्टिसाफ्पीस इत्यपि॥५॥

तथैवयूनिवर्सिट्याः फेलोत्वंशोभसेकिल॥ कलिकाता-
मुंबय्योः शाखाभूतेहिराजकीयेद्वे॥ एशियाटिक्नाम्यो-
सभेतयोस्त्वंसभासदाभरणम् ॥६॥

लंडनेराजकीयंयद्वर्ततेसभ्यमंडलम् ॥ तन्मध्येऽपिसभा-
स्तारोजातस्त्वमसिसांप्रतम् ॥७॥

विद्यावर्धनकामायेतेस्टूडंटाःप्रकीर्तिताः॥ सोसायटीशा
स्त्रविदांसंघोविद्याभिलाषिणाम् ॥८॥

तस्याअपित्वंमूर्धन्यःप्रेसिडेंटइतीर्यसे॥जोग्र्याफिकल्
सोसायट्यास्त्वमेकःसभ्यएवहि॥९॥

ज्ञानप्रसारकसभास्तारमुख्योसिसांप्रतम्॥ तेनत्वांभु-
वनेलोकाअध्यक्षंलोकरंजकम्॥१०॥

हित्वा नात्दुरहंकृतींश्च कुटिलान् धूर्तान्पुरोभागिनो यातोहं-
भवदंतिकं सकलभूविद्वत्प्रमोदांकुरम् ॥ स्वात्यंताऽखिलतृट्
प्रशांतिकरणं चंद्रं विहाय भ्रमात् किं यांती ह चकोरपक्षिनिव-
हाः खद्योतदृग्भत्विषः ॥११॥
मदाश्रयासं विनापि त्वां मत्कृतिस्त्वनुधावति ॥ रत्नाकरं विहायेव
नान्यं गच्छति निम्नगा ॥ १२॥
सरसाल्परसा चेयं कृतिस्ते प्राभृतीकृता ॥ कन्येव मुदमादद्या-
च्छ्लोकोत्तरसमर्पिता ॥१३ ॥

# प्रस्तावना.

सांप्रत काळीं लोकांस मराठी भाषेची अभिरुचि फारच लागली आहे; ह्यामुळें जे अत्यंत उपयोगी, व अवश्य संग्राह्य ग्रंथ संस्कृत किंवा इतर भाषेंत आहेत, त्यांचें ज्ञान साधारण लोकांस प्राप्त होत नाहीं, अशा ग्रंथाचीं मराठी भाषांतरें करण्याचा हल्लीं फार प्रचार पडला आहे, आणि नानाप्रकारच्या विषयांच्या ज्ञानाचा प्रसार चहूंकडे व्हावा या साठीं मोठमोठाले विद्वान लोक झटत आहेत, तेव्हां असल्या उपयुक्त ग्रंथाचें मराठी भाषांतर सर्वांच्या उपयोगीं पडेल, असें मनांत आणून आह्मी ह्या कृत्यास हात घातला आहे.

**माधवनिदान** हा ग्रंथ होऊन सुमारें सातशें वर्षें झालीं असतील; ह्या ग्रंथाचा कर्ता **माधवाचार्य** ह्या नांवाचा मोठा विख्यात पंडित होता. **सायनाचार्याचा** बंधु ह्यासही माधव ह्मणत असत. तो ह्या ग्रंथाचा कर्ता आहे, असें कित्येक लोक ह्मणतात; परंतु तो नसावा असें वाटतें. कारण माधवनिदानावर "आतंकदर्पण" ह्मणून एक टीका आहे, तिच्या आरंभीं टीकाकारानें एका श्लोकांत **हम्मीर** राजाचें नांव घातलें आहे, यावरून तो टीकाकार त्या राजाच्या पदरीं होता, असें अनुमान होतें. प्राचीन इतिहासांच्या शोधावरून असें कळतें कीं, हा हम्मीर राजा चवदाव्या शतकांत होता. त्याच शतकांत **सायनाचार्याचा** बंधु **माधव** हा **विजया**नगरामध्यें **बुक्क** राजाचा प्रधान होता. तेव्हां त्या पूर्वीं शेंपन्नास वर्षें तरी **माधवनिदान** हा ग्रंथ झाला असावा. माधवाचार्य (विद्यारण्य) याचे ग्रंथ सर्व शास्त्रांत आहेत;- धर्मशास्त्रांत- कालमाधव; अलंकारांत शंकरविजय; वेदांतशास्त्रांत-पंचदशी इत्यादि ह्यावरून निदानमाधव ही त्याचाच ग्रंथ असावा, असें

लोक अनुमान करितात. परंतु त्यास कांहीं आधार नाहीं, दुसरें असें कीं, मधुकोशकर्त्यानें आपल्या टीकेच्या शेवटीं "श्रीमाधवेनेंदुरात्मजेन" असें लिहिलें आहे. ह्यावरून निदानकर्त्या माधवाच्या पित्याचें नांव इंदुकर हें होतें. विद्यारण्याच्या पित्याचें नांव इंदुकर हें नव्हतें. ह्यावरून असें सिद्ध होतें कीं, दोघे माधव वेगवेगळ्याल्या काळीं जन्मले असावे.

**माधवनिदान** हा आकर ग्रंथ आहे, ह्याच्या मागून **भावप्रकाश, चिकित्सामृतसागर, वैद्यरहस्य, योगरत्नाकर** आणि, **चिकित्सासार** आदिकरून जे अलीकडे ग्रंथ झाले आहेत, त्यामध्यें त्यात्या ग्रंथकारांनीं माधवाचेंच निदान घेतलें आहे. निदानाविषयीं माधवासारखा दुसरा ग्रंथ पाहाण्यांत येत नाहीं. वैद्यशास्त्रांत जे मोठे नामांकित ग्रंथ आहेत, त्यामध्यें एकेकाचा एकेके गोष्टीविषयीं उत्कर्ष आहे, तो असा— "निदाने माधवः श्रेष्ठः सूत्रस्थाने तु वाग्भटः॥ शारीरे सुश्रुतः प्रोक्तश्चरकस्तु चिकित्सिते॥१॥"

**अर्थ**—निदानाविषयीं **माधव** श्रेष्ठ; सूत्रस्थानाविषयीं **वाग्भट्ट** श्रेष्ठ; शारीराविषयीं **सुश्रुत** श्रेष्ठ; आणि चिकित्सेविषयीं **चरक** श्रेष्ठ.

कोणी कदाचित असें ह्मणेल कीं, इंग्लिशांच्या सुधारलेल्या वैद्यकाचा हल्लीं लोकांमध्यें पुष्कळ प्रसार झाला आहे, तर हिंदु वैद्यक प्रसिद्धीस आणण्याविषयीं व्यर्थ श्रम करूं नयेत. कारण त्यांच्या व ह्यांच्या निदानाच्या व चिकित्सेच्या रीति अगदीं विरुद्ध दिसतात; तर त्याविषयीं आमचें असें ह्मणणें आहे कीं,

## प्रस्तावना.

त्यानीं इंग्लिश वैद्यक व हिंदु वैद्यक यांची परस्पर तुलना करून प हावी. आणि जर ते स्वदेशाभिमान बाळगीत असतील (देशाभिमान बाळगणें हा मनुष्याचा धर्म होय) तर आपल्या प्राचीन ऋषींनीं सतत श्रम करून आपल्या हिता साठीं काय काय गोष्टी लिहून ठेविल्या आहेत, त्यांचा वास्तव विचार करून त्या उदयास व पूर्णतेस आणण्यास जे कोणी झटत असतील त्यांस दोष देणार नाहींत.

हिंदु वैद्यक आणि इंग्लिश वैद्यक ही साधारण दृष्टीनें पाहातां अगदी विरुद्ध दिसतात, परंतु शास्त्र दृष्टीनें त्यांची एकवाक्यता करण्यास झटलें तर होण्या सारिखी आहे, पण एका मनुष्यास दोन्ही वैद्यकाचें चांगलें ज्ञान असलें पाहिजे. दोन्ही वैद्यकें चांगलीं जाणणारा असा वैद्य विरळाच अढळेल.

ह्या ग्रंथांत रोग जाणण्याविषयीं कारण, पूर्वरूप, रूप, उपशय, आणि संप्राप्ति, असे पांच उपाय प्रथम सांगून नंतर ज्वरादि रोगांचीं निदानें सविस्तर सांगितलीं आहेत.

भाषांतरामध्यें मूळ ग्रंथाच्या अधिक स्पष्टीकरणार्थ स्थलविशेषीं मधुकोश टीकेचा सारांश घेतला आहे. आणि जीं निदानें माधवांत नाहींत, तीं इतर ग्रंथांतून घेऊन ग्रंथाच्या शेवटीं परिशिष्ट रूपानें लिहिलीं आहेत.

वैद्यलोक नाडी पाहून रोगाची परीक्षा करितात, आणि रोग्यानें जेंजें खाल्लें असेल तें सांगतात, असें पूर्वीच्या लोकाचें ह्मणणें आहे, व पूर्वींच्या नामांकित वैद्यांची ह्या गोष्टी विषयीं लोकांत अद्यापि प्रसिद्धिही आहे. परंतु ह्या गोष्टीचा वास्तविक

# प्रस्तावना

विचार करून पाहातां आत्रेयसंहिता, चरक, सुश्रुत, वंगसेन, भेड, वाग्भट्ट, आदिकरून महान् महान् ग्रंथांत नाडी परीक्षेचा कोठें उल्लेख नाहीं. पण शार्ङ्गधर चिकित्सासार आदिकरून अर्वाचीन ग्रंथांत ती पाहाण्यांत येते. तिचें वास्तव ज्ञान आणि अनुभव असणारे असे वैद्य या भूमंडळावर थोडेच निपजले असतील. नुसत्या नाडी परीक्षेवरून ज्यांस रोगाचें खरोखर ज्ञान होत असेल, त्यांस तें केवळ चातुर्यानें किंवा देवता साक्षात्कारानें होत असेल असें मानलें पाहिजे.

ह्या ग्रंथांत स्थलविशेषीं भ्रांतीनें किंवा लेखक प्रमादानें काहीं चुका पडल्या असतील, त्याविषयीं सुज्ञांची प्रार्थना आर्यवृत्तानें करितों.

रसिकवर प्राणेशें, केला जो हट्ट मर्द ए कांतीं ॥
कोपानदे विपरितो, दीर्घ दृशा उत्सवास वेस्त्रांती ॥१॥

ह्याचें तात्पर्य असें कीं, कोणाला दोषोद्घाटन करणें झाल्यास त्यानें एकांतीं कळवावें, म्हणजे त्यांत संतोष आहे. दुसरा अर्थ शृंगारपर आहे तो स्पष्ट आहे.

---

१ प्रसवे

श्री.

# अनुक्रमणिका प्रा०


| प्रकरणांक | पृष्ठ |
|---|---|
| मंगलाचरण | १ |
| निदान | २ |
| पूर्वरूप | २ |
| विशिष्टप्राग्रूप | ३ |
| रूप | ३ |
| उपशय | ३ |
| उपशयाच्याउदाहरणाचेंकोष्टक | ४ |
| संप्राप्ति | ५ |
| संप्राप्तीचेऔपाधिकभेद | ५ |
| संख्यादिकांचेंविवरण | ५ |
| विकल्परूपसंप्राप्ति | ५ |
| प्राधान्यरूपसंप्राप्ति | ६ |
| बलरूपसंप्राप्ति | ६ |
| कालरूपसंप्राप्ति | ६ |
| निदानपंचकाचाउपसंहार | ७ |
| सर्वरोगांचेंकारण | ७ |
| रोगांचेंदुसरेंकारण | ७ |
| रोगजनकव्याधीचेंवैचित्र्य | ८ |
| निदानपंचकजाणण्याचीआवश्यकता | ९ |
| **१ ज्वरनिदान.** | |
| ज्वराचीउत्पत्ति | ९ |
| ज्वरसंप्राप्ति | १० |
| ज्वराचेंलक्षण | १० |
| ज्वराचेंपूर्वरूप | १० |
| वातज्वरलक्षण | ११ |
| पित्तज्वरलक्षण | ११ |
| कफज्वरलक्षण | ११ |
| वातपित्तज्वरलक्षण | १२ |
| श्लेष्मवातज्वरल० | १२ |
| श्लेष्मपित्तज्वर | १३ |
| सन्निपातज्वरलक्षण | १३ |
| अन्यग्रंथांतलेंत्रयोदशसन्निपातनिदान | १४ |
| सन्निपाताचींनांवें | १५ |
| त्यांचीदिनमर्यादा | १५ |
| साध्यासाध्यविचार | १६ |
| संधिक | १६ |
| अंतक | १७ |
| रुग्दाह | १७ |
| चित्तभ्रम | १७ |
| शीतांग | १७ |
| तंद्रिक | १८ |
| कंठकुब्ज | १८ |
| कर्णक | १८ |
| भुग्ननेत्र | १९ |
| रक्तष्ठीवी | १९ |
| प्रलापक | २० |
| जिह्वक | २० |
| अभिन्यास | २० |
| हारिद्रक | २१ |
| त्रिदोषज्वरांचीसाधारणमर्यादा | २१ |
| धातुपाकलक्षण | २२ |

| प्र॰अं॰ | | पृष्ठ |
|---|---|---|
| | अजीर्णापासून विषूच्यादिक होतात | ७२ |
| | विषूची ह्मणजे काय? | ७३ |
| | विषूचीचें लक्षण | ७४ |
| | अलसकाचें लक्षण | ७५ |
| | विलंबिकेचें लक्षण | ७५ |
| | अजीर्णजन्य आमाचें दुसरें कार्य | ७५ |
| | विषूचिका आणि अलसक यांचें असाध्य लक्षण. | ७६ |
| | जीर्णाहारलक्षण | ७६ |
| ७ | कृमिनिदान. | |
| | बाह्य आणि अभ्यंतर याभेदें करून कृमि दोन प्रकारचे. त्यांपेकीं बाह्यकृमि | ७७ |
| | कृमीचें कारण | ७८ |
| | पोटांत कृमी झाल्याचें लक्षण | ७८ |
| | कफजकृमि | ७९ |
| | रक्तजकृमि | ८० |
| | पुरीषजन्यकृमि | ८० |
| ८ | पांडुरोगनिदान | |
| | पांडुरोगाचें कारण व संप्राप्ति | ८१ |
| | पूर्वरूप | ८२ |
| | वातपांडुरोग | ८२ |
| | पित्तपांडुरोग | ८२ |
| | कफपांडुरोग | ८२ |
| | सन्निपातपांडुरोग | ८३ |
| | मृद्भक्षणजन्यपांडुरोग | ८३ |
| | असाध्यलक्षणें | ८४ |
| | पांडुरोगामध्यें कामला (कावीळ) होते ती० | ८६ |
| | कुंभकामला | ८६ |
| | असाध्यलक्षण | ८७ |
| | कुंभकामलेचें असाध्यलक्ष० | ८७ |
| | हलीमकरोग | ८७ |
| | पानकील० | ८८ |
| ९ | रक्तपित्तनिदान. | |
| | पूर्वरूप | ८९ |
| | कफयुक्तरक्तपित्तलक्षण | ८९ |
| | वातिकरक्तपित्तलक्षण | ९० |
| | पैत्तिकरक्तपित्तलक्षण | ९० |
| | द्वंद्वजरक्तपित्त | ९१ |
| | ऊर्ध्वगादिकांचा साध्यासाध्यविचार | ९१ |
| | साध्याचें कारण | ९१ |
| | दोषभेदानें साध्यासाध्यल० | ९१ |
| | रक्तपित्ताचे उपद्रव | ९२ |
| | असाध्यलक्षणें | ९२ |
| | दुसरीं असाध्यलक्षणें | ९३ |
| १० | राजयक्ष्मनिदान. | |
| | कारणें | ९४ |
| | त्याची विशिष्टसंप्राप्ति | ९४ |
| | पूर्वरूप | ९५ |
| | त्रिरूपक्षयाचें लक्षण | ९६ |
| | एकादशरूप, षड्रूप, आणि त्रिरूपशोषाचें लक्षण | ९६ |
| | साध्यासाध्यविचार | ९७ |
| | असाध्यलक्षणें | ९८ |

| प्र॰अ॰ | पृष्ठ |
|---|---|
| व्यवायशोषीलक्षण | ९९ |
| शोकशोषीलक्षण | ९९ |
| जराशोषीलक्षण | ९९ |
| अध्वमशोषीलक्षण | १०० |
| व्यायामशोषीलक्षण | १०० |
| व्रणशोष | १०१ |
| उरःक्षतरोग | १०१ |
| पूर्वरूप | १०३ |
| क्षतक्षीणाचेंअसाध्यलक्षण | १०३ |
| असाध्यलक्षण | १०३ |
| **११ कास(खोकला)निदान** | |
| त्याचेंकारण, संप्राप्तिआणिनिरुक्ति | १०४ |
| पूर्वरूप | १०४ |
| वातकास | १०५ |
| पित्तकास | १०५ |
| कफकास | १०५ |
| क्षतकास | १०६ |
| क्षयकास | १०६ |
| साध्यासाध्यविचार | १०७ |
| **१२ हिक्का,(उचकी)आणिश्वास(दमा) ह्यांचें निदान.** | |
| हिक्काचेंस्वरूपआणिनिरुक्ति | १०८ |
| त्यांचाभेदआणिसंप्राप्ति. | १०९ |
| पूर्वरूप | १०९ |
| अन्नजा | १०९ |
| यमला | १०९ |

| प्र॰अ॰ | पृष्ठ |
|---|---|
| क्षुद्रा | ११० |
| गंभीरा | ११० |
| महती | ११० |
| असाध्यलक्षण | ११० |
| यमिकेचेंअसाध्यल॰ | १११ |
| **१३ श्वासनिदान.** | ११२ |
| पूर्वरूप | ११२ |
| संप्राप्ति | ११२ |
| महाश्वासल॰ | ११२ |
| ऊर्ध्वश्वासलक्षण | ११३ |
| श्वासखालींनयेण्याचेंकारण | ११३ |
| छिन्नश्वासल॰ | ११४ |
| तमकश्वासलक्षण | ११४ |
| प्रतमकश्वासल॰ | ११५ |
| प्रतमकाचेंदुसरेंलक्षणवकारण | ११५ |
| क्षुद्रश्वासल॰ | ११५ |
| साध्यासाध्यविचार | ११६ |
| उपेक्षेनेहिक्का, श्वास आणि कास हे सत्वर घातक होतात. | ११७ |
| **१४ स्वरभेदनिदान.** | |
| वातस्वरभेदलक्षण | ११८ |
| पित्तजस्वरभेदलक्ष॰ | ११९ |
| कफजस्वरभेदल॰ | ११९ |
| सन्निपातजस्वरभेदल॰ | ११९ |
| क्षयजन्यस्वरभेद | ११९ |
| मेदजस्वरभेद | १२० |
| असाध्यलक्षण | १२० |

| प्र०अं० | पृष्ठ |
|---|---|
| १५ अरोचकनिदान. | |
| वाताद्यरोचकलक्षणें. | १२१ |
| शोकाद्यरोचकलक्ष० | १२१ |
| अरोचकापासूनअन्यठिकाणीं विकृति होतेती | १२२ |
| १६ छर्दि(वांति) निदान. | |
| छर्दीचेंकारणवनिरुक्ति. | १२२ |
| पूर्वरूप | १२३ |
| वातछर्दि | १२४ |
| पित्तछर्दि | १२४ |
| कफछर्दि | १२४ |
| त्रिदोषजछर्दि | १२५ |
| असाध्यलक्षण | १२५ |
| आगंतुजछर्दीचेंलक्षण | १२६ |
| कृमिजछर्दि | १२६ |
| साध्यासाध्यल० | १२६ |
| उपद्रव | १२७ |
| १७ तृष्णानिदान. | |
| संप्राप्ति | १२७ |
| अन्नजादितृष्णांचीसंप्राप्ति | १२७ |
| वातजतृष्णालक्षण. | १२८ |
| पित्तजतृष्णाल० | १२८ |
| कफजतृष्णाल० | १२८ |
| क्षतजतृष्णाल० | १२९ |
| क्षयजतृष्णाल० | १२९ |
| आमजतृष्णा | १३० |
| अन्नजतृष्णा | १३० |
| उपसर्गजतृष्णालक्षण | १३० |

| प्र०अं० | पृष्ठ |
|---|---|
| असाध्यलक्षणें | १३० |
| १८ मूर्छानिदान | |
| निदानवसंप्राप्ति | १३१ |
| पूर्वरूप | १३२ |
| वातजमूर्छालक्षण | १३२ |
| पित्तजमूर्छालक्षण | १३३ |
| कफजमूर्छालक्षण | १३३ |
| सन्निपातजमूर्छालक्षण | १३३ |
| रक्तजमूर्छाल० | १३४ |
| विषजआणिमद्यजमूर्छा० | १३४ |
| रक्तजादितिन्हीमूर्छांचील० | १३५ |
| मूर्छा,भ्रम,तंद्रा, आणि निद्रा ह्यांचाभेद | १३५ |
| तंद्रेचेंलक्षण | १३५ |
| सन्यास | १३६ |
| त्याचेंलक्षण | १३६ |
| १९ मदात्ययनिदान. | |
| अविधीनेंमद्यपानाचें फळ | १३७ |
| दृष्टांत | १३७ |
| विधीनेंमद्याचें फळ | १३८ |
| प्रथममदलक्षण | १३८ |
| द्वितीयमदलक्षण | १३९ |
| तृतीयमदलक्षण | १३९ |
| चतुर्थ मदल० | १४० |
| अविधिमद्यपानापासूनदुसरेविकार | १४० |
| वातमदात्यय | १४१ |
| पित्तमदात्यय | १४२ |

प्र·अं· — पृष्ठ

कफमदात्यय ........ १४२
त्रिदोषजमदात्यय ........ १४२
परमदलक्षण ........ १४२
पानाजीर्णलक्षण ........ १४३
पानविभ्रमलक्षण ........ १४३
असाध्यलक्षण ........ १४३
उपद्रव ........ १४४

२० दाहनिदान.

मद्यजन्यदाहल० ........ १४४
रक्तजआणिपित्तजदाह ........ १४४
तृष्णानिरोधजदाह ........ १४५
रक्तपूर्णकोष्ठजन्यदाह ........ १४५
धातुक्षयजन्यदाह ........ १४५
क्षतजदाह ........ १४६
मर्माभिघातजदाह ........ १४६

२१ उन्मादनिदान.

संप्राप्ति. ........ १४६
उन्मादाचेंसामान्यकारणवसं० ........ १४७
उन्मादांचेंस्वरूप ........ १४७
विशेषलक्षण ........ १४८
पित्तजोन्मादाचेंकारणवल० ........ १४८
कफजउन्माद ........ १४९
सन्निपातउन्माद ........ १५०
शोकजउन्माद ........ १५०
विषजउन्माद ........ १५०
असाध्यलक्षण ........ १५१
भूतजउन्माद ........ १५१

देवग्रहाचेंलक्षण ........ १५१
असुरग्रहलक्षण ........ १५२
गंधर्वग्रहलक्षण ........ १५२
यक्षग्रहलक्षण ........ १५३
पितृग्रहलक्षण ........ १५३
सर्पग्रहलक्षण ........ १५३
राक्षसग्रहल० ........ १५४
पिशाचग्रहल० ........ १५४
देवग्रहादिकांचाग्रहणकाळ ........ १५५
शरीरामध्येंग्रहावेशहोतोनोनादि-
सण्याचेंकारण ........ १५५

अपस्मार(फेंपरें)निदान.

त्याचेंसामान्यलक्षण ........ १५६
पूर्वरूप ........ १५६
वातजअपस्मार ........ १५७
पित्तजअपस्मार ........ १५७
कफजअपस्मार ........ १५७
सन्निपातजअपस्मार ........ १५८
असाध्यलक्षण ........ १५८
अपस्माराचीपाळी ........ १५८

२३ वातव्याधिनिदान.

कारणें ........ १५९
पूर्वरूप ........ १६०
संकोचादिकवातविकार ........ १६१
कोष्ठादिगतवायूचीं कार्यें ........ १६२
कोष्ठगत, सर्वांगकुपित, गुदस्थित,
आमाशयस्थितवायू ........ १६२

प्र०अं० पृष्ठ

पक्काशयगत श्रोत्रादिइंद्रियस्थित वायूचीं कार्यें ... १६३
रसादिसप्तधातूगतवायूचीं ल० ... १६३
शिरागतवायू ... १६५
स्नायुगत आणिसंधिगतवा० ... १६५
पित्तकफानींआवृतझालेल्या प्राणादिवायूचीं लक्षणें ... १६५
आक्षेपकाचें सामान्यलक्षण ... १६६
अपतंभक व अपतानकलक्षण ... १६७
दंडापतानक, अंतरायाम, बहिरायाम (धनुर्वायू) आणिअभियान यांचीं लक्षणें ... १६८
आक्षेपकादिकांस पित्तकफाचा संबंध झाला असतां लक्षणें ... १६९
असाध्यलक्षण ... १७०
पक्षवध (पक्षाघात) लक्षणें ... १७०
सर्वांगरोगल० ... १७०
साध्यासाध्यज्ञानार्थ इतरदोषांचा संबंध ... १७१
अर्दितरोग ... १७१
त्याचें असाध्यलक्षण ... १७१
आक्षेपकापासून अर्दितापर्यंत रोगांचा वेग ... १७२
हनुग्रहलक्षण ... १७२
मन्यास्तंभ ... १७३
जिव्हास्तंभ ... १७३
शिरोग्रह ... १७३
गृध्रसी ... १७४
विश्वाची ... १७४

प्र०अं० पृष्ठ

क्रोष्टुशीर्ष (गुडघी) ... १७४
खंजआणि पांगुल्य ... १७५
कलायखंज ... १७५
वातकंटक ... १७५
पाददाह ... १७५
पादहर्ष ... १७६
अंसशोषअवबाहुक ... १७६
मूकादिकनीनरोग ... १७६
तूनीरोग ... १७७
प्रतूनीरोग ... १७७
आध्मानलक्षण ... १७७
प्रत्याध्मान ... १७७
वाताष्ठीला, प्रत्यष्ठीला ... १७८
मूत्ररोध
कंपवायू, खल्लीचें लक्षण, अनुक्तवातरोगसंग्रह, साध्यासाध्यविचार ... १७९
उपद्रव, असाध्यलक्षण, प्रकृतिस्थवायूचें लक्षण व कार्य ... १८०

२४ वातरक्तनिदान.

कारण, संप्राप्ति ... १८१
पूर्वरूप ... १८२
वातरक्ताला अन्यदोषसंसर्ग, रक्ताधिकल० व पित्ताधिकल० ... १८३

प्र॰अं॰ पृष्ठ

कफाधिकाचें ल॰ ........ १८४
पायांवर झालेलें वातरक्त उपेक्षेनें हातावर देखील होतें ........ १८४
असाध्यलक्ष॰ ........ १८४
उपद्रव ........ १८५
साध्यासाध्यविचार ........ १८५

२५ ऊरुस्तंभनिदान.

कारणें ........ १८६
पूर्वरूप ........ १८७
लक्षण ........ १८७
असाध्यलक्षण ........ १८८

२६ आमवातनिदान.

कारणें ........ १८८
आमवायूचें सामान्यल॰ ........ १८९
तोअत्यंतवाढल्यावरचें ल॰ ........ १८९
विशेषलक्षण ........ १९०
साध्यासाध्यविचार ........ १९०

२७ शूलनिदान.

वातशूलाचें कारण वल॰ ........ १९१
पित्तशूळाचें कारणवल॰ ........ १९२
कफशूलाचें का॰ वलक्षण ........ १९३
आमशूळ ........ १९४
द्वंद्वजशूळ ........ १९४
परिणामशूळवत्याचेवातजादिभेद ........ १९५
अन्नद्रवाख्यशूल ........ १९६

प्र॰अं॰ पृष्ठ

२८ उदावर्तनिदान.

उदावर्ताचें कारण ........ १९७
त्रयोदशउदावर्तांचीं लक्षणें ........ १९७
रूक्षादिकारणांनीं कुपित झालेल्या वायूपासून होणारें उदावर्त ........ २००

२९ आनाहरोगनिदान.

त्याचें कारण व संप्राप्ति ........ २०१
असाध्यलक्षण ........ २०२

३० गुल्मनिदान.

त्याचें कारण व संप्राप्ति ........ २०२
गुल्माचें सामान्यस्वरूप ........ २०३
संप्राप्ति ........ २०३
पूर्वरूप ........ २०३
गुल्माचें साधारणरूप ........ २०४
वातगुल्माचें कारणवल॰ ........ २०४
पित्तगुल्माचें कारण ........ २०५
कफज व सन्निपातजगुल्म ........ २०५
द्वंद्वजगुल्म ........ २०६
सन्निपातगुल्म ........ २०६
रक्तगुल्म ........ २०७
असाध्यलक्षणें ........ २०९

३१ हृद्रोगनिदान

त्याची संप्राप्ति व सामान्यल॰ ........ २१०
वातजादिहृद्रोगांचीं लक्षणें ........ २११
कृमिहृद्रोगल॰ ........ २१२
उपद्रव ........ २१२

पित्तकादिमूत्रकृच्छ्रा…

शल्यजमूत्रकृच्छ्र ........ २१४
पुरीषजमूत्रकृच्छ्र ........ २१५
अश्मरीजमूत्रकृ० ........ २१५
शुक्रजमूत्रकृ० ........ २१५
अश्मरीआणिशर्कराह्यांचेंसाम्यआणिअवांतरभेद ........ २१५

## ३३ मूत्राघातनिदान.

वातकुंडलिका ........ २१६
अष्ठीला ........ २१७
वातबस्ति ........ २१७
मूत्रातीत ........ २१७
मूत्रजठर ........ २१८
मूत्रोत्संग ........ २१८
मूत्रक्षय ........ २१९
मूत्रग्रंथि ........ २१९
मूत्रशुक्र ........ २१९
उष्णवात ........ २१९
मूत्रसाद ........ २२०
विड्विघात ........ २२०
बस्तिकुंडल ........ २२१
ह्यालाअन्यदोषझाल्यावरचेंल० ........ २२१
साध्यासाध्यल० ........ २२२

## ३४ अश्मरी (मुतखडा) निदान.

संप्राप्ति ........ २२२
पित्ताश्मरील० ........ २२४
कफजअश्मरी ........ २२४
बालकांसअश्मरीहोतेती ........ २२५
शुक्राश्मरीलक्षण ........ २२५
अश्मरीशर्करायांचेउपद्रव ........ २२६
असाध्यलक्षणें ........ २२६

## ३५ प्रमेहनिदान.

कफादिमेहांचीसंप्राप्ति ........ २२७
प्रमेहांचादोषदूष्यसंग्रह ........ २२८
पूर्वरूप ........ २२८
सामान्यलक्षण ........ २२९
प्रमेहाचेंकारण ........ २२९
कफजमेहांचींलक्षणें ........ २२९
पित्तजमेहांचील० ........ २३१
वातजमेहांचील० ........ २३१
कफजादिमेहांचेउपद्रव ........ २३२
प्रमेहाचींअसाध्यलक्षणें ........ २३३
कुलपरंपरागतअन्यविकाराचेंअसाध्यत्व ........ २३३
उपेक्षेनेंसर्वमेहमधुमेहत्वपावतात.
धातुक्षयआणिआवरणह्यापासूनकोपलेल्यावायूनेंमधुमेहाचासंभव.
आवरणाचेंल०
मधुमेहशब्दाच्याप्रवृत्तीचेंनिमि० ........ २३४

## ३७ मेदोनिदान.


कारणवसंप्राप्ति ........ २३८
मेदस्वीपुरुषाचेंल० ........ २३८
अत्यंतमेदवाढल्याचेपरिणाम २३९
स्थूललक्षण ........ २३९


## ३८ उदरनिदान.


अग्नीच्यादुष्टीसउदराख्याका० २४०
उदरांचीसंप्राप्ति ........ २४०
उदरांचेंसामान्यरूप ........ २४१
उदरांचीसंख्या ........ २४१
वातोदरलक्षण ........ २४१
पित्तोदरलक्षण ........ २४२
कफोदरलक्षण ........ २४२
सन्निपातोदरलक्षण ........ २४३
प्लीहोदरलक्षण ........ २४३
यकृद्दाल्युदरल० ........ २४४
बद्धगुदोदरल० ........ २४५
क्षतोदरल० ........ २४५
जलोदराचेंउत्पत्तिसहितल० ........ २४६
साध्यासाध्यविचार ........ २४७
असाध्यल० ........ २४८


## ३९ शोथनिदान.


संप्राप्ति ........ २४८
वातजशोथ ........ २५०
पित्तजशोथ ........ २५०
कफजशोथ ........ २५१
द्वंद्वजआणिसंनिपातजशोथ ........ २५१
अभिघातजशोथ ........ २५१
विषजशोथ ........ २५२
दोषांचीसूज उत्पन्न करण्याचीं ठिकाणें ........ २५२
कृच्छ्रादिभेद ........ २५२
असाध्यलक्षण ........ २५३


## ४० अंडवृद्धिनिदान.


संप्राप्ति ........ २५४
वातादिकांपासून झालेल्या अंडवृद्धीचेंलक्षण ........ २५५
मूत्रवृद्धि ........ २५५
अंत्रवृद्धीचेंलक्षण ........ २५६
उपेक्षाकेलीअसतांपरिणाम ........ २५६
असाध्यलक्षण ........ २५७


## ४१ गलगंडनिदान.


त्याचीसंप्राप्ति ........ २५७
वातिकगलगंड ........ २५८
कफजगलगंड ........ २५८
मेदजगलगंड ........ २५९
असाध्यलक्षण ........ २५९

| प्र॰ अं॰ | पृष्ठ |
|---|---|
| ४२ गंडमालानिदान. | |
| अपचीलक्ष॰ | २६० |
| साध्यासाध्यलक्ष॰ | २६० |
| ४३ ग्रंथिनिदान. | |
| वातजग्रंथि | २६१ |
| पित्तजग्रंथि | २६१ |
| कफजग्रंथि | २६२ |
| मेदजग्रंथि | २६२ |
| शिराजग्रंथि | २६२ |
| ४४ अर्बुदनिदान. | |
| त्याचीसंप्राप्ति | २६३ |
| रक्तार्बुद | २६४ |
| मंसार्बुद | २६४ |
| अध्यर्बुद | २६५ |
| द्विरर्बुद | २६५ |
| अर्बुदनपिकण्याचेंकारण | २६५ |
| ४५ श्लीपद(वारूळ) निदान. | |
| त्याचीसंप्राप्ति | २६६ |
| वातजश्लीपद | २६६ |
| पित्तजश्लीपद | २६६ |
| कफजश्लीपद | २६६ |
| असाध्यलक्षण | २६७ |
| श्लीपदामध्येंकफाचेंप्राधान्य | २६७ |
| श्लीपदउत्पन्नहोण्याचेदेश | २६७ |
| ४६ विद्रधिनिदान. | |
| संप्राप्तिवगैरे | २६८ |
| वातजादिविद्रधीचीलक्षणें | २६९ |
| पिकल्यांवरत्यांचेस्राव | २६९ |
| सन्निपातविद्रधि | २७० |
| अभिघातजविद्रधि | २७० |
| रक्तजविद्रधि | २७० |
| अंतर्विद्रधिवत्याचीस्थानें | २७१ |
| स्रावनिर्गम | २७२ |
| साध्यासाध्यविद्रधि | २७२ |
| असाध्यलक्षण | २७३ |
| ४७ व्रणशोथनिदान. | |
| व्रणपाक. | २७३ |
| अपक्वलक्षण. | २७४ |
| पच्यमानलक्षण | २७४ |
| पक्वव्रणलक्षण. | २७५ |
| व्रणांनपाककाचींत्रिदोषसंबं॰ | २७५ |
| पूनकादलाअसतांपरिणाम | २७६ |
| आमादिलक्षणजाणनारेवैद्या चेगुणदोष. | २७६ |
| अपक्वछेदनआणि पक्वाची उपेक्षाकेल्यानेवैद्यदोष. | २७७ |
| ४८ व्रणनिदान. | |
| वातिकव्रण, पैत्तिकव्रण | २७७ |
| कफव्रण, रक्तजवद्वंद्वजव- क्षतव्रण, कृच्छ्रसाध्यवअसा॰ | २७८ |
| दुष्टव्रण, शल्यव्रण, भरणाराव्रण | २७९ |

| अं. | | पृष्ठ |
|---|---|---|
| | भरलेल्याव्रणाचेंल० कृच्छसाध्यव्रण, साध्यासाध्यलक्षण | २८९ |
| | असाध्यव्रण | २९० |
| | दुसरींअसाध्यल० | २९१ |
| | व्रणाचाअपचार | २९१ |
| ९ | आगंतुव्रणनिदान. | |
| | आगंतुव्रणसाहाप्रकारचे | २९२ |
| | छिन्नलक्षण. | २९२ |
| | भिन्नलक्षण. | २९२ |
| | कोष्ठलक्षण. | २९३ |
| | कोष्ठभेदाचेंलक्ष० | २९३ |
| | आमाशयस्थितरक्तल० | २९४ |
| | पक्काशयस्थितलक्ष० | २९४ |
| | विद्धलक्षण | २९४ |
| | क्षतलक्षण | २९४ |
| | पिचितल० | २९४ |
| | घृष्टलक्षण | २९५ |
| | सशल्यव्रण | २९५ |
| | कोष्ठभेदलक्षण | २९५ |
| | असाध्यकोष्टभेद | |
| | मांसशिरास्नायुआणिअस्थि यांच्यामर्मभेदाचेंसामान्यल० | २९५ |
| | मर्मरहितशिराविद्धल० | |
| | स्नायुविद्ध | २९७ |
| | संधिविद्ध | २९७ |
| | अस्थिविद्ध | २९७ |
| | मर्मरहितशिरादिविद्धलक्षणा सरूपशिरादिमर्मविद्धल०जाणावें | २९८ |

| प्र.अं. | | पृष्ठ |
|---|---|---|
| | मांसमर्माचेंलक्षण | २९८ |
| | सर्वव्रणाचेउपद्रव | २९८ |
| ५० | भग्ननिदान. | |
| | भग्न दोनप्रकारचें, एकसव्रण, आणि एकअव्रण, त्यापैकीं | २९९ |
| | अव्रणलक्षण | |
| | संधिभग्न | |
| | संधिभंगाचेंसामान्यल० | २९९ |
| | कांडभग्नलक्षणें | ३९१ |
| | कष्टसाध्यल० | ३९२ |
| | असाध्यलक्षणें | ३९२ |
| | क्षयगईनेंअसाध्यत्व. | ३९३ |
| | अस्थींचेतन्हतऱ्हेचेभंग | ३९३ |
| ५१ | नाडीव्रणनिदान. | |
| | संप्राप्ति | ३९४ |
| | वातनाडीव्रण | ३९४ |
| | पित्तनाडी | ३९५ |
| | कफनाडी | ३९५ |
| | सन्निपातजनाडी | ३९५ |
| | शल्यजनाडी | ३९५ |
| | साध्यासाध्यल० | ३९६ |
| ५२ | भगंदरनिदान. | |
| | संप्राप्ति | ३९६ |
| | पूर्वरूप | ३९६ |
| | शतपोनकल० | ३९७ |
| | उष्ट्रशिरोधरल० | ३९७ |

| प्र॰अं॰ | पृष्ठ |
|---|---|
| परिस्रावीभगंदर | २९७ |
| शंबूकावर्तभगंदर | २९८ |
| उन्मार्गिभगंदर | २९८ |
| साध्यासाध्यल॰ | २९८ |
| असाध्यल॰ | २९९ |


## ५३ उपदंशनिदान.


| | |
|---|---|
| कारण | २९९ |
| वातोपदंशलक्षण | २९९ |
| पित्तवरक्तोपदंशल॰ | ३०० |
| कफोपदंश | ३०० |
| सान्निपातोपदंश | ३०० |
| असाध्यलक्षणें | ३०० |
| लिंगवर्तिल॰ | ३०१ |


## ५४ शूकदोषनिदान.


| | |
|---|---|
| संप्राप्ति | ३०१ |
| सर्षपिकाल॰ | ३०२ |
| अष्ठीलिका | ३०२ |
| ग्रथित | ३०२ |
| कुंभिका | ३०२ |
| अलजी | ३०३ |
| मृदित | ३०३ |
| संमूढपिटिका | ३०३ |
| अवमंथ | ३०३ |
| पुष्करिका | ३०३ |
| स्पर्शहानि | ३०४ |
| उत्तमा | ३०४ |
| शतपोनक | ३०४ |
| त्वक्पाक | ३०४ |
| शोणितार्बुद | ३०४ |
| मांसार्बुद | ३०५ |
| मांसपाक | ३०५ |
| विद्रधि | ३०५ |
| तिलकालक | ३०५ |
| असाध्यशूकदोष | ३०६ |


## ५५ कुष्ठनिदान.


| | |
|---|---|
| कारणें | ३०६ |
| सप्तमहाकुष्ठें | ३०७ |
| कुष्ठांचेंपूर्वरूप | ३०८ |
| सप्तमहाकुष्ठांचीं ल॰ | ३०८ |
| १ कापाल २ औदुंबर ३ मंडल ४ ऋष्यजिव्ह ५ पुंडरीक ६ सिध्म (शिबें) ७ काकणाकुष्ठ | ३०८, ३०९ |
| एकादशक्षुद्रकुष्ठांचीं ल॰ | ३१० |
| १ चर्मकुष्ठ २ किटिभकुष्ट ३ वैपादिक ४ अलसककुष्ठ ५ दद्रुमंडलकु॰ ६ चर्मदल ७ पामा (खरूज) | ३११ |
| ८ कच्छुकुष्ट ९ विस्फोटक १० शतारु ११ विचर्चिका | ३१२ |
| वातजादिकुष्ठल॰ | ३१२ |
| रसादिधातुगतकुष्ठलक्षणें | ३१३ |
| साध्यादिभेदवपथ्यान्नदोष | ३१५ |
| किलासनिदान | ३१६ |
| वातादिभेदानेंत्यांचीं ल॰ | ३१६ |
| श्वित्राचेंसाध्यासाध्यलक्ष॰ | ३१७ |

अं० प्र० — पृष्ठ

किलासाचेंअसाध्यल० ३१७
सांसर्गिकरोग ३१७

५६ शीतपित्तनिदान.

संप्राप्ति.
पूर्वरूप.
उदर्दलक्षण. } ३१८
उदर्दाचादुसराधर्म
कोठलक्षण } ३१५

५७ अम्लपित्तनिदान.

निदानपूर्वकअम्लपित्ताचेंरूप
अम्लपित्ताचेंलक्षण
अम्लपित्ताचेप्रकार २ पैकीं } ३२०
अधोगताचेंलक्षण
ऊर्ध्वगताचेंलक्षण } ३२१
कफपित्तजन्यअम्लपित्तल०
साध्यासाध्यविचार
अम्लपित्तामध्येंइतरदोषांचा संसर्ग
वातयुक्तअम्लपित्ताचेंल० } ३२२
कफयुक्तअम्लपित्ताचेंल० ३२३
वातकफयुक्तअम्लपित्त ३२३
कफपित्ताचेंल० ३२३

५८ विसर्पनिदान.

त्याचीनिदानपूर्वकसंख्या, संप्राप्तिआणिनिरुक्ति. } ३२४
विसर्पाचींदोषदूष्यें ३२४

प्र० अं० — पृष्ठ

वातजादिविसर्पांचींल० ३२४
अग्निविसर्प (अग्याधांवरें) ३२५
ग्रंथिविसर्प ३२६
कर्दमविसर्प ३२७
क्षतजविसर्प ३२८
उपद्रव
साध्यासाध्यलक्षण } ३२९

५९ विस्फोटनिदान.

कारणें ३२९
विस्फोटस्वरूप
वातजादिविस्फोटांचींल० } ३३०
रक्तजविस्फोट
साध्यासाध्यविचार
उपद्रव } ३३१

६० मसूरिकानि० (देवी)

कारणवसंप्राप्ति
पूर्वरूप } ३३३
वातजादिमसूरिकाल० ३३४
चर्मपिटिका
रोमांतिक (गोवर) } ३३५
रसादिसप्तधातुगत मसूरिकालक्षणें } ३३६
त्याचें दोषसंबंधानेंल० ३३८
धातुगतआणिदोषजमसूरिकांमध्यें साध्य कोणत्या
कष्टसाध्यल०
असाध्यमसूरिका } ३३९

प्र.अं. पृष्ठ

मसूरिकांचेंअवस्थाविशेषेंकरून लक्षण ३३९
मसूरिकांचेउपद्रव ३३९

६१ क्षुद्ररोगनिदान.

अजगल्लिका ३४०
यवप्रख्या ३४१
अंधालजी
विवृतापिटिका
कच्छापिका
वल्मीक ३४२
इंद्रवृद्धा
गर्दभिका ३४३
पाषाणगर्दभ
पनसिका
जालगर्दभ
इरिवेल्लिका ३४४
कक्षा(खाकमांजरी)
गंधनाम्नी
अग्निरोहिणी(काळपुळी)
चिप्य (नखुर्डे) ३४५
अनुशयी
विदारिका
शर्करा ३४६
शर्करार्बुद
पाददारी
कदर(कुरूप)
अलस (चिखल्या) ३४७
इंद्रलुप्त (चाई)
दारुण(दारणा) ३४७
अरुंषिका(खवडे) ३४८
पलित(केंसपिकणें)
तारुण्यपिटिका(मुरमाच्यापुळ्या)
पद्मिनीकंटक
जंतुमणि ३४९
मष(मस)
तिलकालक(तीळ)
न्यच्छ ३५०
व्यंग(वांग)
नीलिका
परिवर्तिका
अवपाटिका ३५१
निरुद्धप्रकाश
सन्निरुद्धगुद ३५२
अहिपूतन
वृषणकच्छू ३५३
गुदभ्रंश
सूकरदंष्ट्र

६२ मुखरोगनिदान.

संख्या ३५४
ओष्ठरोग ८
दंतमूलगत १५ रोग ३५६
दंतरोग ८ ३५९
जिव्हारोग ५ ३६१
तालुरोग ९ ३६२
कंठरोग १७ ३६४
मुखपाक ३७०

प्र॰ अं॰ पृष्ठ

असाध्यमुखरोग ३७१

६३ कर्णरोगनिदान.

१ कर्णशूळ, २ कर्णनाद ३ बाधिर्य ४ कर्णक्ष्वेड ५ कर्णस्राव ६ कर्णकंडु ३७२

७ कर्णगूथ ८ कर्णप्रतिनाह ९ कृमिकर्ण ३७३

कानांतपतंगादिकीटकगेल्याचेंलक्षण. ३७४

१० कर्णविद्रधि ११ कर्णपाक १२ पूतिकर्ण ३७४

१३ कर्णशोथ १४ कर्णार्बुद १५ कर्णार्श ३७५

चरकोक्तकर्णरोग ३७५

कर्णपालीचेरोग ३७६

कर्णशोथ, उत्पात, उन्मंथक ३७६

दुःखवर्धन, परिलेही ३७७

६४ नासारोगनिदान.

पीनस, पूतिनस्य ३७७

मांसापाक, पूयरक्त, क्षवथु ३७८

भ्रंशथु, दीप्त, प्रतीनाह, स्राव ३७९

व नासापरिशोष, आमपक्वादिलक्ष॰ ३८०

प्रतिश्याय ५ प्रकारचा ३८०

वातिकादिप्रतिश्यायांचीलक्ष॰ ३८२

दुष्टप्रतिश्याय, रक्तप्रतिश्याय असाध्यलक्ष॰ ३८३

प्रतिश्यायबादलेअसतांजे विकारहोतातते. ३८४

शेषसंख्यापूरणार्थदुसरेनासारोग ३८४

६५ नेत्ररोगनिदान.

कारण, ३८५

अभिष्यंदरोग. ३८६

अधिमंथरोग, ३८८

नेत्ररोगांचीसामनिरामलक्ष॰ ३८९

सशोथअक्षिपाकलक्षण, ३८९

हताधिमंथाचेंलक्षण, ३८९

वातपर्यय, शुष्काक्षिपाक. अन्यतोवात, ३९०

अम्लाध्युषित, शिरोत्पात, शिराहर्ष, सव्रणशुक्र, ३९१

अव्रणशुक्र, ३९२

तेंअवस्थाविशेषानें कृच्छ्रसाध्य व असाध्य होतें. ३९३

अक्षिपाकात्यय. अजकाजात. दृष्टिरोग, ३९४

द्वितीयतृतीयपटलगतरोग ३९५

चतुर्थपटलगततिमिरलक्ष॰ ३९६

तृतीयपटलगतकाच्यालादुसरीसंज्ञा. ३९७

दोषविशेषानें रूपदर्शन. ३९७

परिम्लायितिमिररोग. लिंगनाश ६ प्रकारचा. ३९८

वातिकरोगांचेंविशेषलक्ष॰ दृष्टिमंडलगतरोग. ३९९

प्र॰ अं॰ पृष्ठ
दृष्टिरोगांची संख्या ........ ४००
पित्तविदग्धदृष्टि, दिवांध्य, कफविदग्धदृष्टि ........ ४००
नक्तांध्य (रातांधळें), धूमदर्शी, ऱ्हस्वदृष्टि, नकुलांध्य ........ ४०१
गंभीरदृष्टि, आगंतुजलिंगनाश, अनिमित्ताचेंलक्षण ........ ४०२
अर्मरोग (वडस) ५ प्रकारचे, शुक्तिरोग, अर्जुन (आह्निरा) ........ ४०३
पिष्टक, जाल, शिराजपिटिका, बलास, पूयालस, ........ ४०४
उपनाह, स्रावकिंवानाडी ........ ४०५
पर्वणी, व अलजी, कृमिग्रंथि; वर्त्मरोग ........ ४०६
कुंभिका, पोथकी, वर्त्मशर्करा, अर्शोवर्त्म ........ ४०७
शुष्कार्श, अंजना, बहलवर्त्म, वर्त्मबंध ........ ४०८
क्लिष्टवर्त्म, वर्त्मकर्दम, श्यावर्त्म, प्रक्लिन्नवर्त्म ........ ४०९
अक्लिन्नवर्त्म, वातहतवर्त्म, अर्बुद, निमेष. ........ ४१०
शोणितार्श, लगण, बिसवर्त्म कुंचन. ........ ४११

प्र॰ अं॰ पृष्ठ
पक्ष्मकोप, पक्ष्मशात ........ ४१२

## ६६ शिरोरोगनिदान.

वातज, पैत्तिक, श्लैष्मिक, ........ ४१३
सान्निपातिक, रक्तज, क्षयज, कृमिज, ........ ४१४
सूर्यावर्त, अनंतवात ........ ४१५
अर्धावभेदक (अर्धशिशी) शंखक, ........ ४१६

## ६७ स्त्रीरोगनिदान.

प्रदरनिदान ........ ४१७
प्रदराचेंसामान्यरूप ........ ४१७
उपद्रव ........ ४१७
श्लैष्मिकादिप्रदरल॰ ........ ४१८
विशुद्धार्तवल॰ ........ ४१९
योनिव्यापत्तिनिदान ........ ४२०
योनिकंदनिदान ........ ४२०
वातिकादियोनिकंदल॰ ........ ४२२
मूढगर्भनिदान ........ ४२३
गर्भपात ........ ४२३
स्रावआणिपातयांचाकाल ४२३
अकालींगर्भपडण्याचेंकारण ४२४
प्रसूतिहोतेवेळींमूढगर्भक-शानें होतोतो ........ ४२४
मूढगर्भाच्याआठप्रकार-च्यागति ........ ४२४
असाध्यमूढगर्भ वगर्भि-णीचेंलक्षण ........ ४२५

प्र॰ अं॰ पृष्ठ

पोटांतगर्भमेल्याचेंल॰ गर्भमरणहेतु गर्भिणीचेंदुसरेंअसाध्यल॰ ... ४२६
सूतिकारोग(बाळंतरोग) नि॰ स्तनरोगनिदान ... ४२७
स्तन्यरोग,वातादिकांनीं दूषित दुग्धांचीलक्षणें ... ४२८
शुद्धदुग्धाचेंलक्षण ... ४२९

६८ बालरोगनिदान.

लेंकरांच्याअंतर्गत वेदना जाणण्याचाउपाय ... ४३०
कुकूणक,पारिगर्भिक, ... ४३१
तालुकंटक महापद्मविसर्प आणि दुसरे विकार ... ४३२
सामान्यग्रहजुष्टलक्ष॰ स्कंदग्रिहीतलक्षण ... ४३३
स्कंदापस्मार,शकुनिग्रह, रेवतीग्रहलक्षण ... ४३४
पूतनाग्रह, अंधपूतना, शीतपूतना, मुखमंडिका ... ४३५
नैगमेयग्रहल॰ ... ४३६

६९ विषनिदान.

स्थावरजंगमविषें ... ४३६
जंगमविषांचेंसामान्यल॰ ... ४३६
स्थावरविषांचेंसामान्यल॰ ... ४३७
विषघालणाराचेंल॰ ... ४३७
मूलादिविषांचील॰ ... ४३८
विषलिप्तशस्त्रहतल॰ ... ४३९
सर्पांच्याजाति ... ४३९
भोगिप्रभृतिसर्पांच्यादंशा वरवातादिकांचेंल॰ ... ४४०
विशिष्टदेशावरवविशिष्टनक्षत्रावरडसल्याचेंअसाध्यल॰ ... ४४०
उष्णाच्यायोगानेंविषाचाजोर असाध्यलक्षण ... ४४१
दूषीविष ... ४४२
त्याचेंलक्षण ... ४४२
स्थानभेदानेंत्याचेंविशिष्टल॰ ... ४४३
रसादिधातुगत विषाचेंसामान्यलक्षण ... ४४४
दूषीविषाचीनिरुक्ति ... ४४५
दूषीविषेंदोनप्रकारचींतीं ... ४४५
त्याचेंसाध्यादिल॰ लूताविष,वत्यांच्या दंशाचेंसामान्यल॰ ... ४४६
दूषीविषलूतांचेंदंशल॰ प्राणहरलूता,दूषीविषयुक्तल॰ ... ४४७
प्राणहरमूषकविषल॰ कृकलास(सरडा) दष्टल॰ वृश्चिकविषल॰ असाध्यलक्षणें ... ४४८
कणभदष्टल॰ उच्चिटिंगविषल॰ मंडूक(बेडूक)विषल॰ सविषमत्स्यदष्टल॰ सविषजलौकादष्टल॰ ... ४४९

प्र· अं · · · पृष्ठ
गृहगोधिका (पाल) विषल० · · ) 
शतपदी (गोम) विषल० · · } 
मशक (डास) विषल० · · } ४५०
असाध्यमशकदंशाचेंल० · · }
सविषमक्षिकादंशल० · · )
चतुष्पादादिकांचेंसाधारण-विष · · } ४५१
विषउतरल्याचेंलक्षण. · · )

इतिमाधवनिदानसमाप्त.

## परिशिष्ट.

७० षांढ्यनिदान.

आसेक्यनपुंसकाचेंल० · · ४५२
सौगंधिकनपुंसक · · ४५२
कुंभिकषंढाचेंल० · · ४५२
ईर्ष्यकषंढाचेंल० · · ४५३
महाषंढलक्ष० · · ४५३
नारीषंढल० · · ४५३

७१ अलर्कविषनिदान.

कुत्र्याच्यादंशाचेंल० · · ४५४

प्र· अं · · · पृष्ठ
सविषनिर्विषदंशाचेंल० · · ४५४
असाध्यलक्षण · · ४५५
जलसंत्रासरोग · · ४५५

७२ स्नायुकनिदान. · · ४५५

७३ शुक्रार्तवदोष · · ४५६
आर्तवदोष · · ४५७

७४ मंथरकज्वर (मधुराज्वर) लक्षण · · ४५८

७ विष्टंभगर्भ (सल) उपविष्टकगर्भ. · · ४५९

रोगानुक्रमणिका · · ४५९

ग्रंथसमाप्ति · · ४६०

इतिमाधवस्यानुक्रमणिकासमाप्ता.

श्री.

# माधवनिदानप्रारंभ.

प्रथमत: माधवाचार्य, ग्रंथनिर्विघ्नपणें समाप्तीसजावा. याबुद्धीनें शिवाचें मंगल करितात.

श्लोक

प्रणम्यजगदुत्पत्तिस्थितिसंहारकारणम्॥स्वर्गा पवर्गयोर्द्वारं त्रैलोक्यशरणंशिवम्॥१॥ ॥

अर्थ— जगताची उत्पत्ति, पालन आणि संहार यांस कारणभूत, स्वर्ग ह्मणजे सुख, अपवर्ग ह्मणजे मोक्ष यांचें द्वार ह्मणजे उपाय, आणि-त्रैलोक्याचें रक्षण करणारा असा जो शिव त्याला नमस्कार करून हा पुढील ग्रंथ रचितों, असा पुढील श्लोकांत संबंध आहे.

स्वर्ग मोक्षाचें द्वार ह्मणून सांगीतलें, येणें करून सकलपुरुषार्थ हेतुत्व सूचविलें, कारण सुखप्राप्ति आणि दुःखनाश या व्यतिरिक्त पुरुषार्थच नाहीं. हरादि अन्य पर्याय शब्द असतां येथें ग्रंथकारानें शिवपदाची योजना अशासाठीं केली कीं, अध्ययन करणारांचें कल्याण व्हावें. लोकांचें कल्याण करितो ह्मणून महेश्वराला शिव असें ह्मणतात.

नानामुनीनांवचनेरिदानींसमासतःसद्भिषजांनियोगात्॥ सोपद्रवारिष्टनिदानलिंगोनिबध्यतेरोगविनिश्चयोयम्॥२॥

अर्थ– नाना प्रकारच्या ऋषींच्या वचनांनीं, आणि सद्वैद्यांच्या आज्ञेनें, उपद्रव, मरणसूचक चिन्ह, रोगोत्पादक हेतु, आणि रोग ज्ञापक हेतु, यां सहित रोगांचा निर्णय ज्यांत सांगितला आहे असा हा ग्रंथ आह्मीं संक्षेपानें रचितों.

नानातंत्रविहीनानां भिषजामल्पमेधसाम्॥ सुखं विज्ञातुमातंकमयमेव भविष्यति॥ ३॥

अर्थ– नाना प्रकारचीं तंत्रें (शास्त्रें) ज्यांस माहित नाहींत, अशा अल्प बुद्धीच्या वैद्यांस सुखानें रोग ज्ञान होण्यास हाच ग्रंथ उपयोगीं पडेल.

व्याधी जाणण्याचे उपाय पांच आहेत ते सांगतों.

निदानं पूर्वरूपाणि रूपाण्युपशयस्तथा॥ संप्राप्तिश्चेति विज्ञानं रोगाणां पंचधा स्मृतम्॥ ४

अर्थ– निदान, पूर्वरूप, रूप, उपशय, आणि संप्राप्ति, हे पांच प्रकार रोग जाणण्या साठीं सांगितले आहेत, त्या निदान पंचकाचा अर्थ पुढें सांगितला आहे.

निदान सांगतों.

निमित्त हेत्वायतन प्रत्ययोत्थान कारणैः॥ निदानमाहुः पर्यायैः

अर्थ– निमित्त, हेतु, आयतन, प्रत्यय, उत्थान, आणि कारण, त्या पर्याय शब्दांस निदान असें ह्मणतात. निदान ह्मणजे रोगाचें आदि कारण समजावें.

पूर्वरूप सांगतों.

प्राग्रूपं येन लक्ष्यते॥ ५॥ उत्पित्सुरामयो दोषविशेषेणानधिष्ठितः॥

अर्थ— पूर्वरूप ह्मणजे जेणें करून पुढें होणारा व्याधिविशेष समजण्यांत येतो तें. तें दोन प्रकारचें. एक सामान्य, आणि दुसरें विशिष्ट; सामान्य प्राग्रूप असें कीं, दोष विशेषानें असंबद्ध असा उत्पन्न होणारा व्याधिच्या लक्षणानें समजतो तें पूर्वरूप होय.

विशिष्टप्राग्रूपाचें लक्षण सांगतो

लिंगमव्यक्तमल्पत्वाद्व्याधीनांतद्यथायथम्॥ ६॥

अर्थ— व्याधि अल्प असल्या मुळें जें अस्पष्ट लक्षण होतें तें विशिष्ट प्राग्रूप; ह्मणजे त्या त्या व्याधीचें तें तें अव्यक्त रूप होय.

रूप सांगतो.

तदेव व्यक्ततांयातंरूपमित्यभिधीयते॥ संस्थानंव्यंजनंलिंगं लक्षणंचिन्हमाकृतिः॥ ७॥

अर्थ— तेंच पूर्वरूप व्यक्त झालें ह्मणजे त्याला रूप असें ह्मणतात. संस्थानादिक त्या रूपाचे पर्याय शब्द आहेत. चरकानें रूपानें लक्षण सांगितलें आहे तें असें— व्याधीच्या ज्ञानासाठीं जीं लक्षणें सांगितलीं असतात, त्यानां रूपें ह्मणावीं.

उपशाय सांगतो.

हेतुव्याधिविपर्यस्तविपर्यस्तार्थकारिणाम्॥ औषधान्नविहाराणामुपयोगंसुखावहम्॥ ८॥ विद्यादुपशयंव्याधेःसहिसात्म्यमितिस्मृतः॥ विपरीतोनुपशयोव्याध्यसात्म्यमितिस्मृतः॥ ९॥

अर्थ— हेतुविपरीत, व्याधिविपरीत, हेतुव्याधिविपरीत, हेतुविपर्यस्तार्थकारि, व्याधिविपर्यस्तार्थकारि, आणि हेतुव्याधिविपर्यस्तार्थकारि, अशीं औषधें, अन्नें, आणि विहार, यांचा जो सुखकारक-

उपयोग त्याला व्याधीचा उपशय ह्मणावा, व्याधिसात्म्य, हा त्याचा पर्याय शब्द सांगितला. औषधादिकांचा दुःखकारक जोउपयोग त्यास अनुपशय ह्मणतात. व्याध्यसात्म्य हा त्याचा पर्याय शब्द होय.

आंतां यांचे उदाहरणाचे कोष्ठक.

| नांवें | औषध. | अन्न | विहार. |
|---|---|---|---|
| हेतुविपरीत | शीतज्वरावर सुंठीवगेरे ऊष्ण | श्रम वायूपाणीं झालेल्या व्याधीस मांसरस व भात | दिवानिद्रेनें झालेल्या कफास रात्रीजागरण. |
| व्याधिविपरीत. | अतिसारावर स्तंभन.पाहाडमूल वगेरे. विषावर शिरीष.कुष्ठ. रेंवेर. मेहास, हळद. | अतीसारास स्तंभन. मसूरादि | उदावर्तावर प्रवाहण ह्म. कुंथणें(वायूला वररवालीं नेणें) मंत्र, देवता, गुरूंचीउपासना करणें. |
| हेतुव्याधिविपरीत. | वायूचे सुजेवर दशमूळ वातहर आणि शोथहर | वातकफग्रहणीवर ताक वातहर व कफहर ग्रहणीहर. शीत वातज्वरावर पेज. | स्निग्धजोदिवानिद्रा तिजपासून झालेल्या तंद्रेवर रूक्षरात्रीजागरण |
| हेतुविपर्यस्तार्थकारि. | पित्तप्रधानव्रणशोथावर पित्तकर ऊष्णपिंडी बांधणें. | पच्यमानव्रणशोथावर विदाहि अन्न. | वातोन्मादास त्रास देणें. |
| व्याधिविपर्यस्तार्थकारि. | ओकारीवर ओकीरी करणारे गेळफळ. | अतिसारावर रेचकारक दूध. | ओकारीवर वमनासाठीं ओकारी बळानें आणणें. |
| हेतुव्याधिविपरीतार्थकारि. | अग्नीनें पोळल्यावर ऊष्ण अगरूचा लेप. अथवा विषावर विष | मद्यानें झालेल्या उन्मादावर मादकमद्यपान | आमजनित संमूढवायूवर. पोहणें. प्रवाहण व.रून.व्यायाम करणें |

या प्रमाणें उपशयाचें लक्षण जाणावें.

संप्राप्तिसांगतो.

यथादुष्टेन दोषेणयथाचानुविसर्पता।। निर्वृत्तिरा
मयस्यासोसंप्राप्तिर्जातिरागतिः।। १०।।

अर्थ–दोषांची दुष्टि अनेक प्रकारची आहे, म्हणून स्वकारणानें दुष्ट झालेल्या दोषातें स्वस्थान सोडून ऊर्ध्वाधस्तिर्यगादिभेदानें चहूंकडे फिरून जीरोगाचीउत्पत्ति होते तिला संप्राप्ति म्हणजे दोषांची इति कर्तव्यता म्हणावी, जाति आणि आगति हे दोनतिचे पर्याय शब्द आहेत.

संप्राप्तीचे औपाधिक भेद सांगतो.

संख्याविकल्पप्राधान्यबलकालविशेषतः।।साभिद्यते.

अर्थ– संख्या, विकल्प, प्राधान्य, अप्राधान्य, बल, अबल, आणि काल. हे संप्राप्तीचे भेद आहेत.

संख्यादिकांचेंविवरण करितो.

यथा त्रैव वक्ष्यंते ष्टोज्वराइति।। ११।।

अर्थ– जसे त्याच ग्रंथांत ज्वर आठ प्रकारचे सांगावयाचे आहेत. त्याला संख्यारूप संप्राप्ति म्हणावें.

विकल्परूपसंप्राप्तिसांगतो.-

दोषाणांसमवेतानांविकल्पोंऽशांश कल्पना।।

अर्थ– परस्पर संबद्ध जाहलेले जे दोष म्हणजे वात, पित्त, कफ, त्यांची अंशांशकल्पना म्हणजे वातादिगतरोक्ष्यादिक धर्म ते एक दोन तीन, किंवा सगळे होऊन जी वातादिकांच्या कोपाची कल्पना करणें ती सविकल्प असें म्हणावें, अशा प्रकारचा दोष कोप निदान वैद्यि-

त्यानें होतो, उदाहरण. रोक्ष्य, शैत्य, लाघव, आणि वैशद्य इत्यादि गुण संपन्न जो वायू त्याचा, रोक्ष्यादि गुणसंपन्न कषाय रस आणि वाटा णा सर्वभावानें वर्धक आहे. तसेंच विस्वदरससर्व भावानीं पित्ताचा वर्धक आहे. आणि कटु, ऊष्ण, तीक्ष्णत्वानें हिंग ही पित्ताचा वर्धक आहे. तसेंच मधुर रस आणि ह्मशीचें दूध. हें सर्व भावें करून कफाचें वर्धक आहे इत्यादि.

## प्राधान्यरूपसंप्राप्ति.

स्वातंत्र्यपारतंत्र्याभ्यां व्याधेः प्राधान्य मादिशेत्॥१२

अर्थ— व्याधि स्वातंत्र्यानें प्रधान आणि पारतंत्र्यानें अप्रधान समजावी.

## बलरूपसंप्राप्ति.

हेत्वादि कात्स्न्यावयवैर्बलाबलविशेषणम्॥ ॥

अर्थ— हेत्वादिक सगळे असलेतर व्याधी बलवान् जाणावा, आणि थोडे असलेतर निर्बळ जाणावा.

## कालरूपसंप्राप्ति.

नक्तं दिनर्तुभुक्तांशैर्व्याधिकालोयथामलम्॥

अर्थ— नक्त ह्मणजे रात्र, दिन ह्मणजे दिवस, ऋतु ह्मणजे वसंतादिक, भुक्त ह्मणजे आहार, यांचे अंश ह्मणजे एक देश, तीं हीं करून दोषानुसारें करून व्याधीचा काळ जाणावा, ह्मणजे-रात्रीचे तीन भाग करून त्यांत पहिला भाग कफाचा, मधला-पित्ताचा, आणि शेवटचा वायूचा; या प्रमाणेंच दिवसाचे भाग-समजावे, वसंतकाळ कफाचा, शरत्काळ पित्ताचा, वर्षाकाळ वायूचा; या प्रमाणें जेवण होतांच कफाचा काळ, मध्यें अन्नाच्या-

पच्य मान अवस्थेमध्यें पित्ताचा, आणि अन्नाचा चांगला पाक झा ल्यावर वायूचा प्रकोप काळ समजावा. त्या काळा वरून त्या त्या दोषाचें ज्ञान होण्यास कठीण पडणार नाहीं.

निदान पंचकाचा उपसंहार.

इति प्रोक्तो निदानार्थः स व्यासेनोपदेक्ष्यते॥

अर्थ— या प्रमाणें निदान ह्मणजे काय? हें संक्षेपानें सांगीतलें, याचा विस्तार प्रति रोगास निदान पूर्वरूपादिकें करून पुढें सांगूं.

रोगाला कारण दोन प्रकारचें, एक दूरचें, व एकजवळचें. त्यांत आहारादिक हें दूरचें, आणि वातादिक हें जवळचें कारण होय. सर्व रोगांस वातादिक हेच कारण आहेत हें सांगतों.

सर्वेषामेव रोगाणां निदानं कुपिता मलाः॥
तत्प्रकोपस्य तु प्रोक्तं विविधाहितसेवनम्॥

अर्थ— कुपित झालेले वात, पित्त, आणि कफ, हे सर्व रोगाला कारण होतात. आणि नाना प्रकारचें अपथ्य सेवन हें वातादिकांच्या कोपाला कारण आहे.

याखेरीज दुसरेंही रोगाला कारण आहे तें सांगतों.

निदानार्थकरो रोगो रोगस्याप्युपजायते॥ तद्यथा ज्वरसंतापाद्रक्तपित्तमुदीर्यते॥ रक्तपित्ताज्ज्वरस्ताभ्यां श्वासश्चाप्युपजायते॥ प्लीहाभिवृद्ध्या जठरं जठराच्छोफ एव च॥ अर्शोभ्यो जाठरं दुःखं गुल्मश्चाप्युपजायते॥ प्रतिश्यायादथो कासः कासात्संजायते क्षयः

क्षयोरोगस्य हेतुत्वे शोषस्याप्युपजायते ॥१७॥

अर्थ— रोग ही रोगाचा निदानार्थ करणारा होतो, ह्मणजे रोगापासून रोग उत्पन्न होतो. या विषयीं येथेंच दृष्टांत सांगतो. ज्वर संतापा पासून रक्तपित्त उद्भवतें; रक्तपित्ता पासून ज्वर उत्पन्न होतो; रक्तपित्त आणि ज्वर यां पासून श्वास उत्पन्न होतो; प्लीहा (कवळू) वादला ह्मणजे उदर रोग होतो; उदरा पासून सूज येत्ये; मुळव्याधीपासून उदररोग आणि गुल्मरोग उत्पन्न होतात; पडशापासून खोकला उत्पन्न होतो; खोकल्या पासून ओजः प्रभृति धातूंचा क्षय होतो; आणि हा क्षय, राजयक्ष्मा म्हणून जो सर्व रोगांमध्यें राजा आहे त्याला उत्पन्न करितो,

रोगोत्पादक जे हे रोग सांगितले ते उत्पन्न
होतां क्षणींच दुसरा रोग उत्पन्न करितात.
किंवा मागून कांहीं वेळानें करितात हें सांगतो.

ते पूर्वं केवला रोगाः पश्चाद्धेत्वर्थकारिणः ॥ ॥

अर्थ— ते रोग पूर्वी स्वतंत्र असून मागून त्यांना कांहीं पुष्टबल मिळालें असतां हेत्वर्थकारी ह्मणजे रोग उत्पन्न करितात- जसा ज्वर रक्तपित्तास उत्पन्न करितो.

त्या रोगजनक व्याधींचें वैचित्र्य सां०

कश्चिद्धि रोगो रोगस्य हेतुर्भूत्वा प्रशाम्यति ॥ न प्रशाम्यति चाप्यन्यो हेत्वर्थं कुरुतेपि च ॥ एवं कृच्छ्रतमा नृणां दृश्यन्ते व्याधिसंकराः ॥

अर्थ— कोणी एक रोग दुसऱ्या रोगाला कारण होऊन शांत होतो; दुसरा, रोगाला उत्पन्न करून तसाच राहातो, आमसापों.

मनुष्यांस व्याधीचे संकर मोठे क्लेशदायक दिसतात, जसें, पडसें न जातां खोकला उत्पन्न होतो, मुळव्याध न जातां उदर आणि गुल्म हे होतात, हे नाना प्रकारचे व्याधी उत्पन्न करून दुःख देतात, आणि बहुत करून त्यावर चिकित्सा विरुद्ध असल्ये, ह्मणून हे रोग कष्टतम आहेत.

पूर्वी सांगीतलें निदानपंचक अव
श्यजाणावें ह्मणून सांगतात.

तस्माद्यत्नेन सद्वैद्यैरिच्छद्भिःसिद्धिमुत्तमाम्॥ज्ञा
तव्योवक्ष्यतेयोयंज्वरादीनांविनिश्चयः॥

अर्थ– ह्मणून उत्तम सिद्धि मिळावी अशी ज्या सद्वैद्यांची इच्छा आहे, त्याणीं ज्वरादिकाचें निदान जें पुढें सांगावयाचें आहे तें प्रयत्नें करून जाणावें.

---

ज्वरनिदान.

सर्वरोगांमध्यें ज्वर प्रधान आहे ह्म
णून पहिल्यानें त्याचें निदान सांगतों.

दक्षापमानसंक्रुद्धरुद्रनिश्वाससंभवः॥ज्वरोष्ट
धापृथक्द्वंद्वसंघातागंतुजःस्मृतः॥

अर्थ– दक्षप्रजापतीपासून झालेल्या अपमानानें क्रुद्ध झालेला जो रुद्र ह्मणजे शिव, त्याच्या श्वासापासून उत्पन्न झालेला असा ज्वर आठ प्रकारचा आहे,– वात, पित्त, कफ, ईहींकरून ३ द्वंद्वज ३ सन्निपात १ आणि आगंतुकज १ मिळून संक्षेपानें ८ प्रकारचा सांगितला आहे.

## ज्वरसंप्राप्ति.

मिथ्याहारविहाराभ्यांदोषाह्यामाशयाश्रयाः॥
बहिर्निरस्य कोष्ठाग्निंज्वरदाःस्यूरसानुगाः॥

अर्थ– मिथ्या आहार आणि मिथ्या विहार यां पासून दुष्ट झालेले दोष (वातादिक) आमाशयाचा आश्रय करून कोष्ठाग्नीला बाहेर काढून रस धातूला मिळून ज्वर उत्पन्न करितात. ही संप्राप्ति शारीर ज्वराचीच आहे, आगंतुक ज्वरांची नव्हे. त्यानां दोष संबंध– मागून होतो,

## ज्वराचें लक्षण.

स्वेदावरोधःसंतापःसर्वांगग्रहणंतथा॥युगपद्य
त्ररोगेचसज्वरोव्यपदिश्यते॥

अर्थ—ज्यारोगामध्यें घाम नयेणें, देह, इंद्रिय, आणि मन, यांचा संताप, आणि सर्वांगास वेदना, हीं एक कालीं होतात त्याला ज्वर असें ह्मटलें आहे, — पित्त ज्वरांमध्यें घाम येतो, तेव्हां वरजें लक्षण सांगितलें त्याला दोष आला, यावर जेज्जटादिक समाधान करितात कीं, स्वेदावरोध ह्मणजे "स्विद्यते अनेनेति स्वेदः" या व्युत्पत्तीवरून स्वेद ह्मणजे अग्नि, त्याचा अवरोध ह्मणजे दोष व्याप्ति, असें केल्यानें लक्षणाचा व्यभिचार घडत नाहीं.

## ज्वराचें पूर्वरूप.

श्रमोरतिर्विवर्णत्वंवैरस्यंनयनप्लवः॥इच्छाद्वेषौ
मुहुश्चापिशीतवातातपादिषु॥जृंभांगमर्दोगुरुता
रोमहर्षोरुचिस्तमः॥अप्रहर्षश्च शीतंचभवंत्यु-
त्पत्स्यतिज्वरे॥सामान्यतोविशेषात्तुजृंभात्यर्थसमी

रणात्॥पित्तान्नयनयोर्दाहः कफान्नान्नाभिनंदनं॥

अर्थ— आयास केल्या वांचून श्रम, चैन न पडणें, शरीरास ग्लानि, तोंड बेचव, डोळे पाण्यानें भरून येणें, थंडी, वारा, आणि ऊन, यांवर वारंवार इच्छा आणि द्वेष होणें, जांभया, आंग मोडून येणें, अंगजड होणें, रोमांच उभारणें, अन्नावर वासना नसणें, नेत्रांत पडल्या सारिखें होणें, संतोष नसणें, फार थंडी वाजणें, आणि बालकादिकांचा द्वेष, ज्वर उत्पन्न होणार असतां हीं लक्षणें सामान्यतः सर्व ज्वरानां होतात, आतां विशेष सांगतों.— वायू पासून ज्वर यावयाचा असला तर जांभया फार येतात, पित्ता पासून डोळ्यांची आग होत्ये, आणि कफा पासून अन्न द्वेष होतो.

## वातज्वरलक्षण.

वेपथुर्विषमोवेगः कंठोष्ठमुखशोषणम्॥ निद्रानाशः क्षवस्तंभोगात्राणांरौक्ष्यमेवच॥ शिरोहृद्गात्ररुग्वक्त्रवैरस्यंगाढविट्कता॥ शूलाध्मानेजृंभणंचभवंत्यनिलजेज्वरे॥ २८

अर्थ— कंप होणें, अनियत काळीं ज्वर अधीक उणा होणें किंवा येणें, घसा, ओंठ, तोंड, यांस कोरड पडणें, निद्रा न येणें, शिंका न येणें, गात्रांनां रूक्षता, मस्तक, हृदय, गात्रें यांचे ठाईं वेदना, तोंडाला विरसपणा, शौचास खडा होणें, पोटांत दुखणें, व वायूनें पोट फुगून दुखणें, जांभया येणें, हीं लक्षणें वातज्वरांत होतात.

## पित्तज्वराचीं ल.

वेगस्तीक्ष्णोतिसारश्चनिद्राल्पत्वंतथावमिः॥ कंठोष्ठमुखनासानांपाकः स्वेदश्चजायते॥ प्रलापो

वक्त्रकटुता मूर्छा दाहो मदस्तृषा॥ पीतविण्मूत्रने
त्रत्वक् पैत्तिके भ्रम एव च॥३०॥

अर्थ— ज्वराचा वेग तीक्ष्ण, अतिसार होणें, थोडी निद्रा, वांती, गळा, ओंठ, तोंड, नाक, यांवर फोड, घाम, बडबड, तोंड तिखट, रूपादिकांचें अज्ञान, दाह, उन्मत्तपणा, ताहान, विष्ठा, मूत्र, नेत्र, यांचा पिंवळेपणा, चाकावर बसून फिरल्यासारखें वाटणें, हीं लक्षणें पित्तज्वरामध्यें होतात.

## कफज्वराचीं लक्ष०

स्तैमित्यं स्तिमितो वेग आलस्यं मधुरास्यता॥ शुक्ल
मूत्रपुरीषत्वक्स्तंभस्तृप्तिरथापि च॥ गौरवं शीत-
मुत्क्लेदो रोमहर्षोतिनिद्रता॥ प्रतिश्यायोरुचिः का
सः कफजेक्ष्णोश्च शुक्लता॥३२॥

अर्थ— आंग ओल्या वस्त्रानें गुंडाळल्यासारिखें भासणें, ज्वराचा वेग मंद, शक्ती असून काम करण्यास उत्साह नसणें, तोंडाला गोडी; मूत्र, मळ, आणि त्वचा, यांस पांढरेपणा, आंग ताठणें, तृप्तासारिखी अन्नावर वासना नसणें, आंगास जडपणा, थंडी वाजणें, ओकारी आल्यासारिखी वाटणें, आंगाला कांटा येणें, फार झोंप, पडसें, अरुचि, खोकला, डोळ्यांस पांढुरकी, हीं लक्षणें कफज्वरामध्यें होतात.

## वातपित्तज्वरल०

तृष्णा मूर्छा भ्रमो दाहः स्वप्ननाशः शिरोरुजा॥
कंठास्यशोषो वमथू रोमहर्षोरुचिस्तमः॥३३॥
पर्वभेदश्च जृंभा च वातपित्तज्वराकृतिः॥

अर्थ— ताहान, मूर्छा, भ्रम, दाह, निद्रानाश, मस्तकशूल, गळा, तोंड, यांचा शोष, मळमळ, रोमांच, अरुचि, अकस्मात अंधारांत पडल्या सारिखें भासणें, सांध्याचे ठाईं वेदना, जांभया, हें वातपित्तज्वराचें स्वरूप जाणावें.

### श्लेष्मवातज्वर.

स्तैमित्यं पर्वणां भेदो निद्रागौरवमेवच ॥ शिरोग्रहः प्रतिश्यायः कासः स्वेदाप्रवर्तनम् ॥ संतापोमध्यवेगश्च वातश्लेष्मज्वराकृतिः ॥ ३५ ॥

अर्थ— आंग आर्द्रवस्त्रानें गुंडाळल्या सारिखें भासणें, सांध्यानां फूट, निद्रा फार येणें, आंग जड, मस्तकावर भार, पडसें, खोकला, घाम थोडा येतो, शरीराचा दाह, ज्वराचा वेग मध्यम, या प्रमाणें वात श्लेष्मज्वराचें रूप जाणावें.

### श्लेष्मपित्तज्वर.

लिप्ततिक्तास्यता तंद्रा मोहः कासोरुचिस्तृषा ॥ मुहुर्दाहो मुहुः शीतं श्लेष्मपित्तज्वराकृतिः ॥ ३६

अर्थ— तोंड कडवट असून चिकट, झांपड, मोह, खोकला, अरुचि, ताहान, वारंवार दाह होतो, व वारंवार थंडी वाजल्ये, हें कफपित्तज्वराचें स्वरूप जाणावें.

### सन्निपातज्वरलक्षण.

क्षणेदाहः क्षणे शीतमस्थिसंधिशिरोरुजा ॥ सास्रावे कलुषे रक्ते निर्भुग्ने चापि लोचने ॥ सस्वनौ सरुजौ कर्णौ कंठः शूकैरिवावृतः ॥ तंद्रा मोहः प्रलापश्च कासश्वासोऽरुचिर्भ्रमः ॥ ३८ ॥ परिदग्धा खर

रस्पर्शाजिव्हाकस्तांगतापरम्॥ ष्ठीवनंरक्तपित्त
स्यकफेनोन्मिश्रितस्यच॥३९॥ शिरसोलोटनंतृष्णा
निद्रानाशोत्हृदिव्यथा॥स्वेदमूत्रपुरीषाणांचिराद्
र्शनमल्पशः॥४०॥ कृशत्वंनातिगात्राणांप्रततंकं
ठकूजनम्॥ कोठानांश्यावरक्तानांमंडलानांचदर्श
नम्॥४१॥मूकत्वंस्त्रोतसांपाकोगुरुत्वमुदरस्यच॥
चिरात्पाकश्चदोषाणांसन्निपातज्वराकृतिः॥४२॥

अर्थ— क्षणांत दाह व क्षणांत शीत, हाडें, संधि, मस्तक, यांचे ठाई- शूळ, डोळ्यानां पाणी येतें, व ते गढूळ, लाल व तार केलेअसतात, व कानांत शब्द होतो, व शूळ होतो, गळ्यांत भाताचें कूस लागल्या सारिखें दुखतें, झांपड, मोह, बडबड, खोकला, श्वास, अरुचि, भ्रम, व जीभ जळल्या सारिखी, व सागाच्या पाना सारिखी खरखरीत, अत्यंत आंग गळणें, रक्तपित्तानें मिश्रित असा कफाचा थेडका येतो, व मस्तक डोलतें, , ताहान, झोंप न येणें, उरांत दुखणें, घाम, मूत्र, मळ, हे फार वेळानें थोडे होतात, गात्रें अत्यंत कृश होत नाहींत, निरंतर गळा घुर घुर वाजतो, माशी चावल्या सारिख्या गांधी ये- तात, व काळसर व तांबूस वर्ण चकंदळें उठतात, व याचा अस त्ये, कान, नाक, तोंड, यांचे ठिकाणीं फोड येतात, व पोट जड होतें. वात, पित्त, कफ, यांचा पाक कालें करून होतो. हें सन्निपात ज्व- राचें रूप जाणावें,

ग्रंथांतरीचें त्रयोदशसन्निपातां
चें निदान सांगतों.

अम्लस्निग्धोष्णतीक्ष्णैः कटुमधुरकृशातापसेवा

कषायैःकामक्रोधातिरुक्षैर्गुरुतरपिशिताहारसौ
ह्यिस्यशीतैः॥शोकव्यायामचिंताग्रहगणवनिता-
त्यंतसंगप्रसंगैःप्रायःकुर्व्यंतिपुंसांमधुसमयशर
द्दर्षणेसन्निपाताः॥१॥

अर्थ—आंबट, स्निग्धोष्ण, तीव्र, उष्ण, मधुर, मद्य, ऊन, किंवा शीक, तुरट, काम, क्रोध, अतिरुक्ष, फारजड आकंठ भोजन, आणि मांस भक्षण, शीतपदार्थसेवन, शोक, श्रम, चिंता, पिशाचबाधा, फार- स्त्रीसंग, या कारणांनीं; आणि चैत्र, वैशाख, अश्वीन, कार्तिक, श्राव ण, भाद्रपद यामहिन्यांत; मनुष्यानां प्रायःसन्निपाताचा प्रकोप होतो.

### त्यासन्निपातांचींनांवें.

संधिकश्चांतकश्चैवरुग्दाहश्चित्तविभ्रमः॥शीतांग
स्तंद्रिकःप्रोक्तःकंठकुब्जश्चकर्णकः॥विख्यातोभ
ग्ननेत्रश्चरक्तष्ठीवीप्रलापकः॥जिव्हकश्चेत्यभिन्या
सःसन्निपातास्त्रयोदश॥३॥

अर्थ— संधिक, अंतक, रुग्दाह, चित्तविभ्रम, शीतांग, तंद्रिक, कंठ कुब्ज, कर्णक, भुग्ननेत्र, रक्तष्ठीवी, प्रलापक, जिव्हक, अभिन्यास, या प्रमाणें तेरा सन्निपात सांगीतले आहेत.

### त्यांचीमर्यादा.

संधिकेवासराःसप्तचांतकेदशवासराः॥रुग्दाहेविं
शतिर्ज्ञेयाचव्ध्यष्टौचित्तविभ्रमे॥४॥पक्षमेकंतुशीतां
गेतंद्रिकेपंचविंशतिः॥विज्ञेयावासराश्चैवकंठकु-
ब्जेत्रयोदश॥५॥कर्णकेचत्रयोमासाभग्ननेत्रेदिना
ष्टकम्॥रक्तष्ठीवीदशाहानिचतुर्दशप्रलापके॥६॥

जिव्हकेषोडशाहानि कलाभिन्यासलक्षणे ॥ परमायुरिदं प्रोक्तं म्रियतेतत्क्षणादपि ॥ ७ ॥

अर्थ— संधिकाला ७ अंतकाला १० रुग्दाहास २० चित्तविभ्रमाला २४ शीतांगाला १५ तंद्रिकाला २५ कंठकुब्जाला १३ कर्णकालातीन महिने, १० दिवस, भुग्ननेत्राला ८ रक्तष्ठीवीला १० प्रलापकाला १४ जिव्हकाला १६ अभिन्यासाला १६ दिवस, ही आयुष्याची परमावधि सांगीतली आहे, परंतु रोगी तत्क्षणीं मरतो.

## साध्यासाध्यविचार.

संधिकस्तंद्रिकश्चैवकर्णकः कंठकुब्जकः ॥ जिव्हकश्चित्तविभ्रंशः षट्साध्याः सप्तमारकाः ॥ ८ ॥

अर्थ— संधिक, तंद्रिक, कर्णक, कंठकुब्ज, जिव्हक, चित्तविभ्रंश, हे साहा साध्य; बाकीचे राहिलेले सात मारक आहेत.

## संधिक

पूर्वरूपकृतशूलसंभवंशोषवातबहुवेदनान्वितं ॥ श्लेष्मतापबलहानिजागरंसन्निपातमितिसंधिकंवदेत् ॥ ९ ॥

अर्थ—ज्याचा पूर्वरूपामध्यें शूल, शोष, वायूच्या फार वेदना, श्लेष्मोद्रेक, संताप, बलाहानि, जागरण, ही लक्षणें होतात त्याला संधिक असें ह्मणावें.

## अंतक

दाहंकरोतिपरितापनमातनोति मोहंददातिविदधातिशिरःप्रकंपं ॥ हिक्कांकरोतिकसनंचसमातनोति जानीहितंविबुधवर्जितमंतकाख्यम् ॥ १० ॥

**अर्थ**— दाह करितो, संतापाला वाढवितो, मोह देतो, शीर कांपवितो, उच-
की करितो. आणि कास वाढवितो. सन्निपात वेत्यांहीं सोडलेला असा-
हा **अंतक** सन्निपात जाणावा.

## रुग्दाह.

**प्रलापपरितापनप्रबलमोहमांद्यश्रमः परिभ्रमणवेदना-
व्यथितकंठमन्याहनुः ॥ निरंतरतृषाकरः श्वसनकासहि
क्काकुलः सकष्टतरसाधनोभवतिहंतिरुग्दाहकः ॥ ११ ॥**

**अर्थ**— बडबड, संताप, बळकट मोह, मंदत्व, अनायासानें श्रम, भोंवळ
या वेदनानीं युक्त, कंठ, मान, हनुवटी, यांचे ठाई वेदना, निरंतर तृषालाग-
णें, श्वास, कास, आणि उचकी या लक्षणांनीं व्याप्त असा हा रुग्दाह
कष्टसाध्य आहे. हा संनिपात मारितो.

## चित्तभ्रम.

**यदिकथमपिपुंसांजायतेकायपीडाभ्रममदपरितापो मो
हवैकल्यभावः ॥ विकलनयनहासोगीतनृत्यप्रलापी-
र्यभिदधतमसाध्यंकेपिचित्तभ्रमाख्यम् ॥ १२ ॥ ॥**

**अर्थ**— जर कोणत्याही प्रकारानें शरीराला पीडा होत आहे, व भ्रम,
धोतरा खाल्या सारिखी अवस्था, संताप मोह विकलपणा, डोळे व्या-
कुळ होणें, हंसणें. गाणें. नाचणें आणि बडबड करणें हीं लक्षणें होता-
त:तर त्या सान्निपाताला कोणी **चित्तभ्रम** म्हणतात. हा असाध्य आहे.

## शीतांग.

**हिमसदृशशरीरोवेपथुश्वासहिक्काशिथिलितसकलांगोखि
न्ननादोग्रतापः ॥ क्लमथुदवथुकासच्छर्द्यतीसारयुक्तस्त्वरित
मरणहेतुः शीतगात्रप्रभावात् १३ ॥ ॥ ॥**

अर्थ—शरीर बर्फासारिखें थंड, कंप, श्वास, उचकी, संपूर्ण आंग ढिलें होणें, स्वर खोल जाणें, अंतः उग्रसंताप, अनायासश्रम, मनाला संताप, खोकला, वांति, अतिसार या लक्षणानीं युक्त झालेल्या सन्निपातास शीतगात्र ह्मणावा. हा प्राणाचा त्वरित नाश करितो.

## तंद्रिक.

प्रभूतातंद्रार्तिज्वरकफपिपासाकुलतरोभवेच्छ्यामाजिह्वा पृथुलकठिनाकंठकलिता ॥ अतीसारःश्वासःक्लमथुपरितापःश्रुतिरुजोभृशंकंठेजाड्यंशयनमनिशंतंद्रिकगदे ॥ १४॥

अर्थ— तंद्रिक सन्निपातामध्यें झांपड फार असते. शूल, ज्वर, कफ, ताहान यांनीं रोगी फार पीडित होतो. जीभ श्यामवर्ण, दडस, कठिण आणि कांटाळलेली होते. व अतिसार, श्वास, ग्लानि, तलखी, कान दुःखणें घशांत जडत्व आणि रात्रंदिवस झोंप, हीं लक्षणें होतात. हा साध्य.

## कंठकुब्ज.

शिरोर्तिकंठग्रहदाहमोहकंपज्वरोरक्तसमीरणार्तिः ॥ हनुग्रहस्तापविलापमूर्च्छोस्यात्कंठकुब्जः खलुकष्टसाध्यः १५

अर्थ— कपाळ दुखणें, गळा दुखणें, दाह, बेसावधपणा, कंप, ज्वर, रक्तवातसंबंधीं पीडा, हनुवटी जखडणें, संताप, बडबड, आणि मूर्छा या लक्षणांनीं युक्त झालेल्या संनिपाताला कंठकुब्ज ह्मणावा. हा कष्टसाध्य आहे.

## कर्णक.

प्रलापश्रुतिह्रासकंठग्रहांगव्यथाश्वासकासप्रसेकप्रभावे ॥ ज्वरेतापकर्णांतयोर्गल्लपीडाबुधाःकर्णकंकष्टसाध्यंवदंति ॥ १६॥

अर्थ— बडबड, बधिरपणा, गळा धरणें, अंगांत तिडका, श्वास, खोकला, लालास्राव, ज्वर, संताप, कर्ण आणि गाल यांचे ठायीं पीडा, या लक्षणां-

नींयुक्त असा हा कर्णक होय. याला पंडित कष्टसाध्य ह्मणतात.

संनिपातज्वरस्यांतेकर्णमूले स्रुदारुणः ॥ शोथः संजायते-
तेनकश्चिदेवप्रमुच्यते ॥१७॥ ज्वरस्यपूर्वंज्वरमध्यतोवा
ज्वरांततोवाश्रुतिमूलशोथः ॥ क्रमादसाध्यः खलुकष्ट-
साध्यः सुखेनसाध्योमुनिभिः प्रदिष्टः ॥१८॥ ॥

**अर्थ**–संनिपातज्वराचेअंतीं कर्णमूळाचेठाईं मोठी भयंकर सूज येत्ये, ती पासून कोणी एखादा बरा होतो. ती सूज–ज्वराचे पूर्वीं आली असतां असाध्य; ज्वराच्यामध्यें आली असतां कष्टसाध्य; व ज्वराचेअंतीं आली असतां सुखसाध्य; असें मुनींनीं सांगितलें आहे.

## भुग्ननेत्र.

ज्वरबलापचयःस्मृतिशून्यताश्वसनभुग्नविलोचनमो-
हितः ॥ प्रलपनभ्रमकंपनशोफवान् त्यजतिजीवित
माशुसभुग्नदृक् ॥१९॥ ॥ ॥

**अर्थ**– ज्वरानें बलक्षय, स्मृतिनाश, श्वास, वक्रदृष्टी, बेसावधपणा, बडबड, भ्रम, कंप, आणि सूज हीं लक्षणें भुग्ननेत्र सन्निपातांत होतात. हा रोगी लवकर मरतो.

## रक्तष्ठीवी.

रक्तष्ठीवीज्वरवमितृषामोहशूलातिसाराहिक्काध्मा
नभ्रमणदवथुश्वाससंज्ञाप्रणाशः ॥ श्यामारक्ता-
धिकतररसनामंडलोत्थानरूपारक्तष्ठीवीनिगदि-
तइहप्राणहंताप्रसिद्धः ॥२०॥ ॥ ॥

**अर्थ**– रक्ताचीगुळणी, ज्वर, वांति, तृषा, मूर्छा, शूळ अतिसार उचकी, पोटफुगणें, चक्राच्याभ्रमणासारिखें भोंवणें, तलखी श्वा-

स, संज्ञानाश जिव्हा काळी किंवा रक्तवर्ण होते, व तिच्यावर मंडलें उठतात. ह्या लक्षणांनीं युक्त जो सन्निपात त्याला रक्तष्ठीवी म्हणतात. हा प्राणाचा नाशक म्हणून प्रसिद्ध आहे.

## प्रलापक.

कंपप्रलापपरितापनशीर्षपीडाप्रौढप्रभावपवमानपरोन्यचिंता ॥ प्रज्ञाप्रणाशविकलप्रचुरप्रवादः क्षिप्रंप्रयातिपितृपालपदंप्रलापी ॥२१॥ ॥ ॥

अर्थ— कंप, बडबड, संताप, कपाळ दुखणें, प्रौढ गोष्टी सांगणें, आणि स्वच्छपणाविषयीं आसक्त, दुसऱ्याची काळजी करणारा, बुद्धिनाश झालेला, विकल आणि पुष्कळ बडबड करणारा, असा हा प्रलापक सन्निपात रोगी यमसदनाप्रत जातो.

## जिव्हक.

श्वसनकासपरितापविव्हलः कठिनकंटकष्टतानिजिव्हकः ॥ बधिरमूकबलहानिलक्षणोभवतिकष्टतरसाध्यजिव्हकः ॥ २२ ॥ ॥ ॥

अर्थ— खोकला, दमा, आणि संताप, यांणीं विव्हळ, कठिन, व कांट्यांनीं व्याप्त झालेली जिव्हा, बहिरेपणा, मुकेपणा, आणि बलहानि, ह्या लक्षणांनीं युक्त असा हा जिव्हक संनिपात कष्टसाध्य आहे.

## अभिन्यास

दोषत्रयास्निग्धमुखत्वनिद्रावैकल्यनिश्चेष्टनकष्टवाग्मी ॥ बलप्रणाशः स्वसनादिनिग्रहोभिन्यासउक्तोनतुमृत्युकल्पः ॥ २३ ॥ ॥ ॥

अर्थ— त्रिदोषांच्या कोपानें तोंडावर तुळतुळीतपणा, झोंप, विक-

छपणा, निश्चेष्टपडणें, मोठ्या प्रयासानें एखादा शब्द बोलणें, बल नाश, श्वासादिकांचा अवरोध, हीं लक्षणें अभिन्यास सन्निपाताचीं आहेत. हा केवळ भयंकर मृत्युतुल्य आहे.

## हारिद्रक.

हारिद्रदेहनखनेत्रकराङ्घ्रितापनिष्ठीवनादिकसनेत्ररूपलक्षितोयः॥ हारिद्रकः सकथितः किल संनिपातः साध्योनचैषभिषजोज्वरकालरूपः॥२४॥

अर्थ- देह, नख, नेत्र, हात, पाय, हे हळद लावल्यासारिखे पिंवळे होतात, ज्वर, थुंका पडणें, आणि खोकला हीं लक्षणें ज्या सन्निपातांत होतात, त्याला हारिद्रक सन्निपात ह्मणतात. हा ज्वररूपी काळच होय. हा वैद्यांस साध्य होतच नाहीं. हा त्रयोदश संनिपाताखेरीज आहे.

सद्यस्त्रिपंचसप्ताहाद्दशाहाद्द्वादशादपि॥ एकविंशाद्दिनैःशक्रः सन्निपातीरुजावति॥२५॥ ॥

अर्थ- सन्निपात झाल्यावर तत्काळ तीन, पांच, सात, दाहा, आणि बाराव दिवस उलटून २१ दिवस लोटले ह्मणजे शक्र होऊन संनिपातरोगी जगतो.

## त्रिदोषज्वराची साधारण मर्यादा.

सप्तमीद्विगुणायावन्नवम्येकादशीतथा॥ एषात्रिदोषमर्यादामोक्षायचवधायच॥२६ पित्तकफानिलवृद्ध्या दशदिवसद्वादशाहसप्ताहान्॥ हंतिविमुंचतिपुरुषं त्रिदोषजोधातुमलपाकात्॥२७॥ ॥ ॥

अर्थ- त्रिदोष झाल्या दिवसापासून ७ किंवा १४, आणि ९ किंवा १८, तसेंच ११ किंवा २२ दिवस पर्यंत ही त्रिदोषांची मर्यादा आ-

णावी. यापुढें ज्वर जातो, किंवा मृत्यु येतो. ७। ९ आणि ११ ही मर्यादा वाताधिक, पित्ताधिक, आणि कफाधिक संनिपाताची क्रमानें जाणावी.

पित्त कफ आणि वायू ह्यांच्या वृद्धीनें क्रमें करून दाहा दिवसांनीं, बारा दिवसांनीं, आणि साता दिवसांनीं त्रिदोषजज्वर धातुपाक झाला असतां मारतो. आणि मलपाक झाला असतां रोग्याला सोडतो.

## धातुपाकलक्षण.

निद्रानाशोहृदिस्तंभोविष्टंभोगौरवारुची॥ अरति-
र्बलहानिश्चधातूनांपाकलक्षणम्॥ २८॥ ॥

अर्थ— निद्रानाश, हृदय ताडल्यासारिखें होणें, मूत्रपुरीषांचा अवष्टंभ, शरीराला जडपणा, अन्नद्वेष, अस्वस्थपणा, आणि बलाचा नाश, धातुपाक झाला असतां हीं लक्षणें होतात.

धातुपाक म्ह० उत्तरोत्तर रोगाची वृद्धि आणि बलाची हानि होऊन शुक्रादि धातुसहित मूत्रादिकांचा जो पाक होणें त्यास **धातुपाक** म्हणावें.

## मलपाकलक्षण.

दोषप्रकृतिवैकृत्यंलघुताज्वरदेहयोः॥ इंद्रियाणां
चवैमल्यंदोषाणांपाकलक्षणम्॥ २९॥ ॥

अर्थ— दोषांचा स्वभाव पालटणें, ज्वर हलका होणें, शरीर हलकें होणें, इंद्रियांस निर्मलता, हें मलपाकाचें लक्षण जाणावें. धातुपाक आणि मलपाक होणें हें केवळ देवावर आहे, याविषयीं दुसरा कांहीं हेतु दिसत नाहीं.

## सन्निपाताचेंअसाध्यलक्षण.

दोषेविबद्धेनष्टेग्नौसर्वसंपूर्णलक्षणः॥ सन्निपा-
तज्वरोऽसाध्यः कृच्छ्रसाध्यस्ततोन्यथा॥ ३०॥

अर्थ- मलादिक व पित्तादिक दोष बद्ध झाले असतां आणि अग्नि शांत झाला असतां, आणि वातादि सर्व दोषांची संपूर्ण लक्षणें झाली असतां सान्निपातज्वर असाध्य होतो; आणि याच्या उलट ह्मणजे दोषप्रवृत्ति असून अग्नि थोडासा दीप्त असून सर्वांची लक्षणें थोडथोडीं झालीं असतां सन्निपातज्वर कृच्छ्रसाध्य होतो.

## आगंतुज्वर.

अभिघाताभिचाराभ्यामभिषंगाभिशापतः॥आ
गंतुर्जायतेदोषैर्यथास्वंतंविभावयेत्॥३१॥ ॥

अर्थ- शस्त्र, मातीचें ढेंकूळ, बुकी, काठी इत्यादिकानीं मारण्यानें, किंवा श्येनादि याग केल्यानें, अथवा उलट सुलट मंत्रानीं लोखंडाच्या स्रुचीनें सर्षपादिकांचा होम केल्यानें, किंवा कामादिक व भूतादिकांचे उपद्रव झाल्यानें, अथवा ब्राह्मण, गुरु, वृद्ध, सिद्धपुरुष, यांच्या शापानें, आगंतुज्वर उत्पन्न होतो; तो पुढें जे जे दोष कुपित होतील त्या त्या लक्षणा वरून जाणावा.

## विषजन्यआगंतुकज्वर.

श्यावास्यताविषकृतेदाहोतीसारएवच॥भक्ता-
रुचिःपिपासाचतोदश्वसहमूर्छया॥३२॥ ॥

अर्थ- स्थावर जंगम विषभक्षणानें जो ज्वर येतो, त्यांत तोंड श्यामवर्ण होतें, आणि दाह, अतिसार, अन्नद्वेष, ताहान, सुयाटोंचल्या सारिखी पीडा, आणि मूर्छा हीं लक्षणें होतात.

## ओषधांच्यावासानें झालेलाज्वर.

ओषधीगंधजेमूर्छाशिरोरुग्वमथुःक्षवः॥

अर्थ- एखाद्या उग्र ओषधाच्या वासानें जो ज्वर येतो, त्या मध्यें

मूर्छा, कपाळदुखणें, वांति, किंवा मळमळ, आणि शिंका हीं लक्षणें होतात.

## कामज्वर.

कामजेचित्तविभ्रंशस्तंद्रालस्यमभोजनम्॥ हृ-
दयेवेदनाचास्यगात्रंचपरिशुष्यति॥३३॥

अर्थ– कामज्वर ह्मणजे इच्छिलेल्या स्त्रीची प्राप्ति न झाल्यामुळें जो ज्वर येतो, तेणेंकरून चित्तभ्रंश, झांपड, आळस, जेवणावरइच्छा नसणें, हृदयांत पीडा, हीं लक्षणें होतात. आणि त्या पुरुषाचें शरीर वाळून जातें.

## भय, शोक, आणि कोप यां पासून झालेलाज्वर.

भयात्प्रलापः शोकाच्चभवेत्कोपाच्चवेपथुः॥३४॥

अर्थ– भया पासून झालेल्या ज्वरामध्यें बडबड फार असते.
शोका पासून झालेल्या ज्वरांतही बडबडच असते.
कोपापासून झालेल्याज्वरामध्यें कांपरें सुटतें.

## अभिचार आणि अभिघातज्वर.

अभिचाराभिघाताभ्यां मोहस्तृष्णाचजायते॥

अर्थ– अभिचार आणि अभिघात यांपासून ज्वर आला असतां मोह होतो, आणि ताहान लागते.

## भूताभिषंगज्वर.

भूताभिषंगादुद्वेगोहास्यरोदनकंपनम्॥३५॥

अर्थ– भूतबाधेनें ज्वर आलातर चित्त उद्विग्न होतें, हंसणें, रडणें, आणि कांपणें हीं लक्षणें होतात.

आगंतुकज्वरांमध्यें देखील दोषांचा-

संबंधनियत होतो ह्मणून सांगतो.

कामशोकभयाद्वायुः क्रोधात्पित्तं त्रयोमलाः ॥ भूताभिषंगात्कुप्यंति भूतसामान्यलक्षणाः ॥

अर्थ— काम, शोक, आणि भय यां पासून वायु कोपतो, क्रोधानें पित्त कोपतें; आणि भूताभिषंगानें तिन्ही दोष कोपतात, त्या मध्यें भूतांचीं आणि दोषांचीं लक्षणें होतात, ह्मणजे उन्माद निदाना मध्यें ज्या ज्या देवग्रहांचीं लक्षणें ( हास्य रोदनादिक ) सांगीतलीं आहेत तीं होऊन दोषांचीं लक्षणें होतात,

---

विषमज्वराचीसंप्राप्ति.

दोषोल्पोहितसंभूतोज्वरोत्सृष्टस्यवापुनः ॥ धातुमन्यतमंप्राप्यकरोतिविषमज्वरम् ॥

अर्थ— ज्वरानें नुकताच सोडलेल्या मनुष्याला अपथ्य सेवन झालें असतां त्याचा दोष पुनः थोडा कुपित होऊन रस रक्तादि धातू पैकीं कोणत्याही धातू प्रत जाऊन विषमज्वर ह्मणजे तृतीयादिकज्वर उत्पन्न करितो, वा शब्दानें पहिल्या पासून ही विषमज्वर होतो हें सूचविलें, अल्प शब्दानें असें सूचविलें कीं, तो दोष बलवान नसल्या मुळें विशिष्ट काळीं बलवान होऊन ज्वर करितो, आणि जो दोष बलवान् आहे तो तर नित्यच ज्वर करितो, विषमज्वराचें सामान्य लक्षण भालुकीनें सांगितलें आहे तें असें "अनियत काळीं शीतोष्णानें विषमवेगज्वर होतो, त्या ज्वराला विषम ज्वर असें ह्मटलें आहे," दुसरें लक्षण असें कीं " मुक्तानु बंधित्वं विषमत्वं " ह्मणजे जो ज्वर सोडतो आणि पुनः येतो त्यास विषमज्वर ह्मणतात.

विषमज्वराचीं नांवें व संख्या.

संततः सततोन्येद्युस्तृतीयकचतुर्थकौ ॥ ॥

अर्थ— संतत, सतत, अन्येद्यु, (द्व्याहिक) तृतीयक, (त्र्याहिक) आणि चतुर्थक (चातुर्थिक) असे पांच प्रकारचे विषमज्वर आहेत.

संततादिज्वरांचीं निमित्त दूष्यें.

संततं रसरक्तस्थः सोन्येद्युः पिशिताश्रितः ॥ मेदोगतस्तृतीयेन्हि अस्थिमज्जागतः पुनः ॥ कुर्याच्चातुर्थिकं घोरमंतकं रोगसंकरम् ॥

अर्थ— संतत शब्दानें सतत आणि संतत हे दोन्ही समजावे, ह्मणजे रसस्थ दोष संततज्वर करितो, आणि रक्तस्थ दोष सततकज्वर करितो. येथें संतत आणि सततक हे दोन शब्द केवळ संज्ञा वाचक आहेत, सांतत्य वाचक नाहींत, असें समजावें, तो दोष मांसाश्रित झाला असतां अन्येद्युष्क, ह्मणजे द्व्याहिकज्वर करितो, आणि मेदोगत झाला ह्मणजे तिसरे दिवशीं ज्वर करितो, त्याला तिजारें ह्मणतात, तो दोष अस्थिमज्जाश्रित झाला ह्मणजे दुस्सह, मृत्युकारक, अनेक रोगानीं व्याप्त असा चातुर्थिक ज्वर उत्पन्न करितो.

संततज्वराचें लक्षण.

सप्ताहं वा दशाहं वा द्वादशाहमथापि वा ॥ संतत्यायो विसर्गी स्यात्संततः स निगद्यते ॥

अर्थ— सात दिवस पर्यंत, किंवा दाहा दिवस पर्यंत, किंवा बारा दिवस पर्यंत एकसारखा जो ज्वर सोडीत नाहीं, त्याला संततज्वर ह्मणतात, सात, दाहा, आणि बारा, हे विकल्प सांगितले, ते

अनुक्रमें वात,पित्त, कफांच्या उल्बणानें सांगितलें आहेत, हा संतत ज्वर त्रिदोषजच आहे, कारण याला द्वादशपदार्थांना आश्रय आहे, असें चरकानें सांगितलें तें येणे प्रमाणें," वातादिदोष धातू प्रमाणें मूत्र, आणि पुरीष यांस एक समया वच्छेदें करून ग्रासून नियमानें संतत ज्वर उत्पन्न करितात" बारा पदार्थ येणें प्रमाणें. वातादि दोष ३ सप्त धातु ७ मूत्र १ आणि पुरीष मिळून १२ झाले.

## सततकादिकांचें लक्षण.

अहोरात्रे सततको द्वौ कालावनुवर्तते॥ अन्येद्युष्कस्त्वहोरात्रमेककालं प्रवर्तते॥ तृतीयकस्तृतीयेऽह्नि चतुर्थेऽह्नि चतुर्थकः॥ केचिद्भूताभिषंगोत्थं वदंति विषमज्वरम्॥

अर्थ— सततकज्वर अहोरात्रा मध्यें दोन वेळा येतो, ईशानदेव ह्मणतो कीं, दिवसास दोन वेळा किंवा रात्रौ दोन वेळा अथवा दिवसास एक वेळा आणि रात्रीस एक वेळा, एकूण दोन वेळा- अमुकच वेळेवर येतो असें सांगितलें नाहीं, आणि असेंच पाहाण्यांत येतें, अन्येद्युष्कज्वर, अहोरात्रा मध्यें एक वेळा येतो, तृतीयक ज्वर आल्या दिवसा पासून तिसऱ्या दिवशीं येतो, आणि चतुर्थक. चौथे दिवशीं येतो, कोणी हा विषमज्वर भूताभिषंगोत्थ आहे असें ह्मणतात, हें मत सुश्रुताचार्यांस हि मान्य आहे, ह्मणून त्यांणीं विषमज्वरावर बलिहोमादिक भूतोचित आणि कषाय पानादिक दोषोचित अशी चिकित्सा सांगितली, आणि विषम ज्वर हा प्रायशः आगंतूचा संबंधी आहे, ह्मणून चरकानें देखील सांगितलें आहे,

उत्कृष्ट दोषभेदानें तृतीय चतु
र्थकांचें दुसरें लक्षण सांगतो.

कफपित्तात्त्रिकग्राही पृष्ठाद्वातकफात्मकः॥ वात-
पित्ताच्छिरोग्राही त्रिविधःस्यात् तृतीयकः॥ चातु
र्थिको दर्शयति प्रभावं द्विविधं ज्वरः॥ जंघाभ्यां श्लै-
ष्मिकः पूर्वं शिरसोनिलसंभवः॥

अर्थ— तृतीयकज्वर कफपित्ताच्या जोरानें त्रिकसंधीचे ठाईं वे-
दना करितो, वातकफात्मक पाठीला वेदना करितो, वातपित्तापासू
न मस्तकाला वेदना करितो. या प्रमाणें तृतीयकज्वर तीन प्रका
रचा होतो. येथें कफपित्तापासून त्रिकग्राही होतो म्हणून सांगित
लें, तर त्रिक हें वायूचें स्थान आहे, तेथें गेलेले वातकफ दुसऱ्याचे
स्थानीं गेले म्हणून दुर्बल झाले यास्तव तिसरे दिवशीं ज्वर करि
तात, जर ते स्वस्थानीं असते तर त्याणीं संततज्वरच केला असता. अ
सें जेज्जटाचें मत आहे, या प्रमाणेंच मस्तक हें कफस्थान आ-
णि पाठ ही पित्तस्थान म्हणून तेथें प्राप्त झालेले दुसरे दोघे दोष प
रठिकाणीं गेल्यामुळें दुर्बळ होऊन तृतीयकज्वर करितात, ही
गोष्ट चतुर्थकाला ही लागू आहे, आतां त्रिक हें वातस्थान आहे तेथें
पित्त कफ कसे येतील? असें म्हणूनका. स्थाननियम प्रकृतिस्थ दोषां
चा राहतो, कुपित दोषांच्या स्थानांचा नियम नाहीं, ते सर्व देहा-
मध्यें फिरतात.

चातुर्थिकज्वर दोन प्रकारचा स्वभाव म्हणजे स्वरूप
शक्ति दाखवितो, तो असा— कफाधिक असतो तो पहिल्यानें मां
ड्यांपासून आरंभ करून मग सर्व देह व्याप्त करितो, आणि वाता

धिक असतो तो पहिल्यानें मस्तकतापवून नंतर सर्वशरीरांत भरतो.

हे पांच प्रकारचे विषमज्वर प्रायशः सन्निपातापासून होतात असें चरकाचें मत आहे, हारीताचार्य, ह्मणतो कीं चतुर्थकामध्यें पित्त प्रधान असतें, त्याविषम ज्वरांचा उत्पत्ति क्रम ह्डुस श्रुतांत लिहिला आहे तो असा— कफाचीं स्थानें पांच आहेत त्या त्या स्थानीं दोष गेला ह्मणजे ते ते विषमज्वर होतात, तीं स्थानें येणें प्रमाणें, आमाशय, हृदय, कंठ, शिर, आणि संधि, त्यांत आमाशयस्थ दोषानें सततक दोन वेळा येतो, हृदयस्थित दोष आमाशयांत आला ह्मणजे अन्येद्युः ज्वर एक वेळ येतो, कंठस्थित दोष एके दिवशीं हृदयांत येतो, दुसरे दिवशीं आमाशयांत येऊन ज्वर उत्पन्न करितो. तो तृतीयक, या प्रमाणेंच शिरस्थित दोष, कंठ, हृदय, आणि आमाशय यां प्रत तीन दिवसानीं क्रमानें येऊन चतुर्थक ज्वर करितो. त्याचें पुनः स्वस्थानीं गमन त्याच दिवशीं होतें, संधिस्थित दोषानें प्रलेपकज्वर होतो, हाही विषमज्वराच्याच तोडीचा ज्वर आहे. कारण त्याची उत्पत्ति कफस्थानापासूनच होत असल्ये, आणि सुश्रुतानें ही सांगितलें आहे कीं, " प्रलेपक हा विषमज्वर होय, हा धातु शोष रोग्यांस क्लेश प्रद होतो.

## विषमज्वराचा भेद.

विषमज्वर एवान्यश्चातुर्थिकविपर्ययः॥ समध्ये-
ज्वरयत्यन्ही आद्यंतेच विमुंचति॥

अर्थ— चतुर्थकज्वराच्या उलट हा दुसरा विषमज्वरच आहे, हा पहिला आणि शेवटला हे दोन दिवस सोडून मध्यें दोन दिवस येतो, जसा हा चातुर्थिकाचा विपर्यय आहे तसाच तृतीयकादिकां

चा ही विपर्यय होत असतो, ह्मणून सांगतात, तो असा-मध्येंएक दिवस ताप येऊन आद्यंत दिवशीं सोडतो, तो तृतीयक विपर्यय- एक काळ सोडून सर्व अहोरात्र ज्वर व्यापून राहतो, तो अन्ये द्युष्क विपर्यय जाणावा, याविषयीं ग्रंथकारांचीं भिन्न भिन्न मतें आहेत, विस्तर भयास्तव लिहीत नाहीं.

### वातबलासकज्वर.

नित्यंमंदज्वरोरूक्षः शूनकस्तेनसीदति॥स्तब्धांगः
श्लेष्मभूयिष्ठोनरोवातबलासकी॥

अर्थ— वातबलास नामक ज्वर ज्या मनुष्यास झाला आहे तो त्या ज्वरानें शोथयुक्त होऊन ग्लान होतो, अंग ताठतें, आणि कफकारक होतो, शरीर रूक्ष होतें, हा ज्वर वायु आणि कफ यांपासून होतो ह्मणून याला वातबलासक ज्वर ह्मणतात.

### प्रलेपकज्वर.

प्रलिंपन्निवगात्राणि घर्मेण गौरवेणच॥ मंदज्वरविलेपीचसशीतःस्यात्प्रलेपकः॥

अर्थ— या ज्वरांत गात्रें घामानें व जडपण्यानें सारा वेळ चिकचिकलेलीं असतात, त्या योगानें ज्वर मंद असतो, थंडी वाजते, हा ज्वर कफपित्तजन्य आहे, राजयक्ष्यामध्यें हा होत असतो. कोणी याला त्रिदोषजनित ही ह्मणतात.

### विषमज्वरांचे विशेष.

विदग्धेन्नरसेदेहेश्लेष्मपित्तेव्यवस्थिते॥तेनार्धंशीतलंदेहमर्धंसुष्णंप्रजायते॥

अर्थ— अन्नाचा रस दुष्ट झाला असतां आणि देहामध्यें कफपि-

नें दुष्ट होऊन व्यवस्थित झालीं असतां, अर्धा देह कफानें थंड हो तो, आणि अर्धा पित्तानें ऊष्ण होतो, येथें अर्ध ह्मणजे अर्धनारीश्व राकार किंवा नरसिंहाकार जाणावें.

कायेदुष्टं यदापित्तंश्लेष्माचांतेव्यवस्थितः॥तेनो ष्णत्वंशरीरस्यशीतत्वंहस्तपादयोः॥

अर्थ— जेव्हां कोष्ठामध्यें पित्त दुष्ट होतें, आणि कफ हाता पायांचे ठाईं दुष्ट होऊन राहातो, तेणें करून कोथळा ऊन राहातो, आणि हात पाय गार राहातात.

त्याच्याउलटदुसराज्वर

कायेश्लेष्मायदादुष्टःपित्तंचांतेव्यवस्थितम्॥शी तत्वंतेनगात्राणामुष्णत्वंहस्तपादयोः॥

अर्थ— ज्या वेळेस कोठ्यामध्यें कफ दुष्ट होऊन पित्त हस्तपादामध्यें दुष्ट होऊन राहातें, तेव्हां शरीराला शीतता आणि हाता पायांलाउ-ष्णता होत्ये.

शीतपूर्वज्वर

त्वक्स्थौश्लेष्मानिलौशीतमादौजनयतोज्वरम्॥तयोः प्रशांतयोःपित्तमंतेदाहंकरोतिच॥

अर्थ— कफ आणि वायु हे त्वक्स्थ ह्मणजे रस धातूचा आश्रय करू नपहि त्यानें शीतज्वर उत्पन्न करितात, त्यांचा वेग शांत झाला ह्म-णजे शेवटीं पित्त दाह करितें.

दाहपूर्वज्वर.

करोत्यादौतथापित्तंत्वक्स्थंदाहमतीवच॥तस्मि न्प्रशांतेत्वितरौकुरुतःशीतमंततः॥द्वावेतौ दाह

शीतादौ ज्वरोसंसर्गजोस्मृतो॥दाहपूर्वस्तयोः कष्टः
कृछ्रसाध्यतमश्चसः॥

अर्थ— तसेंच पहिल्यानें पित्त रसगत होऊन अत्यंत दाह करितें, नंतर त्याचा वेग शांत झाला ह्मणजे वात कफ शेवटीं शैत्य-करितात.

दाह पूर्वक आणि शीतपूर्वक हे दोन्हीज्वर संसर्गह्मणजे त्रिदोषांच्या संबंधानें होतात, असें सांगितलें आहे, त्यापेकीं दाह पूर्वक ज्वर दुःखप्रद आणि अत्यंत कृछ्र साध्य आहे, यावरून शीत पूर्वज्वर सुखसाध्य आहे हें अर्थात् सिद्ध झालें.

सर्व विषमज्वरांमध्यें वायु हा अवश्य असतोच असें वृद्धसुश्रुताचें व विदेहाचें ह्मणणें आहे.

## सप्तधातुगत ज्वरांचीं लक्षणें.

### रसगतज्वर.

गुरुतात्हृदयोत्क्लेशः सदनं छर्द्यरोचकौ॥रसस्थेतु
ज्वरेलिंगंदैन्यंचास्योपजायते॥

अर्थ— जडपणा, हृदयस्थ दोष ओकून पडेलसा वाटणें, ग्लानि, ओकारी, अन्न द्वेष, आणि दैन्य ह्मणजे मनाला खेद, हें चिन्ह रसस्थज्वराचें जाणावें, त्यांत मुख्यत्वें करून रस हा दूष्य आहे.

### रक्तगतज्वर.

रक्तनिष्ठीवनंदाहो मोहश्छर्दनविभ्रमौ॥प्रलापः
पिडका तृष्णारक्तप्रासेज्वरेनृणाम्॥

अर्थ— रक्ताचा बेडका, दाह, मोह, ओकारी, भ्रम, बडबड, अंगावर गांधी, किंवा पुटकुळ्या, आणि तहान, हीं लक्षणें रक्तगत ज्व

र झाला असतां होतात.

## मांसगतज्वर.

पिंडिकोद्वेष्टनं तृष्णासृष्टमूत्रपुरीषता ॥ ऊष्मां-
तर्दाहविक्षेपौ ग्लानिः स्यान्मांसगे ज्वरे ॥

अर्थ— पोटऱ्या वळणें, तहान, मळमूत्राचा विसर्ग होणें, तलखी-अंतर्दाह, हातपाय चाळविणें, आणि ग्लानी, हीं लक्षणें मांसगत ज्वराचीं आहेत.

## मेदोगतज्वर.

भृशं स्वेदस्तृषामूर्छा प्रलापश्छर्दिरेव च ॥ दौर्गंध्यारो
चकौ ग्लानिर्मेदस्थे चासहिष्णुता ॥

अर्थ— अत्यंत घाम येणें, तहान, मूर्छा, बडबड, वांति, अंगाला दुर्गंधि, अन्नावर अरुचि, ग्लानि, आणि वेदना सहन न होणें, हीं लक्षणें मेदस्थज्वरांमध्यें होतात.

## अस्थिगतज्वर.

भेदोस्थ्नां कूजनं श्वासो विरेकश्छर्दिरेव च ॥ विक्षेप
णं च गात्राणामेतदस्थिगते ज्वरे ॥

अर्थ— हाडें फुटल्या सारिखीं वाटणें, कुंथणें, श्वास, रेच, ओकारी, हातपाय चाळविणें, हें अस्थिगत ज्वराचें लक्षण.

## मज्जागतज्वर.

तमः प्रवेशनं हिक्का कासः शैत्यं वमिस्तथा ॥ अं-
तर्दाहो महाश्वासो मर्मछेदश्च मज्जगे ॥ ॥

अर्थ— अंधारांत शिरल्या प्रमाणें भासणें, उचकी, खोकला, थंडी वाजणें, ओकारी, अंतर्दाह, माहाश्वास (श्वासनिदान पहा ) आणि

मर्म छेद ह्मणजे ह्रदयभेद, हीं मज्जागतज्वराचीं लक्षणें जाणावीं

## शुक्रगतज्वर.

मरणं प्राप्नुयात्तत्र शुक्रस्थानगते ज्वरे॥ शेफसः स्त
ब्धता मोक्षः शुक्रस्य च विशेषतः॥

अर्थ— रसादि धातुगत ज्वरांमधील ज्वर शुक्रस्थानीं गेला अ-सतां रोगी मरण पावतो, त्या ज्वरांमध्यें शिश्नास ताठपणा असतो, आणि शुक्राचा स्राव विशेष होतो; व दुसरे रक्तादि पदार्थांचाही थोडा थोडा स्राव होतो, असें ह्मणतात.

## प्राकृत आणि वैकृत ज्वर.

वर्षाशरद्वसंतेषु वाताद्यैः प्राकृतः क्रमात्॥ वैकृतो
न्यः स दुःसाध्यः प्राकृतश्चानिलोद्भवः॥

अर्थ— वर्षाऋतु, शरदृतु, आणि वसंत ऋतु यामध्यें वातादिकांनीं क्रमें करून जो ज्वर होतो तो प्राकृतज्वर ह्मणजे वर्षाकाळीं वातज्वर, शरत्कालीं पित्तज्वर, आणि वसंतकाळीं कफज्वर, याहून जो दुसरा ज्वर होतो तो वैकृतज्वर. जसे वर्षाकाळीं पैत्तिक, शरत्काळीं श्लेष्मिक, आणि वसंतकाळीं वातिक, हा वैकृत ज्वर दुःसाध्य आहे, आणि वातजन्य प्राकृत ज्वरही दुःसाध्य आहे, अन्य रोगांमध्यें प्राकृतत्व दुःसाध्य आहे, ज्वरामध्यें व्याधिस्वभावानें सुखसाध्यत्व आहे, या विषयीं अन्य तंत्रांमध्यें सांगितलें आहे तें असें, ज्वरामध्यें ऋतु आणि दोष हे तुल्य असावे. आणि प्रमेहांत दूष्यें तुल्य असावीं. आणि रक्तगुल्म जुने असावे हें सुखसाध्याचें लक्षण आहे.

प्राकृतज्वरांचा चिकित्सेसाठीं उ.

उत्पत्ति क्रम सांगतो.

वर्षासु मारुतो दुष्टः पित्तश्लेष्मान्वितो ज्वरं ॥ कुर्या
च्चपित्तं शरदि तस्य चानुबलः कफः ॥ तत्प्रकृत्या
विसर्गाच्च तत्र नानशनाद्भयं ॥ कफो वसंते न म-
पि वातपित्तं भवेदनु ॥

अर्थ— ग्रीष्म ऋतूंत संचित झालेला वायु वर्षा काळीं कुपित झाला-
असतां पित्त कफयुक्त होऊन ज्वर उत्पन्न करितो, तसेंच वर्षा काळीं-
संचित झालेलें पित्त शरत्कालीं दुष्ट होऊन ज्वर करितें, त्याला कफा
चा अनुबंध होतो, त्या ज्वरांत कफ पित्ताच्या स्वभावास्तव, आणि
विसर्ग काल असतो ह्मणून लंघनापासून भय होत नाहीं, त्याप्र
माणेंच हेमंत काळीं सांचलेला कफ वसंत कालीं ज्वर करितो त्या-
च्या मागून वात पित्त ही साह्य करितात.

कालेयथास्वं सर्वेषां प्रवृत्तिर्वृद्धिरेव वा ॥ निदानो
क्तोऽनुपशयो विपरीतोपशायिता ॥

अर्थ— वातादिकांची आपआपल्या काळीं उत्पत्ति होत्ये, किंवा
वृद्धि होत्ये, काळ हा जसा दोषविशेष जाणण्याचें लक्षण आहे;
तसेंच उपशयानुपशय ही आहेत, ते येणें प्रमाणें:— निदान त्वें क
रूनजे आहाराचार सांगितले त्यांच्या सेवनानें अनुपशय ह्मणजे दुः
ख होतें, आणि दोषांच्या विपरीत जे आहाराचार तींहीं करून उपशा-
यिता ह्मणजे सुखोत्पत्ति होत्ये.

+ वर्षा, शरत् आणि हेमंत. हे विसर्ग काळ आहेत, त्या काळीं सोमाचें बळ असतें
ह्मणून प्राण्याचें बळ वाढत असतें. आणि शिशिर वसंत आणि ग्रीष्म हे आदान काळ आ
हेत त्या वेळेस सूर्याचें बळ अधिक असतें ह्मणून प्राण्याचें बळ क्षीण होत असतें.

मागें जे ज्वर सांगितले त्यामध्यें संप्रा
प्तिभेदानें कोणी एकादा ज्वर अंतर्वेग हो
तो. कोणी बहिर्वेग होतो त्या दोघांचील०

अंतर्दाहोधिकातृष्णाप्रलापःश्वसनंभ्रमः॥संध्यस्थि
शूलमस्वेदोदोषवर्चोविनिग्रहः॥अंतर्वेगस्यलिंगा
निज्वरस्यैतानिलक्षयेत्॥ संतापोभ्यधिकोबाह्यस्तृ
ष्णादीनांचमार्दवम्॥ बहिर्वेगस्यलिंगानिसुखसा-
साध्यत्वमुच्यते॥

अर्थ— अभ्यंतरीं दाह, फारतृषा, बडबड, श्वास, भ्रम, सांधे आणि हा डें यांचे ठिकाणीं शूळ, घाम येत नाहीं, वायू आणि मळ यांचा प्रतिबंध, हीं अंतर्वेगज्वराचीं लक्षणें जाणावीं.

बाहेरून संताप फार असतो, तृष्णादिक लक्षणें थोडीं असतात, हीं बहिर्वेगज्वराचीं लक्षणें, हा ज्वर सुखसाध्य आहे, त्याचें सुख साध्यत्व सांगण्यानें अंतर्वेगज्वर कृच्छ्रसाध्य किंवा असाध्य आहे हें सूचविलें.

चिकित्सा करण्यासाठीं आम. पच्य
मान आणि निरामज्वरांचीं लक्षणें.

लालाप्रसेकहृल्लासहृदयाशुध्यरोचकाः॥तंद्रा
लस्याविपाकास्यवैरस्यंगुरुगात्रता॥क्षुन्नाशोब
हुमूत्रत्वंस्तब्धताबलवान्ज्वरः॥आमज्वरस्यलिं
गानिनदद्यात्तत्रभेषजम्॥ भेषजंह्यामदोषस्य-
भूयोजनयतिज्वरम्॥ शोधनंशमनीयंचकरोति
विषमज्वरम्॥

अर्थ— लाळेचा स्राव, ओकारी होईलसें वाटणें, उरांतजड वाटणें, अरुचि, झांपड, आळस, अन्नाचा पाक न होणें, तोंड बेचव, आंगाला जडपणा, क्षुधानसणें, वारंवार मूत्र होणें, आंगताठल्या सारखें होणें, आंगांतज्वरपुष्कळ असणें, हीं अपक्व ज्वराचीं लक्षणें जाणावीं, त्या ज्वरावर औषध देऊंनये, अपक्व दोषाला औषध दिलें तर ज्वर वाढतो, शोधन किंवा शमन औषध दिलें तर विषमज्वरावर घालवितें, **भावप्रकाशांत**, ज्वराचे दाहा उपद्रव सांगितले आहेत ते-येणें प्रमाणें.

श्वासोमूर्छारुचिस्तृष्णा छर्द्यतीसारविड्ग्रहाः॥
हिक्काकासांगदाहश्चज्वरस्योपद्रवा दश॥

अर्थ— श्वास, मूर्छा, अरुचि, तृषा, वांति, अतिसार, मळबद्धता, गुचकी, खोकला, आंगाचा दाह, हे दाहा ज्वराचे उपद्रव आहेत.

## पच्यमानज्वराचें लक्षण.

ज्वरवेगोधिकातृष्णा प्रलापःश्वसनंभ्रमः॥
मलप्रवृत्तिरुत्क्लेशः पच्यमानस्य लक्षणम्॥

अर्थ— ज्वराचा वेग अधिक, ताहान फार लागणें, बडबड, श्वास, भ्रम, मळ होणें, ओकारी आल्या सारिखें वाटणें, हें पच्यमान म्हणजे पक्व होणाऱ्या ज्वराचें लक्षण आहे.

## पक्वज्वर किंवा निरामज्वर.

क्षुत्क्षामतालघुत्वंच गात्राणांज्वरमार्दवम्॥
दोषप्रवृत्तिरुत्साहो निरामज्वरलक्षणम्॥

अर्थ— क्षुधालागणें, शरीर कृश होणें, अंग हलकें होणें, मंदज्वर असणें, अधोवायूची प्रवृत्ति होणें, आणि मनाला उत्साह वाटणें,

हें निरामज्वराचें लक्षण, जाणावें, आता प्रसंगानें ग्रंथांतरोक्तजीर्णज्वराचें लक्षण सांगतों.

त्रिसप्ताहे व्यतीतेतु ज्वरो यस्तनुतांगतः॥ प्लीहाग्निसादंकुरुतेसजीर्णज्वरउच्यते॥

अर्थ— २१ दिवस उलटल्यावर जो ज्वर बारीक होऊन आंगांत राहातो, त्या पासून प्लीहा रोग आणि अग्निमांद्य होतें, त्याला जीर्णज्वर असें ह्मणतात.

## साध्यज्वर कोणता तो सांगतों.

बलवत्स्वल्पदोषेषु ज्वरः साध्योऽनुपद्रवः॥

अर्थ— बलवान पुरुषांस दोष अल्प असून जो श्वासादि उपद्रव रहित ज्वर होतो तो साध्य जाणावा.

## असाध्यज्वर.

हेतुभिर्बहुभिर्जातोबलिभिर्बहुलक्षणः॥ ज्वरः प्राणांतकृद्यश्चशीघ्रमिंद्रियनाशनः॥

अर्थ— जो ज्वर बहुत प्रबळ कारणानीं झालेला, ज्यामध्यें लक्षणें पुष्कळ असतात तो ज्वर प्राणांत करणारा होतो, आणि जो ज्वर उत्पन्न होतांच एकाद्या चक्षुरादि इंद्रियाची शक्ति नष्ट (ह्मणजे आंधळा, बहिरा इत्यादि) करितो, तो ही असाध्य जाणावा.

## दुसरीं असाध्य लक्षणें.

ज्वरःक्षीणस्यशूनस्यगंभीरोदैर्घ्यरात्रिकः॥ असाध्योबलवान्यश्चकेशसीमंतकृज्ज्वरः॥

अर्थ— क्षीण व सूज आलेल्या पुरुषाचा ज्वर असाध्य होय. अंतर्धातुस्थ किंवा अंतर्वेगज्वर आणि फार दिवस राहणारा

ज्वरअसाध्य होय, आणि जो ज्वर बलवान् आणि ज्याच्या योगानें केशामध्ये भांग पडतात तो ही असाध्यच होय.

### गंभीरज्वराचें लक्षण.

गंभीरस्तुज्वरोज्ञेयोल्यंतर्दाहेनतृष्णाया ॥ आनद्ध-
त्वेनचात्यर्थं श्वास कासोद्गमेनच ॥

अर्थ—अंतर्दाह, ताहान, दोषानीं अत्यंत ताठल्या सारिखें वाटणें, श्वास, खोकला, यांची उत्पत्ति ह्या लक्षणानीं गंभीर ज्वर जाणावा.

### दुसरीं असाध्य लक्षणें.

आरंभाद्विषमोयस्य यस्यवादैर्घ्यरात्रिकः ॥
क्षीणस्यचातिरूक्षस्य गंभीरोहंतिमानवम् ॥
विसंज्ञस्ताम्यतेयस्तु शेतेनिपतितोपिवा ॥ शी
तार्दितोंतरुष्णाश्चज्वरेणम्रियतेनरः ॥

अर्थ— ज्याचा ज्वर मुळापासून विषम झाला आहे तो, ज्याचा-ज्वर फार दिवसांचा आहे तो; आणि क्षीण, व अत्यंत रूक्ष पुरुषाचा गंभीर ज्वर मृत्यु प्रद होतो, जो बेसावध होऊन मोह पावतो, आणि जो सर्वदा आंथरुणावर पडून असतो ह्मणजे त्याच्यानें उठवत नाहीं, बाहेरून थंडी वाजत्ये, आणि शरीरांत दाह होतो, अशा प्रकारच्या ज्वरानें रोगी मरतो.

### दुसरीं असाध्य लक्षणें.

योहृष्टरोमारक्ताक्षोहृदिसंघातशूलवान् ॥ व-
क्त्रेणचैवोच्छ्वसितिसंज्वरोहंतिमानवम् ॥ हिक्का
श्वासतृषायुक्तं मूढंविभ्रांतलोचनम् ॥ संतता-

-च्छ्वासिनं क्षीणं नरं क्षपयति ज्वरः॥ हतप्रभेंद्रियं क्षाम मरोचकनिपीडितम्॥ गंभीरं तीक्ष्ण वेगार्तं ज्वरितं परिवर्जयेत्॥

अर्थ—ज्याच्या आंगावर रोमांच उभे राहतात, डोके लाल होतात हृदया मध्यें एकादी गांठ जमून जशी पीडा व्हावी तशी होत्ये, आणि केवळ तोंडानेंच श्वास टाकतो, अशा पुरुषाला ज्वर मारतो.

गुचकी, श्वास, तृषा, ह्यांनीं व्याप्त झालेला, मोह पावलेला, डोके इकडे तिकडे फिरविणारा, निरंतर श्वासानें पिडलेला, अशा मनुष्याला ज्वर खपवितो.

ज्यांच्या इंद्रियांची शक्ति नष्ट होत्ये, किंवा ज्याची शरीर कांति निस्तेज होत्ये, आणि इंद्रियें नष्ट होतात, कृश होतो, व अन्न द्वेषानें फार पिडतो, आणि गंभीर व तीक्ष्ण वेगानें पीडित होतो, अशा ज्वरी पुरुषाला वैद्यानीं सोडावा.

### दुसरीं असाध्य लक्षणें पुष्कळ आहेत तीं ग्रंथांतरांतून थोडीशीं येथें लिहितों.

प्रेतैः सह पिबेन्मद्यं स्वप्ने यः कृष्यते शुना॥ स घोरं ज्वरमासाद्य न जीवेन्न च मुच्यते॥ ज्वरः पूर्वाण्हि कोयस्य शुष्क कासस्य दारुणः॥ बलमांस विहीनश्च यथा प्रेतस्तथैव सः॥ ज्वरो यस्यापराण्हे तु श्लेष्मा कासश्च दारुणः॥ बलमांसविहीनश्च यथा प्रेतस्तथैव सः॥ सहसा ज्वरसंतापस्तृष्णा मूर्च्छा बलक्षयः॥ विश्लेषणं च संधीनां मुमूर्षोरुपजायते॥ गोसर्गे व

253252

दनाद्यस्यस्वेदःप्रच्यवतेभ्रुवम्॥ लेपज्वरोपसृष्ट
स्यदुर्लभंतस्यजीवितम्॥स्वेदोललाटेहिमवान्न
रस्यशीतार्दितस्यातिकफपिच्छिलस्य॥ कंठस्थि
तोयस्यनयातिवक्षोनूनंयमस्येतिगृहंसमर्त्यः॥ यस्य
स्वेदोतिबहलः पिच्छिलो याति सर्वतः ॥ रोगिणः
शीतगात्रस्यतदामरणमादिशेत्॥

अर्थ—जो स्वप्नामध्यें प्रेतां बरोबर मद्यपितो, किंवा ज्याला कुत्रीं ओढून नेतात, तो भयंकर तापयेऊन मरतो, ज्याला पूर्वाण्हीं मोठा ज्वर येतो, कोरडा खोकला असतो, आणि बल मांसें नष्ट होतात, तो प्रेतसमान जाणावा. ज्याला अपराण्हीं ज्वर येऊन कफ, खोकला फार असतो, व बळ मांस नाहींशीं होतात, तो प्रेतासारखा जाणावा, अकस्मात् ज्वराचा दाह, तृषा, मूर्छा, आणि बलक्षय, आणि सांधे ढिले पडणें, हीं लक्षणें आसन्न मरणाचीं होत, पांहाटेस ज्याचा तोंडावरून पुष्कळ घाम निघतो, आणि लेपज्वरानें व्याप्त होतो, त्याचें वांचणें दुरापास्त होतें, ज्याचे कपाळावर थंडगार घाम येतो, थंडी फार वाजत्ये, अंग बुळबुळीत होतें, आणि गळ्यावरचा घाम उरःस्थळावर येत नाहीं, तो मनुष्य यमाच्या घरीं लवकर जातो, ज्याला दाट व बुळबुळीत घाम चहूंकडे सर्वांगाला येतो, आणि आंग थंड होतें, तेव्हां तत्क्षणीं त्या रोग्याचें मरण होईल म्हणून जाणावें.

## ज्वरमुक्तीचें पूर्वरूप.

दाहःस्वेदोभ्रमस्तृष्णा कंपोविड्भेदसंज्ञता॥
कूजनंचातिवैगंध्यमाकृतिर्ज्वरमोक्षणे॥

अर्थ— दाह, घाम, भ्रम, तहान, कांपरें, मळ पातळ होणें, बेशुद्धी, कुंथणें, आणि आंगाला अत्यंत दुर्गंधि, हीं लक्षणें ज्वर सोडीत असतांना होतात, या वर कोणी अशी शंका करील कीं, दोष क्षय झाल्या वांचून व्याधि कसा जाईल,? आणि दोष क्षीण झाला-नर असें दाहादि लक्षण कसें करील? त्या वर असें समाधान आहे कीं, कोणी एकाचा असा स्वभाव असतो कीं, क्षीण असतांही विनाश काळीं आपली शक्ति दाखवावी, उदाहरण-दिव्यांतलें तेल सरून तो जाऊं लागला ह्मणजे त्याची जोत पहिल्या पेक्षां चार पांच वेळां मोठी होऊन मागून तो विझतो, ही गोष्ट सर्वांच्या पाहाण्यांत आहेच, अथवा दोषानीं पिडलेल्या धातूंचा दोष गेल्या वर क्षोभ होऊन दाहादिक लक्षणें होतात असें जाणावें.

## ज्वरमुक्तिलक्षण.

स्वेदो लघुत्वंशिरसः कंडूः पाकोमुखस्यच ॥ क्षवथुश्चान्न कांक्षाच ज्वरमुक्तस्य लक्षणम् ॥

अर्थ— घाम येणें, शरीरास हलकेपणा, डोळ्यानां कंडसुटणें, मुख पाक ह्मणजे तोंड येणें, शिंक येणें, आणि अन्नावर वांछा होणें, हीं लक्षणें झालीं ह्मणजे ज्वरानें सोडलें असें समजावें.

इति ज्वरनिदानम्.

मधुकोशांकनिर्मथ्य सार मा ह्य्यवेमया ॥ व्याख्या कृता महाराष्ट्री माधवार्थप्रकाशिका ॥

---

## अतिसारनिदान.

पित्तज्वरामध्यें अतिसार होत असतो वज्वर आणि अतिसा

र हे एक मेकांचे उपद्रव आहेत ह्मणून ज्वरानंतर अतिसार सांगतों

अतिसाराचीं कारणें.

गुर्वतिस्निग्धतिक्ष्णोष्णद्रवस्थूलातिशीतलैः॥
विरुद्धाध्यशनाजीर्णैर्विषमैश्चातिभोजनैः॥स्नेहाद्यै
रतियुक्तैश्चमिथ्यायुक्तैर्विषैर्भयैः॥शोकदुष्टांबुम
द्यातिपानैःसात्म्यर्तुपर्यये॥२॥जलाभिरमणैर्वे
गविघातैः कृमिदोषतः॥ नृणांभवत्यतीसारोल-
क्षणंतस्यवक्ष्यते॥३॥

अर्थ— प्रमाणापेक्षां अधिक खाणें, किंवा स्वभावतः जड पदार्थ, उडीद इत्यादि भक्षणानें, अतिस्निग्ध, अतितीक्ष्ण, अतिऊष्ण, अत्यंत पातळ, आणि अत्यंत स्थूळ, (ह्मणजे ज्यांचे अवयव कठिण तो,) उदाहरण, लाडू, घिवर, इत्यादि, अत्यंत थंड (स्पर्शानें- किंवा वीर्यानें) विरुद्ध, (जसें क्षीर मत्स्य इत्यादिक) अध्यशन(ह्मणजे पूर्व दिवसाचा आहार जीर्ण झाल्या वांचून जेवणें.) अपक्वान्न, रोजची जेवणाची वेळ सोडून अन्य वेळीं थोडें किंवा फार खाणें, अशा भोजनानीं, स्नेहस्वेदादि पंचकर्मांचा अतियोग केल्यानें, किंवा हीनयोग केल्यानें, स्थावरादि दूषिविषभक्षणानें, भयानें, शोक केल्यानें, नासकें पाणी, आणि तसेंच-मद्य यांच्या प्राशनानें, अथवा निर्दुष्ट पाणी आणि मद्य यांचें अत्यंत प्राशन केल्यानें, सात्म्य ऋतू बदल्यानें, जळांत क्रीडा करण्यानें, मळमूत्रादिकांचा वेग धरण्यानें, कृमींच्या उपद्रवानें, (कृमीमुळें पक्काशय आणि आमाशय दुष्ट होतात) किंवा कृमिजन्य वायूच्या कोपानें मनुष्यांस अतिसार (ढाळ) रोग होतो, त्याचें लक्षण पुढें सांगतों.

## अतिसाराचीसंप्राप्ति.

संशम्यापांधातुरग्निंप्रवृद्धोवर्चोमिश्रोवायुनाधःप्र
णुन्नः॥ सरत्यतीवातिसारंतमाहुर्व्याधिंघोरंषड्वि
धंतंवदंति॥ ४॥ एकैकशःसर्वशश्चापिदोषैःशोके
नान्यः षष्ठआमेनचोक्तः॥ ४॥ ॥

अर्थ—अत्यंत दुष्ट झालेला शरीरांतला उदकरूप धातु+ अग्नीला मंद करून मळ मिश्र होऊन वायूनें खालीं (गुदमार्गानें) नेला ह्मणजे वारंवार सरतो, त्याला अतिसार ह्मणतात; हा भयंकर व्याधि साहा प्रकारचा आहे तो येणें प्रमाणें.

एकेक दोषानें ३ (ह्मणजे १ वातातिसार, २ पित्तातिसार, ३ आणि कफातिसार) सर्व दोष मिळून १ ह्मणजे सन्निपातातिसार, आणि पांचवा शोकातिसार, आणि साहावा ६ आमातिसार, असे साहा प्रकारचे अतिसार होतात, द्वंद्वज अतिसार व्याधिस्वभावानें होत नाहींत, सुश्रुतानें, आमातिसार नसांगतां भय शोकज दोन सांगून ६ साहा संख्येची बरीज पुरी केली, त्याणीं आमातिसाराचा अंतर्भाव सन्निपातातिसारांत केला, आणि येथें भयातिसार यातजा मध्यें गणला असें समजावें.

## अतिसाराचें पूर्वरूप.

हृन्नाभिपायूदरकुक्षितोदगात्रावसादानिलसन्नि
रोधाः॥ विड्संगआध्मानमथाविपाको भविष्यतस्त
स्यपुरःसराणि॥ ५॥

अर्थ—हृदय, नाभि, गुद, पोट, कुशी, इतक्या ठिकाणीं सुया टों-

+ रस, जल, मूत्र, स्वेद, मेद, कफ, पित्त, रक्त, इत्यादिक जाणावीं.

चल्या सारिखी पीडा, हातपाय गळणें; अपान वायूचा रोध, मळाव रोध, पोटफुगणें, अन्नाचा पाक बरोबर न होणें, अतिसार व्हावयाचा असला ह्मणजे हीं पूर्व चिन्हें होतात.

वातातिसार लक्षण.

अरुणं फेनिलं रूक्षमल्पमल्पं मुहुर्मुहुः॥ शकृदामं सरुक्शब्दं मारुतेनातिसार्यते॥ ६॥

अर्थ— वायूनें अतिसार झाला असतां, तांबडें, फेसयुक्त, रूक्ष, थोडें थोडें, आणि वारंवार, व अपक्व असें पुरीष (विष्ठा) पडतें, व दाळ होते वेळीं पर पर शब्द होतो, आणि पोटांत मुरडा होतो.

पित्तातिसारलक्षण.

पित्तात्पीतं नीलमालोहितं वा तृष्णामूर्छादाहपाकोपपन्नम्॥ ७॥

अर्थ— पित्तापासून. पिंपळें, निळें, किंवा थोडेंसें तांबडें, पुरीष- (मळ) होतें, आणि ताहान, भोंवळ, सर्वांगाचा दाह, गुदाचे ठिकाणीं पुरळ, हीं लक्षणें होतात.

कफज अतिसार.

शक्लं सांद्रं सकफं श्लेष्मयुक्तं विस्रं शीतं हृष्टरोमा- मनुष्यः॥

अर्थ— कफातिसारामध्यें पांढरें, घट्ट, कफमिश्रित, आमगंधि, आणि थंड, असें पुरीष पडतें, व त्या मनुष्याच्या आंगावर रोमांच उभे राहतात.

सान्निपातिक अतिसार

वाराहस्नेहमांसांबुसदृशं सर्वरूपिणम्॥ कृच्छ्र

साध्यमतीसारं विद्याद्दोषत्रयोद्भवम्॥ ८॥ ॥

अर्थ— डुकराच्या चर्बीसारिखें, अथवा मांस धुतलेल्या पाण्यासारिखें, आणि वातादि त्रिदोषांचीं जीं लक्षणें सांगितलीं त्या सर्व लक्षणांनीं युक्त असा हा त्रिदोषोद्भव अतिसार कष्टसाध्य जाणावा.

शोकातिसार.

तैस्तैर्भावैः शोचतोल्पाशनस्य बाष्पोष्मा वै वन्हिमाविश्य जंतोः॥ ९॥ कोष्ठं गत्वा क्षोभयेत्तस्य रक्तं तच्चाधस्तात्काकणंतीप्रकाशं॥ निर्गच्छेद्वै विड्विमिश्रं त्यविड्वा निर्गंधं वा गंधवद्वातिसारः॥ १०

अर्थ— त्या त्या धन, बंधु, विनाशादिकानीं शोक करणारा, आणि शोकामुळेंच ज्यानें अन्न तुटलें आहे, (त्यावरून त्याला धातुक्षय देखील होईल हें सांगितलें) अशा प्राण्याचें बाष्प, (नेत्रावाटे आंसवें गळतात तीं) आणि ऊष्मा म्हणजे शोकजन्य देह तेज तो बाष्पोष्मा कोठ्यांत शिरून अग्निला व्याकुळ (मंद) करून त्याच्या रक्ताला क्षोभवितो, मग तें रक्त गुदावाटे पडतें, त्याचा रंग तांबड्या गुंजेसारिखा असतो, तें मळमिश्रित किंवा मळरहित, गंधरहित किंवा दुर्गंधयुक्त असें असतें, सर्वांच्या मतीं हा अतिसार वात पित्तजनित आहे.

शोकातिसाराचें कृच्छ्रसाध्यत्व.

शोकोत्पन्नो दुश्चिकित्स्योतिमात्रं रोगो वैद्यैः कष्ट एष प्रदिष्टः॥

अर्थ— शोकापासून झालेला हा अतिसार चिकित्सा करण्यास फार कठिण, कारण, शोक शांति झाल्यावांचून केवळ औषधानें गू

ण येणें कठीण आहे, म्हणून वैद्यानीं हा कष्टसाध्य आहे म्हणून सांगितला, आतां "एष:" या पदानें असें कळविलें कीं वर सांगितलेल्या संप्राप्तीचा हा मात्र कष्ट, दुसऱ्या प्रकारच्या संप्राप्तीचा शोकज अतिसार सुखसाध्य होतो.

## आमातिसार.

अन्नाजीर्णात्प्रद्रुता:क्षोभयंत: कोष्ठंदोषा धातुसंघान् मलांश्च॥ नानावर्णंनैकश: सारयंति शूलो-
पेतंषष्ठमेनंवदंति॥

अर्थ— अन्न न जिरल्या मुळें दोष (वातपित्तकफ) स्व मार्ग सोडून कोष्ठांत जातात, आणि त्याचा क्षोभ करून रक्तादि धातु, आणि पुरीषादि मळ वारंवार गुदावाटे बाहेर सारतात; त्याचा रंग तऱ्हेतऱ्हेचा असतो, व त्यांत मुरडा फार होतो, त्याला सहावा आमातिसार म्हणतात.

## चिकित्से करितां आमपक्वलक्षण सांगतो.

संसृष्टमेभिर्दोषैस्तन्यस्तमप्स्ववसीदति॥ १२॥
पुरीषंभृशदुर्गंधिपिच्छिलंचामसंज्ञितम्॥ एतान्येवतुलिंगानिविपरीतानियस्यवै॥१३॥ लाघवंचविशेषेणतस्यपक्वंविनिर्दिशेत्॥

अर्थ— मागें सांगितलेल्या वातादिक अतिसाराच्या लक्षणानीं युक्त असें पुरीष पाण्यांत टाकलें असतां आम जड आहे म्हणून बुडतें, व तें फारच दुर्गंधयुक्त, व अत्यंत बुळबुळीत असतें, त्याला आम ही संज्ञा आहे.

त्याच्या विपरीतज्याचीं लक्षणें असतात, आणि शरीराला विशेषें करून लाघव असतें, त्याचें पुरीष पक्व झालें ह्मणून समजावें.

### असाध्यलक्षण.

पक्वजांबव संकाशंयकृत्पिंडनिभंतनु॥ घृततैलवसा मज्जावेसवारपयोदधि॥ मांसधावनतोयाभंकृष्णं-नीलारुणप्रभम्॥ मेचकंकर्बुरंस्निग्धंचंद्रकोपगतं घनं॥ कुणपंमस्तलुंगाभंदुर्गंधंकुथितंबहु॥ तृष्णा दाहारुचिश्वासहिक्कापार्श्वास्थिशूलिनम्॥ संमूर्छा रतिसंमोहयुक्तंपक्वलीगुदं॥ प्रलापयुक्तंच भिषक् वर्जयेदतिसारिणम्॥ १७॥ ॥

अर्थ— पिकलेल्या जांभळाच्या रंगासारिखें, काळजाच्या रंगाचें, (काळें तांबडें) थोडें, तूप, तेल, चर्बी मज्जा, वेसवार+, दूध, दहिं, आणि मांस धुतलेलें पाणीं याच्या रंगासारिखें, काजव्या प्रमाणें-काळें, निळ्या व शेंदरी रंगाचें, मृदंगाच्या शाई सारिखें, नाना प्रकारच्या रंगाचें, तुळतुळीत, मोराचे पिसावर असे चांदवे असतात तशे धातुस्नेहाचे चांदवे त्यांवर असतात, घट्ट, कुजयाच्या दुर्गंधानें मस्तकांतल्या मज्जेसारिखें, दुर्गंधयुक्त, व कुजक्या घाणीचें, पुष्कळ, असें पुरीष (मळ) पडतें, आणि रोग्यास तृषा, दाह, अन्नद्वेष, दमा, उचकी, बरगड्यांच्या हाडांस ठणका, मनाचा मोह, अस्वास्थ्य, इंद्रियमोह हीं लक्षणें होतात, आणि त्याच्या गुदाच्या वळ्या पिकतात, बडबड करणें. अशा आमातिसारि रोग्याला वैद्यानें सोडावा.

---

\+ मांसांतली हाडें वेगळीं करून कुटून दहीं, दूध, वेलदाणे, मिर्चें घालून जो पदार्थ करितात तो

## दुसरें असाध्यलक्षण.

असंवृत्तगुदंक्षीणंदुराध्मानमुपद्रुतम्॥गुदेपक्केगतोष्माणमतिसारिणमुत्सृजेत्॥

अर्थ— ज्याचें गुद मिटत नाहीं, असा क्षीण झालेला, अत्यंत आध्मानानें युक्त, शोथादि उपद्रवानीं व्याप्त, आणि गुदाचे ठाईं पाक करणारें पित्त विद्यमान असतां ज्याच्या शरीरांतला ऊष्मा नाहींसा झालेला, ह्मणजे अंग गार पडलें आहे, अथवा ज्याचा अग्नि नष्ट झाला आहे, अशा अतिसारी रोग्यास वैद्यानें सोडावा, "दुरात्मानं" असा पाठ असला तर अजितेंद्रिय ह्मणोजे ज्याचें तोंड स्वाधीन नाहीं ह्मणून पाहिजे तो पदार्थ खाणारा,

## अतिसाराचे उपद्रव.

शोथंशूलंज्वरंतृष्णांश्वासंकासमरोचकम्॥छर्दिंमूर्छांचहिक्कांचदृष्ट्वातीसारिणंत्यजेत्॥

अर्थ— सूज, शूल, ज्वर, तृष्णा, श्वास, खोकला, अन्नद्वेष, वांति, मूर्छा, उचकी, हीं लक्षणें झालीं असतां रोग्याला सोडावा.

## असाध्यलक्षण.

श्वासशूलपिपासार्तंक्षीणंज्वरनिपीडितम्॥विशेषेणनरंवृद्धमतिसारोविनाशयेत्॥

अर्थ— श्वास, शूल, तहान याणीं पिडलेला, क्षीण, ज्वरानें अत्यंत पिडलेला, आणि वृद्ध मनुष्य असला तर बहुत करून तो त्या अतिसारानें जगणार नाहीं.

## रक्तातिसार.

पित्तकृतियदात्यर्थंद्रव्याण्यश्नातिपैत्तिके॥ तदोप

जायतेभीक्ष्णं रक्तातीसारउल्वणः॥

अर्थ— पित्तातिसार झाला असतां, किंवा व्हावयाचा असतां; जर पित्त करणारीं द्रव्यें पुष्कळ आणि निरंतर खाल्लीं तर मोठा रक्तातिसार उत्पन्न होतो. त्याच्या तांबड्या काळ्या वगैरे रंगानीं वातादिक दूषक जाणावे. कोणी असें ह्मणेल कीं, रक्तज ही अतिसार आहे तो सातवा ह्मटला तर षट्त्व संख्येला बाध येईल; ह्मणून हा पित्तकाचाच एक अवस्था भेद आहे असें मानावें.

## प्रवाहिकेचीसंप्राप्ति.

वायुःप्रवृद्धोनिचितंबलासंनुदत्यधस्तादहिताशनस्य॥ प्रवाहतोल्पंबहुशोमलाक्तंप्रवाहिकांतांप्रवदंतितज्ज्ञाः॥

अर्थ— अपथ्य सेवन करणाऱ्या मनुष्याचा कुपित झालेला वायु, सांचलेल्या कफाला मलमिश्रित करून वारंवार गुदद्वारा वाटे पाडतो, कुंथलें असतां थोडा थोडा मल पडतो, त्या रोगास प्रवाहिका असें ह्मणतात,

प्रवाहिका आणि अतिसार यांचे धर्म सारखेच आहेत ह्मणून अतिसारांमध्यें प्रवाहिका सांगितली; परंतु अतिसारामध्यें नाना प्रकारचे द्रव धातु पडतात, आणि प्रवाहिकेमध्यें केवळ कफ पडतो, इतका भेद आहे,

## प्रवाहिकेचें वातादिभेदानें लक्षण

प्रवाहिका वातकृता सशूला पित्तात्सदाहा सकफा कफाच्च॥ सशोणिता शोणितसंभवाच्च ताः स्नेहरूक्षप्रभवा मतास्तु॥ तासामतीसारवदादिशे-

च्चलिंगंक्रमंचामविपक्कतांच॥

अर्थ— वातजन्य प्रवाहिका शूलयुक्त असल्ये, पित्तापासून दाहयुक्त, कफापासून कफयुक्त, आणि रक्ता पासून रक्तयुक्त असल्ये. त्या स्नेह रूक्ष पदार्था पासून होतात. ह्मणजे स्नेहा पासून कफजा, रूक्षा पासून वातजा, तु शब्दानें तीक्ष्णाम्ला पासून क्रमानें पित्तजा आणि रक्तजा होतात असें जाणावें

त्यांचें लिंग ह्मणजे वातादि भेद लक्षण, क्रम, आम पक्का वस्था, हीं अतिसार निदानांत सांगितल्या प्रमाणें जाणावीं.

अतिसार निवृत्तीचीशंकाजाण्या
साठीं त्याचें निवृत्तिलक्षणसांगतो.

यस्योच्चारंविनामूत्रंसम्यग्वायुश्चगच्छति॥दी
प्ताग्नेर्लघुकोष्टस्यस्थितस्तस्योदरामयः॥

अर्थ— ज्याला मूत्र होते वेळीं मळ होत नाहीं, आणिअपान वायु चांगला सरतो, अग्नि प्रदीप्त व कोष्ठ हलका होतो, त्या मनुष्याचा अतिसार गेला असें समजावें. इतिअतिसारनिदानम्

---

मधुकोशाख्यनिर्मथ्यसारमाख्यवेमया॥ व्याख्याकृतामहाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥ ॥५॥

---

## ग्रहणीनिदानम्

### ग्रहणीची संप्राप्ति.

अतीसारेनिवृत्तेपिमंदाग्नेरहिताशिनः॥भूयः
संदूषितोवन्हिर्ग्रहणीमभिदूषयेत्॥१॥

अर्थ— अति सार गेला असतां ही अग्नी मंद झालेल्या व अपथ्य भक्ष
या करणाऱ्या पुरुषाचा पुन: (किंवा अत्यंत) दुष्ट होऊन ग्रहणीला* चहूं
कडून दूषित करतो, अपि शब्दानें अतिसार झाला नसला तरी स्व का
रणानीं ग्रहणी रोग होतो, हें सूचविलें, कोणी असें ह्मणतात कीं अति
सार गेला नसला तरी ग्रहणी रोग होतो, मंदाग्नि या पदानें असें सूचवि-
लें कीं, ज्याचा अग्नि बरवर आहे, त्याणें अपथ्य सेवन केलें तरी विकार हो
त नाहीं, ग्रहणी दुष्ट झाली ह्मणजे अन्नाचें पाचन चांगलें होत नाहीं
ह्मणून वारं वार आममिश्रित मळ पडतो, हा रोग बहुत करून मुलां
स होतो, असें या ह्मण्यांत येतें.

## ग्रहणीचेंसंप्राप्तिपूर्वकसामान्यल०

एकैकश: सर्वशश्च दोषैरत्यर्थमूर्छितैः॥ सादुष्टा
बहुशोभुक्तमाममेवविमुंचति॥ २॥ पक्वंवासरुजं
पूतिमुहुर्बद्धंमुहुर्द्रवम्॥ ग्रहणीरोगमाहुस्तमायु
र्वेदविदोजना:॥ ३॥

अर्थ— अत्यंत दुष्ट झालेले पृथक् पृथक् दोष (वात, पित्त, कफ)
आणि सर्व दोष मिळून ती ग्रहणी दुष्ट झाली ह्मणजे खाल्लेलें अन्न-
अपक्व किंवा पक्व सोडते, तेव्हां मुरडा होतो, त्या मळाला अत्यंत
दुर्गंध असतो, वायूनें मळ वारंवार घट्ट होतो, पित्तानें वारंवार पातळ
होतो, ह्मणजे चोथा पाणी भरला होतो, आयुर्वेद जाणणारे लोक त्या
ला ग्रहणी रोग (ह्मणजे ग्रहणी मध्यें जो रोग तो.) ह्मणतात,

---

* पित्तधरानामक साहावी कला सांगितली, ती पक्वाशय आणि आमाशय यांच्या
मध्यें असते तिला ग्रहणी ह्मणतात. अन्नाचें ग्रहण करिते ह्मणून तिला ग्रहणी-
ही संज्ञा दिली आहे.

कती लागणें,) आणि अन्नाचा पाक उशीरानें होणें, आणि शरीराला जड पणा येणें, हें त्या ग्रहणी रोगाचें पूर्वरूप होय.

### वातिकग्रहणीचें कारण.

कटुतिक्तकषायातिरूक्षसंदुष्टभोजनैः॥ प्रमिताशनात्यध्ववेगनिग्रहमैथुनैः॥५॥ मारुतः कुपितोवन्हिंसंछाद्यकुरुतेगदान्॥५॥

अर्थ — तिखट, कडु, तुरट, अत्यंतरूक्ष, आणि संयोगादिविरुद्ध-अशा भोजनानीं, व अत्यंत अल्पभोजन, उपवास, अतिमार्गगमन, मलमूत्रादि वेगाचें धारण आणि अत्यंत मैथुन, या कारणांनीं वायु कुपित होऊन अग्नीला दूषित करून रोगांस उत्पन्न करितो.

### जे रोगउत्पन्न करितोते सांगतो.

तस्यान्नंपच्यतेदुःखंशक्तपाकंखरांगता॥ कंठस्यशोषः क्षुत्तृष्णा तिमिरंकर्णयोःस्वनः॥ पार्श्वोरुवंक्षणग्रीवारुगभीक्ष्णंविषूचिका॥७॥हृत्पीडा कार्श्यदौर्बल्यंवैरस्यंपरिकर्तिका॥ गृद्धिःसर्वरसानांचमनसःसदनंतथा॥८॥जीर्णेजीर्यतिचाध्मानंभुक्तेस्वास्थ्यमुपैतिच॥ सवातगुल्महृद्रोगप्लीहाशंकीचमानवः॥९॥चिराद्दुःखंद्रवंशुष्कंतन्वामंशब्दफेनवत्॥ पुनःपुनः सृजेद्वर्चः कासश्वासार्दितो निलात्॥१०॥

अर्थ— ज्यारोग्याचें अन्न मोठ्या दुःखानें पचतें, त्याचा पाक आंबट होतो. ( हें अग्नि मांद्यामुळें झालेल्या पित्ताच्या विदाहानें होतें. ) आंगाला खर्बरीतपणा असतो. ( हें वायूनें त्वचेचा स्नेह शोषण केल्यामुळें होतें ) गळा आणि तोंड हीं कोरडीं पडतात. ताहान आणि भूक लागत्ये. दृष्टीला मांद्य येतें, कानामध्यें शब्द होतो; बरगड्या, मांड्या, आडसंधि, आणि मान हीं दुखतात, आणि वारंवार विषूचिका ( ह्मणजे दोन्ही द्वारानीं आमअन्नाची प्रवृत्ति. ) होत्ये, हृदयास पीडा, शरीर कृशता, शक्ति नाहींशी होणें, तोंडास अरुचि, गुदाचे ठिकाणीं कात्तरल्यासारिखी पीडा, सर्व मधुरादि रस खाण्याची इच्छा, ( ही गोष्ट व्याधि प्रभावानें होत्ये किंवा वायूनें अंतःकरण दुष्ट झाल्यामुळें होत असेल. ) मनाची ग्लानि, अन्न जिरलें असतां किंवा जिरत असतां पोट फुगतें, आणि कांहीं खाल्लें असतां स्वस्थ होतें, आपणास वातगुल्म, हृद्रोग, आणि प्लीहा झाला आहे अशी त्यामनुष्यास शंका प्राप्त होत्ये. कारण, त्यारोगासारिखी पीडा होत असत्ये. वायूच्या योगानें तो मनुष्य खोकला आणि श्वास ह्यानीं पीडित होऊन त्याला फारवेळानें मोठ्या कष्टानें कधीं पातळ कधीं कोरडा, थोडा, शब्द आणि फेनासहित वारंवार मळ होतो.

## पित्तग्रहणीचें कारण व लक्षण.

कट्वजीर्णविदाह्यम्लक्षाराद्यैःपित्तमुल्बणम् ॥
आप्लावयद्धन्त्यनलंजलं तप्तमिवानलम्॥११॥ सोऽ
जीर्णनीलपीताभंपीताभःसार्यतेद्रवं॥ सधूमोद्गार
हृत्कंठदाहारुचितृडर्दितः॥१२॥

अर्थ — तिखट, अजीर्ण, विदाह करणारे, ( वेळूचे कोंब, ) मेपतीं.

पक्क निळ्या पिंवळ्या रंगाचा आणि पातळ मळ होतो, त्याला धुरकट ढेंकर येतात, उरांत आणि गळ्यांत जळजळ लागते, अन्नद्वेष, आणि तृषा त्यांनीं फार तो व्याकुळ होतो.

### कफग्रहणीचें निदा० व लक्षण.

गुर्वतिस्निग्धशीतादिभोजनादतिभोजनात्॥
भुक्तमात्रस्यवस्वप्ताद्धन्त्यग्निंकुपितः कफः॥१३॥
तस्यान्नंपच्यतेदुःखंहृल्लासच्छर्द्यरोचकाः॥आ
स्योपदेहमाधुर्यकासष्ठीवनपीनसाः॥१४॥हृ
दयंमन्यतेस्त्यानमुदरंस्तिमितंगुरु॥दुष्टोमधुर-
उद्गारःसदनंस्त्रीष्वहर्षणम्॥१५॥भिन्नामश्ले
ष्मसंसृष्टगुरुवर्चःप्रवर्तनम्॥अकृशस्यापिदौ
र्बल्यमालस्यंचकफात्मके॥१६॥

अर्थ— जड, अतिस्निग्ध, थंड, इत्यादि पदार्थांचें भोजन केल्यानें, आणि अतिमात्र भोजन केल्यानें, आणि जेवण होतांक्षणींच झोंप घेतल्यानें, कफ कुपित होऊन अग्नीचा नाश करितो, त्या रोग्याचें-अन्न कष्टानें पचतें, हृदय लसलसतें, वांति, अरुचि, तोंड कफानें सारवल्यासारिखें, व गोड होतें, खोकला येतो, कफाचा बेडका पडतो. आणि पडसें येतें, हृदय पाण्यानें भरल्यासारखें वाटतें, पोट ताठतें, व जड होतें, विकृत आणि मधुर असा ढेंकर येतो, अग्निमांद्य होतें, स्त्री संभोगाविषयीं इच्छा नसते, पातळ आणि आमक-

फानीं मिश्रित आणि जड असा मळ होतो, कृशानसून दुर्बळता ह्मणजे सामर्थ्य नसतें, आणि आळस येतो, कफजन्य ग्रहणीरोगांमध्यें हीं लक्षणें होताल.

## त्रिदोषग्रहणीचें लक्षण.

पृथग्वातादिनिर्दिष्टहेतुलिंगसमागमे॥ त्रिदोषं लक्षयेदेवंतेषां वक्ष्यामिभेषजम्॥ १७॥

अर्थ— वातादिकांचीं पृथक् पृथक् सांगितलेलीं कारणें व लक्षणें एकत्र झालीं असतां त्रिदोषग्रहणी रोगजाणावा, "तेषां वक्ष्यामि भेषजं" हें केवळ पादपूरणार्थ लिहिलें आहे,

मधुकोशस्कनिर्मथ्यसारमाकृष्यवैयथा॥ व्याख्या कृता महाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥ इतिग्रहणीनिदानम्

---

## अर्शोनिदान.

अतिसार ग्रहणी आणि अर्श यांचा परस्परसंबंध आहे ह्मणून ग्रहणीनंतर अर्श सांगतो.

पृथक् दोषैः समस्तैश्च शोणितात्सहजानिच॥ अर्शांसि षट्प्रकाराणि विद्याद्गुदवलित्रये॥ १

अर्थ— पृथक् दोषें करून ३ समस्तदोषमिळून, १ रक्तापासून १ आणि सहज १ अशीं सा हा प्रकारची अर्शस् (मुळव्याध) गुदाच्या तीनवळीवर होतात, गुदाचे ठिकाणीं प्रवाहिणी, सर्जनी, आणि ग्राहिणी अशा तीन वळी आहेत,

संप्राप्तिपूर्वकअर्शाचें स्वरूपसां०

दोषास्त्वङ्‌मांसमेदांसि संदूष्य विविधाकृतीन्॥ मांसांकुरानपानादौ कुर्वंत्यर्शांसि तान् जगुः॥२॥

अर्थ— वातादि दोष, त्वचा, मांस, आणि मेद, ह्यानां आणि त्याठिकाणचे रक्ताला दूषित करून अपान (ह्मणजे गुद) स्थानीं, आदि शब्दानें नासिकादिक घ्यावीं, नाना प्रकारच्या आकृतीचे मांसाचे अंकुर उत्पन्न करितात, त्या अंकुरांस अर्श (मुळव्याध) ह्मणतात.

वातार्शाचें कारण.

कषायकटुतिक्तानिरूक्षशीतलघूनिच॥ प्रमिताल्पाशनंतीक्ष्णमद्यमैथुनसेवनम्॥३॥ लंघनंदेशकालौचशीतौव्यायामकर्मच॥ शोकोवातातपस्पर्शो हेतुर्वातार्शसांमतः॥४॥

अर्थ— तुरट, तिखट, कडु, अतिरूक्ष, अतिशीत, आणि अतिलघु, अशा पदार्थांचें सेवन, उशीरानें जेवणें, अल्पभोजन करणे, तीव्र मद्याचें पान करणें, अत्यंत मैथुन, (स्त्रीसंग) करणें, उपवास, थंड देश आणि काल (हेमंतादि) अत्यंत आयास करणें, शोक करणें, वाऱ्यांत व उन्हांत फिरणें, हें वातजन्य अर्शाचें कारण आहे.

पित्तार्शाचें कारण.

कट्वम्ललवणोष्णानिव्यायामाग्न्यातपश्रमाः॥ देशकालावशिशिरौक्रोधोमद्यमसूयनम्॥५॥ विदाहितीक्ष्णमुष्णांचसर्वंपानान्नभेषजम्॥ पित्तोल्बणानांविज्ञेयः प्रकोपेहेतुरर्शसाम्॥६॥

अर्थ— तिखट, आंबट, खारट, आणि उष्ण असे पदार्थ, व्यायाम, अग्नी जवळ आणि उन्हांत बसणें, श्रम, उष्ण देश, व उष्ण काल, –

क्रोध, मद्यपान, हेवा करणें, दाह करणारें, तिखट, ऊन असें पान, अन्न आणि औषध, हें पित्ताधिक अर्शाचें कारण होय.

## कफज अर्शाचें कारण.

मधुरस्निग्धशीतानिलवणाम्लगुरूणिच ॥ अव्या
यामदिवास्वप्नशय्यासनसुखेरतिः ॥ ७ ॥ प्राग्वा-
तसेवाशीतौच देशकालावचिंतनम् ॥ श्लेष्मोल्ब
णानामुद्दिष्टमेतत्कारणमर्शसाम् ॥ ८ ॥

अर्थ— मधुर, स्निग्ध, शीत, खारट, आंबट, आणि जड, अशीं भोजनें, व्यायाम न करणें, दिवसास निजणें, सर्वकाळ मऊ गादीवर बसण्याची आवड, पाहांटेस पूर्वेकडचा वारा घेणें, थंड देश आणि थंड काळ, निष्काळजी असणें, हें कफाधिक अर्शाचें कारण समजावें.

## द्वंद्वजार्श कारण.

हेतुलक्षणसंसर्गाद्विद्याद्द्वंद्वोल्बणानिच ॥

अर्थ— दोन दोन दोषांचीं कारणें आणि लक्षणें मिळालीं म्हणजे द्वंद्वज अर्श झाला आहे म्हणून समजावें.

## त्रिदोषज अर्श.

सर्वोहेतुस्त्रिदोषाणां लक्षणं सहजैः समम् ॥ ९

अर्थ— पृथक् वातादिक अर्शांचें जें कारण सांगितलें, तें सर्व त्रिदोषार्शाला कारण आहे. आणि सहज अर्शाचें जें लक्षण तेंच त्याचें लक्षण आहे.

## वातार्शाचें लक्षण.

गुदांकुरा बह्वनिलाः शुष्काश्चिमिचिमान्विताः ॥
म्लानाः श्यावारुणास्तब्धा विशदाः परुषाः खराः ॥ १०

मिथोविसदृशाव क्रास्तीक्ष्णाविस्फुटितानना:॥
बिंबीकर्कंधुखर्जूरकार्पासीफलसन्निभा:॥११॥
केचित्कदंबपुष्पाभा: केचित्सिद्धार्थकोपमा:॥शि
र:पार्श्वांसकट्यूरुवंक्षणाभ्यधिकव्यथा:॥१२॥
क्षवथूद्गारविष्टंभहृद्ग्रहारोचकप्रदा:॥ कासश्वा
साग्निवैषम्यकर्णनादभ्रमावहा:॥१३॥ तैरार्तो
ग्रथितंस्तोकंसशब्दंसप्रवाहिकम्॥ रुक्फेनपि-
च्छानुगतंविबद्धमुपवेश्यते॥१४॥ कृष्णत्व-
ङ्नखविण्मूत्रनेत्रवक्त्रश्चजायते॥गुल्मप्लीहो-
दराष्ठीलासंभवस्तत एवच॥१५॥

अर्थ— वाताधिक गुदांतले मोड(अर्श) रूके (स्रावरहित) चित्र विचित्र वेदनेने युक्त, निर्जीव, श्याम व अरुण वर्ण, ताठर, बुळबुळी तनसणारे, कर्कश, खरखरीत (गाईचा जिभे सारखे,) एक सारखे नसणारे, वांकडेतिकडे, अणकुचीदार, कित्येकांचीं तोंडें भंगलेलीं, तोंडली, बोर, खारीक, देवकापसी, यांच्या फळा सारिखे आकृतीचे, कोणी कदंबाच्या पुष्पासारिखे,(जाड व बारीक अनेक टोंकांचे) कोणी मोहऱ्या इतके बारीक, असे असतात, त्यांच्या योगानें डोकें, बरगड्या, खांदे, कंबर, मांड्या, आणि आडसंधि, हे फार दुखतात, व शिंका, ढेंकर, मलावरोध, हृदय जखडल्या सारिखी वेदना, अरुचि, हीं होतात, आणि खोकला श्वास, अग्निवैषम्य, (अन्न कधीं चांगलें पचावें, कधीं पचूंनये,) कानामध्यें गिणगिण शब्द, आणि भ्रम, हीं होतात, त्या अर्शांनीं पीडित झालेल्या मनुष्यास दगडासारखा कठिण, थोडा, शब्दयुक्त, कुंथून, शूळ, फेंस, व चिकटा यांसह

अडकत, अडकत, मळ होतो, त्या मनुष्याची त्वचा, नखें, विष्ठा, मूत्र, डोळे, आणि तोंड हीं काळीं होतात, गुल्म, प्लीहोदर, अष्ठीला, (वायूची गांठ) त्या रोगांचा उपद्रव त्या अर्शापासूनच होतो.

## पित्तार्शाचें लक्षण.

पित्तोत्तरा नीलमुखा रक्तपीतासितप्रभाः॥ तन्व
स्रस्राविणो विस्रास्तनवो मृदवः श्लथाः॥ १६॥ शु
कजिव्हायकृत्खंडजलौकावक्त्रसन्निभाः॥ दाह
पाकज्वरस्वेदस्तृण्मूर्छारुचिमोहदाः॥ १७॥ सो
ष्माणो द्रवनीलोष्णपीतरक्तामवर्चसः॥ यवम-
ध्या हरितपीतहारिद्रत्वङ्नखाद्यः॥ १८॥

अर्थ— पित्ताधिक अर्शाचे मोड निळ्या अग्राचे, व त्यांचा रंग तांबडा, पिंवळा, किंवा काळा असतो, त्यांच्यांतून पातळ रक्ताचा स्राव होतो, त्यांना आंबूस घाण येत्ये, ते बारीक व कोमल आणि शिथिल असतात, त्यांचा आकार पोपटाची जीभ, काळीज, आणि जळवांचीं तोंडें त्यासारिखा असतो, त्यांपासून आग, गुदपाक, ज्वर, स्वेद, तृषा, मूर्छा, अरुचि आणि मोह, हे होतात, आणि हात लावला असतां कढत लागतात, व त्यामुळें पातळ, निळा, ऊन, पिंवळा, तांबडा, आणि आमयुक्त असा मळ होतो, ते जवासारखे मध्यें रोसर असतात, आणि त्या रोग्याचे, त्वचा, नख नेत्रादिक हिरवे पिंवळे किंवा हळदवट होतात,

## कफज अर्शाचें लक्षण.

श्लेष्मोल्बणा महामूला घना मंदरुजः सिताः॥
उत्सन्नोपचिताः स्निग्धाः स्तब्धा वृत्तगुरुस्थिराः॥

॥१९॥ पिच्छिलास्तिमिताः श्लक्ष्णाः कंड्वाढ्याः स्पर्शनप्रियाः॥ करीरपनसास्थ्याभास्तथागोस्तनसन्निभाः॥२०॥ वंक्षणानाहिनः पायुबस्तिनाभिविकर्षिणः॥ सश्वासकासहृल्लासप्रसेकारुचिपीनसाः॥२१॥ मेहकृच्छ्रशिरोजाड्यशिशिरज्वरकारिणः॥ क्लैब्याग्निमार्दवच्छर्दिरामप्रायविकारदाः॥२२॥ वसाभसकफप्राज्यपुरीषाःसप्रवाहिकाः॥ नस्रवंतिनभिद्यंतेपांडुस्निग्धत्वगादयः॥२३॥

अर्थ— कफाधिक अर्शाचे मोड महामूल ह्मणजे दूर धातूप्रत जाणारे, कठीण, मंद पीडा करणारे, पांढरे, लांबलांब, तुळतुळीत, तादर, वाटोळे, जड, गुदाला ओझें वाटविणारे, स्थिर, बुळबुळित, ओलसर, मण्या प्रमाणें गुळगुळित, कंडू फार करणारे, ह्मणून त्यानां स्पर्श केला असतां गोड वाटतो, नेपती आणि फणस यांच्या आठोळी सारिखे, गाईच्या सडासारिखे, आडसंधीला जखडून टाकणारे, गुद, बस्ति, आणि नाभि यानां ओढल्या सारिखी पीडा करणारे, श्वास, कास, मळमळ, लालास्राव, अरुचि, आणि पडसें, त्यानां उत्पन्न करणारे; आणि मेह, मूत्रकृच्छ्र, मस्तकाला जडत्व, शीतज्वर, यानां उत्पन्न करणारे; तसेंच नपुंसकत्व, अग्निमांद्य, ओकारी, आणि आमबहुल रोग, (अतीसारादिक) करणारे, वसा (चर्बी) व कफ त्यानीं मिश्रित असा पुष्कळ मळ पाडणारे, प्रवाहिका उत्पन्न करणारे होत, त्यापासून क्लेद रक्तादिक कांहीं स्रवत नाहीं, आणि ते बळकट पिळले असतांही फुटत नाहींत, त्यांच्या योगानें त्वचा, नख, नेत्रादिक पांढरे व तुळतुळीत होतात.

## सन्निपातज आणि सहज अर्शांचीं ल०

सर्वैः सर्वात्मकान्याहुर्लक्षणैः सहजानिच ॥ ॥

अर्थ— सर्व वात आदि अर्शांचा लक्षणानीं सर्वात्मक ह्मणजे त्रिदोषज अर्शाचीं लक्षणें, आणि तींच सहज अर्शांचीं लक्षणें जाणावीं, कारण तींही त्रिदोषजन्य आहेत.

## रक्तार्शाचें लक्षण.

रक्तोल्बणागुदेकीलाः पित्ताकृतिसमन्विताः ॥२५ वटप्ररोहसदृशागुंजाविद्रुमसन्निभाः ॥ तेत्यर्थंदुष्टमुष्णांचगाढविट्प्रपीडिताः ॥ स्रवंतिसहसारक्तं तस्यचातिप्रवृत्तितः ॥ भेकाभः पीड्यतेदुःखैः शोणितक्षयसंभवैः ॥२६॥ हीनवर्णबलोत्साहोहतौजाः कलुषेंद्रियः ॥ विट्श्यावंकठिणंरूक्षमधोवायुर्नगच्छति ॥२७॥

अर्थ— रक्त आहे अधीक ज्यामध्यें असे अर्शाचे मोड पित्तार्शाच्या लक्षणानीं युक्त असतात, वडाच्या अंकुरासारखे व गुंजेसारिखे, कोणी पोंवळ्यांच्या कांड्यासारखे असतात, ते जेव्हां कठीण मळानें अत्यंत दाबले जातात तेव्हां त्यांतून दुष्ट व ऊन ऊन रक्त अकस्मात् गळूं लागतें, तें रक्त फार वाहिलें ह्मणजे तो मनुष्य पर्जन्यकाळच्या बेडकासारखा पिंवळा होतो, आणि रक्तक्षयापासून झालेल्या दुःखानीं (स्वच्छारुध्य शिराशैथिल्यादिक) पीडित होतो, त्याच्या शरीराचा वर्ण, स्थूळपणा, आणि उत्साह हीं नष्ट होतात, शक्ति नाहींशी होत्ये, डोळे गढूळ होतात, किंवा सर्व इंद्रियें व्याकूळ होतात, त्याला श्यामवर्ण, कठीण, आणि रूक्ष असा मळ होतो, आणि अपान वायु स

रत नाहीं

आतां या रक्तार्शाचेंच वातादिभेदानें
लक्षण सांगतों.

तनुचारुणवर्णंच फेनिलंचासृगर्शसाम्॥ कट्यू
रुगुदशूलंच दौर्बल्यं यदिचाधिकम्॥ २८॥ तत्रा
नुबंधो वातस्य हेतुर्यदिच रूक्षणम्॥

अर्थ— मुळव्याधींचे रक्त पातळ, अरुण वर्ण, आणि फेंसाळलेलें, असें जर पडत असेल, आणि कंबर, मांड्या, आणि गुद, यांच्या ठिकाणीं शूळ होत असेल, व दुर्बलता फार झाली असेल आणि त्यांत कांहीं रूक्ष हेतु पोचला असेल तर त्या रक्तार्शामध्यें वायूचा संबंध आहे असें जाणावें.

कफसंबंधाचें लक्षण.

शिथिलंश्वेतपीतंच विट्स्निग्धंगुरुशीतलम्॥ य
घर्शसांघनंचासृक्तंतुमत्पांडुपिच्छिलम्॥ गुदंस
पिच्छंस्तिमितंगुरुस्निग्धंच कारणम्॥ श्लेष्मानुबं
धोविज्ञेयस्तत्ररक्तार्शसांबुधैः॥ ३०॥

अर्थ— ज्यामध्यें शिथिल, पांढरा, व पिंवळा, स्नेहयुक्त, जड, आणि शीतळ, असा मळ होत असेल, आणि जर मुळव्याधीचें रक्त जाड, तंतुयुक्त, पांढरें, आणि बुळबुळीत पडत असेल, आणि गुद बुळबुळीत, दडस होत असेल, आणि गुरु, स्निग्ध, असें कांहीं कारण झालें असेल तर त्या रक्तार्शास कफाचा संबंध आहे असें जाणावें.

पित्ताचा अनुबंध कां सांगितला नाहीं? असें कोणी ह्मणेल तर त्याचें कारण सांगतों, रक्ताचीं व पित्ताचीं लक्षणें सारिखींच आहेत

पूर्वरूपसांगतों.

विष्टंभोन्नस्य दौर्बल्यंकुक्षेराटोपएवच॥ ३१॥ का
र्श्यमुद्गार बाहुल्यंसक्थिसादोल्पविट्कता॥ ग्रहणी
दोषपांड्वर्तेराशंकाचोदरस्यच॥ पूर्वरूपाणि निर्दि
ष्टान्यर्शसामभिवृद्धये॥ ३२॥

अर्थ— अन्नाचा विष्टंभ ह्मणजे अवष्टंभ होऊन जिरणें, शक्तिक्षीणता, कुशीमध्ये गुड गुड शब्द, रोड होणें, ढेंकर पुष्कळ येणें, मांड्या गळून जाणें, थोडा मळ होणें, ग्रहणी आणि पांडुरोग यांची-भ्रांति होणें. कारण त्यांचीं लक्षणें दिसण्यांत येतात, व उदर झाल्याची ही भ्रांति होत्ये, मुळव्याध उत्पन्न व्हावयाची असली ह्मणजे पहिल्यानें हीं लक्षणें होतात.

निदानानंतर पूर्वरूप सांगावें, तें येथें लक्षणानंतर सांगण्याचें प्रयोजन असें कीं, निदान लक्षणास चिकित्सेचें अंगत्व प्रतिपादनार्थ तीं पूर्वी सांगून मग हें सांगितलें, अथवा ग्रंथकाराचीमर्जी.

केवळ गुदाचे ठाईं दोष कोपानें.
अर्शोरोग होतो, मग सर्वदेहाम
ध्यें कृशत्व कृष्णत्वादिरूपदुष्टि
कशी होत्ये अशी कोणी शंका क-
रील ह्मणून सांगतों.

पंचात्मा मारुतः पित्तं कफोगुदवलित्रये॥ सर्वए
वप्रकुप्यंतिगुदजानांसमुद्भवे॥ ३३॥ तस्मादर्शां
सि दुःखानि बहुव्याधिकराणिच॥ सर्वदेहोप-
तापीनिप्रायः कृच्छ्रतमानिच॥ ३४॥

अर्थ— गुदाच्या तिन्ही वळीवर मुळव्याधीचे मोड उत्पन्न झाले असतां पांच प्रकारचा वायु, पांच प्रकारचें पित्त, आणि पांच प्रकारचा कफ, हे सर्वत्र दोष कोपपावतात.

प्राण, अपान, समान, उदान, आणि व्यान हे पांच प्रकारचे वायु हृदय, गुद, नाभि, कंठ, आणि सर्वशरीर हीं त्यांचीं अनुक्रमानें स्थानें होत, तसेच आलोचक, रंजक, साधक, पाचक, आणि भ्राजक याभेदानें पित्त पांच प्रकारचें आहे त्यांचीं स्थानें— आलोचक नेत्रांमध्यें, रंजक, यकृत, आणि प्लीहा यांमध्यें, साधक हृदयामध्यें, पाचक पक्वाशय आणि आमाशय यांमध्यें, आणि भ्राजक त्वचेमध्यें राहतें, या प्रमाणें कफही अवलंबक, क्लेदक, बोधक, तर्पक आणि श्लेषक या पांच भेदानें क्रमे करून हृदय, आमाशय, जिव्हा, मस्तक, आणि संधी या पांच ठिकाणीं राहतो, याप्रमाणें सर्व दोष आप आपल्या पांच पांच स्वरूपानीं कुपित होतात, ह्मणून हारोग, (अर्श) फार दुःखदायक व बहुत प्रकारचे व्याधि (उदर अग्निमांद्य इत्यादि उपद्रव) करणारा, सर्व देहास क्लेशदायक आणि बहुत करून कृच्छ्रसाध्य होतो.

## सुखसाध्यलक्षण.

बाह्यायांतु वलौजातान्येकदोषोल्बणानिच ॥ अर्शांसि सुखसाध्यानि नचिरोत्पतितानिच ॥ ३५ ॥

अर्थ— बाहेरल्या वळीवर झालेले, एक दोषोल्बण, आणि ज्यांस एक वर्ष लोटलें नाहीं असे मोड सुखसाध्य होतात.

## कृच्छ्रसाध्यलक्षण.

द्वंद्वजानिद्वितीयायांवलौयान्याश्रितानिच ॥ कृच्छ्र-

साध्यानितान्याहुः परिसंवत्सराणिच ॥ ३५ ॥ ॥

अर्थ— दोन दोषां पासून झालेले, वजे दुसऱ्या वळीवरअसणारे, आणि ज्यांना एक वर्ष लोटलें आहे, असेमुळव्याधीचेमोड कृच्छ्रसाध्य होतात, आणि जे बाह्य वळीवर असून द्विदोषोत्पण असतील, आणि एक दोषोत्पण दुसऱ्या वळीवर झालेअसतील तेही कृच्छ्रसाध्यजाणावे.

## असाध्यलक्षणें.

सहजानित्रिदोषाणियानिचाभ्यंतरांवलिम् ॥ जायंतेऽर्शांसिसंश्रित्यतान्यसाध्यानिनिर्दिशेत् ॥ ३६

अर्थ— सहज (जन्माबरोबर झालेले) त्रिदोषज, आणि जे आंतल्या वळीवर होतात, ते सर्व असाध्यजाणावे.

## याप्यलक्षण.

शेषत्वादायुषस्तानिचतुःपादसमन्विते ॥ याप्यंते दीप्तकायाग्नेः प्रत्याख्येयान्यतोन्यथा ॥ १७ ॥

अर्थ— असाध्य मुळव्याध जरी असली तरी रोग्याचें आयुष्य बाकी असले आणि ती चतुःपाद संपन्न युक्त असला (वैद्य, औषध, परिचारक, आणि रोगी हे जसे असावे तसे असले) तर, आणि त्यारोग्याचा अग्नि प्रदीप्त असला तर याप्य म्हणजे कांहीं शम पावत्ये, आणि या विपरीत असलें तर रोगी सोडावा.

## उपद्रवानें असाध्यत्वसांगतो.

हस्ते पादे गुदे नाभ्यां मुखे वृषणयोस्तथा ॥ शोथोहृत्पार्श्वशूलंच तस्यासाध्योऽर्शसोहिसः ॥ ३८ ॥

अर्थ— ज्याच्या हात, पाय, गुद, नाभि, मुख, आणि वृषण यांवर सूज-

येत्ये, व हृदय आणि पार्श्व भाग दुखतात, तो रोगी साध्य होतनाहीं

दुसरीं असाध्य लक्षणें.

हृत्पार्श्वशूलसंमोहश्छर्दिरंगस्यरुक्ज्वरः॥ तृ
ष्णा गुदस्यपाकश्चनिहन्युर्गुदजातुरम्॥ ३९॥

अर्थ— हृदय आणि पार्श्व यांस शूल, इंद्रिय आणि मन यांचा मोह, ओकारी, आंगांत शूल, ज्वर, तृषा, गुदाचा पाक, (गुदावर पिंवळे फोड) हीं लक्षणें झालीं ह्मणजे रोगी असाध्य जाणावा.

तृष्णारोचकशूलार्तमतिप्रस्रुतशोणितम्॥ शोथा
तीसारसंयुक्तमर्शांसिक्षपयंतिहि॥ ४०॥

अर्थ— तृषा, अरुचि, शूल, यानीं पिडलेला, ज्याचें रक्त फार स्रवलें आहे, आणि सूज, अतिसार याणीं युक्त अशा रोग्याचा अर्श नाश करितात.

मेंद्रादिष्वपिवक्ष्यंतेयथास्वंनाभिजान्यपि॥ गंडूप
दास्यरूपाणिपिच्छिलानिमृदूनिच॥ ४१॥

अर्थ— मेंढ्र ह्मणजे शिश्न, आदिशब्देंकरून नासिका कर्ण इत्यादिकांचे ठाईं दोषभेदें करून अर्श (अंकुर) होतात, ह्मणून पुढें सांगणें आहे, तसेंच नाभीला ही अर्श होतात, तीं गांडवळाच्या तोंडासारिखीं, बुळबुळीत आणि मृदु अशीं असतात.

चर्मकील (चामखीळ) यांचीसंप्राप्ति.

व्यानोगृहीत्वाश्लेष्माणंकरोत्यर्शस्त्वचोबहिः॥
कीलोपमंस्थिरखरंचर्मकीलंतुतद्विदुः॥ ४२॥ ॥

अर्थ— व्यान वायु कफाला घेऊन त्वचेवर खिळ्यासारखा, स्थिर, आणि खरखरीत असा मोड करितो, त्याला चामखील ह्मणतात.

वातादिभेदें करून त्याचें लक्षण.

वातेन तोद पारुष्ये पित्तादसितरक्तता॥ श्लेष्मणा
स्निग्धता चास्य ग्रथितत्वं सवर्णता॥ ४३॥

अर्थ— वायूनें त्यामध्यें सुया टोंचल्या सारिखी पीडा, आणि कर्कशपणा; पित्तानें त्याचा रंग काळा तांबडा, आणि कफानें त्याला गुळगुळीतपणा, गांठाळलेला. आणि त्वचे सारखा वर्ण असतो.

मधुकोशं समुनिर्मथ्य सारमाकृष्य वै मया॥ टीका कृता
महाराष्ट्री माधवार्थप्रकाशिका॥

इति अर्शोनिदानम्.

---

## अग्निमांद्य.

अर्शापासून अग्निमांद्य होतें ह्मणून
अर्शानंतर अग्निमांद्यनिदान सांगतों.

मंदस्तीक्ष्णोथ विषमः समश्चेति चतुर्विधः॥ क-
फपित्तानिलाधिक्यात्तत्साम्याज्जाठरोनलः॥ १॥

अर्थ— कफ, पित्त, आणि वायु यांच्या आधिक्यानें आणि त्यांच्या समतेने अनुक्रमें करून, जठराग्नि, मंद, तीक्ष्ण, विषम, आणि सम- या प्रमाणें चार प्रकारचा होतो, ह्मणजे कफानें मंद, पित्तानें तीक्ष्ण, वायूनें विषम, आणि तिघांच्या सारखे पणानें सम अग्नि होतो.

त्याचें स्वरूप.

विषमो वातजान् रोगान् तीक्ष्णः पित्तनिमित्तजान्॥
करोत्यग्निस्तथा मंदो विकारान् कफसंभवान्॥ २॥

अर्थ— विषमाग्नि वातजन्य ८० रोगां पैकीं कोणतेंही उत्पन्न करितो.

व सामान्य ज्वरातिसारादिक ही उत्पन्न करितो, तीक्ष्णाग्नि पित्त-जन्य ४० रोगां पैकीं ओष चोषादिक रोग उत्पन्न करितो, तसेंच मंदाग्नि कफजन्य २० विकारां पैकीं आलस्यादिक उत्पन्न करितो.

समाग्न्यादिकांचीं लक्षणें.

समासमाग्नेरशितामात्रा सम्यग्विपच्यते॥ स्वल्पापिनैव मंदाग्नेर्विषमाग्नेस्तु देहिनः॥३॥ कदाचित्पच्यते सम्यक् कदाचिन्न विपच्यते॥ मात्रातिमात्राप्यशिता सुखं यस्य विपच्यते॥ ४॥ तीक्ष्णाग्निरिति तं विद्यात्समाग्निः श्रेष्ठ उच्यते॥

अर्थ– समाग्नि पुरुषाचा योग्य आहार चांगला पचतो, मंदाग्नीचा अल्प देखील आहार पचत नाहीं; आणि विषमाग्नीचा तर कधीं चांगला पचतो, कधीं पचत नाहीं, आणि अतिमात्र भोजन केलें असतां ज्याला सुखानें पचतें, त्याचा अग्नि तीक्ष्ण आहे, असें जाणावें, सर्वां मध्यें समाग्नि हा श्रेष्ठ आहे भस्मक = ह्मणून जो अग्नि आहे तो तीक्ष्णाग्नि नव्हे, अत्यंत तीक्ष्णाग्नीलाच भस्मक ह्मणतात, त्याचें लक्षण वरकांत सांगितलें आहे तें असें.

नरे क्षीणकफे पित्तं कुपितं मारुतानुगं॥ ५॥ सोष्मणा पाचकस्थाने बलमग्नेः प्रयच्छति॥ तदा लब्धबलो देहं रूक्षयेत्सानिलोऽनलः॥ ६॥ अभिभूय पचत्यन्नं तैक्ष्ण्यादाशु मुहुर्मुहुः॥ पक्त्वान्नं स ततो धातून्शोणितादीन्पचत्यपि॥ ७॥ ततो दौर्बल्यमातंकं मृत्युं चोपानयेत्परम्॥ भुक्तेन्नेलभते शांतिं जीर्णमात्रे प्रताम्यति॥ ८॥ तृट्कासदाहमोहाः स्युर्व्या

धयोत्यग्निसंभवाः ॥९॥

अर्थ— कोणी मनुष्याचा कफ क्षीण झाला ह्मणजे कुपित झालेलें पित्त वायूला मिळून ऊष्म्यासह वर्तमान पाचक स्थानीं जाऊन अग्नीला बळ देतें, त्या वेळेस तो अग्नि वातसहाय्यानें प्रबळ होऊन देहाला रूक्ष करून टाकतो; आणि तीव्र तेनें लवकर आणि वारंवार अन्न पचवून टाकतो; अन्न पचविल्या नंतर तो रक्तादि धातूंस हीपचवितो, त्यायोगानें दुर्बलता, रोग आणि मृत्यु देखील येतो, त्यावर कांहीं अन्न खाल्लें असतां सरव वाटतें, परंतु अन्न जिरता क्षणींच मूर्छा येत्ये. तृषा, खोकला, दाह, आणि मूर्छा (ह्मणजे कांहीं कळेनासें होणें,) हे व्याधि अत्यग्नी पासून होतात.

मधुकोशंसकनिर्मथ्यसार माकृष्य वैमया॥ व्याख्या कला महाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥ इत्यग्निमांद्यनिदान

---

## अथाजीर्णनिदानम्

अग्निमांद्य आणि अजीर्ण हीं परस्पर कारणें आहेत ह्मणून अग्निमांद्यानंतर अजीर्णनिदान सांगतों.

आमं विदग्धं विष्टब्धं कफपित्तानिलैस्त्रिभिः॥ अजीर्णं केचिदिच्छंति चतुर्थं रसशेषतः॥१॥ अजीर्णं पंचमं केचिन्निर्दोषं दिनपाकि च॥ वदंति षष्ठं चाजीर्णं प्राकृतं प्रतिवासरम्॥२॥

अर्थ— कफ, पित्त, आणि वायु, या तीन दोषानीं क्रमानें आम, विदग्ध, आणि विष्टब्ध अशीं तीन अजीर्णें होतात, आहार रसाच्या शेषानें च

यथें अजीर्ण होतें, असें कोणी ह्मणतात, आणि रात्र दिवस मिळून जो आहार पचतो व त्यामध्यें पोट फुगणें वगैरे कांहीं होत नाहीं. हें पांचवें अजीर्ण कोणाचे मतीं आहे, आणि दररोजचें स्वाभाविक (विकृतिजन्य नव्हे) अजीर्ण साह्मावें असें कोणी ह्मणतात, हें साह्मावें अजीर्ण सांगण्याचें कारण इतकेंच कीं, त्याच्या पचनार्थ ऋतुतांत वामपार्श्व शयनादिक आचार सांगितला आहे तो करावा, तो असा "भुक्त्वा शतपदं गच्छेद्वामपार्श्वेन संविशेत्॥ शब्दरूपरसस्पर्शगंधांश्च मनसः प्रियान्॥ भुक्तवानुपसेवेत तेनान्नं साधु तिष्ठति.॥" अर्थ— भोजन झाल्यावर शत पावली करून डाव्या कुशीवर निजावें, मनास आवडतील ते शब्दादि विषय सेवन करावे- ह्मणजे अन्नाचा परिपाक चांगला होतो.

## अजीर्णाचें कारण.

अत्यंबुपानाद्विषमाशनाच्च संधारणात्स्वप्नविपर्ययाच्च॥ कालेपि सात्म्यं लघु चापि भुक्तमन्नं न पाकं भजते नरस्य॥३॥ ईर्ष्याभयक्रोधपरिक्षितेन लुब्धेन शुग्दैन्यनिपीडितेन॥ प्रद्वेषयुक्तेन च सेव्यमानमन्नं न सम्यक्परिपाकमेति॥४॥

अर्थ— फार पाणी पिणें, अकाळीं जेवणें, मळमूत्रादिकांचा वेगरोध करणें, दिवसास निजणें, ह्या कारणानीं जेवणाच्या वेळेवर जरी लघु आणि सोसेल असें ही अन्न खाल्लें तरी तें चांगलें पचत नाहीं. ईर्ष्या, भय, आणि क्रोध यांणीं व्याप्त झालेला, लोभी, शोक, आणि दैन्य यांणीं पिडलेला, आणि मत्सरयुक्त अशा पुरुषानें खाल्लेलें अन्न चांगलें परिपक्व होत नाहीं. कोणी हा ईर्ष्याभयक्रोध"

इत्यादि श्लोक मानस दोषाजीर्ण विषयक आहे, असें ह्मणतात.

### आमादिक अजीर्णाचें लक्ष.

तत्रामेगुरुतोत्क्लेदः शोथोगंडाक्षिकूटगः ॥ उद्गारश्च यथाभुक्तमविदग्धः प्रवर्तते ॥ ५ ॥

अर्थ— त्या पैकीं आमाजीर्णा मध्यें आंगाला जडता, मळमळ, गाल आणि डोळे यानां सूज, आणि ढेंकर येतो तो जसें अन्न खावें तसा येतो.

### विदग्धाजीर्णलक्षण.

विदग्धेभ्रमतृण्मूर्छाः पित्ताच्चविविधारुजः ॥ उद्गारश्चसधूमाम्लः स्वेदो दाहश्चजायते ॥ ६ ॥

अर्थ— विदग्धाजीर्णामध्यें भ्रम, तृषा, आणि मूर्छा ह्या होतात, आणि पित्ता पासून नाना प्रकारच्या ओषचोषादिक पीडा होतात. आणि ढेंकर येतो तो धुरकट व आंबट येतो, आणि घाम येतो व दाह होतो.

### विष्टब्धाजीर्णलक्षण.

विष्टब्धेशूलमाध्मानंविविधावातवेदनाः ॥ मलवाताप्रवृत्तिश्च स्तंभोमोहोंगपीडनम् ॥ ७ ॥

अर्थ— विष्टब्धाजीर्णामध्यें शूळ, पोटफुगणें, नाना प्रकारच्या तोदभेदादि रूप वातवेदना, मळ आणि वायु यांचीं अप्रवृत्ति, (ह्मणजे. बंदी) आंगताठ ल्या सारखें होणें. मोह आणि अंगपीडन ह्म॰ आमवायूच्या कळा सारिख्या कळा लागणें. हीं लक्षणें होतात.

### रसशेषाजीर्णलक्षण.

रसशेषेन्नविद्वेषो हृदयाशुद्धिगौरवे ॥ ॥

अर्थ— रसशेषाजीर्णामध्यें अन्नद्वेष, हृदयस्वच्छ नसणें आणि शरीराला जडपणा, हीं होतात.

अजीर्णापासूनउपद्रव.

**मूर्च्छाप्रलापोवमथुः प्रसेकः सदनंभ्रमः ॥ उपद्रवा भवंत्येतेमरणंचाप्यजीर्णतः ॥ ८॥**

अर्थ— मूर्छा, बडबड, ओकारी, तोंडाला पाणी सुटणें, ग्लानि, भोंवळ, अजीर्णा पासून हे उपद्रव होतात, आणि अजीर्ण फार विकोपास गेलें तर मरण देखील येतें.

अतिमात्रभोजन करणें हें अजीर्णाला कारण आहे ह्मणून सांगतों.

**अनात्मवंतः पशुवद्भुंजतेये प्रमाणतः ॥ रोगानीकस्यतेमूलमजीर्णंप्राप्नुवंतिहि ॥ ९॥**

अर्थ— इंद्रियें स्वाधीन नसल्यामुळें जे पशूप्रमाणें हवें तितकें खातात, त्यानां अनेक रोगाचें मूळ असें अजीर्ण होतें.

अजीर्णापासून विषूच्यादिक होतात ह्मणून अजीर्णानंतर विषूच्यादिक सांगतों.

**अजीर्णमामंविष्टब्धंविदग्धंचयदीरितम् ॥ विषूच्यलसकौतस्माद्भवेच्चापिविलंबिका ॥ १०॥**

अर्थ— आम, विष्टब्ध, आणि विदग्ध हीं जीं अजीर्णें सांगितलीं, त्यापासून विषूचिका (मोडशी किंवा तरळ) आणि अलसक, आणि विलंबिका हे रोग उत्पन्न होतात.

विषूची ह्मणजे काय तें सांगतो.

सूचीभिरिवगात्राणितुदन्संतिष्ठतेनिल:॥ यत्रा-
जीर्णेच सा वैद्यैर्विषूचीतिनिगद्यते॥ ११॥

अर्थ— ज्या अजीर्णांत सुयानीं टोंचल्या सारिखी शरीरास वायूची-पीडा होत्ये तिला विषूचि असें ह्मणतात,

नतांपरिमिताहारालभंतेविदितागमा:॥ मूढास्ता
मजितात्मानोलभंतेशनलोलुपा:॥१२॥

अर्थ— ज्यांचा आहार परिमित आहे व ज्यानां वैद्यशास्त्र कळतें,त्या नां ही विषूचिका होत नाहीं, आणि जे अज्ञानी वज्यांचीं इंद्रियें स्वाधीन नाहींत आणि पशू प्रमाणें प्रमाणातिरिक्त भोजन करणारे अशा मनुष्यांस ही विषूचिका अवश्य होत्ये.

विषूचीचें लक्षण.

मूर्छातिसारौवमथु:पिपासाशूलभ्रमोद्वेष्टनजृंभ
दाहा:॥ वैवर्ण्यकंपौह्रदयेरुजश्चभवंतितस्यांशि
रसश्चभेद:॥ १३॥

अर्थ— मूर्छा, दाळ, ओकारी, शोष, शूल, भोंवळ, पांयांला पेटक्या येणें, जांभया, दाह, शरीराचा वर्ण बदलणें, कांपरें सुटणें, आणिउरांत दुखणें, आणि मस्तकशूळ हीं लक्षणें विषूचीत होतात, हिलाच महामारी ह्मणतात किंवा कोणी पटकी ह्मणतात,

अलसकाचें लक्षण.

कुक्षिरानह्यतेत्यर्थंप्रताम्येत्परिकूजति॥निरुद्धो
मारुतश्चैवकुक्षावुपरिधावति॥ १४॥ वातवर्चोनि
रोधश्चयस्यात्यर्थंभवेदपि॥ तस्यालसकमाचक्षे
तृष्णोद्गारौतुयस्यच॥ १५॥

अर्थ— फूस अत्यंत फुगते, रोगी भुल्लून पडतो, आणि मोठ्यानें आरोळ्या मारतो, या प्रमाणें वायूचा खालीं जाण्याचा रोध झाला ह्मणजे तो कुक्षीच्या वरती ह्मणजे हृदय कंठादिकांप्रत येतो, मळाचा आणि वायूचा अत्यंत रोध होतो, आणि त्याला शोष फार लागतो व ढेंकर कर्पट येतात, त्याच्या त्या रोगाला अलसक असें ह्मणतात.

विलंबिकेचें लक्षण.

दुष्टंतुभुक्तंकफमारुताभ्यां प्रवर्ततेनोर्ध्वमधश्चयस्य॥ विलंबिकांतां भृशदुश्चिकित्स्यामाचक्षतेशास्त्रविदःपुराणाः॥ १६॥

अर्थ— कफ वायूनीं अन्न दुष्ट होऊन ऊर्ध्व किंवा अधोमार्गानें प्रवृत्त होत नाहीं (ह्मणजे वांति किंवा ढाळ होत नाहींत) आमाशयांत तें अन्न तसेंच पुष्कळ वेळ राहातें, त्या रोगाला विलंबिका ह्मणतात. ही चिकित्सा करण्यास फारच कठीण आहे, अलसक आणि विलंबिका त्या दोघांमध्यें कफवात प्रबळ असून ऊर्ध्वाधः प्रवर्तन होत नाहीं, तेव्हां हे तुल्यच आहेत, त्यांत भेद कोणता? अशी कोणी शंका करील तर सांगतों, — अलसकामध्यें शूलादिक फार तीव्र होतात, आणि विलंबिकेंत होत नाहींत,

अजीर्णापासून झालेले विषूच्यादिक सांगून अजीर्णजन्य आमाचें दुसरें कार्य सांगतो.

यत्रस्थमामंविरुजेत्तमेवदेशंविशेषेणविकारजातैः॥ दोषेणयेनावततंशरीरंतल्लक्षणैरामसमुद्भवैश्च॥ १७॥

अर्थ— ज्या ठिकाणीं आम राहातें त्याच ठिकाणीं, ज्या दोषानें शरीर व्याप्त झालें असेल, त्याच्या लक्षणानीं (तोद, दाह, गौरवादि) आणि आम जन्य विकारानीं (आम वातादिक) विशेष पीडा होत्ये, यावरून अन्य ठिकाणीं ही थोडी पीडा करितो हें सूचविलें, आणि "यत्र" या सर्वनाम शब्दानें कुपित झालेल्या वातादिकां प्रमाणेंच आमाचेंही नियमित स्थान नाहीं हें सूचविलें,

## विषूचिका आणि अलसक यांचें असाध्य लक्षण सांगतो.

यःश्यावदंतोष्ठनखोल्पसंज्ञो वम्यर्दितोऽभ्यंतरयातनेत्रः॥ क्षामस्वरःसर्वविमुक्तसंधिर्यायान्नरोसोपुनरागमाय॥१८॥

अर्थ— ज्याचे दांत, ओंठ आणि नखें काळीं पडतात, स्मृति थोडी असत्ये, ओकारीनें पीडित होतो, डोळे खोल जातात, शब्द खोल जातो, आणि हाता पायांचे संधि सर्व ढिले पडतात, तो मनुष्य वांचत नाहीं. विलंबिका तर स्वरूपानेंच असाध्य आहे, असें भेज्जटाचें मत आहे.

## जीर्णाहार लक्षण.

उद्गारशुद्धिरुत्साहो वेगोत्सर्गोयथोचितः॥ लघुताक्षुत्पिपासाचजीर्णाहारस्यलक्षणम्॥१९॥

अर्थ— शुद्ध ढेकर, शरीराला आणि मनाला आनंद वाटणें, आणि आहाराप्रमाणें वेगासहित मल मूत्रांची प्रवृत्ति होणें, शरीरास हलकेपणा, त्यांत विशेषें करून कोठा हलका होणें, भूक आणि तहान लागणें, अन्नचांगलें जिरलें असतां हीं लक्षणें होतात. इत्यग्निमांद्याजीर्णविषूचिकाविलंबिकानिदानम्॥ ॥

मधुकोशं स निर्मथ्य सारमाकृष्य वै मया॥ व्याख्याकृ
तामाहाराद्धी माधवार्थप्रकाशिका॥ इत्यग्निमांद्यनिदानं॥

## कृमिनिदान.

अजीर्णापासून कृमीचा उद्भव होतो
म्हणून अजीर्णानंतर कृमिनिदान सां.

कृमयस्तु द्विधा प्रोक्ता बाह्याभ्यंतरभेदतः॥ बहिर्म
लकफासृग्विट्‌जन्मभेदाच्चतुर्विधाः॥१॥ नामतो
विंशतिविधाः,

अर्थ— बाह्य आणि अभ्यंतर या भेदानें कृमी दोन प्रकारचे आहेत.
बहिर्मल(सेदादिक) कफ,रक्त,आणि विष्ठा, या मध्यें उत्पन्न होणारे असे चा
र प्रकारचे, आणि त्यांचीं नावें वीस प्रकारचीं आहेत.

त्यापैकीं बाह्य कृमि सांगतो.

बाह्यास्तत्र मलोद्भवाः॥ तिलप्रमाणसंस्थानवर्णाः
केशांबराश्रयाः॥२॥ बहुपादाश्च सूक्ष्माश्च यूका
लिक्षादिनामतः॥ द्विधाते कोठपिटिकाकंडूगंडान्
प्रकुर्वते॥३॥

अर्थ— त्यापैकीं बाह्यमलोद्भव कृमि;— प्रमाण, आकृति, आणि व
र्ण (पांढरा किंवा काळा) ईहीं करून तिळा प्रमाणें असतात, ते केश
आणि वस्त्रें यांवर राहातात, त्यापैकीं ज्याना पाय बहुत म्हणजे सा
हा असतात त्यांस उवा आणि त्यापेक्षां बारीक जे असतात, त्यानां
लिखा म्हणतात, त्या दोहों कृमी पासून गांधी, पुळया, कंडू, आ
णि गांठी उत्पन्न होतात.

### क्रमीचें कारण.

अजीर्णभोजीमधुराम्लनित्योद्रवप्रियःपिष्टगुडो
पभोक्ता॥ व्यायामवर्जीचदिवाशयानोविरुद्धभु
क् संलभते क्रमींस्तु॥ ४॥

अर्थ— अजीर्णावर भोजन करणारा, निरंतर गोड, आणि आंबट पदार्थ खाणारा, द्रवपदार्थ, (कढी, सांबारें, आमटी, वगैरे) खाणारा, गूळ, आणि पीठ याणीं केलेले पदार्थ (अनारसे, घारगे इत्यादि) खाणारा, व्यायाम नकरणारा, दिवसास निद्रा करणारा, आणि विरुद्धभुक् म्ह णजे क्षीर मत्स्यादि पदार्थ भक्षण करणारा, अशा पुरुषास क्रमि (जंत) होतात.

### कोणते क्रमि कोणत्या कारणानें हो· तात तें सांगतो.

माषपिष्टान्नलवणगुडशाकैःपुरीषजाः॥ मांसमाष
गुडक्षीरदधिशक्तैः कफोद्भवाः॥५॥ विरुद्धाजीर्णशा
काद्यैःशोणितोत्थाभवंतिहि॥ ५॥॥

अर्थ— उडीद, पिष्टान्न, (मोदक, लाडू, वगैरे) खार, गूळ, भाज्या, ह्या पदार्थांनीं विष्ठे पासून क्रमि होतात.

मांस, उडीद, गूळ, दूध, दहीं, शक्त, (कांजी किंवा लोणचें) ह्या पदार्थांनीं कफा पासून क्रमि होतात,

विरुद्ध, (क्षीरमत्स्यादि) अर्धकच्चे शिजलेलें, आणि भाज्या, आदि करून पदार्थांनीं रक्तजन्य क्रमि होतात.

### पोटांत क्रमि झाल्याचें लक्षण.

ज्वरोविवर्णताशूलंहृद्रोगः सदनंभ्रमः॥ भक्तद्वे-

षोतिसारश्चसंजातकृमिलक्षणं॥ ६॥ ॥ ॥

अर्थ— ज्वर, शरीराचा वर्ण पालटणें, शूळ, हृदयांत पीडा, अंगग्लानि, भ्रम, अन्नद्वेष, आणि अतीसार, हीं लक्षणें झालीं ह्मणजे समजावें कीं कृमि झाले आहेत.

## कफज कृमीचें लक्षण.

कफादामाशयेजाता वृद्धाःसर्पंतिसर्वतः॥७॥ पृथु ब्रध्ननिभाःकेचित्केचिद्गंडूपदोपमाः॥ रूढधान्यांकुराकारास्तनुदीर्घास्तथाणवः॥८॥ श्वेतास्ताम्रावभासाश्चनामतःसप्तधातुते॥ अंत्रादाउदरावेष्टाः हृदयादामहारुजः॥९॥ चुरवोदर्भकुसुमाःसुगंधा स्तेचकुर्वते॥ हृल्लासमास्यस्रवणमविपाकमरोच कं॥१०॥ मूर्छाछर्दितृषानाहकार्श्यश्वयथुपीनसान्

अर्थ— कफापासून आमाशयामध्यें झालेले कृमि वाढले असतां चहूंकडे फिरतात, त्यांत कोणी रुंद वादी (चामड्याची) सारिखे कोणी गांडूळा सारिखे; कोणी धान्याच्या अंकुरासारिखे असतात, कित्येक बारीक, लांब, आंखूड, असतात, कांहीं पांढरे, तांबडे, असतात; त्यांचीं नांवें सात आहेत, तीं येणें प्रमाणें,— १ अंत्राद, २ उदरावेष्ट ३ हृदयाद, ४ महारुज, ५ चुरु ६ दर्भकुसुम, आणि ७ सुगंध. हीं नांवें कांहीं अन्वर्थक, कांहीं निरर्थक आहेत, व्यवहारार्थ पूर्वींच्या आचार्यांनीं दिलीं आहेत, या प्रमाणेंच पुढलीं नांवें जाणावीं; त्या कृमीपासून मळमळ, तोंडाला पाणी सुटणें, अन्न न पचणें, अरुचि, घेरी, ओकारी, ताहान, पोटफुगणें, शरीर कृश होणें, सूज आणि पडसें हे विकार होतात.

## रक्तजकृमिलक्षण.

रक्तवाहिशिरास्थानारक्तजाजंतवोणवः॥अपादा
वृत्तताम्राश्च सौक्ष्म्यात्केचिददर्शनाः॥११॥केशादा
रोमविध्वंसारोमद्वीपाउदुंबराः॥षट्तेकुष्ठैककर्मा
णःसहसौरसमातरः॥१२॥

अर्थ— रक्त वाहणाऱ्या शिरामधील रक्तापासून होणारे कृमि बारीक, पादरहित, वाटोळे, तांबडे, असतात, कित्येक कृमि फार बारीक असतात, ह्मणून दिसत देखील नाहींत, ते कृमि साहा प्रकारचे, त्यांचीं नांवें, १ केशाद, २ रोमविध्वंस ३ रोम द्वीप ४ उदुंबर ५ सौरस आणि ६ मातर, कुष्ठ उत्पन्न करणें हेंच त्यांचें मुख्य कर्म होय.

## पुरीषजन्यकृमिलक्षण.

पक्काशयेपुरीषोत्थाजायंतेधोविसर्पिणः॥प्रवृ-
द्धाःस्युर्भवेयुश्चतेयदामाशयोन्मुखाः॥१३॥त
दास्योद्गारनिश्वासाविड्गंधानुविधायिनः॥पृ
थुवृत्ततनुस्थूलाःश्यावपीतसितासिताः॥१४॥
तेपंचनाम्नाकृमयःककेरुकमकेरुकाः॥सौसुरा
दामल्दनाश्चलेलिहाजनयंतिच॥१५॥विड्भेद
शूलविष्टंभकार्श्यपारुष्यपांडुताः॥रोमहर्षाग्नि
सदनगुदकंडूर्विमार्गगाः॥१६॥ इतिकृमिनिदानं॥

अर्थ— पक्काशयामध्यें पुरीष ह्मणजे मला पासून झालेले —कृमि गुदावाटे बाहेर सरतात, ते फार वाढून आमाशयाकडे येतात तेव्हां त्या कृमिरोगाच्या ढेकराला आणि निश्वासाला विष्ठेचा घाण येत्ये, ते कृमि जाड, पोसलेले, वाटोळे, बारीक, लठ्ठ, नीलय

र्ण, पिंवळे, काळे, पांढरे, त्यांची नांवें पांच तीं येणें प्रमाणें, १ककेरुक २मकेरुक, ३सौसुराद ४ मलून ५लेलिह, हे मळस्या आडमार्गानें जाऊं लागले असतां ध्यापासून पातळ मळ, शूळ, पोट फुगणें, कृशत्व, अंग खरखरीत होणें, पांडुर वर्ण, रोमांच, अग्निमांद्य, आणि गुदाला कंडू, हे उपद्रव होतात. इति कृमिनिदानम्॥ ॥

मधुकोशंस्कनिर्मथ्य सारमाकृष्य यत्नतः॥ व्याख्या कृता महाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥ ॥

---

## पांडुरोगनिदान.

पांडुरोगाः स्मृताः पंच वातपित्तकफैस्त्रयः॥ चतुर्थः सन्निपातेन पंचमो भक्षणान्मृदः॥ १॥

अर्थ— पांडुरोग पांच प्रकारचे आहेत, १ वातपांडु, २ पित्तपांडु, ३ कफपांडु, ४ सन्निपात पांडु आणि पांचवा ५ माती खाल्ल्यापासून एकूण पांच सांगितले आहेत.

### पांडुरोगाचें कारण व संप्राप्ति.

व्यवायमम्लं लवणानि मद्यं मृदं दिवास्वप्नमतीव तीक्ष्णं॥ निषेव्यमाणस्य विदूष्य रक्तं दोषास्त्वचं पांडुरतां नयंति॥ २॥

अर्थ— अतिमैथुन, अत्यम्लपदार्थ, खारटपदार्थ यांचें सेवन, अतिमद्यपान, मृत्तिका भक्षण, दिवसास निजणें, अत्यंत तिखट पदार्थ, यांचें सेवन करणाराचें रक्तदोषानीं दुष्ट होऊन शरिराची त्वचा पांडुर वर्ण होत्ये, येथें रक्त हें केवळ उपलक्षण आहे, तेणेंकरून त्वङ्, मांस हीं दूष्यें आहेत असें समजावें हारीतानें नर-

रस देखील दूष्य ह्मणून सांगितला आहे.

पूर्वरूप.

त्वक्स्फोटनष्ठीवनगात्रसादमृद्भक्षणप्रेक्षणकूटशोथाः॥विण्मूत्रपीतत्वमथाविपाकोभविष्यत स्तस्यपुरःसराणि॥३॥

अर्थ— त्वचा फुटल्ये, तोंडाला थुंका, आंग गळणें, मृत्तिकाभक्षण, नेत्र गोलानां सूजयेल्ये, मळ, मूत्र, यानां पिंवळट पणा, अन्नाचा पाक होणें, हीं लक्षणें पांडु रोग होण्याचे पूर्वी मनुष्याला होतात.

वातपांडुरोगलक्षण.

त्वङ्मूत्रनयनादीनांरूक्षकृष्णारुणाभता॥ वातपांड्वामयेकंपतोदानाहभ्रमादयः॥४॥

अर्थ— वातजन्य पांडुरोगामध्यें त्वचा, मूत्र, आणि नयन इत्यादिकांस रूक्षता, काळेपणा, तांबडे पणा असतो, आणि कंप, सया टोचल्या सारिखी पीडा, पोट फुगणें, भ्रम, आदि शब्दें करून भेद शूलादिक ही होतात.

पित्तपांडुरोगलक्षण.

पीतमूत्रशकृन्नेत्रोदाहतृष्णाज्वरान्वितः॥ भिन्नविट्कोतिपीताभःपित्तपांड्वामयीनरः॥५॥

अर्थ— पित्त पांडुरोग्याचीं, मूत्र, विष्ठा, आणि नेत्रें हीं पिंवळीं होतात; दाह, ताहान, ज्वर, ह्यानीं तो पीडित असतो; मळ पातळ होतो, आणि त्याची शरीर कांति अत्यंत पिंवळी होल्ये,

कफपांडुरोगलक्षण.

कफप्रसेकश्वयथुस्तंद्रालस्यातिगौरवैः॥पांडुरोगी
कफाच्छुक्लैस्त्वङ्मूत्रनयनाननैः॥६॥

अर्थ— मुखावाटे कफाचा स्राव, सूज, झांपड, आळस, शरीराला भार, त्वचा, मूत्र, डोळे, आणि तोंड ह्यांना श्वेतत्व, ह्या लक्षणांनीं कफपांडुरोगी ओळखावा.

सान्निपातिक पांडुरोगी तर वर सांगितलेल्या वातादि लक्षणांवरूनच जाणावा.

### उपद्रवयुक्तसान्निपातिकपांडु रोगाचें असाध्य लक्षण.

ज्वरारोचकहृल्लासछर्दितृष्णाक्लमान्वितः॥पांडु-
रोगीत्रिभिर्दोषैस्त्याज्यः क्षीणोहतेंद्रियः॥७॥

अर्थ— ज्वर, अरुचि, मळमळ, ओकारी, ताहान, आणि उत्कासे, ह्या उपद्रवांनीं युक्त जो त्रिदोषजन्य पांडुरोग, आणि क्षीण झालेला, आणि ज्या-च्या इंद्रियांची स्वस्व विषय घेण्याची शक्ति गेली आहे तो सोडावा.

### मृत्तिकाभक्षणापासून पांडुरोग होतो त्याचें लक्षण.

मृत्तिकादनशीलस्यकुप्यत्यन्यतमोमलः॥कषाया
मारुतंपित्तमुखरामधुराकफं॥८॥कोपयेन्मृद्रसादीं
श्चरौक्ष्याद्भुक्तंचरूक्षयेत्॥पूरयत्यविपक्वैवस्त्रोतांसि
निरुणद्धापि॥९॥इंद्रियाणांबलंहत्वातेजोवीर्योज-
सीतथा॥पांडुरोगंकरोत्याशुबलवर्णाग्निनाशनम्॥१०

अर्थ— माती खाण्याची ज्या मनुष्याला सवय लागली असते, त्या-च्या वातादिकांपैकीं एकादा दोष कुपित होतो, मातीतुरट रसाची अ

सळी तर वायु कुपित होतो, खारी असली तर पित्त कोपतें, गोड असली तर कफ कुपित होतो, ती माती पोटांत गेल्यावर रसादिक धातूनां रूक्ष करिते, आणि रौक्ष्य गुण प्रबल झाला ह्मणजे जें अन्न खावें तें रूक्ष होऊन जातें, ती माती कोष्ठादिकांच्या अग्नीनीं पाक झाल्या वांचून रस वाहणाऱ्या स्रोतसां (मार्ग) मध्यें शिरते, आणि त्यांचा रोध करिते, तेणें करून इंद्रियांचें बळ ह्मणजे स्वविषय ग्रहण शक्ति नष्ट होत्ये, शरीराची दीप्ति, शक्ति आणि ओज ह्मणजे सर्व धातूंचे सार—(हृदयांत असतें ते) क्षीण होऊन पांडुरोग उत्पन्न होतो, त्यामध्यें बल, वर्ण, आणि अग्नि त्यांचा नाश होतो,

## विशेषलक्षण.

शूनाक्षिकूटगंडभ्रूः शूनपन्नाभिमेहनः॥ कृमिकोष्ठोतिसार्येतमलंचासृक्कफान्वितम्॥११॥

अर्थ- नेत्रगोल, गाल, भृकुटि, पाय, नाभि, आणि शिश्न, त्यानां सूज येत्ये, आणि कोठ्यामध्यें कृमि होतात, व रक्त कफ मिश्रित दाळ होतो, —— सर्व पांडु रोगामध्यें जेव्हां कोष्ठांत कृमि होतात तेव्हां हें लक्षण होतें, असें जेज्जटाचार्यांचें मत आहे, आणि मृद्भक्षणजन्य पांडुरोगानंतर हें लक्षण सांगितलें आहे, ह्मणून हें त्याचेंच लक्षण होय, असें इतर आचार्यांचें मत आहे, विदेहानें तर हेंच लक्षण त्याचें (मृत्पांडुरोगाचें) ह्मणून स्पष्ट सांगितलें आहे.

## असाध्यलक्षणें.

पांडुरोगश्चिरोत्पन्नः खरीभूतोनसिध्यति॥ कालप्रकर्षाच्छूनांगोयोवापीतानिपश्यति॥१२॥ बद्धाल्पविट्सहरितंसकफंयोतिसार्यते॥ दीनः श्वेतातिदि-

ग्धांगश्छर्दिमूर्छातृषान्वितः॥ १३॥ सनास्त्यसृक्क्ष
याद्यस्तु पांडुः श्वेतत्वमाप्नुयात्॥ पांडुदंतनखोयस्तु
पांडुनेत्रश्चयोभवेत्॥ १४॥ पांडुसंघातदर्शीचपांडु
रोगीविनश्यति॥ अंतेषुशूनंपरिहीनमध्यंम्लानंत
थांतेषुचमध्यशूनं॥ १५॥ गुदेचशेफस्यथ मुष्कयोश्च
शूनंप्रताम्यंतमसंज्ञकल्पम्॥ विवर्जयेत्पांडुकिनंय
शोर्थीतथातिसारज्वरपीडितंच॥ १६॥

अर्थ— फारादिवसांचा पांडुरोग काळ बहुत लोटल्यामुळें जरठ-
झाला ह्मणजे साध्य होत नाहीं, अथवा.

सर्व शरीराला सूज आली असून जो रोगी सर्व पदार्थ पिंवळे पा
हातो तो रोगी असाध्य जाणावा, अथवा,

जा मनुष्याला बांधलेला थोडा मळ हिरव्यारंगाचा कफमिश्रि
त पडतो तो असाध्य, अथवा,

जो पुरुष दीन ह्मणजे ग्लान होतो व फांदरा फटफटीत पडतोव
ओकारी, मूर्छा, तृषा, त्यानीं पिडतो तो नास्ति ह्मणजे मेल्यासारि-
खा ह्मणजे असाध्य. दुसरें असाध्य लक्ष.

रक्तक्षया पासून जो पांडुरोगी पांदरा होतो तो असाध्य

ज्याचे दांत, नखें, आणि डोळे पिंवळे झाले आहेत तो असाध्य.

जो पांडुर वर्णाचे पदार्थ समुदाय पाहातो तो पांडुरोगी नाश पावतो.

हात, पाय, डोकें, त्याच्या ठिकाणीं सूज आणि मध्य देह ज्याचा
शुष्क झाला आहे तो असाध्य, त्याच्याउलट साध्य.

मध्यदेहाला सूज, आणि हात, पाय, डोकें, हीं शुष्क झालेलीं,
गुद व शिश्न यांचे ठाईं सूज, मृत प्राय झालेला असा पांडुरोगी वै

द्यानें सोडावा, तसाच अतिसार आणि ज्वर ह्यानीं पिडलेल्या रोग्या स यश इच्छिणाऱ्या वैद्यानें टाकून द्यावा.

पांडुरोगामध्यें कामला (कावीळ)
होत्ये ती सांगतो.

पांडुरोगीतु योत्यर्थं पित्तलानि निषेवते॥ तस्यपित्त मसृङ्मांसं दग्ध्वा रोगाय कल्पते॥१७॥ हारिद्रने त्रः सभृशं हारिद्र त्वङ् नखाननः॥ रक्तपीतशकृन्मू त्रो भेकवर्णो हतेंद्रियः॥१८॥ दाहाऽविपाकदौर्ब- ल्यसदनारुचिकर्षितः॥ कामला बहुपित्तैषा कोष्ठ शाखाश्रया मता॥१९॥

अर्थ— जो पांडुरोगी अत्यंत पित्तल द्रव्यें सेवन करतो, त्याचें पित्त रक्त मांसाला जाळून (दुष्ट करून) कामलारूप रोग करण्यास समर्थ होत्ये, त्याचे डोळे अत्यंत पिंवळे होतात, त्वचा, नखें, आणि तोंड- हीं पिंवळीं होतात, आणि मूत्र व पुरीष लाल व पिंवळीं होतात, तो मनुष्य पावसाळ्यांतल्या बेडका सारिखा पिंवळा होतो, इंद्रियां चीशक्ति नष्ट होत्ये, दाह, अन्न न पचणें, दुर्बलता, अंगग्लानि, अन्नद्वेष याणींतो रोगी पीडित होतो, जीमध्यें पित्त प्रबळ अशी- ही कामला एक कोष्ठाश्रय, आणि दुसरी शाखा (रक्तादि धातु) श्रि त असत्ये, जसा राजयक्ष्मा स्वतंत्र होतो तशी ही कामला स्वतंत्र होते.

हिचीच एक दुसरी अवस्था आहे.
जिला कुंभकामळा ह्मणतात ती.

कालांतरात्खरीभूता कृच्छ्रास्यात्कुंभकामला॥

अर्थ— कालांतरानें जरठ झालेली जी कुंभकामला ती कृच्छ्रसाध्य

होत्ये, कुंभ ह्मणजे कोष्ठ तद्गतजी कामला ह्मणजे कोष्ठाश्रया कामला.

### असाध्यलक्षण.

कृष्णापीतशकृन्मूत्रोभृशंशूनश्वमानवः॥संरक्ता
क्षिमुखच्छर्दिविण्मूत्रोयश्चताम्यति॥२०॥ ॥

अर्थ— ज्यापुरुषाचें शकृत् (मळ) काळें वमूत्र पिंवळें होतें वशरीराला भोंना सारिखी सूजयेती, आणि डोळे, तोंड, वांति, पुरीष, आणि मूत्र हीं अत्यंत लालहोतात, वजो वरचेवर मोहपावतो, तो-कामलारोगी वांचत नाहीं.

### दुसरें असाध्यलक्षण.

दाहारुचितृडानाहतंद्रामोहसमन्वितः॥नष्टा
ग्निसंज्ञःक्षिप्रंचकामलावान्विपद्यते॥२१॥ ॥

अर्थ— दाह, अरुचि, तृषा, पोटास फुगारा, झांपड, मूर्छा ह्या लक्षणानीं युक्त, अग्निमांद्य झालेला, वस्मृति गेलेला कामलेचा रोगी तत्काळ मरण पावतो.

### कुंभकामलेचें असाध्यलक्षण.

छर्द्यरोचकहृल्लासज्वरक्लमनिपीडितः॥ नश्यति
श्वासकासार्तोविट्भेदीकुंभकामली॥२२॥

अर्थ— ओकारी, अरुचि, मळमळ, ज्वर, आयासा वांचून श्रम, ह्यानीं पिडलेला, व दमा, खोकला, यानीं जर्जरित, आणि अतिसारयुक्त असा कुंभकामली पुरुष नाशपावतो.

### पांडुरोगामध्यें हलीमकरोग होतअसतो तोसांगतो.

यदातुपांडोर्वर्णस्याद्धरितःश्यावपीतकः॥ बलो.

साह क्षयस्तंद्रामंदाग्नित्वंमृदुर्ज्वरः॥२३॥स्त्रीष
हर्षांगमर्दश्चदाहतृष्णारुचिर्भ्रमः॥ हलीमकंतदा
तस्यविद्यादनिलपित्ततः॥२४॥

अर्थ— ज्या वेळेस पांडुरोग्याचा वर्ण हिरवा, निळा, किंवा पिंवळा, होतो, आणि बल व उत्साह यांचा नाश, झांपड, अग्निमांद्य, बारीक ज्वर, स्त्रीसंभोगाचे इच्छेचा अभाव, अंगमोडून येणें, दाह, तृषा, अन्न द्वेष, आणि भ्रम, हे उपद्रव होतात, तेव्हां वातपित्ता पासून त्यांला हलीमक रोग झाला आहे असें समजावें.

## पानकी लक्षण.

संतापोभिन्नवर्चस्त्वंबहिरंतश्चपीतता॥ पांडुता
नेत्रयोर्यस्यपानकीलक्षणंभवेत्॥२५॥

अर्थ— संताप ह्मणजे इंद्रियें, मन, यांस ताप, मळ पातळ होणें, आंत बाहेर पिंवळेपणा, आणि डोळ्यांस पिंवळेपणा, हें पानकीचें लक्षण होय, इति पांडु, कामला, हलीमक निदानम्॥ ॥

मधुकोशस्कनिर्मथ्यसारमाकृष्यवैमया॥ व्याख्या
कृतामहाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥ ॥

## रक्तपित्तनिदान.

पांडुरोगाप्रमाणें रक्तपित्त ही पित्तजन्य
च आहे ह्मणून पांडुरोगानंतर रक्तपित्त सां०

घर्मव्यायामशोकाध्वव्यवायैरतिसेवितैः॥तीक्ष्णो
ष्णक्षारलवणैरम्लैःकटुभिरेवच॥१॥पित्तंविद-
ग्धंस्वगुणैर्विदहत्याशुशोणितं॥ततःप्रवर्तते-

रक्तमूर्ध्वंवाधोद्विधापिवा॥ २॥ ऊर्ध्वंनासाक्षिकर्णा स्येमेंद्रयोनिगुदैरधः॥ कुपितंरोमकूपेश्चसमस्ते स्तत्प्रवर्तते॥ ३॥

अर्थ— उन्हांत फारफिरणें, अति आयास करणें, अत्यंत शोक करणें, अति मार्ग चालणें, अति मैथुन करणें, मिरच्या आदिकरून तिखट पदार्थ, विस्तवाजवळ बसणें, जवखारादि क्षारपदार्थ, मीठ वगैरे लवण पदार्थ, आंबट तिखट पदार्थ, इत्यादिकानीं कुपित झालेलें पित्त आपल्या तीक्ष्ण, द्रव, पूति, इत्यादि गुणानीं झटकन रक्ताला तापवितें, तदनंतर तें रक्त ऊर्ध्व मार्गानें किंवा अधो मार्गानें अथवा दोहों मार्गानें प्रवृत्त होतें, ऊर्ध्व मार्ग ह्मणजे नाक, डोळे, कान, आणि तोंड, यापासून वाहातें, आणि अधोमार्ग ह्मणजे, शिश्न, योनि, आणि गुद यां वाटे वाहातें, आणि तें फार कुपित झालें तर सर्व रोमरंध्रांतून वाहूं लागतें,

## पूर्वरूप.

सदनंशीतकामित्वंकंठधूमायनंवमिः॥ लोहगंधिश्चनिःश्वासोभवत्यस्मिन्भविष्यति॥ ४॥

अर्थ— ग्लानि, शीताची इच्छा, घशापासून धूर निघाल्या सारिखें वाटणें, वांति आणि तापविलेल्या लोखंडावर पाणी ओतलें असतां जसा गंध येतो तसा गंध निश्वासाला येतो, रक्त पित्त पुढें व्हावयाचें असलें ह्मणजे हीं लक्षणें होतात,

## कफयुक्तरक्तपित्तल.

सांद्रंसपांडुसस्नेहंपिच्छिलंचकफान्वितम्॥

अर्थ— घट्ट, किंचित् पांडुर वर्ण, स्नेहयुक्त, आणि बुळबुळीत,

असें जें रक्तपित्त पडतें तें कफमिश्रजाणावें.

## वातिकरक्तपित्तलक्षण.

श्यावारुणंसफेनंचतनुरूक्षंचवातिकम्॥५॥

अर्थ— नीलवर्ण, अरुण वर्ण, किंचित फेंसयुक्त, पातळ, आणि- रूक्ष, अशा रक्तपित्तास वाताचा संबंध आहे असें जाणावें,

## पैत्तिकरक्तपित्तलक्षण.

रक्तपित्तंकषायाभंकृष्णंगोमूत्रसन्निभम्॥मे
चकागारधूमाभमंजनाभंचपैत्तिकम्॥६॥

अर्थ— जें रक्तपित्त, भगव्या रंगाचें, काळें, गोमूत्रा सारिखें, किंवा मृदंगाच्या शाईसारिखें, किंवा घेरोशासारिखें, किंवा सुरम्या सारखें, काळें तें पित्त संबंधाचें जाणावें,

## द्विदोषजादिलक्षण.

संसृष्टलिंगंसंसर्गात् त्रिलिंगंसान्निपातिकं॥
ऊर्ध्वगंकफसंसृष्टं अधोगंमारुतान्वितम्॥७॥
द्विमार्गंकफवाताभ्यामुभाभ्यामनुचर्तते॥

अर्थ— दोन दोषांच्या संबंधानें दोघांचीं लक्षणें होतात, तें द्विदोषजरक्तपित्त जाणावें

तीन दोषांचीं लक्षणें दिसलीं ह्मणजे त्रिदोषज रक्तपित्त जाणावें.

ऊर्ध्व मार्गानें जाणाऱ्या रक्तपित्तास कफाचा संबंध असतो आणि अधोमार्गी ज्याला वायूचा संबंध असतो.

द्वि मार्गग रक्तपित्त वात आणि पित्त या दोघांपासून प्रवृत्त होतें.

ऊर्ध्वगादिकांचा साध्यासाध्यविचार सांगतो.

**ऊर्ध्वं साध्यमधो याप्यमसाध्यं युगपद्गतम्॥८॥**

अर्थ— ऊर्ध्वग रक्तपित्त साध्य आहे, कारण तें कफसंसृष्ट असतें, ह्मणून त्यावर कषाय, तिक्तरस, कफपित्त हर योग्य होतात, अधोग रक्तपित्त याप्य, (साध्यासाध्य) आहे, कारण, पित्त हरणाविषयीं विरेचन हें प्रधान आहे, आणि त्यावर तर वातपित्त शमन करणारा, एकटाच मधुररस आहे, वमन दिलें तर विरुद्धमार्गी य आहे ह्मणून वेगमात्र बंद करील, परंतु पित्त हरण करणार नाहीं, उभय मार्गी रक्तपित्त असाध्य आहे, कारण त्यावर विरुद्धचिकित्सा करावी लागत्ये,

साध्य होण्याचें कारण.

**एकमार्गं बलवतो नातिवेगं नवोत्थितम्॥ रक्तपित्तं सुखे काले साध्यं स्यान्निरुपद्रवम्॥९॥**

अर्थ— बलवान पुरुषाचें एकमार्ग (ह्मणजे ऊर्ध्वग) ज्याला अति वेग नाहीं, व नवीन झालेलें, हेमंत शिशिर कालीं झालेलें, आणि दौर्बल्यादि उपद्रवरहित असें रक्तपित्त साध्य होतें,

दोषभेदानें साध्यासाध्यत्व.

**एकदोषानुगं साध्यं द्विदोषं याप्यमुच्यते॥ त्रिदोषजमसाध्यं स्यान्मंदाग्नेरतिवेगितम्॥१०॥ व्याधिभिः क्षीणदेहस्य वृद्धस्यानश्नतश्च यत्॥**

अर्थ— एक दोषानुग रक्तपित्त साध्य होतें, द्विदोषज याप्य होतें, आणि त्रिदोषज असाध्य होतें, मंदाग्नि, व्याधि क्षीणदेह, आणि-

वृद्ध व अन्न तुटलेला अशा पुरुषाचें, अतिवेगाचें, रक्तपित्त असाध्य होतें,

## रक्तपित्ताचे उपद्रव.

दौर्बल्यश्वासकासज्वरवमथुमदाः पांडुतादाह
मूर्छाभुक्ते घोरोविदाहस्त्वधृतिरपिसदाहृद्यतु-
ल्याचपीडा॥ तृष्णाकोष्ठस्यभेदःशिरसिचतप
नंपूतिनिष्ठीवनत्वंभक्तद्वेषाविपाकोविकृतिरपि
भवेद्रक्तपित्तोपसर्गाः॥ ११॥

अर्थ— अशक्तता, श्वास, खोकला, ताप, ओकारी, धोत्र्याचें फळ खाऊन जशी अवस्था होत्ये तशी अवस्था, शरीरास पांडुर वर्ण, दाह, मूर्छा, अन्न खाल्लें असतां अत्यंत विदाह, अधैर्य, सर्व काळ हृदयाचे ठाईं विलक्षण पीडा, तहान, कोठाचा भेद (ह्मणजे मळ पातळ होणें,) मस्तकाचा संताप, दुर्गंधयुक्त थुंका, अन्नद्वेष, आहाराचा परिपाक नहोणें, हे रक्तपित्ताचे उपद्रव होत, आणि तशीच त्याची विकृति ही होत्ये, ती पुढें "मांसप्रक्षालनाभं" इत्यादि श्लोकानें सांगायाची आहे,

## असाध्य लक्षणें.

मांसप्रक्षालनाभंकुथितमिवचयत्कर्दमांभोनि-
भंवामेदःपूयास्रकल्पंयकृदिवयदिवापक्कजंबु-
फलाभं॥ यत्कृष्णंयच्चनीलंभृशमतिकुणपंयत्र
चोक्ताविकारास्तद्वर्ज्यंरक्तपित्तंसुरपतिधनुषाय
च्चतुल्यंविभाति॥ १२॥

अर्थ— जें रक्तपित्त मांस धुतलेल्या पाण्या सारिखें, किंवा सडल्या

सारिखें, अथवा चिखलानें गढूळ झालेल्या पाण्या सारिखें, किंवा चिखला सारिखें, व पाण्या सारिखें, नसेंच जें मेद, पू, आणि रक्त यांसारखें, काजळाच्या तुकड्या सारिखें, अथवा पिकलेल्या जांभळा सारिखें, किंवा जें काळ्या रंगाचें किंवा जें नील ह्मणजे तास पक्ष्याच्या पंखा सारिखें, अथवा जें वर सांगितलेल्या श्वासादि विकारानीं युक्त तें रक्तपित्त वर्जावें, आणि जें रक्त पित्त इंद्र धनुष्या प्रमाणें नाना तऱ्हेच्या रंगाचें असतें तेंही वर्जावें, ह्मणजे त्यावर वैद्यानें उपाय करूं नये,

## दुसरें असाध्यलक्षण.

येनचोपहतोरक्तंरक्तपित्तेनमानवः॥ पश्येद्दृश्यंवियच्चापितच्चासाध्यमसंशयम्॥१३॥

अर्थ— ज्या रक्त पित्तानें मनुष्य ग्रासला असतां तो अदृश्य आकाश रक्त वर्ण पाहातो, अथवा दृश्य घट पटादि पदार्थ आणि आकाश हीं रक्त वर्ण पाहातो तो निःसंशय असाध्य जाणावा,

## दुसरें असाध्यलक्षण.

लोहितंछर्दयेद्यस्तु बहुशो लोहितेक्षणः॥ लोहितोद्गारदर्शीचम्रियतेरक्तपैत्तिकः॥१४॥

अर्थ— ज्याला वारंवार तांबड्या ओकाऱ्या येतात, व ज्याचे डोळे लाल रक्ता सारिखे होतात, आणि ज्याला उद्गार ह्मणजे ढेंकर किंवा गर्दई येते तीही लाल येते, तो रक्त पित्ताचा रोगी मरण पावतो,

मधुकोशंसुनिर्मथ्य सारमाकृष्ययत्नतः॥ टीकाकृतामहाराष्ट्री माधवार्थप्रकाशिका॥ ॥इतिरक्तपित्तनिदानम्,

## राजयक्ष्मनिदान.

### कारणें.

वेगरोधात्क्षयाच्चैवसाहसाद्विषमाशनात्।।त्रिदोषो
जायतेयक्ष्मागदोहेतुचतुष्टयात्।।१।।

अर्थ— वात मूत्र पुरीषादि वेगांचा रोध करणें, अतिमैथुन, उपवास, ईर्ष्या, विषाद, इत्यादि धातुक्षयाचीं कारणें, बळवंताशीं झोंबी करणें, विषमाशन, ह्मणजे अकाळीं थोडें किंवा फार खाणें, ह्या चार कारणानीं त्रिदोषांचा कोप होऊन एक यक्ष्मा रोग होतो, वेगरोधादिक हीं वातकोपाचीं कारणें आहेत खरीं, परंतु वात कोपानेंच अग्नि दुष्ट होऊन कफपित्तांचाही कोप होतो, ह्या चार हेतूमध्यें असंख्य हेतूंचा अंतर्भाव होतो, रसादि धातूंचे शोषण करितो म्हणून ह्या रोगाला (शोष) ह्मणतात, शरीरांतील पाननादिसर्व कियांचा क्षय करितो म्हणून (क्षय) ह्मणतात, वाग्भटानें तर हा सर्वरोगांचा राजा म्हणून याला राजयक्ष्मा हें नांव दिलें;

केवळ धातुक्षय झाल्यानेंच राजयक्ष्मा होतो असें नाहीं तर रसादिकांच्या स्रोतसांचा रोध झाला असतांही होतो हें दाखविण्यासाठीं विशिष्टसंप्राप्ति सांगतो.

कफप्रधानेर्दोषैस्तुरुद्धेषुरसवर्त्मसु।।अतिव्यवायि
नोवापिक्षीणे रेतस्यनंतराः।।क्षीयंते धातवः सर्वेत-
तः शुष्यतिमानवः २।।

अर्थ— कफ आहे मुख्य ज्यामध्यें अशा वातादि दोषानीं रसवर्त्म ह्मणजे रस वाहणाऱ्या धमनी रुद्ध झाल्या असतां, येथें हें सत्वावि-

लें कीं रस मार्ग बंद झाला ह्मणजे तेथेंच तो हृदयांत राहून नासतो आणि तोंडा वाटे निघतो// "येणेकरून अनुलोम+ क्षय दर्शविला, आतां प्रतिलोम* क्षय कसा होतो तो दाखवितो. —//अथवा अतिमैथुन करणाऱ्या पुरुषाचें शुक्र क्षीण झालें असतां त्याच्याजवळचे सर्व धातु-क्षीण होतात, नंतर तो पुरुष सुकतो, शुक्रक्षीण झालें ह्मणजे मज्जा क्षीण होत्ये, मज्जा क्षीण झाली ह्मणजे अस्थि क्षीण होतात, या प्रमाणें पूर्व पूर्व धातु क्षीण होत जातात,

आतां शुक्र हें कार्य भूत आहे याचा क्षय झाला असतां कारण भूत धातूंचा क्षय कसा होईल, ? अशी कोणी शंका करील तर सांगतों, शुक्रक्षया पासून वायु कुपित होतो, तो वायु जवळच्या मज्जे-ला शोषतो याप्रमाणें पूर्व पूर्व धातूंला शोषित शोषित रसापर्यंत जातो, जसा अग्नीनें तापवून लाल केलेला लोखंडाचा गोळा ओल्या जमिनीवर ठेविला तर जवळची जमीन सुकून जात्ये, तसा हा दृष्टांत याविषयीं समजावा,

## पूर्वरूप.

श्वासांगसादकफसंस्त्रवतालुशोषवम्यग्निसादम
दपीनसकासनिद्राः॥ शोषेभविष्यतिभवंतिसचापि
जंतुःशुक्लेक्षणोभवतिमांसपरोरिरंसुः॥ ३॥स्वप्ने
षुकाकशुकशल्लुकनीलकंठगृध्रास्तथैवकपयः कृ
कलासकाश्च॥तंवाहयंतिसनदीर्विजलाश्चपश्ये-
च्छुष्कांस्तरून्पवनधूमदवार्दितांश्च॥ ४॥ ॥

+ रसापासून शुक्रापर्यंत धातूंचा क्षय होणें तो.

* प्रतिलोम ह्म० शुक्रापासून रसापर्यंत शोष होत जाणें तो.

अर्थ—श्वास, हातपाय गळणें, कफाचा बेडका पडणें, टाळा कोरडा पडणें, शांति, अग्निमांद्य, उन्मत्तता, पडसें, शोकला, आणि झोंप, हीं लक्षणें धातुशोष व्हावयाचा असला ह्मणजे होतात, आणि त्या मनुष्याचे डोळे पांढरे होतात, आणि त्याला मांस खाण्याची व स्त्रीजवळ रति करण्याची इच्छा फार होत्ये, असें होण्याचें कारण केवळ व्याधिमहिमा होय, व्याधीच्या योगानें मन दुष्ट होऊन अशी इच्छा होत्ये.

तसेंच स्वप्नामध्यें त्या मनुष्याला कावळे, राघे, साळई, मोर, गिधाड, तसेच वानर, सरडे, हे ओढून किंवा पाठीवर वाहून नेतात व तोजलरहित नद्या व वठलेले, आणि वायु, धूर, आणि वणवा यांहीं पीडित असे वृक्ष पाहातो, चकारें करून तृण केशादिकांचें पतन ही होतें, असें जाणावें, हीं सर्व पूर्वरूप काळींच होतात,

### त्रिरूप क्षयाचें लक्ष.

अंसपार्श्वाभितापश्च संतापः करपादयोः॥ ज्वरः सर्वांगगश्चैव लक्षणं राजयक्ष्मणः॥ ५॥

अर्थ— खांदे, आणि बरगड्या यांस संताप, हाता पायांची जळजळ आणि सर्वांगांत ज्वर, हें राजयक्ष्म्याचें लक्षण, हीं तीन लक्षणें अवश्य व्हावयाचीं ह्मणोन चरकानें सांगितलें आहे,

### एकादशरूप, षड्रूप आणि त्रिरूप शोषाचें लक्षण सांगतों.

स्वरभेदोनिलाच्छूलंसंकोचश्चांसपार्श्वयोः॥ ज्वरो दाहोतिसारश्च पित्ताद्रक्तस्य चागमः॥ ६॥ शिरसः परिपूर्णत्वमभक्तच्छंद एव च॥ कासः कंठस्य चोध्वंसो विज्ञेयः कफकोपतः॥ ७॥ एकादशभिरेतैर्वा ष-

[illegible]

अर्थ— राजयक्ष्मा हा त्रिदोषोत्पन्न आहे, यामध्यें दोषांचीं अकरा रूपें वाटणी वाटणीनें व्याधि प्रभावानें होतात, सन्निपातज्वर लक्षणा प्रमाणें सर्व लक्षणें सर्व दोषा पासून होतात, असें नाहीं ह्मणून सांगतो, वायूच्या योगानें— स्वरभेद (घसाबसणें) खांदे आणि पार्श्व यांचे ठाईं शूल, खांदे आणि बरगड्या खेंचल्या सारिख्या होणें, हीं होतात, पित्ता पासून— ज्वर, दाह, अतिसार, आणि तोंडावाटे रक्त पडणें, हीं होतात; आणि कफ कोपानें मस्तक भरल्या सारिखें, अन्नद्वेष, खोकला, स्वरभेद, हीं होतात; या एकादश लक्षणानीं, किंवा खोकला, अतिसार, बरगड्यांत शूळ, स्वरभेद, अरुचि आणि ज्वर (या साहा लक्षणानीं. किंवा ज्वर, खोकला, आणि रक्तविकार (या तीन लक्षणानीं पीडित झालेला क्षयरोगी बल मांस क्षय झाला असतां यश इच्छिणाऱ्या वैद्यानें सोडावा.

## साध्यासाध्यविचार.

सर्वैरर्धैस्त्रिभिर्वापि लिंगैर्वापि बलक्षये॥ युक्तोव-
र्ज्यश्चिकित्स्यस्तु सर्वरूपोप्यतोन्यथा॥१०॥ ॥

अर्थ— स्वरभेदादिक जीं अकरा लक्षणें सांगीतलीं, त्या सर्व लक्षणानीं किंवा त्यांपैकीं अर्धीं (ह्मणजे साहा लक्षणानीं) किंवा तीन लक्षणानीं युक्त झालेला, क्षयरोगी बल, मांसाचा क्षय झाला असतां वर्जावा, आणि बल मांस क्षय नसला तर सर्व लक्षण युक्त असला तरी तो रोगी चिकित्सा करण्यास योग्य आहे.

## असाध्यलक्षणें.

महाशिनंक्षीयमाणमतिसारनिपीडितम्॥शूनमु
ष्कोदरंचैवयक्ष्मिणंपरिवर्जयेत्॥११॥

अर्थ— पुष्कळ आहार करीत असून दिवसें दिवस क्षीण होणारा (हें दु श्चिन्ह आहे ह्मणून असाध्य) अतिसारानें अत्यंत पीडित झालेला रोगी असाध्य, कारण क्षय रोग्याचें जीवित मलाधीन आहे ह्मणोन सांगित लें आहे, अंड कोश आणि उदर हीं ज्याचीं सुजलेलीं आहेत, असा रोगी असाध्य, कारण शोथ हा विरेचन साध्य असल्यामुळें विरुद्ध चिकित्सा क रावी लागते, अशा क्षय रोग्याला वैद्यानें औषध देऊं नये,

### कोणत्या रोग्याला औषध द्यावें तो सांगतो.

ज्वरानुबंधरहितंबलवंतंक्रियासहं॥उपक्रमेदात्म
वंतंदीप्ताग्निमकृशंनरम्॥१२॥

अर्थ— ज्याला ज्वराचा संबंध अगदीं नाहीं, बलवान, औषधाद्युपचा र सोसणारा, इंद्रियें स्वाधीन ठेवणारा, अग्नि प्रदीप्त असणारा, आणि कृश न झालेला, अशा रोग्यास चिकित्सा (उपचार) करावी,

### असाध्य लक्षणें.

शुक्लाक्षमन्नद्वेष्टारमूर्ध्वश्वासनिपीडितम्॥कृच्छ्रे-
णबहुमेहंतंयक्ष्माहंतीहमानवम्॥१३॥

अर्थ— पांढरे डोळे झालेला, अन्नाचा द्वेष करणारा, ऊर्ध्व श्वासानें पि डलेला; आणि कष्टानें पुष्कळ मुतणारा अशा मनुष्याचा यक्ष्मा रोग ना श करितो, शुक्लाक्षादिक हीं प्रत्येक वेगवेगळीं असाध्य लक्षणें आहेत,

### मैथुनादिकें करून झालेल्या केवळ धातूंच्या शोषणानेंच राजयक्ष्मा हो.

व्यवायशोकवार्धक्यव्यायामाध्वप्रशोषिणः॥ अथो-
रःक्षतसंज्ञौच शोषिणोलक्षणे:शृणु॥१४॥

अर्थ— आतां व्यवाय शोषी, शोकशोषी, वार्धक्य शोषी, व्यायाम शोषी, अध्वशोषी, व्रण शोषी, आणि उरःक्षत शोषी, त्यांची लक्षणें सांगतों ऐका,

### व्यवाय शोषीचें लक्षण.

व्यवायशोषीशुक्रस्यक्षयलिंगैरुपद्रुतः॥ पांडुदेहोय
थापूर्वंक्षीयंतेचास्यधातवः॥१४॥

अर्थ— व्यवाय शोषी (अतिमैथुनानें क्षीण झालेला) सुश्रुतांत सांगितलेल्या शुक्र क्षय लक्षणांनीं (शुक्रक्षय झाला असतां शिश्नाला आणि वृषणाला वेदना, मैथुनाविषयीं अशक्ति, बळेंच मैथुन केलें असतां चिरकालानें शुक्रस्राव होणें तो स्राव झाला तरी अत्यंत अल्प होतो, अथवा रक्ताचा स्राव होतो.) पीडित होऊन त्याचें शरीर पांढरें फटफटीत होतें, आणि शुक्रापासून मज्जा, मज्जेपासून अस्थि असे त्यांचे उलटे-धातु क्षीण होत जातात,

### शोक शोषीचें लक्षण.

प्रध्यानशीलःस्रस्तांगःशोकशोष्यपितादृशः॥

अर्थ— शोक शोषी ही चिंता करणारा, हात पाय गळालेला, आणि शुक्रक्षय व्यतिरिक्त शोष लक्षणांनीं युक्त असतो,

### जराशोषीलक्षण.

जराशोषीकृशोमंदवीर्यबुद्धिबलेंद्रियः॥१५॥ कं-

पनो: रुचिमान् भिन्नकांस्यपात्रहतस्वर:॥ ष्ठीवति-
श्लेष्मणाहीनं गौरवारुचि पीडित:॥ संप्रस्रुतास्यना
सास्य: शष्करूक्षमलच्छवि:॥१६॥

अर्थ— इद् त्यामुळें धातु क्षीण झालेला पुरुष कृश होतो, त्याचीं वीर्य, बुद्धि, बळ, आणि इंद्रियें हीं मंद होतात; कांपतो, अन्नाला रुचि नसत्ये, फुटलेल्या कांशांच्या भांड्यावर काठी वगैरे मारून जसा शब्द होतो तसा याचा स्वर उमटतो, कफावांचून थुंकतो, (म्हणजे कफ पडण्या विषयीं यत्न करील असा तो हीं तोनि घत नाहीं.) शरीरास भार आणि अरुचि त्यानीं पीडित होतो, (अत्यंत अरोचक रुचविण्यासाठीं पुन: अरुचि ग्रहण केलें.) तोंड, नाक, आणि डोळे त्यानां गळ लागती, मळ कोरडा होतो, आणि शरीराची कांतिनिस्तेज दिसत्ये.

## अध्वप्रशोषी लक्ष०

अध्वप्रशोषीस्रस्तांग: संभृष्टपरुषच्छवि:॥ प्रसुप्त
गात्रावयव: शष्कक्लोमगलानन:॥ १७॥

अर्थ— अध्वप्रशोषी (अतिमार्ग गमनानें क्षीण झालेला.) हात, पाय गळलेला त्याचा शरीराचा वर्ण भाजल्यासारिखा खरखरीत होतो, सर्व शरीराला मेहरी येत्ये, हृदयांत पिपासास्थान असतें तें गळा, आणि तोंड हीं कोरडीं पडतात.

## व्यायामशोषी लक्षण.

व्यायामशोषी भूयिष्ठमेभिरेवसमन्वित:॥ लिंगै
रुर: क्षयकृतै: संयुक्तश्च क्षतंविना॥ १८॥

अर्थ— व्यायामशोषी (अत्यंत श्रमानें धातुक्षीण झालेला) हा-

253252

ध्य मोठा होतात; आणि तो मनुष्य देखील [illegible]
क्त होतो,

तीन कारणानीं व्रणशोष होतो
ह्मणून सांगतात.

रक्तक्षयाद्वेदनाभिस्तथैवाहारयंत्रणात्॥ व्रणिनश्च
भवेच्छोषः सचासाध्यतमोमतः॥१९॥ ॥

अर्थ— रक्तक्षयानें, व्रणवेदनानीं, तसेंच आहार तुटल्यानें व्रणी पुरुषास जो शोष होतो तो अत्यंत असाध्य मानला आहे.

उरःक्षतानेंही धातुशोष होण्याचा संभव आहे ह्मणून शोषप्रकरणामध्येंच
निदानसहित उरःक्षतरोग सांगतो.

धनुषायस्यतोत्यर्थंभारमुद्वहतोगुरुं॥युध्यमानस्य
बलिभिःपततोविषमोच्चतः॥२०॥वृषंहयंवाधावं
तंदम्यंचान्यंनिगृण्हतः॥ शिलाकाष्ठाश्मनिर्घाता
न्क्षिपतोनिघ्नतः परान्॥२१॥अधीयानस्यवात्यु-
च्चैर्दूरंवाव्रजतोद्रुतम्॥महानदींवातरतोहयैर्वास
हधावतः॥२२॥सहसोत्पततोदूरात्तूर्णंवातिप्रनृत्य
तः॥ तथान्यैः कर्मभिः क्रूरैर्भृशमभ्याहतस्यच॥२३॥
विक्ष्यतेवक्षसिव्याधिर्बलवान्समुदीर्यते॥ स्त्रीषु-
चातिप्रसक्तस्यरूक्षाल्पप्रमिताशिनः॥२४॥उरोवि
रुज्यतेत्यर्थंभिद्यतेथविरुज्यते॥प्रपीड्यतेतथापार्श्वे

शःष्यत्यंगंप्रवेपते॥२५॥ क्रमाद्वीर्यंबलंवर्णोरुचिर ग्निश्चहीयते॥ज्वरोव्यथामनोदैन्यंविड्भेदोग्निवधा दपि॥२६॥दुष्टःश्यावःसुदुर्गंधिःपीतोवि ग्रथितो बहु ॥कासमानस्यचाभीक्ष्णंकफःसास्रःप्रवर्तते॥ २७॥सक्षतीक्षीयतेत्यर्थंतथाशुक्रोजसोःक्षयात्२८

अर्थ— धनुष्य ओढल्यानें आयास करणारा, अत्यंत जड ओझें वाहणारा, बलवान् पुरुषाशीं युद्ध करणारा, उंचावरून पडणारा, बैल, घोडे, हत्ती, उंट, इत्यादि कधांवत असतां त्यांस धरणारा, मोठी शिळा, लांकूड, धोंडे, निर्घात, (अस्त्रविशेष,) हीं फेंकणारा, शत्रूनां मारणारा, मोठ्यानें वेदादिकांचें पठण करणारा, अथवा दूर देशावर शीघ्र चालत जाणारा, अथवा दुथड्यानीं भरून वाहणाऱ्या गंगा, यमुनादि महानदींत पोहणारा, अथवा घोड्या बरोबर धांवत जाणारा, अकस्मात् दुरून उडी मारणारा, अथवा लोकर लोकर नाचणारा, या प्रमाणें दुसरींमल्ल युद्धादि क्रूर कर्मांनीं उरीं फुटलेला, अशा पुरुषाचें हृदय दुखावलें असतां बलवान् उरःक्षत रूप व्याधि उत्पन्न होतो, स्त्रियांचे ठाईं अत्यंत आसक्त झालेला, व रूक्ष अल्पपरिमाणअन्न वेळा वेळानें खाणारा, अशा पुरुषाचें ऊर फुटल्या सारिखें वाटतें, किंवा फोडून दोन भाग केल्या सारिखें वाटतें, व तें अत्यंत वेदना युक्त होतें, तदनंतर बरगड्या फारच दुखूं लागतात, अंगसुकतें, थरथरां कांपतें, आणि शक्ति मांस, वर्ण, रुचि, आणि अग्नि, हे क्रमाक्रमानें कमी होत होत जातात, ज्वर असतो, मनाला अनुखर वाटतें, दीनपणा आणि अग्निनाशामुळें विड्भेद म्हणजे मळ पातळ होतो, आणि वारंवार खोकतां खोकतां दुष्ट म्हणजे घाणेरडा, काळसर, अत्यंत दुर्गंधियुक्त, पिंवळा,

गांगळलेला, पुष्कळ, आणि रक्त मिश्रीत असा कफ पडतो, याप्रमाणें- तो क्षतरोगी अत्यंत क्षीण होतो, व तो केवळ क्षतानें क्षीण होतो असें- नाहीं; तर स्त्री सेवादिकें करून शुक्र, व ओज (सर्व धातूंचे तेज) यां चा क्षय झाला असतां ही क्षीण होतो.

## पूर्वरूप.

अव्यक्तंलक्षणंतस्य पूर्वरूपमितिस्मृतम्॥२८

अर्थ— त्या उरःक्षताच्या अस्पष्ट लक्षणालाच पूर्वरूप ह्मटलें आहे,

## क्षतक्षीणाचें असाध्यलक्षण.

उरोरुक्शोणित छर्दिः कासो वैशेषिकः कफे॥क्षी णेसरक्तमूत्रत्वंपार्श्वपृष्ठकटिग्रहः॥२९॥ ॥

अर्थ— क्षतामध्यें उरासपीडा, रक्ताची वांति, आणि विशिष्ट कास, (ह्मणजे वर सांगितलेल्या दुष्ट श्वासादि लक्षणयुक्त) हीं होतात, आ णि क्षीणाचे ठाईं रक्तमूत्रत्व, बरगड्या, पाठ, आणि कंबर, हीं जखड ल्या सारखी हीं लक्षणें होतात,

## त्याचें साध्यलक्षण.

अल्पलिंगस्यदीप्ताग्नेः साध्योबलवतोनवः॥परि संवत्सरोयाप्यः सर्वलिंगंविवर्जयेत्॥३०॥

अर्थ— ज्याला लक्षणें थोडीं झालेलीं व ज्याचा अग्नि प्रदीप्त आहे, अ सा पुरूष बलवान् असून रोग नवीन झाला आहे तर तो साध्य होतो, आणि रोग होऊन एक वर्ष लोटलें तर साध्यासाध्य होतो, ज्यामध्यें स र्वलक्षणें झालीं आहेत तो असाध्य, त्याला वैद्यानें सोडावा.

मधुकोशंसमनिर्मथ्य सारमाकृष्ययत्नतः॥ व्याख्या कृतामहा शास्त्रीमाधवार्थप्रकाशिका॥ ॥इतिराजयक्ष्मनिदानम्॥

## कासनिदान.

### कारण, संप्राप्ति, आणि निरुक्ति.

धूमोपघाताद्रजसस्तथैव व्यायामरूक्षान्ननिषेवणाच्च॥ विमार्गगत्वादपि भोजनस्य वेगावरोधात् क्षवथोस्तथैव॥१॥ प्राणोऽध्रुदानानुगतः प्रदुष्टः संभिन्नकांस्यस्वनतुल्यघोषः॥ निरेति वक्त्रात्सहसा सदोषो मनीषिभिः कासइति प्रदिष्टः॥२॥

अर्थ— नाकांतोंडांत धूर जाऊन दम कोंडल्यानें, तसेंच नाकातोंडांत धूळ शिरल्यानें, व्यायाम, रूक्षान्न, यांचें नित्य सेवन केल्यानें, घाईघाईनें जेवतांना उशीक गेल्यानें, मळमूत्रादिकांचा रोध केल्यानें, तसेंच शिंक येत असतां तिचा रोध केल्यानें, प्राण वायु अत्यंत दुष्ट होऊन दुष्ट उदान वायूशीं मिळून कफपित्तयुक्त अकस्मात तोंडांतून बाहेर निघतो त्याचा शब्द फुटक्या कांस्य पात्राचा शब्दा सारिखा होतो. त्या रोगाला विद्वान लोक कास (ह्मणजे खोकला) असें ह्मणतात.

पंच कासाः स्मृता वातपित्तश्लेष्मक्षतक्षयैः॥ क्षया योपेक्षिताः सर्वे बलिनश्चोत्तरोत्तरम्॥३॥

अर्थ— वात, पित्त, कफ, क्षत, आणि क्षय क्षणीं पांच प्रकारचे खोकले होतात, त्यांवर कांहीं औषधोपचार केला नाहीं तर सर्व क्षयावर घालवितात, हे उत्तरोत्तर बलवंत आहेत, ह्मणजे वात कासा पेक्षां पित्त कास बलवान्, पित्त कासा पेक्षां श्लेष्म कास बलवान, या प्रमाणें पुढें जाणावें.

### पूर्वरूप.

पूर्वरूपं भवेत्तेषां शूकपूर्णगलास्यता॥ कंठे कंडू-

### वातकासरूप.

हृच्छंखमूर्धोदरपार्श्वशूलीक्षामाननःक्षीणब
लस्वरौजाः॥प्रसक्तवेगस्तुसमीरणेनभिन्नस्वरः
कासतिशुष्कमेव॥५॥

अर्थ— हृदय, शंख, मस्तक, उदर, आणि पार्श्व भाग ह्यांच्या ठिकाणीं शूळ, तोंडाला कोरड, बल, स्वर, आणि धातुतेज, ह्यांचा क्षय, वारंवार खोकला उसकणें, स्वरभेद, आणि कोरडा खोकला, हीं वात कासाचीं लक्षणें जाणावीं.

### पित्तकासलक्षण.

उरोविदाहज्वरवक्त्रशोषैरभ्यर्दितस्तिक्तमुखस्तृषार्तः॥
पित्तेनपीतानिवमेत्कटूनिकासेनपांडुःपरिदह्य-
मानः॥६॥

अर्थ— पित्त कासानें उरांत जळजळ, ज्वर, तोंडास कोरड, ह्यानीं पीडित असून तोंड कडू होतें, व तहान फार लागते, पिंवळी आणि तिखट अशी वांति होते, रोगी पांडुरवर्ण होतो, व त्याला चहूंकडून पेटल्या सारखें वाटतें.

### कफकासलक्षण.

प्रलिप्यमानेनमुखेनसीदन्शिरोरुजार्तःकफपू
र्णदेहः॥अभक्तरुग्गौरवकंडुयुक्तः कासेद्भृशं
सांद्रकफःकफेन॥७॥

अर्थ— कफ कासानें तोंड आंतून कफानें सारवल्यासारिखें होतें, ग्लानि होत्ये, मस्तकास अत्यंत वेदना, सर्वदेह कफानें पूर्ण असतो, अन्नावर अरुचि, शरीरासजडपणा, आणि कंडू होत्ये, आणि-रोगी वारंवार खोकतो, आणि कफ पडतो, तो दाट असतो.

क्षतकासलक्षण.

अतिव्यवायभाराध्वयुद्धाश्वगजनिग्रहैः॥ रूक्षस्योरः क्षतंवायुर्गृहीत्वाकासमावहेत्॥ ८॥ सपूर्वं कासतेशुष्कं ततःष्ठीवेत्सशोणितम्॥ कंठेनरुजतात्यर्थंविरुग्णेनेववोरसा॥ ९॥ सूचीभिरिवतीक्ष्णाभिस्तुद्यमानेनशूलिना॥ दुःखस्पर्शेनशूलेनभेदपीडाभितापिना॥ १०॥ पर्वभेदज्वरश्वासतृष्णावैस्वर्यपीडितः॥ पारावतइवाकूजन्कासवेगात्क्षतोद्भवात्

अर्थ— अतिमैथुन, अतिभार वाहाणें, अतिमार्गगमन, मल्लयुद्ध, घोडा, हत्ती, हे पळत असतां धरणें, ह्याकारणानीं रूक्ष पुरुषाचें उरफुटून वायूचा कोप होऊन खोकला उत्पन्न होतो, त्या रोग्याला पहिल्यानें सुरती ढांस लागून नदनंतर रक्त पडूं लागतें, घसा फार दुखतो. ऊर फुटल्यासारिखा होतो, आणि तोर तीक्ष्ण सुयानीं टोंचल्यासारिख्या वेदनेनें पीडित होतो, आणि त्याला स्पर्श सहन होत नाहीं, व तो कुऱ्हाडीनें तोडल्यासारिखी वेदना व दाह यांणीं युक्त अशा शूळानें पीडित होतो, आणि तो रोगी संधी फुटणें, ज्वर, श्वास, तृषा, स्वरभेद ह्यानीं पीडित होतो, क्षतजन्य खोकल्याच्या वेगानें रोगी पारव्यासारखा घुंघुं शब्द करतो,

क्षयकास लक्षण.

[illegible]
रदाहमोहान् प्राणक्षयंचापिलभेत कासी॥ १३॥ श्र-
ष्यन्विनिष्ठीवतिदुर्बलस्तु प्रक्षीणमांसोरुधिरंसपूय
म्॥ तंसर्वलिंगंभृशदुश्चिकित्स्यंचिकित्सितज्ञाः क्ष-
यजंवदंति॥ १४॥

अर्थ— विषम, असात्म्य असें भोजन, अतिमैथुन, मलमूत्रादि वेग धारण, ह्यांपासून अत्यंत दयाशील, आणि शोक करणाऱ्या पुरुषांचा अग्नि विझाला, (ह्मणजे आहार तुटल्यानें वायु कुपित होऊन त्यानें अग्नि नष्ट केला) असतां, तिन्ही दोषांचा कोप होऊन ते क्षयजन्य व देह नाश करणारा खोकला उत्पन्न करितात, मग त्या खोकणारास गात्र शूळ, ज्वर, दाह, आणि मोह, हे होतात, आणि प्राण क्षय हा होतो, तो वाळत जातो, दुर्बळ होतो, त्याच्या शरीरांत मांसाचा लेश राहात नाहीं, खोकतां खोकतां जो बेडका पडतो, त्यांत रक्त आणि पू असतो, सर्व लक्षण युक्त आणि चिकित्सा करण्यास फार अवघड, अशा ह्या खोकल्यास वैद्य लोक क्षयज असें ह्मणतात.

### साध्यासाध्यविचार.

इत्येषः क्षयजः कासः क्षीणानांदेहनाशनः॥ साध्यो
बलवतांवास्याद्याप्यस्त्वेवंक्षतोत्थितः॥ १५॥ नवौ
कदाचित्सिध्येतामपिपादगुणान्वितौ॥ स्थविराणां
जराकासः सर्वोयाप्यः प्रकीर्तितः॥ १६॥ त्रीन्पूर्वान्
साधयेत्साध्यान्पथ्यैर्याप्यांस्तुयापयेत्॥ १७॥ ॥

अर्थ— या प्रमाणें हा क्षयज कास क्षीण पुरुषांस घातुक होतो, बलवान् पुरुषांचा असाध्य अथवा याप्य होतो, क्षतज कासाचाहि असाच प्रकार आहे, वैद्यादि पादचतुष्टय संपन्न असतां हे दोन्ही प्रकारचे कास नवे असले तर कदाचित् साध्य होतात, वृद्ध पुरुषांचे जराकास ह्मणजे धातुक्षयानें झालेला सर्व प्रकारचा खोकला, याप्य होतो- ह्मणून सांगितलें आहे, पहिले तीन कास साध्य आहेत, ते औषधानें बरे करावे, आणि याप्य आहेत ते पथ्य सेवनावर लोटावे.

मधुकोशस्कनिर्मथ्यसारमाकृष्य यत्नतः॥ व्याख्या कृता महाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥ ॥इतिकासनिदानम्

## हिक्का आणि श्वास निदान.

विदाहिगुरुविष्टंभिरूक्षाभिष्यंदिभोजनैः॥शीतपानाशनस्नानरजोधूमातपानिलैः॥१॥व्यायामकर्मभाराध्ववेगघातापतर्पणैः॥हिक्काश्वासश्च कासश्च नृणांसमुपजायते॥२॥

अर्थ— दाहजनक, जड, पोट फुगविणारीं, रूक्ष, पडसें आणणारीं, अशीं भोजनें केल्यानें, थंड पाणी पिणें, थंड अन्न भक्षण, आणि शीतोदकानें स्नान केल्यानें नाकातोंडांत धूळ शिरल्यानें, तसाच धूर, ऊन, वारा, आयास, ओझें उचलणें, अतिमार्गगमन, मलमूत्रादिकांचे वेग धारण, आणि उपवास, या कारणानीं मनुष्यांस हिक्का (उचकी) श्वास (दमा) आणि कास (खोकला) हे उत्पन्न होतात.

## हिक्कांचें स्वरूप व निरुक्ति.

मुहुर्मुहुर्वायुरुदेतिसस्वनोयकृत्प्लिहांत्राणिमुखा

दिव्याक्षिपन्॥सघोषवानाशुहिनस्त्यसून्यतस्तेनसाहि
क्केत्यभिधीयतेबुधैः॥२॥

अर्थ— वायु येथें उदाना सहित प्राण वायु समजावा, तो हिगू हिगू असा शब्द करित होत्सातां काळीज प्लीहा आणि आंतडीं हीं तोंडापर्यंत ओढतोच काय असा वर येतो, तो वायु प्राणाचा लवकर नाश करितो, ह्मणून त्या रोगाला पंडित लोक हिक्का असें ह्मणात,

## त्यांचा भेद आणि संप्राप्ति.

अन्नजांयमलांक्षुद्रांगंभीरांमहतींतथा॥ वायुःकफे
नानुगतःपंचहिक्काः करोतिहि॥३॥

अर्थ— वायु कफानें युक्त झाला ह्मणजे, अन्नजा यमला, क्षुद्रा, गंभीरा, आणि महती, अशा पांच प्रकारच्या उचक्या उत्पन्न करितो.

## पूर्वरूप.

कंठोरसोर्गुरुत्वंचवदनस्यकषायता॥हिक्कानांपूर्व
रूपाणिकुक्षेराटोपएवच॥४॥

अर्थ— गळा आणि ऊर त्यांस जडत्व येतें, तोंडाला तुरट पणा येतो, आणि कुशीला फुगवटी येत्ये, हीं हिक्कांचीं पूर्वरूपें जाणावीं.

## अन्नजालक्ष.

पानान्नैरतिसंभुक्तैःसहसापीडितोनिलः॥हिक्कय-
त्यूर्ध्वगोभूत्वातांविद्यादन्नजांभिषक्॥५॥

अर्थ— पाणी आणि अन्न हीं अत्यंत सेवन केलीं असतां वायु अकस्मात पीडित होऊन ऊर्ध्वगति होऊन जी उचकी करितो तिला अन्नजा ह्मणून जाणावी,

## यमलाल.

चिरेणयमलैर्वेगैर्याहिक्कासंप्रवर्तते॥ कंपयंतीशि
रोग्रीवांयमलांतांविनिर्दिशेत्॥ ६॥

अर्थ— जी हिक्का फार वेळानें एक दम दोन दां येत्ये आणि डोकें व मान यांस कांपवित्ये, तिला यमला असें ह्मणावें

क्षुद्रालक्षण.

प्रकृष्टकालैर्यावेगैर्मंदैःसमभिवर्तते॥क्षुद्रिका-
नामसाहिक्काजत्रुमूलात्प्रधावति॥ ७॥

अर्थ— जी हिक्का फार उशीरानें आणि मंद वेगानें येत्ये, वजत्रु मूला पासून उत्पन्न होत्ये तिला क्षुद्रिका ह्मणावें.

गंभीरालक्ष.

नाभिप्रवृत्तायाहिक्काघोरागंभीरनादिनी॥अनेको
पद्रववतीगंभीरानामसास्मृता॥ ८॥

अर्थ— जी हिक्का नाभि पासून प्रवृत्त होऊन गंभीर शब्द करणारी, तृष्णा, ज्वरादि अनेक उपद्रव युक्त व भयंकर होत्ये तिला गंभीरा-ह्मणतात,

महतीलक्ष.

मर्माण्युत्पीडयंतीवसततंयाप्रवर्तते॥महाहिक्के
तिसाज्ञेयासर्वगात्रप्रकंपिनी॥ ९॥

अर्थ— जी हिक्का मर्में ह्मणजे मुख्यत्वें करून नाभि बस्त्यादि मर्में यांस पीडा करणारी, सर्वकाळ प्रवृत्त होत्ये, आणि सर्व गात्रें कंपित होतात तिला महाहिक्का ह्मणावी.

असाध्यलक्षण.

आयम्यतेहिक्कतोयस्यदेहोदृष्टिश्चोर्ध्वंनाम्यतेय

स्यनित्यं॥ क्षीणान्नद्विट्सौतियश्चातिमात्रंतौद्वौ चास्यौवर्जयेद्धिक्कमानौ॥१०॥

अर्थ— उचकीनें ज्याचा देह ताणल्या सारिखा होतो, दृष्टि ऊर्ध्व होत्ये, आणि मोह पावतो तो, आणि क्षीण जो होतो तो, अन्न द्वेषी होतो, आणि वारंवार उचकी देतो; हे दोघे उचकीचे रोगी आणि ज्यांस गंभीरा व महती हिक्का झाली आहे ते दोघे वैद्यानें सोडावे.

## असाध्यलक्षण.

अतिसंचितदोषस्य भक्तच्छेदकृशस्यच॥ व्याधिभिः क्षीणदेहस्य वृद्धस्यातिव्यवायिनः॥ आसांया सासमुत्पन्ना हिक्का हन्त्याशुजीवितम्॥११॥ ॥

अर्थ— ज्याचे दोष अत्यंत सांचले आहेत, व अन्न तुटल्यानें जो कृश झाला आहे, व अनेक व्याधींनीं ज्याचा देह क्षीण झाला आहे, व वृद्ध मनुष्य, व अति मैथुन करणारा अशा पुरुषांस या पैकीं जी उचकी उत्पन्न होईल ती तत्काळ त्याचें जीवित हरण करील.

## यमिकेचें असाध्य लक्षण.

यमिकाचप्रलापार्तिमोहतृष्णासमन्विता॥१२॥

अर्थ— बडबड, शूल, मोह, तृष्णा या लक्षणांनीं युक्त झालेली जी यमिका नावाची उचकी तीहि तत्काळ प्राण हरण करित्ये,

## यमिकेचें साध्यलक्षण.

अक्षीणश्चाप्यदीनश्चस्थिरधात्विंद्रियश्चयः॥ तस्यसाधयितुंशक्यायमिकाहंत्यतोन्यथा॥१२॥

अर्थ— बलवान्, प्रसन्न मनाचा, ज्याचे धातु आणि इंद्रियें स्थीर आहेत, अशा पुरुषाची यमला उचकी साध्य होण्यास समर्थ होत्ये,

आणि या विपरीत(म्हणजे क्षीण, दीन, इत्यादि.) पुरुषाचा तत्काळ ती नाश करिते.

## श्वासनिदान.

महोर्ध्वछिन्नतमकक्षुद्रभेदैस्तु पंचधा ॥ भिद्यते स महाव्याधिः श्वास एको विशेषतः ॥ १ ॥

अर्थ— महान्, ऊर्ध्व, छिन्न, तमक, आणि क्षुद्र या भेदानें एक श्वास रोग पांच प्रकारचा होतो.

## पूर्वरूप.

प्राग्रूपं तस्य हृत्पीडा शूलमाध्मानमेव च ॥ आनाहो वक्त्रवैरस्यं शंखनिस्तोद एव च ॥ २ ॥

अर्थ— हृदय पीडा, शूळ, पोट फुगणें, पोट ताणल्यासारिखें, तोंड बेचव, आणि शंखाचे ठाईं टोंचल्यासारिखी पीडा हें श्वास रोगाचें पूर्व रूप होय.

## संप्राप्ति.

यदा स्रोतांसि संरुध्य मारुतः कफपूर्वकः ॥ विष्वक् व्रजति संरुद्धस्तदा श्वासान् करोति सः ॥ ३ ॥

अर्थ—ज्या वेळेस वायु कफयुक्त होऊन प्राणान्नोदक वह स्रोतसांचा (मार्ग) रोध करून चहूंकडे जातो, तेव्हां तो श्वास उत्पन्न करितो

## महाश्वास लक्षण.

उद्धूयमानवातो यः शब्दवद्दुःखितो नरः ॥ उच्चैः श्वसिति संरुद्धो मत्तर्षभ इवानिशं ॥ ४ ॥ प्रनष्टज्ञानविज्ञानस्तथा विभ्रांतलोचनः ॥ विस्तब्धाक्ष्याननो लोब-

ड्मूत्रवर्चाविशीर्णवाक्॥५॥ दीनः प्रश्वसितंचास्य दूराद्विज्ञायतेभृशम्॥ महाश्वासोपसृष्टस्तु क्षिप्रमेव विपद्यते॥ ६॥

अर्थ— ज्याचा वायु वर ओढला आहे, असा मनुष्य दुःखित होऊन मोठ्यानें शब्दयुक्त श्वास टाकतो, एकाद्या रोगावलेल्या व माज लेल्या बैला प्रमाणें रात्रंदिवस श्वासानें पीडित होतो, त्याचें ज्ञान, वगैरे नष्ट होतें, डोळे चंचळ होतात, डोळे आणि तोंड हीं वासतात, हग मूत बंद होतें, बोलवत नाहीं किंवा बोललातर हळू बोलतो, मन खिन्न होतें, त्या रोग्याचा श्वास दुरून समजतो, हा महाश्वास ज्या पुरुषास होतो तो लवकरच नाश पावतो,

## ऊर्ध्वश्वासलक्षण.

ऊर्ध्वंश्वसितियोदीर्घंनचप्रत्याहरत्यधः॥ श्लेष्मावृतमुखस्रोताः क्रुद्धगंधवहार्दितः॥ ७॥ ऊर्ध्वदृष्टिर्विपश्यंश्च विभ्रांताक्ष इतस्ततः॥ प्रमुह्यन्वेदनार्तश्च शुष्कास्योरतिपीडितः॥ ८॥

अर्थ—पुष्कळ वेळ पर्यंत श्वास वर घेतो तो खाली लवकर सोडीत नाहीं, तोंड आणि दुसरे मार्ग कफानें दाटतात, कुपित्त वायूनें पीडित होतो, वर डोळे करून चंचल दृष्टीनें इकडे तिकडे पाहातो, मूर्छेनें व वेदनेनें अत्यंत पीडित होतो, तोंडाला कोरड पडत्ये, व असमाधान होतें- हें ऊर्ध्व श्वासाचें लक्षण होय,

## श्वास खालीं येत नाहीं म्हणून जें सांगितलें त्याविषयीं कारण सांगतो.

ऊर्ध्वश्वासेप्रकुपितेह्यधःश्वासो निरुध्यते॥ मुत्य

तस्तात्म्यतश्चोर्ध्वश्वासस्तस्येवहंत्यसून्॥९॥ ॥

अर्थ— ऊर्ध्व श्वास कोपला असतां, खालचा श्वास बंद होतो, ह्मणजे तो त्यांतच कोंडून राहातो, अथवा श्वास ह्मणजे वायू तो खालीं उतरत नाहीं, मोह पावणाऱ्या व ग्लान होणाऱ्या त्या पुरूषाचा तो ऊर्ध्व श्वास प्राण घेतो,

## छिन्नश्वास.

यस्तुश्वसितिविच्छिन्नंसर्वप्राणेनपीडितः॥नवाश्व सितिदुःखार्तोमर्मच्छेदरुगर्दितः॥१०॥आनाहस्वेद मूर्च्छार्तोदह्यमानेनबस्तिना॥विप्लुताक्षःपरिक्षीणः- श्वसन्रक्तैकलोचनः॥११॥विचेताःपरिशुष्कास्यो- विवर्णःप्रलपन्नरः॥छिन्नश्वासेनविच्छिन्नःसशी घ्रंविजहात्यसून्॥१२॥

अर्थ— जो पुरूष राहून राहून जेवढी शक्ति आहे तेवढ्या शक्तीनें श्वास टाकतो, अथवा क्लेश पाडून श्वास टाकित नाहीं, हृदय कुऱ्हाडीनें तोडल्या प्रमाणें वेदनेने घाबरा होतो, फोट फुगणें घाम, आणि मूर्च्छा, त्यानीं बेजार होतो, बस्ति जळल्या सारिखा होतो, डोळे गरगरा फिरवितो, किंवा ते अस्र्याने भरतात, श्वास टाकतां टाकतां अत्यंत क्षीण होतो, एकच डोळा तांबडा होतो (हें व्याधि प्रभावानें होतें, दोषानें होतें तर दोन्ही लाल व्हावे) उद्विग्न चित्त होतो, तोंडास कोरड बळत्ये, वर्ण बदलतो, बडबड करतो, संधिबंधनें सर्व शिथिल होतात, त्या छिन्न श्वासानें तो मनुष्य लवकर प्राण सोडितो,

## तमक श्वास लक्षण.

प्रतिलोमंयदावायुः स्त्रोतांसिप्रतिपद्यते॥ग्रीवांशि रश्चसंगृह्यश्लेष्माणंसमुदीर्यच॥१३॥करोतिपीनसं

[illegible] ॥१५॥ श्लेष्मणामुच्यमानेन भृशं भवति दुःखितः॥ तस्यैव च विमोक्षांते मुहूर्तं लभते सुखं॥१६॥ तथास्योध्वंसते कंठः कृच्छ्राच्छक्नोति भाषितुम्॥ नचापि निद्रां लभते शयानः श्वासपीडितः॥१७॥ पार्श्वे तस्यावगृह्णाति शयानस्य समीरणः॥ आसीनो लभते सौख्यमुष्णं चैवाभिनंदति॥१८॥ उच्छ्रिताक्षो ललाटेन स्विद्यता भृशमर्तिमान्॥ विशुष्कास्यो मुहुः श्वासो मुहुश्चैवाच धम्यते॥१९॥ मेघांबुशीत प्राग्वातैः श्लेष्मलैश्च विवर्धते॥ स याप्यस्तमकश्वासः साध्यो वास्यान्नवोत्थितः॥२०॥

अर्थ— ज्या काळीं वायु मान डोकें जखडून कफाला उसळीत वरउलटा स्रोतसां प्रतयेतो, तेव्हां त्या कफानें रुद्ध होऊन पडसें व गळ्यामध्यें घुर्घुर शब्द करितो, आणि अत्यंत तीव्र वेगानें हृदयास पीडा करणारा असा श्वास उत्पन्न करितो, मग त्या वेगानें तो पुरुष मूर्छित होतो- त्रासतो, आणि निश्चेष्ट होतो, आणि खोकूं लागला ह्मणजे वारंवार मोह पावतो, व कफ सुटत असतां फार पीडा पावतो, आणि तोच कफ सुटला ह्मणजे दोन घटका सुख पावतो, तसाच त्याचा गळा खाजसो, व मोठ्या कष्टानें बोलतो, श्वासाच्या पीडेनें निजूं लागला असतां झोंपयेत नाहीं, निजला असतां वायूनें त्याच्या बरगड्या धरतात, बसला असतां सौख्य पावतो, आणि उष्ण पदार्थापासून खुशाली होत्ये, डो-

के सजीर होतात, कपाळाला घाम येतो, अत्यंत वेदनायुक्त होतो, तों डाला कोरड पडत्ये, वारंवार श्वास आणि वारंवार हत्तीवर बसल्या प्रमाणें सर्वशरीर डोलवितो, हाश्वास मेघ, पर्जन्य, थंडी, पूर्वेकडचा वारा, आणि कफकर पदार्थ, यानीं वाढतो, हातमक श्वास याप्य आहे किंवा नवाउत्पन्न झाला असला तर साध्य होतो,

तमकाला पित्ताचा अनुबंध होऊन
ज्वरादिकांचा योग झाला ह्मणजे तो
प्रतमक होतो ह्मणून सांगतो.

ज्वरमूर्छापरीतस्य विद्यात्प्रतमकं तु तम्॥ ॥

अर्थ— त्या तमक श्वासामध्यें ज्वर आणि मूर्छा हीं दोन लक्षणें झालीं ह्मणजे त्याला प्रतमक श्वास ह्मणावें,

प्रतमकाचें दुसरें लक्षण
आणि कारण सांगतो.

उदावर्तरजोजीर्णक्लिन्नकायनिरोधजः॥ २१॥ तमसा वर्धतेऽत्यर्थं शीतैश्चाशु प्रशाम्यति॥ मज्जतस्तमसीवास्य विद्यात्प्रतमकं तु तं॥ २२॥

अर्थ—उदावर्त, धूळ, आमादि अजीर्ण, विदग्धान्न, मलमूत्रादि वेगाचा रोध, (अथवा क्लिन्नकाय म० स्नानाने मनुष्य आणि निरोध ह्मणजे (वेगरोध) ह्या कारणानीं झालेला श्वास, अंधारानें किंवा तमोगुणानें अत्यंत वाढतो, आणि शीतोपचारानें झटकन शांत होतो, ह्या श्वासाच्या योगानें रोग्यास अंधारांत बुडाल्या सारखें वाटतें, त्याला प्रतमक ह्मणावें.

क्षुद्रश्वासलक्षण.

रूक्षायासोद्भवः कोष्ठे क्षुद्रो वातमुदीरयेत्॥ क्षुद्रश्वासो न सोऽत्यर्थं दुःखेनांगप्रबाधकः॥२३॥ हिनस्ति न स गात्राणि न च दुःखो यथेतरे॥ न च भोजनपानानां निरुणद्ध्युचितां गतिं॥२४॥ नेंद्रियाणां व्यथां वापि कांचिदापादयेद्रुजम्॥ स साध्य उक्तः,

अर्थ— रूक्ष पदार्थ आणि आयास यां पासून उत्पन्न झालेला असा क्षुद्र श्वास वायूला ऊर्ध्व नेतो, हा क्षुद्र श्वास अत्यंत दुःखदायक नाहीं, व आंगाला कांहीं इजा करीत नाहीं, जसे ऊर्ध्व श्वासादिक दुःख दायक आहेत, तसा हा नाहीं, आणि भोजन पानादिकांची योग्य गति बंद करित नाहीं, व इंद्रियांस कांहीं व्यथा करीत नाहीं, व कांहीं एकादी पीडा ही उत्पन्न करीत नाहीं, हा क्षुद्र श्वास साध्य म्हणून सांगितला आहे,

## साध्यासाध्यविचार.

बलिनः सर्वे चाव्यक्तलक्षणाः॥२५॥ क्षुद्रः साध्यतमस्तेषां तमकः कृच्छ्र उच्यते॥ त्रयः श्वासा न सिध्यंति तमको दुर्बलस्य च॥२६॥

अर्थ— बलवान पुरुषाचे सर्व महाश्वासादिक अव्यक्त लक्षण झालें असतां साध्य होतात, त्यामध्यें क्षुद्र श्वास तर अत्यंत साध्य आहे, तमकाला च कृच्छ्र म्हणतात, महान्, ऊर्ध्व, आणि छिन्न हे तीन श्वास संपूर्ण लक्षण झाले तर साध्य होत नाहीत, आणि दुर्बल रोग्याचा तमक ही साध्य होत नाहीं,

उपेक्षा किंवा वाईट प्रकारचा उपचार झाला असतां हिक्का आणि,

…प्राणहरारोगाबहवोनतुतेतथा॥यथाश्वास
श्चहिक्काचहरतःप्राणमाशुवै॥२७॥

अर्थ— प्राण हरण करणारे असे सन्निपातज्वरादिक रोग पुष्कळ आहेतखरे; परंतु श्वास आणि हिक्का हे जसे लवकर प्राण हरण करतात तसे ते करीत नाहींत, इति हिक्का व श्वास निदानम्॥ ॥

मधुकोशंसनिर्मथ्यसारमाकृष्ययत्नतः॥व्याख्याकृतामहाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥ इति हिक्काश्वास निदानम्

---

## स्वरभेदनिदान.

अत्युच्चभाषणविषाध्ययनाभिघातसंदूषणैःप्रकुपिताःपवनादयस्तु॥स्रोतःसुतेस्वरवहेषुगताःप्रतिष्ठांहन्युःस्वरंभवतिचापिहिषड्विधःसः॥१ ॥

अर्थ— फार मोठ्यानें बोलणें, विष भक्षण, उच्च स्वरानें वेदादि पाठ करणें, कंठादिकांवर काष्ठाचा प्रहार त्या दुष्टीच्या कारणानीं अत्यंत कोप पावलेले जे वातादिक दोष, ते स्वर वाहणारीं जीं चार स्रोतसें आहेत त्यांत जाऊन किंवा तेथें वृद्धि पावून स्वराचा नाश करितात, हा स्वरभेद रोग वात, पित्त, कफ, सन्निपात, क्षय, आणि मेद त्यां पासून साहा प्रकारचा होतो,

## वातस्वरभेदलक्षण.

वातेनकृष्णनयनाननमूत्रवर्चाभिन्नंस्वरंवदतिगर्दभवत्खरंच॥

अर्थ— वायूनें स्वरभेद झाला असतां, रोग्याचीं डोळे, तोंड, मूत्र, आणि विष्ठा हीं काळ्या रंगाचीं होतात, तो पुरुष फुटल्या सारिखा व गाढवाच्या स्वरा प्रमाणें कर्कश स्वर बोलतो,

## पित्तजस्वरभेद.

पित्तेनपीतनयनाननमूत्रवर्चाब्रूयाद्गलेनसचदा-
हसमन्वितेन॥२॥

अर्थ— पित्ताच्या स्वरभेदानें रोग्याचीं नेत्रें, तोंड, मूत्र, आणि विष्ठा हीं पिंवळीं होतात, आणि बोलत्ये वेळेस त्याच्या गळ्यांत दाह होतो,

## कफजस्वरभेद.

ब्रूयात्कफेनसततंकफरुद्धकंठःस्वल्पंशनैर्वदतिचा-
पिदिवाविशेषात्॥

अर्थ— कफज स्वरभेदानें कफानें निरंतर कंठ रोधला असतां हळू हळू व थोडें बोलतो, दिवसास फार बोलतो,

## सन्निपातजस्वरभेद.

सर्वात्मकेभवतिसर्वविकारसंपत्तंचाप्यसाध्यमृ
षयःस्वरभेदमाहुः॥३॥

अर्थ— सन्निपातस्वरभेदामध्यें वर सांगीतलेलीं सर्व लक्षणें होतात, हा स्वरभेद असाध्य आहे ह्मणून ऋषी सांगतात,

## क्षयजन्यस्वरभेद.

धूम्येतवाक्क्षयकृतेक्षयमाप्नुयाच्चवागेषचापिह
तवाक्परिवर्जनीयः॥

अर्थ— धातुक्षयजन्य स्वरभेदामध्यें तोंडांतून वाणी निघत्ये त्या वेळेस घशांतून धूर निघाल्या प्रमाणें अनुभवास येतें, आणि वाणी क्षय

ला नसला तर साध्य होतो,

## मेदजस्वरभेद.

अंतर्गतस्वरमलक्ष्यपदं चिरेणमेदोन्वयाद्वदतिदिग्धलस्तृषार्तः॥ ४॥

अर्थ — मेदाच्यासंबंधानें कफ किंवा मेद याणीं गळा लिप्त होतो, व मेदानें स्त्रोतोरोध केल्यामुळें ताहान फार लागते, आणि शब्दोच्चार न होतां खोलस्वर बोलतो,

## असाध्यलक्षण.

क्षीणस्य वृद्धस्य कृशस्य चापि चिरोत्थितो यस्य सहोपजातः॥ मेदस्विनः सर्वसमुद्भवश्च स्वरामयो यो न स सिद्धिमेति॥ ५॥ इतिस्वरभेदनिदानम्

अर्थ— क्षीणपुरुषाचा, वृद्धाचा, रोडक्याचा, फार दिवसांचा, जन्मापासून झालेला, मेदस्वी पुरुषाचा, आणि सन्निपातोद्भव, असा स्वरभेदरोग साध्य होत नाहीं,

मधुकोशं समुन्मथ्य सारमाकृष्य वै मया॥ व्याख्याकृता महाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥ इतिस्वरभेदनिदानम्

---

## अरोचकनिदान.

वातादिभिः शोकभयातिलोभक्रोधैर्मनोघ्नाशनरूपगंधैः॥ अरोचकाः स्युः परिहृष्टदंतः कषायवक्त्रश्च

मतोनिलेन॥१॥

अर्थ— पृथक् वातादिकें करून ३ सन्निपातानें १ शोकापासून १ भयापासून १ अतिलोभानें १ व अतिक्रोधानें १ असे ८ प्रकारचे अरोचक आहेत ते, मनाला किळस येणारें अन्न, रूप, आणि गंध, ह्याकारणानीं उत्पन्न होतात.

वायूच्या अरोचकानें दांत आंबटानें आंबल्या प्रमाणें आंबतात, आणि तोंड तुरट होतें,

कट्वम्लमुष्णं विरसंच पूतिपित्तेन विद्यात् लवणंच वक्रं॥ माधुर्यपैच्छिल्यगुरुत्वशैत्यविबद्धसंबद्ध-युतंकफेन॥२॥

अर्थ— पित्ताच्या अरुचीनें तिखट, आंबट, ऊष्ण, बेचव, दुर्गंधयुक्त असें तोंड होतें,

कफानें खारट, मधुर, बुळबुळीत, जड, गार, असें तोंड होतें, आणि बांधल्या सारिखें म्हणजे खावयत नाहीं, आणि आंतून कफानें सारवल्या सारिखें होतें,

## शोकाद्यरोचकलक्षण.

अरोचकेशोकभयातिलोभक्रोधाद्यहृद्याशुचिगंधजेस्यात्॥ स्वाभाविकंचास्यमथारुचिश्चत्रिदोषजे नैकरसंभवेत्तु॥३॥

अर्थ— शोक, भय, अतिलोभ, क्रोध, अहृद्य व घाणेरडा गंध, यांपासून झालेल्या अरोचकामध्यें तोंड स्वाभाविक असतें, म्हणजे वातजादिकां प्रमाणें तुरट वगैरे असत नाहीं,

त्रिदोषअरोचकांत अन्नद्वेष व तोंड अनेकरस होतें,

वातजादिभेदानें तोंडांतली विकृति सां
गून अन्य ठिकाणीं जी विकृति होते ती सां०

हृच्छूलपीडनयुतं पवनेन पित्तात्तृड्दाहचोषबहुलं सकफप्रसेकं॥श्लेष्मात्मकं बहुरुजं बहुभिश्च वि
द्याद्वैगुण्यमोहजडताभिरथापरं च॥ ४॥

अर्थ—वायूनें अरोचकामध्यें हृदयांत शूल आणि वेदना होतात,

पित्तापासून, तृषा, दाह, आणि चोष (ह्म० तुमडी लावल्या प्रमाणें पीडा) हीं लक्षणें होतात,

कफाच्या अरोचकामध्यें तोंडांतून कफाचा स्राव होतो-

त्रिदोषजामध्यें बहुत वेदना होतात,

वैगुण्य (ह्मणजे मनाची व्याकुळता,) मोह, जडत्व, त्या लक्षणानीं अपर ह्मणजे आगंतुज अरोचक जाणावें)

क्षुधा असतां जेवणाला सामर्थ्य नसणें त्याला अरुचि ह्मणावें

आवडतें अन्न दिलें तरी खात नाहीं त्यास अन्नाभिनंद ह्मणावें.

अन्नाचें स्मरण, श्रवण, दर्शन, आणि वास, त्यानीं त्रासतो त्याला, भक्तद्वेष ह्मणावें. या प्रमाणें हा रोग तीन प्रकारचा आहे, तरि चरक. सुश्रुतानीं अरोचक शब्दानें त्याचा संग्रह केला,

मधुकोशं समुनिर्मथ्य सारमाकृष्य वैमया॥ व्याख्याकृ
तामहाराष्ट्री माधवार्थप्रकाशिका॥ १॥ अरोचकसं०

---

## छर्दिनिदान.

छर्दीचें कारण व निरुक्ति.

दुष्टैर्दोषैः पृथक्सर्वैर्बीभत्सालोकनादिभिः॥ छर्द

यः पंचविज्ञेयास्तासांलक्षणमुच्यते॥१॥अतिद्रवै रतिस्निग्धैरहृद्यैर्लवणैरपि॥अकालेचातिमात्रैश्च तथासात्म्यैश्चभोजनैः॥२॥श्रमाद्भयात्तथोद्वेगादजीर्णात्कृमिदोषतः॥नार्याश्चापन्नसत्वायास्तथातिद्रुतमश्नतः॥३॥बीभत्सैर्हेतुभिश्चान्यैर्द्रुतमुत्क्लेशितो बलात्॥ छादयन्नाननंवेगैरर्दयन्नंगभंजनैः ॥४॥निरुच्यते छर्दिरिति दोषोवक्त्रंप्रधावति॥४॥

अर्थ— दुष्ट झालेले पृथक् आणि सर्व दोषानीं व बीभत्स (हें दरें) पदार्थ, यांच्या अवलोकन, गंध, भक्षणादिकें करून पांच प्रकारच्या छर्दि (ह्मणजे वांति, होतात) त्यांचीं लक्षणें पुढें सांगतों,

अत्यंत पातळ व स्निग्ध व किळस आणणारे व खारट पदार्थ त्याच्या सेवनानें, अकाळीं भोजन केल्यानें, किंवा अतिमात्र भोजनानें, अथवा जें सोसत नाहीं तें खाल्यानें, श्रमानें, भयानें, शिसारी आल्यानें, अजीर्णानें, कृमिदोषाच्या योगानें, गर्भिणीस्त्रीला गर्भोत्पीडनानें, नसेंच घाई घाईनें जेवणानें, अथवा दुसऱ्या बीभत्स कारणानीं, जोरानें झटकन वर आलेला दोष तोंडाला आच्छादन करितो, आणि आंगाचा विळाखिळा करून पीडा करतो, ह्मणून त्या रोगाला — (छर्दि) ओकारी असें ह्मणतात, त्यामध्यें दोष तोंडावाटे धांवतो,

## पूर्वरूप.

हृल्लासोद्गारसंरोधौप्रसेकोलवणस्तनुः॥ द्वेषोन्नपानेचभृशंवमीनांपूर्वलक्षणम्॥५॥

अर्थ— वांति व्हावयाची असली ह्मणजे मळमळ सुटते, ढेंकर बंद होतो, तोंडाला खारट पाणी सुटतें, अन्नपानावर अत्यंत द्वेष होतो,

वातछर्दीचें ल०

हृत्पार्श्वपीडामुखशोषशीर्षनाभ्यर्तिकासःस्वरभेदतोदैः॥उद्गारशब्दप्रबलंसफेनंविच्छिन्नकृष्णंतनुकंकषायम्॥ ६॥ कृच्छ्रेणचाल्पंमहताचवेगेनार्तोनिलाच्छर्दयतीहदुःखम्॥

अर्थ— हृदय, बरगड्या यांस पीडा, तोंडास कोरड, मस्तक आणि नाभि यांच्या ठिकाणीं शूळ, खोकला, स्वरभेद, आणि सूया टोंचल्या प्रमाणें पीडा, ह्या लक्षणांनीं युक्त झालेला नर ओकतो, तें कसें तें सांगतों,— उद्गार आणि शब्द हे त्यांत फार असतात, वमनाला फेंस फार असतो, राहून राहून वांति होत्ये, किंवा थोडी होत्ये, वांति काळ्या रंगाची असून पातळ व तुरट थोडी असत्ये, वांतीचा वेग मोठा असून त्यामुळें दुःख फार होतें, वायू पासून वांति झाल्याचें हें लक्षण होय,

पित्तछर्दीचें लक्षण.

मूर्छापिपासामुखशोषशीर्षताल्वक्षिसंतापतमोभ्रमार्तः॥पीतंभृशोष्णंहरितंसतिक्तंधूम्रंचपित्तेनवमेत्सदाहम्॥ ७

अर्थ— भोंवळ, ताहान, कोरड, डोकें, तालु, आणि डोळे, हीं तापतात, अंधारी चक्कर ह्यांनीं पीडलेला रोगी पिंवळें, कढत, हिरवें, कडू, धुरकट आणि दाह युक्त असें पित्तानें ओकतो,

कफछर्दीचें लक्षण.

तंद्रास्यमाधुर्यकफप्रसेकसंतोषनिद्रारुचिगौरवार्तः॥स्निग्धंघनंस्वादुकफाद्विशुद्धंसरोमहर्षोल्परुजंवमेत्तु॥ ८॥

अर्थ— झांपड, तोंडाला गोडी, कफाचा स्राव, संतोष (ह्मणजे जेवल्या प्रमाणें संतोष असणें) झोंप अरुचि, जडपणा, ह्यांनीं पिडलेला मनुष्य, स्नेहयुक्त, घट्ट, गोड, पांदरे असें कफानें ओकतो, व ओकते वेळेस पीडा थोडी होत्ये व अंगाला शाहारे येतात,

### त्रिदोषजछर्दीचें लक्ष०

शूलाविपाकाऽरुचिदाहतृष्णाश्वासप्रमोहप्रबला
प्रसक्तं॥ छर्दिस्त्रिदोषाल्लवणाम्लनीलसांद्रोष्णरक्तं
वमतांनृणांस्यात्॥९॥

अर्थ— शूल, अजीर्ण, अरुचि, दाह, ताहान, श्वास, मोह, ह्या लक्षणानीं प्रबळ झालेली वांति त्रिदोषापासून निरंतर होत्ये, आणि ओकण्याराचें वमन खारट, आंबट, निळें, घट्ट, ऊन, आणि लाल असें असतें,

### असाध्य लक्षण.

विट्स्वेदमूत्रांबुवहानिवायुः स्रोतांसिसंरुध्ययदो
र्ध्वमेति॥ उत्सन्नदोषस्यसमाचितंतंदोषंसमुद्धूय-
नरस्यकोष्ठात्॥१०॥ विण्मूत्रयोस्तत्समगंधवर्णांतृ
ट्श्वासकासार्तियुतंप्रसक्तं॥ प्रच्छर्दयेद्दुष्टमिहातिं
वेगात्तयार्दितश्चाशुविनाशमेति॥११॥

अर्थ—ज्या वेळेस वायु हा पुरीष, स्वेद, मूत्र, आणि उदक, यांस वाहाणाऱ्या स्रोतसांचा रोध करून वर येतो, तेव्हां वर आलेला दोष (पुरीषादि) कोष्ठांतून बाहेर काढून वांति करतो, त्या वांतीला विष्ठेचा व मूत्राचा दुर्गंध येतो, व रंगही तसाच असतो, तृषा, श्वास, खोकला, आणि शूळ हीं त्यांत असतात, व ही दुष्ट वांति वारंवार मोठ्या वेगानें होत्ये, त्या वांतीनें पीडित झालेला मनुष्य लवकर नाश पावतो.

## आगंतुज छर्दीचें लक्षण.

बीभत्सजादौर्हृदजामजाच्चअसात्म्यजावाक्रुमि-
जाच्चयाहि॥सापंचमीतांचविभावयेत्तुदोषो छ्रये
णैवयथोक्तमादौ॥१२॥

अर्थ— बीभत्स पदार्थांच्या दर्शनादिकांपासून झालेली, डोहोळे न पुरविल्या पासून झालेली, अजीर्णानें झालेली, असात्म्य पदार्थापासून झालेली अथवा क्रुमिजन्य, ध्या सर्वकारणापासून झालेलेली, आगंतुज वांति पांचवी होय, ती पूर्वी सांगितलेल्या लक्षणावरून ज्या दोषांचें आधिक्य दिसेल त्या दोषाच्या प्राबल्यानेजाणावी,

## क्रुमिज छर्दीचें लक्षण.

शूलहृल्लासबहुला क्रुमिजाचविशेषतः॥ क्रुमिहृ
द्रोगतुल्येनलक्षणेनचलक्षिता॥१३॥

अर्थ— क्रुमिजन्य छर्दीमध्यें शूळ, हृदय लसलसणें, हें फार असतें आणि बहुत करून क्रुमि आणि हृद्रोग यांच्या लक्षणा सारख्या लक्षणानें तीसमजावी,

## साध्यासाध्यलक्षण.

क्षीणस्ययाछर्दिरतिप्रसक्तासोपद्रवाशोणितपूय
युक्ता॥सचंद्रिकांतांप्रवदेदसाध्यांसाध्यांचिकित्से-
न्निरुपद्रवांच॥१४॥

अर्थ—क्षीणपुरुषाची, व वारंवार एकसारिखी होणारी, व कासादि उपद्रवानीं युक्त, व रक्तपूमिश्रित झालेली, मोरपिसाच्या चंद्रकासारिख्या चंद्रकानें युक्त, अशी वांति असाध्य ह्मणावी, निरुपद्रव असेलतर साध्य समजून उपाय करावा.

उपद्रव.

कासश्वासोज्वरोहिक्कातृष्णावैचित्यमेवच॥ हृद्रो
गस्तमकश्चैवज्ञेयाश्छर्देरुपद्रवाः॥ १५॥

अर्थ— खोकला, दमा, ज्वर, उचकी, तृषा, उद्विग्नता, हृद्रोग, अंधारांत पडल्यासारिखा भास, हे छर्दीचे उपद्रव होत,

मधुकोशंकनिर्मथ्य सारमारुष्यचेमया॥ व्याख्याकृता
महाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥ इति छर्दिनिदानम्

---

## तृष्णानिदान.

### संप्राप्ति.

भयश्रमाभ्यांबलसंक्षयाद्वाऊर्ध्वंचित्तंपित्तविव-
र्धनैश्च॥ पित्तंसवातंकुपितंनराणांतालुप्रपन्नंज-
नयेत्पिपासाम्॥ १॥

अर्थ— भयानें, श्रमानें, बलक्षयानें, आणिपित्त वाढविणारे क्रोधोपवासादिकानीं स्वस्थानींच सांचलेलें पित्त, आणि वात हे कुपित होऊन वर तालु(पिपासा स्थानीं)जाऊन तृष्णा (ताहान) उत्पन्नकरितात,

### अन्नजादिकतृष्णांचीसंप्राप्ति.

स्रोतस्स्वपांवाहिषुदूषितेषुदोषैश्चतृष्णाभवतीह-
जंतोः॥ तिस्रः स्मृतास्ताः क्षतजाचतुर्थीक्षयात्तथा
ह्यामसमुद्भवाच॥ २॥ भक्तोद्भवासप्तमिकेतिता-
सांनिबोधलिंगान्यनुपूर्वशश्च॥

अर्थ— उदकवह स्रोतसें दूषित झालीं असतां दोष(अन्न, कफ आणि आम) यांपासून तृष्णा होत्ये, (या तीन आणि चवथी क्षतज तृ-

ध्या(जी व्रणी पुरुषास होतेती) पांचवी क्षया पासून होत्ये, साहावी आमा पासून होत्ये, आणि सातवी अन्ना पासून होते, त्यांची लक्षणें अनुक्रमानें सांगतो, त्या पैकीं पहिल्या चार तृष्णा सुखसाध्य, आणि बाकीच्या कष्टसाध्य जाणाव्या,

## वातज तृष्णा लक्षण.

क्षामास्यता मारुतसंभवायां तोदस्तथा शंखशिरःसु चापि॥ स्रोतोनिरोधो विरसं च वक्त्रं शीताभिरद्भिश्च विवृद्धिमेति॥३॥

अर्थ— वातानें झालेल्या तृष्णेमध्यें तोंड सुकतें व दीन होतें, शंख आणि मस्तक यांचे ठिकाणीं टोंचल्यासारिखी पीडा होत्ये, रस व उदक वाहणाऱ्या स्रोतसांचा रोध होतो, तोंड विरस होतें, आणि थंड पाणी प्यावयास दिलें असतां तृषा फारच वाढते, हें अनुपशयाचें लक्षण होय, चकारें करून निद्रा नाशही होतो,

## पित्तज तृष्णा लक्षण.

मूर्छान्नविद्वेषविलापदाहा रक्तेक्षणत्वं प्रततश्च शोषः॥ शीताभिनंदा मुखतिक्तता च पित्तात्मिकायां परिदूयनं च॥४॥

अर्थ—पित्ताच्या तृष्णेमध्यें, मूर्छा, अन्नद्वेष, बडबड, दाह, डोळ्यांना लाली, अत्यंत शोष, शीत पदार्थांची वांछा, तोंडाला कडवट पणा, आणि संताप हीं लक्षणें होतात,

## कफज तृष्णा लक्षण.

बाष्पावरोधात्कफसंवृतेऽग्नौ तृष्णा बलासेन भवेत्तथा तु॥ निद्रा गुरुत्वं मधुरास्यता च तृष्णार्दितः शुष्य

तिचातिमात्रम्॥ ५॥

अर्थ— स्वकारणानीं कुपित कफानें अग्नि आच्छादित होऊन त्याच्या ऊष्म्याचा अवरोध झाला असतां खालीं जाऊन उदक वह स्रोतसांचें शोषण करून कफज तृष्णा उत्पन्न होते, त्या तृष्णेमध्यें झोंप, जाड्य, तोंडास गोडी, हीं होतात, ह्या तृष्णेनें पीडित झालेला पुरुष अत्यंत शोष पावतो,

क्षतजतृष्णाल०

क्षतस्यरुक्शोणितनिर्गमाभ्यांतृष्णाचतुर्थीक्षतजामतातु॥

अर्थ— शस्त्रादिकें करून क्षत झालेल्या पुरुषास पीडा, आणि रक्तस्राव यांपासून जी तृष्णा होते, ती चवथी क्षतज तृष्णा जाणावी,

क्षयजतृष्णाल०

रसक्षयाद्याक्षयसंभवासातयाभिभूतस्तनिशादिनेषु॥ पेपीयतेंभःससुखंनयातितांसन्निपातादितिकेचिदाहुः॥ ७॥ रसक्षयोक्तानिचलक्षणानितस्यामशेषेणभिषग्व्यवस्येत्॥

अर्थ— रसाच्या क्षयानें जी तृष्णा होते ती क्षयज तृष्णा होय, तिणें पीडित झालेला पुरुष रात्रं दिवस वारंवार पाणी पितो, परंतु संतोष होत नाहीं, कोणी ही तृष्णा सन्निपाता पासून होती म्हणून म्हणतात, रसक्षयाचीं जीं लक्षणें सांगितलीं आहेत तीं सर्व हिच्यामध्यें होतात, तीं वैद्यानें जाणावीं, " रसक्षय ल० सुश्रुतांत सांगितलीं आहेत तीं येणें प्रमाणें. रसक्षयांत हृदयास पीडा. कांपरें, शोष, बधिरता, (सुंग्या आल्या प्रमाणें, आणि तहान."

### आमजतृष्णाल०

त्रिदोषलिंगामसमुद्भवातुहृच्छूलनिष्ठीवनसा
दकर्त्री॥८॥

अर्थ— आमज ह्मणजे अजीर्णा पासून जी तृष्णा होत्ये, तिच्या मध्यें तिन्हीं दोषांचीं लक्षणें असतात, आणि हृदयशूल, लाळ, ग्लानि, हीं तिज पासून होतात.

### अन्नजतृष्णाल०

स्निग्धंतथाम्लंलवणंतुभुक्तंगुर्वन्नमेवाशुतृषं-
करोति॥

अर्थ— स्निग्ध, तसेंच आंबट, खारट, जड, आणि मात्राधिक, असें अन्न खाल्लें असतां अवश्यमेव शीघ्र तृषा उत्पन्न करतें.

### उपसर्गजतृष्णाल०

दीनस्वरःप्रताम्यन्दीनाननशुष्कहृदयगलतालुः॥
भवतिखलुसोपसर्गात्तृष्णासाशोषिणीकष्टा॥ज्व-
रमोहक्षयकासश्वासाद्युपसृष्टदेहानां॥१०॥

अर्थ— शब्द खोल जातो, मोह पावतो, मन क्लांत होतें, तोंड, घसा, तालु हीं कोरडी पडतात, ही तृष्णा उपद्रवा पासून होते, ही मनुष्याला-शुष्क करून टाकत्ये, व्याधीनें शरीर कृश झालें असतें ह्मणून ही कष्टसाध्य होय. — ते उपद्रव येणे प्रमाणे. — ज्वर, मोह, क्षय, खोकला, श्वास, आदि शब्दानें अतिसारादिक, हे रोग ज्यांस झालेले आहेत-त्यांना झालेली तृष्णा कष्टसाध्य जाणावी.

### असाध्यलक्षणें

सर्वास्त्वतिप्रसक्तारोगकृशानांवमिप्रसक्तानाम्॥

घोरोपद्रवयुक्तास्तृष्णामरणायविज्ञेयाः॥११॥

अर्थ— वातजादिसर्व प्रकारच्या तृष्णा अत्यंत वाढल्या असतां. किंवा रोगानें कृश झाले त्याच्या तृष्णा, किंवा वांती पासून झाले- ल्या तृष्णा, व भयंकर उपद्रवानीं युक्त अशा तृष्णा मरणाला का- रण होतात,

मधुकोशस्कनिर्मथ्य सारमाकृष्य वैमया॥ व्याख्याकृता महाराष्ट्रीमाधवार्थ प्रकाशिका॥ इतितृष्णानिदानं॥

---

## मूर्छानिदान.

### निदान व संप्राप्ति.

क्षीणस्य बहुदोषस्य विरुद्धाहारसेविनः॥ वेगा- घातादभीघातान्हीनसत्वस्यवापुनः॥१॥ कर- णायतनेषूग्रा बाह्येष्वाभ्यंतरेषुच॥ निविशंतेय दादोषास्तदामूर्छंतिमानवाः॥२॥ संज्ञावहास्क नाडीषुपिहितास्वनिलादिभिः॥ तमोभ्युपैतिस- हसासुखदुःखव्यपोहकृत्॥३॥ सुखदुःखव्य पोहाच्चनरः पततिकाष्ठवत्॥ मोहोमूर्छेतितामा हुःषड्विधासाप्रकीर्तिता॥४॥ वातादिभिः शोणि- तेनमद्येनचविषेणच॥ षट्स्वप्येतासुपित्तंतुप्र भुत्वेनावतिष्ठते॥५॥

अर्थ— क्षीण झालेला, पुष्कळ दोषसांचलेला, विरुद्ध आहार सेवन करणारा, अशा पुरुषास, मलमूत्रादि वेग धारण केल्यानें, लगुडा दिकांच्या अभिघातानें, अथवा त्यापुरुषाचा सत्वगुण क्षीण झा-

ला. अशापुरुषाचीबाहेरच्याच आंतल्यामनोवहस्रोतसांमध्यें जेव्हां दोष प्रवेश करितात, तेव्हां मनुष्यांस मूर्च्छा येते, ह्म० संज्ञा वाहाणाऱ्या नाडी वातादिकानीं आवृत झाल्या असतां सुखदुःखाचें ज्ञान नष्ट करणारें असें तम ह्मणजे अज्ञान अकस्मात प्राप्त होतें, सुख दुःखाचें ज्ञान नष्ट झालें ह्मणजे मनुष्य काष्ठवत् पडतो; त्या रोगाला मोह किंवा-मूर्च्छा असें ह्मणतात, ही साहा प्रकारची आहे,ती अशी- वातादिकें करून ३ आणि रक्त, विष, आणि मद्य यांपासून ३ एकूण ६, त्या साही मूर्च्छामध्यें पित्त हें व्यापक असतें

## पूर्वरूप.

हृत्पीडाजृंभणंग्लानिःसंज्ञादौर्बल्यमेवच॥सर्वासांपूर्वरूपाणियथास्वंताविभावयेत्॥ ६॥

अर्थ— हृदयांत पीडा,जांभया,ग्लानि,भ्रांति, हीं सर्व मूर्च्छांचीं पूर्वरूपें होत, पुढें त्या मूर्च्छा वातादि भेदानें जाणाव्या,

## वातज मूर्च्छा लक्षण.

नीलंवायदिवाकृष्णमाकाशमथवारुणम्॥पश्यंस्तमः प्रविशतिशीघ्रंचप्रतिबुध्यते॥७॥वेपथुश्चांगमर्दश्चप्रपीडाहृदयस्यच॥कार्श्यंश्यावारुणाच्छायामूर्छायेवातसंभवे॥८॥

अर्थ— वायू पासून झालेल्या मूर्च्छेमध्यें आकाश निळ्या रंगाचें किंवा काळेंअथवा तांबडें दृष्टीस पडून आंधारी यत्ये, ह्मणजे मूर्च्छा येत्ये, आणि रोगी लवकर सावध होतो, आंगाला कांपसुटतो, आंगमोडूनयेतें, हृदय फार दुखतें, शरीर कृश होतें, शरीराचा वर्ण काळा सांवळा किंवा तांबूस होतो,

## पित्तजमूर्छालक्षण.

रक्तंहरितवर्णंवावियत्पीतमथापिवा॥पश्यंस्तमः प्रविशतिसस्वेदश्चप्रबुध्यते॥९॥सपिपासःससंतापोरक्तपीताकुलेक्षणः॥संभिन्नवर्चाःपीताभोमूर्छायेपित्तसंभवे॥१०॥

अर्थ— पित्ताच्या मूर्छेमध्यें लाल किंवा हिरवें, अथवा पिंवळें आकाशपाहून रोगी मूर्छित होतो, आणि सावध होते वेळीं घाम येतो, तृषा लागते, संताप होतो, डोळे लाल व पिंवळे होतात, मळपातळ होतो, शरीराचा वर्ण पिंवळा होतो,

## कफजमूर्छालक्षण.

मेघसंकाशमाकाशमावृतंवातमोघनेः॥पश्यंस्तमःप्रविशतिचिराच्चप्रतिबुध्यते॥११॥गुरुभिःप्रावृतेरंगैर्यथैवार्द्रेणचर्मणा॥सप्रसेकःसहृल्लासोमूर्छायेकफसंभवे॥१२॥

अर्थ— कफज मूर्छेमध्यें आकाश मेघासारिखें, किंवा अंधार आणि मेघ यानीं व्याप्त झालेलें आकाश पाहातअसतां रोगी मूर्छा पावतो, आणि उशीरानें सावध होतो, आंगावर जाड पांघरुणें, अथवा ओलें चर्म घातलें आहे असें वाटतें, तोंडाला पाणी सुटतें, ओकारी होईल सें वाटतें,

## सन्निपातजमूर्छालक्षण.

सर्वाकृतिःसन्निपातादपस्मारइवापरः॥सजंतुंपातयत्याशुविनाबीभत्सचेष्टितेः॥१३॥

अर्थ— सन्निपातापासून जी मूर्छा येते, तिच्यामध्यें सर्वदोषांचीं

लक्षणें होतात, हारोग दुसरा अपस्मार (फेंपरें) च होय, अपस्मारामध्यें तोंडाला फेंस, दांत चावणें, डोळे फिरवणें इत्यादि लक्षणें होतात, तीं मात्र येथें होत नाहीत एवढाच भेद आहे,

## रक्तजमूर्छेचीसंप्राप्ति.

पृथिव्यापस्तमोरूपंरक्तगंधस्तदन्वयः॥तस्माद्रक्तस्यगंधेनमूर्छंतिभुविमानवाः॥१४॥द्रव्यस्वभाव इत्येके दृष्ट्वायदभिमुह्यति॥ १४॥

अर्थ— पृथ्वी आणि उदक हीं दोन्हीं तमोगुण विशिष्ट आहेत, आणि रक्त गंधही तदन्वय म्हणजे पृथ्वी अंशोमय आहे, म्हणून रक्ताच्या गंधानेंजे भुवि मानव म्हणजे तामस पुरुष आहेत ते मूर्छापावतात, रक्ताचा गंध न आला तरी नुसतें रक्त पाहून मूर्छा येते, हा द्रव्य स्वभाव आहे असें कोणी म्हणतात,

## विषआणिमद्य त्यांपासून. झालेल्यामूर्छा सांगतो.

गुणास्तीव्रतरत्वेन स्थितास्तविषमद्ययोः॥तएवतस्मादाभ्यांतुमोहौस्यातांयथेरितौ॥१५॥

अर्थ— तैलादिकामध्यें जे दाहा गुण आहेत, तेच विषआणि मद्य यांमध्यें अत्यंत तीव्र तेनें राहातात, म्हणून विषंमद्यां पासून खालीं सांगितल्या प्रमाणें मोह होतात, विषज मोह आपल्या आपण जात नाहीं, कारण त्याचा पाक होत नाहीं, आणि मद्यजन्य मोह नर मद्य पचल्या नंतर शांत होतो, हा भेद विष मद्यामध्यें प्रभावानें राहातो,

---

लघु, रूक्ष, आशु, विशदं, व्यवायि, तीक्ष्णं, विकाशि, सूक्ष्मं, च॥ उष्ण, मनिर्देश्यरसं, दशगुणमुक्तं विषंतज्ज्ञैः॥

### रक्तजादितीन मूर्छांचीं लक्षणें.

स्तब्धांगदृष्टिस्त्वसृजागूढोच्छ्वासश्चमूर्छितः॥१६
मद्येनविलपन्शेतेनष्टविभ्रांतमानसः॥गात्राणिवि
क्षिपन्भूमौजरांयावन्नयातितत्॥१७॥वेपथुस्वप्न
तृष्णाःस्युस्तमश्चविषमूर्छिते॥वेदितव्यंतीव्रतरं-
यथास्वंविषलक्षणैः॥१८॥

अर्थ— रक्तज मूर्छेनें अंग आणि डोळे ताठतात, आणि श्वास अस्पष्ट-असतो,

मद्यानें बडबड करितो, निजतो, स्मृतिनष्ट होते, भ्रमिष्ट होतो, आणि जों पर्यंत तें मद्य जीर्ण होत नाहीं तों पर्यंत जमिनीवर हात, पाय, पाखडतो,

विषजन्य मूर्छेमध्यें कांपरें, झोंप, तृषा, आणि अंधारांत पडल्यासारिखें वाटणें, हीं होतात आणि मूल, पत्र, क्षीरादि भेदें करून जें विष-भक्षणांत आलें असेल त्याच्या लक्षणानें युक्त मूर्छा होते.

### मूर्छा.भ्रम.तंद्रा.आणि निद्रायांचा भेद सांगतों.

मूर्छापित्ततमःप्रायारजःपित्तानिलाद्भ्रमः॥तमोवा
तकफात्तंद्रा निद्राश्लेष्मतमोभवा॥१९॥

अर्थ— मूर्छे मध्यें पित्त आणि तमोगुण अधिक; रजोगुण, पित्त आणि वायू यांपासून भ्रम होतो, तमोगुण, वायु आणि कफ यांपासून तंद्रा आणि कफ व तमोगुण यांपासून निद्रा उत्पन्न होते,

### तंद्रेचें लक्षण.

इंद्रियार्थेष्वसंप्राप्तिर्गौरवंजृंभणंक्लमः॥निद्रार्त-

स्येवयस्येतेतस्यतंद्रांविनिर्दिशेत्॥ २०॥ ॥

अर्थ— इंद्रियें स्वस्व विषय ग्रहण करीत नाहींत, सुस्ती, जांभया, भागवटा, हीं लक्षणें निद्रार्त पुरुषा प्रमाणें ज्याला होतात, त्याला तंद्रा-लागली असें ह्मणावें, निद्रा आणि भ्रम हे अति प्रसिद्ध असल्या मुळें माधव कारानें सांगीतले नाहींत; परंतु चरकानें सांगितले आहेत ते सांगतों— " यदातु मनसि क्लांते कर्मात्मानः क्लमान्विताः॥ विषयेभ्यो निवर्तंते तदास्वपिति मानवः॥ अर्थ— ज्या वेळेस मन क्लांत होऊन इंद्रियें क्लांत होतात आणि विषयां पासून निवृत्त होतात, तेव्हां मनुष्याला झोंप लागते,

## मूर्छादिकांपेक्षां सन्यास वेगळा आहे तो सांगतो.

दोषेषुमदमूर्छायागतवेगेषुदेहिनाम्॥ स्वयमेवोपशाम्यंतिसन्यासोनौषधैर्विना॥ २१॥

अर्थ— दोषांचा वेग गेला असतां मद मूर्छादिक आपल्या आपण शांत होतात, परंतु सन्यास हा औषधा वांचून शांत होत नाहीं,

## सन्यासाचें लक्षण सांग०

वाग्देहमनसांचेष्टाआक्षिप्यातिबलामलाः॥ संन्यस्यंत्यबलंजंतुंप्राणायतनमाश्रिता॥ २२॥ सनासन्यासंसन्यस्तः काष्ठीभूतोमृतोपमः॥ प्राणैर्विमुच्यतेशीघ्रंमुक्त्वासद्यःफलांक्रियां॥ २३॥

अर्थ— अत्यंत बळिष्ठ झालेले दोष, वाणी, देह, आणि मन त्यांचे व्यापार बंद करून हृदयांत राहून निर्बळ प्राण्याला मोहून टाकतात, तो सन्यासानें पीडलेला मनुष्य काष्ठ होऊन मेल्यासारिखा पडतो. -

त्याला सद्यः फल चिकित्सा ह्मणजे रुधा टोंचणें, यंत्रानें पीडणें, कुहि-ली लावणें, पेटव लेले कांकडे नाकांत घालणें इत्यादि क्रिया नकेली तर-तो प्राण वियुक्त ह्मणजे मरतो, नाहींतर वांचतो.

मधुकोशांकनिर्मथ्यरात्मा कृष्ययत्नतः ॥ व्याख्या कृता महाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका ॥

---

## मदात्ययनिदान.

येविषस्यगुणाः प्रोक्तास्तेपिमद्येप्रतिष्ठिताः ॥ तेन मिथ्योपयुक्तेनभवत्युग्रोमदात्ययः ॥ १ ॥ किंतुमद्यं स्वभावेनयथैवान्नंतथास्मृतम् ॥ अयुक्तियुक्तंरो-गाययुक्तियुक्तंयथामृतम् ॥ २ ॥

अर्थ—विषाचे जे गुण सांगितले आहेत, तेच गूण मद्यामध्यें आहेत; ह्मणून तें मद्य अविधीनें सेवन केलें तर भयंकर मदात्यय रोग होतो, कोणी अशी शंका करिल कीं, विषाचे गूण मद्यामध्यें आहेत, तेव्हां विषाप्रमाणें मद्य सेवूं नये, यां विषयीं सांगतो, मद्य हें स्वभावतः जसें अन्न देह धारक आहे तसेंच सांगितलें आहे, परंतु तें अविधीनें योजलें तर रोग कारक होतें, आणि युक्तीनें योजलें तर अमृता-सारिखें गुण करितें.

## त्याविषयीं दृष्टांत.

प्राणाः प्राणभृतामन्नंतदयुक्त्यानिहंत्यसून् ॥ विषंप्राणहरंतच्चयुक्तियुक्तंरसायनम् ॥ ३ ॥

अर्थ—अन्न हें प्राण्याचें केवळ प्राण होय, तें अयुक्तीनें ह्मणजे अति-मात्रादि सेवनानें विषूच्यादि रोग उत्पन्न करून प्राण घेतें, विष हें—

माण हर आहे खरें परंतु तेंच प्रमाणानें योजिलें तर रसायन होतें.

### विधीनें मद्य योजिलें असतां त्या चें फळ.

विधिनामात्रया काले हितैरन्नैर्यथाबलम्॥ प्रहृष्टो यःपिबेन्मद्यं तस्य स्यादमृतं यथा॥४॥ स्निग्धैः सदन्नैर्मांसैश्च भक्ष्यैश्च सह सेवितम्॥ भवेदायुःप्रकर्षाय बलायोपचयाय च॥५॥

अर्थ— यथोक्त विधीनें व उक्त प्रमाणानें योग्य काळीं स्निग्धादि चांगल्या अन्नासह वर्तमान यथा शक्तीनें अत्यंत हर्षित होत्साता जो मद्यपान करील, त्याला तें अमृता सारिखें गूण करील.

स्निग्ध अन्ना बरोबर, मांसा बरोबर, व इतर भक्ष्या बरोबर मद्य सेवन केलें असतां आयुष्य वाढेल, शक्ति येईल, आणि शरीर पुष्ट होईल.

### विधीनें सेवलेल्या मद्याचें दुसरें लक्षण.

काम्यता मनसस्तुष्टिस्तेजो विक्रम एव च॥ विधिवत्सेव्यमाने तु मद्ये संति हिता गुणाः॥६॥

अर्थ— मद्य विधीनें सेवन केलें असतां, सुंदर रूप, मनाचा संतोष, उत्साह दुसऱ्याचा पराभव करण्याचें सामर्थ्य, इत्यादि हितावह गूण, होतात.

सांगितल्या विधिविरुद्ध मद्यपान केलें असतां मदात्यय रोग होतो, तो तीन प्रकारचा— पूर्वमद, मध्यमद, आणि अंतिममद

### त्यांचीं लक्षणें.

बुद्धिस्मृतिप्रीतिकरः सुखश्च पानान्नविद्रारति-

वंधनश्च॥ संपाठगीतस्वरवर्धनश्च प्रोक्तोतिरम्यः प्रथमोमदोहि॥७॥

अर्थ—बुद्धि, स्मृति, आणि प्रीति त्यांस करणारा, सख्य कारक, पान अन्न, निद्रा, आणि रति त्यांस वाढविणारा, सुंदर पाठ करणें, गायन आलाप, त्यांस वाढविणारा, असा प्रथम मद अतिरम्य ह्मणून सांगितला आहे.

## द्वितीयमदलक्षण.

अव्यक्तबुद्धिस्मृतिवाक्‌विचेष्टः सोन्मत्तलीलाकृतिरप्रशांतः॥ आलस्यनिद्राभिहतोमुहुश्चमध्येनमत्तः पुरुषोमदेन॥८॥

अर्थ— मध्यम मदानें मत्त झालेल्या पुरुषाची बुद्धि, स्मृति आणि वाणी त्या अस्पष्ट होतात, तो पुरुष विरुद्ध चेष्टा करितो, उन्मत्ता सारिख्या लीला, आणि कृती, करतो, रागावतो, आणि वारंवार आळस, व झोंप, त्यानीं गुंगतो.

## तृतीयमदाचें लक्षण.

गच्छेदगम्यान्नगुरूंश्चमन्येत्खादेदभक्ष्याणिचनष्टसंज्ञः॥ ब्रूयाच्चगुह्यानिहृदिस्थितानिमदेतृतीयेपुरुषोऽस्वतंत्रः॥९॥

अर्थ—तिसऱ्या मदामध्यें पुरूष मद्याच्या स्वाधीन होऊन अगम्या-(गुरुदारादिक) गमन करितो, वडिलांस मानीत नाहीं; अभक्ष्य भक्षण करितो, कोण त्यागोष्टीचा उल्लेख करावा, कोणतीचा करूंनये त्या विषयींचें ज्ञान नाहींसें होतें, ह्मणून मनांतल्या गुह्य गोष्टी बोलतो

## चतुर्थमदलक्षण.

चतुर्थेतुमदेमूढो भग्नदार्विवनिष्क्रियः॥ कार्याकार्य विभागाज्ञो मृतादप्यपरो मृतः॥१०॥ कोमदं तादृशंग च्छेदुन्मादमिव चापरम्॥ बहुदोषमिवारूढः कांता रंस्ववशः कृती॥११॥

अर्थ— चवथ्या मदामध्यें तर पुरुष अगदीं मूढ होऊन मोडक्या लांकडा प्रमाणें निरुपयोगी होतो, करावें कोणतें, न करावें कोणतें, हें कांहींच समजत नाहीं; तो मेल्यापेक्षां मेला होतो, असला निंद्य अम्मल कोणी शाहाणा मनुष्य करील? जेथें व्याघ्रादि घातुक पशू पुष्कळ आहेत, अशा निर्जन अरण्याच्या मार्गानें कोण जाईल काय? कोणी जाणार नाहीं, एका मद्यापासून ४ प्रकारचे मद होतात याचें कारण काय? अशी कोणी शंका करील तर सांगतो, — मद्य हें अग्नी सारिखें आहे, जसें अग्नी मध्यें सोनें टाकलें ह्मणजे उत्तम, मध्यम, कनिष्ठ, ह्मणून लागलीच परीक्षा होते. तसेंच मद्य देखील सत्व, रज, तम, बहुल प्राण्याच्या प्रकृतीचें सूचक आहे, ह्मणून प्रथम, द्वितीय, आणि तृतीय, मद हे सत्व, रज, तम, ह्या गुणाच्या आधिक्याचें सूचक आहेत.

## अविधिमद्यपानानें दुसरेही विकार होतात ह्मणून सांगतो.

निर्भुक्तमेकांतत एवमद्यं निषेव्यमाणं मनुजेन नित्यं॥
आपादयेत्कष्टतमान् विकारानापादयेच्चापि शरीरभेदं॥१२

अर्थ— मनुष्यांनि मद्याचें सेवन अन्नरहित निरंतर नित्य केलें असतां अत्यंत दुःखदायक विकार (पानात्ययादिक) उत्पन्न होतात, आणि शरीराचा नाश देखील होतो.

अन्नसहीतमद्यसेवनकेलेंतरी-
क्रुद्धत्वादिकारणांनीविकारउत्पन्नक
रितें हें सांगतों.

क्रुद्धेनभीतेनपिपासितेनशोकाभितप्तेनबुभुक्षि
तेन॥व्यायामभाराध्वपरिक्षतेनवेगावरोधाभिह
तेनचापि॥१३॥अत्यन्नभक्ष्यावततोदरेणसाजीर्ण
भुक्तेनतथाऽबलेन॥ऊष्माभितप्तेनचसेव्यमानंक
रोतिमद्यंविविधान्विकारान्॥१४॥

अर्थ— क्रोधयुक्त, भ्यालेला, तान्हेला, शोक झालेला, भुकेलेला, व्या याम, ओझें वाहाणें, आणि अतिमार्गगमन ह्यांनीं क्षीण झालेला, वेग रोधानें पिडलेला, अत्यंत अन्न व भक्ष्य खाल्यानें पोट फुगलेला, अजी र्ण भोजन केलेला, तसाच दुर्बल, उन्हानें तापलेला, अशा पुरुषानें म- द्य सेवन केलें असतां नाना प्रकारचे पानात्ययादि विकार उत्पन्न हो- तात.

त्याविकारांचेविवरण करितो.

पानात्ययंपरमदंपानाजीर्णमथापिवा॥पानविभ्र
मसुग्रंचतेषांवक्ष्यामिलक्षणम्॥१५॥

अर्थ— पानात्यय, परमद, पानाजीर्ण, आणि पानविभ्रम, या नांवा चे असे भयंकर विकार होतात, त्यांचीं लक्षणें सांगतो.

वातमदात्यय.

हिक्काश्वासशिरःकंपपार्श्वशूलप्रजागरैः॥विद्या
द्बहुप्रलापस्यवातप्रायंमदात्ययं॥१६॥

अर्थ— गुचकी, श्वास, मस्तकाला कंप, पार्श्वांचा शूळ, आणि नि-

द्रानाश, आणि फार बडबड हीं लक्षणें ज्यास होतात त्याचा वात प्रधा न मदात्यय जाणावा.

## पित्तमदात्ययलक्षण

तृष्णादाहज्वरस्वेदमोहातीसारविभ्रमैः॥ विद्याद्धरितवर्णस्यपित्तप्रायंमदात्ययम्॥ १७॥

अर्थ— तृषा, दाह, ज्वर, घाम, मोह, अतिसार, आणि भ्रम, आणि शरीचा वर्ण हिरवा, ऱ्या लक्षणानीं पित्त बहुल मदात्यय जाणावा.

## कफमदात्ययलक्षण.

छर्द्यरोचकहृल्लासतंद्रास्तैमित्यगौरवैः॥ विद्याच्छीतपरीतस्यकफप्रायंमदात्ययम्॥ १८॥

अर्थ— वांति, अन्नावर अरुचि, मळमळ, तंद्रा, अंग ओलसर, जडत्व, आणि शैत्य, ऱ्या लक्षणानीं कफबहुल मदात्यय जाणावा.

## त्रिदोषजमदात्ययल०

ज्ञेयस्त्रिदोषजश्चापिसर्वलिंगैर्मदात्ययः॥ ॥

अर्थ— सर्वांचा लक्षणांनीं त्रिदोषज मदात्यय जाणावा.

## परमदलक्षण.

श्लेष्मोच्छ्रयोंगगुरुतामधुरास्यताचविण्मूत्रसक्तिरथतंद्रिररोचकश्च॥ लिंगंपरस्यतुमदस्यवदंतितज्ज्ञास्तृष्णारुजाशिरसिसंधिषुचातिभेदः॥ १९॥

अर्थ— कफाचा कोप (हा नासास्रावादिकानीं जाणावा,) अंगाला जडत्व, तोंडाला गोडी, मलमूत्राचा अवरोध, तंद्रा, अरुचि, ताहान, मस्तकांत पीडा, आणि संधीचा ठाई कुऱ्हाडीनें तोडल्या सारिखी पीडा, हें परमदाचें लक्षण जाणावें.

## पानाजीर्णलक्षण.

आध्मानमुग्रमथवोद्गिरणंविदाहःपानेत्वजीर्णमु
पगच्छतिलक्षणानि॥ २०॥

अर्थ— अत्यंत पोट फुगणें, वांति, किंवा गर्दई येणें, जळती लागणें, हीं लक्षणें मद्य अजीर्ण तेप्रत पावलें असतां होतात.

## पानविभ्रमलक्षण.

हृद्गात्रतोदकफसंस्रवकंठधूमसूर्छावमिज्वरशिरो
रुजनप्रदेहाः॥ द्वेषःसुरान्नविकृतेष्वपितेषुतेषुत
पानविभ्रममुशंत्यखिलेनधीराः॥ २१॥

अर्थ— हृदय, आणि गात्र, यांस सुया टोंचल्या सारिखी पीडा, कफाचा स्राव, गळ्यांतून धूर निघाल्या सारिखी पीडा, मूर्छा, वांति, मस्तकशूळ, तोंड आंतून कफानें सारवल्या सारिखें, नाना प्रकारच्या सुरा, मैरेय, पैष्टिक इत्यादि सुराविकृति, आणि लड्डूकादि अन्नविकृति त्यांवर द्वेष, ह्या सर्व लक्षणांनीं ह्या रोगाला पानविभ्रम असें ह्मणतात.

## असाध्यलक्षण.

हीनोत्तरोष्ठमतिशीतममंददाहंतैलप्रभास्यमति
पानहतं त्यजेत्तु॥ जिह्वोष्ठदंतमसितंत्वमथापिनि
नीलंपीतेनयस्यनयनेरुधिरप्रभेवा॥ २२॥

अर्थ— ज्याच्या ओठापेक्षां वरचा ओठ लांब होऊन लोंबतो, बाहेरून थंडीफार वाजत्ये आणि अभ्यंतरीं अत्यंत दाह होतो, तोंड तेल लावल्या प्रमाणें तुळतुळीत दिसतें, जीभ, ओंठ, दांत, काळे, अथवा निळे होतात, डोळे पिंवळे किंवा रक्तासारखे लाल होतात.

असल्या अतिपानानें नष्ट झालेल्या पुरुषास वर्जावें ह्मणजे चिकित्सा करूनये.

### उपद्रवसांगतो.

हिक्काज्वरौवमथुवेपथुपार्श्वशूलाः कासभ्रमाव पिवपानहनंत्यजत्तं॥२३॥इतिमदात्ययादिनिदा०

अर्थ— गुचकी, ताप, मळमळ, कंप, पार्श्वशूळ, खोकला, आणि भ्रम हे उपद्रव ज्यांस होतात त्यास सोडावा.

मधुकोशंकनिर्मथ्यसारमाकृष्यवैमया॥टीकाकृतामहाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥ ॥

---

## दाहनिदान.

### दाहसातप्रकारचा त्यापैकीं मद्यजन्य दाह लक्षण.

त्वचंप्राप्तःसमानोष्मापित्तरक्ताभिमूर्छितः॥दाहंप्रकुरुतेघोरंपित्तवत्तत्रभेषजम्॥१॥

अर्थ— मद्यपानानें कुपित झालेल्या पित्ताची ती उष्णता पित्तरक्तानें वाढून भयंकर दाह उत्पन्न होतो, त्यावर पित्ता प्रमाणें औषध योजावें.

### रक्तज आणि पित्तजदाह.

कृत्स्नदेहानुगंरक्तमुद्रिक्तंदहतिध्रुवम्॥सचुष्यते तृष्यतेचताम्राभस्ताम्रलोचनः॥२॥लोहगंधांगवदनोवन्हिनेवावकीर्यते॥पित्तज्वरसमःपित्तात्सचाप्यस्यविधिःस्मृतः॥३॥

अर्थ— सर्व देहांत लें रक्त कुपित होऊन अत्यंत दाह करितें, आणि तो रोगी अग्नीजवळ बसल्या प्रमाणें तापतो, तृषित, तांबडा, आणि रक्त नयन होतो, त्याच्या तोंडाला व आंगाला लोखंडा सारिखी घाण येत्ये, आणि आंगावर कोणी विस्तव च टाकतो आहे अशी वेदना होते,

पित्ता पासून जो दाह होतो तो पित्तज्वरा सारखा ह्मणजे पित्तज्वराचीं लक्षणें त्यांत असतात, त्यावर पित्तज्वराची चिकित्सा करावी,

## तृष्णानिरोधजदाहल.

तृष्णानिरोधादप्धातौ क्षीणे तेजः समुद्धतम्॥ सबाह्याभ्यंतरं देहं प्रदहेन्मंदचेतसः॥ संशुष्कगलताल्वोष्ठोजिव्हां निष्कृष्य वेपते॥ ४॥

अर्थ— तृष्णेचा निरोध केल्यामुळें उदकरूप धातु क्षीण होऊन तेज ह्मणजे पित्तोष्मा वाढतो, आणि तो देहाला आंतून बाहेरून दाह करितो, तेणें करून रोगी बेशुद्ध होतो, गळा, ताळु, आणि ओंठ, हे अत्यंत कोरडे पडतात, आणि जीभ बाहेर काढून कांपतो.

## शस्त्राचा घाय लागून रक्त पूर्ण कोष्ठ होतो त्यामुळें जो दाह होतो तो.

असृजः पूर्णकोष्ठस्य दाहोन्यः स्यात्सुदुःसहः॥ ५

अर्थ— शस्त्र प्रहार झाला असतां रक्तानें कोष्ठ भरून जो दाह होतो तो, फार दुःसह होतो, कोष्ठ शब्दानें हृदयादिक घ्यावीं,

## धातुक्षयजन्यदाहलक्षण.

धातुक्षयोत्थो यो दाहस्तेन मूर्छा तृषान्वितः॥ क्षामस्वरः क्रियाहीनः ससीदेद्भृशपीडितः॥ ६॥ ॥

अर्थ— रसादि धातूंच्या क्षया पासून जो दाह होतो तेणें करून रोगी

मूर्छा, तृषा, याणीं युक्त होतो, शब्द खोलजातो, आणि निश्चेष्ट होतो, व त्या दाहानें अत्यंत पीडित होऊन मरतो,

क्षतज दाह.

क्षतजोनश्नतश्चान्यः शोचतोवाप्यनेकधा॥ तेनांत
र्दह्यतेत्यर्थंतृष्णामूर्छाप्रलापवान्॥७॥

अर्थ— क्षतापासून एक दाह होतो, तेणें करून आहार तुटतो, किंवा अनेक प्रकारानें शोक केल्यानें दाह होतो, तेणे करून अभ्यंतरीं अत्यंत दाह होतो, व त्या दाहानं मूर्छा आणि बडबड करणें हीं होतात,

मार्माभिघातज दाह.

मर्माभिघातजोप्यस्तिसोसाध्यःसप्तमोमतः॥

अर्थ— मर्मावर अभिघात झाला असतां दाह उत्पन्न होतो, तो असाध्य जाणावा, हा दाह सातवा होय,

सर्वएवचवर्ज्याःस्युःशीतगात्रस्यदेहिनः॥८॥

अर्थ— बाहेरून ज्या पुरुषाचें आंग थंड लागतें त्याचे सर्व प्रकारचे दाह वर्जावे, इति दाहनिदानम्॥

---

उन्मादनिदान.

मदयंत्युद्धतादोषा यस्मादुन्मार्गमाश्रिताः॥ मान
सोयमतो व्याधिरुन्माद इतिकीर्त्यते॥९॥

अर्थ— दोष दुष्ट होऊन स्वमार्ग सोडून अन्य मार्गांत गेले ह्मणजे मनोवह धमनीप्रत गेले असतां मनाला भ्रम करितात, हा व्याधि मानस होय, त्याला उन्माद असें ह्मणतात,

एकैकशः सर्वशश्च दोषैरत्यर्थमूर्छितैः॥ मानसेन

चदुःखेनसपंचविधउच्यते॥२॥विषाद्भवतिषष्ठ
श्चयथास्वंतत्रभेषजं॥सचाप्रवृद्धस्तरुणोमदसं
ज्ञांबिभर्तिच॥३॥

अर्थ— अत्यंत कुपित झालेल्या पृथक् दोषांनीं व सन्निपातानें आणि मानसिक दुखानें हा रोग पांच प्रकारचा, आणि विषा पासून साहावा होतो, तो षड्विध उन्माद फार वाढला नसून तरूणअसला म्हणजे मद ही संज्ञा त्याला प्राप्त होत्ये,

## उन्मादाचें सामान्यकारणवसंप्राप्ति.

विरुद्धदुष्टाशुचिभोजनानिप्रधर्षणंदेवगुरुद्विजा
नाम्॥उन्मादहेतुर्भयहर्षपूर्वोमनोभिघातोविष-
माश्चचेष्टाः॥४॥तैरल्पसत्वस्यमलाःप्रदुष्टाबुद्धे
र्निवासंहृदयंप्रदूष्य॥स्रोतांस्यधिष्ठायमनोवहा
निप्रमोहयंत्याशुनरस्यचेतः॥५॥

अर्थ— विरुद्ध, दुष्ट (म्हणजे विषयुक्त) अमंगळ अशीं भोजनें, देव, गुरु, ब्राह्मण, यांचा तिरस्कार, भय, आणि हर्ष, यांच्या योगानें मनाला धक्का बसणें, आणि विषमचेष्टा (म्हणजे वेडें वांकडें चालणें, बोलणें-वगैरे, आणि बळिष्ठ पुरुषाशीं झोंबी खेळणें, इत्या०) हें उन्मादाचें-कारण होय,

त्या वर सांगितलेल्या कारणांनीं अल्पसत्वगुणी पुरुषाचे वातादिक दोष कुपित होऊन बुद्धीचें राहण्याचें ठिकाण असें हृदय म्हणजे मन त्याला दुष्ट करून मनोवहस्रोतसां मध्यें राहून मनुष्याचे अंतःकरणांस मोहित करतात,

## उन्मादाचें स्वरूप.

धीविभ्रमः सत्वपरिप्लवश्च पर्याकुला दृष्टिरधीरता च॥ अबद्धवाक्त्वं हृदयं च शून्यं सामान्यमुन्मादगदस्य चिन्हं॥ ६॥

अर्थ— भ्रमिष्टपणा, मनाला चंचळपणा, दृष्टि चकित, भयशीलता, असंबद्ध भाषण, हृदय शून्य, (विचार शक्ति नसणें) हें उन्माद रोगाचें सामान्य लक्षण होय.

विशेषलक्षण.

रूक्षाल्पशीतान्नविरेकधातुक्षयोपवासैरनिलोतिवृद्धः॥ चिंतादिदुष्टं हृदयं प्रदूष्य बुद्धिं स्मृतिं चापि निहंति शीघ्रं॥ ७॥ अस्थानहासस्मितनृत्यगीतवागंगविक्षेपणरोदनानि॥ पारुष्यकार्श्यारुणवर्णता च जीर्णे बलं चानिलजस्वरूपम्॥ ८

अर्थ— रूक्ष, अल्प, आणि शीत, असें अन्न, विरेक (या शब्दानें येथें रेच आणि वांति समजावी,) धातुक्षय आणि उपवास, ह्या कारणानीं अत्यंत वाढलेला वायु चिंतादिकानीं युक्त झालेल्या हृदयास (मनास) अत्यंत दुष्ट करून बुद्धि आणि स्मृति ह्यांस सत्वर नाहींशा करितो. हंसण्याचें कारण नसतां हंसणें, किंचित् हास्य, नृत्य, गीत, आणि भाषण हीं देखील प्रसंग नसतां करणें, हाताने वेडे वेडे चाळे करणें, रडणें आणि शरीर खरखरीत व कृश आणि तांबूस होणें, आणि- आहाराचा परिपाक झाला असतां व्याधीचा जोर जास्ती होतो, हें- वातज उन्मादाचें लक्षण जाणावें.

पित्तज उन्मादाचें कारण व लक्षण.

अजीर्णकट्वम्लविदाहिशीतैर्भोज्यैश्चितं पित्तमुदी

र्णवेगम्॥ उन्मादमत्युग्रमनात्मकस्य हृदिस्थितं पूर्ववदाशु कुर्यात्॥९॥ अमर्षसंरंभविनग्नभावाः संतर्जनाभिद्रवणौष्ण्यरोषाः॥ प्रच्छायशीतान्नजलाभिलाषाः पीतास्यता पित्तकृतस्य लिंगं॥१०॥

अर्थ— अर्धी कच्ची, तिखट, आंबट, विदाह करणारीं, आणि उष्ण अशा भोजनानीं, सांचलेलें पित्त तीव्र वेग होऊन अजितेंद्रिय पुरुषाच्या हृदयांत राहून पूर्ववत् अतिउग्र उन्माद तत्काळ उत्पन्न करितें, तेणें करून असहनशीलता, तिर्सटपणा, नग्नत्व, भय पावणें, पळणें, अंगाला उष्णता, राग येणें, सांवलींत बसणें, शीतान्न आणि शीतजल यांची इच्छा, आणि पिवळटपणा, हीं लक्षणें होतात.

कफजउन्मादाचें कारण व लक्षण.

संपूरणैर्मंदविचेष्टितस्य सोष्मा कफो मर्मणि संप्रवृद्धः॥ बुद्धिंस्मृतिं चाप्युपहंति चित्तं प्रमोहयन्संजनयेद्विकारम्॥११॥ वाक्चेष्टितं मंदमरोचकश्च नारीविविक्तप्रियता तिनिद्रा॥ छर्दिश्च लाला च बलं च भुक्ते नखादिशौक्ल्यं च कफाधिके स्यात्॥१२॥

अर्थ— तृप्तिजनक पदार्थ भक्षण करून आयास न करणाऱ्या पुरुषाचा पित्तयुक्त कफ, हृदयामध्यें अत्यंत वाढून बुद्धि, स्मृति, आणि चित्त यांची शक्ति नाहींशी करितो, आणि मोहित करून उन्मादरूप विकार उत्पन्न करितो, तेणें करून वाणीचा व्यापार ह्मणजे-बोलणें वगैरे मंद होतें, अन्न द्वेष, स्त्री आवडते, व एकांत वास आवडतो, झोंप फार येते, ओकारी होते, व तोंडांतून लाळ वाहते, जेवल्यावर व्याधीचा जोर होतो, नखें आदिशब्दानें त्वक्, मूत्र, नेत्रादिक

हीं पांदरीं होतात,

## सन्निपातउन्मादलक्षण.

यःसन्निपातप्रभवोतिघोरः सर्वैःसमस्तैरपिहेतुभिःस्यात्॥ सर्वाणिरूपाणिबिभर्तितादृक्विरुद्धभैषज्यविधिर्विवर्ज्यः॥१३॥

अर्थ— जो उन्माद वातादि दोषांनीं व त्यांच्या संपूर्ण कारणांनीं होतो, तो सन्निपातजन्यउन्माद फार भयंकर होय, त्यामध्यें दोषांचीं सर्वलक्षणें होतात, याला विरुद्ध चिकित्सा करावी लागते, असला हा उन्माद वैद्यानीं सोडावा, कारण हा असाध्य आहे,

## शोकजउन्मादलक्षण.

चौरैर्नरेंद्रपुरुषैररिभिस्तथान्यैर्वित्रासितस्यधनबांधवसंक्षयाद्वा॥गाढंक्षतेमनसिचप्रिययारिरंसोर्जायेतचोत्कटतरोमनसोविकारः॥१४॥चित्रंब्रवीतिचमनोनुगतंविसंज्ञोगायत्यथोहसतिरोदितिचातिमूढः॥१५॥

अर्थ— चोरांनीं, राजपुरुषांनीं, अथवा शत्रूनीं तसेंच दुसऱ्या कोणी पुरुषानीं त्रासवलेलो. अथवा धन, बंधुनाशानें त्रास पावलेला, अशा पुरुषाचें अंतःकरण बळकट दुखवलें असतां त्यास, अथवा इष्टस्त्रीशीं संभोग करण्यास इच्छिणारा अशा पुरुषाच्या मनाला भयंकर विकार होतो, तेणें करून तो नाना तऱ्हेचें बोलतो, मनांतलीं गुप्यगोष्ट बोलतो, त्याचें ज्ञान विपरीत होतें, तो गातो, हंसतो, आणि रडतो देखील म्हणून अत्यंत मूर्ख होऊन जातो,

## विषजउन्मादलक्षण.

रक्तेक्षणोहतबलेंद्रियभाः सुदीनः श्यावाननो-
विषकृतेनभवेद्विसंज्ञः॥१५॥

अर्थ— विषानें झालेल्या उन्मादानें डोळे नांबडे होतात, बळ, इंद्रियें आणि शरीराची कांति नष्ट होत्ये, अत्यंत दीन होतो, त्याच्या तोंडावर काळिमा येतो, आणि संज्ञा नाश होतो,

## असाध्यलक्षण.

अवाङ्मुखस्तून्मुखोवाक्षीणमांसबलोनरः॥जा
गरूकोह्यसंदेहमुन्मादेनविनश्यति॥१६॥

अर्थ— ज्याणें तोंड खालीं घातलें आहे, अथवा वर केलें आहे, वज्यांचीं मांस आणि बळ हीं क्षीण झालीं आहेत, आणि ज्याची झोंप उडालेली आहे असा मनुष्य या उन्माद रोगानें नाश पावतो,

## भूतजउन्मादलक्षण.

अमर्त्यवाग्विक्रमवीर्यचेष्टाज्ञानादिविज्ञानबला-
दिभिर्यः॥उन्मादकालोनियतश्चयस्यभूतोत्थमु-
न्मादमुदाहरेत्तं॥१७॥

अर्थ— वाणी, पराक्रम, शक्ति, शरीर व्यापार, तत्व ज्ञान, शिल्पादिज्ञान, आदि शब्दानें स्मृत्यादिक हीं ज्याचीं मनुष्याशरिरवी नसतात, वज्याचा उन्मत्त होण्याचा काल बांधलेला असतो, अशा उन्मादाला भूतजउन्माद म्हणावें, भूत शब्दानें पुढें सांगतो त्या देवना समजाव्या,

## देवग्रहाचें लक्षण.

संतुष्टः शुचिरतिदिव्यमाल्यगंधो निस्तंद्रिस्त्ववि
तथसंस्कृतप्रभाषी॥तेजस्वीस्थिरनयनोवरप्रदा

ताब्रह्मण्योभवतिनरःसदेवजुष्टः॥१८॥ ॥

अर्थ— सर्व काळ संतोष पावलेला, पवित्र, आंगाला दिव्य पुष्पा सारखा सुवास, डोळ्यांवरची झोपउडालेली आहे, सत्य व संस्कृत बोलणारा, तेजस्वी, स्थिर दृष्टि, वरदाता, (तुझें कल्याण होईल असा वर देतो) ब्राह्मणावर प्रीति करणारा, असाजो मनुष्य होतो तो देवग्रह- पीडित जाणावा, देवशब्दानें गणमातृकादिक घ्यावे,

## असुरपीडित लक्षण.

संस्वेदीद्विजगुरुदेवदोषवक्ताजिह्माक्षोविगतभ-
योविमार्गदृष्टिः॥ संतुष्टोनभवतिचान्नपानजातैर्दु
ष्टात्माभवतिसदेवशत्रुजुष्टः॥१९॥

अर्थ— घामाघुम झालेला, ब्राह्मण, गुरु, आणि देव यांजवर दोष- ठेवणारा, वक्रदृष्टीनें पाहाणारा, निर्भय, वेदविरुद्ध मार्गावर लक्ष्य ठेवणारा, आणि पुष्कळ अन्न पाणी दिलें तरी संतोष न पावणारा, आणि दुष्ट बुद्धि असाजो मनुष्य होतो, तो दैत्यग्रह पीडित झाला ह्मणून समजावा,

## गंधर्वग्रहलक्षण.

हृष्टात्मापुलिनवनांतरोपसेवीस्वाचारःप्रियपरि
गीतगंधमाल्यः॥ नृत्यन्वैप्रहसतिचारुचाल्पश-
ब्दंगंधर्वग्रहपरिपीडितोमनुष्यः॥२०॥

अर्थ— गंधर्व ग्रहानें पिडलेला मनुष्य, हर्षयुक्त मनाचा, वाळवंट आणि बागबगीचे ह्यांत राहाणारा, निंद्य आचार करणारा, गायन गंध आणि पुष्प हीं ज्यास आवडतात, तो नाचतो, सुंदर व थोडें बोलून हंसतो,

## यक्षग्रहलक्षण.

ताम्राक्षःप्रियतनुरक्तवस्त्रधारीगंभीरोद्रुतगतिर
ल्पवाक्सहिष्णुः॥ तेजस्वीवदतिचकिंददामिकस्मै
योयक्षग्रहपरिपीडितोमनुष्यः॥२१॥

अर्थ— यक्षग्रहानें पिडलेला मनुष्य, डोळे लाल झालेले ला, सुंदर बारीक असें रक्तवस्त्र नेसणारा, गंभीर, धीमान्, लवकर चालणारा, मित भाषण करणारा, सहनशील, तेजःपुंज आणि कोणाला काय देऊं असें बोलणारा, असा असतो.

## पितृग्रहलक्षण.

प्रेतानांसदिशतिसंस्तरेषुपिंडान्शांतात्माजलम
पिचापसव्यवस्त्रः॥ मांसेप्सुस्तिलगुडपायसाभि
कामस्तद्भक्तोभवतिपितृग्रहाभिजुष्टः॥२२॥

अर्थ—पितृग्रह सेवित पुरुष दर्भावर प्रेतांस (पितरांस) पिंड देतो, शांतिष्ट होतो, आणि उत्तरीय वस्त्र अपसव्य करून तर्पण ही करितो, त्याला मांस खाण्याची इच्छा होते. तीळ, गूळ, खीर ह्यांवर वांछा जाते, (हें सांगण्याचें प्रयोजन असें आहे कीं, ज्याची ज्या पदार्थावर इच्छा होईल त्याला त्या पदार्थाचा बळि द्यावा, याप्रमाणेंच अन्य ठिकाणीं समजावें,) आणि तो मनुष्य पितरांची भक्ति करितो.

## सर्पग्रहजुष्टलक्षण.

यस्तूर्व्यांप्रसरतिसर्पवत्कदाचित्सृक्किण्योविलि
हतिजिह्वयातथैव॥ क्रोधालुर्मधुगुडदुग्धपाय
सेप्सुर्विज्ञेयोभवतिभुजंगमेनजुष्टः॥२३॥

अर्थ— जो मनुष्य सर्पा प्रमाणें भुईवर पसरतो ह्मणजे उरानें चालतो, व सर्पा प्रमाणेंच आपले ओष्ठ प्रांत जिभेने चाटतो, रागीट असतो, व गूळ, मध, दूध, आणि खीर हीं खाण्याची वांछा करितो. तो सर्प ग्रहानें सेवित झाला आहे ह्मणून समजावा.

राक्षसग्रहपीडितलक्ष०

मांसासृग्विविधसुराविकारलिप्सुर्निर्लज्जोभृशम
तिनिष्ठुरोतिशूरः॥ क्रोधालुर्विपुलबलोनिशाविहा
रीशौचाद्विट्भवतिसराक्षसैर्गृहीतः॥२४॥

अर्थ—जो मनुष्य मांस, रक्त, नाना प्रकारचीं मद्यें ह्यांची वांच्छा करितो, आणि निर्लज्ज अति निष्ठुर, अत्यंत शूर, रागीट, मोठा बलाढ्य, रात्रीस फिरणारा, शचिर्भूतपणास कंटाळणारा, असा होतो, तो राक्षसानीं घेरला आहे असें समजावें.

पिशाचजुष्टलक्षण.

उद्धस्तः कृशपरुषश्चिरप्रलापीदुर्गंधोभृशमशुचि
स्तथातिलोलः॥ बव्हाशीविजनवनांतरोपसेवीव्या
चेष्टन्भ्रमतिरुदन्पिशाचजुष्टः॥२५॥

अर्थ—जो आपले हात वर करितो "उद्ध्वस्त असा पाठ असला तर" नग्न, रोड झालेला निस्तेज, चिरकाल बडबड करणारा, ज्याच्या आंगाची दुर्गंधि येत्ये, अत्यंत अमंगल, तसाच अत्यंत लोल ह्मणजे सर्व अन्नपानाविषयीं धादांतलेला, खायाला बसला तर पुष्कळ खाणारा, एकांत वनांत राहण्यास इच्छिणारा, विरूद्ध चेष्टा करणारा, रडत फिरणारा, तो पिशाच जुष्ट जाणावा, हिंसा, व क्रीडा व सत्कार करून घेणें अशा तीन कारणानीं ग्रह धरतात, त्यांतहिं

सा करण्या साठीं जो धरलाजातो तो साध्य होत नाहीं.

## त्याचें लक्षण.

स्थूलाक्षोद्रुतमटनः सफेनलेही निद्रालुः पततिच कंपतेनचयोति॥ यश्चाद्रिद्विरदनगादिविच्युतः स्या त्सोसाध्यो भवतितथात्रयोदशेब्दे॥२८॥ ॥

अर्थ—डोळे वासलेला, शीघ्र चालणारा, तोंडांत फेस आलेला, चाटणारा, झोंपाळु, व जो पडतो, व कांपतो, आणि जो पर्वत, हत्ती, आणि झाड, या पासून पडल्या मुळें ग्रहाच्या झपाट्यांत सांपडतो तो असाध्य होतो, तसाच जो तेराव्या वर्षीं होतो तो असाध्य जाणावा.

## देवादिग्रहांचा ग्रहणकाल.

देवग्रहाः पौर्णमास्यामसुराः संध्ययोरपि॥ गंधर्वाः प्रायशोष्टम्यां यक्षाश्च प्रतिपद्यथ॥ पितृग्रहास्तथा दर्शे पंचम्यामपिचोरगाः॥ रक्षांसि रात्रौ पैशाचा श्चतुर्दश्यां विशंति हि॥२९॥

अर्थ— देवग्रह पौर्णिमेला, असुरग्रह सकाळीं आणि संध्याकाळीं, गंधर्वग्रह बहुत करून अष्टमीला, यक्षग्रह प्रतिपदेला, पितृग्रह अमावास्येला; सर्पग्रह पंचमीला; राक्षस रात्रीस; आणि पिशाच चतुर्दशीस मनुष्यांनां पछाडतात, तिथी सांगण्याचें कारण असें कीं, त्या त्या तिथीला तो तो ग्रह आंगास येतो. त्यावरून तो ओळखावा, व त्या त्या तिथीला त्या त्या ग्रहाच्याशांत्यर्थ बलिदान करावें.

## ॥ शरीरामध्यें ग्रहाचा आवेश होतो तो कां दिसत नाहीं याचें कारण.

दर्पणादीन्यथा छायाशीतोष्णंप्राणिनोयथा॥स्व मणिंभास्करांशश्चयथादेहंचदेहधृक्॥ विशंति नच दृश्यंतेग्रहास्तद्वच्छरीरिणाम्॥ २९॥ ॥इति भूतोन्मादनिदानम्॥

अर्थ— आरशांत जसें प्रतिबिंबशिरतें, जसें शीतोष्ण प्राण्यास लागतें, अथवा जसा सूर्य किरण सूर्यकांत मण्यांत शिरतो, अथवा जीव जसा देहांत शिरतो, तसेच ग्रह प्राण्यांच्या शरीरांतशिरतात परंतु दिसत नाहींत.

मधुकोशंकनिर्मथ्यसारमाकृष्यवैमया॥ व्याख्याकृतामहाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥

---

## अपस्मारनिदान.

### अपस्माराचें सामान्य लक्षण.

तमःप्रवेशःसंरंभोदोषोद्रेकहृतस्मृतिः॥अपस्मा रइतिज्ञेयोगदोघोरश्चतुर्विधः॥१॥

अर्थ— आंधारांत शिरल्या सारिखें होणें, डोळे वेडे वांकडे फिरविणें, दोषांच्या उद्रेकानें ज्ञान नष्ट होणें हीं लक्षणें ज्या रोगांत होतात असा हा भयंकर अपस्माररोग चार प्रकारचा आहे, त्याला लोकांत फेंपरें, मिरगी, घुरं, असें ह्मणतात.

### पूर्वरूप.

हृत्कंपःशून्यतास्वेदोध्यानंमूर्छाप्रमूढता॥ निद्रानाशश्चतस्मिंस्तु भविष्यतिभवंत्यथ॥२॥

अर्थ— तो अपस्मार व्हावयाचा असला ह्मणजे हृदय कांपतें,-

आणि शून्य पडलें (ह्मणजे कांहीं सुचत नाहीं) चिंता, मूर्छा, प्रमूढता, ह्मणजे इंद्रियमोह, आणि निद्रानाश हीं लक्षणें होतात.

## वातजअपस्मार.

कंपते प्रदशेद्दंतान् फेनोद्वामी श्वसत्यपि ॥ परुषारुणकृष्णानि पश्येद्रूपाणि चानिलात् ॥ ३ ॥

अर्थ— वायूचा अपस्मारानें रोगी कांपतो, दांत खातो, त्याच्या तोंडातून फेस निघतो, व श्वास लागतो, आणि कर्कश, अरुण वर्ण, आणि कृष्ण वर्ण अशीं प्राण्यांची रूपें पाहातो, ह्मणजे कोणी नील वर्णाचा पुरुष मज कडे धांवत येतो आहे, या प्रमाणें पैत्तिकामध्यें पिंवळा पुरुष धांवत येतो आहे, आणि श्लेष्मिका मध्यें शुक्ल पुरुष मज कडे धांवत येतो आहे असें वाटतें.

## पैत्तिक अपस्मार लक्षण.

पीतफेनांगवक्त्राक्षः पीतासृग्रूपदर्शनः ॥ सतृष्णोष्णानलव्याप्तलोकदर्शी च पैत्तिकः ॥ ४ ॥

अर्थ— पैत्तिक अपस्माऱ्याचे फेस, आंग, तोंड आणि डोळे हे पिंवळे होतात, तो पिंवळें आणि तांबडें असें रूप पाहातो, तृषायुक्त व उष्ण असून अग्नीनें व्याप्त झालेलें असें जगत पाहातो.

## श्लैष्मिकअपस्मार.

शुक्लफेनांगवक्त्राक्षः शीतो हृष्टांगजो गुरुः ॥ पश्यन् शुक्लानि रूपाणि मुच्यते श्लैष्मिकश्चिरात् ॥ ५ ॥

अर्थ— कफज अपस्माऱ्याचे डोळे, फेस, अंग, तोंड, हे पांढरे होतात; अंग गार असतें, अंगावर रोमांच उभे राहतात, जड होतो, आणि पांढरे पदार्थ पाहतो, हा अपस्मार फार वेळानें सोडतो, यावरून-

वात पित्तचेअपस्माराची लवकर सुटकाहोत्ये हें सूचविलें.

## सान्निपातिक अपस्मार.

सर्वैरेतैःसमस्तैश्चलिंगैर्ज्ञेयस्त्रिदोषजः॥अपस्मा
रःसचासाध्योयःक्षीणस्याऽनवश्चयः॥६॥ ॥

अर्थ— वर सांगीतलेलीं सर्व लक्षणें झालीं ह्मणजे त्रिदोषज अपस्मार जाणावा, हा असाध्य आहे, व जो क्षीण पुरुषाला होतो तो व जीर्ण झालेला ही असाध्य होतो.

## असाध्य लक्षण.

प्रतिस्फुरंतंबहुशःक्षीणंप्रचलितभ्रुवं॥नेत्राभ्यां-
चविकुर्वाणमपस्मारोविनाशयेत्॥७॥

अर्थ— वारंवार कंप युक्त होणारा, क्षीण झालेला, भ्रुकुटी चाळविणारा, आणि डोळे वेडे वांकडे करणारा असा अपस्मारी जगत नाहीं.

## अपस्माराचीपाळी.

पक्षाद्वाद्वादशाहाद्वामासाद्वाकुपितामलाः॥अप
स्मारायकुर्वंतिवेगंकिंचिदथोत्तरम्॥८॥

अर्थ— कुपित झालेले दोष पंधरा दिवसानीं किंवा बारा दिवसानीं, वा महिन्यानें मिरगी आणिताल, त्यांत पैत्तिक १५ दिवसानीं, वातिक १२ दि० आणि श्लेष्मिक ३० दिवसानी येते, येथें द्वादशाहानंतर पक्ष सांगावा, असें असतां पहिल्यानें पक्ष सांगीतला तेणें करून अधिक-काळानेही दोष वेग करितात, हें सांगितलें "किंचिदथोत्तरं" या पदानीं सूचविलें कीं, उक्त काळा पूर्वी देखील दोषांच्या तारतम्यानें वेग होतात असें जाणावें, या वर कोणी आक्षेप घेईल कीं, वेगउत्पन्न करून अपस्माराचे आरंभक दोष तर शरीरांत सर्व काळ अस

तो, मग तो सर्वकाळ वेग कां करीत नाहीं द्वादशादि दिवसाचे ठा ईच कां करितो, याविषयीं दृष्टांतरूप समाधान सांगतो.

देवेवर्षत्यपियथाभूमौबीजानिकानिचित्॥शर-
दिप्रतिरोहंतितथाव्याधिसमुच्छ्रयः॥९॥ ॥इ-
त्यपस्मारनिदानम्॥

अर्थ— जसें पाऊस पडत असतां जमिनींत पेरलेलें कांहीं बीज शरत्काळीं उगवतें, तसा हा व्याधि त्या त्या काळींच उद्भवतो, ह्मणजे असें आहे कीं, बीजाला अंकुर फुटण्यास तेज, वायु, पृथिवी, उदक, हींस हाय्य असून तें कालविशेषाची प्रतीक्षा करितें, अंकुर येण्यास काळही सहाय्य पाहिजे, ह्मणजे ज्या काळीं ज्याबीजास अंकुर यावया चा त्याच काळीं येईल, मध्यें येणार नाहीं, चातुर्थिक ज्वरादिकाचे ठाईं देखील हाच न्याय जाणावा. इतिअपस्मारनिदान॥ ॥

मधुकोशंसुनिर्मथ्यसारमाकृष्यदेमया॥ व्याख्याकृ
तामहाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥ ॥

---

## वातव्याधिनिदान.

रूक्षशीताल्पलघ्वन्नव्यवायातिप्रजागरैः॥वि-
षमादुपचाराच्चदोषासृक्स्रावणादपि॥१॥लं-
घनप्लवनात्यध्वव्यायामातिविचेष्टनैः॥धातू-
नांसंक्षयाच्चिंताशोकरोगातिकर्षणात्॥२॥वे-
गसंधारणादामादभिघातादभोजनात्॥मर्म-
बाधाद्गजोष्ट्राश्वशीघ्रयानादिसेवनात्॥३॥
देहेस्रोतांसिरिक्तानिपूरयित्वानिलोबली॥-

करोतिविविधान्व्याधीन्सर्वांगैकांगसंश्रयान्॥४॥

अर्थ— रुक्ष, शीत, अल्पप्रमाण आणि लघु असें अन्न भक्षण केल्यानें; अति मैथुनानें, अत्यंत जागरण केल्यानें; विषम उपचार केल्यानें दोष (कफ, पित्त, मल, मूत्र इ०) आणि रक्त यांचा स्राव केल्यापासून एकादा खाडा वगैरे उडी मारून ओलांडल्यानें, नदींत वगैरे पोहण्यानें, अति मार्गक्रम केल्यानें, अत्यंत आयास केल्यानें, अत्यंत विरुद्ध चेष्टा (उड्या वगैरे) केल्यानें, रस रक्तादि धातूंचा क्षय झाल्यामुळें, काळजीमुळें, शोक वगैरे त्यानीं कृशत्व आल्यामुळें, मलमूत्रादिकांचा वेगरोध केल्यामुळें, आमामुळें*, काष्ठादिकांचा अभिघात झाल्यामुळें, उपवास केल्यानें, हृदयादि मर्मांचे ठाईं अभिघात झाल्यामुळें, हत्ती, उंट, घोडे, इत्यादि शीघ्र यानावर बसण्यानें, कुपित झालेला बलवान वायु देहांतील रिकामीं स्रोतसें भरून सर्वांग किंवा एकांग व्यापणारे असे नाना तऱ्हेचे व्याधी उत्पन्न करितो.

## पूर्वरूप.

अव्यक्तंलक्षणंतेषांपूर्वरूपमितिस्मृतं॥आत्मरूपं
तुतद्व्यक्तमपायोलघुतापुनः॥५॥

अर्थ— त्या वक्ष्यमाण वात व्याधीचें जें अस्पष्ट लक्षण त्याला च पूर्वरूप असें म्हटलें आहे, तें ज्वरादिकां प्रमाणें विशिष्ट नाहीं, आणि जें रूप व्यक्त होतें म्हणजे दोषादि भेदें करून चांगलें दिसण्यांत येतें, तेंच त्यांचें लक्षण होय. अपाय म्हणजे वायूचा चंचलत्वामुळें स्तंभ संकोच कंपादिकांचा कदाचित् अभाव होतो, आणि लघुता शरीराची ती वायूनें धातूंचें शोषण केल्यामुळें, अथवा आपाय लघुता म्हणजे सर्व वात विकारांचा अपाय म्ह० अभाव होतो, आणि-

* वायूच्या मार्गाचें आवरण करण्याच्या द्वारें आमाला कारणत्व आहे स्वरूपतः नाहीं.

वात विकारांची लघुता ह्मणजे अल्पत्वें करून स्थिति निःशेष निवृत्ति होत नाहीं.

आतां नाना प्रकारचे व्याधि करतो ह्मणून जें सांगितलें तें व्याधि पुढील श्लोकांत सांगतो—

संकोचः पर्वणां स्तंभो भंगोस्थ्नांपर्वणामपि॥ लो महर्षः प्रलापश्च पाणि पृष्ठशिरोग्रहः॥ ६॥ खांज्य पांगुल्यकुब्जत्वंशोथोंगानामनिद्रता॥ गर्भशुक्ररजोनाशः स्पंदनं गात्रसुप्तता॥ ७॥ शिरोनासाक्षिजत्रूणांग्रीवायाश्चापिहुंडनम्॥ भेदस्तोदोर्तिराक्षेपोमोहश्चायास एवच॥ ८॥ एवंविधानिरूपाणि करोतिकुपितोनिलः॥ हेतुस्थानविशेषाच्चभवेद्रोगविशेषकृत्॥ ९॥

अर्थ— संधीचा संकोच आणि स्तंभ, अस्थींचा आणि संधींचा भंग, ह्मणजे फुटल्यासारखी पीडा, रोमांच, असंबद्ध भाषण, हात, पाय, आणि डोकें, ह्यांचा ग्रह ह्मणजे जखडणें, खंजत्व, पांगळेपणा, कुबडेपणा, आंगालासूज, निद्रानाश, गर्भधारण न होणें, शुक्र आणि रजस्त्रीचें आर्तव, ह्यांचा नाश, कंप, अंगाला मेहेरी, मस्तक, नासिका, डोळे, जत्रू आणि मान हीं आंत जाणें किंवा वांकडी होणें, भेद ह्मणजे टोचल्याप्रमाणें पीडा, शूल, आक्षेप, मोह, श्रम, कुपित झालेला वायु याप्रमाणें लक्षणें करितो, तो हेतु आणि स्थान यांच्या भेदानें विशिष्ट रोग उत्पन्न करणारा होतो. जसें— कफानें आवृत झाला ह्मणजे मन्यास्तंभ करणारा होतो, पक्वाशयांत असला ह्मणजे अंत्रकूजनादि करितो.

आतां त्याचेंच विवरण करितो.

### कोष्ठाश्रितवायूचें कार्य.

तत्र कोष्ठाश्रिते दुष्टे निग्रहो मूत्रवर्चसोः॥ वर्ध्महृ
द्रोगगुल्मार्शःपार्श्वशूलं च मारुते॥१०॥

अर्थ— कोष्ठाश्रित वायू दुष्ट झाला असतां मळ, मूत्राचा अवरोध होतो, वृषणरोग, हृद्रोग, गुल्म, मुळव्याध, आणि पार्श्व शूळ, हे रोग उत्पन्न करितो.

### सर्वांगकुपितवायूचें कार्य.

सर्वांगकुपिते वाते गात्रस्फुरणजृंभणम्॥ वेदना-
भिःपरीतास्य स्फुटंती वास्य संधयः॥ ११॥

अर्थ— वायु सर्वांग कुपित झाला असतां अंग फुरफुरणें, जांभया आणि सांधे, वेदनेनें व्याप्त असून फुटतातच काय असे होतात.

### गुदस्थितवायूचें कार्य.

ग्रहो विण्मूत्रवातानां शूलाध्मानाश्मशर्कराः॥ जंघो
रुत्रिकहृत्पृष्ठरोगशोषो गुदे स्थिते॥१२॥

अर्थ— वायु गुदें स्थित असतां मळ, मूत्र, आणि अपान वायु, यांचा अवरोध, शूळ, आध्मान, मुतखडा, शर्करा, (मुता बरोबर खडे पडणें) जांघा, मांड्या, त्रिक, हृदय, आणि पृष्ठ यांस पीडा, आणि सूज हे रोग होतात.

### आमाशयस्थितवायूचें कार्य.

रुक्पार्श्वोदरहृन्नाभेस्तृष्णोद्गारविषूचिकाः॥ का

\+ येथें गुद शब्दानें उत्तरगुद ह्मणजे पक्वाशय समजावा, नुसतें गुद नव्हे. नुसतें गुदच ह्मटलें तर अश्मरी कर्तृत्व येणार नाहीं.

सः कंठास्यशोषश्च श्वासश्चामाशयेस्थिते॥१३॥

अर्थ— वायू आमाशयांत राहिला असतां पार्श्व, उदर, ह्रदय, आणि नाभी यांस पीडा होते, तृषा, ढेंकर, आणि विषूचिका (तोंडा वाटे व गुदा वाटे आमाच्या ची प्रवृत्ति,) खोकला, घसा, तोंड, ह्यांना कोरड, आणि श्वास हे होतात.

पक्वाशयस्थवायूचें कार्य.

पक्वाशयस्थोंत्रकूजं शूलाटोपौ करोतिच॥ मूत्रकृच्छ्रपुरीषत्वमानाहंत्रिकवेदनाम्॥१४॥

अर्थ— वायु पक्वाशयस्थ असला म्हणजे अंत्रकूजन (आंतड्यांत कर कर वाजणें,) शूळ, आटोप, (गुडगुडा शब्द) मळमूत्र कष्टानें होणें, पोट फुगणें आणि त्रिकाचे ठाई वेदना, हीं करितो.

श्रोत्रादिइंद्रियस्थित वायूचें कार्य.

श्रोत्रादिष्विंद्रियवधं कुर्यात्क्रुद्धः समीरणः॥

अर्थ— श्रोत्रादिक इंद्रियांचे ठाई राहिलेला कुपित वायु त्या त्या इंद्रियांचा नाश करितो.

रसधातुगत वायूचें लक्षण.

त्वग्रूक्षास्फुटितासुप्ताकृशाकृष्णाच तुद्यते॥ आतन्यते सरागाच पर्वरुक्त्वग्गतेऽनिले॥१५॥

अर्थ— वायु त्वग्गत म्हणजे धातुरूप रसाचे प्रत गेला असतां, त्वचा रूक्ष, फुटलेली, बधिरलेली, कर्कश आणि काळी होऊन तिला टोंचल्या प्रमाणें पीडा होते, वती ताणली जाते, व किंचित तांबूस होते, आणि ह्रदयादि मर्मास पीडा होते.

रक्तगत वायूचें लक्षण.

रुजस्तीव्राः ससंतापा वैवर्ण्यं कृशतारुचिः॥ गात्रे-
चारूंषि भुक्तस्य स्तंभश्चासृग्गतेनिले॥१६॥

अर्थ— वायु रक्तमिश्रित झाला असतां संतापयुक्त तीव्र वेदना होतात, विवर्णत्व, कृशता, अरुचि आणि आंगावर खवंदें, आणि जेवल्यावर अंगताठणें, हीं लक्षणें होतात.

### मांसमेदोगतवायूचें ल०

गुर्वंगंतुद्यतेस्तब्धंदंडमुष्टिहतंयथा॥ सरुक्श्रमि
तमत्यर्थंमांसमेदोगतेऽनिले॥१७॥

अर्थ— मांस आणि मेद यांप्रत वायु गेले असतां अंग जड, टोंचल्यासारखें, ताठ, व काठीनें किंवा बुकीनें मारावें तसें दुखनें, अत्यंत श्रमित ह्मणजे हात लावला असतां सोसवत नाहीं.

### मज्जास्थिगतवायूचें ल०

भेदोस्थिपर्वणांसंधिशूलंमांसबलक्षयः॥ अस्व
प्नःसंततारुक्चमज्जास्थिकुपितेनिले॥१८॥

अर्थ— मज्जा, आणि अस्थि यांच्या ठिकाणीं वायूचा कोप झाला असतां हाडांचीं पेरीं फुटतात, संधि दुखतात, मांस आणि बळ, हीं क्षीण होतात, झोंप येत नाहीं, सर्वकाळ ठणका लागतो.

### शुक्रगतवायूचें लक्षण.

क्षिप्रंमुंचतिबध्नातिशुक्रंगर्भमथापिवा॥ विकृतिं
जनयेच्चापिशुक्रस्थःकुपितोनिलः॥१९॥

अर्थ— शुक्रस्थानीं वायूचा कोप झाला असतां तो वायु शुक्र लवकर सोडतो, बांधतो, अथवा गर्भ सोडतो बांधतो, आणि गर्भाला किंवा शुक्राला विकार करितो.

### शिरागत वायूचें लक्षण.

कुर्याच्छिरागतः शूलं शिराकुंचनपूरणं॥ स बाह्या
भ्यंतरायामं खल्लीं कुब्जत्वमेव च॥ २०॥

अर्थ— वायु शिरागत झाला ह्मणजे शूळ, शिरांचा संकोच, व स्थूलत्व करतो, आणि बाह्यायाम, अभ्यंतरायाम, खल्ली, आणि कुब्जत्व, हे रोग करितो.

### स्नायुगत आणि संधिगत वायूचें लक्षण.

सर्वांगैकांगरोगांश्च कुर्यात्स्नायुगतोनिलः॥ हंति
संधिगतः संधीन् शूलशोथौ करोति च॥ २१॥

अर्थ— वायु स्नायुगत झाला असतां सर्वांग आणि एकांग रोग करितो, — संधिगत झाला असतां संधीचा विश्लेष व स्तंभ आणि शूल व सूज उत्पन्न करितो.

### पित्त आणि कफ ह्यांनीं आवृत झालेले प्राणादिक वायूचीं अर्ध्या अर्ध्या श्लोकानें लक्षणें सांगतो.

प्राणे पित्तावृते छर्दिर्दाहश्चैवोपजायते॥ दौर्बल्यं
सदनं तंद्रा वैरस्यं च कफावृते॥ २२॥ उदाने पित्तयु
क्ते तु दाहो मूर्छा भ्रमः क्लमः॥ अस्वेदहर्षौ मंदाग्निः
शीतता च कफावृते॥ २३॥ स्वेददाहौष्ण्यमूर्छाः स्युः
समाने पित्तसंयुते॥ कफेन संगो विण्मूत्रे गात्रहर्ष
श्च जायते॥ २४॥ अपाने पित्तयुक्ते तु दाहौष्ण्यं रक्त
मूत्रता॥ अधः काये गुरुत्वं च शीतता च कफावृते॥ २५

व्यानेपित्तावृतेदाहोगात्रविक्षेपणंक्लमः॥स्तंभ
नोदंडकश्चापिशोथशूलौकफावृते॥२६॥ ॥

अर्थ— प्राणवायु पित्तानें आवृत झालाअसतां वांति आणि दाह उत्पन्न होतो, आणि कफावृत झालाअसतां, दुर्बलपणा, ग्लानि, तंद्रा, आणि मुखविरसता, हीं होतात.

उदानवायु— पित्तावृत झाला असतां दाह, मूर्छा, भ्रम, आणि अनायास श्रम, हे होतात, — तोच कफावृत झालाअसतां घाम येत नाहीं, आंगाला कांटायेतो, अग्निमंद होतो, आणि थंडी वाजते.

समानवायु— पित्तयुक्त झाला असतां स्वेद, दाह, उष्णता, आणि मूर्छा, ह्या होतात, — आणि कफानें आवृत झाला असतां मळमूत्राचा रोध, आणि रोमांच होतो.

अपान वायु—पित्तव्याप्त झालाअसतां, दाह, ऊष्णता, मूत्राला आरक्तपणा ही होतात, — आणि कफावृत झाला असतां कमरेपासून खालीं जडत्व, आणि शीतलाई येते.

व्यानवायु— पित्तावृत झालाअसतां दाह, गात्रांचा विक्षेप, ह्मणजे इकडे तिकडे करणें, आणि श्रम होतो, —आणि कफावृत झाला असतां शरीर काठी प्रमाणें ताठतें, शोथ, आणि शूळ, होतात.

## आक्षेपकाचें सामान्य लक्षण.

यदातुधमनीःसर्वाःकुपितोभ्येतिमारुतः॥तदा
क्षिपत्याशुमुहुर्मुहुर्देहंमुहुश्चरः॥मुहुर्मुहुस्तदा
क्षेपादाक्षेपकइतिस्मृतः॥२७॥ ॥

अर्थ— जेव्हां वायु कुपित होऊन सर्व धमनी प्रत प्राप्त होतो, तेव्हां तो वारंवार संचार करून देहाला वारंवार आक्षिप्त करितो. ह्मण-

जे हत्तीवर बसलेल्या पुरुषा प्रमाणें सर्वगात्र चाळवितो, तो वारंवार शरीराचा आक्षेप करितो ह्मणून त्या रोगाला आक्षेपक असें ह्मटलें आहे.

आक्षेपकाचेच अपतंत्रक आणि अपतानकअसेदोनअवस्थाविशेषसांगतो.

क्रुद्धःस्वैःकोपनैर्वायुःस्थानादूर्ध्वंप्रवर्तते॥पीडयन्हृदयंगत्वाशिरःशंखौचपीडयेत्॥२८॥धनुर्वन्नामयेद्गात्राण्याक्षिपेन्मोहयेत्तथा॥सकृच्छ्रादुच्छ्वसेच्चापिस्तब्धाक्षोथनिमीलकः॥२९॥कपोतइवकूजेच्चनिःसंज्ञःसोपतंत्रकः॥दृष्टिंसंस्तभ्यसंज्ञांचहत्वाकंठेनकूजति॥३०॥हृदिमुक्तेनरःस्वास्थ्यंयातिमोहंवृतेपुनः॥वायुनादारुणंप्राहुरेकेतमपतानकम्॥३१॥

अर्थ— रूक्षादि स्वकारणानीं कुपित झालेला वायु स्वस्थान सोडून वर येतो, आणि हृदयांत जाऊन तेथें पीडा करून मस्तक आणि शंख त्यांस पीडा करितो, आणि गात्रें धनुष्या प्रमाणें नमवितो, आणि चाळवितो, व मूर्छित करितो, तो रोगी मोठ्या कष्टानें उच्छ्वास टाकितो, डोळे ताठतात, किंवा झांकतात, रोगी पारव्या सारखा घुमतो, व बेशुद्ध पडतो, त्या रोगाला अपतंत्रक ह्मणतात, दृष्टि ताठून संज्ञानाश होऊन गळा घुरघुरतो, वायूनें हृदय सोडलें असतां रोग्यास समाधान वाटतें, वायूनें हृदय व्याप्त झालें ह्मणजे पुनः मोह पावतो, त्या भयंकर रोगाला कोणी अपतानक ह्मणतात.

## दंडापतानक, अंतरायाम, बहिराया म आणि अभिघात या भेदेंकरून आ क्षेपक चार प्रकारचा होतो त्याचीं लक्ष०

### दंडापतानक.

कफान्वितो भृशं वायुस्तास्वेव यदि तिष्ठति॥ स दंड वत्स्तंभयति कृच्छ्रो दंडापतानकः॥ ३२॥

अर्थ— वायु अत्यंत कफयुक्त होऊन त्या सर्व धमनीमध्यें जर राही ल तर तो सर्व शरीर दंडाप्रमाणें स्तब्ध करील, हा दंडापतानक क ष्टसाध्य होय.

### अंतरायाम आणि बहिरायाम- यांचें साधारण रूप सांगतो.

धनुस्तुल्यं नमेद्यस्तु स धनुस्तंभ संज्ञितः॥ ॥

अर्थ— जो वायु धनुष्याप्रमाणें शरीर वांकवितो त्याला धनुस्तंभ संज्ञा दिली आहे.

### अंतरायामलक्षण.

अंगुलीगुल्फजठरहृद्वक्षोगलसंश्रितः॥ स्नायु प्रतानमनिलो यदाक्षिपति वेगवान्॥ ३३॥ विष्ट ब्धाक्षस्तब्धहनुर्भग्नपार्श्वः कफं वमन्॥ अभ्यं तरं धनुरिव यदा नमति मानवः॥ ३४॥ तदा सो भ्यंतरायामं कुरुते मारुतो बली॥ ३५॥ ॥

अर्थ— अंगुल्या, घोटे, पोट, हृदय, उरःस्थल, आणि गळा या ठिका णीं राहिलेला वायु वेगवान् होऊन जेव्हां स्नायुजाल ओढतो, ते व्हां डो के ताठतात, हनुवटी जखडते, आणि पार्श्वभाग मोडतात, आणि तों-

डावाटे कफ पडतो, वज्या वेळेस मनुष्य धनुष्या प्रमाणें आंतून ह्मणजे पोटा कडून नमतो, तेव्हां तो बलाढ्य वायु **अंतरायाम** करितो.

## बाह्यायाम लक्षण.

**बाह्य स्नायुप्रतानस्थो बाह्यायामं करोतिच॥ त-**
**मसाध्यंबुधाःप्राहुर्वक्षःकट्यूरुभंजनम्॥३६॥**

अर्थ— बाहेरल्या स्नायूंच्या तंतूंत राहिलेला वायु **बाह्यायाम** (ह्मणजे पाठी कडून वांकविणें.) करितो; उर; स्थळ, कंबर, आणि मांड्या ह्यांस मोडणारा, अशा ह्या रोगास पंडित लोक असाध्य ह्मणतात.

## वरसांगितलेल्या आक्षेपकादि कांस पित्त कफानुबंध होतो तें सांग.

**कफपित्तान्वितोवायुर्वायुरेवचकेवलः॥ कुर्यादा-**
**क्षेपकंत्वन्यंचतुर्थमभिघातजम्॥३७॥**

अर्थ— कफ पित्तानीं युक्त झालेला वायु किंवा केवळ वायु आक्षेपक रोग करितो, व दुसरा ह्मणजे दंडापतानकादि त्या पेक्षां चवथा अभिघातज आक्षेपक रोग करितो, त्याचें लक्षण "यदातु धमनीः सर्वा" इत्यादि उक्त सामान्य लक्षणावरून जाणावें, ह्या श्लोकाचा गदाधर असा अर्थ करितात कीं, कफपित्तान्वित इत्यादि निमित्त भेदानें चार प्रकारचा आक्षेपक होतो, तो असा, एक कफान्वित वायूनें, दुसरा पित्तान्वित वायूनें, तिसरा केवळ वायूनें आणि चवथा दंडाद्यभिघात कुपित वायूनें, त्यापक्षीं गर्भपात आणि रक्ताचा अतिस्राव यां पासून झालेले केवळ वातजन्य जाणावे, आणि त्यांचे ठाईं चार चार आक्षेपणाही होतें ह्मणून समजावें, कारण ते आक्षेपकाचे भेद आहेत.

## असाध्यत्वसांगतो.

गर्भपातनिमित्तश्चशोणितातिस्रवाच्चयः॥आभि
घातनिमित्तश्चनसिध्यत्यपतानकः॥३८॥ ॥

अर्थ— गर्भ पातामुळें झालेला, अथवा अतिरक्त स्रावापासून झालेला, किंवा अभिघात ह्मणजे दंडादिकांचा तडाखा लागून झालेला, अपतानक रोग साध्य होत नाहीं.

## पक्षवधसांगतो.

गृहीत्वार्धंतनोर्वायुःशिरास्नायूर्विशोष्यच॥पक्ष
मन्यतरंहंतिसंधिबंधान्विमोक्षयन्॥३९॥ कृत्स्नो
र्धकायस्तस्यस्यादकर्मण्योविचेतनः॥एकांगरोगं
तंकेचिदन्येपक्षवधंविदुः॥४०॥

अर्थ— वायु देहाचा अर्धा भाग घेऊन शिरा आणि स्नायू त्यांनां शोषून उजवा किंवा डावा पक्ष ह्मणजे अर्धनारीनटेश्वरा प्रमाणें निष्कार्य करितो, आणि संधीचीं बंधनें शिथिल करितो, मग त्या रोग्याचें सर्व अर्धें अंग अकर्मण्य ह्मणजे अगदीं हालेना चालेना सें होतें, व त्याला यत् किंचित् देखील स्पर्शादि ज्ञान राहात नाहीं, त्याला कोणी एकांगरोग ह्मणतात, दुसरे पक्षवध ह्मणतात. त्याला प्राकृत लोक अर्ध्या अंगा वरून वारें गेलें ह्मणून ह्मणतात.

## सर्वांगरोगलक्ष.

सर्वांगरोगंतंकेचित्सर्वकायास्थितेनिले॥ ॥

अर्थ— तद्वत् ह्मणजे "शिरास्नायूर्विशोष्य" इत्यादिसंप्राप्ति लक्षण येथें ही जाणावें. सर्व शिरांत वायु राहिला असतां त्याला सर्वांगरोग कोणी ह्मणतात.

साध्यासाध्यज्ञानार्थ इतर दोषां
चा संबंध सांगतो.

दाहसंतापमूर्छाःस्यूर्वायोपित्तसमन्विते॥शैत्यशो
थगुरुत्वानितस्मिन्नेव कफान्विते॥शुद्धवातहतंप
क्षंकृच्छ्रसाध्यतमंविदुः॥साध्यमन्येनसंसृष्टमसा
ध्यंक्षयहेतुकम्॥गर्भिणीसूतिकाबालवृद्धक्षीणे
ष्वसृक्स्रुतो॥पक्षाघातंपरिहरेद्वेदनारहितोयदि॥४३

अर्थ— वायु हा कफ पित्त युक्त झाला असतां, दाह, संताप, आणि मूर्छा, होतात, तोच कफयुक्त झाला असतां शैत्य, सूज, जडपणा, हे होतात. केवळ वायूनें झालेला पक्षाघात अत्यंत कष्टसाध्य होतो, इतर दोषानें संसृष्ट झाला असतां साध्य होतो, क्षयापासून झालेला पक्षाघात असाध्य होतो, गर्भिणी, बाळंतीण, बाल, वृद्ध आणि क्षीण त्यांस झालेला व रक्तस्रावापासून झालेला, पक्षाघात वेदना रहित असला तरी तो सोडून द्यावा, ह्मणजे तो असाध्य ह्मणून चिकित्सा करूं नये.

अर्दितरोग सांगतो.

उच्चैर्व्याहरतोत्यर्थं खादतः कठिणानिच॥॥ हसतो
जृंभमाणस्यविषमाच्छयनासनात्॥ ४४ शिरो
नासोष्ठचुबुकललाटेक्षणसंधिगः॥अर्दयत्यनि-
लोवक्त्रमर्दितंजनयत्यतः॥ ४५॥वक्रीभवतिवक्त्रा
र्धंग्रीवाचाप्यपवर्तते॥ शिरश्चलतिवाक्संगो-
नेत्रादीनांचवैकृतम्॥४६॥ग्रीवाचुबुकदंतानां त-
स्मिन्पार्श्वेचवेदना॥तमर्दितमितिप्राहुर्व्याधिं-
व्याधिविशारदाः॥४७॥

अर्थ—उंच स्वरानें वेदादि पाठ करणारा, किंवा अत्यंत कठिण पदार्थ खाणारा, हंसणारा, जांभया देणारा, यांचा, उंच सखल जाग्यावर निजण्यानें विषमाशन केल्यानें कुपित झालेला वायु मस्तक, नाक, ओष्ठ, मुसकट, ललाट, आणि नेत्र, ह्यांच्या संधींत जाऊन मुखाला पीडा देतो ह्मणून अर्दित रोग उत्पन्न करितो, त्या रोगानें अर्धे तोंड वांकडें होतें, आणि मान ही वांकडी होत्ये, मस्तक कांपतें, वाचा बंद होते, नेत्र, भृकुटी, गंड, ह्यांस विकृति, (ह्मणजे वेदना, स्फुरण, वक्रत्वादिक,) होतें, ज्या बाजूला अर्दित होतें, त्या बाजूकडचे मान, चुबुक, आणि दांत ह्यांस वेदना होते, व्याधी जाणण्या विषईं कुशल जे वैद्य आहेत ते ह्या व्याधीला अर्दित असें ह्मणतात.

## अर्दिताचें असाध्यलक्षण.

क्षीणस्याऽनिमिषाक्षस्य प्रसक्ताव्यक्तभाषिणः॥ नसिद्ध्यत्यर्दितं गाढं त्रिवर्षं वेपनस्यच॥ ४८॥

अर्थ— क्षीण झालेला, डोळे उघड झांप करण्याची शक्ति ज्याला नाहीं असा, अत्यंत लागत लागत अस्पष्ट शब्द बोलणारा, अशा पुरुषाचा अर्दित रोग गाढ (ह्मo फार दिवस आंगांत भिनलेला,) तीन वर्षें लोटलेला, अथवा त्रिवर्ष ह्मणजे मुख नासा आणि नेत्र ह्या तिघांचा जेथें स्राव होत आहे असा, आणि कंपयुक्त पुरुषाचा साध्य होत नाहीं.

## आक्षेपकापासून अर्दितापर्यंत रोगाचा वेग सांगतो.

गते वेगे भवेत्स्वास्थ्यं सर्वेष्वाक्षेपकादिषु॥ ॥ ॥

अर्थ— आक्षेपकादि सर्व वात रोगांमध्यें वेग शांत झाल्या वर स्वास्थ्य ह्मo पीडा कमी होत्ये, जसें डोक्या वरचा भार उतरल्यावर सूख वाटतें तसें.

## हनुग्रह लक्षण.

जिव्हानिर्लेखनाच्छुष्कभक्षणादभिघाततः॥कुपि
तोहनुमूलस्थः स्रंसयित्वानिलो हनुम्॥४९॥करो
तिविवृतास्यत्वमथवासंवृतास्यताम्॥हनुग्रहः-
सतेनस्यात्कृच्छ्राच्चर्वणभाषणं॥५०॥

अर्थ— जिव्हा खरखरल्यानें, कोरडें अन्न भक्षण केल्यानें आणि अभि घातानें हनुवटीच्या मूल (कपोल) ठिकाणचा वायु कुपित होऊन हनुवटीला संधीपासून खालीं सोडवून तोंड वासवितो, अथवा मिटवितो, तेणेंकरून हनुग्रह रोग होतो, त्याच्या योगानें चावणें, बोलणें, कठीण-पडतें.

### मन्यास्तंभलक्षण.

दिवास्वप्नाशनस्नानविकृतोर्ध्वनिरीक्षणैः॥मन्या-
स्तंभंप्रकुरुतेसएवश्लेष्मणायुतः॥५१॥

अर्थ— दिवसास निद्रा, अन्न, स्नान, भलत्याच रीतीनें वरपाहणें. ह्या कारणानीं तोच वायू कफयुक्त होऊन मानेच्या शिरा ताठतो, त्याला मन्यास्तंभ ह्मणतात.

### जिव्हास्तंभलक्षण.

वाग्वाहिनीशिरासंस्थोजिव्हांस्तंभयतेऽनिलः॥
जिव्हास्तंभःसतेनान्नपानवाक्येष्वनीशता॥५२॥

अर्थ— वायू वाणीला वाहणाऱ्या शिरांमध्यें राहून जिव्हेचा स्तंभ करितो, त्याला जिव्हास्तंभ ह्मणतात, तेणेंकरून अन्न पाणी घेण्यास व बोलण्यास, सामर्थ्य नसतें.

### शिराग्रहलक्षण.

रक्तमाश्रित्यपवनः कुर्यान्मूर्धधराः शिराः॥ रूक्षाः

सवेदनाः कृष्णाः सोऽसाध्यः स्याच्छिराग्रहः ॥ ४९ ॥

अर्थ— वायु रक्तांत शिरून मस्तकाला धारण करणाऱ्या शिरा, रूक्ष, वेदना युक्त, आणि काळ्या करितो, हा शिराग्रह, रोग असाध्य आहे. शिरोग्रह असाही पाठ आहे.

## गृध्रसीलक्षण.

स्फिक्पूर्वा कटिपृष्ठोरुजानुजंघापदं क्रमात् ॥ गृध्रसी स्तंभरुक्तोदैर्गृण्हाति स्पंदते मुहुः ॥ वाताद्वातकफात्तंद्रागौरवारोचकान्विता ॥ ५० ॥

अर्थ— प्रथमतः स्फिक् ह्मणजे कंबरेचा मागला भाग त्या पासून आरंभून क्रमानें कंबर, पाठ, मांड्या, गुडघे, पोटऱ्या, आणि पाय यांस स्तंभ (लाठणें) वेदना, आणि तोद ह्मणजे टोचल्या प्रमाणें पीडा होते आणि वारंवार कंप होतो, हा गृध्रसी रोग वायू पासून होतो, आणि वातकफा पासून होतो, त्यांत तंद्रा जडत्व आणि अरुचि हीं लक्षणें जाजती होतात, या प्रमाणें दोन प्रकारचे गृध्रसी होतात.

## विश्वाचीलक्षण.

तलं प्रत्यंगुलीनां याः कंडरा बाहुपृष्ठतः ॥ बाह्वोः कर्मक्षयकरी विश्वाची चेहसोच्यते ॥ ५१ ॥

अर्थ— बाहु पृष्ठा पासून हाताच्या वरल्या भागा पर्यंत प्रत्येक अंगुळींच्या ज्या कंडरा ह्मणजे मोठ्या स्नायु आहेत, त्या दुष्ट करून हाताच्या ग्रहण, आकुंचनादि कार्यांचा नाश करणारा जो रोग होतो त्याला विश्वाची ह्मणतात.

## क्रोष्टुशीर्षलक्षण.

वातशोणितजः शोथो जानुमध्ये महारुजः ॥ ज्ञेयः

क्रोष्टुकशीर्षस्तु स्थूलः क्रोष्टुकशीर्षवत्।।५२।।

अर्थ—गुडघ्यांमध्यें वातरक्तापासून अत्यंत वेदना करणारा शोथ (सूज) येतो, तो कोल्ह्याच्या डोक्या प्रमाणें मोठा असतो, ह्मणून त्याला क्रोष्टुशीर्ष असें ह्मणतात, व्यवहारांत त्याला गुडघी ह्मणतात.

खंज आणि पांगुल्य यांचें ल०

वायुः कट्याश्रितः सक्थ्नः कंडरामाक्षिपेद्यदा।। खंजस्तदा भवेज्जंतुः पंगुः सक्थ्नोर्द्वयोर्वधात्।।५३।।

अर्थ— वायु कंबरेमध्यें राहून जेव्हां मांडीची मोठी स्नायु ओढतो तेव्हां मनुष्य खुळा होतो. आणि दोन्हीं मांड्यांची अशी अवस्था झाली-ह्मणजे. पांगळा. होतो.

कलायखंज लक्षण.

प्रक्रामन्वेपते यस्तु खंजन्निव च गच्छति।। कलायखंजं तं विद्यात्मुक्तसंधिप्रबंधनम्।।५४।।

अर्थ— जो पुरुष चालूं लागतांना थरथर कांपतो. आणि भलत्यारितीनें चालतो त्यामध्यें संधीचीं बंधनें शिथिल होतात त्याला कलायखंज ह्मणतात, त्याला अन्यठिकाणी खंजवात अशी संज्ञा आहे.

वातकंटक सांगतो.

रुक्पादे विषमेन्यस्ते श्रमाद्वा जायते यदा।। वातेन गुल्फमाश्रित्य तमाहुर्वातकंटकम्।।५४।।

अर्थ— पाय वांकडा तिकडा पडला असतां. किंवा श्रम झाला असतां वायु कुपित होऊन घोट्यांत जाऊन वेदना उत्पन्न करितो. त्या व्याधीला वातकंटक-असें ह्मणतात. व त्यालाच खुडवात ह्मणतात.

पाददाह सांगतो.

पादयोः कुरुते दाहं पित्तासृक्सहितोनिलः॥ विशे-
षतश्चंक्रमतः पाददाहं तमादिशेत्॥५६॥ ॥

अर्थ— वायु पित्तरक्ताशीं युक्त होऊन पायांची आग करितो, आणि चालतानां तर विशेष आग होते त्याला पाददाह ह्मणावा.

पादहर्ष सांगतो.

हृष्येते चरणौ यस्य भवेतां चातिसुप्तकौ॥ पादहर्षः
सविज्ञेयः कफवातप्रकोपजः॥५७॥

अर्थ—ज्याचे पाय हर्षयुक्त (ह्मणजे गिण्गिण् वेदनायुक्त) होतात, आणि अत्यंत बहिरावतात, त्याच्या त्या कफवातजन्यरोगाला **पादहर्ष** असें ह्मणावें.

अंसशोष आणि अवबाहुक सांगतो.

अंसदेशोस्थितो वायुः शोषयेदंसबंधनम्॥ शिराश्चा
कुंच्य तत्रस्थो जनयेदवबाहुकम्॥५८॥

अर्थ— वायु खांद्यांत राहून त्याचें बंधन शोषितो, ह्मणजे खांदा वाळून जाणें, त्याला **अंसशोष** ह्मणतात, आणि तेथें ह्मणजे खांद्यातच राहून शिरा भरवळून **अवबाहुक** रोग उत्पन्न करितो.

मूकादिक तीन रोग सांगतो.

आवृत्य वायुः सकफो धमनीः शब्दवाहिनीः॥ नरा
न्करोत्यक्रियकान्मूकमिन्मिणगद्गदान्॥५९॥

अर्थ— कफयुक्त वायु शब्दवाहिनी धमन्यांस व्याप्त करून मनुष्यांस, वचनक्रियारहित मुके, मिन्मिण, आणि गद्गद असे करून टाकितो, मुका ह्मणजे ज्यास बोलतां येत नाहीं तो, मिन्मिन ह्मणजे नाकांत गेंगणें बोलणारा, आणि गद्गद ह्मणजे बोलतानां मधलीं

पदें व्यंजनें खाणारा, त्या रोगांनां कारण सारिखें असून रोगांचे भिन्न-भिन्न प्रकार होतात, ते दुष्टीच्या उत्कर्षानें किंवा प्रारब्ध वशात् होतात असें समजावें.

## तूनीरोगल०

अधोयावेदनायातिवर्चोमूत्राशयोत्थिता॥भिंदंतीव गुदोपस्थंसातूनीनामनामतः॥६०॥

अर्थ— पक्काशय आणि मूत्राशय त्यांत कळनिघून खालीं जाते, आणि गुद व उपस्थ ह्म० स्त्री पुरुषाचें गुह्यस्थान त्यांचा भेद करिते, ती तूनी त्या नांवानें प्रसिद्ध आहे.

## प्रतूनीरोग.

गुदोपस्थोत्थितात्वेवप्रतिलोमंप्रधावति॥वेगैःपक्काशयंयातिप्रतूनीत्वेहसोच्यते॥६१॥

अर्थ—गुद आणि उपस्थ यांपासून निघालेली कळ उलटी वर जाते, आणि जोरानें पक्काशयांत शिरते, आणि तूनी प्रमाणें भेदही करिते, तिला प्रतूनी ह्मणतात.

## आध्मानल०

साटोपमत्युग्ररुजमाध्मातमुदरंभृशम्॥आध्मान-मितिजानीयाद्घोरंवातनिरोधजम्॥६२॥

अर्थ—गुड गुड शब्दानें युक्त, अत्यंत पीडा युक्त, असें उदर (पक्काशय) अत्यंत फुगलें ह्मणजे वायूनें भरलेल्या चामड्याच्या थैली प्रमाणें होतें. वात निरोधा पासून झालेल्या त्या भयंकर रोगास आध्मान असें ह्मणावें.

## प्रत्याध्मान.

विमुक्तपार्श्वहृदयं तद्देवामाशयोत्थितम्॥ प्रत्याध्मा
नं विजानीयात्कफव्याकुलितानिलम्॥ ६३॥ ॥

अर्थ— तेंच आध्मान आमाशयांत उत्पन्न झालें ह्मणजे त्याला प्रत्याध्मान ह्मणावें, त्यांत पार्श्वभाग आणि हृदय त्यांस वेदना होत नाहींत, आणि वायू कफानें व्याप्त झालेला असतो.

## वाताष्ठीलालक्षण.

नाभेरधस्तात्संजातः संचारीयदिवाचलः॥ अष्ठीला
वद्घनोग्रंथिरूर्ध्वमायतउन्नतः॥ ६४॥ वाताष्ठीलांवि
जानीयाद्बहिर्मार्गावरोधिनीम्॥

अर्थ— नाभीच्या खालीं उत्पन्न झालेला, फिरणारा अथवा अचल अष्ठीले (वाटोळा पाषाण) प्रमाणें कठीण, वरच्या अंगास लांब, आणि आडवा उचल्लेला, आणि बहिर्मार्ग ह्मणजे वात, मूत्र, आणि मळ, त्यांचा रोध करणारा, असा जो ग्रंथि (गांठ) होतो, त्याला वाताष्ठीला ह्मणावें

## प्रत्यष्ठीला.

एतामेवरुजायुक्तांवातविण्मूत्ररोधिनीं॥ प्रत्यष्ठीला
मितिवदेत्जठरेतिर्यगुत्थितां॥ ६५॥

अर्थ— वाताष्ठीलाच अत्यंत पीडायुक्त, वात मूत्र पुरीषांचा रोध करणारी, आणि आडवी लांब झाली ह्मणजे तिला प्रत्यष्ठीला ह्मणावें.

## मूत्ररोधल.

मारुतेनुगुणेबस्तौ मूत्रंसम्यक्प्रवर्तते॥ विकारा वि-
विधाश्चापिप्रतिलोमेभवंतिहि॥

अर्थ— बस्ती मध्यें वायु अनुलोम असला तर मूत्र चांगल्या रीतीनें होतें, आणि प्रतिलोम असला तर नाना प्रकारचे अश्मरी मूत्र कृच्छ्रादि विकार उत्प

न्न होतात.

## कंपवायु.

सर्वांगकंपः शिरसो वायुर्वेपथुसंज्ञकः ॥ ६७ ॥

अर्थ— सर्व अंगाला आणि मस्तकाला जो कंपवायु होतो त्या वायूला वेपथु ही संज्ञा दिली आहे.

## खल्लीचें लक्षण.

खल्लीतु पादजंघोरुकरमूलावमोटिनी ॥ ॥ ॥

अर्थ— पाय, जंघा, मांड्या आणि हातांचें मूळ, त्यांस मोडणारी जी पीडा तिला खल्ली (लुळेपणा) असें ह्मणतात. ऊर्ध्व वायूचें लक्षण टीकाकारानीं सांगीतलें आहे तें असें, "अधः प्रतिहतो वायुः श्लेष्मणा मारुतेनच ॥ करोत्युद्गार बाहुल्य मूर्ध्ववातः प्रचक्षते, अर्थ सुगम.

## अनुक्त वात रोग संग्रहार्थ सांगतो.

स्थान नामानुरूपैश्चलिंगैःशेषान् विनिर्दिशेत् ॥ सर्वेष्वेतेषु संसर्ग पित्ताद्यैरुपलक्षयेत् ॥ ६८ ॥

अर्थ— स्थान, आणि नाम त्यांस अनुरूप ह्मणजे तुल्य अशा लक्षणानीं बाकीचे वात व्याधि समजावे, स्थानानुरूप ह्मणजे जसा कुक्षिशूल, नखभेद इत्यादि नामानुरूप ह्मणजे जसें शूल ह्मटला ह्मणजे खिळा टोंकल्या प्रमाणें वेदना विशेषच जाणला पाहिजे, तसेंच तोद भेदादि कें करून ही पीडा विशेषच समजला पाहिजे.

## साध्यासाध्य विचार.

हनुस्तंभार्दितात्क्षेपपक्षाघातापतानकाः ॥ कालेन महतावाता यत्नात्सिध्यंतिवानवा ॥ ६९ ॥ नवान्बलवतस्त्वेतान्साधयेन्निरुपद्रवान् ॥ ७० ॥ ॥

अर्थ— हनुस्तंभ, अर्दित, आक्षेप, पक्षाघात, अपतानक, हे वात व्याधी. बहुतां दिवसानीं मोठ्या प्रयत्नानें साध्य होतात, अथवा कधीं साध्य होत नाहींत; परंतु बलवान् पुरुषाचे हे व्याधि नवे असून उपद्रव रहित असले तर ते साधावे, म्हणजे त्यांवर चिकित्सा करावी.

## उपद्रवसांगतो.

विसर्पदाहरुक्संगमूर्छारुच्यग्निमार्दवैः॥ क्षीणमांसबलंवाताघ्नंतिपक्षवधादयः॥ ८०॥

अर्थ—विसर्प, दाह, शूल, मल, मूत्रनिरोध, मूर्छा, अरुचि, अग्निमांद्य, या लक्षणानीं युक्त झालेला आणि बलक्षीण झालेला अशा पुरुषांस पक्षवधादिक विकार मारक होतात.

## असाध्य लक्षण.

शूनंसुप्तत्वचंभग्नंकंपाध्माननिपीडितम्॥ रुजार्तिमंतंचनरंवातव्याधिर्विनाशयेत्॥ ८१॥

अर्थ—सुजलेला, अंगमेहेरलेला, उमेदरवचलेला, कंप आणि आध्मान यानीं अत्यंत पीडित, रुजा, आणि अर्ति म्ह० शूल यानीं युक्त अशा मनुष्यास वात व्याधि नष्ट करितो.

## आतांपांचप्रकारच्याप्रकृतिस्थवायूचें लक्षण आणि कार्यसांगतो.

अव्याहतगतिर्यस्यस्थानस्थः प्रकृतौस्थितः॥ वायुःस्यात्सोधिकंजीवेद्वीतरोगः समाः शतम्॥ ८२॥
इति वातव्याधिनिदानम्॥

अर्थ—ज्या पुरुषाचा वायु अव्याहतगति आणि आपल्या आश्रयांत राहिलेला व प्रकृतिस्थित म्हणजे अक्षीण व अप्रवृद्ध असेल, तो पुरु-

षनि रोगी होत्साता अधिक समाः शतं ह्मणजे एकशें वीस वर्षें आणि पांच दिवस पर्यंत वांचेल.

मधुकोशस्फ़निर्मथ्य सारमाकृष्य वै मया॥ व्याख्या कृता महाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥

---

## वातरक्तनिदान.

लवणाम्लकटुक्षारस्निग्धोष्णाजीर्णभोजनैः॥ क्लिन्नशुष्काम्बुजानूपमांसपिण्याकमूलकैः॥१॥ कुलित्थमाषनिष्पावशाकादिपललेक्षुभिः॥ दध्यारनालसौवीरसुक्ततक्रसुरासवैः॥२॥ विरुद्धाध्यशनक्रोधदिवास्वप्नप्रजागरैः॥ प्रायशः सुकुमाराणांमिथ्याहारविहारिणाम्॥३॥ स्थूलानांसुखिनां चापिवातरक्तंप्रकुप्यति॥ ॥

अर्थ— मीठ, आंबट, तिखट, क्षार, स्निग्ध, उष्ण, अपक्क, अशा भोजनानीं, क्लेदयुक्त, आणि शुष्क असें जलसंचारी जीवांचें आणि जलसन्निहित चारी जीवांचें मांस, तिळांची पेंड, मुळे, कुळगे, उडीद, वाल, शाकादि, तिळांची चटणी, आणि ऊंस, दहीं, कांजी, सौवीरमद्य, सक्त (लोणचें वगैरे) ताक, मद्य, आसव (मद्यविशेष) विरुद्ध (क्षीरमत्स्यादि) अध्यशन, क्रोध, दिवास्वप्न, रात्रिजागर, ह्या कारणानीं बहुत करून सुकुमार पुरुषांस, आणि मिथ्याहारविहार करणाऱ्या पुरुषांस स्थूल-किंवा सुखी पुरुषांस वातरक्त रोग होतो.

### संप्राप्ति सांगतो.

हस्त्यश्वोष्ट्रैर्गच्छतश्चाश्नतश्चविदाह्यन्नंसविदा

हाशनस्य॥ हस्त्यश्वोष्ट्रैर्गच्छतश्चाश्नतश्च विदाहि विदग्धं च नृणाम्। ... दुष्टं पादयोश्चीयते तु॥ तत्संपृक्तं वायुना दूषितेन तत्प्राबल्यादुच्यते वातरक्तम्॥ ५॥

अर्थ— हत्ती, घोडे, उंट, यांवर बसून जाणारा (हें वायूच्या वृद्धीविषयीं आणि विशेषें करून रक्ताला खालीं उतरण्याला कारण आहे) विदाहकारी अन्न खाणारा (ह्यानें ही रक्ताची वृद्धि होते,) ऊन ऊन अन्न खाणारा, अशा पुरुषाच्या शरीरांतलें सर्व रक्त नासून पायांत सांचतें, आणि तें दुष्टवायूनें दूषित होऊन मिश्र होतें, ह्यांत वायु प्रबळ असतो, ह्मणून ह्या रोगाला **वातरक्त** असें ह्मणतात.

## पूर्वरूप.

स्वेदोत्यर्थं न वा कार्ष्ण्यं स्पर्शाज्ञत्वं क्षतेतिरुक्॥ संधिशैथिल्यमालस्यं सदनं पिटिकोद्गमः॥ ६॥ जानुजंघोरुकट्यंसहस्तपादांगसंधिषु॥ निस्तोदः स्फुरणं भेदो गुरुत्वं सुप्तिरेव च॥ ७॥ कंडूः संधिषु रुक् भूत्वा भूत्वा नश्यति चासकृत्॥ वैवर्ण्यं मंडलोत्पत्तिर्वातासृक्पूर्वलक्षणम्॥ ८॥

अर्थ— घाम फार येतो, अथवा येत नाहीं, शरीराला काळेपणा येतो, अंग मेहरतें, क्षत झालें असलें तर ठणका फार लागतो, सांधे ढिले होतात, आळस येतो, ग्लानि, आंगावर पुळ्या उठतात, गुडघे, जंघा, मांड्या, कंबर, खांदे, हात, पाय, आणि आंगाचे सांधे यांच्या ठिकाणीं सुया टोंचल्या प्रमाणें पीडा, फुरफुरणें, फोड ल्यासारखी पीडा, जडत्व, आणि बाधिर्य हि होतात, आणि सांध्याच्या ठिकाणीं कंडु सुटतो, आणि शूळ होऊन वारंवार नाहींसा होतो, शरीर विवर्ण होतें, मंडळें उठतात, हे

वात रक्ताचें पूर्वरूप होय.

### वातरक्ताला अन्य दोषांचा संसर्ग झाला असतां लक्षणसां०

वाताधिकेधिकंतत्रशूलस्फुरणतोदनम्॥शोथश्च रौक्ष्यंकृष्णत्वंश्यावतावृद्धिहानयः॥९॥ धमन्यंगुलिसंधीनांसंकोचोंगग्रहोतिरुक्॥शीतद्वेषानुपशयस्तंभवेपथुस्तमयः॥१०॥

अर्थ— वाताधिक वातरक्तामध्यें शूळ, स्फुरण, आणि टोंचल्या प्रमाणें पीडा, ही अधिक होतात, सूज, रूक्षता, काळेपणा, किंवा श्याम वर्णता. आणि वातरक्त लक्षणाची वृद्धि होते, क्षणांत ऱ्हास होतो, धमन्या आणि अंगुळीचे सांधे आकुसतात, अंगग्रह होतो, अत्यंत वेदना होते. शीताचा द्वेष होतो, आणि शीतसेवनानें दुःख होतें, ताठा, कंप, आणि मेहेरी ऱ्या होतात.

### रक्ताधिक लक्षण.

रक्तेशोथोतिरुक्क्लेदस्ताम्रश्चिमिचिमायते॥स्निग्धरूक्षैःशमंनैतिकंडूक्लेदसमन्वितः॥११॥

अर्थ— रक्ताधिक वातरक्तामध्यें सुजेला अत्यंत वेदना होते, आणि त्यांतून तांबडा क्लेद वाहातो, त्या सुजेला चिमचिम वेदना लागतात, स्निग्ध किंवा रूक्ष पदार्थांनीं शम होत नाहीं, त्या सुजेला कंड व पाणी सुटतें

### पित्ताधिक लक्षण.

पित्तेविदाहःसंमोहस्वेदोमूर्छामदःसतृट्॥स्पर्शासहत्वंरुग्रागःशोफःपाकोभृशोष्णता॥१२॥

अर्थ— पित्ताधिकांमध्यें अत्यंत दाह, इंद्रियमनोमोह, स्वेद, मूर्छा,

उन्मत्तता, तृषा, स्पर्शसहन न होणें, पीडा, आरक्तता, सूज, बारीक बारीक पिंवळे फोड, आणि अत्यंत उष्णता, हीं लक्षणें होतात.

## कफाधिकाचें लक्षण.

कफे स्तैमित्यगुरुतासुप्तिस्निग्धत्वशीतताः॥ कंडूर्मंदाच रुक् द्वंद्वसर्वलिंगं च संकरात्॥१३॥

अर्थ— कफाधिकामध्यें ओलसरपणा, जडत्व, मेहेरी, तुळतुळीतपणा, शैत्य, कंडू, आणि मंदपीडा, हीं लक्षणें होतात.

दोन दोन दोषांच्या मेलनानें द्वंद्वलिंग आणि तीन दोषांच्या संकरानें सर्व लक्षणें होतात.

## पायांवर झालेलें वातरक्त उपेक्षिलें असतां हातावर देखील होतें हें सांगतो.

पादयोर्मूलमास्थाय कदाचिद्धस्तयोरपि॥ आखोर्विषमिव क्रुद्धं तद्देहमनुसर्पति॥१४॥ ॥

अर्थ— तें वातरक्त पायांच्या मूळाला होऊन कदाचित् हातावर ही होतें, तें कोपलें ह्मणजे उंदराच्या विषाप्रमाणें सर्व देहावर हळू हळू पसरतें हें वातरक्त चरकानें दोन प्रकारचें सांगितलें आहे, तें असे— एक उत्तान आणि दुसरें गंभीर. त्वक् आणि मांस यांचा आश्रय करून जें होतें तें उत्तान होय, आणि गंभीर असतें तें याही पेक्षां खोल गेलेलें असतें.

## असाध्यलक्षण.

आजानुस्फुटितं यच्च प्रभिन्नं प्रस्रुतं च यत्॥ उपद्रवैर्यच्च जुष्टं प्राणमांसक्षयादिभिः॥१५॥ वातरक्तमसाध्यं स्याद्याप्यं संवत्सरोषितम्॥

अर्थ— गुडघ्या पर्यंत गेलेलें वातरक्त असाध्य, फुटलेलें ह्मणजे ज्याव

रवी लवानिघालेलीअसे, वज्यालानिरापडल्या आहेत असें, वज्यांतू न लस वाहात आहे असें, असाध्य होय, आणि प्राणमांसक्षयादिउप द्रवानीं जेंयुक्तअसतें तेंअसाध्यहोय, वातरक्त होऊन वर्ष लोटलें ह्मणजे याप्य होतें. वर्षाच्या पूर्वी साध्य होतें, परंतुजर स्फुटितादिलक्षणें नहो तील तर साध्य होईल

## उपद्रव.

अस्वप्नारोचकश्वासमांसकोथशिरोग्रहाः॥ संमूर्छा मंदरुक्तृष्णाज्वरमोहप्रवेपकाः॥ हिक्कापांगुल्यवी सर्पपाकतोदभ्रमक्लमाः॥ अंगुलीवक्रतास्फोटदाह मर्मग्रहार्बुदाः॥ एतैरुपद्रवैर्वर्ज्यमोहेनैकेनचापियत्

अर्थ— निद्रानाश, अरुचि, श्वास, मांससडणें, मस्तकजखडणें, इंद्रि यमनोमोह, अत्यंतपीडा, ताहान, ज्वर, मोह, कंप, उचकी, पांगळेपणा, विसाव, पिकणें, टोचल्यासारिखी पीडा, भ्रम, अनायासश्रम, बोटें- वांकडी होणें, फोड, आग, मर्मग्रह, गांठी होणें, ह्याउपद्रवानीं युक्त झा लेलें वातरक्त असाध्य, अथवा एकल्या मोहानें युक्तअसलें तरी अ- साध्य जाणावें.

## साध्यासाध्यविचार.

अकृत्स्नोपद्रवंयाप्यंसाध्यंस्यान्निरुपद्रवम्॥ए- कदोषानुगंसाध्यंनवंयाप्यंद्विदोषजम्॥ त्रिदोष जमसाध्यंस्याद्यस्यचस्युरुपद्रवाः॥ इतिवातरक्त निदानम्॥ ॥

अर्थ— ज्यावातरक्तामध्यें सगळेउपद्रव झाले नाहींत, तें याप्य, आ- णि ज्यांत मुळींच उपद्रव नाहींत तें साध्य, ज्यांत एकदोषआहे, तें सा

ध्य, नवें द्विदोषज असलें तर तें याप्य, आणि त्रिदोषज व उपद्रवयुक्त असेल तें असाध्य जाणावें.

मधुकोशांकनिर्मथ्य सार माकृष्य यत्नतः॥ व्याख्याकृ ता महाराष्ट्र्यां माधवार्थप्रकाशिका॥

---

## ऊरुस्तंभनिदानम्.

शीतोष्णद्रवसंशुष्कगुरुस्निग्धैर्निषेवितैः॥ जीर्णा जीर्णे तथायाससंक्षोभस्वप्नजागरैः॥१॥ सश्लेष्म मेदःपवनः साममत्यर्थसंचितम्॥ अभिभूयेतरं दोषमूरूचेत्प्रतिपद्यते॥२॥ सक्थ्यस्थीनि प्रपूर्यांतः श्लेष्मणा स्तिमितेन च॥ तदास्तभ्नातितेनोरू स्तब्धौ शीतावचेतनौ॥३॥ परकीयाविव गुरू स्यातामतिभृशव्यथौ॥ ध्यानांगमर्दस्तैमित्यतंद्राछर्द्यरुचिज्वरैः॥४॥ संयुतोपादसदनकृच्छोद्धरणसुप्तिभिः॥ तमूरुस्तंभमित्याहुराढ्यवातमथापरे॥५॥

अर्थ— शीत उष्ण, ओलें कोरडें, जड स्निग्ध, अशीं परस्पर विरुद्ध भोजनें, जीर्ण अजीर्ण, तसाच आयास, चित्तक्षोभ, दिवानिद्रा, रात्रिजागर त्या कारणांनीं कफमेदयुक्त वायु अत्यंत सांचलेल्या आमयुक्त इतर दोषाला अभिभूत ह्मणजे दाबून टाकून मांड्यांत येईल, आणि मांड्यांचीं हाडें आंतून मंद कफानें भरील तर तेणें करून मांड्या ताठून थंड व निर्जीव होतील, दुसऱ्याच्या मांड्यासारिख्या जड लागें. चालणें याविषयीं असमर्थ होतील, आणि जड अत्यंत पीडायुक्त होतील, आणि चिंता अंग मोडणें, ओलसरपणा, तंद्रा, ओकारी, अरुचि, आणि ज्वर हीं-

लक्षणें त्यांत होतात, पायाची ग्लानि मोठ्या कष्टानें उचलणें आणि मेहेरी त्या होतात, त्या रोगाला, ऊरुस्तंभ म्हणतात, कोणी आढ्यवात असें ही म्हणतात.

## पूर्वरूप.

प्राग्रूपंतस्यनिद्रातिध्यानंस्तिमितताज्वरः॥लोमहर्षोरुचिश्छर्दिर्जंघोर्वोःसदनंतथा॥६॥

अर्थ—निद्रापुष्कळयेणें, अत्यंतचिंता, मंदपणा, ज्वर, रोमांच, अरुचि, ओकारि, जंघा आणि मांड्या गळल्यासारिख्या वाटणें, हें त्या ऊरुस्तंभाचें पूर्वरूप होय.

## लक्षण

वातशंकिभिरज्ञानात्तस्यस्यात्स्नेहनात्पुनः॥पादयोःसदनंसुप्तिःकृच्छ्रादुद्धरणंतथा॥७॥जंघोरुग्लानिरत्यर्थंशश्वच्चादाहवेदना॥पदंचव्यथतेत्यर्थंशीतस्पर्शंनवेत्तिच॥८॥संस्थानेपीडनेगत्यांचालनेनाप्यनीश्वरः॥अन्यस्येवहिसंभग्नावूरूपादौचमन्यते॥९॥

अर्थ— वायूच्या शंकेनें नजाणून त्याला स्नेहन चिकित्सा केली असतां हा अधिक वाढतो, पाय गळतात, मेहेरी येत्ये, उचलावयास कष्ट होतात, जंघा आणि मांड्या त्या फारच गळून जातात, आणि निरंतर दाह व वेदना होतात, पाऊल फार ठणकतें, गार पदार्थाचा स्पर्श कळत नाहीं, पाऊल टाकण्यास, रगडण्यास किंवा चाळण्यास, किंवा हालविण्यास देखील मनुष्य असमर्थ होतो, पाय आणि मांड्या मोडल्याच्या सारख्या दुसऱ्याचेच जणु आहेत असें मानितो.

## असाध्यलक्षण.

यदादाहार्तितोदार्तोवेपनःपुरुषोभवेत्॥ ऊरुस्तंभस्तदाहन्यात्साधयेदन्यथानवम्॥१०॥ ॥इति ऊरुस्तंभनिदानम्॥

अर्थ—ज्या वेळेस पुरुष दाह, शूल, आणितोद (टोंचल्या प्रमाणें) यानी पीडित होऊन कंपयुक्त होतो, त्या वेळेस तो ऊरुस्तंभ रोग त्याचा नाश करितो, हीं लक्षणें नसलीं आणि रोग नवा असला तर साध्य करावा.

मधुकोशंसंनिर्मथ्यसारमाकृष्ययत्नतः॥ व्याख्याकृतामहाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥

---

## आमवातनिदान.

विरुद्धाहारचेष्टस्यमंदाग्नेर्निश्चलस्यच॥ स्निग्धंभुक्तवतोह्यन्नंव्यायामंकुर्वतस्तथा॥१॥ वायुनाप्रेरितोह्यामःश्लेष्मस्थानंप्रधावति॥ तेनात्यर्थंविदग्धोसोधमनीःप्रतिपद्यते॥२॥ वातपित्तकफैर्भूयोदूषितःसोन्नजोरसः॥ स्त्रोतांस्यभिष्यंदयतिनानावर्णोतिपिच्छिलः॥३॥ युगपत्कुपितावेतौत्रिकसंधिप्रवेशकौ॥ स्तब्धंचकुरुतोगात्रमामवातःसउच्यते॥४॥

अर्थ—विरुद्ध आहार आणि विरुद्ध विहार करणारा, मंदाग्नी, व्यायाम न करणारा; आणि स्निग्ध अन्न खाऊन लगेच व्यायाम करणारा, अशा पुरुषाचा आम (आंव) वायूनें प्रेरित होऊन कफाच्या आमाशयादिस्थानाप्रत जातो. आणि त्या कफानें अत्यंत दूषित होऊन तो आमधमनींत शि

रतो, नंतर तो अन्न रस(आम)वात, आणि कफ वातपित्त दूषित होऊन स्त्रो-नसांस भरून टाकतो, तो नाना तऱ्हेच्या रंगाचा व अत्यंत बुळबुळीत असा होतो, मग ते वात कफ एककाळीं कुपित होऊन त्रिकसंधींत जाऊन शिरतात, आणि शरीर ताठून टाकतात, त्यारोगाला **आमवायु** असें म्हणतात.

## आमवायूचें सामान्य लक्षण.

**अंगमर्दोऽरुचिस्तृष्णाआलस्यंगौरवंज्वरः॥ अपाकः शूनतांऽगानामामवातःसउच्यते॥ ५॥**

अर्थ— आंग मोडून येणें, अन्नद्वेष, तृषा, आळस, जडपणा, ताप, अन्न न पचणें आणि आंगाला थोदरी, हीं लक्षणें झालीं म्हणजे **आमवात** म्हणून समजावा.

## आमवात अत्यंत वाढला असतां त्याचें लक्षण.

**सकष्टःसर्वरोगाणांयदाप्रकुपितोभवेत्॥ हस्तपादशिरोगुल्फत्रिकजानूरुसंधिषु॥ ६॥ करोतिसरुजंशोथंयत्रदोषःप्रपद्यते॥ सदेशोरुजतेत्यर्थंव्याविद्धइववृश्चिकैः॥ ७॥ जनयेत्सोऽग्निदौर्बल्यंप्रसेकारुचिगौरवं॥ उत्साहहानिर्वैरस्यंदाहंचबहुमूत्रताम्॥ कुक्षौकठिणतांशूलंतथानिद्राविपर्ययम्॥ तृट्छर्दिभ्रममूर्च्छाश्चहृद्ग्रहंविड्विबंधताम्॥ ९॥ जाड्यांत्रकूजमानाहंकष्टांश्चान्यानुपद्रवान्॥**

अर्थ— हा आमवायु ज्यावेळेस वाढलो त्यावेळेस सर्वरोगांमध्यें दुःखदायक होतो; हात, पाय, मस्तक, घोटे, त्रिक, गुडघे, मांड्या, त्यांच्या सं-

धीमध्यें वेदनायुक्त सूज करितो, आणि ज्याज्या ठिकाणीं तो आम जातो, त्यात्या ठिकाणीं विंचवानीं नांगी मारल्या सारिखी वेदना होते, हारोग-अग्निमांद्य, व तोंडाला पाणी सुटणें, अन्नद्वेष, जडपणा, उत्साह नाहींसा होणें, तोंड फिकें पडणें, दाह, व पुष्कळ मुतायाला होणें, कुशीमध्यें कठिणपणा, शूळ, दिवसास निद्रा, रात्रीं जागरण, तृषा, ओकारी, भ्रम, मूर्छा, ऊर दुखणें, शूळ, मळशुद्धी न होणें, जाड्य, आंतड्यांत कुरकुर शब्द, आणि पोट फुगणें, व अन्य उपद्रव ह्मणजे, कुलाय खंजादिक ध्यांस करितो.

## विशेषलक्षण.

पित्तात्सदाहरागंचसशूलंपवनानुगम्॥स्तैमित्यं गुरुकंडूंचकफजुष्टंतमादिशेत्॥ ११॥

अर्थ— पित्तापासून तो आमवात, दाहयुक्त, व आरक्तवर्ण होतो, वायूच्या योगानें शूलयुक्त होतो.

कफसंबंधानें ओलसरपणा, जड आणि खाज हीं होतात.

## साध्यासाध्यविचार.

एकदोषानुगःसाध्योद्विदोषोयाप्यउच्यते॥सर्वदेहचरःशोथःसकृच्छ्रःसान्निपातिकः॥ १२॥ इतिआमवातनिदानम्॥ ॥

अर्थ— एक दोषसंबंध झाला तर साध्य, द्विदोषसंबंधानें याप्य, आणि सर्व देहावर सूज पसरली असतां, किंवा त्रिदोष संबंध असतां कष्टसाध्य होतो.

मधुकोशाकनिर्मथ्यसारमाकृष्यवैमया॥ व्याख्या कृतामहाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥

**दोषैः पृथक् समस्तामद्वंद्वैः शूलोष्टधाभवेत्॥सर्वे ष्वेतेषुशूलेषु प्रायेणपवनःप्रभुः॥ १॥**

अर्थ— पृथक् दोषानीं तीन, सन्निपातानें एक, आमानें एक, आणि द्वंद्वज तीन मिळून आठ प्रकारचा शूळ होतो, त्यासर्व शूलांमध्यें बहुतकरून वायु हा प्रबळ असतो, ज्वरा प्रमाणें शूलाची ही पूर्वीची उत्पत्ति **हारीतानें** सांगितली आहे ती अशी, " मदनाच्या नाशार्थ शिवानें— रागाऊन त्रिशूळ फेंकला, तो आपणा वर येत आहे असें पाहून मदन- भयाभीत होऊन विष्णु शरीरांत शिरला, नंतर तो त्रिशूळ विष्णूच्या हुंकारानें मूर्छित होऊन पडला, तो पृथ्वीवर शूळ यानावानें प्रसिद्ध झाला, तेव्हांपासून तो पंचभूतात्मक देहाला पीडा करूं लागला, त्या प्रमाणें त्याची पूर्व सृष्टि आहे, शिवाच्या त्रिशूळा पासून उत्पन्न झाला व शूळानें घाव मारल्या प्रमाणें वेदना करितो म्हणून याला— शूळ हीसंज्ञा दिली आहे.

## वातशूळाचें कारणवल.

**व्यायामयानादतिमैथुनाच्च प्रजागराच्छीतजलातिपानात्॥ कलायमुद्गाढकिकोरदूषादत्यर्थरूक्षाध्यशनाभिघातात्॥ २॥ कषायतिक्तादिविरूढकान्नाविरूढवल्लूरकशुष्कशाकात्॥ विट्शुक्रमूत्रानिलवेगरोधाच्छोकोपवासादतिहास्यभाषात्॥ ३॥ वायुःप्रवृद्धोजनयेद्धिशूलं हृत्पार्श्वपृष्ठत्रिकबस्तिदेशे॥ जीर्णेप्रदोषेच घनागमेच शीतेच कोपंसमुपैतिगाढम्॥ ४॥ मुहुर्मुहुश्चोपशमप्रकोपौविण्मूत्रसंस्तंभनतोदभेदैः॥ संस्वेदनाभ्यंजनमर्दनाद्यैःस्निग्धोष्णभोज्यैश्चशमंप्रयाति॥ ५॥**

अर्थ— व्यायाम, फारचालणें, अतिमैथुन, अत्यंत जागरण, थंड पाणी पुष्कळ पिणें, वाटाणे, किंवा लांक, मूग, तुरी, कोद्रु, अत्यंत रूक्षपदार्थांचे सेवनानें, आणि अध्यशन, (जेवणावर जेवण) लांकूड वगैरे लागणें, तुरट, कडु, मोड आलेल्या धान्याचें अन्न (उसळ) क्षीर मत्स्यादि विरुद्ध, सुकलेलें मांस, भाजांची काचरी, त्यांच्या सेवनानें; मळ, शुक्र, मूत्र, आणि वायु यांच्या वेगाचा रोध केल्यानें, शोकानें, उपवासानें, अत्यंत हंसण्यानें, फार बोलल्यानें वायूचा कोप होऊन हृदय, पार्श्व, पाठ, त्रिक, आणि बस्ति इत्यादि ठिकाणीं शूळ होतो. तो आहार जिरल्यावर, प्रदोषकाळीं, वर्षाकाळीं, थंडी पडली असेल त्यादिवशीं, फारच कोप पावतो, त्याची वारंवार शांति होते, तसाच प्रकोप होतो, मळ मूत्राचा अवरोध, तोद, आणि भेद, त्या लक्षणांनीं युक्त असतो, स्वेद, लंघन, अभ्यंजन, मर्दन, इत्यादिकें करून आणि स्निग्ध, उष्ण, अन्नानीं शांति पावतो.

## पित्तशूळाचें कारण व लक्षण.

क्षारातितीक्ष्णोष्णविदाहितैलनिष्पावपिण्याककुलित्थयूषैः॥ कट्वम्लसौवीरसुराविकारैः क्रोधानलायासरविप्रतापैः॥ ६॥ ग्राम्यातियोगादशनैर्विदग्धैः पित्तं प्रकुप्याशु करोति शूलं॥ तृण्मोहदाहार्तिकरं हि नाभ्यां संस्वेदमूर्छाभ्रमशोषयुक्तं॥ ॥७॥ मध्यंदिने कुप्यति चार्धरात्रे विदाहकाले जलदात्यये च॥ शीते च शीतैः समुपैति शांतिं सुस्वादुशीतैरपि भोजनैश्च॥ ८॥

अर्थ— यवक्षारादिक्षार, मरीचादि तीक्ष्णोष्ण, वंशांकुरादि विदाहि, ते-

ळ, वाल, वाटाणे, इत्यादि, तिळादिकांची पेंड, कुल्याचें कढण वगैरे, तिखट, आंबट, सौवीर (मद्यविशेष) सुराविकार (कांजी इत्यादि) क्रोध, अग्निजवळ बसणें, आयास, तीव्र उन्हांत फिरणें, अतिमैथुन करणें, जळकी भाजकी अन्नें खाणें, अशा कारणानीं पित्त कुपित होऊन नाभिस्थानीं शूळ उत्पन्न करितें, तो शूळ, तृषा, मोह, दाह, पीडा, श्वास करितो, आणि घाम, मूर्छा, भ्रम, आणि शोष, यांणीं युक्त असतो, दोन प्रहरीं, मध्यरात्रीं, अन्नाचा विदाह काळीं, शरत् काळीं, तो शूळ अधिक होतो, शीत काळीं, शीत पदार्थानीं, आणि अत्यंत मधुर शीत अन्नानीं शांति पावतो.

## कफशूलाचें कारण व लक्षण.

आनूपवारिजकिलाटपयोविकारैर्मांसेक्षुपिष्टकृशरातिलशष्कुलीभिः॥ अन्यैर्बलासजनकैरपिहेतुभिश्च श्लेष्मा प्रकोपमुपगम्य करोति शूलम्॥९॥ हृल्लासकाससदनाऽरुचिसंप्रसेकैरामाशये स्तिमितकोष्ठशिरोगुरुत्वैः॥ भुक्ते सदैव हि रुजं कुरुतेऽतिमात्रं सूर्योदयेऽथ शिशिरे कुसुमागमे च॥१०॥

अर्थ— जलसमीप वर्ति पक्ष्यादिकांचें मांस, मत्स्यादिकांचें मांस, खरवस, ताक, दहीं, तूप, लोणीं इत्यादि, मांस, उसाचा रस, पिष्ट कृत पदार्थ, खिचडी, तीळ, करंजा, ह्या पदार्थानीं व दुसऱ्याही कफ कारक पदार्थानीं कफ कुपित होऊन आमाशयांत शूळ उत्पन्न करितो, तो मळमळ, खोकला, ग्लानि, अरुचि, तोंडाला पाणी सुटणें, कोष्ठांत स्तब्धता, डोक्याला भार, ह्या लक्षणानीं युक्त असतो, जेवण होतां क्षणीच सर्वदा अत्यंत पीडा करितो, सूर्योदयीं, शिशिर ऋतूमध्यें, आणि वसंतकाळीं कोप पावतो.

सकः॥कफस्यालिंगनसमानलिंगमामोद्भवशूल-
मुदाहरंति॥११॥

अर्थ— गुडगुडशब्द, मळमळ, वांति, जडत्व, मंदत्व, पोटफुगणें, मुखावाटे कफाचास्राव, ह्या लक्षणानीं व कफशूलाच्या लक्षणानें तुल्य लक्षणाचा, अशा शूलास आमशूल ह्मणतात.

## द्वंद्वजशूलांचीं लक्षणें.

बस्तोर्हृत्कंठपार्श्वेषुसशूलः कफवातिकः॥ कुक्षौ
हृन्नाभिपार्श्वेषुसशूलःकफपैत्तिकः॥१२॥ दाह
ज्वरकरो घोरोविज्ञेयोवातपैत्तिकः॥ एकदोषोत्थि
तःसाध्यः कृच्छ्रसाध्योद्विदोषजः॥१३॥ सर्वदोषो
त्थितोघोरस्त्वसाध्योभूर्युपद्रवः॥१३॥ ॥

अर्थ— बस्ति, हृदय, कंठ, आणि पार्श्वभाग, ह्यांच्याठिकाणीं शूळ होतो, तो **कफवातिक** होय, कुशी, हृदय, नाभि आणि पार्श्व, ह्याठिकाणीं शूळ होतोतो **कफपैत्तिक**, दाह, ज्वर करणारा असा भयंकर शूळ तो **वातपैत्तिक** होय, एकदोषोत्थित शूल साध्य, द्विदोषजन्य कृच्छ्रसाध्य, सर्व दोषजन्य भयंकर; आणि बहुतउपद्रवानें युक्त तो शूळ असाध्य जाणावा. ग्रंथांतरोक्त शूलांचीं स्थानें " वातात्मकं बस्तिगतं वदंति पित्तात्मकं चापि वदंति नाभ्यां॥ हृत्पार्श्वकुक्षौकफसन्निविष्टं सर्वेषुदेशेषुचसन्निपातात्॥१॥" शूलाचे उपद्रव- " वेदनाचतृषामूर्छाआनाहोगौरवारुची॥ कासश्वासौचहिक्काच शूलस्योपद्रवाः स्मृताः॥२॥"

स्वैर्निदानैः प्रकुपितो वायुः सन्निहितस्तथा॥ कफ-
पित्ते समावृत्य शूलकारी भवेद्बली॥ ४॥ भुक्ते जी
र्यति यच्छूलं तदेव परिणामजम्॥ तस्य लक्षणम
प्येतत्समासेनाभिधीयते॥ १५॥

अर्थ— स्वकारणानीं वायु कुपित होऊन कफपित्ताजवळ जाऊन-
त्यांना आवृत करून जेव्हां बलवान होतो, तेव्हां शूल उत्पन्न करि
तो, आहार पचत असतानां जो शूल होतो त्यालाच परिणामशू
ल ह्मणतात, त्याचें लक्षण संक्षेपानें सांगतों.

## वातिकपरिणामशूललक्षण.

आध्मानाटोपविण्मूत्रविबंधारतिवेपनैः॥ स्निग्धो
ष्णोपशमप्रायं वातिकं तद्वदेद्भिषक्॥ १६॥

अर्थ— उदर पूरण, गुडगुडाशब्द, मळमूत्रावरोध, अस्वस्थपणा
कंप ह्याणीं युक्त आणि स्निग्धोष्ण पदार्थांनीं, शांति पावणारा अ
शा शूलास वातिक शूल ह्मणावें.

## पैत्तिकपरिणामशूललक्षण.

तृष्णादाहारतिस्वेदकट्वम्ललवणोत्तरं॥ शूलं शी
तशमप्रायं पैत्तिकं लक्षयेद्बुधः॥ १७॥

अर्थ— तृषा, दाह, अस्वस्थपणा, घर्म, ह्या लक्षणानीं युक्त, तिखट,
आंबट, आणि खारट, असल्या पदार्थांनीं वाढणारा, आणि शीतप
दार्थांनीं शांत होणारा, अशा शूलास पित्तशूल ह्मणून समजावा.

## श्लेष्मिकपरिणामशूल.

छर्दिहृल्लाससंमोहस्वल्परुग्दीर्घसंतति॥ क-
ट्वतिक्तोपशांतं च तच्च ज्ञेयं कफात्मकम्॥ १८॥ ॥

अर्थ— ओकारी, मळमळ, आणि संमोह (इंद्रियमनोमोह) हीं ज्यां-तफार असतात, पीडाथोडी असते, शूळ फार दिवसपर्यंत राहतो, तिरवट, व कडू असल्या पदार्थांनी शांति होते, तो शूळ कफात्मक जाणावा.

## द्विदोषज व त्रिदोषज लक्षण.

संसृष्टलक्षणंयच्चद्विदोषंपरिकल्पयेत्॥ त्रिदोषजमसाध्यंतुक्षीणमांसबलानलम्॥ १९॥

अर्थ— दोन दोन दोषांचीं लक्षणें दृष्टीस पडलीं ह्मणजे द्वंद्वज, आणि तीन दोषांच्या लक्षणांनीं त्रिदोषज समजावा, मांस बळ आणि अग्नि हे ज्यांस क्षीण होऊन गेले आहेत असा शूळ असाध्य जाणावा.

## अन्नद्रवाख्य शूळ.

जीर्णेजीर्यत्यजीर्णेवायच्छूलमुपजायते॥ पथ्यापथ्यप्रयोगेणभोजनाभोजनेनच॥ नशमंयातिनियमात्सोन्नद्रवउदाहृतः॥ २०॥ ॥ इतिपरिणामशूलनिदानम्॥

अर्थ— अन्न जीर्ण झालें असतां, किंवा जिरत असतां, अथवा अजीर्ण असतां ह्मणजे सर्वदां जो शूळ उपजतो, तो पथ्या पथ्याच्या योगानें, किंवा जेवल्यानें अथवा न जेवल्यानें नियमें करून शांत होत नाहीं; त्याला अन्नद्रव शूळ ह्मणतात, हा शूळ त्रिदोष विकृतीचाच एक प्रकार आहे, परंतु असाध्य आहे असें नाहीं; कारण त्यावर चिकित्सा सांगितली आहे.

मधुकोशंसमानिर्मथ्यसारमाकृष्यवैमया॥ व्याख्याकृता महाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥

## उदावर्ताचें कारण.

वातविण्मूत्रजृंभाश्रुक्षवोद्गारवमींद्रियैः॥ क्षुत्तृ
ष्णोच्छ्वासनिद्राणां धृत्योदावर्तसंभवः॥१॥

अर्थ— वायु, विष्ठा, मूत्र, जांभई, नेत्राश्रु, शिंक, ढेंकर, वांति, शुक्र, क्षुधा, तृषा, उच्छ्वास, आणि निद्रा ह्या तेराजणांच्या वेगधारणानें उदावर्त रोग उत्पन्न होतो, तेरांचा नियम केल्यानें त्याहून वेगळे क्रोध, लोभ, मन, इत्या॰ त्यांचें वेग धारण केल्यानें रोगोत्पत्ति होत नाहीं; कारण यांचें आकलन स्वास्थ्याला हेतु आहे, सर्व उदावर्तामध्यें मुख्य कारण वायुच आहे, उदावर्ताची निरुक्ति अशी आहे कीं "उद्धतेन वेगविधारणेन आवृतस्य वायो रावर्तनमुदावर्तः"

## त्रयोदश उदावर्तांचीं लक्षणें क्रमानें सांगतों.

वातमूत्रपुरीषाणां संगाध्मानं क्लमो रुजः॥ जठरे वातजाश्चान्ये रोगाः स्युर्वातनिग्रहात्॥२॥

अर्थ— वायूचा रोध केल्यानें, वायु, मळ, आणि मूत्र हीं बंद होतात, पोट फुगतें, क्लम येतात, आणि पोटामध्यें वातजन्य पीडा होतात, व दुसरे रोग (तोद शूळादि पीडा) होतात.

आटोपशूलौ परिकर्तिका च संगः पुरीषस्य तथोर्ध्ववातः॥ पुरीषमास्यादथवा निरेति पुरीषवेगेऽभिहते नरस्य॥३॥

अर्थ— मलाचा वेग कोंडला असतां, गुडगुड शब्द, शूळ, गुदामध्यें कातरल्यासारिखी पीडा, मळाचा अवष्टंभ, ऊर्ध्व वायू ढेंकर अथवा मळ तोंडावाटे निघतो.

बस्तिमेहनयोःशूलंमूत्रकृच्छ्रंशिरोरुजा॥वि
नामोवंक्षणानाहःस्याल्लिंगंमूत्रनिग्रहे॥४॥

अर्थ—मूत्राचारोध केला असतां बस्ति(मूत्राशय)आणि शिश्न यांच्या ठिकाणीं शूळ, उन्हाळी लागणें, मस्तक शूळ, पीडेनें गात्रें नम्र होणें, आडसंधी जखडणें, या प्रकारचीं लक्षणें होतात.

मन्यागलस्तंभशिरोविकाराजृंभोपघातात्पवना
त्मकाःस्युः॥तथाक्षिनासावदनामयाश्चभवंति
तीव्राःसहकर्णरोगैः॥५॥

अर्थ—आंभई बंद केली असतां, मानेच्या शिरा आणि गळा ताठतात, आणि वातजन्य विकार मस्तकांत होतात, तसेच नेत्ररोग, नासारोग, मुखरोग आणि कर्णरोग हे तीव्र होतात.

आनंदजंवाप्यथशोकजंवानेत्रोदकंप्राप्तममुंच
तोहि॥शिरोगुरुत्वंनयनामयाश्चभवंतितीव्राः
सहपीनसेन॥६॥

अर्थ— आनंदापासून अथवा शोकापासून आलेलें डोळ्यांतलें अश्रू नढाळणाऱ्या मनुष्यास, मस्तकाला भार, नेत्ररोग, आणि पडसें हीं वक्रकट होतात.

मन्यास्तंभःशिरःशूलमर्दितार्धावभेदकौ॥इंद्रि
याणांचदौर्बल्यंक्षवथोःस्याद्विधारणात्॥७॥

अर्थ— शिंकेचा मनि बंध केला असतां मान ताठते, कपाळ [illegible] तें, अर्धें तोंड [illegible] होतें, अर्धशिशी होते, आणि सर्व इंद्रियें दुर्बळ होतात.

कंठास्यपूर्णत्वमतीवतोदः कूजश्चवायोरथवाप्र
वृत्तिः॥उद्गारवेगेभिहतेभवंतिघोराविकाराःप-
वनप्रसूताः॥८॥

अर्थ— ढेंकर नयेऊं दिला असतां कंठ आणि तोंड भरल्या सारिखें होतें, अत्यंत टोंचल्या प्रमाणें पीडा होते, अव्यक्त भाषण, (बोबडी बकणें.) वायूची अप्रवृत्ति, ह्मणजे उच्छ्वासादिकांचा रोध, आणि वायू पासून उत्पन्न होणारे असे भयंकर विकार (हिक्कादिक) होतात.

कंडूकोठारुचिव्यंगशोफपांड्वामयज्वराः॥कु-
ष्ठहृल्लासवीसर्पाश्छर्दिनिग्रहजागदाः॥९॥

अर्थ— ओकारी नयेऊं दिली असतां अंगाला कंड सुटते, गांधी-येतात, अरुचि, वांग, (तोंडावर काळसर डाग,) सूज, पांडुरोग, ज्वर, कुष्ठ, मळमळ, आणि विसर्प, हे रोग होतात.

मूत्राशयेवैगुदमुष्कयोश्वशोथोरुजामूत्रविनि
ग्रहश्च॥शुक्राश्मरीतस्त्रवणंभवेच्चतेतेविका
राभिहतेचशुक्रे॥१०॥

अर्थ— मैथुन, काळीं रेत स्खलन होऊं दिलें नाहीं, अथवा अन्य प्रकारानें शुक्राच्या वेगाचा रोध केला असतां, मूत्राशयामध्यें सूज येते, व कळ लागते, आणि मूत बंद होतें, शुक्राश्मरी (अश्मरी निदानांत पहा) होते, शुक्राचा स्राव होतो, असे नाना तऱ्हेचे विकार होतात.

तंद्रांगमर्दावरुचिःश्रमश्चक्षुधाभिघातात्कृ
शताचदृष्टेः॥

अर्थ— भुकेचा रोध केला असतां, तंद्रा, आंग मोडून येणें, अरुचि, भ्रम, आणि दृष्टीला मंदता, हे रोग होतात.

कंठास्यशोषः श्रवणावरोधस्तृष्णाभिघाताद्धृदयव्यथा चे॥ ११॥

अर्थ— ताहान मारिली असतां घशाला व तोंडाला कोरड, कानानीं ऐकूं येई नासें होणें, आणि हृदयांत पीडा, हे विकार होतात.

श्रांतस्य निश्वास विनिग्रहेण हृद्रोगमोहावथवापि गुल्मः॥

अर्थ— दमलेल्या मनुष्याचा उसासा बंद केल्यानें, हृद्रोग, मूर्छा, अथवा गुल्म ही होतो.

जृंभांगमर्दाक्षिशिरोतिजाड्यं निद्राभिघातादथवापि तंद्रा॥ १२॥

अर्थ— झोंपेचा मोड झाला असतां, जांभया, अंगमोड कळतें, डोळ्यांना आणि मस्तकाला अत्यंत जडत्व येतें, आणि तंद्रा लागते,

वेगरोधापासून झालेले उदावर्त.
सांगून रूक्षादिकारणानीं कुपित-
झालेल्या वायूपासून होणारें सांग.

वायुः कोष्ठानुगो रूक्षकषायकटुतिक्तकैः॥ भोजनैः कुपितः सद्यउदावर्तं करोति च॥ १३॥ वातमूत्रपुरीषासृक्कफमेदोवहानि वै॥ स्रोतांस्युदावर्तयतिपुरीषं चातिवर्तयेत्॥ १४॥ ततो हृद्बस्तिशूलार्तो हृल्लासारतिपीडितः॥ वातमूत्रपुरीषाणि कृच्छ्रेण लभते नरः॥ १५॥ श्वासकासप्रतिश्यायदा-

हृमोहतृषाज्वरान्॥ वमिहिक्काशिरोरोगमनःश्रवण विभ्रमान्॥१६॥ बहूनन्यांश्चलभतेविकारान्वात-कोपजान्॥१७॥

अर्थ— रूक्ष, तुरट, तिखट, आणि कडू, अशा भोजनानी कोष्ठगत वायू कुपित होऊन तत्काळ उदावर्त रोग करितो, आणि वायू मूत्र, मळ, अश्रु, कफ, आणि मेद, ह्यांना वाहणाऱ्या स्रोतसांस (मार्गांत) व्याप्त करून टाकतो, आणि पुरीषाचा (मळाचा) शोष करितो, त्यामुळें रोगी हृदय, बस्ति, ह्या ठिकाणच्या शूळानें बेजार होतो, मळमळ, अस्वस्थपणा ह्यानीं पिडतो, मळ, मूत्र, आणि वात, हीं कष्टानें त्याला होतात, आणि श्वास, खोकला, पडसें, दाह, मोह, तृषा, ज्वर, वांति, उचकी, शिरोरोग, मनाला भ्रांति, मंद ऐकूं येणें, व वातकोपापासून आणखी ही पुष्कळ विकार होतात.

---

## आनाहरोग निदान.

आमंशकृद्वानिचितंक्रमेणभूयोविबद्धं विगुणानिलेन॥ प्रवर्तमानंनयथास्वमेनंविकारमानाहमुदाहरंति॥१॥ तस्मिन्भवत्यामसमुद्भवेतुतृष्णाप्रतिश्यायशिरोविदाहाः॥ आमाशयेशूलमथोगुरुत्वंहृत्स्तंभउद्गारविघातनंच॥२॥ स्तंभः कटीपृष्ठपुरीषमूत्रेशूलोथमूर्छाशकृतश्चछर्दिः॥ श्वासश्चपक्वाशयजेभवंतितथालसोक्तानिचलक्षणानि॥३

अर्थ— आम किंवा पुरीष क्रमानें सांचून विगुण वायूनें वारंवार विबद्ध होऊन स्वमार्गानें चांगलें प्रवृत्त होत नाहीं, ह्या विकाराला आना

हृ ह्मणतात, आमापासून आनाह झाला असतां, ताहान, पडसें, मस्तकाचा दाह, आ पाशया मध्यें शूळ, जडपणा, ह्रदयाला ताठा, ढेंकराचा प्रतिबंध, कंबर, पाठ, पुरीष, आणि मूत्र यांचा स्तंभ, शूळ, मूर्छा, आणि मळाची वांति, व श्वास हीं लक्षणें होतात.

पक्काशया मध्यें आनाह झाला असतां अलस रोगोक्त लक्षणें-(आध्मान वातरोधादिक) होतात.

## असाध्य लक्षण.

तृष्णार्दितंपरिक्लिष्टंक्षीणंशूलैरुपद्रुतम्॥शकृद्वमंतंमतिमानुदावर्तिनमुत्सृजेत्॥इतिउदावर्तानाहनिदानम्॥

अर्थ— ताहानेनें पीडित, क्लेशपावलेला, क्षीण, शूळानीं पिडलेला, आणि मळ ओकणारा अशा उदावर्ति रोग्याला सोडावें इतिउदावर्त निदानम्॥

मधुकोशंसंनिर्मथ्यसारमाकृष्ययत्नतः॥ व्याख्याकृता महाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥

---

## गुल्मनिदान.

दुष्टावातादयोत्यर्थंमिथ्याहारविहारतः॥कुर्वंतिपंचधागुल्मंकोष्ठांतर्ग्रंथिरूपिणम्॥१॥ तस्यपंचविधंस्थानंपार्श्वहृन्नाभिबस्तयः॥

अर्थ— मिथ्या आहार आणि मिथ्या विहार केल्यानें अत्यंत दुष्ट झालेले वातादि दोष, कोष्ठामध्यें ग्रंथिरूप पांच प्रकारचा गुल्मरोग उत्पन्न करितात, त्यांचीं स्थानें पांच आहेत तीं येणें प्रमाणें— दोन

पार्श्व (ह्मं० बरगड्या) ऱ्हदय, नाभि, आणि बस्ति.

## गुल्माचें सामान्यस्वरूप.

ऱ्हन्नाभ्योरंतरेग्रंथिः संचारीयदिवाचलः॥ वृत्तश्च
यापचयवान् सगुल्म इति कीर्तितः॥२॥

अर्थ– ऱ्हदय, आणि नाभि व बस्ति ऱ्यांच्या मध्यें फिरणारा किंवा अचल, वाटोळा, लहान मोटा होणारा असा ग्रंथि (गांठ) होतो ऱ्याला गुल्म असें ह्मणतात.

## संप्राप्ति.

सव्यस्तैर्जायते दोषैः समस्तैरपिचोच्छ्रितैः॥ पुरुषा
णांतथास्त्रीणां ज्ञेयोरक्तेनचापरः॥३॥

अर्थ– कुपित झालेल्या पृथक् दोषानीं ३ आणि सर्व मिळून एक एकूण चार प्रकारचे गुल्म पुरुषांस होतात, आणि स्त्रियानां रक्तार(र जा) पासून एक गुल्म होतो, येथें व्यस्त शब्दानें द्वंद्वज हीगुल्म हो तात ह्मणून समजावें, पांचच प्रकारचे गुल्म आहेत ह्मणून निश्चय केला आहे असें नाहीं, रक्तगुल्म हा स्त्रियानांच होतो, पुरुषांस होत नाहीं, धातुरूप रक्तज गुल्म आहेतो, स्त्रियानां व पुरुषानां होतो. असें क्षार पाणीनें सांगितलें आहे.

## पूर्वरूप.

उद्गार बाहुल्यपुरीषबंध तृप्त्यक्षमत्वांत्र निकूजना
नि॥ आटोपमाध्मानमपक्तिशक्तिरासन्नगुल्मस्यच
दंतिचिन्हं॥४॥

अर्थ– ढेंकर पुष्कळ येणें, मळावरोध, अन्नावर वासना नसणें, सामर्थ्य नसणें, आंतड्यांत कुरकुरणें, पोट दुखून फुगणें, पोट ताटणें,

मंदाग्निअसणें, हीं लक्षणें दृष्टीस पडली ह्मणजे समजावें कीं गु-ल्म लवकरच होणार आहे.

## गुल्माचेंसाधारणरूप.

अरुचिः कृच्छ्रविण्मूत्रत्वं वाते नांत्रविकूजनम्॥आ नाहश्चोर्ध्ववातत्वं सर्वगुल्मेषु लक्षयेत्॥५॥

अर्थ—अरुचि, मळ मूत्र कष्टानें होणें, वायूनें आंतड्यांत कुरकुरणें, पोट फुगणें, ऊर्ध्व वायू होणें, हीं लक्षणें सर्व गुल्मांत असतात.

## वातगुल्माचें कारण व लक्षण.

रूक्षान्नपानंविषमातिमात्रंविचेष्टनं वेगविनिग्रह-श्च॥ शोकाभिघातोतिमलक्षयश्च निरन्नताचानि लगुल्महेतुः॥६॥ यःस्थानसंस्थानरुजाविकल्प-विड्वातसंगंगलवक्त्रशोषं॥श्यावारुणत्वंशिशि रज्वरंच हृत्कुक्षिपार्श्वांसशिरोरुजंच॥७॥ करो तिजीर्णेभ्यधिकंचकोपंभुक्तेमृदुत्वंसमुपैतिपश्चा त्॥ वातात्सगुल्मोनचतत्ररूक्षंकषायतिक्तंकटु चोपशेते॥८॥

अर्थ— रूक्ष, विषम, आणि अतिमात्र असें अन्न पान सेवणें, ब ळकट पुरुषाशीं झोंबी खेळणें, इत्यादि, मळ मूत्रादिकांचा वेग रोध करणें, शोक, अभिघात, विरेकादिकानीं मळाचा अगदी क्ष य करणें, उपवास हें सर्व वातगुल्माला कारण आहे.

जो गुल्म कधीं नाभींत कधीं बस्तींत कधीं पार्श्वामध्यें जातो व कधीं लहान, कधीं मोठा वाटोला अथवा लांबट होतो, व त्या ची पीडा कधीं थोडी होत्ये, कधी मोठी, तोदभेदरूप अथवा अने

क तऱ्हेची होते, मळाची व वायूची प्रवृत्ति होत नाहीं, गळा आणि तोंड यास कोरड पडती, शरीराचा वर्ण निळा किंवा तांबूस होतो, हीं व येतें, हृदय, कुशी, पार्श्व, खांदे आणि डोकें हीं दुखतात, व जो गुल्म अन्न जिरलें असतां अधीक उसळतो, आणि जेवल्या नंतर मागून जरा नरम पडतो, तो गुल्म वायू पासून जाणावा, त्या वर रूक्ष, तुरट, कडू, आणि तिखट पदार्थ दिले असतां सूख होत नाहीं.

पित्तगुल्माचें कारण वल०

कट्वम्लतीक्ष्णोष्णविदाहिरूक्षक्रोधातिमद्यार्कहुताशसेवा॥आमाभिघातोरुधिरंचदुष्टंपैत्तस्य गुल्मस्यनिमित्तमुक्तम्॥१॥ज्वरःपिपासावदनांगरागः शूलंमहज्जीर्यतिभोजनेच॥स्वेदोविदाहोव्रणवच्चगुल्मःस्पर्शासहःपैत्तिकगुल्मरूपं१०

अर्थ—तिखट, आंबट, तीक्ष्ण (मोहोऱ्यावगैरे) दाह करणारे (वंश करीरादि) रूक्ष, क्रोध, अतिमद्यपान, उन्हांत फिरणें, अग्नी जवळ बसणें, विदग्धा जीर्णा पासून झालेल्या दुष्टरसानें, अभिघात म्हणजे पीडा, रक्त नासणें, हें पित्त गुल्माचें कारण सांगितलें आहे.

ज्वर, तृषा, तोंड, आणि अंग याला लाली, अन्न जिरत असतां शूळ फार होतो, घाम येतो, जळजळ होत्ये, आणि गुल्माला हात लावला असतां व्रणा प्रमाणें सहन होत नाहीं, हें पित्त गुल्माचें लक्षण होय.

कफात्मक व सांन्निपातिकगु०

त्याचें कारण व लक्षण.

शीतंगुरुस्निग्धमचेष्टनंच संपूरणंप्रस्वपनंदि
वाच॥गुल्मस्यहेतुःकफसंभवस्य सर्वस्तुदुष्टो
निचयात्मकस्य॥११॥स्तैमित्यशीतज्वरगात्र
सादहृल्लासकासारुचिगौरवाणि॥शैत्यंरुगल्पा
कठिणोन्नतत्वंगुल्मस्यरूपाणिकफात्मकस्य॥१२

अर्थ— शीत, जड, स्निग्ध, अशा पदार्थांचें सेवन, तृप्तीपेक्षां अधीक भोजन करणें, दिवसास निजणें, हे कफोत्पन्न गुल्म होण्याला कारण होय.

वरजीं वात आदि गुल्माचीं कारणें सांगितलीं तीं सर्व— सन्निपात गुल्माचीं कारणें होत.

अंगाला ओलसरपणा, शीतज्वर, शरीराची ग्लानि, मळमळ, खोकला, अरुचि, जडत्व, शैत्य, थोडी पीडा, गुल्म कठीण असून उचललेला असतो, हीं कफात्मक गुल्माचीं लक्षणें होत.

द्वंद्वजगुल्म.

निमित्तलिंगान्युपलभ्यगुल्मेसंसर्गजेदोषबला
बलंच॥व्यामिश्रलिंगानपरांश्चगुल्मांस्त्रीना
दिशेदौषधकल्पनार्थं॥१३॥

अर्थ— द्वंद्वज गुल्मामध्यें कारणें, लक्षणें, आणि दोषांचे बलाबल जाणून चिकित्सा करण्यासाठीं मिश्रलक्षणाचे, दुसरे तीन गुल्म समजावे.

सन्निपातगुल्म.

महारुजंदाहपरीतमश्मवत् घनोन्नतंशीघ्रवि

दाहदारुणं॥ मनःशरीराग्निबलापहारिणंत्रि-
दोषजंगुल्ममसाध्यमादिशेत्॥१४॥

अर्थ– मोटी पीडा करणारा, दाहानें व्यास, दगडाप्रमाणें कठीण व उन्नत, व शीघ्र दाहानें भयंकर, मन, शरीर, अग्नि, आणि बल यांचा अपहार करणारा (ह्मणजे मनाचें वैकल्य करणारा, शरीराला कृशत्व, आणि वैवर्ण्य करणारा, अग्नि वैषम्यादि करणारा, असामर्थ्य करणारा,) असा त्रिदोषज गुल्म असाध्य ह्मणून समजावा.

## रक्तगुल्म.

नवप्रसूताहितभोजनाया याचामगर्भंविसृजे-
दृतौवा॥वायुर्हितस्याःपरिगृह्यरक्तंकरोतिगुल्मं
सरुजंसदाहं॥१५॥पैत्तस्यलिंगेनसमानलिंगं
विशेषणंचाप्यपरंनिबोध॥यःस्पंदतेपिंडितए
वनांगैश्चिरात्सशूलःसमगर्भलिंगः॥सरौधिरः
स्त्रीभवएवगुल्मोमासेव्यतीतेदशमेचिकित्स्यः

अर्थ– नवीन प्रसूत झालेल्या स्त्रीनें अपथ्य भोजन केलें असतां, अथवा अपक्क गर्भपात झाला असतां, अथवा ऋतुकालीं अपथ्य भोजन केलें असतां वायु कुपित होऊन त्या स्त्रीचें रक्त (ऋतुकालीं स्रवतें तें) घेऊन त्याचा गुल्म करतो, तो पीडायुक्त व दाहयुक्त होतो, आणि पित्तगुल्माचीं जीं लक्षणें सांगितलीं आहेत तशीं लक्षणें त्याला होतात, आणि त्यामध्यें दुसरा विशेष आहे तो जाणावा, — तो असा हा गुल्म फार वेळानें गोळाच्या गोळाच हालतो, अवयवानीं हालत नाहीं, शूलयुक्त होतो, ग-

र्भाच्या लक्षणा सारिखीं त्याचीं लक्षणें असतात, (ह्मणजे विटाळ नयेणें, तोंडाला पाणी सुटणें, स्तनाच्या बोंड्या काळ्या पडणें, आणि डोहाळे लागणें, इत्यादि) ही गोष्ट व्याधिस्वभावानें होत्ये, हा रक्तज गुल्म स्त्रियांसच होतो, दाहावा महिना गेल्यावर त्या गुल्माला चिकित्सा करावी, कोणी ह्मणतील कीं गर्भ आहे किंवा रक्तगुल्म आहे, ही शंका जाण्यासाठीं "दाहावा महिना गेल्यावर" असें सांगीतलें, कारण नववा आणि दाहावा महिना हा प्रसूतीचा काल आहे, तर असें नाहीं "यःस्पंदते पिंडित एव नांगैः" इत्यादि विशेष दृष्टी पडल्यानें संशय गेलाच आहे, आणि गर्भ तर निरंतर प्रत्येक अवयवानीं शूळ केल्यावांचून हालत असतो, गुल्म तर त्याच्या विपरीत आहे, मग दाहावा महिना गेल्यावर चिकित्सा करावी हें कां सांगितलें? याचें कारण असें आहे कीं त्याला तितके दिवस गेलेच पाहिजेत, तेव्हां त्यावर चिकित्सा केली असतां तो सुखसाध्य होतो, जसें—ज्वर जीर्ण झाला तरच त्यावर क्षीरपान विरेचन हितावह होतें, व तंत्रांतरीं ही सांगितलें आहे तें असें— "रक्तगुल्मे पुराणत्वं सुखसाध्यस्य लक्षणं" त्याला पुराणत्व तर दाहा महिने गेल्यावरच प्राप्त होतें, आणि जेज्जटानें ही सांगितलें आहे कीं, जर या पूर्वी भेदनादि क्रिया केली तर गर्भाशयाला विकार होतो, कारण, रक्त त्या ठिकाणीं जमून असतें, अकराव्या महिन्यामध्यें गुल्माचा चांगला गोळा जमला ह्मणजे स्नेहादिकें करून सर्व शरीर मृदु केलें असतां भेदन केलें तरी गर्भाशय सुरक्षीत राहातो.

फार दिवसांचा गुल्म अशा:-

[illegible]

लः शिरानद्धोयदाकूर्मइवोन्नतः॥१७॥ दौर्बल्या-
रुचिहृल्लासकासश्च्छर्घरतिज्वरैः॥ तृष्णातंद्राप्रति
श्यायैर्युज्यतेनससिध्यति॥१८॥

अर्थ— क्रमाक्रमानें वाढलेला गुल्म जेव्हां सर्व उदर व्यापून टाकतो. आणि धातूमध्यें त्याचें मूळ जाऊन पोंचतें व त्यावर शिरांचें जाळें होतें, आणि कांसवाच्या पाठीसारिखा गुल्म उंचवटलेला होतो, तेव्हां तो निःशक्तपणा, अन्नद्वेष, मळमळणें, खोकला ओकारी, असंतोष, आणि ज्वर व ताहान, तंद्रा, आणि पडसें ह्या लक्षणांनीं युक्त होतो, मग तो साध्य होत नाहीं.

## असाध्यलक्षणें.

गृहीत्वासज्वरश्वासच्छर्द्यतीसारपीडितं ॥ हृन्ना
भिहस्तपादेषुशोथःक्षिपतिगुल्मिनम्॥१९॥श्वा
सःशूलंपिपासान्नविद्वेषोग्रंथिमूढता॥ जायतेदु
र्बलत्वंचगुल्मिनांमरणायवै॥२०॥इतिगुल्मनिदान.

अर्थ— वांति आणि दाळ ह्यांनीं बेजार झालेल्या अशा गुल्मी रोग्यास हृदय, नाभि, हात, आणि पाय ह्यांच्या ठिकाणीं सूज येत्ये, आणि ताप व दमा लागतो, असें झालें असतां रोगी वांचत नाहीं.

दमा, शूळ, ताहान, अन्नद्वेष आणि गुल्मांची गांठ एकाएकीं

---

+ अंतर्विद्रधि आणि गुल्म यामध्यें भेद कोणता आहे? याचें स्थान व आकृति तर सारखींच आहेत मग भेद कोणता? विद्रधि पिकतो आणि गुल्म पिकत नाहीं.

कारण गुल्म निराश्रय आहे सुश्रुतानें सांगितलें आहे कीं गुल्म हा फुगी येवदा-आणि विद्रधी यापेक्षां मोठा असतो, गुल्माचा कांहीं निर्बंध नाहीं, आणि विद्रधी-ला निर्बंध आहे, गुल्माचें ठिकाण आपल्या दोषामध्यें असतें, आणि विद्रधीचें मांस रक्तांत असतें, ह्मणून विद्रधीचा पाक होतो आणि गुल्माचा होत नाहीं.

---

नाहींशी होणें, आणि शक्तिपात होणें, हीं लक्षणें झालीं ह्मणजे समजावें कीं, गुल्मि रोग्याचें मरण जवळ आलें आहे, इति गुल्म निदानम्॥ ॥

मधुकोशं समिर्मथ्य सारमाकृष्य चैमया॥ व्याख्या कृता महाराष्ट्री माधवार्थ प्रकाशिका॥

## हृद्रोगनिदान.

अत्युष्णगुर्वम्लकषायतिक्तैःश्रमाभिघाताध्यशनप्रसंगैः॥ संचिंतनैर्वेगविधारणैश्च हृदामयःपंचविधःप्रदिष्टः॥ १॥

अर्थ— अतिऊष्ण, अतिगुरू, अतिआंबट, अतितुरट, आणि अति कडू, अशा पदार्थांनीं, श्रम, अभिघात, आणि जेवणावर जेवण हीं नित्य घडल्यानें, काळजीनें, आणि मळमूत्रादिकांचा वेगरोध केल्यानें-हृदयाला रोग होतो, तो पांच प्रकारचा आहे.

### त्याची संप्राप्ति आणि सामान्य ल०

दूषयित्वा रसंदोषा विगुणा हृदयंगताः॥ हृदि बाधांप्रकुर्वंति हृद्रोगंतंप्रचक्षते॥ २॥

अर्थ— कुपित झालेले दोष रसाला (हृदयांतल्या) दुष्ट करून हृदया मध्यें नाना तऱ्हेची पीडा करितात, त्याला हृद्रोग असें ह्मणतात.

वातज हृद्रोग लक्षण.

आयम्यतेमारुतजेहृदयंतुद्यतेतथा॥निर्मथ्यतेदी
र्यतेच्चस्फोट्यतेपाट्यतेपिच॥३॥

अर्थ— वातज हृद्रोगा मध्यें हृदय ओढल्या सारिखें, सुईनें टोंचल्या सारिखें, रवीनें घुस कल्या सारिखें, दुभाग केल्या सारिखें, अरेनें भोसकल्या सारिखें, अथवा कुऱ्हाडीनें फोडल्या सारिखें होतें.

पित्तजलक्षण.

तृष्णोष्मदाहमोहाःस्युःपैत्तिकेहृदयक्लमः॥धूमा
यनंच मूर्छाचस्वेदःशोषोमुखस्यच॥४५॥ ॥

अर्थ— पित्तज हृद्रोगा मध्यें, तृषा, किंचित दाह, मोह, आणि हृदयांची ग्लानि, धूर निघाल्या सारिखें वाटणें, मूर्छा, स्वेद, आणि तोंडाला कोरड, हीं लक्षणें होतात.

कफजलक्षण.

गौरवंकफसंस्त्रावोऽरुचिस्तंभोग्निमार्दवं॥माधु-
र्यमपिचास्यस्यबलासावततेहृदि॥५॥ ॥

अर्थ— कफानें हृदय व्याप्त झालें असतां जडत्व, कफाचा स्त्राव, अरुचि, हृदय ताठल्या सारिखें, अग्निमांद्य, तोंड गुळचट, हीं लक्षणें होतात.

त्रिदोषज लक्षण.

विद्यात्त्रिदोषंत्वपि सर्वलिंगं

अर्थ— सर्व लक्षणें ज्यांत दृष्टीस पडतील तो त्रिदोषज समजावा. या मध्यें कांहीं अपचार झाला असतां गांठ उत्पन्न होते, तीपासून कृमि होतात, चरकानें असेंच सांगितलें आहे, "त्रिदोषजेतु

हृद्रोगे योदुरात्मानिषेवते ॥ तिलक्षीरगुडादींश्चग्रंथिस्तस्योपजायते ॥ मर्मैकदेशेसंक्लेदंरसश्चाप्युपगच्छति ॥ संक्लेदात्क्रमयश्चास्य भवंत्युपहतात्मनः ॥ इति.

त्याचें हें लक्षण.

तीव्रार्तितोदंकृमिजंसकंडुं ॥ उत्क्लेदः ष्ठीवनंतोदः शूलंहृल्लासकस्तमः ॥ अरुचिःश्यावनेत्रत्वंशोषश्चकृमिजेभवेत् ॥ ६ ॥

अर्थ— तीव्र पीडेनें व टोंचणीनें व कंडूनें युक्त असा हृद्रोग कृमिजन्य जाणावा, उत्क्लेद (ओकारी आल्या प्रमाणें वाटणें) थुंकणे, तोद, (सुया टोंचल्या सारिखी पीडा) शूळ, मळमळ, अंधारी, अन्नद्वेष, डोळ्यानां काळिमा, आणि कोरड, हीं लक्षणें कृमिज हृद्रोगामध्यें होतात, जेज्जटाचें असें ह्मणणें आहे कीं "उत्क्लेदापासून तमापर्यंत" त्रिदोषजाचें लक्षण त्यांत तोद, शूल, हे वायू पासून, उत्क्लेद, हृल्लास, आणि ष्ठीवन हीं कफा पासून, आणि तम हें पित्तापासून होतात, आणि अरुची पासून कृमिजाचें लक्षण होय, या विषयीं प्रत्येक आचार्यांचीं मतें भिन्नभिन्न आहेत.

सर्वांचेउपद्रव.

क्लोम्नःसादोभ्रमःशोषोज्ञेयास्तेषामुपद्रवाः ॥ कृमिजेकृमिजातीनांश्लैष्मिकाणांचयेमताः ॥ ७ ॥ इतिहृद्रोगनिदानम् ॥

अर्थ— क्लोम ह्मणजे पिपासा स्थान त्याची ग्लानि होस्ये, भ्रम, शोष हें त्यांचे उपद्रव जाणावें, — कफज कृमीचे जे उपद्रव सांगितले आहेत ते कृमिज हृद्रोगामध्ये होतात, तेअसे, " हृल्लासमा

## मूत्रकृच्छ्रनिदान.

व्यायामतीक्ष्णौषधरूक्षमद्यप्रसंगनित्यद्रुतपृ-
ष्ठयानात्॥ आनूपमत्स्याध्यशनादजीर्णात्स्युर्मूत्र
कृच्छ्राणिनृणामिहाष्टौ॥१॥

अर्थ— व्यायाम, तीक्ष्णौषध, रूक्षपदार्थ, दररोजमद्यप्राशन, निरंतर घोड्यावर बसून प्रवास करणें, जळाजवळ संचार करणाऱ्या पक्ष्यादिकांचें मांस, आणिमत्स्य, जेवणावर जेवण, आणि कच्चे पदार्थ, इत्यादिकांच्या सेवनानें मनुष्यास मूत्रकृच्छ्र रोग (उन्हाळी) होतो तो आठ प्रकारचा आहे— पृथक् दोषानीं ३ सन्निपातानें १ शल्यज १ पुरीषज, १ शुक्रज १ आणि अश्मरीजन्य १ मिळून ८ झाली

### संप्राप्ति.

पृथङ्मलाः स्वैःकुपितानिदानैः सर्वेथवाकोपमु
पेत्यबस्तौ॥ मूत्रस्यमार्गंपरिपीडयंतियदातदा-
मूत्रयतीहकृच्छ्रात्॥२॥

अर्थ— स्वकारणानीं कुपित झालेले वातादि दोष अथवा सर्वदोष बस्तीमध्यें कोप पावून जेव्हां मूत्राचा मार्ग पीडित करितात तेव्हा मनुष्याला मोठ्या कष्टानें मुताया ला होतें.

### पैत्तिकमूत्रकृच्छ्र

पीतंसरक्तंसरुजंसदाहंकृच्छ्रंमुहुर्मूत्रयतीहपि-

तात्॥३॥

अर्थ— पैत्तिक मूत्र कृच्छ्रानें पिंवळें यत्किंचित् लाल वेदनायुक्त अग्नी प्रमाणें वारंवार कष्टानें मुतायाला होतें.

### वातिकमूत्र कृच्छ्र.

तीव्रार्तिरुग्वंक्षणबस्तिमेढ्रे स्वल्पंमुहुर्मूत्रयती
ह वातात् ॥४

अर्थ—वातिकमूत्र कृ॰अंडसंधी, मूत्राशय, आणि शिश्न ह्यांच्या ठिकाणीं तीव्र वेदना होतात् आणि मुतायाला थोडें थोडें आणि वरचेवर होतें.

### कफ मूत्र कृच्छ्र.

बस्तेःसलिंगस्यगुरुत्वशोथौमूत्रंसपिच्छं कफ
मूत्र कृच्छ्रे॥

अर्थ— कफाच्या मूत्र कृच्छ्रानें लिंग आणि बस्ति ह्यानां जडत्व- व सूज येते, आणि मूत्र बुळबुळीत होतें.

### सन्निपात कृच्छ्र.

सर्वाणि रूपाणितुसन्निपातात्भवंतितत् कृच्छ्र
तमंतु कृच्छ्रं॥४॥

अर्थ— सन्निपातानें सर्व लक्षणें होतात, हें मूत्र कृच्छ्र कष्टसाध्य होतें.

### शल्यज लक्षण.

मूत्रवाहिषुशल्येनक्षतेष्वभिहतेषुच॥मूत्रकृच्छ्रं
तदाघाताज्जायतेभृशदारुणम्॥वातकृच्छ्रेणतु
ल्यानितस्यलिंगानिलक्षयेत्॥५॥

वात मूत्र कृच्छ्राच्या लक्षणा सारखी होतात.

## पुरीषजन्यमूत्रकृच्छ्र.

शकृतस्तु प्रतीघाताद्वायुर्विगुणतांगतः॥आध्मा
नंवातसंगंचमूत्रसंगंकरोतिच॥ ६॥

अर्थ— मळाचा अवष्टंभ झाल्यानें वायु विगुण (उलटा) होऊन आध्मान, वात शूल, मूत्र गुंतणें हीं करितो.

## अश्मरीजन्यमूत्रकृच्छ्र

अश्मरीहेतुतत्पूर्वंमूत्रकृच्छ्रमुदाहरेत्॥

अर्थ— मुतखड्याच्या योगानें जें मूत्र कृच्छ्र होतें, त्याला अश्मरी जन्य मूत्र कृच्छ्र म्हणावें.

## शुक्रजमूत्रकृच्छ्र

शुक्रेदोषैरुपहतेमूत्रमार्गेविधारिते॥ सशुक्रंमूत्रयेत्कृच्छ्राद्बस्तिमेहनशूलवान्॥ ७

अर्थ— दोषांच्या योगानें शुक्र दुष्ट होऊन मूत्रमार्ग कोंडला म्हणजे कष्टानें मूत्र होतें, व मूत्रा बरोबर शुक्र धातु स्रवतो, आणि बस्ति व शिश्न यांस ठणका लागतो.

## अश्मरी आणि शार्करायांचे साम्य आणि अवांतरभेदसां.

अश्मरीशर्कराचैवतुल्यसंभवलक्षणे॥ विशेषणंशर्करायाः शृणुकीर्तयतोमम॥ ८॥ पच्यमानाश्मरीपित्ताच्छोष्यमाणाचवायुना॥ विमुक्तकफ-

संधानाक्षरंतीशर्करामत्ता॥९॥ हृत्पीडावेपथुःशूलंकुक्षावग्निश्चदुर्बलः॥ तथाभवतिमूर्छाचमूत्रकृच्छ्रंचदारुणम्॥१०॥ इतिमूत्रकृच्छ्रनिदानम्॥॥

अर्थ— अश्मरी आणि शर्करा (खर) ह्या दोहींची उत्पत्ति आणि लक्षणें सारखींच आहेत, परंतु त्यामध्यें थोडासा विशेष आहे तो सांगतों, पित्तानें पक्व होणारी, आणि वायूनें शोषित होणारी, अशी अश्मरी कफानें बांधली नाहींतर मूत्रा वाटे खरू लागते, तिलाच शर्करा म्हणतात, त्या शर्करेच्या योगानें हृदयास पीडा, कंप, कुशींत शूळ, अग्नि दुर्बळ, मूर्छा आणि भयंकर मूत्रकृच्छ्र हे रोग होतात. इतिमूत्रकृच्छ्रनिदानंसमाप्तम्॥

मधुकोशंकृनिर्मथ्यसारमाकृष्यवैमया॥ व्याख्याकृता महाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥

---

## मूत्राघातनिदान.

जायंतेकुपितैर्दोषैर्मूत्राघातास्त्रयोदश॥ प्रायोमूत्रविघाताद्यैर्वातकुंडलिकादयः॥१॥

अर्थ— मूत्रवेग विधारणादिकें करून(आद्यशब्दानेंपुरीषशुक्रादिवेग विघात आणि रूक्षाशनादिक समजावीं.) कुपित झाले त्या दोषानीं वातकुंडलिकादिक तेरा प्रकारचे मूत्राघात होतात.

### वातकुंडलिकालक्षण.

रौक्ष्याद्वेगविघाताद्वावायुर्बस्तौसवेदनः॥ मूत्रमाविश्यचरति विगुणःकुंडलीकृतः॥२॥ मूत्रमल्पाल्पमथवासरुजंसंप्रवर्तते॥ वातकुंडलिकां-

[illegible]
म वावटळी सारिखा फिरत राहातो, तेणें करून मूत थोडें थोडें होतें, वत्तिडीक लागते, त्या भयंकर व्याधीला वातकुंडलिका ह्मणावें.

### अष्ठीलालक्षण.

आध्मापयन्बस्तिगुदंरुध्वावायुश्चलोन्नतां ॥कुर्या
त्तीव्रार्तिमष्ठीलांमूत्रमार्गावरोधिनीम्॥४॥ ॥

अर्थ— वायु हा बस्तिआणि गुद त्यांस फुगवून वरोध करून चंचल आणि उन्नत अशी अष्ठीला (दगडा सारिखी गांठ) करितो ती मूत्रमार्गाचा रोध करित्ये.

### वातबस्तिल.

वेगांवि धारयेद्यस्तु मूत्रस्याकुशलोनरः॥निरुणद्धि
मुखंतस्यबस्तेर्बस्तिगतोनिलः॥५॥मूत्रसंगोभवे
त्तेन बस्तिकुक्षिनिपीडितः॥ वातबस्तिः सविज्ञेयो.
व्याधिः कृच्छ्रमसाधनः॥६॥

अर्थ—जो अडाणी मनुष्य मूत लागलें असतां मुताया ला जात नाहीं, त्याच्या बस्तीं तला वायु बस्तीचें तोंड बंद करितो, तेणें करून मूत बंद होतें, तो वायु बस्तिआणि कुशी त्यामध्यें पिडून राहातो, त्या व्याधीला वातबस्ति असें ह्मणतात, हा कष्टानें साध्य होतो.

### मूत्रातीतलक्षण

चिरंधारयतोमूत्रंत्वरयानप्रवर्तते॥मेहमानस्यमं
दंवामूत्रातीतःसउच्यते॥७॥

अर्थ— फारवेळ मूत्र कोंडून धरलें असतां तें त्वरेनें प्रवृत्त होत नाहीं व मुतायास लागलें असतां हळूं हळूं होतें त्या रोगाला मूत्रातीत ह्मणतात.

## मूत्रजठरल०

मूत्रस्य वेगेभिहते तदुदावर्तहेतुकः॥ अपानः कुपितो वायुरुदरं पूरयेद्भृशम्॥ ८॥ नाभेरधस्तादाध्मानं जनयेत्तीव्रवेदनम्॥ तन्मूत्रजठरं विद्यादधोबस्तिनिरोधजम्॥ ९॥

अर्थ— मूत्राचा वेग धरला असतां मूत्र धरल्यामुळें उत्पन्न झालेल्या उदावर्तास कारण भूत असा अपान वायु कुपित होऊन फार पोट फुगवितो, आणि बेंबीच्या खालीं (ह्म० ओटींत) आध्मान उत्पन्न करितो, त्यांत वेदना फार होतात, अधो बस्तीचा वेग रोध करणारा अशा त्या रोगास मूत्रजठर असें ह्मणतात.

## मूत्रोत्संगलक्ष०

बस्तौ वाप्यथवा नाले मणौ वा यस्य देहिनः॥ मूत्रं प्रवृत्तं सज्जेत सरक्तं वा प्रवाहतः॥ १०॥ स्रवेच्छनैरल्पमल्पं सरुजं वाथ नीरुजम्॥ विगुणानिलजो व्याधिस्स मूत्रोत्संगसंज्ञितः॥ ११॥

अर्थ— प्रवृत्त झालेलें मूत्र बस्तीमध्यें अथवा शिश्नामध्यें अथवा शिश्नाच्या अग्रभागीं अडकून राहातें आणि बळेंच कुंथून मुतलें असतां वायूनें बस्ति फाडून जें मूत्र निघतें तें हळूं हळूं थोडें थोडें तिडीक लागून अथवा तिडके वांचून रक्तसहित स्रवतें, विगुण वायु पासून उत्पन्न झालेल्या त्या व्याधीस मूत्रोत्संग असें ह्मणतात.

अर्थ— रूक्ष झालेल्याव म्लान देह झालेल्या अशा पुरुषाच्या बस्तींत कफपित्त आणि वायू मूत्राचा क्षय करितात, तेणेंकरून तिडीक व जळजळ होत्ये, त्याला मूत्रक्षय ह्मणावें.

## मूत्रग्रंथिलक्षण.

अंतर्बस्तिमुखेवृत्तःस्थिरोल्पःसहसाभवेत्॥अ
श्मरीतुल्यरुक्ग्रंथिर्मूत्रग्रंथिःसउच्यते॥१३॥ ॥

अर्थ— बस्तीच्या तोंडामध्यें वाटोळी, स्थीर, लहानशी गोळी अकस्मात् होते, तिची पीडा मुतखड्या सारिखीच होते, त्या रोगाला मूत्रग्रंथि असें ह्मणतात.

## मूत्रशुक्रलक्षण.

मूत्रितस्यस्त्रियंयातोवायुनाशुक्रमुद्धृतम्॥स्था
नाच्युतंमूत्रयतःप्राक्पश्चाद्वाप्रवर्तते॥१४॥भ-
स्मोदकप्रतीकाशंमूत्रशुक्रंतदुच्यते॥

अर्थ—मुतायाला लागून स्त्रीसंग केला असतां वायू त्या शुक्राला उडवितो, तें स्थानापासून भ्रष्ट झालेलें शुक्र मुततानां पहिल्यानें किंवा मुतल्या नंतर प्रवृत्त होतें, तें पाण्यांत भस्म कालवल्या सारिखें दिसतें, त्याला मूत्र शुक्र असें ह्मणतात.

## ऊष्णवातलक्षण.

व्यायामाध्वातपैः पित्तं बस्तिं प्राप्यानिलायुतं ॥१५ बस्तिं मेढ्रं गुदं चैव प्रदहेत्स्रावयेदधः ॥ मूत्रं हारिद्र मथवा सरक्तं रक्तमेव च ॥ १६ ॥ कृच्छ्रात् पुनः पुनर्जंतो रुष्णवातं वदंति तम् ॥

अर्थ— व्यायाम, अतिमार्गगमन, आणि ऊन लागणें या कारणा नीं कुपित झालेलें पित्त बस्तींत जाऊन वायूला मिळून बस्ति, मेंढ्र, आणि गुद त्यांचा दाह करितें, आणि हळदवट, तांबूस, अथवा लाल, अशा मूत्राचा स्राव वारंवार कष्टानें करितें, त्या रोगाला उष्णवात असें ह्मणतात.

## मूत्रसादलक्षण.

पित्तं कफो वा द्वौ वापि संहन्येते ऽनिलेन चेत् ॥ कृच्छ्रा न्मूत्रं तदा पीतं रक्तं श्वेतं घनं सृजेत् ॥ सदाहं रोचना शंखचूर्णवर्णं भवेत्तु तत् ॥ शुष्कं समस्तवर्णं वा मू त्रसादं वदंति तम् ॥

अर्थ— पित्त किंवा कफ अथवा दोन्ही वायूनें घट्ट केले तर पिंवळें, तांबडें, पांढरें, घट्ट असें मूत्र कष्टानें होतें, व मुततेवेळीं आग हो तें, जमिनीवर सुकलें ह्मणजे गोरोचन, शंखाचें चूर्ण त्याच्या रंगाचें अथवा सर्व रंगाचें होतें, त्या रोगाला मूत्रसाद, ह्मणतात.

## विड्विघातलक्षण.

रूक्ष दुर्बलयोर्वातेनोदावर्तं शकृद्यदा ॥ १९ ॥ मू त्रस्रोतोऽनुपद्येत विट्संसृष्टं तदा नरः ॥ विड्गंधं मूत्रयेत्कृच्छ्रा द्विड्विघातं विनिर्दिशेत् ॥ २० ॥

अर्थ— रूक्ष आणि दुर्बळ पुरुषाचें शकृत् (मळ) जेव्हां वा.

मुरुर फाडून आणतो, तेव्हां तें मूत्रमार्गा मध्यें येतें, त्यावेळेस मनुष्य मुतूं लागला ह्मणजे कष्टानें मुततो, त्याच्या मूत्राला विष्ठेची घाण येते, त्याला विड्विघात ह्मणावें.

### बस्तिकुंडल लक्षण.

द्रुताध्वलंघनायासैरभिघातात्प्रपीडनात्॥ स्वस्थानाद्वस्तिरुद्वृत्तः स्थूलस्तिष्ठति गर्भवत्॥ २१॥ शूल स्पंदन दाहार्तो बिंदुं बिंदुं स्रवत्यपि॥ पीडितस्तु सृजेद्धारां संरंभोद्वेष्टनार्तिमान्॥ २२॥ बस्तिकुंडलमाहुस्तं घोरं शस्त्रविषोपमम्॥ पवनप्रबलं प्रायो दुर्निवारमबुद्धिभिः॥२३॥

अर्थ— जलदी वाट चालण्यानें, लंघनानें, आयास केल्यानें, दगड काठी वगैरे लागण्यानें, रगडण्यानें, बस्ति स्वस्थान सोडून वर गेला असतां मोठा होऊन गर्भासारिखा कठीण राहातो, तेणें करून शूळ कांपणें आणि दाह, हीं होतात, मुताचा एकेक बिंदु गळतो, जर बस्तिओटीनें पिळला तर मोठी धार उडते, बस्ति सुजतो व पेट त्याची पीडा होत्ये, त्या रोगाला बस्तिकुंडल असें ह्मणतात, हा शस्त्रविषतुल्य भयंकर आहे, त्यांत प्रायः वायु प्रबळ असतो, मंद बुद्धि वैद्यांस त्याचे निवारण करणें कठीण पडतें.

### त्यालाच अन्य दोषांचा संबंध झाल्यानें जें लक्षण होतें तें.

तस्मिन्पित्तान्विते दाहः शूलं मूत्रविवर्णता॥ श्लेष्मणा गौरवं शोथः स्निग्धं मूत्रं घनं सितम्॥ २४॥ श्लेष्मरुद्धबिलो बस्तिः पित्तोदीर्णो न सिध्यति॥ अवि-

भ्रांतबिल:साध्योनचय।कुंडलीकृत:॥स्याद्वस्तौ कुंडलीभूते तृण्मोहश्वासएवच॥२५॥ इतिमूत्राघातनिदानम्॥

अर्थ— तो पित्तयुक्त झाला असतां दाह आणि मूत्राचा बेरंग होतो, आणि कफयुक्त झाला असतां जडत्व, सूज, आणि मूत्र स्निग्ध, घट्ट व पांढरें होतें.

**साध्यासाध्य लक्षण.** कफानें ज्याचें तोंड चोंदलें आहे असा व पित्तानें व्याप्त झालेला असा बस्ति साध्य होत नाहीं, ज्या बस्तीचें तोंड मोकळें आहे वजो कुंडली कृत झालेला नाहीं तो साध्य होतो, **कुंडलीभूताचें लक्षण** बस्ति कुंडली भूत झाला असतां तृषा, मोह, आणि श्वास, हे होतात, इतिमूत्राघातनिदान-

मधुकोशंसुनिर्मथ्यसारमाकृष्य वैमया॥ व्याख्याकृता महाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥ ॥

## अश्मरीनिदान.

वातपित्तकफैस्तिस्रश्चतुर्थीशुक्रजापरा॥ प्राय: श्लेष्माश्रया: सर्वा अश्मर्यस्युर्यमोपमा:॥१॥

अर्थ— वात, पित्त, कफ, यांपासून ३ चवथा शुक्रा पासून अश्मरी रोग (मुतखडा) होतो, त्या अश्मरी बहुत करून कफाश्रित असतात, यमोपमा म्हणजे चांगली चिकित्सा न मिळाली तर त्या अवश्य प्राण घेतात.

### संप्राप्ति.

विशोषयेद्बस्तिगतंसशुक्रं मूत्रंसपित्तंपवन: क-

फंवा ॥ यदाथदाश्मर्युपजायतेच क्रमेणपित्तेष्वि
वरोचनागो ॥॥ २॥ ॥ ॥

अर्थ—ज्यावेळेस वायु बस्तीतलें शुक्र युक्त किंवा पित्त युक्त मूत्र किंवा कफाला सुकवितो, तेव्हां अश्मरी (मुतखडा) होते, जसें गाईच्या पित्तामध्यें गोरोचन जमतें तसें बस्तीमध्यें शुक्रादिक- गोठून खडा होतो.

## पूर्वरूप.

नैकदोषाश्रयाः सर्वाअश्मर्याः पूर्वलक्षणाम् ॥ ब
स्त्याध्मानंतदासन्नदेशेषुपरितोतिरुक् ॥ ३ ॥ मू-
त्रेबस्तसगंधत्वंमूत्रकृछ्रंज्वरोरुचिः ॥

अर्थ— सर्व अश्मरी अनेक दोषाश्रित आहेत.

बस्ति फुगणें, बस्तीच्या आस पास अत्यंत पीडा होणें, मुताला बोकडाच्या मुताची घाण, मूत्रकृछ्र, ज्वर, आणि अरुचि, हें अश्मरीचें पूर्व रूप होय.

## अश्मरीचेंसामान्यल०

सामान्यलिंगंरुङ्नाभिसेवनीबस्तिमूर्धसु ॥ विशी
र्णधारंमूत्रंस्यात्तयामार्गनिरोधने ॥ तव्द्यपाया
त्सुखंमेहेदच्छंगोमेदकोपमं ॥ ५ ॥ तत्संक्षोभा-
त्क्षतेसास्रमायासाच्चातिरुग्भवेत् ॥ ५ ॥

अर्थ— नाभि शिवण, आणि बस्तीचें अग्र त्यांच्या ठिकाणीं शूल, अश्मरीच्या योगानें मूत्राचा मार्ग कोंडला ह्मणजे मुताची धार फाटते, अश्मरी मूत्र मार्गापासून पली कडे गेली ह्मणजे मुतायाला इजा होत नाहीं, आणि मूत्र स्वच्छ गोमेद मण्या सारिखें होतें, अ

श्मरीच्या योगानें बस्तीमध्यें क्षत झालें असतां रक्तमिश्रित मूत्र होतें व मुततांना जोर केला तर फार क्लेश वपीडा होते, हें सामान्य लक्षण होय.

### वाताश्मरीलक्षण.

तत्रावाताद्भृशार्तो दंतान्खादति वेपते॥ मृद्गाति मेहनं नाभिं पीडयत्यनिशं क्कणन्॥ ६॥ सानिलं मुंचति शकृत्मुहुर्मेहति बिंदुशः॥ श्यावारूक्षाश्मरीचास्यस्याच्चिता कंटकैरिव॥ ७॥

अर्थ— वायूच्या अश्मरीनें रोगी अत्यंत पीडेनें व्यास होतो, दांत खातो, कांपतो, शिश्न कुसकरतो, बेंबी रगडतो, आणि रात्रंदिवस दुःखानें ओरडतो, आणि मूत्र होण्यासाठीं कुंथूं लागला ह्मणजे वायूसरून मूत स्फटतो, वारंवार मुताचा थेंब थेंब गळतो, त्याची अश्मरी नीलवर्ण, रूक्ष असून तिच्यावर कांटे असतात.

### पित्ताश्मरी लक्षण.

पित्तेन दह्यते बस्तिः पच्यमान इवोष्मवान्॥ भल्लातकास्थिसंस्थाना रक्तापीताऽसिताश्मरी॥ ८॥

अर्थ— पित्ताच्या अश्मरीनें बस्तीमध्यें आग होत्ये, आणि क्षारानें जसा कायदा होतआहे अशी वेदना होते, बस्तीवर हात ठेवला तर कढत लागतो, आणि अश्मरी बिब्यांतील गोडंबी येवढी लाल, पिंवळी, किंवा काळी असते.

### कफजअश्मरी ल०

बस्तिर्निस्तुद्यत इव श्लेष्मणा शीतलो गुरुः॥ अश्मरी महती श्लक्ष्णा मधुवर्णाथवा सिता॥ ९॥

अश्मरी बहुधा बालकांस होतात म्हणून सांगतो.

एताभवंतिबालानांतेषामेवच भूयसा॥आश्रयो

पचयाल्पत्वात्ग्रहणाहरणेसुखा:॥१०॥

अर्थ— त्या मागें सांगितलेल्या त्रिदोषज अश्मरी बहुत करून बालांस च होतात, कारण त्यांचा आहार गुरु, मधुर, शीतस्निग्ध असतो. आणि त्यांचा बस्ति लहान व पुष्टता नसते, म्हणून त्या फाडून ओढून काढण्यास कठीण पडत नाहींत.

## शुक्राश्मरीलक्षण.

शुक्राश्मरीतुमहतांजायतेशुक्रधारणात्॥स्थाना

च्युतमसुक्तंहिमुष्कयोरंतरेऽनिल:॥११॥शोषयत्यु

पसंहृत्यशुक्रंतच्छुष्कमश्मरी॥ बस्तिरुक्कृच्छ्रमू

त्रत्वमुष्कश्वयथुकारिणी॥ १२॥तस्यामुत्पन्नमात्रा

यांशुक्रमेतिविलीयते॥ पीडितेत्ववकाशोस्मिन्न-

श्मर्येवचशार्करा॥ १३॥ ॥ ॥

अर्थ— शुक्राश्मरी ही शुक्रधारणानें मोठ्यासच होत्ये, मैथुन काळीं स्थानापासून सुटलेलें शुक्र पुरतें मैथुन न केल्यामुळें न सोडलें तर वायु त्या शुक्राला शिश्नाच्या आणि वृषणाच्या मध्यें आणून शोषितो, त्या शुष्क झालेल्या शुक्राची अश्मरी बनते, तिच्या योगानें बस्तिशूळ, उन्हाळ्या, आणि वृषणाला सूज येते, ती उत्पन्न

होतां क्षणींच शक्त येतें, आणि तो अवकाश ह्मणजे, मेंढ्र, वृषण मध्य दाबला असतां ती पातक होते.

अश्मरी ही व सिकता व शर्करा होते, असें मानावें, शर्करा आणि सिकता यां मध्यें लहानमोटेपणानें भेद आहे. मोठी होते ती शर्करा आणि बारीक रेव पडते ती सिकता.

## अश्मरीशर्करा वतिजपासून उपद्रव.

अणुशो वायुनाभिन्नासातस्मिन्ननुलोमगे॥ निरेतिसह मूत्रेण प्रतिलोमेविबध्यते॥ १४॥ मूत्रस्रोत: प्रवृत्तासासक्ता कुर्यादुपद्रवान्॥ दौर्बल्यंसदनं कार्श्यं कुक्षिशूलमथारुचिम्॥ १५॥ पांडुत्वमुष्णवातंच तृष्णां हृत्पीडनं वमिं॥

अर्थ— वायु बस्ती मध्यें अनुलोम असतां वायूनें ती थोडी थोडी फुटली ह्मणजे मूत्राबरोबर बाहेर पडते, आणि वायु प्रतिलोम-झाला असतां बंद होते, ती मूत्र मार्गांत येऊन बसली ह्मणजे दौर्बल्यादि उपद्रव करिते, शेषं सुगमं।

## असाध्यलक्षण.

प्रशूननाभिवृषणं बद्धमूत्रंरुजान्वितम्॥ अश्मरीक्षपयात्याशु शर्करासिकतान्विता॥ १६॥ इतिअश्मरीनिदानम्

अर्थ— ज्याचे नाभि आणि वृषण सुजले आहेत, मूत्र गुंतलें आहे, वेदना होत आहे, अशा पुरुषाला शर्करा, व सिकता युक्त अश्मरी खपविते. इति अश्मरी निदान व्याख्या

मधुकोशांक निर्मथ्यसारमाकृष्यवैमया॥ व्याख्याकु

## मेहनिदान.

आस्यासुखंस्वप्नसुखंदधीनिग्राम्योदकानूपर
साःपयांसि॥ नवान्नपानंगुडवैकृतंचप्रमेहहेतुः
कफकृच्चसर्वम्॥१॥

अर्थ– बसण्यानें सुख, निद्रासुख, दहीं, गांवांतील आणि उदकां तील प्राण्याचे मांसरस, दूध, नवान्न, आणि नवोदक, साखर, काकवी इत्यादिगुडविकार, अथवा गुळाचे पदार्थ, हे आणि जेवढे कफ कर ह्मणून पदार्थ आहेत ते सर्व प्रमेह होण्यास कारण आहेत.

कफपित्तवातमेहांचीअनुक्र
मानेंसंप्राप्तिसांगतो.

मेदश्चमांसंचशरीरजंचक्लेदःकफोबस्तिगतंप्रदू
ष्य॥ करोतिमेहान्समुदीर्णमुष्णैस्तानेवपित्तंपरि
दूष्यचापि॥ क्षीणेषुदोषेष्ववकृष्यधातून्संदूष्य
मेहान्कुरुतेनिलश्च॥ साध्याःकफोत्थादशपित्त
जाःषड्याप्यानसाध्याःपवनाच्चतुष्काः॥ समक्रि
यत्वाद्विषमक्रियत्वान्महात्ययत्वाच्चयथाक्रमंते॥

अर्थ— बस्तिगत कफ हा मेद, मांस, आणि शरीरांतला क्लेद ह्यां स दुष्ट करून मेह उत्पन्न करितो, तसेंच ऊष्ण पदार्थांनीं कोपले लें पित्त त्या मेदादिकांसच दुष्ट करून मेह उत्पन्न करितें, आणि वायू हा आपल्या पेसां दोषक्षीण झाले असतां धातूस(ह्म० वसा मज्जादिक) ओढून (बस्तीच्या तोंडाशीं आणून) मेह उत्पन्न करि

नी, कफापासून झालेले मेह दहा आहेत, ते साध्य होतात, कारण, कफदोष आणि मेद:प्रभृति दूष्यें यांवर कटुतिक्तादिक्रिया समान आहे, आणि येथें व्याधि महिमाही असाच आहेकीं, प्रमेहामध्यें तुल्य दूष्यतेला साध्यत्व सांगितलें आहे, -पित्तजमेह सहा ते विषम चिकित्से मुळें याप्य होतात, पित्त हरण करणारें जें शीत मधुरादि द्रव्य तें मेदादिकाचें वाढविणारें, आणि मेद हरणारें ऊष्ण कटुकादि तें पित्तकर होतें, असें क्रियावैषम्य आहे, वायूपासून चार मेह होतात ते मज्जादि गंभीर धातूंचें आकर्षण होऊन फारपीडा होत्ये, आणि विषमक्रियत्व ही येथें आहे म्हणून ते असाध्य होतात.

## प्रमेहाचादोषदूष्यसंग्रह

कफ: सपित्तंपवनश्चदोषामेदोस्त्रशुक्रांबुवसालसीका:॥ मज्जारसौज:पिशितंचदूष्या: प्रमेहिणांविंशतिरेवमेहा:॥

अर्थ— कफ, पित्त, आणि वायू हे दोष आणि, मेद, रक्त, शुक्र, उदक, मांसस्नेह(चर्बी) लस, मज्जा, रस, ओज आणि मांस, हीं दूष्यें जाणावीं, आणि त्या पासून रोग्यास वीस मेह होतात.

## पूर्वरूप.

दंतादीनांमलाढ्यत्वं प्राग्रूपंपाणिपादयो:॥ दाहश्चिक्कणतादेहे तृट्श्वासश्चोपजायते॥

अर्थ— दंत (आदि शब्दानें जिव्हा तालु हीं घ्यावीं) यांवर पुष्कळ मळ जमतो, हाता पायांचा दाह, अंगाला चिकण पणा, तृषा, श्वास, चकारें करून केशजटिली भाव आणि नखाभिवृद्धि.

जाणाव्या, हें पूर्व रूप होय.

## सामान्यलक्षण.

सामान्यंलक्षणंतेषांप्रभूताविलमूत्रता ॥

अर्थ—पुष्कळआणि गडूळ मूत्र होणें हें मेहाचें सामान्य लक्षण होय.

## प्रमेहाचें कारण.

दोषदूष्याविशेषेपितत्संयोगविशेषतः ॥ मूत्रवर्णादिभेदेनभेदोमेहेषुकल्प्यते॥

अर्थ— दोष आणि दूष्यें यांचा भेद नसतां त्यांच्या संयोग भेदें करून मूत्रवर्णादि भेदानें मेहा मध्यें भेद कल्पावा, जसे—पांढरा, काळा, पिंवळा, तांबडा आणि श्याम, त्या रंगांचा संयोग केल्यानें पिंगल पाटलादि अनेक वर्णभेद होतात, या प्रमाणें दोषादि संयोगानें नाना प्रकारचे मेह होतात, संयोग भेदाची प्रतीति कोठून कराची असें म्हटलें तर सांगतों, — मूत्राचा वर्णादिभेद पाहून समान कारणाचा भेद कल्पावा, जसे घट करिते वेळीं मृत्तिकादि कारण सामग्रींत भेद नसला तरी कुंभकारादि संयोग भेदानें घट शरावादिक अनेक जाती होतात.

## कफजमेह १० त्यांचीं लक्षणें.

अच्छंबहुसितंशीतंनिर्गंधमुदकोपमम् ॥ मेहत्युदकमेहेनकिंचिदाविलपिच्छिलं ॥ इक्षोरसमिवात्यर्थंमधुरंचेक्षुमेहतः ॥ सांद्रीभवेत्पर्युषितंसांद्रमेहेनमेहति ॥ सुरामेहीसुरातुल्यंउ

पर्यच्छमधोघनम्॥ संहृष्टरोमापिष्टेन पिष्टवद्बहलंसितं॥ शुक्राभं शुक्रमिश्रं वा शुक्रमेही प्रमेहति॥ मूत्राणून्सिकतामेहीसिकतारूपिणोमलान्॥ शीतमेहीसुबहुशोमधुरंभृशशीतलम्॥ शनैः शनैः शनैर्मेहीमंदंमंदंप्रमेहति॥ लालातंतुयुतंमूत्रंलालामेहेनपिच्छिलम्॥

अर्थ—उदकमेहानें स्वच्छ, पुष्कळ, शुभ्र, थंड, गंधरहित, पाण्यासारिखें, किंचित् गढूळ, आणि बुळबुळीत असें मूत्र होतें.

इक्षुमेहानें. उंसाच्या रसाप्रमाणें अत्यंत मधूर असें मूत्र होतें.

सांद्रमेहानें शिळें झालेलें मूत थिजतें.

सुरामेहानें. सुरेसारिखें वरती निवळ आणि खालीं दाट असें होतें.

पिष्टमेहानें. कालवलेल्या पिठासारिखें दाट आणि पांढरें मूत होतें, आणि मुतते वेळीं शाहारे येतात.

शुक्रमेहानें. शुक्रासारिखें किंवा शुक्रमिश्र मूत्र होतें.

सिकतामेहानें- मुताचे कण आणि वाळूचे सारिखे मळाचे खडे पडतात.

शीतमेहानें- मधूर, व अत्यंत गार असें वारंवार मुताया होतें.

शनैर्मेहानें. हळूं हळूं आणि मंद मंद मुताया होतें.

लालामेहानें- लाळेप्रमाणें तंतुयुक्त आणि बुळबुळीत मूत्र होतें

पित्तजमेह ६ त्यांचीं ल०

गंधवर्णरसैः स्पर्शैःक्षारेणक्षारतोयवत्॥ नील
मेहेननीलाभंकालमेहीमषीनिभं॥ हारिद्रमेही
कटुकंहरिद्रासन्निभंदहत्॥ विस्रंमांजिष्ठमेहे
नमंजिष्ठासलिलोपमम्॥ विस्रमुष्णंसलवणं
रक्ताभंरक्तमेहतः॥

अर्थ— क्षार मेहानें क्षारोदका प्रमाणें गंध, वर्ण, रुचि, आणि स्पर्श हीं मूत्राला असतात.

नीलमेहानें- निळ्या रंगाचें ह्मणजे चाष पक्ष्या सारिखें मूत होतें.

कालमेहानें. शाई सारिखें काळें मूत होतें.

हारिद्रमेहानें. तिखट, हळदी सारिखें आणि जळजळीत मूत्र होतें.

मांजिष्ठमेहानें- आम गंधि, आणि मंजिष्ठेच्या काढ्यासारिखें मूत होतें.

रक्तमेहानें— दुर्गंधयुक्त, कढत, खारट आणि रक्ता प्रमाणें लाल मुताचा होतें.

वातमेह ४ त्यांचीं लक्षणें.

वसामेहीवसामिश्रंवसाभंमूत्रयेन्मुहुः॥ मज्जा
भंमज्जमिश्रंवामज्जमेहीमुहुर्मुहुः॥ कषायम
धुरंरूक्षंक्षौद्रमेहंवदेद्बुधः॥ हस्तीमत्तइवाजस्रं
मूत्रंवेगविवर्जितम्॥ सलसीकंविबद्धंचहस्ति
मेहीप्रमेहति॥

अर्थ— वसामेही वसा (चर्बी) युक्त किंवा वसे सारिखें वारंवार मुततो.

मज्जमेही. मज्जे सारिखें किंवा मज्जेनें मिश्र आणि वारं वार मुततो

क्षौद्रमेही- तुरट, मधुर आणि स्निग्ध, असें मुततो.

हस्तिमेही. माजलेल्या हत्ती प्रमाणें निरंतर वेग रहित, लसेनें मिश्रित, आणि अडकत अडकत असें मुततो.

## कफजमेहोपद्रव.

अविपाकोऽरुचिश्छर्दिर्ज्वरः कासः सपीनसः ॥
उपद्रवाः प्रजायंते मेहानां कफजन्मनाम् ॥

अर्थ— अन्नाचा पाक नहोणें, अरुचि, ओकारी, ज्वर, ओला खोकला, व पडसें हे कफ मेहाचे उपद्रव जाणावे.

## पित्तमेहोपद्रव.

बस्तिमेहनयोः शूलं मुष्कावदरणं ज्वरः ॥ दाहस्तृष्णाम्लिकामूर्छाविड्भेदः पित्तजन्मनाम् ॥

अर्थ— बस्ति आणि लिंग यांचे ठाई टोचल्या सारिखी पीडा, वअंडा वरची त्वचा पिकून फाटल्ये, ज्वर, तृषा, आंबट ढेंकर, — मूर्छा, आणि मळ पातळ होणें, हे पित्त मेहाचे उपद्रव जाणावे.

## वातमेहोपद्रव.

वातजानामुदावर्तः कंठहृद्ग्रहलोलताः ॥ शूलमुन्निद्रताशोषः कासश्वासश्च जायते ॥

अर्थ— उदावर्त, गळा, हृदय, यांचा निरोध, लोलता (सर्व रस भक्षणेच्छा,) शूल, निद्रा नाश, शोष, सुका खोकला, श्वास, हेवा

त मेहाचे उपद्रव जाणावे.

### मेहाचें असाध्यलक्षण.

यथोक्तोपद्रवाविष्टमतिप्रस्रुतमेवच॥ पिटिकापी-
डितंगाढंप्रमेहोहंतिमानवम्॥

अर्थ— वर सांगितलेल्या अविपाकादि उपद्रवानीं युक्त, ज्याचे मूत्राचा स्राव फार झाला आहे, शराविकादिपिटिकानीं युक्त, रोग आंगांत मुरलेला, अशीं लक्षणें झालीं असतां तो मेह मनुष्याला मारितो,

### दुसरें असाध्यलक्षण.

जातःप्रमेहीमधुमेहिनायोनसाध्यरोगःसहिबी
जदोषात्॥

अर्थ— मधुमेही पुरुषापासून उत्पन्न झालेल्या प्रमेही पुरुषाचा रोग बीजदोषामुळें साध्य होत नाहीं, एथें मधुमेह शब्दानें सामान्य मेह जाणावा,

### कुलपरंपरागत अन्य विकारांस असाध्यत्व सांगतात.

येचापिकेचित्कुलजाविकाराभवंतिताश्चप्रवदंत्य
साध्यान्॥

अर्थ— जे कांहीं कुष्ठादिक कुलपरंपरागत विकार आहेत, ते हीअसाध्य आहेत असें जाणावें

### सर्वप्रमेह उपेक्षेनें मधुमेहत्व पावतात ह्मणून सांगतात.

सर्वएवप्रमेहास्तुकालेनाप्रतिकारिणः॥ मधुमेह
त्वमायांतितदासाध्याभवंतिहि॥

अर्थ— सर्व प्रमेह औषध पोचलें नसतां काळें करून मधुमेहस्व-पावतात तेव्हां ते असाध्य होतात.

धातुक्षय आणिआवरण यांपासून कुपित झालेल्या वायूनें मधुमेहाचा संभव होतो तो सांगतो.

मधुमेहेमधुसमंजायतेसकिलद्विधा॥ क्रुद्धे धातुक्षयाद्वायौ दोषावृतपथेऽथवा॥

अर्थ— मधुमेहामध्यें मूत्र मधासारिखें होतें, तो दोन प्रकारचा, तो असा, धातुक्षयानें वायु कुपित होऊन होतो तो एक, आणि दोषानीं वायूचा मार्ग आवृत केल्यामुळें होतो तो दुसरा.

आवरणलक्षणसांगतो.

आवृतोदोषलिंगानिसोनिमित्तंप्रदर्शयन्॥ क्षीणः क्षणात्क्षणात्पूर्णो भजतेकृच्छ्रसाध्यताम्॥

अर्थ— आवृत वायूनें केलेला मधुमेह ज्यापित्तादि दोषानें आवृत झालेला असेल त्याचीं लक्षणे अकस्मात् दाखवितो, क्षणांत क्षीण होतो क्षणात्पूर्ण होतो, तो कष्टसाध्य जाणावा.

मधुमेहशब्दाच्याप्रवृत्ती विषयीं निमित्तसांगतो.

मधुरंयच्चमेहेषुप्रायोमध्विवमेहति॥ सर्वेपि मधुमेहाख्यांमाधुर्याच्चतनोरतः॥ इतिप्रमेह निदानम्॥ ॥

अर्थ— प्रमेहामध्यें रोगी प्रायशः मधासारिखे मधुर मुतता, आ

णि सर्व शरीराला मधुरत्व येतें, ह्मणून सर्व प्रमेहाला मधुमेह संज्ञा दिली आहे.

---

## प्रमेहपिटिकानिदान.

शराविकाकच्छपिकाजालिनीविनतालजी॥ मसूरिकासर्षपिकापुत्रिणीसविदारिका॥ विद्रधिश्चेतिपिटिकाः प्रमेहोपेक्षयादश॥ संधिमर्मसुजायंतेमांसलेषुचधामसु॥ २॥

अर्थ—प्रमेहाची उपेक्षा केल्यानें शराविकादि दश पिटिका संधि, मर्मे, आणि मांसल ठिकाणीं होतात.

## सर्वांचीं लक्षणें.

अंतोन्नताचतद्रूपानिम्नमध्याशराविका॥ सदाहा कूर्मसंस्थानाज्ञेयाकच्छपिकाबुधैः॥ जालिनीतीव्र दाहातुमांसजालसमावृता॥ अवगाढरुजोत्क्लेदापृष्ठेवाप्युदरेपिवा॥ महतीपिटिकानीलासाबुधैर्विनतास्मृता॥ रक्तासितास्फोटवतीदारुणात्वलजीभवेत् मसूरदलसंस्थानाविज्ञेयातुमसूरिका॥ गौरसर्षपसंस्थानातत्प्रमाणाचसर्षपी॥ महत्यल्पचिताज्ञेयापिटिकाचापिपुत्रिणी॥ विदारीकंदवद्वृत्ताकठिनाचविदारिका॥ विद्रधेर्लक्षणैर्युक्ताज्ञेयाविद्रधिकातुसा॥

अर्थ—शराविका. ही पिटिका कडेला उंच आणि मध्यें खोलगट, परळा सारिखी असते.

**कच्छपिका** ही कांसवाच्या पाठी सारिखी य त् किंचित् दाहयुक्त असते.

**जालिनी**- ही ती अदाहानें युक्त वमांसाच्या जाळयानें व्याप्त असते.

**विनता**. ही पुळी पाठीवर किंवा पोटावर होतेहिं चीपीडा खोल होतेवर्दीओलसर होते,हीमोठी व निळ्यारंगाची असते.

**अलजी**. ही तांबडी, काळी, बारीक फोडानी व्याप्त वभयंकर असते.

**मसूरिका**. मसूरेंच्या दाळिंबी सारिखी वतेवढी चअसतेती.

**सर्षपिका** . ही पांढऱ्या मोहोऱ्या सारखी व तेवढी असते.

**पुत्रिणी** - ही मध्यें एक मोठी पुळी असून हिच्या सभोवतील हान लहान फोड असतात

**विदारिका**. ही विदारीच्या कांद्या प्रमाणें वाटोळी असून कठीणअसते.

**विद्रधिका**. ही विद्रधीच्या लक्षणानी युक्त असते

**त्यापिटिकाकशानेंउत्पन्नहोताततेंसां॰**

**येयन्मयास्मृतामेहास्तेषामेतास्तन्मयाः॥विनाप्रमेहमप्येताजायंतेदुष्टमेदसः॥तावच्चैतानलक्ष्यंतेयावद्वास्तुपरिग्रहः॥**

अर्थ— जे मेह ज्या दोषानें उल्बण असतील त्यानां त्याच दोषांचाउल्बणानें पिटिका होतील, त्यापिटिका प्रमेहावांचून ही मेद दुष्ट झालेल्या पुरुषास होतात, जों पर्यंत त्यांची गांठ बांधलेली नसते तों पर्यंत त्या लक्षांत येत नाहींत.

[illegible]
हपिटिकानिदानम्॥

अर्थ— गुदावर, हृदयावर, डोक्यावर, खांद्यावर पाठीवर, आणि-मर्मावर उठलेल्या पिटिका, व उपद्रवयुक्त, आणि दुर्बलाग्नी पुरुषाच्या पिटिका वर्जाव्या, पिटिकांचे उपद्रव चरकानें सांगितले आहेत ते असे— " तृट्कासमांससंकोचमोहहिक्कामदज्वराः॥ विसर्पमर्मसंरोधाः पिटिकानामुपद्रवाः॥ अर्थ सुगम आहे ह्मणून लिहीत नाहीं.

कोणी असें ह्मणतात कीं स्त्रियांना प्रमेह होत नाहीं, आणि त्या विषयीं तंत्रांतरचें वाक्य आहे तें असें— " रजः प्रसेकान्नारीणां मासि मासि विशुध्यति॥ कृत्स्नं शरीरं दोषाश्च न प्रमेहंत्यतः स्त्रियः॥ अर्थ— स्त्रियांना महिन्याचे महिन्यास विटाळ वाहातो, त्यामुळे सर्व शरीर आणि दोष हे शुद्ध होतात, ह्मणून त्यांना प्रमेह होत नाहीं, आणि त्यांना मेह झालेला कोठें पाह्यण्यांत येत नाहीं, हें सबळ कारण आहे, आणि अन्य रोग होण्याचा असंभव आहे, ही गोष्ट वादास्पद आहे. हिचा कोणी चांगला निर्णय केला नाहीं, प्रमेहनिवृत्तीचें लक्षण सुश्रुतानें, सांगितलें तें असें, " प्रमेहिणो यदामूत्रमनाविलमपिच्छिलं ॥ विशदं कटुतिक्तंच तदारोग्यं प्रचक्षते " इति प्रमेहनिदानम्

मधुकोशस निर्मथ्य सारमाकृष्यवै मया॥ व्याख्या कृता माहाराष्ट्री माधवार्थप्रकाशिका॥

## मेदोनिदान.

### कारण व संप्राप्ति.

अव्यायामदिवास्वप्नश्लेष्मलाहारसेविनः॥ मधु
रोन्नरसः प्रायः स्नेहान्मेदो विवर्धते॥ मेदसावृत-
मार्गत्वात्पुष्यंत्यन्येन धातवः॥ मेदस्तु चीयते यस्मा
दशक्तः सर्वकर्मसु॥ २॥

अर्थ— व्यायाम न करणें, दिवसास निजणें, आणि कफकर पदार्थ सेवणें अशारीतीनें वागणाऱ्या मनुष्याचा अन्नरस केवळ मधुरह्म णजे आमरूप होऊन स्नेहानें मेद वाढतो, मेदानें मार्ग बंद झाला ह्म णजे अन्य धातु पुष्ट होत नाहींत; आणि मेद सांचत जातो ह्मणून मेदस्वी पुरुष सर्व कर्मा विषयीं अशक्त होतो.

### मेदस्वी पुरुषाचें लक्षण.

क्षुद्रश्वासतृषामोहस्वप्नक्रथनसादनैः॥ युक्तः क्षु
त्स्वेददौर्गंध्यैरल्पप्राणोल्पमैथुनः॥ मेदस्तु सर्वभू
तानामुदरेष्वस्थिषु स्थितम्॥ अत एवोदरे वृद्धिः प्रा
यो मेदस्विनो भवेत्॥

अर्थ— क्षुद्रश्वास (रूक्षायासोद्भव इत्यादिना मागें सांगितला तो) तृषा, मोह, निद्रा, अकस्मात् श्वास कोंडणें, अंगग्लानि, क्षुधा, घर्म, आणि दुर्गंधि (याल क्षणां) नीं तो पुरुष युक्त असतो, त्याला शक्ति कमी असते, व मैथुना विषयीं उत्साह नसतो, मेद हा सर्व प्राण्यांच्या उदरांत आणि अस्थी मध्यें असतो, ह्मणून मेदस्वी पुरुषाच्या पोटांत मेद वाढतो.

### मेदस्वीचा अवस्था विशेष.

न्कांश्चित्कालव्यतिक्रमात्॥ एतावुपद्रवकरौविशे षादग्निमारुतौ॥ एतौहिदहतःस्थूलंवनंदावान लोयथा॥

अर्थ— मेदानें मार्ग बंद झाल्यामुळें कोष्ठामध्यें वायूचा संचार विशेष होऊन तो अग्निला पेटवितो, आणि,खाल्लेला आहार शोषू न टाकितो, त्यामुळें तो आहार लवकरच पचून पुनः जेवणाची वांछा होते, आणि जेवणाला कांहीं उशीर लागला म्हणजे भयंकर विकार (वातविकारांपैकीं) होतात, हे अग्नि आणि वायू फारच उपद्रव करितात, जसा वणवा वन जाळून टाकतो त्या प्रमाणें हे त्या स्थूल पुरुषाला जाळतात.

### अत्यंतमेद वाढल्याचे परिणाम.

मेदस्यतीवसंवृद्धेसहसैवानिलादयः॥ विकारान् दारुणान्कृत्वानाशयंत्याशुजीवितम्॥

अर्थ— मेद अत्यंत वाढला असतां वाय्वादिक हे अकस्मात् भयंकर विकार (प्रमेह पीटिका, ज्वर, भगंदर, विद्रधि, वातरोग, ह्यांपैकीं एखादे) उत्पन्न करून त्वरित जीविताचा नाश करतात.

### स्थूललक्षण.

मेदोमांसातिवृद्धत्वाच्चलस्फिगुदरस्तनः॥ अयथोपचयोत्साहोनरोतिस्थूलउच्यते॥ इतिमेदो निदानम्॥

अर्थ— मेद आणि मांस हीं अत्यंत वाढल्यामुळें ज्या पुरुषाचे कुले, पोट, आणि स्तन हे लटलट हालतात, आणि त्याच्या शरीराची स्थूलता असावी तशी नसते, ह्मणजे भलताच अवयव लठ्ठ झाल्यामुळें बेढब दिसतो, व उत्साह (हुशारी) नसतो, अशा मनुष्याला स्थूल ह्मणतात इति मेदोनिदानम्।

मधुकोशं क निर्मथ्य सारमाकृष्य वैमया॥ व्याख्या कृता महाराष्ट्री माधवार्थप्रकाशिका॥

---

## उदरनिदान.

### अग्नीची दुष्टिही उदराला विशेषें करून कारण आहे.

रोगाः सर्वेपि मंदेऽग्नौ सुतरामुदराणिच॥ अजीर्णान्मलिनैश्चान्नैर्जायंते मलसंचयात्॥ ॥

अर्थ— अग्नि मंद झाला असतां सर्वच रोग होतात, आणि उदरें तर विशेषें करून होतात, कारण, अग्नि मांद्य हें त्रिदोषजनक आहे, आणि अजीर्णानें, मलिन अन्नानीं, (विरुद्धाध्यशनादिक) आणि मल (दोष व पुरीषादिक) संचयानें उदररोग होतात.

### उदरांचीसंप्राप्ति.

रुध्वास्वेदांबुवाहीनि दोषाः स्रोतांसि संचिताः॥ प्राणाग्न्यपानान्संदूष्य जनयंत्युदरं नृणाम्॥

अर्थ— वातादि दोष स्वेद वाहाणारीं आणि उदक वाहणारीं स्रोतसें रुद्ध करून आणि वाढून प्राणवायु, अग्नि, आणि अपानवायु त्यांना अत्यंत दुष्ट करून मनुष्यांस उदर उत्पन्न करितात.

## उदराचें सामान्यरूप.

आध्मानंगमनेशक्तिर्दौर्बल्यंदुर्बलाग्निता॥शो
थःसदनमंगानांसंगोवातपुरीषयोः॥ दाहस्तंद्रा
चसर्वेषुजठरेषुभवंतिहि॥

अर्थ— आध्मान, चालण्यास सामर्थ्य नसणें, दुर्बलता, अग्निमांद्य, सूज, अंगग्लानि, वायूचा व मळाचा अवष्टंभ, दाह, तंद्रा, हीं लक्षणें सर्व उदरामध्यें होतात.

## उदरांचीसंख्या.

पृथक् दोषैः समस्तैश्चप्लीहबद्धक्षतोदकैः॥ सं
भवंत्युदराण्यष्टौतेषांलिंगंपृथक्शृणु॥

अर्थ— पृथक् दोषें करून (ह्म॰ वात, पित्त, कफ,) सन्निपातानें-(सन्निपातोदर) प्लीहोदर १ बद्धोदर १ क्षतोदर १ आणि जलोदर १ मिळून ८ प्रकारचीं उदरें होतात, त्यांचें लक्षण वेगळेवेगळें सांगतों तें ऐका.

## वातोदरलक्षण.

तत्रवातोदरेशोथःपाणिपन्नाभिकुक्षिषु॥कुक्षिपा
र्श्वोदरकटीपृष्ठरुक्पर्वभेदनम्॥शुष्ककासोंगम
र्दोधोगुरुतामलसंग्रहः॥श्यावारुणत्वगादित्व
मकस्माद्वृद्धिह्रासवत्॥सतोदभेदमुदरंतनुकृ
ष्णशिराततम्॥आध्मातदृतिवच्छब्दमाहतंप्र-
करोतिच॥ वायुश्चात्रसरुक्शब्दोविचरेत्सर्वतोगतिः

अर्थ— वातोदरामध्यें हात, पाय, नाभि, आणि कुशी ह्यांच्या ठिकाणी सूज, सांधे तुटणें, कोरडा खोकला, आंग मोडून येणें, कंबरेपासून-खालीं जड वाटणें, मळ सांचणें, त्वचा नख नेत्रादि काळीं तांबडीं होणें, पो-

ट अकस्मात् (निमित्तावांचून) मोटे व्हावें, लहान व्हावें, पोटावर चहूंक डे बारीक काळ्या शिराउमटतात, पोटावर टिचकुली मारिली असतां फुगलेल्या परवाली सारिखा शब्द होतो, ध्या उदरांत वायु चहूंकडेफि रून शूळ करितो वगुर्गुरतो.

## पित्तोदर लक्षण.

पित्तोदरेज्वरोमूर्छादाहस्तृट्कटुकास्यता॥भ्रमो- तिसारः पीतत्वंत्वगादावुदरंहरित्॥ पीतताम्रशि रानद्धंसस्वेदंसोष्मदह्यते॥धूमायतेमृदुस्पर्शंक्षि प्रपाकंप्रदूयते॥

अर्थ–पित्तोदरामध्यें ज्वर, मूर्छा, दाह, तृषा, तोंडाला कडूपणा, भ्र म, अतिसार, त्वगादिक (नख नेत्रें) यांस पिंवळटी, पोट हिरवें, पि वळ्या तांबड्या शिरानीं व्याप्त, घामानें ओलसर, कढत असून जळ जळीत होतें, आंतून धूर निघाल्या सारिखें वाटतें, हाताला मऊ- लागतें, लवकर पाक होतो, ह्मणजे जलोदरत्वा प्रतपावतें, आणि त्याला फार व्यथा होते.

## कफोदर लक्षण.

श्लेष्मोदरेंगसदनंस्वापश्वयथुगौरवम्॥निद्रोत्क्ले शोरुचिश्वासः कासःशुक्लत्वगादिता॥उदरंस्ति- मितंस्निग्धंशुक्लराजीततंमहत्॥ चिराभिवृद्धि- कठिणंशीतस्पर्शंगुरुस्थिरम्॥

अर्थ– कफोदरामध्यें हातापायांचे ढेपचे पडतात, स्पर्श कळत- नाहीं, सूज येते, अंगजड होतें, झोप येते, वांति होईल शीवाटते, अ रुचि होते, श्वास लागतो, खोकला येतो, त्वगादिक पांढरीं होतात.

पोट निश्चळ तुळतुळीत पांढऱ्या रेषांनीं व्याप्त, व मोठें होतें, त्याची वृद्धी चिरकालानें होते, व कठीण व गार लागतें, जड व स्थीर असतें.

## सन्निपातोदर लक्षण.

स्त्रियोन्नपानं नखरोम मूत्रविडार्तवैर्युक्तमसाधुवृत्ताः॥ यस्मै प्रयच्छंत्यरयो गरांश्च दुष्टांबुदूषीविषसेवनाद्वा॥ तेनाशुरक्तंकुपिताश्चदोषाः कुर्युःसुघोरंजठरंत्रिलिंगं॥ तच्छीतवाते भृशंदुर्दिने वा विशेषतःकुप्यतिदह्यतेच॥ सचातुरोमूर्छतिहि प्रसक्तंपांडुः कृशः शुष्यतिसेवयाच॥ दूष्योदरंकीर्तितमेतदेव

अर्थ— दुष्टचालीच्या स्त्रिया ज्या पुरुषास नखें, केश, मूत्र, विष्ठा, आणि विटाळ हीं कालवून अन्नपान देतात, अथवा ज्यास शत्रू विषप्रयोग करितात त्यास, किंवा दुष्टांबु (ज्यांत सविष प्राणि, गवत, पानें कुजलेलीं आहेत असें उदक) आणि दूषीविष, (मंदविष) त्यांचें सेवन झालें असतां त्या योगानें रक्त आणि वातादि दोष लवकर कुपित होऊन अत्यंत भयंकर त्रिदोषात्मक उदर उत्पन्न करितात, तें शीतकाळीं किंवा गार वारा सुटतो त्या वेळीं अथवा ज्या दिवशीं पावसाची झड असेल त्या दिवशीं विशेषें करून कोप पावतें, आणि जळतें, कारण त्याच वेळेस दूषीविषाचा कोप होत असतो; तो रोगी निरंतर विषयोगानें मूर्छा पावतो, पांडुरवर्ण व कृश होतो आणि आयास केल्यानें शोष लागतो, त्याला दूष्योदर असें म्हटलें आहे.

## प्लीहोदर लक्षण.

+ रक्ताला दुष्ट करून जें होतें तें दूष्योदर अथवा परस्पर दूषण करितात ते दोष ते-च दूष्य त्यांनीं केलेलें जें उदर तेंच दूष्योदर.

प्लीहोदरं कीर्तयतो निबोध ॥ विदाह्यभिष्यंदिरत-
स्य जंतोः प्रदुष्टमत्यर्थमसृक्कफश्च ॥ प्लीहाभिवृद्धिं कु-
रुतः प्रवृद्धौ प्लीहोत्थमेतज्जठरं वदंति ॥ तद्वामपार्श्वे प-
रिवृद्धिमेति विशेषतः सीदति चातुरोऽत्र ॥ मंदज्वराग्निः
कफपित्तलिंगैरुपद्रुतः क्षीणबलोऽतिपांडुः ॥

अर्थ— प्लीहोदराचें लक्षण सांगतो तें जाणावें,— विदाहि (वंशकरीरादि) ह्मणजे दाह करणारीं आणि अभिष्यंदि (दध्यादि) ह्मणजे स्रोतःस्रावक अशीं अन्नें निरंतर सेवन करणाऱ्या पुरुषाचें अत्यंत दुष्ट झालेलें रक्त आणि कफ वाढून प्लीहा (कवळ) ची वृद्धि करितात, त्या उदराला प्लीहोत्थ उदर (पाणथरी) ह्मणतात, हें डावेकडे वाढत असतें, त्या अवस्थेमध्यें रोगी फारच गळून जातो, अंगांत बारीक ज्वर असतो, अग्नि मंद असतो, आणि कफपित्तोदर लक्षणें त्यांत असतात, बळ क्षीण होऊन पांढरा फटफटीत होतो.

## यकृद्दाल्युदर लक्षण.

सव्यान्यपार्श्वे यकृति प्रदुष्टे ज्ञेयं यकृद्दाल्युदरं त-
देव ॥

अर्थ— उजव्या बाजूला जें यकृत् ह्मणजे काळीज असतें तें दुष्ट ह्मणजे रोगयुक्त झालें असतां प्लीहोदरासारिखेंच उदर होतें, त्याला **यकृद्दाल्युदर** ह्मणतात, " दोषानीं यकृताचा भेद होतो ह्मणून तें यकृद्दालि उदर होय.

## त्यांत दोषाचा संबंध सांगतो.

उदावर्तरुजानाहैर्मोहतृड्दहनज्वरैः ॥ गौरवारुचि
काठिण्यैर्विद्यात्तत्र मलान्क्रमात् ॥

अर्थ— उदावर्त, शूल, आनाह, ह्यानीं, वायू; मोह, तृषा, ज्वर, ह्यानीं, पित्त; आणि जडत्व, अरुचि, कठीणपणा, ह्यानीं कफ असा क्रमानें दोष संबंध जाणावा.

## बद्धगुदोदरलक्षण.

यस्यांत्रमन्नैरुपलेपिभिर्वाबालाश्मभिर्वापिहितंयथावत्॥ संचीयतेतस्यमलः सदोषः शनैःशनैः संकरवच्चनाड्यां॥ निरुध्यतेतस्यगुदेपुरीषंनिरेतिकृछादतिचाल्यमल्पं॥ हृन्नाभिमध्येपरिवृद्धिमेतितस्योदरंबद्धगुदंवदंति॥

अर्थ—ज्या पुरुषाचें आंतडें उपलेपि ह्मणजे बुळबुळीत, अन्ना-(शाकादिक) नीं अथवा बारीक बारीक खड्यानीं दाटलें जातें, त्या पुरुषाचा दोषयुक्त मळ हळूहळू आंतड्यांच्या नळीमध्यें जसा केरसुणीनें झाडलेला केर कोपऱ्यांत सांचतो तसा सांचतो, त्याच्या गुदामध्यें तो मळ गुंततो, तो मोठ्या कष्टानें ह्मणजे कुंथल्यानें-वगैरे थोड थोडा बाहेर येतो, तें उदर हृदय आणि नाभि यांच्या मध्यें मोटें होतें त्याच्या त्या उदराला बद्धगुदोदर ह्मणतात-गुदाच्या वरती आंतडें बांधल्या सारिखें होतें ह्मणून बद्धगुद होय असें चरकानें सांगितलें आहे.

## क्षतोदरलक्षण.

शल्यंतथान्नोपहितंयदंत्रं भुक्तंभिनत्यागतमन्यथावा॥ तस्मास्रुतोंत्रात्सलिलप्रकाशः स्रावः स्रवेद्वैगुदतस्तुभूयः॥ नाभेरधश्चोदरमेति वृद्धिं निस्तुद्यतेदाल्यतिचातिमात्रं॥ एतत्परि—

स्राव्युदरंप्रदिष्टं

अर्थ— कंटकादिशल्य अन्नांत मिसळून पोटांत गेलें ह्मणजे पक्काशयातून विलोम (वाकडें तिकडें) गेलें असतां आंतड्याला भोंक पडतें, तें सरळ गेलें तर भोक पडत नाहीं, अथवा जांभई अत्यशन केल्यानें आंतडें फाटतें, त्या आंतड्या पासून गळलेला पाण्यासारिखा स्राव पुनः गुदावाटे पाझरतो, पोट बेंबीच्या वरतीं मोठें होतें, टोंचल्या सारिखें व भेद वत्सोडेनें अत्यंत व्यथित होतें, त्याला **परिस्रावि** उदर असें ह्मटलें आहे.

## जलोदराचें उत्पत्तिसहितल०

दकोदरं कीर्तयतो निबोध॥ यः स्नेहपीतोप्यनुवासितोवा वांतो विरिक्तोप्यथवा निरूढः॥ पिबेज्जलं शीतलमाशु तस्य स्रोतांसि दूष्यंति हि तद्वहानि॥ स्नेहोपलिप्तेष्वथवापि तेषु दकोदरं पूर्ववदभ्युपैति॥ स्निग्धं महत्तत्परिवृत्तनाभि समाततं पूर्णमिवांबुनाच॥ यथा दृतिः क्षुभ्यति कंपते च शब्दायते चापि दकोदरं तत्॥

अर्थ— आतां जलोदर कसें होतें तें सांगतो, ऐका, स्नेहपान केलेला, अथवा अनुवासन बस्ति घेतलेला, वमन घेतलेला, किंवा रेचक घेतलेला अथवा निरूह बस्ति घेतलेला असा पुरुष थंड पाणी पीईल तर त्याचीं तीं उदक वाहाणारीं स्रोतसें तत्काळ दुष्ट होतील, तीं उदकवह स्रोतसें स्नेहानें उपलिप्त झालीं असतां पहिल्या प्रमाणें (ह्मणजे अन्नरस उपस्नेहन्यायानें ह्मणजे पाझरून बाहेर येऊन उदर उत्पन्न करितो.) जलोदर होतें, तें वरून तुकतुकीत दिसतें, मोठें हो

तें, बेंबी जवळ फार उंच होतें, चहूं कडे तिडका लागतात, पाण्यानें पोट अगदीं भरल्या सारिखें होतें, जशी पाण्यानें भरलेली पखाल डुचमळते, हालतें, डबकडबक वाजतें, तसें पोट होतें, त्यालाच जलोदर म्हणतात.

## साध्यासाध्य विचार.

जन्मनैवोदरंसर्वंप्रायः कृच्छ्रतमंविदुः॥ बलिनस्तदजातांबुयत्नसाध्यंनवोत्थितम्॥

अर्थ— सर्व प्रकारचें उदर जन्मतः प्रायः अत्यंत कष्ट साध्य म्हणून बोलतात, बलवान् पुरुषाला नवीन झालेलें, आंत पाणी झालें नसलें तर मोठ्या प्रयत्नानें साध्य होतें, पाणी न झालेल्या उदराचें लक्षण चरकांत सांगितलें आहे तें असें "अशोथमरुणाभासंसशब्दं नातिभारिकं॥ सदा गुडगुडायंतंशिराजालगवाक्षितं॥ नाभिंविष्टभ्यपायौतुवेगंकृत्वाप्रणश्यति॥ हृद्वंक्षणकटीनाभिगुदंप्रत्येकशूलिनः॥ कर्कशंसृजतोपार्नं नातिमंदेचपावके॥ लोलस्याविरसेवास्येमूत्रेल्पे संहते विशि,॥ अजातोदकमित्येवंसुक्तं विज्ञायलक्षणैः॥ इति" जातोदक लक्षणही चरकांतच सांगितलें आहे, तें असें, "कुक्षीची अत्यंत वृद्धि, शिरा अंतर्धान पावणें, आणि पोटाचा भरल्या पखालीप्रमाणें क्षोभ आणि स्पर्श होतो, इत्यादि."

पक्षाद्बद्धगुदंतूर्ध्वंसर्वंजातोदकंतथा॥ प्रायोभवत्यभावायछिद्रांत्रंचोदरंनृणाम्॥

अर्थ— बद्धगुदोदर पंधरा दिवसांपुढें असाध्य होतें, तसें सर्व प्रकारचें उदर पाणी झालें म्हणजे नाशकारक होतें, आणि छिद्रांत्रोदर हें प्रायः नाशक होतें, कदाचित् शल्य किंवा शस्त्र चिकित्सा पाहि-

जे तशी झाली तर उदक झालेलें छिद्रांत्र किंवा बद्धगुद साध्य होतें हें प्राय: पदानें सूचविलें.

## असाध्यलक्षण.

शूनाक्षंकुटिलोपस्थमुपक्लिन्नतनुत्वचम्॥ बलशोणितमांसाग्निपरिक्षीणंचवर्जयेत्॥

अर्थ— एथें सांगितल्यापेकीं ज्याचा डोळ्यांला टापशी आलीअसेल, शिश्न वांकडें झालेंअसेल, पोटाची त्वचा क्लेदयुक्त व पातळ झालीअसेल, बळ, रक्त, मांस, आणि अग्नी हे ज्याचे क्षीण झाले असतील त्याला सोडावें

## दुसरें असाध्य लक्षण.

पार्श्वभंगान्नविद्वेषशोथातीसारपीडितम्॥ विरिक्तंचाप्युदरिणंपूर्यमाणंविवर्जयेत्॥ ॥इतिउदरनिदानम्॥

अर्थ— बरगड्या फुटणें, अन्नद्वेष, शोथ, अतिसार, इत्यानीं पिडलेला आणि रेच दिला असतां ज्याचें पोट पुन: भरतें, अशा उदरी रोग्याला वैद्यानें सोडावें इतिउदरनिदानम्॥

मधुकोशंकृनिर्मथ्य सारमाकृष्य वैमया॥ व्याख्याकृता महाराष्ट्री माधवार्थप्रकाशिका.॥

---

## शोथनिदान.

### संप्राप्ति.

रक्तपित्तकफान्वायुर्दुष्टोदुष्टान्बहि:शिरा:॥ नीत्वारुद्धगतिस्तैर्हिकुर्यात्त्वङ्मांससंश्रयम्॥ १॥ सोत्से

धंसंहतंशोथंतमाहुर्निचयादतः॥१॥

अर्थ—दुष्ट झालेला वायु, स्वकारणानीं दुष्ट झालेल्या रक्तपित्त कफांस बाह्यशिरांत नेऊन त्याणीं कोंडला जातो, मग त्याची गति बंद-झाली ह्मणजे तो त्वचा आणि मांस त्यांच्या आश्रयानें सूज उत्पन्न-करितो, ती सूज उंचट आणि कठीण असते, हिला रक्त सहित त्रिदोषांचा संबंध असतो, ह्मणून सन्निपातात्मक ह्मणतात.

सर्वं हेतुविशेषैस्तुरूपभेदान्नवात्मकम्॥ दोषैः पृथक्द्वयेःसर्वैरभिघाताद्विषादपि॥२॥

अर्थ— ती सूज कारणभेदानीं कार्यभेद होऊन नऊ प्रकारची होते, ती अशी, पृथक् दोषानीं ३ द्वंद्वज ३ सन्निपातज १ अभिघातापासून १ आणि विषापासून १ मिळून नऊ प्रकारची.

## पूर्वरूप.

तत्पूर्वरूपंदवथुःशिरायामोंगगौरवम्॥३॥

अर्थ— संताप, शिरा ताणल्या सारिखी पीडा, अंगाला जडत्व, हीं लक्षणें झालीं ह्मणजे सूज येणार ह्मणून समजावें.

## कारण.

शुध्यामयाभक्तकृशाबलानां क्षाराम्लतीक्ष्णोष्ण गुरूपसेवा॥ दध्याममृच्छाकविरोधिदुष्टगरोपसृष्टान्ननिषेवणंच॥४॥अर्शांस्यचेष्टानचदेहशुद्धिर्मर्मोपघातोविषमाप्रसूतिः॥ मिथ्योपचारः प्रतिकर्मणांचनिजस्यहेतुः श्वयथोःप्रदिष्टः॥५॥

अर्थ— वमन विरेकादि शोधन, ज्वरादि रोग, उपवासानें कृश व दुर्बल झालेल्या पुरुषांस खारट, आंबट, तिखट, आणि ऊष्ण आणि

जड अशा पदार्थांचे सेवन, दहीं, अपक्क, मृत्तिका, भाजा, क्षीरमत्स्यादि विरुद्ध, संयोगज विषानें दूषित झालेलें अन्न, त्यांचे सेवन. मुळव्याध, अव्यायाम, शोधनास योग्य दोष झाला तरी शोधन-न घेणें, इत्यादि मर्मास दोषानीं केलेला उपघात, आमगर्भपतनादि वाईट प्रसूति, व मनादि पंच कर्मांचा मिथ्यायोग, हें सर्व दोषज सुजेला कारण सांगितलें आहे.

## सामान्य लक्षण.

**सगौरवंस्यादनवस्थितत्वंसोत्सेधमूष्माथशिरातनुत्वं॥सलोमहर्षश्चविवर्णताचसामान्यलिंगंश्वयथोःप्रदिष्टं॥६॥**

अर्थ— अंगाला जडत्व, चित्त स्वस्थ नसणें, सुजेला उंचवटा आणि दाह, शिरा बारीक होणें, रोमांच येणें, आणि अंगाचा रंग बदलणें हें सुजेचें सामान्य लक्षण होय.

## वातज शोथ.

**चलस्तनुत्वक्परुषोरुणोऽसितःससुप्तिहर्षार्तियुतोनिमित्ततः॥प्रशाम्यतिप्रोन्नमतिप्रपीडितो दिवाबलीस्यात्श्वयथुःसमीरणात्॥७॥**

अर्थ— वायूपासून सूज चंचळ, पातळ त्वचा झालेली, खरबरीत, तांबूस, काळी, मेहेरलेली, भिण भिण वेदनांयुक्त अशी असते, ती कदाचित् निमित्तावांचून ओसरते, दाबली असतां तत्क्षणीं वर येते, आणि दिवसास तिचा जोर असतो.

## पित्तजशोथ.

**मृदुःसगंधोसितपीतरागवान् भ्रमज्वरस्वेदतृ**

षामदान्वितः॥ यउष्यनेस्पर्शरुगक्षिरागकृत्-
सपित्तशोथोभृशदाहपाकवान्॥ ८॥

अर्थ— पित्ताची सूज, मऊ, किंचित् गंधयुक्त, काळी, पिंवळी, आणि तांबूस असते, तिच्या योगानें भ्रम, ज्वर, घर्म, तृषा, आणि उन्मत्तता, हीं होतात, ती जळजळते, हात लावला असतां दुखते, तिच्या योगानें डोळ्यांला लाली येते, तिला अत्यंत दाह व पाक होतात.

## कफज शोथ.

गुरुःस्थिरःपांडुररोचकान्वितः प्रसेकनिद्रावमि
वन्हिमांद्यकृत्॥ सकृच्छ्र जन्म प्रशमोनिपीडि-
तोनचोन्नमेद्रात्रिबली कफात्मकः॥ ९॥

अर्थ- कफाची सूज जड, स्थिर, पांडुर वर्ण असते; तिच्या योगानें अन्नद्वेष, लालास्राव, निद्रा, ओकारी, अग्निमांद्य हीं होतात, तिची उत्पत्ति आणि नाश हे चिरकालानें होतात-ती दाबलीं असतां वर येत नाहीं, रात्रीस तिचें बळ असतें.

## द्वंद्वज आणि सन्निपातज
## शोथ लक्षण.

निदानाकृतिसंसर्गाच्छ्वयथुः स्याद्विदोषजः॥ स
र्वाकृतिःसन्निपाताच्छोथोव्यामिश्रलक्षणः॥ १०

अर्थ— दोन दोन दोषांचीं कारणें आणि लक्षणें एकत्र झालीं म्हणजे द्वंद्वज शोथ जाणावा, सन्निपातापासून जो शोथ होतो त्यांत वातादिक दोष मिळून सर्व लक्षणें होतात.

## अभिघातज शोथ.

अभिघातेनशस्त्रादिछेदभेदक्षतादिभिः॥हिमा
निलोदध्यनिलैर्भल्लातकपिकच्छुजैः॥ ११॥ रसैः
शूकैश्वसंस्पर्शाच्छ्वयथुः स्याद्विसर्पवान्॥ भृ-
शोष्मा लोहिताभासः प्रायशःपित्तलक्षणः॥ १२

अर्थ — काष्ठादिकानें अभिघात झाला असतां, शस्त्रादिकानें फो-डलें तोडलें असतां, किंवा क्षताच्या योगानें, थंड वारा लागल्यानें, किंवा समुद्राचा वारा लागल्यानें, बिब्याचें तेल, आणि कुहिली-चीं कुसें लागल्यानें सूज येते, ती चहूंकडे पसरते, तिला अत्यं-त दाह असतो, तिचा रंग तांबडा असतो, आणि बहूत करून पि-त्ताच्या सूजेचीं लक्षणें तींत होतात.

## विषजशोथलक्ष०

विषजः सविषप्राणिपरिसर्पणमूत्रणात्॥ दंष्ट्रा
दंतनखाघातादविषप्राणिनामपि॥ १३॥ विण्मूत्र
शुक्रोपहतमलवद्वस्त्रसंकरात्॥ विषवृक्षानि-
लस्पर्शाद्गरयोगावचूर्णनात्॥ १४॥ मृदुश्चलोव
लंबीचशीघ्रोदाहरुजाकरः॥

अर्थ— सविष प्राणि आंगावरून चालले असतां, किंवा मुतले अ-सतां, अथवा निर्विष प्राण्याचे देखील दाढा किंवा दांत नखें लाग-लीं असतां, अथवा सविष प्राण्याची विष्ठा, मूत्र, शुक्र याणीं भ-रलेलें व मळीण वस्त्र आंगास लागलें असतां, अथवा विषवृक्षा-वरून आलेल्या वाऱ्याचा स्पर्श झाला असतां, अथवा संयोगज-विषानें अंग चोळवटलें असतां जो शोथ उत्पन्न होतो तो विषज ह्मणावा, तो मऊ, चंचळ, खालीं लोंबणारा, जलद होणारा, दाह

करितात ते ठिकाणें सांगतो.

दोषाःश्वयथुमूर्ध्वंहिकुर्वंत्यामाशयस्थिताः॥
पक्काशयस्थामध्येतु वर्चस्थानगतास्त्वधः॥१५
कृत्स्नदेहमनुप्राप्ताःकुर्युःसर्वसरंतथा॥

अर्थ– आमाशय स्थित दोष वरती (उरापासून वर) सूज उत्पन्न करितात. पक्काशयस्थ दोष मध्यें (ऊर आणि पक्काशय यांच्या मध्यें) सूज करितात, आणि मल स्थानगत दोष खालीं (पायांपोतर) सूज उत्पन्न करितात, आणि सर्व देहांत दोष पसरले ह्मणजे सर्वांगाला सूज आणितात.

आतां कृच्छ्रादिभेद सांगतो.

योमध्यदेशेश्वयथुःसकष्टःसर्वगश्चयः॥अ-
धोंगेरिष्टभूतःस्याद्यश्चोर्ध्वंपरिसर्पति॥१७

अर्थ—जी सूज मध्य देशावर येत्येती सर्व अंगावर येते,ती कष्ट साध्य, जी सूज खालच्या अंगावर उत्पन्न होऊन वर चढते ती मरण सूचक जाणावी.

असाध्य लक्षणें.

श्वासःपिपासाछर्दिश्चदौर्बल्यंज्वरएवच॥यस्य
चान्नेरुचिर्नास्तिशोथिनंपरिवर्जयेत्॥१८

अर्थ– श्वास, तहान, ओकारी, अशक्तता, ज्वर, हीं लक्षणें असून ज्याला अन्नावर रुचि होत नाहीं अशा सुजेच्या रोग्यास सोडावें.

अनन्योपद्रवकृतः शोथःपादसमुत्थितः॥पुरु

षं हंतिनारींतुमुखजोगुह्यजो द्वयम्॥१९॥नवोनु
पद्रवःशोथःसाध्योऽसाध्यःपुरेरितः॥ इतिशोथ
निदानम्॥

अर्थ– अन्यरोगाच्या उपद्रवानें झालेला नव्हे असा शोथ पहिल्यानें पायांवर येऊन नंतर वर चढतो (त्याला उलटी सूज ह्मणतात) तो पुरुषाचा नाश करितो, आणि पहिल्यानें तोंडावर येऊन मग खाली उतरतो तो स्त्रियांस घातक आहे, आणि गुह्यस्थानीं उत्पन्न होऊन-सर्व शरीर भर येतो तो उभयतांस घातक होतो.

नवीन आणि उपद्रव (श्वासादि) रहित जो शोथ असतो तो साध्य होतो, आणि अधोंगे रिष्ट संभूत इत्यादि श्लोकांत मागें सांगितला तो शोथ असाध्य जाणावा, इति शोथनिदानम्॥ ॥

मधुकोशांकनिर्मथ्यसारमाकृष्य वैमया॥ व्याख्या कृता महाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥

---

## अंड वृद्धि निदान.

### संप्राप्ति.

कुधोनूर्ध्वगतिर्वायुः शोथ शूल करश्चरन्॥ मुष्को
वक्षणतः प्राप्य फल कोशाभि वाहिनीः॥ प्रपीड्य
धमनी र्वृद्धिं करोति फल कोशयोः॥

अर्थ– कुपित झालेला अधोगमन शील व शोथ आणि शूल उत्पन्न करणारा वायु कुक्षी मध्यें संचार करीत असतां अंडसंधीतून अंडांत येऊन अंडाची बाठ आणि कोश (पिशवी) यांच्या वाहणाऱ्या धमनी (नाडी) स दुष्ट करून अंडाची वृद्धि (दोहोंकडची किंवा एक

गांवध्यानिलाद्धुपमेदस्तुकवेलम्॥

अर्थ—तो वृद्धिरोगदोष ३ रक्त १ मेद १ मूत्र १ आणि आंतडें १ ह्यानीं सात प्रकारचा होतो, मूत्रज आणि अंत्रज वृद्धि हे तरी वायूपासूनच होतात, परंतु त्यांचें कारण मात्र वेगळें आहे.

### वात, पित्त, कफ, रक्त, आणि. मेद ह्यां पासून झालेल्या वृद्धिचें लक्षण.

वातपूर्णदृतिस्पर्शोरूक्षोवाताद्हेतुरुक्॥कृ-
ष्णास्फोटावृत:पित्तवृद्धिलिंगैश्चपित्तज:॥कफ
वन्मेदसोवृद्धिर्मृदुस्तालफलोपम:॥

अर्थ— वायूनें भरलेली पिशवी जशी हाताला लागते तसा हा लागतो, रूक्ष आणि कारणा वांचून दुखूं लागतो तो वातज वृद्धि होय.

काळ्या फोडानें व्याप्त झालेला व पित्त वृद्धि लक्षणानीं युक्त जो वृद्धि तो पित्ताचा व रक्ताचा जाणावा.

मेदा पासून जो वृद्धि होतो तो कफ वृद्धि सारखा मृदु व पिकलेल्या ताडगोळ्या सारिखा ह्मणजे पिंवळा आणि वाटोळा असतो.

### मूत्र वृद्धि.

मूत्रधारणशीलस्यमूत्रज:सतुगच्छत:॥अंभो
भि:पूर्णदृतिवत्क्षोभंयातिसरुङ्मृदु:॥मूत्रकृछ्र
मधस्याच्चचलयन्फलकोशयो:॥

अर्थ— मूत्र कोंडण्याची ज्याला सवय असते त्याला हा विकार होतो

तो वाढूं लागलें असतां पाण्यानें भरलेल्या परवाली सारखा डबक डबक हालतो, वाजतो, थोडासा दुखतो, हाताला मऊ लागतो, त्यापासून मुताायाला साफ होतें नाहीं, आणि अंडाची झोळी खालीं लोंबून इकडे तिकडे हेलकावे बसतात.

## अंत्रवृद्धीचें लक्षण.

वातकोपिभिराहारैः शीततोयावगाहनैः॥ धारणेरणभाराध्वविषमांगप्रवर्तनैः॥ क्षोभणैः क्षुभितोन्यैश्चक्षुद्रांत्रावयवंयदा॥ पवनोविगुणीकृत्य स्वनिवेशादधोनयेत्॥ कुर्याद्वंक्षणसंधिस्थोग्रंथ्याभंश्वयथुंतदा॥

अर्थ— वात कोप करणारे आहार सेवन केल्यानें, गार पाण्यांत बुडी मारल्यानें, उपस्थित वेगाचें धारण, अप्राप्त वेगाचें बळेंच प्रेरण, गुरुभार वहन, अतिमार्ग गमन, वेड्यावांकड्या अंगानींगमनादि व्यापार करणें, आणखी दुसरीं बलवद्विग्रहादि, अशा कोप कारणानीं कुपित झालेला वायु लहान आंतड्याचा एक भाग घेऊन त्याचा संकोच किंवा दुमडून स्वस्थाना पासून जेव्हां खालीं नेतो तेव्हां तो वंक्षण संधीत राहून तेथें गांठी सारिखी सूज उत्पन्न करितो.

## उपेक्षा केली असतां परिणाम.

उपेक्षमाणस्यचमुष्कवृद्धिमाध्मानरुक्स्तंभवतींसवायुः प्रपीडितोंतःस्वनवान्प्रयातिप्रध्मापयन्नेतिपुनश्चमुक्तः

अर्थ—ज्या अंड वृद्धीमध्यें फुगारा, कळ, ताठरपणा असतात, तिची उपेक्षा केली असतां अंड दाबला ह्मणजे त्यांतला वायू कोंकोंशब्द करीत वर जातो आणि सोडला ह्मणजे पुनः वायु उतरल्यामुळें अंड फुगतो.

## असाध्य लक्षण.

स्थूलांत्रावयवान्श्लेष्मासुष्कयोर्वातसंचयात्।।अंत्रवृद्धि
रसाध्योयंवातवृद्धिसमाकृतिः।। ।।इतिवृद्धिनिदानम्।।

अर्थ—लहानआंतड्याचासंबंध असल्यामुळें, आणिअंडामध्यें वातसांचल्यामुळें, वातवृद्धिलक्षणासारिखा हाअंत्रवृद्धिरोगअसाध्यजाणावा, **वर्ध्मनिदान** तंत्रांतरांतसांगितलेंआहे तेंअसें "अत्यभिष्यंदिगुर्वामसेवनान्निचयंगतः।।करोतिग्रंथिवच्छोफंदोषोवंक्षणसंधिषु।।ज्वरशूलांगदाहाढ्यंतंवर्ध्मेतिनिर्दिशेत्।।" अर्थ—अत्यंत स्रोतःस्रावी, जड, आम, अशाअन्नाच्यासेवनानें दुष्ट झालेला दोष वंक्षणसंधीमध्यें गांठीवजासूज उत्पन्न करितो, तेणेंकरून ज्वर, ठणका, आंगांतजळजळ, हीं होतात, त्यारोगालावर्ध्म असें ह्मणतात, अंडवृद्धीलाकोणी **कुरंदक** हीं ह्मणतात.

मधुकोशाख्यनिर्मथ्यसारमाकृष्य वैमया।। व्याख्याकृता महाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका।।

## गलगंडनिदान.

निबद्धःश्वयथुर्यस्यमुष्कवल्लंबतेगले।।महान्वाय
दिवाह्रस्वोगलगंडंतमादिशेत्।।

अर्थ—ज्याच्या गळ्याला अंडु बध युक्तमोठी किंवा लहान अंगाप्रमाणें सूज होत्ये, तिलागलगंड असें ह्मणावें.

### त्याचीसंप्राप्ति.

वातःकफश्चापिगलेप्रदुष्टोमन्येसमाश्रित्यतथैव
मेदः।।कुर्वंतिगंडंक्रमशःस्वलिंगैःसमन्वितं
तंगलगंडमाहुः।।

अर्थ— गळ्या मध्यें दुष्ट झालेले वात, कफ, आणि तसेच मेद- हीं गळ्याच्या मागल्या शिरामध्यें राहून क्रमा क्रमानें आपआपल्या लक्षणांनीं युक्त असा गंड (गोळा) उत्पन्न करितात, त्याला गलगंड (गालगुंड) असें ह्मणतात.

## वातिकगलगंड.

तोदान्वितः कृष्णशिरावनद्धः श्यावोऽरुणो वा पवनात्मकस्तु ॥ पारुष्ययुक्तश्चिरवृद्ध्यपाको यदृच्छया पाकमियात्कदाचित् ॥ वैरस्यमास्यस्य च तस्य जंतोर्भवेत्तथा तालुगलप्रशोषः ॥

अर्थ— वातजन्य गलगंडांत सुयानीं टोचल्यासारिखी पीडा होते, तो काळ्याशिरानीं व्याप्त, निळा, तांबूस, व खरखरीत लागतो, चिरकालानें वाहाडतो, तो पिकत नाहीं, पिकला तर कदाचित् यदृच्छेनें पिकतो, त्या रोग्याच्या तोंडाला रुचि नसते, आणि टाळा व गळा हे कोरडे पडतात.

## कफजगलगंड.

स्थिरः सवर्णो गुरुरुग्रकंडूः शीतो महांश्चापि कफात्मकस्तु ॥ चिराभिवृद्धिं भजते चिराद्वा प्रपच्यते मंदरुजः कदाचित् ॥ माधुर्यमास्यस्य च तस्य जंतोर्भवेत्तथा तालुगलप्रलेपः ॥

अर्थ— कफात्मक गलगंड स्थिर, त्वचेच्या रंगाचा, जड, अत्यंत कंडुयुक्त, थंड, आणि मोठा असतो, तो फार दिवसानीं वाढतो व उशीरानें कदाचित् पिकतो, तेव्हां त्यास थोडा ठणका लागतो. त्या मनुष्याचें तोंड गोड असतें, तसें टाळा आणि गळा हे कफानें

सारवल्या प्रमाणें होतात.

## मेदजगलगंड.

स्निग्धोगुरुःपांडुरनिष्टगंधोमेदोभवःस्वल्परुजो निकंडूः॥ प्रलंबतेलाबुवदल्पमूलोदेहानुरूपःक्ष यवृद्धियुक्तः॥ स्निग्धास्यतातस्यभवेच्चजंतोर्ग लेनुशब्दंकुरुतेचनित्यं॥

अर्थ— मेदा पासून झालेला गळगंड, तुळतुळीत, जड, पांडुरव र्ण, दुर्गंधयुक्त, मंदपीडा करणारा, आणि अत्यंत कंडुयुक्त होतो. तो दुध्या भोंपळ्या सारिखा लोंबतो, त्याचें मूळ लहान असतें, आ णि देहानुरूप क्षय आणि वृद्धि त्यानीं युक्त असतो, ह्मणजे देह क्षीण झाला असतां तो क्षीण होतो, देह वृद्ध झाला असतां तो मो ठा होतो, त्या मनुष्याचें तोंड तेल सारवल्या प्रमाणें तुळतुळीत दिसतें, आणि बोलतानां गळ्यांतून अनुशब्द निघतो.

## असाध्यलक्षण.

कृछ्राच्छ्वसंतंमृदुसर्वगात्रंसंवत्सरातीतमरो चकार्तं॥ क्षीणंचवैद्योगलगंडजुष्टंभिन्नस्वरंचा पिविवर्जयेत्तु॥ इतिगलगंडनिदानम्॥

अर्थ— कष्टानें श्वास टाकणारा, मृदुगात्र झालेला, गळगंड हो ऊन वर्ष लोटलेला, अरोचकानें पीडित, क्षीण झालेला, आणि स्वरभेदयुक्त, अशा गळगंडपीडित मनुष्याला वैद्यानें सोडावें.

---

## गंडमालानि०

कर्कंधुकोलामलकप्रमाणैःकक्षांसमन्यागलवं-

क्षणेषु॥ मेदःकफाभ्यां चिरमंदपाकैः स्याद्गंडमाला बहुभिस्तु गंडैः॥

अर्थ— मेद आणि कफ यांपासून, कांख, खांदे, मान, गळा, आणि अंडसंधि इतक्या ठिकाणीं लहान बोरा येवढ्या मोठ्या- बोरा येवढ्या, आंवळ्या येवढ्या अशा अनेक गांठी येतात; त्या फारा दिवसानीं हळू हळू पिकतात; त्या गांठीच्या ओळीला गंडमाळा ह्मणतात.

## अपचीलक्ष॰

तेग्रंथयः केचिदवाप्तपाकाः स्रवंतिनश्यंतिभवंतिचान्ये॥ कालानुबंधंचिरमादधातिसैवापचीतिप्रवदंतिकेचित्॥

अर्थ— त्या गांठी कांहीं पिकतात, कांहीं स्रवतात, कित्येक नाहींशा होतात, दुसऱ्या उगवतात, अशी पीडा फार दिवस राहाते तिलाच कोणी अपची ह्मणतात.

## साध्यासाध्यलक्षण.

साध्यास्मृतापीनसपार्श्वशूलकासज्वरछर्दि- युतानसाध्या॥ ॥इत्यपचीनिदानम्॥

अर्थ— वर सांगीतलेली अपची साध्य आहे, तीच पीनसादि उपद्रवानीं युक्त झाली ह्मणजे साध्य होत नाहीं, इतिअपचीनिदान

## ग्रंथिनिदान.

वातादयोमांसमसृक्प्रदुष्टाः संदूष्यमेदश्चतथा शिराश्च॥ वृत्तोन्नतंविग्रथितंतुशोथंकुर्वंत्यतो ग्रंथिरितिप्रदिष्टः॥

अर्थ— अत्यंत दुष्ट झालेले वातादि दोष, मांस, रक्त, आणि मेद, न-शाच शिरा त्यानां दुष्टकरून (येथें दुष्टि वृद्धिरूप जाणावी, क्षयरूप नव्हे, कारण क्षीणांस विकार करण्याचें सामर्थ्य नसतें.) वाटोळा, उंच, गाठाळलेला, किंवा कठीण असा शोथ उत्पन्न करितात, म्हणून त्याला ग्रंथि असें ह्मटलें आहे.

## वातजग्रंथि.

आयम्यते वृश्च्यति तुद्यते च प्रत्यस्यते मथ्यति भिद्यते च॥ कृष्णो गुरुर्बस्तिरिवाततश्च भिन्नः स्रवेच्चानिलजोऽस्त्रमच्छं॥

अर्थ— वातज ग्रंथि ओढून लांब केल्यासारिखा, छिलल्यासारिखा, टोंचल्यासारिखा, फेंकल्यासारिखा, घुसळल्यासारिखा. फोडल्यासारिखा होतो, तो काळ्या रंगाचा, मृदु, बस्तीप्रमाणें विस्तृत असतो; तो फुटला असतां स्वच्छ रक्त स्रवतें.

## पित्तजग्रंथि.

दंदह्यते धूम्यति चूष्यते च पापच्यते प्रज्वलतीव चापि॥ रक्तः सपीतोप्यथवापि पित्ताद्भिन्नः स्रवेदुष्टमतीव चास्रं॥

अर्थ—पित्तज ग्रंथि अग्नीनें भाजल्या प्रमाणें अत्यंत दाहयुक्त होतो, आंतून धूर निघाल्यासारिखा वाटतो, तुमडीनें ओढल्यासारिखा, क्षार लावून पिकवल्या प्रमाणें, अत्यंत पक्क होतो, जळून भस्म होत आहेसा वाटतो, तांबडा लाल होतो, किंवा किंचित् पिंवळा असतो, आणि फुटला ह्मणजे त्यांतून नासलेलें पुष्कळ रक्त स्रवतें.

## कफजग्रंथि.

शीतोविवर्णोल्परुजोतिकंडूः पाषाणवत्संहननोपपन्नः॥ चिराभिवृद्धिश्चकफप्रकोपाद्भिन्नंस्रवेच्छुक्लघनंचपूयम्॥

अर्थ— कफज ग्रंथि थंड, प्रकृतिसम वर्ण, (कोणी किंचित् विवर्ण असें ह्मणतात,) अल्प पीडाकरणारा, अत्यंत कंडुयुक्त, दगडा प्रमाणें कठीण व मोठा, आणि चिरकालानें वाढणारा, असा असतो; तो-फुटला ह्मणजे पांढरा दाट पू गळतो.

## मेदजग्रंथि.

शरीरवृद्धिक्षयवृद्धिहानिःस्निग्धोमहान्कंडुयुतोऽरुजश्च॥ मेदःकृतोगच्छतिचात्रभिन्नेपिण्याकसर्पिःप्रतिमंतुमेदः॥

अर्थ— मेदज ग्रंथि शरीर वृद्ध झालें असलें तर तो वृद्ध होतो, शरीर क्षीण झालें असलें तर तो क्षीण होतो, तुळतुळीत, मोठा, कंडुयुक्त, रुजारहित असतो, आणि तो फुटला असतां त्यांतून तिळांच्या कल्का सारिखा किंवा थिजलेल्या तुपा सारिखा मेद जातो.

## शिराजग्रंथीची संप्राप्ति.

व्यायामजातैरबलस्यतैस्तैराक्षिप्यवायुस्तुशिराप्रतानम्॥ संकुच्यसंपीड्यविशोष्यचापिग्रंथिंकरोत्युन्नतमाशुवृत्तम्॥

अर्थ— निर्बळ पुरुषानें नाना प्रकारचीं शरीरा यास जनक कर्मे केल्यानें वायु कुपित होऊन शिरांचें जाळें आंवळून संकोच करून एके ठिकाणीं करून, आणि शोषून झटकन उंच ग्रंथि (गांठ) करितो.

## त्याचें साध्यासाध्यलक्षण.

ग्रंथिःशिराजःसचकृच्छ्रसाध्योभवेद्यदिस्यात्स-
रुजश्चलश्च॥अरुक्सएवाप्यचलोमहांश्चमर्मो-
त्थितश्चापिविवर्जनीयः॥

अर्थ— तो शिराज ग्रंथि कृच्छ्रसाध्य आहे, जर तो पीडायुक्त व चंचळ होईल तर तो साध्य होतो, आणि तोच पीडारहित व निश्चल, मोठा किंवा मर्म स्थानीं झाला असला तर तो वैद्यानें सोडावा.

---

# अर्बुदनिदान.

## त्याची संप्राप्ति.

गात्रप्रदेशेक्वचिदेवदोषाःसंमूर्छितामांसमसृक्प्र
दूष्य॥ वृत्तंस्थिरंमंदरुजंमहांतमनल्पमूलंचिरवृ-
द्धिपाकं॥कुर्वंतिमांसोच्छ्रयमत्यगाधंतदर्बुदं-
शास्त्रविदोवदंति॥

अर्थ— शरीराच्या कोणत्याही भागावर दुष्ट झालेले दोष मांस रक्ताला दूषित करून, वाटोळा, स्थीर, मंदपीडायुक्त, मोठा, खोल मूळ गेलेला, चिरकालानें वाढणारा, व पिकणारा असा मांसाचा गोळा उठवितात; त्याला वैद्य अर्बुद ह्मणतात

वातेनपित्तेनकफेनचापिरक्तेनमांसेनचमेदसाच॥
तज्जायतेतस्यचलक्षणानिग्रंथेःसमानानिसदाभ
वंति॥

अर्थ— तें अर्बुद वायूनें, पित्तानें, कफानें, रक्तानें, मांसानें, आणि मेदानें असें साहा प्रकारानें होतें; त्याचीं लक्षणें सर्वदा ग्रंथिसदृश-

## रक्तार्बुदलक्षण.

दोषःप्रदुष्टोरुधिरंशिरास्तुसंकुच्यसंपीड्यततो-
स्त्यपाकं॥ सास्रावमुन्नह्यतिमांसपिंडंमांसांकुरै
राचितमाशुवृद्धं॥ करोत्यजस्रंरुधिरप्रवृद्धिमसा
ध्यमेतद्रुधिरात्मकंतु॥ रक्तक्षयोपद्रवपीडितत्वा
त्पांडुर्भवेत्सोर्बुदपीडितस्तु॥

अर्थ– दुष्ट झालेला दोष शिरामध्यें रक्ताला संकुचित करून व पीडित करून मांसाचा गोळा उचलवितो, तो यत्किंचित पिकणारा, व किंचित् स्रावयुक्त, आणि मांसांकुरानीं व्याप्त, आणि लोकर वाढणारा असा असतो त्याजपासून निरंतर रक्त वाहात असतें, हें रक्तार्बुद असाध्य आहे, तो अर्बुदपीडित रोगी रक्तक्षयाच्या उपद्रवानी पीडित झाल्यामुळें पांढरा फटफटीत होतो.

## मांसजार्बुदसंप्राप्ति.

मुष्टिप्रहारादिभिरर्दितेंगेमांसंप्रदुष्टंजनयेद्धिशो
थं॥ अवेदनंस्निग्धमनन्यवर्णमपाकमश्मोपम
मप्रचाल्यम्॥ प्रदुष्टमांसस्यनरस्यगाढमेतद्भवे
न्मांसपरायणस्य॥ मांसार्बुदंत्वेतदसाध्यमुक्तं

अर्थ– मुष्टिप्रहारादिकें करून अंगपीडित झालें असतां दुष्ट झालेलें मांस सूज उत्पन्न करितें, ती दुखत नाहीं, तुळतुळीत, अनन्य वर्ण, न पिकणारी, दगडासारखी कठीण, न हलणारी अशी असते. ज्या मनुष्याचें मांस बिघडलें आहे, व जो नित्य मांस खाणारा आहे त्याला हें अर्बुद होतें, हें मांसार्बुद असाध्य म्हणून सांगितलें आहे.

साध्यामध्यें असाध्य प्रकार सांगतो.

साध्येष्वपीमानितुवर्जयेच्च॥ संप्रस्रुतंमर्मणियच्च जातंस्त्रोतःसुवायच्चभवेदचाल्यम्॥

अर्थ— साध्यामध्यें हीं पुढील अर्बुदें वर्जावीं,— स्रावयुक्त, जें मर्माच्या ठिकाणीं झालेलें; किंवा नासादि स्रोतसांचे ठिकाणीं झालेलें, किंवा जें स्थिर असतें तें असाध्य जाणावें.

अध्यर्बुदल.

यज्जायतेन्यत्खलुपूर्वजातज्ञेयंतदध्यर्बुदमर्बुदज्ञेः

अर्थ— पूर्वीं ज्या ठिकाणीं अर्बुद झालें होतें त्याच ठिकाणीं जें दुसरें अर्बुद होतें तें अध्यर्बुद ह्मणून समजावें.

द्विरर्बुद.

यद्द्वंद्वजातंयुगपत्क्रमाद्वा द्विरर्बुदंतच्चभवेदसाध्यं

अर्थ— एक काळीं किंवा एका मागून एक दोन अर्बुदें शेजारीं शेजारीं होतात त्याला द्विरर्बुद ह्मणावें. तें असाध्य होतें.

अर्बुदें न पिकण्याचें कारण.

नपाकमायांतिकफाधिकाद्वा मेदोबहुत्वाच्चविशेषतस्तु॥ दोषस्थिरत्वाद्ग्रथनाच्चतेषांसर्वार्बुदान्येवनिसर्गतस्तु॥ इति गलगंड,गंडमाला,अपची,ग्रंथि,अर्बुदनिदान्॥

अर्थ— कफ अधिक असतो त्यामुळें, किंवा विशेषें करून मेद पुष्कळ असतो त्यामुळें, दोष स्थीर असल्या मुळें, व दोषाचें ग्रथन झाल्या मुळें सर्व प्रकारचीं अर्बुदें स्वभावतः पिकत नाहींत, इति गलगंड,गंडमालां पचीग्रंथ्यर्बुदनिदानम्॥ ॥ ॥

मधुकोशंकनिर्मथ्य सारमाकृष्य वैमया॥ व्याख्याकृतामहाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥

---

## श्लीपदनिदान.

### त्याचीसंप्राप्ति.

यःसज्वरोवंक्षणजोभृशार्तिः शोथोनृणांपाद गतःक्रमेण॥ तत्श्लीपदंस्यात्करकर्णनेत्रशिश्नौष्ठनासास्वपिकेचिदाहुः॥१॥

अर्थ— जी सूज पहिल्यानें अंडसंधीमध्यें उत्पन्न होऊन हळू हळू पायांवर येते, व तिच्या बरोबर ताप येतो, त्या रोगाला श्लीपद (धारूळ) ह्मणतात. हें श्लीपद, हात, कान, डोके, शिस्न, ओष्ठ, नाक, त्यांवर देखील होतें असें कोणी ह्मणतात.

### वातजश्लीपद.

वातजंकृष्णरूक्षंचस्फुटितंतीव्रवेदनं॥ अनिमित्तरुजंतस्यबहुशोज्वरएवच॥२॥

अर्थ— वायूपासून झालेलें श्लीपद काळें, खरखरीत, चिरापडलेलें, तीव्रवेदनायुक्त, कारणा वांचून दुखणारें, असें असतें; आणि त्यांत बहुशः ज्वर असतो.

### पित्तजश्लीपद.

पित्तजंपीतसंकाशंदाहज्वरयुतंमृदु॥ ॥

अर्थ— पित्तजन्य श्लीपद पिवळ्यारंगाचें दाह आणि ज्वर यांणीं युक्त व मृदु असतें.

### श्लेष्मिकश्लीपद.

श्लेष्मिकं स्निग्धवर्णं च श्वेतं पांडु गुरुस्थिरम् ॥ ३

अर्थ — कफात्मक श्लीपद, तुकतुकीत, पांढरें, गुळधवें, जड, आणि कठिण असतें.

## असाध्यलक्षण.

वल्मीकमिव संजातं कंटकैरुपचीयते ॥ अब्दात्मकं महत्तच्च वर्जनीयं विशेषतः ॥ ४ ॥

अर्थ — वारुळा सारिखें वाढलेलें, ज्यावर पुष्कळ कांटे उभारले आहेत असें एका वर्षानें व मोठें झालेलें श्लीपद विशेषें करून सोडावें.

## श्लीपदामध्यें कफाचें प्राधान्य अव्यभिचारानें असतें ह्मणून सांगतो.

त्रीण्यप्येतानि जानीयाच्छ्लीपदानि कफोच्छ्रयात् ॥ गुरुत्वं च महत्त्वं च यस्मान्नास्ति विना कफात् ॥ ५ ॥

अर्थ — ह्यावर सांगितलेल्या तिन्ही श्लीपदामध्यें कफाचें आधिक्य असतें, कारण गुरुत्व; आणि महत्त्व; हीं कफावांचून होत नाहींत.

## श्लीपद कोणत्या देशांत उत्पन्न होतें तसले देश सांगतात.

पुराणोदकभूयिष्ठाः सर्वर्तुषु च शीतलाः ॥ ये देशास्तेषु जायंते श्लीपदानि विशेषतः ॥ ६ ॥

अर्थ — पावसाचें पाणी पुष्कळ पडलेलें असून जमिनीला खवंगे असल्या मुळें सुकून जात नाहीं ह्मणून जुनें पाणी सांचलेलें; सर्व ऋतूमध्यें थंड असणारे असे जे देश आहेत तेथें बहूत करून श्लीपद रोग होतो.

## असाध्यलक्षण.

यश्श्लेष्मलाहारविहारजातंपुंसःप्रकृत्याचकफा-त्मकस्य॥ सास्रावमत्युन्नतसर्वलिंगंसकंडुरंश्लेष्मयुतंविवर्ज्यं॥७ इतिश्लीपदनिदानम्॥

अर्थ— जें श्लीपद कफकर आहार विहारानीं झालेलें, व कफ प्रकृतीच्या पुरुषाला कफस्वभावानें झालेलें; वस्रावयुक्त व ज्या दोषानें तें झालें असेल त्याचीं लक्षणें त्यांत वृद्धिंगत असतात, व ज्याला, कंडू फार सुटत्ये व कफानें युक्त असेल तें वर्जावें, इतिश्लीपदनि०

मधुकोशंसुनिर्मथ्यसारमाकृष्यवैमया॥ व्याख्याकृता महाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥

---

## विद्रधिनिदान.

त्वग्रक्तमांसमेदांसिप्रदूष्यास्थिसमाश्रिताः॥दोषाःशोथंशनैर्घोरंजनयंत्युच्छ्रिताभृशम्॥१॥ महाशूलंरुजावंतंवृत्तंवाप्यथवायतम्॥ सविद्रधिरितिख्यातोविज्ञेयःषड्विधश्चसः॥२॥ पृथक्दोषैःसमस्तैश्चक्षतेनाप्यसृजातथा॥षण्णामपिहितेषांतुलक्षणंसंप्रचक्षते॥३॥

अर्थ— अत्यंत वाढलेले, व अस्थीचा आश्रय करून राहिलेले, वातादि दोष, त्वचा, रक्त, मांस, आणि मेद यांस दुष्ट करून हळू हळू भयंकर शोथ उत्पन्न करितात; त्याचें मूळ अस्थीपर्यंत गेलेलें असतें; उत्पत्ति काळींच अत्यंत पीडा करणारा, व वाटोळा, अथवा लांबजो शोथ असतो त्याला विद्रधि (गळू, केसतुड) असें ह्मणतात, पृथ-

क दोषानीं ३ सन्निपातानें १ क्षतानें १ आणि रक्तानें १ मिळून ६ प्रकारचे विद्रधि होतात, त्या साहा विद्रधीचें लक्षण सांगतों.

### वातजविद्रधि.

कृष्णोरुणोवाविषमोभृशमत्यर्थवेदनः॥चित्रो
त्थानप्रपाकश्चविद्रधिर्वातसंभवः॥ ४॥

अर्थ— जो विद्रधि काळा, अरुण, विषम ह्मणजे कदाचित् लहान, कदाचित् मोठा, अत्यंत वेदनायुक्त असा असतो, त्याचा उद्गम आणि पाक हे नाना प्रकारचे असतात.

### पित्तजविद्रधि.

पक्वोदुंबरसंकाशःश्यावोवाज्वरदाहवान्॥क्षि
प्रोत्थानप्रपाकश्चविद्रधिःपित्तसंभवः॥ ५॥

अर्थ— पित्तजविद्रधि पिकलेल्या उंबरा सारिखा, अथवा श्याम वर्ण, ज्वर आणि दाह करणारा असून त्याचा उगम व पाक लवकर होतात.

### कफजविद्रधि.

शरावसदृशःपांडुःशीतस्निग्धोल्पवेदनः॥चिरो
त्थानप्रपाकश्चविद्रधिःकफसंभवः॥ ६॥

अर्थ— कफज विद्रधि, परळा सारिखा ह्मणजे मोठा, पांडुर वर्ण, थंड, स्निग्ध, अल्प वेदन असतो, त्याचा उगम आणि पाक हे उशीरानें होतात.

### पिकल्यानंतर त्यांचास्राव.

तनुपीतसिताश्चैषामास्रावाः क्रमशःस्मृताः॥

अर्थ— हे तिन्ही प्रकारचे विद्रधि पिकले असतां त्यां पासून वातादि क्रमानें पातळ, पिंवळा, आणि पांढरा पूं गळतो.

सन्निपातविद्रधि.

नानावर्णरुजास्रावो घंटालो विषमो महान्॥७॥
विषमं पच्यते चापि विद्रधिः सान्निपातिकः॥ ॥

अर्थ— सन्निपात विद्रधीमध्यें नाना प्रकारच्या पीडा व नाना तऱ्हेचे स्राव होतात; घांटे सारिखा लोंबणारा, लहान, मोटा, कदाचित् पिकतो कदाचित् पिकत नाहीं असा तो विद्रधि असतो.

अभिघातजन्य(आगंतुजविद्रधी)ची संप्राप्ति सांगतो.

नैस्तैर्भावैरभिहते क्षते वापथ्यकारिणः॥८॥क्षतोष्मा वायुविसृतः सरक्तं पित्तमीरयेत्॥ज्वरस्तृष्णा च दाहश्च जायंते तस्य देहिनः॥९॥ आगंतुविद्रधिर्ज्ञेयः पित्तविद्रधिलक्षणः॥

अर्थ— त्या त्या काष्ठ लोष्ठ पाषाणादिकानीं अभिघात (ठेंचणें, पिचणें इत्यादि) झाला असतां किंवा क्षत झालें असतां अपथ्य करणाऱ्याचा कुपित वायूनें पसरलेला क्षतोष्मा रक्तसहित पित्ताला कोपवितो, त्या पुरुषास, ज्वर, तृषा, आणि दाह हे होतात, व पित्तविद्रधीचीं लक्षणें त्यांत असतात, हा आगंतुविद्रधि जाणावा.

रक्तजविद्रधि.

कृष्णस्फोटावृतः श्यावस्तीव्रदाहरुजाकरः॥पित्तविद्रधिलिंगस्तु रक्तविद्रधिरुच्यते॥१०॥

अर्थ— काळ्या फोडानीं व्याप्त झालेला, श्याम वर्ण, दाह, ठणका, आणि ज्वर हीं ज्यांत तीव्र होतात; व पित्त विद्रधीच्या लक्षणानीं जो युक्त असतो तो रक्तविद्रधि जाणावा.

## अंतर्विद्रधि.

पृथक्संभूय वा दोषाः कुपिता गुल्मरूपिणम्॥
वल्मीकवत्समुन्नद्धमंतः कुर्वंति विद्रधिम्॥ ११

अर्थ— कुपित झालेले वेगळे किंवा एकत्र झालेले वातादि दोष शरीरामध्यें गुल्मा सारखा, वारुळा प्रमाणे वाढलेला असा विद्रधि उत्पन्न करितात.

## स्थानें.

गुदे बस्तिमुखे नाभ्यां कुक्षौ वंक्षणयोस्तथा॥ वृक्कयोः प्लीह्नि यकृति हृदये क्लोम्नि चाप्यथ॥ १२॥ एषामुक्तानि लिंगानि बाह्यविद्रधिलक्षणैः॥ गुदे वातनिरोधस्तु बस्तौ कृच्छ्राल्पमूत्रता॥ १३॥ नाभ्यां हिक्का तथाटोपः कुक्षौ मारुतकोपनम्॥ कटिपृष्ठग्रहस्तीव्रो वंक्षणोत्थेन विद्रधौ॥ १४॥ वृक्कयोः पार्श्वसंकोचः प्लीह्न्युच्छ्वासावरोधनम्॥ सर्वांगप्रग्रहस्तीव्रो हृदि कंपश्च जायते॥ १५॥ श्वासो यकृति हिक्का च क्लोम्नि पेपीयते पयः॥

अर्थ— गुद, बस्तीचें तोंड, बेंबी, कुक्षी, अडसंधि, कुक्षि पिंड, प्लीहा, काळीज, हृदय, क्लोम, (पिपासा स्थान) इतक्या ठिकाणीं विद्रधि होतात, त्यांचीं लक्षणें बाह्यविद्रधि लक्षणा प्रमाणें जाणावीं.

गुदामध्यें विद्रधी झाला असतां वायूचा रोध होतो.

बस्तीमध्यें झाला असतां कष्टानें थोडें मुतायाला होतें.

नाभीमध्यें— झाला असतां उचकी व रुजापूर्वक क्षोभ होतो.

कुशीमध्यें— वायूचा कोप होतो.

वंक्षणांत — कंबर आणि पाठ हीं बळकट जखडतात.

कुक्षिपिंडांत — बरगड्यांचा संकोच होतो.

प्लीहामध्यें — उच्छ्वास कोंडतो.

हृदयांत — सर्वांगाचें ग्रहण व कंप होतो.

काळजांत — श्वास आणि उचकी लागतात.

क्लोमामध्यें — रोग्याला वारंवार पाणी पिण्याची इच्छा होते.

## स्रावनिर्गम.

नाभेरुपरिजाः पक्वा यान्त्यूर्ध्वमितरे त्वधः॥१६॥
अधःस्रुतेषु जीवेत्तु स्रुतेषूर्ध्वं न जीवति॥ ॥

अर्थ— नाभीच्या वरतीं जे विद्रधी होतात ते पिकले ह्मणजे त्यांचा स्राव तोंडावाटे होतो, नाभीच्या खालती होणाऱ्याचा स्राव गुदमार्गानें होतो, नाभीचे ठिकाणीं झालेल्याचा स्राव उभय मार्गांनीं होतो. खालून स्रवूं लागले ह्मणजे रोगी वांचतो; आणि वरून स्रवूं लागले ह्मणजे वांचत नाहीं.

## साध्यासाध्यविद्रधि.

हृन्नाभिबस्तिवर्ज्या ये तेषु भिन्नेषु बाह्यतः॥१७
जीवेत्कदाचित्पुरुषो नेतरेषु कथंचन॥ साध्या विद्रधयः पंच विवर्ज्यः सान्निपातिकः॥ आमपक्वविदग्धत्वं तेषां शोथवदादिशेत्॥१८॥

अर्थ— हृदय, नाभि, आणि बस्ति हीं स्थानें सोडून झालेले, (ह्मणजे प्लीहा, क्लोम, इत्यादिकांचे ठाईं) विद्रधि बाहेरून फुटले असतां कदाचित् पुरुष वांचतो; इतरांचे ठिकाणीं वांचत नाहीं.

पहिले पांच विद्रधि साध्य आहेत, सन्निपातज विद्रधि असा

ध्य आहे, त्यांच्या आम, पक्क, आणि विदग्ध त्या तिन्ही अवस्था शोथा प्रमाणें जाणाव्या.

## असाध्यलक्षण.

आध्मातंबद्धनिष्यंदं छर्दिहिक्कातृषान्वितम्॥ रुजाश्वाससमायुक्तंविद्रधिर्नाशयेन्नरं॥१॥ इति विद्रधिनिदानम्॥

अर्थ— आध्मान युक्त, मूत्र गुंतलेला, ओकारी, उचकी, आणि तृषा, त्यानीं पीडित, ठणका श्वास त्यानीं युक्त अशा मनुष्याचा विद्रधि असाध्य, इतिविद्रधिनिदानम्॥

मधुकोशंसमनिर्मथ्य सारमाकृष्य वैमया॥ व्याख्याकृतामहाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥

---

## व्रणनिदान.

एकदेशोत्थितःशोथो व्रणानांपूर्वलक्षणम्॥ षड्विधःस्यात्पृथक्सर्वरक्तागंतुनिमित्तजः॥१॥ शोथाः षडेतेविज्ञेयाःप्रागुक्तैःशोथलक्षणैः॥ विशेषःकथ्यतेतेषांपक्कापक्कविनिश्चये॥२॥ ॥

अर्थ— एके ठिकाणीं सूज उत्पन्न झाली म्हणजे समजावें कीं व्रण होणार आहे, तो पृथक् दोषानीं ३ सन्निपातानें १ रक्तानें १ आणि आगंतुज १ मिळून साहा प्रकारचा होतो, पूर्वी सांगितलेल्या शोथाच्या लक्षणा प्रमाणें त्या साहा शोथांचीं लक्षणें समजावीं, त्यांच्या पक्कापक्कादि निश्चयाविषयीं जो विशेष आहे तो मात्र येथें सांगतो.

## व्रणपाक

विषमंपच्यतेवातात्पित्तोत्थश्चाचिरंचिरं॥ कफ
जःपित्तवच्छोफोरक्तागंतुसमुद्भवः॥३॥ ॥

अर्थ— वातानें विषम पाक होतो; ह्मणजे कांहीं ठिकाणीं पिकतो, कांहीं ठिकाणीं पिकत नाहीं, पित्तानें फारलवकर पक्क होतो, कफानें पिकण्याला उशीर लागतो, रक्तज व आगंतुज शोथ पित्ता प्रमाणें ह्मणजे लौकर-पिकतात.

## अपक्कलक्षण.

मंदोष्मताल्पशोथत्वंकाठिण्यंत्वक्सवर्णता॥ मं-
दवेदनताचैवशोथानामामलक्षणम्॥ ४॥

अर्थ— शोथ हाताला थोडा ऊन लागतो, सूज थोडी असते, कठीणपणा असतो, रंग बदलत नाहीं, आणि ठणका थोडा असतो, हें शोथाचें आम लक्षण होय.

## पच्यमान लक्षण.

दह्यतेदहनेनेवक्षारेणेवचपच्यते॥ पिपीलिका
गणेनेवदश्यतेछिद्यतेतथा॥ ५॥ भिद्यतेचैवशस्त्रे
णदंडेनेवचताड्यते॥ पीड्यतेपाणिनेवांतःसूची-
भिरिवतुद्यते॥ सोषाचोषोविवर्णःस्यादंगुल्येवा
वपाट्यते॥ आसनेशयनेस्थानेशांतिंवृश्चिकवि-
द्धवत्॥ ७॥ नगच्छेदाततःशोथोभवेदाध्मातब
स्तिवत्॥ ज्वरस्तृष्णारुचिश्चैवपच्यमानस्यल
क्षणम्॥ ८॥

अर्थ— व्रण पिकत असतां अग्नीनें भाजल्या सारिखी आग होते, क्षार लावल्या प्रमाणें तो चुणचुणतो, मुंग्या डसल्या प्रमाणें वेदना होते,

तो दुभाग केल्या प्रमाणें व शस्त्रानें फाडल्या प्रमाणें व काठीनें मारल्या प्रमाणें व हातानें पिळल्या प्रमाणें व आंत सुईनें टोंचल्या प्रमाणें होतो; व त्यांत दाह होतो, अग्नीनें शेकल्या प्रमाणें त्यास वेदना होते, त्याचा रंग बदलतो, तो बोटानें फाडल्या सारिखा होतो; बसतानां निजताना, उभेराहातानां, विंचूडसल्या प्रमाणें जी वेदना होत असते ती कधीं शांत होत नाहीं, तो शोथ फुगलेल्या बस्ती प्रमाणे ताणला जातो. त्यांत ज्वर, तृषा, आणि अरूचि, हीं लक्षणें होतात.

## पक्वव्रणाचेंलक्षण.

वेदनोपशमःशोथोलोहितोल्पोनचोन्नतः॥प्रादुर्भावोबलीनांचतोदःकंडूर्मुहुर्मुहुः॥९॥उपद्रवाणांप्रशमोनिम्नतास्फुटनंत्वचः॥ बस्ताविवांबुसंचारः स्याच्छोथेंगुलिपीडिते॥१०॥पूयस्यपीडयत्येकमंतमंतेचपीडिते॥भक्ताकांक्षाभवेच्चैवशोथानांपक्वलक्षणम्॥११॥

अर्थ— व्रण पिकला ह्मणजे वेदना शांत होतात; सूज तांबडी होऊन थोडी बसरते, तिला सुरकुत्या पडतात, टोंचणी लागते, वारंवार कंड सुटते, पित्त रूत दाहादिउपद्रवांची शांति होते, सुजेला खळगा पडतो, त्वचेला भेगा पडतात, सूज बोटानें दाबली असतां बस्तींतलें पाणी जसें इकडे तिकडे होतें त्याप्रमाणें पूइकडे तिकडे होतो, अन्नावर वांछा होते.

एकादोषानेंसूजउत्पन्नझालीअसलीतरींतीपिकतेवेळींतिन्हींदोषांचासंबंधहोतो.

नर्तेनिलाद्रुग्नविनानपित्तंपाकःकफंवापिविनानपूयः॥तस्माद्धिसर्वेपरिपाककालेपचंतिशोथांस्त्रिभिरेवदोषैः॥१२॥

अर्थ— वायू वांचून ठणका लागत नाहीं, पित्ता वांचून दाह होत नाहीं, आणि कफा वांचून पू होत नाहीं, ह्मणून परिपाक कालीं तिन्ही दोष एकत्र होऊन सर्व प्रकारची सूज पिकते, "रक्तपाक लक्षण ग्रंथांतरीं सांगितलें आहे; तें असें; " कफजेषुच शोथेषु गंभीरं पाकमेत्यसृक्॥ पक्कंस्निग्धंततःस्पष्टंयत्रस्यात्क्लिन्न शोफता॥ त्वक्सावर्ण्यं रुजोत्सर्वं घनस्पर्शित्वमश्मवत्॥ रक्तपाकमितिब्रूयात्तंप्राज्ञोमुक्तसंशयः॥" अर्थस्पष्ट.

पून काढला असतां जो परिणाम होतो तो दृष्टांतानें सांगतो.

कक्षंसमासाद्ययथैववन्हिः वाय्वीरितःसंदहतिप्रसह्य॥ तथैवपूयोप्यविनिःसृतोहिमांसंशिरास्नायुचखादतीह॥१३॥

अर्थ— गवताच्या गंजीला आग लागून वायूचें साहाय्य झालें असतां जशी ती जळून खाक होते; तसेंच व्रणांतला पू न काढला असतां तो मांस, शिरा, आणि स्नायु ह्यांस खाऊन टाकतो.

आमादि लक्षण ज्ञानानें वैद्याचे गुणदोष दाखवितो.

आमंविदह्यमानंचसम्यक्पक्वंचलक्षणैः॥जानीयात्सभवेद्वैद्यः शेषास्तस्करवृत्तयः॥

अर्थ— अपक्व, पच्यमान, आणि चांगला पिकलेला व्रण जो वैद्य जा

णील त्यालाच वैद्य ह्मणावें, बाकीचे सर्व चोर आहेत.

अपक्क छेदन आणि पक्काचीउ
पेक्षाकेल्यानें वैद्याचा दोष सांग.

यश्छिनत्त्यामम ज्ञानाद्यश्च पक्कमुपेक्षते॥ श्व पचाविव मंतव्यौ तावनिश्चितकारिणौ॥१५॥ इति व्रणशोथ निदानम्

अर्थ— जो अज्ञानानें अपक्क शोथ पक्क समजून फोडतो, अथवा जो पक्काची उपेक्षा करितो, हे दोघे अविचारी चांडाळा प्रमाणें जाणावे.

---

## व्रणनिदान.

द्विधाव्रणःपरिज्ञेयः शारीरागंतुभेदतः॥ दोषैराद्य- स्तयोरन्यः शस्त्रादिक्षतसंभवः॥१॥

अर्थ— शारीर आणि आगंतुक ह्याभेदानें व्रण दोन प्रकारचे होतात. पहिला (शारीर) दोषानीं होतो; व दुसरा शस्त्रादिकें करून (धाय लागल्याने) होतो.

## वातिकव्रण.

स्तब्धः कठिणसंस्पर्शो मंदस्रावो महारुजः॥ तुद्यते स्फुरतिश्यावो व्रणो मारुतसंभवः॥२॥

अर्थ— वायू पासून झालेला व्रण ताठलेला असतो, हाताला कठिण लागतो, त्यांतून थोडा स्राव होतो, त्याला ठणका फार लागतो, टोंचणी लागत्ये, स्फुरण होतें, आणि तो काळ्या रंगाचा असतो.

## पैत्तिकव्रण.

तृष्णामोहज्वरक्लेददाहदुष्यवदारणे:॥ व्रणंपित्त
कृतंविद्याद्गंधैःस्रावैश्च पूतिकैः॥ ३॥

अर्थ— तृषा, मोह, ज्वर, क्लेद, दाह, सडणें, चिरापडणें, घाणआणिदुर्गंधस्रावहोणें, ह्या लक्षणानीं पित्त व्रण जाणावा.

## कफजव्रण.

बहुपिच्छोगुरुःस्निग्धःस्तिमितोमंदवेदनः॥पांडु
वर्णोल्पसंक्लेदीचिरपाकीकफोद्भवः॥४॥ ॥

अर्थ— कफाचा व्रण अत्यंत बुळबुळीत, जड, स्निग्ध, निश्चळ, मंद वेदन, पांडुर वर्ण, थोडा स्रवणारा, आणि चिरकालानें पिकणारा असा असतो.

## रक्तज व द्वंद्वज व्रण.

रक्तोरक्तस्रुतीरक्ताद्विद्विजःस्यात्तदन्वयैः॥ ५॥

अर्थ— रक्ता पासून जो व्रण होतो तो रक्तवर्ण होतो; व त्यातून रक्तस्राव होतो.

एक दोष आणि रक्त ह्यांचा संबंधानें द्वंद्वज व दोन दोष व रक्त ह्यांचा संबंधानें सन्निपातज व्रण जाणावा.

## सुखव्रण.

त्वङ्मांसजःसुखेदेशेतरुणस्यानुपद्रुतः॥धीमतो
भिनवःकालेसुखेसाध्यःसुखव्रणः॥ ६॥

अर्थ— जो व्रण त्वचा आणि मांस व मर्मरहितस्थानीं उपद्रव रहित असून तरूण व ज्ञानी पुरुषाला हेमंतशिशिर कालीं झालेला असतो तो सुख व्रण ह्मणावा, तो सुखसाध्य आहे.

## कृच्छ्रसाध्य व असाध्य व्रण.

गुणेरन्यतमैर्हीनस्ततः कृच्छ्रो व्रणः स्मृतः॥ सर्वैर्विहीनो विज्ञेयः सोसाध्यो निरुपक्रमः॥७॥

अर्थ— वर सांगितल्या गुणापैकीं कांहीं गुण कमी असल्यास व्रण कृच्छ्र साध्य होतो, आणि सर्व गुण रहित असतो तो असाध्य, त्याची चिकित्सा करूनये.

## दुष्ट व्रण.

पूतिपूयातिदुष्टासृक्स्राव्युत्संगी चिरस्थितिः॥ दुष्टव्रणोतिगंधादिः शुद्धलिंगविपर्ययः॥ ८॥

अर्थ—ज्यांतून दुर्गंधयुक्त पू आणि नासलेलें रक्त हीं वाहतात, जो वर उचललेला व आंतून पोकळ, फार दिवस राहाणारा, तो दुष्टव्रण ह्मणावा, — तो शुद्धलिंगाच्या विपरीत असतो.

## शुद्धव्रणल०

जिव्हातलाभोतिमृदुः श्लक्ष्णः स्निग्धोल्पवेदनः॥ सुव्यवस्थो निरास्रावः शुद्धो व्रण इति स्मृतः॥९॥

अर्थ—जो व्रण जिभेवरच्या भागासारिखा, अत्यंत मृदु, गुळगुळीत, स्निग्ध, अल्पवेदनायुक्त, चांगल्या प्रकारचा ह्मणजे उचललेला वगैरे नव्हे तो दोषरक्तादिस्रावरहित असतो तो शुद्ध व्रण समजावा.

## भरण्याच्या बेतात आलेला व्रण.

कपोतवर्णप्रतिमा यस्यांताः क्लेदवर्जिताः॥ स्थिरश्च पिटिकावंतो रोहतीति तमादिशेत्॥ १०॥

अर्थ— ज्याच्या कडा पारव्याचा रंगासारख्या असून त्यांतून क्लेद वाहात नाहीं, त्या कडा स्थीर असून त्यावर किरळ चढते. तो व्रण भरत आहे असें समजावें.

### भरलेल्या व्रणाचें लक्षण.

रूढवर्त्मानमग्रंथिमशूनमरुजं व्रणम्॥ त्वक्सव
र्णसमतलंसम्यग्रूढंतमादिशेत्॥ ११॥

अर्थ— ज्याचा मार्ग भरून आला आहे, गांठ मोडली आहे, सूज-व ठणका नाहीं, त्वचेसमान वर्ण झाला आहे, वरबोलगट पणामोडला आहे, तो चांगला भरून आला ह्मणून समजावें.

### व्याधिविशेषेंकरून व्रण कृच्छ्र साध्य होतो तें सांगतो.

कुष्ठिनांविषजुष्टानांशोषिणांमधुमेहिनाम्॥ व्रणाः
कृच्छ्रेणसिध्यंतियेषांचापिव्रणेव्रणाः॥ १२॥

अर्थ— कुष्ठीपुरुष, विषार झालेले, क्षयरोगी, मधुमेही, अशांचे व्रण कष्टानें साध्य होतात, वज्यांस पूर्वीच्या व्रणावर पुनः व्रण-होतात त्यांचे ही व्रण कष्टसाध्य होतात.

### साध्यासाध्यलक्षण.

वसांमेदोथमज्जानंमस्तुलुंगंचयःस्रवेत्॥ आगं
तुजोव्रणःसिध्येन्नसिध्येद्दोषसंभवः॥ १३॥

अर्थ— ज्या व्रणांतून चर्बी, मेद, मज्जा, आणि मस्तकांतील स्नेह-वाहातात, तो व्रण आगंतुज असेल तर साध्य होतो, आणि दोषकृत असेल तर साध्य होत नाहीं.

### असाध्यव्रण.

मद्यागुर्वाज्यसुमनःपद्मचंदनचंपकैः॥ सगंधा
दिव्यगंधाश्चमुमूर्षूणांव्रणाःस्मृताः॥ १४॥

अर्थ— मद्य, अगर, तूप, पुष्पें, कमळ, चंदन, आणि सोनचांप्याचें

फूल त्यांच्या सारखा, किंवा चमत्कारिक पारिजातकादि फुलांसारखा सुवास जा व्रणास येतो त्या व्रणानीं रोगी जगत नाहीं.

## दुसरीं असाध्य लक्षणें.

येन्वमर्मस्वसंभूताभवंत्यत्यर्थवेदनाः॥ दह्यंतेचांतरत्यर्थं बहिःशीताश्चयेव्रणाः॥१५॥ दह्यंतेबहिरत्यर्थंभवंत्यंतश्चशीतलाः॥ प्राणमांसक्षयश्वासकासारोचकपीडिताः॥१६॥ प्रवृद्धपूयरुधिराव्रणायेषांचमर्मसु॥ क्रियाभिःसम्यगारब्धानसिध्यंतिचयेव्रणाः॥१७॥ वर्जयेदेवतान्वैद्यः संरक्षन्नात्मनोयशः॥१७॥

अर्थ—जे व्रण मर्माचे ठिकाणीं उत्पन्न होऊन अत्यंत वेदना करितात ते; व ज्या व्रणांत अभ्यंतरीं दाह आणि बाहेर थंडावा असतो ते; अथवा बाहेर दाह असून अभ्यंतरीं थंड असतात ते; व ज्या मध्यें बळ, मांस, यांचा क्षय होतो; श्वास, खोकला, अरोचक, त्यांनी पीडा फार होते असे; व जे व्रण मर्मस्थानीं होऊन त्यांतून पू आणि रक्त फार वाहतात ते; व ज्या व्रणास चांगली चिकित्सा केली असतां साध्य होत नाहींत ते; अशा प्रकारचे व्रण आपलें यशरक्षण करणाऱ्या वैद्यानें सोडावे.

## व्रणाचा अपचार.

व्रणेश्वयथुरायासात्सचरागश्चजागरात्॥ तौचरुक्चदिवास्वापात्ताश्चमृत्युश्चमैथुनात्॥१८॥ ॥ इतिशारीरव्रणनिदानम्॥

अर्थ— आयास केल्यानें व्रणाला सूज येते, आणि जागरणानें सूज ये

ऊन तांबडा होतो; दिवसास निजल्यानें सूज लाली येऊन ठणका लागतो; आणि मैथुन केल्यानें सूज; लाली, ठणका, ही होऊन मृत्यु येतो. इति शारीरव्रणनिदानम्॥

मधुकोशंकनिर्मथ्यसारमाकृष्य वैभया॥ व्याख्याकृता माहाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥

---

## आगंतु व्रण निदान.

नानाधारामुखैःशस्त्रैर्नानास्थाननिपातितैः॥भवंतिनानाकृतयोव्रणास्तांस्तान्निबोधमे॥१॥ ॥

अर्थ— नाना प्रकारच्या धारांचीं वमुखांचीं शस्त्रें नाना प्रकारच्या ठिकाणीं लागून नाना तऱ्हेच्या आकृतीचे व्रण होतात ते सांगतो

### तेव्रणास हाप्रकारचे.

छिन्नंभिन्नंतथाविद्धंक्षतंपिच्चितमेवच॥घृष्टमाहुस्तथाषष्ठंतेषांवक्ष्यामिलक्षणम्॥२॥

अर्थ— छिन्न, भिन्न, विद्ध, क्षत, पिच्चित, आणि सहावा घृष्ट असे व्रण होतात; त्यांचीं लक्षणें येणें प्रमाणें.

### छिन्नलक्षण.

तिर्यक्छिन्नमृदुर्वापियोव्रणस्त्वायतोभवेत्॥गात्रस्यपातनंतद्धिछिन्नमित्यभिधीयते॥३॥

अर्थ—जो व्रण तिर्कस, सरक, किंवा लांब, होतो त्याला **छिन्न-** म्हणावें.

### भिन्नलक्षण.

शक्तिकुंतेषुखड्गाग्रविषाणैराशयोहतः॥यत्किं

चित्स्रवतेतद्धि भिन्नलक्षणमुच्यते॥ ४॥ ॥

अर्थ— बर्ची, भाला, बाण, तरवारीचें अग्र, विषाण (दांत, शिंगें) त्यानीं आशय (कोष्ठ) भोसकून थोडेंसें रक्त स्रवतें; त्याला भिन्न ह्मणतात.

## कोष्ठलक्षण.

स्थानान्यामाग्निपक्वानांमूत्रस्यरुधिरस्यच॥ हृ
दुंडुकःफुप्फुसश्चकोष्ठइत्यभिधीयते॥ ५॥ ॥

अर्थ— आमाशय, अग्न्याशय, पक्वाशय, मूत्राशय, रक्ताशय, काळीज, प्लीहा, हृदय, मळाशय, आणि फुप्फुस, ह्या ठिकाणास कोष्ठ ही संज्ञा आहे.

## त्याच्याभेदाचें लक्षण.

तस्मिन्भिन्नेरक्तपूर्णेज्वरोदाहश्चजायते॥ मूत्र
मार्गगुदास्येभ्योरक्तं घ्राणाच्चगच्छति॥ ६॥ मूर्छा
श्वासतृषाध्मानमभक्तच्छंदएवच॥ विण्मूत्रवात
संगश्चस्वेदास्रावोक्षिरक्तता॥ ७॥ लोहगंधित्व-
मास्यस्यगात्रदौर्गंध्यमेवच॥ हृच्छूलंपार्श्वयो
श्चापिविशेषंचात्रमेशृणु॥ ८॥

अर्थ— तो कोष्ठ भिन्न होऊन रक्तानें भरला असतां ज्वर, दाह, होतो; मूत्र मार्ग, गुद, मुख, आणि नाक यांतून रक्त वाहातें; मूर्छा, श्वास, तृषा, पोटास फुगवटी, अन्नावर द्वेष, मळ, मूत्र, वात, यांचा अवरोध, घाम फार येणें, डोळ्यानां लाली, मुखाला लोखंडाची घाण, आंगाला दुर्गंधि, हृदयाला, आणि बरगड्यानां शूळ, हीं लक्षणें होतात, त्यापेक्षां विशेष होतो तो सांगतो.

आमाशयस्थितरक्तलक्षण.

आमाशयस्थेरुधिरेरुधिरंछर्दयत्यपि॥ आध्मानम
तिमात्रंचशूलंचभृशदारुणम्॥९॥

अर्थ—आमाशयांत रक्त सांचलें असतां रक्ताची वांति होते, पोट फार फुगतें, आणि अत्यंत भयंकर शूल होतो.

पक्काशयस्थरक्तलक्षण.

पक्काशयंगतेचापिरुजागौरवमेवच।अधःकायेवि-
शेषेणशीतताचभवेदिह॥१०॥

अर्थ— पक्काशयांत रक्त सांचलें असतां शूळ, जडपणा, आणि कंबरेपासून विशेषें करून गारवा असतो.

विद्धलक्षण.

सूक्ष्मास्यशल्याभिहतंयदंगंत्वाशयंविना॥उत्तुंडि
तंनिर्गतंवातद्विद्धमितिनिर्दिशेत्॥११॥

अर्थ— बारीक अग्राच्या शल्यानें आशया वांचून जें अंगटोचलें जातें तेंउत्तुंडित (ह्मणजे तोंड पडलेलें) निर्गत ह्मणजे (शल्यनिघूनगेलेलें) होतें त्याला विद्ध असें ह्मणतात.

क्षताचेंलक्षण.

नातिच्छिन्नंनातिभिन्नमुभयोर्लक्षणान्वितम्॥वि
षमंव्रणमंगेषुतत्क्षतंत्वभिनिर्दिशेत्॥१२॥

अर्थ—जें अंग अतिछिन्न व अतिभिन्न झालें नसून दोघांच्या लक्षणानींयुक्त असतें, व व्रण वांकडा तिकडातिकडा पडतो त्याला— क्षत ह्मणतात.

पिच्चितलक्षण.

प्रहारपीडनाभ्यांतु यदंगं पृथुतांगतम्॥ सास्थितत्पि
च्चितं विद्यान्मज्जारक्तपरिप्लुतम्॥१३॥ ॥

अर्थ— जें अंग हाडासहित प्रहार किंवा दाबणें यांच्या योगानें चेंचून पसरतें; व रक्त बोंबाळ होऊन मेंदु निघतो त्यास पिच्चित ह्मणावें.

## घृष्टलक्षण.

घर्षणादभिघाताद्वा यदंगं विगतत्वचम्॥ ऊषास्रा
वान्वितं तद्धि घृष्टमित्यभिनिर्दिशेत्॥१४॥ ॥

अर्थ— घांसटल्यानें, कांहीं लागल्यानें जा अंगावरची सालडी जाते, व आग होऊन रक्त स्त्रवतें त्याला घृष्ट ह्मणावें.

## सशल्य व्रण.

श्यावं सशोथं पिटिकान्वितंच मुहुर्मुहुः शोणित वा-
हिनंच॥ मृदूद्गतं बुद्बुदतुल्यमांसं व्रणं सशल्यं सरु
जं वदंति॥१५॥

अर्थ— जो व्रण निळा, सूज लेला, पुळ्यानीं व्याप्त, असून वारंवार त्यांतून रक्त वाहातें; मृदु असून वर उचललेला असतो, व ज्याचें मांस बुडबुड्या प्रमाणें वर आलें असतें; त्या व्रणांत शल्य आहे म्हणून समजावें

## कोष्ठभेद लक्षण.

त्वचोतीत्य शिरादीनि भित्वा वा परिहृत्य वा॥ को
ष्ठे प्रतिष्ठितं शल्यं कुर्यादुक्तानुपद्रवान्॥१६॥ ॥

अर्थ— त्वचेच्या पलीकडे शिरादिकांचा भेद करून किंवा त्याला सोडून जें शल्य कोष्ठांत राहातें त्या पासून सांगितलेले उपद्रव होतात.

## असाध्यकोष्ठभेद.

तत्रांतर्लोहितं पांडु शीतपादकराननम्। शीतो-
च्छ्वासंरक्तनेत्रमानद्धंपरिवर्जयेत्॥१७॥

अर्थ— ज्याचें रक्त आंत सांचलें आहे (ह्मणजे बाहेर वाहिलें नाहीं), जो पांडुर वर्ण, ज्याचे हात पाय गार थंड झाले आहेत, व जो थंड श्वास सोडतो, ज्याचे डोळे लाल झाले आहेत, आणि आनाह ह्मणजे (पोट फुगणें) युक्त आहे अशा रोग्यास सोडावें.

## मांस, शिरा, स्नायु, अस्थि, आणि संधी यांच्या मर्मांनां जखम लागली असतां सामान्य लक्षण.

भ्रमः प्रलापः पतनं प्रमोहो विचेष्टनं ग्लानिरथोष्णताच॥ स्रस्तांगता मूर्छनमूर्ध्ववातस्तीव्रा रुजो वातकृताश्चतास्ताः॥१८॥ मांसोदकाभंरुधिरंचगच्छेत्सर्वेंद्रियार्थोपरमस्तथैव॥ दशार्धसंख्येषथ विक्षतेषु सामान्यतो मर्मसु लिंगमुक्तम्॥१९॥

अर्थ— भ्रम, बडबड, पडणें, इंद्रियमनोमोह, हात पाय पाखडणें, ग्लानि, उष्णता, अंग गळणें, मूर्छा, दम लागणें, वातजन्य तीव्रपीडा होणें, मांस धुतलेल्या पाण्यासारिखें रक्त वाहाणें, सर्व इंद्रियें विकळ होणें, (ह्मणजे त्यांचे व्यापार बंद होतात) हीं लक्षणें पांच मर्में विद्ध झालीं असतां होतात.

## मर्मरहित शिरा विद्धाचें लक्षण.

स्फुरेंद्रगोपप्रतिमं प्रभूतं रक्तं स्रवेत्तत्क्षतजश्च वायुः॥ करोति रोगान्विविधान्यथोक्तान् शिरासु विद्धास्वथवा क्षतासु॥२०॥

अर्थ—शिरा टोंचल्या किंवा त्यांना क्षत झालें असतां त्यांतून इंद्रगोपकिड्या प्रमाणें अलवपुष्कळरक्त स्रवतें; रक्तक्षयानें वायु कुपित होऊन नाना प्रकारचे (आक्षेपकादि) रोग उत्पन्न होतात.

## स्नायुविद्ध.

कौब्ज्यं शरीरावयवावसादः क्रियास्वशक्तिस्तुमुलारुजश्च॥ चिराद्व्रणो रोहति यस्य चापि तं स्नायुविद्धं पुरुषं व्यवस्येत्॥ २१॥

अर्थ—कुब्जता, शरीर ग्लानि, काम करण्यास असामर्थ्य, बहुत वेदना, ज्याची जखम फार दिवसांनीं भरते, त्याचा स्नायु विद्ध झाल्या आहेत म्हणून समजावें.

## संधिविद्ध.

शोथाभिवृद्धिस्तुमुलारुजश्च बलक्षयः पर्वसु भेदशोथौ॥ क्षतेषु संधिषु चलाचलेषु स्यात्सर्वकर्मोपरमश्च लिंगम्॥२२॥

अर्थ— चल किंवा अचल सांधीचा वेध झाला असतां सूज वाढते, वेदना फार होतात, शक्तिपात होतो, सांधीमध्यें भेद व पीडा होते, आणि सूज येते; कोणतें ही काम करावें सें वाटत नाहीं.

## अस्थिविद्ध.

घोरारुजो यस्य निशादिनेषु सर्वास्ववस्थासु च नैति शांतिम्॥ भिषग्विपश्चिद्विदितार्थसूत्रस्तमस्थिविद्धं पुरुषं व्यवस्येत्॥२३॥

अर्थ—ज्या पुरुषाला रात्रंदिवस भयंकर पीडा होतात, जागृतादि-सर्व अवस्थामध्यें शांति नसते, त्याचें अस्थि विद्ध झालें आहे असें

सूज्ञ वैद्यानें जाणावें.

### मर्मरहितशिरादिकांच्याविद्धल क्षणाकथनानें शिरादिमर्मविद्धल क्षणाचा हवाला देतो.

यथास्वमेतानिविभावयेत्तुलिंगानि मर्मस्वभिताडितेषु॥

अर्थ— मर्माच्या ठिकाणीं अभिघात झाला असतां हीं पूर्वोक्त लक्षणें ज्याचीं त्यास जाणावीं, चकारें करून हीं लक्षणें आणि सामान्य लक्षणें होतात ह्मणून समजावें.

### मांसमर्माचें लक्षण सांगितलें नाहीं तें सांगतो.

पांडुर्विवर्णःस्पर्शितंनवेत्ति योमांसमर्मस्वभिताडितः स्यात्॥ २४॥

अर्थ— जो पुरूषमांस मर्माचे ठिकाणीं विद्ध होतो तो पांडुर वर्ण, बेरंग होऊन स्पर्श जाणत नाहीं.

### सर्वव्रणाचेउपद्रव.

विसर्पःपक्षघातश्चशिरास्तंभोपतानकः॥ मोहोन्मादव्रणरुजाज्वरस्तृष्णाहनुग्रहः॥ २५॥ कासश्छर्दिरतीसारो हिक्काश्वासःसवेपथुः॥ षोडशोपद्रवाः प्रोक्ता व्रणानां व्रणचिंतकैः॥ २६॥ ॥ इतिसद्योव्रणनिदानम्॥

अर्थ— विसर्प, पक्षाघात, शिरास्तंभ, अपतानक, मोह, उन्माद, ज्वर, व्रणपीडा, तृष्णा, हनुग्रह, खोकला, ओकारी, अतिसार, उचकी,

श्वास, कंप, हे व्रणाचे सोळा उपद्रव सांगितले आहेत, इतिस योव्र-णनिदान.

मधुकोशंस्कृनिर्मथ्य सारमाकृष्य वैमया॥ व्याख्याकृता महाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥

---

## भग्ननिदान.

भग्न दोन प्रकारचें; एक सव्रण-आणि एक अव्रण; त्यांत सव्रणसां गून अव्रणं सांगतो.

भग्नंसमासाद्द्विविधंहुताशकांडेचसंधौचहि॥

अर्थ— हे अग्निवेशा, कांड भंग आणि संधि भंग मिळून संक्षेपानें भग्न दोन प्रकारचें होतें.

## संधिभग्न.

तत्रसंधौ॥ उत्पिष्टविश्लिष्टविवर्तितंचतिर्यक्चवि क्षिप्तमधश्चषोढा॥१॥

अर्थ-त्यामध्येंसंधिस्थली भग्न सहा प्रकारचें होतें, त्यांचीं नावें उत्पिष्ट, विश्लिष्ट, विवर्तित, तिर्यक्, विक्षिप्त आणि अधःक्षिप्त.

## संधिभंगाचेंसामान्यलक्षण.

प्रसारणाकुंचनवर्तनोग्रारुक्स्पर्शाविद्वेषणमे-तदुक्तम्॥ सामान्यतःसंधिगतस्यलिंगं॥२

अर्थ— पसरते वेळीं, आंखुडते वेळीं, किंवा न हालविलें तरी फार दुखतें, आणि स्पर्श सोसत नाहीं, हें संधिभग्नाचें सामान्यलक्षण.

उत्पिष्टसंधेःश्वयथुःसमंतात्॥विशेषतोरात्रि-

भवारुजाच.

अर्थ—उत्पिष्ट संधीच्या भोंवताली सूज येते, आणि रात्रीस पीडा फार होते, संधि स्थळीं दोन हाडें एकमेकाला घांसतात, त्याला उत्पिष्ट ह्मणतात.

विश्लिष्टजे तोच रुजाच नित्यम्॥ ॥

अर्थ—विश्लिष्ट संधीमध्यें भोंवताली सूज आणि रात्रिपीडा हीं असून सर्व काळ अत्यंत पीडा असते, येवढा उत्पिष्टापेक्षां विशेष. विश्लिष्ट ह्मणजे संधि शिथिल मात्र होतो, ह्यांत हाडें सरून मध्यें खळगा पडतो.

विवर्तितेपार्श्वरुजश्चतीव्राः

अर्थ—विवर्तित संधीमध्यें दोहों बाजूंचीं हाडें संधिपासून बाजूकडे जातात ह्मणून तीं फार दुखतात, ह्या संधीमध्यें दोहों कडचीं हाडें गरगरां फिरतात.

तिर्यग्गतेतीव्ररुजोभवंति॥

अर्थ—तिर्यग्गत झालें असतां फार पीडा होते, येथें एक अस्थिसंधि स्थान सोडून वांकडें जातें.

क्षिप्तेतिशूलंविषमारुगस्थ्नोः

अर्थ—ऊर्ध्वक्षिप्तामध्यें अत्यंत शूळ आणि हाडांना क्रमजाजती पीडा होते, एथें एका अस्थीच्या क्रियेनें किंवा दोहों अस्थींच्या क्रियेनें दोन्हीं हाडें परस्परापासून दूर होतात.

क्षिप्तेत्वधोरुग्विघटश्चसंधेः॥

अर्थ—अधःक्षिप्तामध्यें पीडा व संधीचा बिघाड होतो, यांत ही संधीची हाडें परस्पर दूर होतात; परंतु किंचित् खालीं जातात येव

दाविशेष

आतां कांडभग्नसांगतों.

कांडेत्वतः कर्कटकाश्वकर्णविचूर्णितंपिच्चितमस्थि झल्लिका॥ कांडेषुभग्नंत्वतिपातितंचमज्जागतंचस्फुटितंच वक्रं॥४॥ छिन्नंद्विधा द्वादशधापि कांडे.

अर्थ— कांड भग्न १२ प्रकारचें, तें असें; १ कर्कट, २ अश्वकर्ण, ३ विचूर्णित, ४ पिच्चित, ५ अस्थि छल्लिका, ६ कांडभग्न, ७ अतिपातित, ८ मज्जागत, ९ स्फुटित, १० वक्र, आणि दोन प्रकारचें छिन्न,

१ कर्कटक ह्मणजे हाड दोन्ही बाजूस दबलेलें असून मध्यें उचललेलें असतें.

२ अश्वकर्ण— घोड्याच्या काना सारिखें जें हाड होतें तें.

३ विचूर्णित — चुरलेलें हाड, तें शब्दानें किंवा स्पर्शानें जाणावें.

४ पिच्चित— पिचलेलें हाड.

५ अस्थिछल्लिका— हाडाचा कांहीं भाग गुंतून राहातो ती,

६ कांडभग्न— हाडाचें कांडें मोडणें.

७ अतिपात— सगळें हाड तुटतें तें.

८ मज्जागत— हाड मोडून मज्जेंत शिरून मज्जा बाहेर पडल्ये.

९ स्फुटित— ज्या हाडाचे पुष्कळ तुकडे होतात तें.

१० वक्र— हाड वांकडें होतें तें; हें ही भग्नांतच गणलें आहे.

११ छिन्न २ — बारीक बारीक व पुष्कळ तुकडे होतात तें, एक, व दुसरें एका बाजूला सबंद असून दुसरे बाजूस फुटतें तें.

कांडभग्नाचेंसामान्यलक्षण.

स्रस्तांगताशोथरुजातिवृद्धिः॥ संपीड्यमानेभव-
तीहशब्दःस्पर्शासहस्पंदनतोदशूलाः॥५॥सर्वा
स्ववस्थास्रनशर्मलाभोभग्नस्यकांडेखलुचिन्हमे-
तत्॥६॥

अर्थ—अंगगळणें, सूजयेणें, ठणका फार लागणें, भग्नस्थलीं चेपून पाहिलें असतां शब्द होणें, हात लावलेला सोसत नाहीं, कांपरें फुटतें, टोंचणी लागल्ये, शूळ होतो, कधीं ही चैन पडत नाहीं, कांड शब्दानें नलक, कपाल, वलय, तरुण, आणि रुचक त्या पांच प्रकारचा अस्थींचा संग्रह होतो.

## कांडभग्नाचेबारांहूनहीअ धीकप्रकारहोतातत्स्रं सांगतो.

भग्नंतु कांडे बहुधाप्रयातिसमासतोनामभिरेवतु
ल्यम्॥

अर्थ— कांडाचे ठायीं अनेक प्रकारचा भंग होतो, तो जाजास्थळीं जशा आकृतीचा असेल त्या प्रमाणें त्याला नांव द्यावें.

## कष्टसाध्य.

अल्पाशनोनात्मवतोजंतोर्वातात्मकस्यच॥उपद्र
वैर्वाजुष्टस्यभग्नंकृच्छ्रेणसिद्ध्यति॥७॥

अर्थ— अल्प आहार करणारा, इंद्रियें स्वाधीन नठेवणारा, वात प्रकृतीचा, ज्वरादि उपद्रवानीं युक्त अशा पुरुषाचें मोडलेलें हाड मोठ्या कष्टानें साध्य होतें.

## असाध्य लक्षण.

भिन्नंकपालंकट्यांतुसंधिमुक्तंतथाच्युतम्॥जघ

नंप्रतिपिष्टंच वर्जयेत्तुविचक्षणः॥ ८॥ ॥

अर्थ— कंबरेचे कपालास्थिफुटलें किंवा संधीपासून अस्थि सुट लें किंवा अगदींच निखळलें, आणि जघनास्थि चूर झालें असतां तें सोडावें.

## दुसरें असाध्य लक्षण.

असंश्लिष्टकपालंच ललाटेचूर्णितंचयत्॥भग्नं-
स्तनांतरेशंखेशंखेमूर्ध्निचवर्जयेत्॥ ९॥

अर्थ— ललाटास्थीचे तुकडे तुकडे होऊन ते परस्पर दूर राहून न-जडण्याजोगें झालें असतां; अथवा स्तनाच्या मधलें अथवा पाठीचें किंवा शंखास्थि, मस्तकास्थि भग्न झालें असतां सोडावें.

## ह्यगई केल्यानें असाध्य त्वसांगतात.

सम्यक्संधितमप्यस्थिदुर्निक्षेपनिबंधनात्॥
संक्षोभाद्वापियद्गच्छेद्विक्रियांतच्चवर्जयेत्॥१०

अर्थ— अस्थि चांगलें जुळलें असून चांगलें ठेवलें नाहीं, अथवा-चांगलें बांधलें नाहीं, किंवा त्याला कांहीं ढका लागला तर तें विकोप्यास जातें, तें बरें होत नाहीं.

## निरनिराळ्या अस्थि निरनिरा ळ्या रीतीनीं भग्न होतात तें सांगतो.

तरुणास्थीनिनम्यंतेभिद्यंतेनलकानिच॥ कपाला
निविभज्यंतेस्फुटंतिरुचकाणिच॥११॥ इतिभ-
ग्ननिदानम्॥

अर्थ— तरुणास्थि दबतात, नळ्या चिरतात, कपाळें फुटून तुकडे

तुकडे होतात, आणि रुचकास्थि (दांतवगैरे) चे कपारे उडतात. ॥
इतिभग्ननिदान॥ ॥

मधुकोशंसमनिर्मथ्यसारमाकृष्यवैमया॥ व्याख्याकृतामहाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥

---

## नाडीव्रणनिदान.

### संप्राप्ति.

यः शोथमाममतिपक्कमुपेक्षतेज्ञोयोवाव्रणंप्रचुरपूयमसाधुवृत्तः॥ अभ्यंतरंप्रविशतिप्रविदार्यतस्यस्थानानिपूर्वविहितानिततःसपूयः॥१॥ तस्यातिमात्रगमनाद्गतिरिष्यतेतुनाडीवयद्वहतितेनमतातुनाडी॥

अर्थ— जो मूर्ख मनुष्य पिकलेला शोथ अपक्वच आहे म्हणून उपेक्षा करितो; किंवा पुष्कळ पू झालेल्या व्रणाची उपेक्षा करितो त्याचा पू पूर्वोक्त त्वङ्मांसादिकस्थानीं जाऊन त्यांचा भेद करून तो फारखोल गेल्यामुळें एकमार्ग होतो; त्यांतून तो पू नाडीप्रमाणें वाहतो. म्हणून त्याला **नाडी** म्हणतात.

### संख्यारूपसंप्राप्ति.

दोषैस्त्रिभिर्भवतिसापृथगेकशश्चसंमूर्छितैरपिचशल्यनिमित्ततोन्या॥२॥ ॥

अर्थ— पृथक् दोषानीं ३ सन्निपातानें १ आणि शल्यापासून १ अशी ती नाडी पांच प्रकारची होते.

### वातनाडीव्रण.

तत्रानिलात्परुषसूक्ष्ममुखीसशूलाफेनानुवि-
द्धमधिकंस्रवतिक्षपासु ॥

अर्थ— वायू पासून नाडीचें तोंड रूक्ष व बारीक होतें; व शूळ होतो. तिच्या तून फेसयुक्त स्राव होतो; आणि रात्रीस तर फारच होतो.

## पित्तनाडी.

पित्तात्तुतृड्ज्वरकरीपरिदाहयुक्तापीतंस्रवत्यधि
कमुष्णमहःसुचापि॥ ३॥

अर्थ— पित्तज नाडीपासून, तृषा, ज्वर, आणि दाह होतो; तिच्या तून पिंवळा कढत व पुष्कळ पूवा हातो; तो दिवसास अधीक होतो.

## कफजनाडी.

ज्ञेयाकफाद्बहुघनार्जुनपिच्छिलास्रास्तब्धासकं
डुररुजारजनीप्रवृद्धा॥

अर्थ— कफज नाडीतून पांढरा, दाट, चिकट, पूवा हातो; कंडू सुटते; रात्रीचा स्राव फार होतो.

## सन्निपातजनाडी.

दाहज्वर श्वसनमूर्छनवक्त्रशोषायस्यांभवंति
विहितानिचलक्षणानि॥ ४॥तामादिशेत्पवनपित्त
कफप्रकोपात् घोरामसुक्षयकरीमिवकालरात्रिम्॥

अर्थ— ज्या नाडीमध्यें दाहज्वर, श्वास, मूर्छा, कोरड, व उक्त लक्षणें होतात; ती त्रिदोष कोपजन्य जाणावी, ती भयंकर प्राणनाश करणारी कालरात्री सारिखी होय.

## शल्यजनाडी.

नष्टंकथंचिदनुमार्गमुदीरितेषुस्थानेषुशल्यमचि

रेणा गतिं करोति॥ सा फेनिलं मथितमुष्णमसृग्वि
मिश्रं स्रावं करोति सहसा सरुजं च नित्यम्॥ ५॥

अर्थ—कोण त्याही प्रकारानें शल्य (कंटकादि) उक्तस्थानीं जाऊन मोडलें असतां नाडी उत्पन्न करितें, त्या नाडीतून फेस व रक्त युक्त कढत आणि घुसळल्या सारिखा नित्य पू वाहतो; व ठणका लागतो.

साध्यासाध्यलक्षण.

नाडी त्रिदोषप्रभवा न सिद्ध्येच्छेषाश्चतस्त्रः खलु
यत्नसाध्याः॥ ६॥ इति नाडीव्रणनिदानम्॥

अर्थ— त्रिदोषज नाडी साध्य होत नाहीं, बाकीच्या चार नाड्या यत्न केला असतां साध्य होतात, इति नाडीव्रणनिदानम्॥ ॥

मधुकोशाख्यनिर्मथ्य सारमाकृष्य वै मया॥ व्याख्या
कृता महाराष्ट्री माधवार्थप्रकाशिका॥ ॥

---

भगंदरनिदान.

गुदस्य व्यंगुले क्षेत्रे पार्श्वतः पिटिकार्तिकृत्॥
भिन्ना भगंदरो ज्ञेयः स च पंचविधो मतः॥ १॥

अर्थ— गुदा पासून बाजूस दोन अंगुळांवर एक पिटिका होतें; तिला फार ठणका लागतो, ती फुटली ह्मणजे तोच भगंदर (भगेंद्र) रोग होतो, तो पांच प्रकारचा आहे.

पूर्वरूप.

कटीकपालनिस्तोददाहकंडूरुजादयः॥ भवं-
ति पूर्वरूपाणि भविष्यति भगंदरे॥ २॥

अर्थ— कंबरेच्या कपालास्थीला टोचणी लागते, आग होते, कंडू

टतें, ठणका लागतो, भगंदर व्हावयाचा असला ह्मणजे अशीं लक्ष णें होतात.

## शतपोनकलक्षण.

कषायरूक्षैरतिकोपितोनिलस्त्वपानदेशेपिटि-
कांकरोतियां॥ उपेक्षणात्पाकमुपैतिदारुणंरुजा-
चभिन्नारुणफेनवाहिनी॥३॥ तत्रागमोमूत्रपुरी
षरेतसांव्रणेरनेकैः शतपोनकंवदेत्॥

अर्थ—तुरट आणि रूक्ष पदार्थ भक्षणानें वायु अत्यंत कुपित होऊन गुदस्थानीं जी पिटिका करितो तिची उपेक्षा केली असतां ती पिकते; आणि फुटली ह्मणजे ठणका लागून तांबूस फेंसाळ पू वाहातो, व तेथें अनेक छिद्रें पडतात, त्यांवाटें मूत्र, पुरीष, आणि रेत हीं वाहातात, चाळणी सारिखीं छिद्रें असतात ह्मणून त्या रोगाला शतपोनक ह्मणतात.

## उष्ट्रशिरोधरलक्षण.

प्रकोपनैःपित्तमतिप्रकोपितंकरोतिरक्तांपिटिकां
गुदाश्रिताम्॥ तदाशुपाकाहिमपूयवाहिनींभगं
दरंतूष्ट्रशिरोधरंवदेत्॥४॥ ॥

अर्थ—पित्तल पदार्थांनीं पित्त प्रकुपित होऊन गुदस्थानीं लाल पिटिका उत्पन्न होते, ती लवकर पिकून तिच्यांतून कढत पू वाहातो; ही पिटिका उंटाच्या मानें सारिखी असते ह्मणून हिला उष्ट्रशिरोधर हें नाव दिलें आहे.

## परिस्रावीभगंदर.

कंडूयनोघनस्रावीकठिणोमंदवेदनः॥ श्वेतावभा

सः कफजः परिस्रावी भगंदरः॥५॥ ॥

अर्थ— कफा पासून झालेल्या भगंदरास कंड सुटते, व त्यांतून घट्ट पू वाहातो, वती पिटिका कठीण असते, व तिला ठणका कमी असतो; तिचा वर्ण पांढरा असतो.

## शंबूकावर्तभगंदर.

बहुवर्णरुजास्रावाः पिटिकागोस्तनोपमाः॥ शंबूकावर्तवन्नाडी शंबूकावर्तकोमतः॥६॥

अर्थ— ह्यांत गाईच्या स्तना सारिख्या अनेक पिटिका होतात, त्यांचे रंग, वेदना, आणि स्राव, हे अनेक तऱ्हेचे असतात, आणि व्रण शंखाच्या भोंवऱ्या प्रमाणें पीरवार लेला असतो ह्मणून त्याला शंबूकावर्त असें ह्मणतात.

## उन्मार्गिभगंदर.

क्षताकृतिः पायुगता विवर्धते ह्युपेक्षणात्तात्कृमयो विदार्यते॥ प्रकुर्वते मार्गमनेकधा मुखैर्व्रणे स्तदुन्मार्गिभगंदरं वदेत्॥७॥

अर्थ— कंटकादिकें करून गुदाजवळ झालेल्या क्षताची उपेक्षा केली असतां तें क्षत चरत चरत गुदापर्यंत जातें. त्यांत किडे पडून त्या क्षताचें विदारण होतें, ते कृमि अनेक तोंडें पाडतात, ह्याला उन्मार्गि भगंदर ह्मणतात.

## साध्यासाध्यलक्ष०

घोराः साधयितुं दुःखाः सर्व एव भगंदराः॥ तेष्वसाध्यस्त्रिदोषोत्थः क्षतजश्च विशेषतः॥८॥ ॥

अर्थ— सर्व भगंदर दुःसाध्य आहेत, त्यांमध्यें त्रिदोषज भगंदर-

असाध्य, आणि क्षतज तर विशेषें करून असाध्य.

## असाध्यलक्षण.

वातमूत्रपुरीषाणि कृमयः शुक्रमेवच॥ भगंदरा त्स्रवंतिनाशयंतितमातुरम्॥१॥ ॥इतिभ गंदरनिदानम्॥ ॥

अर्थ— ज्या भगंदरांतून वायु, मूत्र, पुरीष, कृमि, आणि शुक्र वाहा तात, त्याच्या योगानें रोगी मरतो. इतिभगंदरनिदानम्॥ ॥

मधुकोशांसनिर्मथ्यसारमाकृष्यवैमया॥ व्याख्याकृता महाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥ ॥

---

# उपदंशनिदानम्॥

## कारण.

हस्ताभिघातान्नखदंतघातादधावनादत्यतिसेव नाद्वा॥ योनिप्रदोषाच्चभवंतिशिस्नेपंचोपदंशा- विविधापचारैः॥१॥

अर्थ— हाताच्या अभिघातानें; नख, दांत, लागल्यानें; न धुतल्यानें; अत्यंत रति केल्यानें; किंवा योनिदोषानें, किंवा घाणेरड्या पाण्या- नें धुतल्यानें; इत्यादिकारणानीं शिस्नाचे ठाईं उपदंश (गर्मी, दुःख) रोग होतो, तो पांच प्रकारचा आहे.

## वातोपदंशलक्षण.

सतोदभेदस्फुरणैः सकृष्णैः स्फोटैर्व्यवस्येत्पवनो पदंशम्॥

अर्थ— शिस्नावर काळे फोड उठून त्यांत टोंचणी, फूट, आणि स्फुरण,

हीं होतात.

## पित्तोपदंशवरक्तोपदंशलक्षण.

पीतैर्बहुक्लेदयुतैःसदाहैःपित्तेनरक्तासितशितावभासैः॥२॥

अर्थ— पित्ताचा उपदंशानें पिवळे फोड येतात, त्यांतून फार पाणी वाहातें; आग होते, रक्तानें मांसा सारिखे तांबडे फोड येतात.

## कफोपदंशलक्षण.

सकंडुरैशोथयुतैर्महद्भिःशुक्लैर्घनस्त्रावयुतैः कफेन॥

अर्थ— कफाच्या उपदंशानें पांढरे मोठाले फोड येतात, कंडू सुटते, सूजयेते, आणि दाटपू वाहातो.

## सन्निपातोपदंशलक्षण.

नानाविधस्त्रावरुजोपपन्नमसाध्यमाहुस्त्रिमलोपदंशम्॥३॥

अर्थ— या उपदंशांत नाना प्रकारचे स्त्राव वेदना होतात, ह्या त्रिदोषज उपदंश असाध्य आहे.

## असाध्यलक्षण.

विशीर्णमांसंकृमिभिःप्रजग्धंमुष्कावशेषंपरिवर्जयेत्तु॥

अर्थ— ज्या उपदंशानें मांस गळालें आहे, आणि कृमीनीं शिश्न खाऊन अंड मात्र अवशेष राहिलें आहे, तो वैद्यानें सोडावा.

## असाध्यलक्षण.

संजातमात्रेनकरोतिमूढःक्रियांनरोयोविषयेप्रसक्तः॥ कालेनशोथकृमिदाहपाकैर्विशीर्णशिश्नोम्रि

गळून जातें· त्या पाई तो मरतो.

लिंगवर्तिलक्षण.

अंकुरैरिवसंघातैरुपर्युपरिसंस्थितैः॥ क्रमेणजाय
तेवर्तिस्ताम्रचूडशिखोपमा॥ ५॥ कोशस्याभ्यंतरे·
संधौसर्वसंधिगतापिवा॥ लिंगवर्तिरितिख्यातालिं
गार्श इतिचापरे॥ ६॥ कुलित्थाकृतयः केचित्केचित्
पद्मदलोपमाः॥ ७॥ मेंद्रसंधौनृणांकेचित्केचित्स-
र्वाश्रयाः स्मृताः॥ रुजादाहार्तिबहुलास्तृष्णातोद·
समन्विताः॥ स्त्रीणांपुंसांचजायंते ह्युपदंशाः सुदारुणाः॥ ८॥ इत्युपदंशनिदानम्॥

अर्थ—शिश्नावर मांसाचे कोंम एकावर एक उगवून कोंबड्याच्या शेंडी सारिखे कोशाच्या आंत मण्यावर किंवा सर्व संधीभर होतात-त्या रोगाला **लिंगवर्ति** ह्मणतात व कोणी **लिंगार्श** ही ह्मणतात· ही त्रिदोषजन्य आहे, ह्मणूनच वेदना युक्त बबुळबुळीतअसते. अन्यत् सुगमं इत्युपदंशनिदानम्·

मधुकोशं सुनिर्मथ्य सारमाकृष्यवैमया॥ व्याख्या सु
तामहाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥ ॥

---

शूकदोषनिदानम्

अकस्माच्छेफसोवृद्धिंयोभिवांछतिमूढधीः॥

व्याधयस्तस्य जायंते दशचाष्टौ च शूकजाः ॥ १ ॥

अर्थ— जो मंदमती पुरुष क्रमा वांचून शिश्न मोठें होण्याच्या इच्छेनें शिश्नावर विष कृमीचा लेप करितो त्याला १८ शूकज व्याधी होतात.

सर्षपिकेचें लक्षण.

गौरसर्षपसंस्थाना शूकदुर्भुग्नहेतुका ॥ पिटिका श्लेष्मवाताभ्यां ज्ञेया सर्षपिका च सा ॥ २ ॥

अर्थ— दुष्ट जलजंतूंना वाईट रीतीनें लेप केल्यानें कफवात कुपित होऊन पांढऱ्या मोहोरी येवढी जी पिटिका होते तिला **सर्षपिका** म्हणतात.

अष्ठीलिकालक्षण.

कठिणा विषमैर्भुग्नैर्वायुना ष्ठीलिका भवेत् ॥

अर्थ— अप्रशस्त शूकांच्या लेपानें वायु कुपित होऊन आठोळी सारिखी कठीण पुळी होते; तिला **अष्ठीलिका** म्हणतात.

ग्रथितलक्षण.

शूकैर्यत्पूरितं शश्वद्ग्रथितं नाम तत्कफात् ॥ ३ ॥

अर्थ— निरंतर शूक लेपानें कफापासून शिश्नावर गांठी होतात; तें **ग्रथित** होय.

कुंभिकालक्षण

कुंभिका रक्तपित्तोत्था जांबवास्थिनिभाशुभा ॥

अर्थ— रक्तपित्ता पासून जांभळाच्या बी सारिखी काळी पिटिका होते; तिला **कुंभिका** म्हणतात.

अलजीलक्षण.

तुल्यजां त्वलजीं विद्यात्तथाप्रोक्तां विचक्षणैः ॥ ४

मृदित.

मृदितंपीडितंयत्तुसंरब्धंवातकोपत:॥

अर्थ— शूक पीडा झाल्यानंतर शिश्न मरदलें वदाबलें असतां वायूच्या कोपानें शिश्न सुजतें तें

## संमूदपिटिका.

पाणिभ्यांभृशसंमूढेसंमूढपिटिकाभवेत्॥५॥

अर्थ— लेपानंतर दोहीं हातानीं शिश्न पुष्कळ चोळलें असतां एक मूढ (बिन तोंडाची) पिटिका होते ती.

## अवमंथलक्षण.

दीर्घाबव्ह्यश्चपिटिकादीर्यंतेमध्यतस्तया:॥सो
वमंथ:कफासृग्भ्यांवेदनारोमहर्षकृत्॥६॥ ॥

अर्थ— कफ रक्ता पासून लांबोळ्या अनेक व मध्यें मध्यें फुटलेल्या अशा ज्या पिटिका शिश्नावर होतात त्यांच्या योगानें रोमांच व वेदना होतात. त्या रोगाला अवमंथ ह्मणतात.

## पुष्करिकालक्षण.

पित्तशोणितसंभूतापिटिकापिटिकाचिता॥प-
द्मकर्णिकसंस्थानाज्ञेयापुष्करिकाचसा॥७॥

अर्थ— पित्त रक्ता पासून उत्पन्न झालेली पुळी मध्ये असून तिच्या भोंवतालीं दुसऱ्या लहान लहान पुळ्या होतात; तेव्हां त्या सर्व मिळून कमळाच्या वाटी सारिख्या दिसतात; त्या करितां त्यांना पुष्करिका ह्मणतात.

## स्पर्शहानिलक्षण.

स्पर्शहानिंतुजनयेच्छोणितंशूकदूषितम्॥

अर्थ— शूक लेपानें रक्त दुष्ट होऊनतेंत्वचेचें स्पर्श ज्ञान नष्टकरितें.

## उत्तमालक्षण.

मुद्गमाषोद्गमारक्तारक्तपित्तोद्भवाश्चया:॥ व्या-
धिरेषोत्तमानामशूकाजीर्णनिमित्तज:॥ ८॥

अर्थ— शूकाचा वारंवार लेप केल्यानें रक्तपित्त कुपित होऊन मुगा-उडदा एवढ्या तांबड्या पुळ्या शिश्नावर होतात. त्यारोगाला उत्तम असें ह्मणतात.

## शतपोनकलक्षण.

छिद्रैरणुमुखैर्लिंगंचितंयस्यसमंतत:॥९॥ वात
शोणितजोव्याधिर्विज्ञेय:शतपोनक:॥ ॥

अर्थ— ज्या पुरुषाचें लिंगावर अनेक बारीक छिद्रें पडतात,त्याचा हा व्याधि वातरक्तापासून होतो; त्याला शतपोनक ह्मणतात.

## त्वक्पाक.

वातपित्तकृतोयस्तुत्वक्पाकोज्वरदाहवान्॥१०

अर्थ— वातपित्तापासून शिश्नपुवाळतें, व तेणें करून ज्वर व दाह-होतो.

## शोणितार्बुद.

कृष्णै:स्फोटै:सरक्ताभि:पिटिकाभिर्निपीडितम्॥
यस्यवास्तरुजाचोग्राज्ञेयंतच्छोणितार्बुदम्॥११

अर्थ— ज्या पुरुषाचे शिश्नावर काळ्या तांबड्या पुळ्या येतात, व ज्याच्या व्रणाचे ठिकाणीं फार ठणका लागतो; त्याच्या त्या रोगाला

शोणितार्बुद ह्मणावें.

## मांसार्बुद.

मांसदोषेणजानीयादर्बुदंमांससंभवम्॥ ॥

अर्थ— मांस दुष्ट झाल्यानें मांसार्बुद होतें.

## मांसपाक.

शीर्यंतेयस्यमांसानियस्यसर्वाश्ववेदनाः॥१२॥वि-
द्यात्तंमांसपाकंतुसर्वदोषकृतंभिषक्॥

अर्थ—ज्याच्या शिश्नाचें मांस सडून गळून पडतें, आणि नाना तऱ्हे-च्या पीडा होतात, (हा व्याधि त्रिदोषज आहे) त्याच्या त्या व्याधीला मांसपाक ह्मणतात.

## विद्रधिलक्षण.

विद्रधिंसन्निपातेनयथोक्तमभिनिर्दिशेत्॥१३॥

अर्थ—विद्रधि निदानांतील सन्निपातज विद्रधि प्रमाणें येथें वि-द्रधि जाणावा.

## तिलकालक.

कृष्णानिचित्राण्यथवाशूकानिसविषाणितु॥पाति
तानिपचंत्याशुमेदुंनिरवशेषतः॥१४॥ कालानिभू
त्वामांसानिशीर्यंतेयस्यदेहिनः॥सन्निपातसमुत्थां
स्तुतान्विद्यात्तिलकालकान्॥१५॥

अर्थ— काळ्या किंवा चित्रविचित्र रंगाच्या सविष शूकांचा लेप केला असतां त्या योगानें तत्काळ सर्व शिस्न पिकतें, व सर्व मांस तिळा प्रमाणें काळें होऊन झडतें. या त्रिदोषोत्पन्न व्याधीला तिलकालक ह्मणतात.

असाध्यशूकदोष.

तत्रमांसार्बुदंयच्चमांसपाकश्चयःस्मृतः॥विद्रधि श्चनसिद्ध्यंतियेचस्फस्तिलकालकाः॥१८॥ इति शूकदोषनिदानम्॥

अर्थ— त्या शूक दोषामध्ये मांसार्बुद, मांसपाक, विद्रधि, आणितिलकालक, हे असाध्य आहेत, इतिशूकदोषनिदान.

मधुकोशस्फनिर्मथ्य सारमाकृष्यवैमया॥ व्याख्याकृता महाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥

---

## कुष्ठनिदान.

विरोधीन्यन्यपानानिद्रवस्निग्धगुरूणिच॥भजताभागतांछर्दिवेगांश्चान्यान्प्रतिघ्नताम्॥१॥ व्यायाममतिसंतापमतिभुक्त्वानिषेविणाम्॥ शीतोष्णलंघनाहारान्क्रमंमुक्त्वानिषेविणाम्॥२॥ घर्मश्रमभयार्तानांद्रुतंशीतांबुसेविनाम्॥अजीर्णाध्यशनानां च पंचकर्मापचारिणाम्॥३॥ नवान्नदधिमत्स्यातिलवणाम्लनिषेविणाम्॥माषमूलकपिष्टान्नतिलक्षीरगुडाशिनाम्॥४॥ व्यवायंचाप्यजीर्णेन्नेनिद्रांचभजतांदिवा॥विप्रान्गुरून्धर्षयतांपापंकर्मचकुर्वताम्॥५॥वातादयस्त्रयोदुष्टास्त्वग्रक्तंमांसमंबुच॥ दूषयंतिसकुष्ठानांसप्तकोद्रव्यसंग्रहः ६॥ अतःकुष्ठानिजायंतेसप्तचैकादशैवच॥६॥ ॥

अर्थ— क्षीरमत्स्यादिविरोधि, पातळ, स्नेहयुक्त, जड अशी अन्न-

पानें सेवणारे, ओकारी आली असतां तिचा वेग बंद करणारे, आणि-अन्य वेग ह्मणजे मूत्र पुरीषादि वेगांचा रोध करणारे, जेऊन अत्यंत व्यायाम व अति संताप, (सूर्यताप.) सेवणारे, शीत,ऊष्ण, लंघन, आणि आहार यांचा सेवण्याचा उक्त क्रम सोडून सेवणारे, उन श्रम-आणि भय यानीं पीडित होऊन तत्क्षणीं गारपाणी पिणारे, अजीर्ण अन्न भक्षण करणारे, व जेवणावर लगेच जेवणारे, वमन विरेकादि पंच कर्म करतांना अपचार करणारे, नवीन अन्न, दहीं, मत्स्य, खारट, अंबट यांचें सेवन करणारे, उडीद, मुळे, पिष्टान्न (लाडू घारगे-वगैरे) तीळ, दूध, गूळ, हीं भक्षण करणारे, अन्न जिरल्या वांचून-मैथुन करणारे, व दिवसास निद्रा करणारे, ब्राह्मण, गुरु, त्यांचा तिरस्कार करणारे, पाप कर्म आचरण करणारे, अशा पुरुषाचे वातादिक तीन दोष त्वचा, रक्त, मांस, आणि उदक त्यांस दुष्ट करून कुष्ठ रोग (कोड.) उत्पन्न करितात, कुष्ठ होण्याला वातादि दोष आणि त्वचादि द्रव्यें हे सात पदार्थ अवश्य कारण भूत आहेत, ह्मणून अष्टादश कुष्ठें होतात, त्यापैकीं सात महाकुष्ठें आणि अकरा क्षुद्र कुष्ठें आहेत.

### कुष्ठाना त्रिदोषजत्व असतांही दोषाधिक्यानें तीं सात प्रकारचीं होतात ह्मणून सांगतो.

**कुष्ठानि सप्तधा दोषैः पृथक् द्वंद्वैः समागतैः॥ सर्वेष्वपि त्रिदोषेषु व्यपदेशोधिकत्वतः॥७॥**

अर्थ— पृथक् दोषानीं ३ द्वंद्वानीं ३ आणि सन्निपातानें एक मिळून ७. सर्व कुष्ठें त्रिदोषज असतां हीं जो दोष अधिक असेल त्याणें व्य-

व हार करावा (जसें वातेन कुष्ठं कापालं इ०)

## कुष्ठाचेंपूर्वरूप.

अतिश्लक्ष्णखरस्पर्शस्वेदास्वेदविवर्णताः॥ दाहः कंडूस्त्वचिस्वापस्तोदःकोठोन्नतिःश्रमः॥ ८॥ व्रणानामधिकंशूलंशीघ्रोत्पत्तिश्चिरस्थितिः॥रूढानामपिरूक्षत्वंनिमित्तेल्पेपिकोपनम्॥ ९॥ रोमहर्षोसृजःकार्ष्ण्यंकुष्ठलक्षणमग्रजम्॥

अर्थ— ज्या ठिकाणी कुष्ठ व्हावयाचें असतें ती जागा हाताला फार गुळगुळीत किंवा खडबडीत लागते; त्याठिकाणीं घाम येतो किंवा येत नाहीं, व तेथला वर्ण बदलतो, दाह होतो, कंडू सुटते, त्वचेला स्पर्श कळत नाहीं, टोंचल्या सारिखी पीडा होते, गांधिलमाशी डसल्याप्रमाणें गांधी येतात, आयास केल्या वांचून श्रम होतो, व्रणांस ठणका फार लागतो, त्यांची उत्पत्ति लवकर होऊन फार दिवस राहातात, ते भरून आले तरी रूक्ष असतात, त्यांना थोडें निमित्त झालें तरी कोप होतो, रोमांच येतो, आणि रक्ताला काळिमा येतो, हें कुष्ठाचें पूर्वरूप.

## सप्तमहाकुष्ठांचींलक्षणें.

कृष्णारुणकपालाभंयद्रूक्षंपरुषंतनु॥कापालंतोदबहुलंतत्कुष्ठंविषमंस्मृतम्॥ ११॥

अर्थ—कापालकुष्ठ—जें काळ्या व तांबड्या खापरा सारिखें, रूक्ष, कर्कश, पातळ त्वचा झालेलें, टोंचणीनें व्यास, असतें; तें दुश्चिकित्स्य आहे, म्हणजे तें चिकित्सा करण्यास अवघड आहे.

## औदुंबरकुष्ठ.

रुग्दाहरागकंडूभिःपरीतंलोमपिंजरम्॥उदुंब
रफलाभासंकुष्ठमोदुंबरंवदेत्॥१२॥ ॥

अर्थ— औदुंबरकुष्ठ-हें शूल, दाह, आरक्तता, आणि कंडू ह्यानीं व्याप्त असतें; त्या वरचे केंस भोरे असतात, व तें उंबराच्या फळासारखें दिसतें.

## मंडलकुष्ठ.

श्वेतंरक्तंस्थिरंस्त्यानंस्निग्धमुत्सन्नमंडलम्॥कृ
च्छ्रमन्येनसंयुक्तंकुष्ठंमंडलमुच्यते॥१३॥ ॥

अर्थ—मंडलकुष्ठ पांढरें, तांबडें, कठीण, दडस, गुळगुळीत-ज्याचें मंडळ वर आलेलें, वज्याचीं मंडळें एकामेकाशीं लागलेलीं, असें हें मंडळकुष्ठ कष्टसाध्य आहे.

## ऋष्यजिव्हकुष्ठ.

कर्कशंरक्तपर्यंतमंतःश्यावंसवेदनं॥यदृष्यजि
व्हासंस्थानमृष्यजिव्हंतदुच्यते॥१४॥ ॥

अर्थ— ऋष्यजिव्हकुष्ठ—कर्कश, तांबड्या कडा झालेलें, मध्यें काळें, वेदनायुक्त, जें ऋष्याच्या (रोहीच्या) जिभेसारिखें असतें तें.

## पुंडरीककुष्ठ.

सश्वेतंरक्तपर्यंतंपुंडरीकदलोपमम्॥सोत्सेधंच
सरागंचपुंडरीकंप्रचक्षते॥१५॥ ॥

अर्थ—पुंडरीककुष्ठ-किंचित् पांढरें, कडेला तांबडें, पांढऱ्या कमळाच्या पाकळीसारिखें यत्किंचित् उंच झालेलें, आणि मध्यें थोडेंसें तांबूस असतें.

## सिध्मलक्षण.

अर्थ— सिध्मलक्षण—पांढरें, तांबूस, पातळ, [illegible] कोंडा-
निघतो; हें बहुत करून उरावर होतें; त्याचा आकार पांढऱ्या भों
पळ्याच्या फुला प्रमाणें असतो, त्याला लोकांत शिबें ह्मणतात.

### काकणकुष्ठ.

यत्काकणंतिकावर्णसपाकंतीव्रवेदनम्॥त्रि-
दोषलिंगंतत्कुष्ठंकाकणंनैवसिध्यति॥ १७॥

अर्थ— काकणकुष्ठ– जें गुंजे सारिखें लाल ह्मणजे मध्यें काळें आणि कडेला तांबडें अथवा मध्यें तांबडें आणि कडेला काळें, किंचित् पिकलेलें, तीव्र वेदनायुक्त, तिन्ही दोषांची लक्षणें त्यांत असतात; हें साध्य होत नाहीं.

### एकादश क्षुद्रकुष्ठांचीं लक्षणें.

अस्वेदनंमहावास्तुयन्मत्स्यशकलोपमम्॥त
देककुष्ठंचर्माख्यंबहलंहस्तिचर्मवत्॥ १८॥

अर्थ— चर्मकुष्ठ–घर्मरहित, मोठी जागा व्यापणारें, माशाच्या खवळा सारिखें, हत्तीच्या चामड्या प्रमाणें जाड असतें.

### किटिभकुष्ठ.

श्यावंकिणखरस्पर्शंपरुषंकिटिभंस्मृतम्॥

अर्थ— किटिभकुष्ठ–नीलवर्ण, व्रणाच्या घट्या प्रमाणें खरखरीत, आणि रूक्ष असतें.

### वैपादिककुष्ठ.

वैपादिकंपाणिपादस्फोटनंतीव्रवेदनम्॥ १९॥

## अलसककुष्ठ.

कंडूमद्भिः सरागैश्च गंडैरलसकं चितम्॥ ॥

अर्थ— अलसककुष्ठ. हें कुष्ठ फार खाजणाऱ्या व तांबड्या रंगाच्या फोडांनीं व्याप्त असतें.

## दद्रुमंडलकुष्ठ.

सकंडूरागपिटिकं दद्रुमंडलमुद्गतम्॥२०॥ ॥

अर्थ— दद्रुमंडलकुष्ठ-त्याला कंडू, लाली, आणि फोड असतात; आणि हें वर उचललेलें असतें; हें मंडलाकार उत्पन्न होतें म्हणून ही संज्ञा त्याला दिली आहे.

## चर्मदलकुष्ठ.

रक्तं सशूलं कंडूमत्स्फोटं यद्दलयत्यपि॥ तच्चर्म
दलमाख्यातमस्पर्शासहमुच्यते॥२१॥ ॥

अर्थ— चर्मदलकुष्ठ-हें तांबडें, शूलयुक्त, कंडुयुक्त फोडांनीं व्याप्त असून फुटतें; त्याला हात लावला तर सहन होत नाहीं; त्यांत चामडी फाटत्ये, म्हणून ही संज्ञा दिली आहे.

## पामाकुष्ठ.

सूक्ष्मा बह्व्यः पीडकाः स्राववत्यः पामेत्युक्ताः-
कंडुमत्यः सदाहाः

अर्थ-पामाकुष्ठ-त्याला बारीक बारीक व पुष्कळ फोड येतात, त्यांतून लस वाहात असते; व त्यानां खाज फार सुटते, व आग होते; त्या कुष्ठाला पामा म्हणतात.

रुग्रास्फिकोश्चा॥२२॥

अर्थ— कछु-तीव्र पामा मोठ्या फोडानीं व तीव्र दाहानें युक्त असून हातांवर झाली ह्मणजे कच्छु ह्मणतात.

उग्रा— ही कंबरेवर उत्पन्न होते.

## विस्फोटक.

स्फोटाः श्यावारुणाभासा विस्फोटास्युस्तनुत्वचः॥

अर्थ—विस्फोट-निळ्या व तांबूस रंगाचे व ज्यांवरची त्वचा पातळ असते असे जे फोड होतात ते.

## शतारुकुष्ठ.

रक्तं श्यावं सदाहार्ति शतारुःस्याद्बहुव्रणम्॥२३

अर्थ— शतारु-हें तांबडे, श्याम वर्ण, दाह व शूळ युक्त व अनेक व्रण युक्त असतें.

## विचर्चिका

सकंडूपिटिकाश्यावाबहुस्रावाविचर्चिका॥

अर्थ— विचर्चिका-कंडु युक्त, श्यामवर्णाचीजी पिटिका होते,ती, व तिच्या तून फार स्राव होत असतो.

चर्म कुष्ठा पासून विचर्चिकापर्यंत १८ कुष्ठें होतात. मग क्षुद्र कुष्ठें ११ ह्मणून कां सांगितलें, अशी कोणी शंका केल्यास सांगतो. विचर्चिका पांयांवर होऊन फुटली ह्मणजे विपादिका होते, असें ह्मटल्यानें संख्या वाढत नाहीं; याविषयीं भोजाचें हीअसेंच मत आहे.

गाः प्रकुपितं दाहरागस्रावान्वितं स्मृतम्। कफात्स्थू
दिघनं स्निग्धं सकंडूशैत्यगौरवम्॥२५॥ द्विलिंगं
द्वंद्वजं कुष्ठं त्रिलिंगं सान्निपातिकम्॥

अर्थ— वायूच्या योगानें कुष्ठ खर खरीत, श्याव वर्ण, किंवा अरुण वर्ण, रूक्ष, आणि वेदनायुक्त होतें

पित्ताच्या योगानें झालेलें कुष्ठ दाह, लाली, आणि स्राव ह्यांनीं युक्त असतें.

कफापासून क्लेदयुक्त, जाड, स्निग्ध, खाजणारें, थंड, आणि जड, असें असतें.

द्वंद्वज कुष्ठामध्यें दोन दोषांचीं लक्षणें होतात.

सान्निपातिक कुष्ठामध्यें तीन दोषांचीं लक्षणें होतात.

### आतां रसादि धातुगत कुष्ठलक्षणें क्रमानें सांगतात.

### रसधातुगतलक्ष०

त्वक्स्थे वैवर्ण्यमंगेषु कुष्ठे रौक्ष्यं च जायते॥ त्वक्स्वा
पो रोमहर्षश्च स्वेदस्याति प्रवर्तनम्॥२६॥

अर्थ— रस धातुगत कुष्ठ झालें असतां अंगाचा वर्ण बदलतो, आंग रूक्ष होतें, त्वचेला स्पर्श कळत नाहीं, रोमांच होतो, आणि घाम फार सुटतो.

### रक्तगतलक्षण.

कंडूर्विपूयकश्चैव कुष्ठे शोणितसंश्रये॥

बाहुल्यंवक्त्रशोषश्चकार्कश्यंपिडकोद्गमःतोदः

स्फोटस्थिरत्वंचकुष्ठेमांससमाश्रिते॥२७॥

अर्थ— मांसगत कुष्ठ झालें असतां तोंडाला कोरड फारच पडते. कर्कश अंग होतें, अंगा वर गांठीउठतात, टोंचणी लागते, फोड येतात ते फार दिवस राहातात.

## मेदोगतकुष्ठल०

कौण्यंगतिक्षयोंगानांसंभेदःक्षतसर्पणम्॥मेद

स्थानगतेलिंगंप्रागुक्तानितथैवच॥२८॥

अर्थ—मेदस्थानीं कुष्ठ गेलें असतां हात मोडतो (जाया होतो) चालणें बंद होतें, आंगाला फूट लागते, क्षतें पडलीं असतां तीं पसरतात, आणि पूर्वोक्त लक्षणें (रस, रक्त, मांस गत कुष्ठ लक्षणें) होतात.

## अस्थिमज्जागतकुष्ठलक्षण.

नासाभंगोक्षिरागश्चक्षतेषुकृमिसंभवः॥स्वरोप

घातश्चभवेदस्थिमज्जसमाश्रिते॥२९॥

अर्थ— कुष्ठ अस्थिगत झालें असतां नाक गळून जातें, डोळे लाल होतात, क्षतामध्यें किडे पडतात, घसा बसतो.

## शुक्रार्तवगतकुष्ठलक्षण.

दंपत्योःकुष्ठबाहुल्याद्दुष्टशोणितशुक्रयोः॥यद

पत्यंतयोर्जातंज्ञेयंतदपिकुष्ठितम्॥३०॥

अर्थ—ज्या स्त्री पुरुषांचें शोणित शुक्र कुष्ठाधिक्यानें तें दुष्ट झा·

जन्म होतें म्हणून वाग्भट्टाचार्यांनीं ही सांगितलें आहे.

## साध्यादिभेद.

साध्यं त्वग्रक्तमांसस्थंवातश्लेष्माधिकंचयत्॥मे
दसि द्वंद्वजंयाप्यंवर्ज्यमज्जास्थिसंश्रितम्॥३१॥
कृमितृड्दाहमंदाग्निसंयुक्तंयत्त्रिदोषजम्॥प्रभि
न्नंप्रस्रुतांगंचरक्तनेत्रंहतस्वरम्॥३२॥ पंचकर्म-
गुणातीतंकुष्ठंहंतीहकुष्ठिनम्॥

अर्थ— रस रक्त मांस ह्या धातूपर्यंत गेलेलें कुष्ठ साध्य होतें. ज्या कुष्ठांत वायु आणि कफ प्रधान असतात तें साध्य होतें, मेदो धातुगत कुष्ठ व द्वंद्वज कुष्ठ याप्य होतें. मज्जा आणि अस्थि यांपर्यंत गेलेलें व शुक्रगत हीं असाध्य होतात. वर्जें कुष्ठ कृमि, व मळमळ आणि मंदाग्नि ह्यांनीं युक्त झालेलें व त्रिदोषज तें असाध्य होतें. जें कुष्ठ फुटून वाहात आहे तें व ज्या कुष्ठी रोग्याचे डोळे लाल झाले आहेत. किंवा स्वर बसला आहे, वमन विरेचनादि पंच कर्मांचे गूण ज्यावर चालत नाहींत असा रोगी मरतो.

## कुष्ठावरचिकित्साकरण्या सार्ठी प्रधान दोष सांगतो.

वातेनकुष्ठंकापालं पित्तेनौदुंबरंकफात्॥ मंडला-
ख्यंविचर्चिकाऋष्याख्यंवातपित्तजम्॥३३॥चर्मै
ककुष्ठंकिटिभंसिध्मालसविपादिका॥॥वातश्ले-

थोद्भवाः श्लेष्मपित्ताद्दद्रुशतारुषी॥ ३४॥ पुंडरी-
कंसविस्फोटंपामाचर्मदलंतथा॥ सर्वैः स्यात्काक
णंपूर्वंत्रिकंदद्रुःसकाकणा॥ ३५॥ पुंडरीकर्ष्यजि
व्हेचमहाकुष्ठानिसप्ततु॥

अर्थ— वायूनें कापाल कुष्ठ; पित्तानें औदुंबर; कफानें मंडल; आ-णि विचर्ची; वात पित्तानीं ऋष्यजिव्ह; वातकफापासून, चर्मकु-ष्ठ; किटिभ, सिध्म, अलस, आणि विपादिका; कफपित्ता पासून. दद्रु, शतारु, पुंडरीक, विस्फोट, पामा, चर्मदल; त्रिदोषापासून का-कण कुष्ठ होतें, पहिलीं तीन (कापाल, उदुंबर, आणि मंडल,) दद्रू, काकण, पुंडरीक, आणि ऋष्यजिव्ह, हीं सात महाकुष्ठें जाणावीं.

## किलासनिदान.

कुष्ठेकसंभवंश्वित्रंकिलासंचारुणंभवेत्॥ निर्दि
ष्टमपरिस्रावीत्रिधातूद्भवसंश्रयम्॥ ३६॥ ॥

अर्थ— कुष्ठ होण्यालाजीं कारणें (विरुद्धाशन पापकर्मादि) सांगि-तलीं आहेत, त्या कारणानीं श्वित्र (पांढरें कोड) आणि किलास (तां-बडें कोड) हीं होतात, त्यांतून स्राव होत नाहीं; व हें तीन धातूंचा आ-श्रय करून राहातें, (ह्मणजे तीन दोष आणि रक्त, मांस, व मेद) त्यां-चा आश्रय करून राहातें.

## वातादिभेदानेंत्यांचीलं०

वाताद्रूक्षारुणंपित्तात्ताम्रंकमलपत्रवत्॥ सदा-
हंरोमविध्वंसिकफाच्छ्वेतंघनंगुरु॥ ३७॥ सकंडु
रंक्रमाद्रक्तमांसमेदस्सुचादिशेत्॥ वर्णेनैवेदृगु
भयंकृच्छ्रंतच्चोत्तरोत्तरम्॥ ३८॥ ॥

अर्थ– तें वायूनें रूक्ष व अरूण होतें; पित्तानें रक्त कमल पत्रा प्रमाणें लाल असतें, त्याला आग होते, त्यावरचे केंस झडतात, कफाच्या योगानें तें पांढरें, जाड, आणि जड असतें, त्याला कंडु सुटते; हीं क्रमानें रक्त, मांस, आणि मेद त्यांच्या ठिकाणीं होतात, (सु० दोष रक्ताश्रित असतां तांबडें; मांसाश्रित असतां तांबूस, आणि मेदाश्रित असतां पांढरें किलास होतें.)

## श्वित्राचें साध्यासाध्यलक्ष०

अशुक्लरोमाबहलमसंश्लिष्टमथोनवम्॥ अनग्निदग्धजं साध्यं श्वित्रं वर्ज्यमतोन्यथा॥ ३९॥

अर्थ– ज्या श्वित्रावरचे केंस पांढरे झाले नाहींत, वजें पातळ असून एकमेकास लागलें नाहीं, वजें नवीन झालेलें आहे, वजें भाजल्यामुळें झालेलें नाहीं, तें श्वित्र साध्य होतें, नाहींतर नाहीं.

## किलासाचें असाध्यलक्षण.

गुह्यपाणितलोष्ठेषुजातमप्यचिरंतनम्॥ वर्जनीयंविशेषेणकिलासंसिद्धिमिच्छता॥ ४०॥ ॥

अर्थ– गुह्य स्थानीं, हातावर, तळपायांवर, ओंठावर झालेलें, किलास थोड्या दिवसांचें असलें तरी यश मिळविणाऱ्या वैद्यानें सोडून द्यावें.

## सांसर्गिकरोग सांगतात.

प्रसंगाद्गात्रसंस्पर्शान्निश्वासात्सहभोजनात्॥ सहशय्यासनाच्चापिवस्त्रमाल्यानुलेपनात्॥ ॥४१॥ कुष्ठंज्वरश्चशोषश्च नेत्राभिष्यंदएवच॥ औपसर्गिकरोगाश्च संक्रामंतिनरान्नरम्॥ ४२॥

अर्थ— मैथुनादि प्रसंगानें, किंवा शरीराच्या स्पर्शानें, श्वासोच्छ्वासानें, एके ठिकाणीं जेवल्यानें, निजल्यानें, बसल्यानें, वस्त्र पांघरल्यानें, पुष्प हुंगल्यानें, गंध लावल्यानें, कुष्ठ, ज्वर, धातुशोष, नेत्ररोग, (डोळे येतात ते) हे सांक्रामिक रोग एकापासून दुसऱ्याला होतात. इतिकुष्ठनिदानसमाप्त.

मधुकोशंसमनिर्मथ्य सार माछष्य वेमया॥ व्याख्या कृता महाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥

---

## शीतपित्तनिदान.

### संप्राप्ति.

शीतमारुतसंस्पर्शात्प्रदुष्टौ कफमारुतौ॥ पित्तेन-सहसंभूय बहिरंतर्विसर्पतः॥ १॥ ॥

अर्थ— गार वारा लागल्यानें कफ वायू दुष्ट होऊन पित्ताशीं मिळून-अभ्यंतरीं (रक्तादिकामध्यें) आणि बाहेर त्वचेवर संचार करतात.

### पूर्वरूप.

पिपासारुचिहृल्लासदेहसादांगगौरवम्॥ रक्तलोचनतातेषांपूर्वरूपस्यलक्षणम्॥ २॥ ॥

अर्थ— तहान, अरुचि, तोंडाला पाणी सुटणें, अंग गळणें, आणि-जड होणें, डोळ्यानां लाली, हीं पूर्वरूपाचीं चिन्हें जाणावीं.

### उदर्दलक्षण.

वरटीदष्टसंस्थानःशोथःसंजायतेबहिः॥ सकंडूस्तोदबहुलश्छर्दिज्वरविदाहवान्॥ ३॥ उदर्दमितितंविद्याच्छीतपित्तमथापरे॥

गे होतात, त्यारोगाला उदर्द म्हणतात, कोणी शीत पित्त म्हण- तात, (लोक प्रचारांत त्याला पित्त उठलें म्हणून म्हणतात,) त्याम ध्यें कंडू होते ती कफा पासून; टोचणी लागते ती वाता पासून, आणि ओकारी, संताप, आणि दाह हे पित्ता पासून होतात, असे जाणावें.

वाताधिकंशीतपित्तमुदर्दस्तुकफाधिकः॥४॥

अर्थ— शीतपित्तांत वायु प्रधान व उदर्दांत —— कफ प्रधान असतात

उदर्दाचा दुसरा धर्मसांगतो.

सोत्संगैश्चसरागैश्चकंडूमद्भिश्चमंडलैः॥ शैशिरः कफजो व्याधिरुदर्दःपरिकीर्तितः॥५॥ ॥

अर्थ— थंडीनें कफाचा प्रकोप होऊन आंगावर तांबडीं चकदळें उठतात, त्यांना कंड फार सुटते, तीं मंडलें मध्यें खोलगड व कडेला उंच अशीं असतात, त्यारोगाला उदर्द म्हणतात.

कोठलक्षण.

असम्यग्वमनोदीर्णपित्तश्लेष्मान्ननिग्रहैः॥मंडलानिसकंडूनिरागवंतिबहूनिच॥६॥उत्कोठः सानुबंधश्चकोठइत्यभिधीयते॥ ॥इतिशीतपित्तोदर्दकोठनिदानम्॥ ॥

अर्थ— वमक औषध चांगलें लागून झाल्यामुळें पित्त आणि कफ उसळले असतां किंवा, वांतीचा वेग बंद केला असतां अंगाव

र तांबडी पुष्कळ चकंदळें उठतात, त्यानें खाज सुटते, त्यारोगा ला **उत्कोठ** ह्मणतात, हाच पुनः पुनः होतो, आणि जो क्षणांतउ त्पन्न होऊन नाहींसा होतो, त्याला कोठ ह्मणतात, इतिशीत पित्त उदर्द कोठ निदानम्

मधुकोशंसुनिर्मथ्य सारमाकृष्य वैमया॥ व्याख्याकृ तामहाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥ ॥

---

## अम्लपित्तनिदान.

### निदानपूर्वक अम्लपित्ताचेंस्वरूप.

विरुद्धदुष्टाम्लविदाहिपित्तप्रकोपिपानान्नभुजो विदग्धम्॥ पित्तंस्वहेतूपचितंपुरायत्तदम्लपि त्तंप्रवदंतिसंतः॥१॥

अर्थ— विरुद्ध (क्षीरमत्स्यादि,) अंबलेलें अन्न, अंबट, दाहकर णारें, पित्त वाढविणारें, अन्न पान सेवन केल्यानें, वर्षादि ऋतूंना ठाईं स्वकारणानीं सांचलेलें पित्त नासतें, त्याला **अम्लपित्त** ह्मणतात.

### त्याचें लक्षण.

अविपाकक्लमोत्क्लेदतिक्ताम्लोद्गारगौरवैः॥ हृ त्कंठदाहारुचिभिश्चाम्लपित्तंवदेद्भिषक्॥२॥

अर्थ— अन्न न पचणें, आयासा वांचून श्रम होणें, मळमळ सुट णें, कडू, व अंबट ढेकर येणें, अंग भारावणें, जळती लागणें, अ न्न द्वेष होणें, हीं लक्षणें झालीं असतां अम्लपित्त झालें ह्मणून समजावें.

अधोगताचें लक्षण.

तृड्दाहमूर्छाभ्रममोहकारिप्रयात्यधोवाविविधप्रकारम्॥ हृल्लासकोठानलसादकर्णस्वेदांगपीतत्वकरंकदाचित्॥३॥

अर्थ—अम्लपित्त अधोगत झालें असतां, तृषा, दाह, मोह, (इंद्रिय मनोमोह, ) मूर्च्छा, घेरी, मळमळ, आंगाला गांधी, अग्निमांद्य, कानांला घाम, आंगाला पिंवळटी; हीं लक्षणें होऊन गुदावाटे काळें, तांबडें, दुर्गंधि, अनेक वर्णाचें पित्त पडतें.

ऊर्ध्वगताचें लक्षण.

वांतंहरित्पीतकनीलकृष्णमारक्तरक्ताभमतीवचाम्लं॥ मांसोदकाभंत्वतिपिच्छिलाच्छश्लेष्मानुयातंविविधंरसेन॥४॥ भुक्तेविदग्धेत्वथवाप्यभुक्ते करोतितिक्ताम्लवमिंकदाचित्॥ उद्गारमेवंविधमेवकंठेहृत्कुक्षिदाहंशिरसोरुजंच॥५॥ ॥

अर्थ—ऊर्ध्वगत अम्लपित्तानें, हिरवें, पिंवळें, निळें, काळें, तांबूस, लाल, अत्यंत आंबट, मांसधुतलेल्या पाण्यासारिखें, अत्यंत बुळबुळीत, स्वच्छ, कफमिश्रित, खारट, तुरट वगैरे रसयुक्त असें पित्त पडतें; कधीं कधीं जेवलेलें अन्न विदग्धावस्थेंत आलें असतां, अथवा जेवणापूर्वी कडू, आंबट, अशी ओकारी होते; व ढेंकर ही तसाच येतो, गळा, कुशी; आणि ऊर हीं जळजळतात; डोकें दुखतें.

कफपित्तजन्य अम्लपित्त लक्षण.

करचरणदाहमोष्ण्यंसहतीमरुचिंज्वरंचकफपित्तम्॥जनयतिकंडूमंडलपिटिकाशतनिचितगात्ररोगचयम्॥६॥

अर्थ— हाता पायांची आग, अंगाला कडकी, अन्नद्वेष, ज्वर, कंडू, गांधी, शतशः पिटिका, आणि अविपाकादि अनेक उपद्रव; हीं लक्षणें कफ पित्ता पासून होतात.

## साध्यासाध्यविचार.

रोगोयमम्लपित्तारव्योयत्नात्संसाध्यतेनवः॥चिरोत्थितोभवेद्याप्यः कृच्छ्रसाध्यः सकस्यचित्॥७॥

अर्थ— हा अम्ल पित्त रोग नवा असला तर यत्नानें साध्य होतो; फारा दिवसांचा असला तर याप्य होतो; पथ्यानें वागणाऱ्या मनुष्याचा रोग फार दिवसांचा असला तरी कृच्छ्रसाध्य होतो.

## अम्लपित्तामध्यें केवळ वायूचा-
## आणि वातकफाचा संसर्ग होतोतो.

सानिलंसानिलकफंसकफंतच्चलक्षयेत्॥दोषलिंगेनमतिमान्भिषङ्मोहकरंहितत्॥८॥ ॥

अर्थ— वातयुक्त अम्लपित्त, वात कफयुक्त अम्लपित्त, आणि कफयुक्त अम्लपित्त, असें तिन्ही प्रकारचें अम्लपित्त बुद्धिमान्वैद्यानें दोषांच्या लक्षणा वरून समजावें; कारण ऊर्ध्वग अम्ल पित्ता वर छर्दि रोगाचा भास होतो; आणि अधोगावर अतिसाराचा भास होतो; यामुळें वैद्याला व्यामोह होतो; यासाठीं वैद्यानें त्याची सूक्ष्मरीतीनें परीक्षा करावी.

## वातयुक्त अम्लपित्ताचें लक्षण.

अर्थ— वातयुक्त अम्लपित्तामध्यें, कंप, बडबड, मूर्छा, अंगाला मुंग्या येणें, अंगग्लानि, पोट दुखणें, डोळ्यां पुढें आंधारी येणें, भ्रांति पडणें, इंद्रिय मनोमोह, रोमांच उठणें; हीं लक्षणें होतात.

## कफयुक्तअम्लपित्ताचेंलक्षण.

कफनिष्ठीवनगौरवजडताऽरुचिशीतसादवमिले
पाः॥दहनबलसादकंडूर्निद्राचिन्हंकफानुगते॥१०

अर्थ— कफयुक्त अम्लपित्तामध्यें कफाचा बेडका पडणें, शरीरास अत्यंत जडपणा, अन्न द्वेष, थंडी वाजणें, अंगग्लानि, ओकारी, तोंडास चिकटा, अग्निमांद्य, बलनाश, कंडू, आणि झोंप; हीं लक्षणें होतात.

## वातकफयुक्तअम्लपित्त.

उभयमिदमेवचिन्हंमारुतकफसंभवेभवत्यम्ले॥

अर्थ— वात कफयुक्त अम्लपित्तामध्यें वर सांगितलेलीं दोघांचीं लक्षणें होतात.

## कफपित्ताचें लक्षण.

भ्रमोमूर्छारुचिश्छर्दिरालस्यंचशिरोरुजः॥प्र
सेकोमुखमाधुर्यंश्लेष्मपित्तस्यलक्षणम्॥११॥
इतिअम्लपित्तनिदानम्॥

अर्थ— भ्रम, मूर्छा, अरुचि, वांति, आळस, कपाळ दुखणें, तोंडाला पाणी सुटणें, तोंडाला गोडी; हें कफपित्तयुक्त अम्ल पित्ताचें लक्षण जाणावें. इति अम्लपित्तनिदानम्॥ ॥

मधुकोशंकृनिर्मथ्यसारमाकृष्यवैमया॥ व्याख्याकृता महाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥

---

## विसर्पनिदान.

त्याचीनिदानपूर्वकसंख्यासंप्राप्तिआणिनिरुक्तिसांगतो.

लवणाम्लकटूष्णादिसंसेवादोषकोपतः॥ विसर्पः सप्तधाज्ञेयः सर्वतः परिसर्पणात्॥ १॥ ॥

अर्थ— खारट, अंबट, तिखट, उष्ण आदि करून पदार्थ सेवल्यानें वातादि दोषांचा कोप होऊन सात प्रकारचा विसर्प होतो, तो च हूकडे पसरतो ह्मणून त्या रोगाला **विसर्प** (इसब; धांवरें) असें ह्मणतात.

सर्वप्रकारचेविसर्प रक्तादिकचारदूष्यें आणि वातादितीनदोषयांपासूनहोतातह्म॰सांग॰

रक्तंलसीकात्वङ्मांसंदूष्यंदोषास्त्रयोमलाः॥ विसर्पाणांसमुत्पत्तौविज्ञेयाःसप्तधातवः॥ २॥

अर्थ—रक्त, लस, रस, मांस हीं दूष्यें; आणि वातादितीन दोष; हे सात धातू विसर्पाचा उत्पत्तीला कारण आहेत.

### वातविसर्प.

तत्रवातात्परीसर्पोवातज्वरसमाकृतिः॥ शोफस्फुरणनिस्तोदभेदायामार्तिहर्षवान्॥ ३॥ ॥

अर्थ— वायू पासून जो विसर्प होतो त्याचें लक्षण वातज्वरासारि

पित्तविसर्प.

पित्ताद्रुतगतिःपित्तज्वरलिंगोतिलोहितः॥

अर्थ— पित्ताच्या विसर्पाची गति शीघ्र असते; ह्मणजे तो सत्वरप सरतो; पित्तज्वर लक्षणानी युक्त व अत्यंत लाल असतो.

## कफविसर्प.

कफात्कंडूयुतःस्निग्धः कफज्वरसमानरुक्॥

अर्थ— कफापासून विसर्पाला कंडू फार असते; तुळतुळीत असतो; व तो कफज्वरासारिखी पीडा करितो.

## सन्निपातविसर्प.

सन्निपातसमुत्थश्चसर्वरूपसमन्वितः॥ ॥

अर्थ— सन्निपात जन्य विसर्पा मध्यें वर सांगितलेलीं सर्व लक्षणें असतात.

## अग्निवीसर्पलक्षण.

वातपित्ताज्ज्वरश्छर्दिमूर्छातीसारतृड्भ्रमैः॥ अस्थिभेदाग्निसदनतमकारोचकैर्युतः॥४॥ करोतिसर्वमंगंचदीप्तांगारावकीर्णवत्॥ यंयंदेशं विसर्पश्चविसर्पतिभवेच्चसः॥५॥ शांतांगारासितोनीलोरक्तोवाशूपचीयते॥ अग्निदग्धइवस्फोटैःशीघ्रगत्वाद्द्रुतंचसः॥६॥ मर्मानुसारीवीसर्पः स्याद्वातोतिबलस्ततः॥ व्यथेतांगंहरेत्संज्ञांनिद्रां चश्वासमीरयेत्॥७॥ हिध्मांचसतत्तोवस्थामी-

दशांलभतेनरः॥ कश्चिच्छर्मारतिग्रस्तो भूमि
शय्यासनादिषु॥८॥ चेष्टमानस्ततःक्लिष्टोमनो
देहसमुद्भवाम्॥ दुर्बोधामश्नुतेनिद्रांसोऽग्निवी
सर्पउच्यते॥२९॥

अर्थ– वाता पासून झालेला विसर्प. ज्वर, वांति, मूर्च्छा, अतिसार, तृषा, घेरी, हाडें फुटणें, अग्निमांद्य, आंधारी, भ्रम, द्वेष, ह्या लक्षणानीं युक्त असतो; त्याच्या योगानें सर्व शरीर रसरशीत निखारे ओतल्या प्रमाणें होतें; ज्याज्या ठिकाणीं तो विसर्प पसरत जातो तेंतें ठिकाण कोळशा प्रमाणें काळें, निळें, तांबडें, होऊन त्वरित सूजतें; अग्नीनें भाजल्या प्रमाणें वर फोड येतात; त्याची शीघ्र गति असते. यामुळें तो झटकन ह्रदयाला जाऊन भिडतो; अथवा तो अत्यंत बळवान होतो; ह्मणून आंगाला व्यथा करितो. संज्ञा आणि निद्रा यांचा नाश करितो; श्वास वाढवितो; व गुचकी उत्पन्न करितो; अशी मनुष्याची अवस्था होते; अस्वास्थ्यपणामुळें भुईवर, आंथरुणावर, किंवा बसून ही कोठें सूख होत नाहीं, हालचाल करूं लागला असतां क्लेश होतात. मनाला व देहाला क्लेश झाल्यानें उत्पन्न होणारी अशी दुर्बोधनिद्रा (मरणरूपनिद्रा) त्याला प्राप्त होते, ह्या रोगाला अग्निविसर्प (अग्या धांवरें) ह्मणतात.

## ग्रंथिविसर्प.

कफेनरुद्धःपवनःभित्वातंबहुधाकफम्॥रक्तं
वाहद्धरक्तस्यत्वक्शिरास्नायुमांसगम्॥१०॥
दूषयित्वाचदीर्घाणुवृत्तस्थूलखरात्मनाम्॥

ग्रंथीनांकुरुतेमालांरक्तानांतीव्ररुज्वरां॥११
श्वासकासातिसारास्यशोषहिक्कावमिभ्रमैः॥
मोहवैवर्ण्यमूर्छांगभंगाग्निसदनैर्युतां॥१२॥
इत्ययंग्रंथिवीसर्पः कफमारुतकोपजः॥१३॥

अर्थ—स्वकारण कुपित कफानें वायूचा रोध होऊन तो कफाचा भेद करून किंवा वाढलेल्या रक्ताचा भेद करून त्वचा, शिरा, स्नायु, आणि मांस यांप्रत आणून दुष्ट करून, लांबट, लाहान, वाटोळ्या, मोठ्या, खरखरीत, तांबड्या, गांठीच्यामाळा करितो; त्या गांठीनां ठणका फार लागतो; कडक ताप येतो, श्वास, खोकला, अतिसार, तोंडाला कोरड, गुचकी, ओकारी, घेरी, भ्रांति, वर्ण फिरणें, मूर्छा, अंग मोडणें, अग्निमांद्य हीं लक्षणें होतात. यारोगाला **ग्रंथिवीसर्प** (गांठ्याविसाप,) म्हणतात, हा कफ वायूच्या कोपानें उत्पन्न होतो.

## कर्दमवीसर्प.

कफपित्ताज्ज्वरस्तंभोनिद्रातंद्राशिरोरुजः॥१३
अंगावसादविक्षेपप्रलापारोचकभ्रमाः॥मूर्छा
ग्निहानिर्भेदोस्थ्नांपिपासेंद्रियगौरवम्॥१४॥आ
मोपवेशनंलेपःस्त्रोतसांसविसर्पति॥प्रायेणा
माशयंगृण्हन्नेकदेशंनचातिरुक्॥१५॥पिड·
केरवकीर्णोतिपीतलोहितपांडुरैः॥स्निग्धोसि
तोमेचकाभोमलिनःशोफवान्गुरुः॥गंभीरपा
कः प्राज्योष्मास्पष्टःक्लिन्नोवदीर्यते॥ पंकवच्छी
र्णमांसश्चस्पष्टस्नायुशिरागणः॥१७॥शवगं·

धिश्चवीसर्पः कर्दमाख्यमुशंतितम्॥१७॥ ॥

अर्थ— कफपित्ता पासून ताप, अंगतावणें, निद्रा, तंद्रा, मस्तकशूल, अंगग्लानि, हातपाय पारवडणें, बडबड, अरुचि, घेरी, मूर्छा, अग्निमांद्य, हाडें फुटणें, ताहान, इंद्रियांस जडत्व, आंवपडणें, सुखादि स्रोतसांस कफाचा लेप; इत्यादि लक्षणें होतात; व तोविसर्प आमाशयावर उत्पन्न होऊन मग चहूंकडे पसरतो; तो फार दुखत नाहीं; त्यावर पिंवळ्या तांबूस पांढऱ्या पुळ्या होतात; व तो विसर्प तुळतुळीत शाई सारखा काळा, मळकट, सुजलेला, जड, व आंत पिकलेला असून त्याला फार जळजळ असते; तो-दाबतां क्षणींच ओला होतो; व त्याला चिरा पडतात; व तो चिखला प्रमाणें होऊन त्याचें मांस गळतें; तेणें करून शिरा, स्नायु, उघड्या पडतात; व त्याला मुडद्याची घाण येते, ह्या विसर्पाला **कर्दमविसर्प** (चिखल्या विसाप) ह्मणतात.

## क्षतजविसर्प.

बाह्यहेतोः क्षतात्क्रुद्धः सरक्तं पित्त मीरयन्॥ ॥१८॥ विसर्पं मारुतः कुर्यात् कुलत्थसदृशैश्चितम्॥ स्फोटैः शोथज्वररुजा दाहाढ्यं श्यावशोणितम्॥१९॥

अर्थ— बाह्य कारणानें क्षत होऊन त्यापासून वायु कुपित होऊन तो रक्तसहित पित्ताला व्रणांत आणून विसर्प उत्पन्न करितो; त्यावर कुळथ्या सारिखे श्यामवर्ण फोड येतात, सूज येते; ताप येतो, ठणका लागतो; आणि दाह होतो; त्याचें रक्त काळसर होतें.

काविपाकश्चविसर्पाणामुपद्रवाः॥ २०॥

अर्थ—ज्वर, अतिसार, वांति, तृषा, मांसगळणें, अनायास श्रम, अरुचि, अन्न न पचणें हे विसर्पाचे उपद्रव होतात.

## साध्यासाध्यलक्षण.

सिध्यंतिवातकफपित्तकृताविसर्पाः सर्वात्मकः क
फकृतश्चनसिद्धिमेति॥पित्तात्मकोंजनवपुश्चभ
वेदसाध्यः कृछ्राश्चमर्मसुभवंतिहिसर्वएव॥२१
इतिविसर्पनिदानम्॥ ॥ ॥

अर्थ—वात, कफ, पित्त, यांपासून झालेले विसर्प साध्य होतात; सन्निपातज आणि क्षतज विसर्प साध्य होत नाहींत. पित्तापासून झालेला विसर्प ज्याणें काजळासारिखें अंग होतें तो असाध्य; आणि जे विसर्प मर्माचे ठिकाणीं होतात ते सर्व कष्टसाध्य होतात.

मधुकोशंसनिर्मथ्यसारमाकृष्ययत्नतः॥ व्याख्याकृ
तामहाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥ ॥

---

## विस्फोटनिदान.

कट्वम्लतीक्ष्णोष्णविदाहिरूक्षक्षारैरजीर्णाध्यशना
तपैश्च॥ तथर्तुदोषेणविपर्ययेणकुप्यंतिदोषाः प
वनादयस्तु॥१॥ त्वचमाश्रित्यतेरक्तमांसास्थी-
निप्रदूष्यच॥ घोरान्कुर्वंतिविस्फोटान् सर्वान्ज्व
रपुरःसरान्॥२॥ ॥ ॥

अर्थ— तिरवट, अंबट, तीक्ष्ण, (मोहऱ्यावगैरे) उष्ण, दाहजनक, रूक्ष, क्षार, अजीर्ण, जेवणावर जेवण, आणि ऊन, ऋतुदोष ह्मणजे शीतोष्णातियोग, व ऋतुविपर्यय (ऋतूंचा पालट) इत्यादिकारणानीं वातादि दोष कुपित होऊन त्वचेचा आश्रय करून रक्त, मांस, आणि अस्थी यानां दूषित करून भयंकर विस्फोट (फोड) फोड उत्पन्न करितात, ते होण्याचे पूर्वी बळकट ताप येतो.

## विस्फोटस्वरूप.

अग्निदग्धनिभाः स्फोटाः सज्वरा रक्तपित्तजाः॥
क्वचित्सर्वत्र वा देहे विस्फोटा इति ते स्मृताः॥ ३॥

अर्थ— रक्तपित्ता पासून झालेले असे अग्नीनें भाजल्या सारिखे फोड अंगावर कांहीं ठिकाणीं किंवा सर्व अंगावर येतात; व त्यामुळें ज्वर येतो; त्यानां विस्फोट असें ह्मणतात।

## वातविस्फोटलक्षण.

शिरोरुक्शूलभूयिष्ठं ज्वरतृट्पर्वभेदनम्॥
सकृष्णवर्णता चेति वातविस्फोटलक्षणम्॥ ४

अर्थ— मस्तक शूळ, ठणका, ताप, तृषा, सांधे फुटणें, फोडानां काळे पणा, हें वातविस्फोटाचें लक्षण जाणावें.

## पित्तविस्फोट.

ज्वरदाहरुजास्रावपाकतृष्णाभिरन्वितम्॥ पीतलोहितवर्णं च पित्तविस्फोटलक्षणम्॥ ५॥

अर्थ— ताप, दाह, ठणका, स्राव, फोड पिकणें, तृषा, शरीराचा पिंवळा तांबडा वर्ण होणें, हें पित्त विस्फोटाचें लक्षण होय.

## कफविस्फोटल०

छर्द्यरोचकजाड्यानि कंडूकाठिण्यपांडुताः॥-
अवेदनश्चिरात्पाकी सविस्फोटः कफात्मकः॥६

अर्थ—ओकारी, अरुचि, जडत्व, कंडू, फोड टणक, व पांढरे, त्यानां ठणका लागत नाहीं; व तेउशीरानें पिकतात, हा विस्फोट कफजन्य होय.

कफपित्तात्मकविस्फोट.

कंडूर्दाहो ज्वरश्छर्दिरेतैस्तु कफपैत्तिकः॥ ॥

अर्थ— कंडू, दाह, ज्वर, आणि वांति ह्यालक्षणानीं कफपित्त जन्य विस्फोट जाणावा.

वातपित्तात्मकविस्फोट.

वातपित्तकृतोयस्तु कुरुते तीव्र वेदनाम्॥७॥

अर्थ— वातपित्तात्मक विस्फोटा मध्यें ठणका फार असतो.

कफवातात्मकाचें लं०

कंडूस्तैमित्यगुरुभिर्जानीयात्कफवातिकम्॥

अर्थ— कंडू, मंदता, जडत्व, ह्यालक्षणानीं कफवातिक विस्फोट जाणावा.

सान्निपातिकविस्फोट.

मध्येनिम्नोन्नतोंतेच कठिणोल्पप्रपाकवान्॥८
दाहरागतृषामोह छर्दिमूर्च्छारुजाज्वराः॥ प्रला
पो वेपथुस्तंद्रा सोसाध्यश्चत्रिदोषजः॥ ९॥

अर्थ—जे फोड मध्यें खोलगट आणि कडेला उंच, कठीण, किंचित् पिकणारे असतात; व ज्यांच्या योगानें दाह, अंगाला लाली, तृषा, मोह, ओकारी, मूर्छा, ठणका, ताप, बडबड, कांपरें,

झांपड; हीं लक्षणें होतात; ते सन्निपातजविस्फोटअसाध्य आहेत.

## रक्तजविस्फोटलक्षण.

रक्तारक्तसमुत्थानागुंजाफलनिभास्तथा॥ वेदितव्यास्तुरक्तेनपैत्तिकेनचहेतुना॥९॥ नतेसिद्धिं समायांतिसिद्धैर्योगशतैरपि॥

अर्थ— रक्ता पासून उत्पन्न झालेले विस्फोट तांबडे, गुंजे येवढे असतात; ते रक्त किंवा पित्त दुष्ट होऊन झालेले असतात, ते शेंकडों अनुभविक औषधें योजलीं तरी साध्य होत नाहींत.

## साध्यासाध्यविचार.

एकदोषोत्थितःसाध्यः कृच्छ्रसाध्योद्विदोषजः॥ सर्वरूपान्वितोघोरस्त्वसाध्योभूर्युपद्रवः॥१०॥

अर्थ— एक दोषा पासून उत्पन्न झालेला विस्फोट साध्य होतो, द्विदोषज कष्टसाध्य, आणि सर्वलक्षणानीं युक्त असतो तो भयंकर व ज्यांत उपद्रव पुष्कळ आहेत तो असाध्य जाणावा.

## उपद्रव.

हिक्काश्वासोरुचिस्तृष्णाअंगसादोहृदिव्यथा॥ विसर्पज्वरहृल्लासविस्फोटानामुपद्रवाः॥११॥ इतिविस्फोटनिदानम्॥ ॥ ॥

अर्थ— गुचकी, दमा, अरुचि, तृष्णा, अंगग्लानि, हृदयास पीडा, विसर्प, ज्वर, मळमळ, हे विस्फोटाचे उपद्रव जाणावे. इतिविस्फोटनिदानम्॥

मधुकोशंसनिर्मथ्यसारमाकृष्यवैमया॥ व्याख्या.

मसूरिकानिदान.

कारण व संप्राप्ति.

कट्वम्ललवणक्षारविरुद्धाध्यशनाशनैः॥दुष्ट-
निष्पावशाकादिप्रदुष्टपवनोदकैः॥१॥क्रुद्धग्र
हेक्षणाद्वापिदेहेदोषाःसमुद्धताः॥जनयंतिश
रीरेस्मिन्दुष्टरक्तेनसंगताः॥२॥मसूराकृतिसं
स्थानाःपिटिकाःस्युर्मसूरिकाः॥

अर्थ—तिखट, आम्ल, लवण, क्षार, विरुद्धाशन, अध्यशन(जे वणावर जेवण.) नासलेलें अन्न, वाल, वाटाणे, उडीद इत्यादि, शाका; विघारलेलावारा आणिपाणी, शनैश्चरादि अनिष्ट ग्रहांचे अवलोकन; त्यासर्व कारणानीं शरीरामध्यें वातादि दोषकुपित होऊन दुष्टरक्ताशीं मिळून मसूरा एवढ्या व त्यासार ख्याच ज्या पुळ्या उत्पन्नकरितात त्यानां मसूरिका(देवि ह्मणावें.

त्याचेंपूर्वरूप.

तासापूर्वज्वरःकंडूर्गात्रभंगोःरुचिर्भ्रमः॥त्व
चिशोफःसवेवर्ण्योनेत्ररागस्तथैवच॥३॥ ॥

अर्थ— त्यादेवी यावयाच्या असल्या ह्मणजे पहिल्यानें तापयेतो, कंडूसुटते, अंगफुटूंलागतें, अन्नावर द्वेष होतो, घेरीयेते, अंगावरची त्वचासुजते, व वर्ण बदलतो, वडोळेलाल होतात

## वातमसूरिकालक्षण.

स्फोटाः कृष्णारुणारूक्षास्तीव्रवेदनयान्विताः॥
कठिणाश्चिरपाकाश्च भवंत्यनिलसंभवाः॥ ४॥
संध्यस्थिपर्वणांभेदः कासः कंपोरतिःक्लमः॥शो
षस्ताल्वोष्ठजिव्हानांतृष्णाचारुचिसंयुता॥ ५॥

अर्थ—वात मसूरिकेचे फोड काळे, तांबूस, व रूक्ष असतात; त्या ना ठणका फार असतो; ते कठीण असून लवकर पिकत नाहींत; त्यांच्या योगानें संधि, हाडें, आणि पेरीं, हीं फुटतात; खोकला, कंप, अस्वस्थपणा, आयासा वांचून श्रम, टाळू, ओंठ, आणि जीभ, ह्यांना कोरड; तृष्णा, अरुचि, हीं लक्षणें होतात.

## पित्तजमसूरिकाल•

रक्ताःपीताःसिताःस्फोटाःसदाहास्तीव्रवेदनाः॥
भवंत्यचिरपाकाश्च पित्तकोपसमुद्भवाः॥ ६॥वि
ट्भेदश्चांगमर्दश्च दाहस्तृष्णारुचिस्तथा॥मुख
पाकोक्षिपाकश्च ज्वरस्तीव्रःसुदारुणः॥७॥

अर्थ—पित्तज मसूरिकेचे फोड लाल, पिंवळे, काळे असतात; त्यांना दाह व ठणका फार असतो; ते लवकर पिकतात; त्यांच्या योगानें मळपातळ होणें, आंग मोडणें, दाह, तृष्णा, अरुचि, तोंडाला व डोळ्यांना पिकलेले फोड, तीव्रज्वर, हीं लक्षणें होतात.

## रक्तजमसूरिकालक्षण.

रक्तजायांभवंत्येते विकाराःपित्तलक्षणाः॥ ८॥

अर्थ— रक्तज मसूरिके मध्यें पित्तज मसूरिकेचीं लक्षणें होतात.

## कफजमसूरिकालक्षण.

स्निग्धा गुरवस्थूलाः कंडुरामंदवेदनाः॥ मसूरि-
काः कफोत्थाश्च चिरपाकाः प्रकीर्तिताः॥१०॥ ॥

अर्थ— कफज मसूरिकेमध्यें तोंडावाटे कफाचा स्राव, अंगाला चिकचिकी व जडत्व, मस्तकशूल, ओकारी आल्यासारिखें वाटणें, अरुचि, झोप, झांपड, आळस, हीं होतात; आणि फोड पांढरे, तुळतुळीत, फार मोठे, असे असतात; त्यांना कंड फार सुटते, व वेदना कमी असते; आणि ते फार दिवसांनीं पिकतात.

## त्रिदोषजमसूरिका.

नीलाश्चिपिटविस्तीर्णामध्येनिम्नामहारुजाः॥
चिरपाकाः पूतिस्रावाः प्रभूताः सर्वदोषजाः॥११

अर्थ— त्रिदोषज मसूरिकेचे फोड निळे, पोह्यांसारिखेच चपटे, पसरट, मध्यें खोलगट, असे असतात; त्यांना ठणका फार लागतो, व ते फार दिवसांनीं पिकून त्यांतून दुर्गंधयुक्त स्राव होतो; व ते फोड फारच दाट आलेले असतात.

## चर्मपिटिका.

कंठरोधारुचिस्तंद्राप्रलापारतिसंयुताः॥ दुश्चि
कित्स्याः समुद्दिष्टाः पिडकाश्चर्मसंज्ञिताः॥१२॥

अर्थ— ज्या फोडांच्या योगानें घसा धरतो, अरुचि, झांपड, बडबड, चैन न पडणें, हीं होतात; ते चिकित्सा करण्यास कठीण म्हणून सांगितले आहेत.

## रोमांतिक (गोवर)

रोमकूपोन्नतिसमा रागिण्यः कफपित्तजाः॥ का
सारोचकसंयुक्ता रोमान्त्योज्वरपूर्विकाः॥ १३॥

अर्थ— कफपित्तापासून केसांच्या छिद्राइतका बारीक, तांबडा पुरळ येतो; तेणें करून खोकला, व अरुचि, होते; व हा पुरळ उठण्या पूर्वी ताप येत असतो; त्याला रोमांत्य (गोवर) म्हणतात.

## रसादि सप्त धातुगत मसूरिकेचें लक्षण सांगतो.

### रसगत मसूरिका लक्षण.

तोयबुद्बुदसंकाशास्त्वग्जाताश्च मसूरिकाः॥
स्वल्पदोषाः प्रजायंते भिन्नास्तोयंस्रवंतिच॥ १४

अर्थ— रसगत मसूरिका पाण्याच्या बुडबुड्यासारिख्या असतात; त्या फुटल्या असतां त्यांतून पाणी वाहातें; त्या मसूरिका साध्य आहेत. कारण; त्यांत दोष स्वल्प असतात.

### रक्तगत मसूरिका लक्षण.

रक्तस्था लोहिताकाराः शीघ्रपाकास्तनुत्वचः॥
साध्या नात्यर्थदुष्टास्तु भिन्ना रक्तंस्रवंतिच॥ १५

अर्थ— रक्तगत मसूरिका तांबड्या, लवकर पिकणाऱ्या, असतात; त्यांच्या वरची त्वचा पातळ झालेली असते; त्या अत्यंत दुष्ट झाल्या नसल्या तर साध्य होतात; आणि फुटल्या वर त्यांतून रक्त वाहातें

### मांसगतांचें लक्षण.

मांसस्थाः कठिणाः स्निग्धाश्चिरपाकास्तनुत्व

च:॥ गात्रशूलोरति:कंडूर्मूर्छादाहतृषान्विता:॥१६

अर्थ— मांसस्थमसूरिका कठीण, तुळतुळीत असतात, त्या फार दिवसांनीं पिकतात, व त्यांचीं त्वचा पातळ होते, अंगाला कळा लागतात, चैन पडत नाहीं, कंड सुटते, मूर्छा, दाह, आणि तृषा, हीं लक्षणें होतात.

## मेदोगतांचें लक्षण.

मेदोजामंडलाकारामृदव:किंचिदुन्नता:॥ घोरज्वरपरीताश्वस्थूला: कृष्णा:सवेदना:॥ संमोहारतिसंतापा: कश्चिदाभ्योविनिस्तरेत्॥१७॥ ॥

अर्थ— मेदोगत मसूरिका वाटोळ्या, मऊ, किंचित् उचलेल्या, पोसलेल्या, व काळ्या, असतात, त्यांच्या योगानें भयंकर ताप, ठणका, इंद्रियमनोमोह, अस्वस्थपणा, तलखी हीं लक्षणें होतात; व त्यापासून एकादा मनुष्य वांचतो, त्यावरून असें सूचवितो कीं त्या अत्यंत कृच्छ्रसाध्य आहेत.

## अस्थिमज्जागतांचें लक्षण.

क्षुद्रागात्रसमारूढाश्चिपिटा:किंचिदुन्नता:॥ मज्जस्थाभृशसंमोहवेदनारतिसंयुता:॥१८॥ छिंदंतिमर्मधामानि प्राणानाशुहरंतिता:॥ भ्रमरेणेव विद्धानि भवंत्यस्थीनि सर्वत:॥१९॥

अर्थ— अस्थिमज्जागत मसूरिका बारक्या, अंगासरशा, पोंचट, थोड्याश्या उचलेल्या असतात; अत्यंत मनोमोह, वेदना, अस्वस्थता; हीं होतात, त्या मर्मस्थानांचा भेद करून लवकर प्राण हरण करितात; त्यांच्या योगानें सर्व हाडांनां भुंग्यानें पोखार त्या सारिखी

पीडा होते.

### शुक्रगतांचें लक्षण.

पक्काभाः पिडकाः स्निग्धाः श्लक्ष्णाश्चात्यर्थवेदनाः॥ स्तैमित्यारतिसंमोहदाहोन्मादसमन्विताः॥२०॥ शुक्रजायां मसूर्यां तु लक्षणानि भवंति च॥ निर्दिष्टं केवलं चिन्हं दृश्यते न तु जीवितम्॥२१॥

अर्थ— शुक्र धातुगत मसूरिका पिकल्यासारिख्या, तुकतुकीत, व गुळगुळीत असतात, त्यांना फार ठणका लागतो, त्यांच्या योगानें मंदत्व, अस्वस्थता, मोह, दाह, उन्माद, हीं लक्षणें होतात, रोगी वांचेल असें ध्यांन काहीं लक्षण दिसत नाहीं, त्या वरून त्या असाध्य जाणाव्या.

### सप्त धातुगत मसूरिकांचे दोषां च्या संबंधानें लक्षण.

दोषमिश्रास्तु सप्तैता द्रष्टव्या दोषलक्षणैः॥ ॥

अर्थ— त्या सप्त धातुगत मसूरिका वातादिकांच्या लक्षणानीं त्या त्या दोषानीं मिश्रित झाल्या आहेत ह्मणून समजाव्या.

### धातुगत आणि दोषज मसूरिकांमध्यें साध्य कोणत्या त्यासां.

त्वग्गता रक्तजाश्चैव पित्तजा श्लेष्मजास्तथा॥२२॥ पित्तश्लेष्मकृताश्चैव सुखसाध्या मसूरिकाः॥ एता विनापि क्रियया प्रशाम्यंति शरीरिणाम्॥२३॥

अर्थ— रसगत, रक्तगत, पित्तज, कफज, पित्तकफज, त्या मसूरि-

का करव साध्य आहेत, त्याओषधा वांचून शांत होतात.

## कष्टसाध्य.

वातजा वातपित्तोत्था वातश्लेष्मकृताश्च याः॥
कृच्छ्रसाध्यामतास्तास्ता यत्नादेताउपाचरेत्॥२४

अर्थ— वातज, वात पित्तज, वात कफज मसूरिका कष्ट साध्य आहेत, त्यांस यत्नानें चिकित्सा करावी.

## असाध्यमसूरिका.

असाध्याः सन्निपातोत्थास्तासांवक्ष्यामिलक्षणम्॥ प्रवालसदृशाः काश्चित्काश्चिज्जंबूफलोपमाः॥२५॥ लोहजालसमाः काश्चिदतसीफलसन्निभाः॥ आसांबहुविधावर्णाजायंतेदोषभेदतः॥२६॥

अर्थ— सन्निपातज मसूरिका असाध्य आहेत; त्यांचें लक्षण- सांगतो— कांहीं पोवळ्या सारिख्या लाल असतात, कांहीं जांभका सारिख्या, आणि कांहीं लोखंडी गोळ्या सारिख्या व कांहीं जवसाच्या बोंडा सारिख्या असतात, दोष भेदानें त्यांचें नाना तऱ्हेचे रंग होतात.

## सर्वमसूरिकांचें अवस्था विशेषंकरून लक्षण सांगतो.

कासोहिक्काथमोहश्चज्वरस्तीव्रः सुदारुणः॥
प्रलापारतिमूर्छाश्चतृष्णादाहोतिघूर्णता॥२७
मुखेनप्रस्रवेद्रक्तंतथाघ्राणेनचक्षुषा॥ कंठेघुघुरकंकृत्वाश्वसित्यत्यर्थदारुणम्॥२८॥ मसू

रिकाभिभूतोयोभृशंघ्राणेननिःश्वसेत्॥ सभृ
शंत्यजतिप्राणान्तृष्णार्तोवायुदूषितः॥ २९॥

अर्थ— खोकला, गुचकी, मोह, तीव्रज्वर, बडबड, असंतोष, मूर्छा, तृष्णा, दाह, डोळे चेडे वांकडे फाडणें, हीं लक्षणें होतात; तोंड, नाक आणि डोळे, या वाटे रक्त वाहातें; घसा घुर्घुरतो, आणि भयंकर श्वास लागतो, जो मसूरिका पीडित रोगी केवळ नाकानें श्वास टाकतो तो वायु आणि तृषा ऱ्यानीं पीडित होत्साता तत्काळ प्राण सोडितो.

## मसूरिकांचेउपद्रव.

मसूरिकांतेशोथःस्यात्कूर्परेमणिबंधके॥ त-
थांसफलकेचापिदुश्चिकित्स्यःसुदारुणः॥३०
इतिमसूरिकानिदानम्॥ ॥

अर्थ— मसूरिकांच्या अंतीं कोपर, मनगट, किंवा खांदा, ऱ्यांवर सूज येते (हिला व्यवहारांत गुरू असें ह्मणतात,) ही चिकित्सा करण्यास कठीण आहे, इति मसूरिकानिदानं समाप्तम्॥

मधुकोशंसुनिर्मथ्यसारमाकृष्यवैमया॥ व्याख्या कृ-
तामहाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥ ॥

---

## क्षुद्ररोगनिदान.

## अजगल्लिका.

स्निग्धाःसवर्णाग्रथितानीरुजामुद्गसन्निभाः॥
कफवातोत्थिताज्ञेयाबालानामजगल्लिका॥१॥

अर्थ— बाळकास कफवाता पासून गुळगुळीत, त्वक्समानव

र्ण, गांठाळलेल्या, रुजारहित, व मुगा येवढ्या ज्या पिटिका होतात त्यांना **अजगल्लिका** ह्मणतात.

## यवप्रख्या.

**यवाकारा कफकठिणा ग्रथिता मांससंश्रिता॥ पिडका श्लेष्मवाताभ्यां यवप्रख्येति चोच्यते॥२॥ ॥**

अर्थ— कफवातापासून जवासारिखी कठीण, गांठाळलेली, मांसाश्रित जी पिटिका होते तिला **यवप्रख्या** ह्मणतात.

## अंधालजी.

**घनामवक्त्रां पिटिकामुन्नतां परिमंडलाम्॥ अंधालजीमल्पपूयां तां विद्यात्कफवातजाम्॥३॥**

अर्थ— कफवातापासून, कठीण, बिनतोंडाची, उंचललेली, पिटिका होते, व तिच्या भोंवताली वळें पडतें, व तिच्यांत पू कमी असतो; तिला **अंधालजी** ह्मणतात.

## विवृत्तापिटिका.

**विवृत्तास्यां महादाहां पक्वोदुंबरसन्निभाम्॥ परिमंडलां पित्तकृतां विवृतां नाम तां विदुः॥४॥**

अर्थ—पित्ताच्या योगानें मोठ्या तोंडाची, अत्यंत दाहयुक्त, पिकलेल्या उंबरासारिखी, भोंवती वळें पडलेली, जी पिटिका असते तिला **विवृता** ह्मणतात.

## कच्छपिका.

**ग्रथिताः पंच वा षड्वा दारुणाः कच्छपोन्नताः॥ कफानिलाभ्यां पिटिका ज्ञेया कच्छपिका बुधैः॥५**

अर्थ— कफवायूपासून गांठाळलेल्या, पांच किंवा साहा, कठीण,

कांस वांच्या पाठी प्रमाणें उंचज्या पिटिका होतात, त्यानां कच्छपिका ह्मणतात.

## वल्मीक (वारुळ)

ग्रीवांसकक्षाकरपाददेशेसंधौगलेवात्रिभिरेवदोषैः॥ ग्रंथिःसवल्मीकवदक्रियाणांजातः क्रमेणेवगतःप्रवृद्धिं॥ ६॥ मुखैरनेकैस्स्रुतितोदवद्भिर्विसर्पवत्सर्पतिचोन्नताग्रैः॥ वल्मीकमाहुर्भिषजोविकारंनिष्प्रत्यनीकंचिरजंविशेषात्॥ ७॥

अर्थ— मान, खांदे, काख, हात आणि पाय, सांधे, गळा, ह्याठिकाणीं तिन्हीं दोषा पासून वारुळा सारिखा ग्रंथि (गांठ) होतो; त्याला उपाय न केल्यास तो हळू हळू मोठा होतो; त्याला पुष्कळ तोंडें पडतात, त्यां तून स्राव होतो, वटोंचणी लागते; वतीं तोंडें वरउचललेलीं असून इसबा प्रमाणें पसरतात; ह्या रोगाला वैद्य वारूळ ह्मणतात, ह्यावर औषधोपचार चालत नाहीं, आणि जुनें झालें असलें तर अगदींच चालत नाहीं.

## इंद्रवृद्धा.

पद्मकर्णिकवन्मध्येपिडकाभिःसमाचिता॥ इंद्रवृद्धांतुतांविद्याद्वातपित्तोत्थितांभिषक्॥ ८॥

अर्थ— कमळाच्या वाटी प्रमाणें मध्यें एक पिटिका होऊन तिच्या भोवतालीं बारीक बारीक फोड येतात, तिला इंद्रवृद्धा ह्मणतात ही वात पित्ता पासून उत्पन्न होते.

## गर्दभिका.

मंडलंवृत्तमुत्सन्नंसरक्तंपिटिकाचितम्॥रुजा
करींगर्दभिकांतांविद्याद्वातपित्तजाम्॥९॥ ॥

अर्थ— वातपित्तापासून एक वाटोळें उचलून आलेलें, तांबडें, व फोडांनीं व्याप्त, असें मंडळ होतें, तें फार दुखतें; त्याला गर्दभिका ह्मणतात.

## पाषाणगर्दभ.

वातश्लेष्मसमुद्भूतःश्वयथुर्हनुसंधिजः॥स्थि
रोमंदरुजःस्निग्धोज्ञेयःपाषाणगर्दभः॥१०॥

अर्थ— वात कफापासून हनुसंधीवर कठीण, मंदपीडा करणारा, तुकतुकीत, शोथ होतो, त्याला पाषाणगर्दभ ह्मणतात.

## पनसिका.

कर्णस्याभ्यंतरेजातांपिटिकामुग्रवेदनाम्॥स्थि
रांपनसिकांतांतुविद्याद्वातकफोत्थिताम्॥११॥

अर्थ— कानाच्या आंत वात कफापासून फणसाच्या आंठी सारिखी कठीण जी पिटिका होते, तिला दणका फार असतो; ती पनसिका होय, भोजाच्या मतीं ही पिटिका कानाच्या बाहेर भोंवताली होते असें आहे.

## जालगर्दभ.

विसर्पवत्सर्पतियःशोथस्तनुरपाकवान्॥दा-
हज्वरकरःपित्तात्सज्ञेयोजालगर्दभः॥१२॥

अर्थ— पित्तापासून विसर्पाप्रमाणें इकडे तिकडे पसरणारा, पातळ, व किंचित् पिकणारा असा शोथ येतो, त्यामुळें दाह होतो, व ज्वर येतो, त्याला जालगर्दभ ह्मणतात.

### इरिवेल्लिका.

पिटिकामुत्तमांगस्थां वृत्तामुग्ररुजाज्वराम्॥ स
र्वात्मिकां सर्वलिंगां जानीयादिरिवेल्लिकाम्॥१३

अर्थ— त्रिदोषापासून मस्तकावर वाटोळी, अत्यंत पीडा व ज्वर-करणारी, त्रिदोषलक्षणयुक्त अशी पिटिका होते, तिला **इरिवेल्लिका** ह्मणतात.

### कक्षा (खाकमांजरी)

बाहुकक्षांसपार्श्वेषु कृष्णस्फोटां सवेदनाम्॥ पि
त्तकोपसमुद्भूतां कक्षामित्यभिनिर्दिशेत्॥ १४॥

अर्थ— बाहु, काख, खांदे, आणि बरगड्या ह्याठिकाणी पित्तकोपापासून उत्पन्न झालेली, काळ्या फोडानी व्यास व वेदनायुक्त जी-पिटिका होते तिला **कक्षा** ह्मणावी.

### गंधनाम्नी.

एकामेतादृशीं दृष्ट्वा पिडकां स्फोटसन्निभाम्॥ त्व
ग्गतां पित्तकोपेन गंधनाम्नीं प्रचक्षते॥१५॥ ॥

अर्थ— पित्तकोपानें जी एक पिटिका फोडासारिखी मोठी, त्वचेवर होते तिला **गंधनाम्नी** ह्मणतात.

### अग्निरोहिणी (काळपुळी)

कक्षाभागेषु ये स्फोटा जायंते मांसदारणाः॥ अं
तर्दाहज्वरकरा दीप्तपावकसन्निभाः॥ १६॥ स
प्ताहाद्वा दशाहाद्वा पक्षाद्वा हंति मानवम्॥ ताम
ग्निरोहिणीं विद्यादसाध्यां सान्निपातिकीम्॥१७

अर्थ— काखेच्या आसपास मांस विदारण करणारे जे फोड होता-

... दिवसांनी रोगी मरतो, ही अ-
ग्निरोहिणीनामक त्रिदोषज पिटिका असाध्य आहे हें उघडच आहे.

### चिप्प (नखुर्डें)

नखमांसमधिष्ठाय वातः पित्तं च देहिनाम्॥ कुर्वाते दाहपाकौ च तं व्याधिं चिप्पमादिशेत्॥ १८॥ तदेवाल्पतरैर्दोषैः कुनखं परुषं वदेत्॥ ॥

अर्थ— वायु आणि पित्त नखांच्या मांसांत राहून दाह आणि पाक करितात; त्या रोगाला चिप्प ह्मणावे, हेंच अल्पदोषानें झालें असतां त्याला कुनख ह्मणतात.

### अनुशयी.

गंभीरामल्पसंरंभां सवर्णामुपरिस्थिताम्॥ पादस्यानुशयीं तां तु विद्यादन्तः प्रपाकिनीम्॥ १९॥

अर्थ— पायावर त्वक्समान वर्ण, यत्किंचित्सूज लेली, आंत पिकलेली जी पिटिका होते तिला अनुशयी ह्मणतात.

### विदारिका

विदारीकंदवद्वृत्ता कक्षावंक्षणसंधिषु॥ विदारिका भवेद्रक्ता सर्वजा सर्वलक्षणा॥ २०॥ ॥

अर्थ— बेदरीच्या कांद्या प्रमाणें वाटोळी काखेंत किंवा जांगाडांत जी गांठ तांबड्या रंगाची होते तिला विदारिका ह्मणतात, ती सन्निपातानें होते ह्मणून तिजमध्यें सर्व दोषांची लक्षणें असतात.

### शर्करा.

प्राप्यमांसंशिराःस्नायूःश्लेष्मामेदस्तथानिलः॥
ग्रंथिंकरोत्यसोभिन्नोमधुसर्पिर्वसानिभम्॥२१
स्रवत्यास्रावमनिलस्तत्रवृद्धिंगतःपुनः॥ मांसं
विशोष्यग्रथितांशर्करांजनयेत्ततः॥२२॥ ॥

अर्थ– कफ, मेद, आणि वायु, हें मांस, शिरा, आणि स्नायू, त्यांमध्यें शिरून गांठ बांधतात; ती फुटली ह्मणजे तींतून मध, तूप, चर्बी,- त्यांसारखा स्राव होतो, तेणें करून वायु पुनः वाढून मांस शुष्क करून त्याच्या बारीक बारीक गांठी करितो; त्यांना **शर्करा** ह्मणावें.

## शर्करार्बुद.

दुर्गंधिक्लिन्नमत्यर्थंनानावर्णंततःशिराः॥स्रृजं
तिरक्तंसहसातद्विद्याच्छर्करार्बुदम्॥२३॥ ॥

अर्थ– शर्करा झाल्यानंतर तेथच्या शिरांतून दुर्गंध, क्लेदयुक्त, नाना तऱ्हेच्या वर्णाचें (घृत, मेद, आणि वसा यांच्या वर्णाचें) रक्त अकस्मात् स्रवतें; त्या रोगाला **शर्करार्बुद** ह्मणतात.

## पाददारी.

परिक्रमणशीलस्यवायुरत्यर्थरूक्षयोः॥ पादयोः
कुरुतेदारींसरुजांतलसंश्रिताम्॥२४॥ ॥

अर्थ—ज्या मनुष्याला फार चाल पडते त्याचे पाय वायूच्या योगानें अत्यंत रूक्ष होऊन तळव्याला भेगा पडतात; त्या दुखतात; ती **पाददारी** होय.

## कदर (कुरूप)

शर्करोन्मथितेपादेक्षतेवाकंटकादिभिः॥ग्रंथिः
कोलवदुत्सन्नोजायतेकदरंतुतत्॥२५॥ ॥

अर्थ— पायांला खडा बोंचून किंवा कांटा मोडून बोराएवढी उचललेली गांठ होते, तिला कदर ह्मणतात.

अलस (चिखल्या)

क्लिन्नांगुल्यंतरौपादौ कंडूदाहरुजान्वितौ॥ दुष्टकर्दमसंस्पर्शादलसं तं विभावयेत्॥ २६॥ ॥

अर्थ— घाणेरडा चिखल लागल्यामुळें पायांच्या बोटांच्या मधली कातडी कुजतात; त्यांना पाणी व खाज सुटते, आग होते, ठणका लागतो; ह्या रोगाला अलस ह्मणतात.

इंद्रलुप्त (चाई)

रोमकूपानुगं पित्तं वातेन सह मूर्छितम्॥ प्रच्यावयति रोमाणि ततः श्लेष्मा सशोणितः॥ २७॥ रुणद्धि रोमकूपांस्तु ततोऽन्येषामसंभवः॥ तदिंद्रलुप्तं खालित्यं प्राहुश्चाचेति चापरे॥ २८॥ ॥

अर्थ— पित्त, वायूसह वर्तमान कुपित होऊन रोमकूपांत शिरते; त्या योगानें केंस झडतात; मग कफ आणि रक्त रोमकूपें बंद करितात; तेणें करून दुसरे केंस उगवत नाहींत, ह्या रोगाला इंद्रलुप्त, खालित्य (टक्कल), चाचा (चाई) ह्मणतात.

दारुणा (दारणा)

दारुणा कंडुरा रूक्षा केशभूमिः प्रपच्यते॥ कफमारुतकोपेन विद्या दारुणकं तु तत्॥ २९॥ ॥

अर्थ— कफ वायूच्या कोपानें केंसाची जमीन अति कठीण होऊन-खाजते, खरखरीत होते, कधीं कधीं पुटकुळ्या येऊन पिकते, त्याला दारुणक ह्मणतात, कफवातकोपानें हारोग होतो ह्मणून सांगितलें-

खरें परंतु त्यांत रक्तपित्ताचा संबंध असतो; कारण, पाक हा पित्त रक्ता वांचून होत नाहीं.

अरूंषिका (खवडे).

अरूंषि बहुवक्त्राणि बहुक्लेदीनि मूर्धनि॥ कफा-
सृक्कृमिकोपेन नृणां विद्यादरूंषिकां॥ ३०॥

अर्थ— रक्त, कफ, आणि कृमि यांच्या योगानें डोक्यांमध्यें खवंदें पडतात; त्याना पुष्कळ तोंडें पडतात, व त्यांतून लस फार वाहाते, त्या रोगाला अरूंषिका ह्मणतात

पलित (केशपिकणें).

क्रोधशोकश्रमकृतः शरीरोष्मा शिरोगतः॥ पित्तं
च केशान्पचति पलितं तेन जायते॥ ३१॥ ॥

अर्थ— क्रोध, शोक, आणि श्रम त्यांपासून उत्पन्न झालेला शरीरोष्मा (ऊष्णता) आणि पित्त हीं मस्तकांत जाऊन केश पिकवितात; तेणें करून हा पलित रोग होतो.

तारुण्यपिटिका (मुरमाच्या पुळ्या)

शाल्मलीकंटकप्रख्याः कफमारुतकोपजाः॥ जा
यंते पिटिका यूनां विज्ञेया मुखदूषिकाः॥ ३२॥

अर्थ— कफ वायूच्या कोपानें सांवरीच्या कांट्या सारिख्या तरुण मनुष्याच्या तोंडावर ज्या पुटकुळ्या येतात त्यांना मुखदूषिका ह्मणतात, त्यांमुळें तोंड वाईट दिसतें.

पद्मिनीकंटक.

कंटकैराचितं वृत्तं मंडलं पांडु कंडुरं॥ पद्मिनीकंट
कप्रख्यैस्तदाख्यं कफवातजम्॥ ३३॥ ॥

ह्मणतात, हे कफवायू पासून होतें.

## जंतुमणि.

समसुत्सन्नमरुजंमंडलंकफरक्तजम्॥ सहजंल
क्ष्मचैकेषांलक्ष्योजंतुमणिस्मृतः॥ ३५॥ ॥

अर्थ— कफरक्ताने जन्मापासून झालेलें, सारखें, उचललेलें, नदुखणारें, असें मंडळ आंगावर होतें; त्याला कोणी लक्ष्म (खूण), कोणी लक्ष्य, व कोणी जंतुमणी ह्मणतात, हें स्त्रीपुरुषांच्या अंगभेदाप्रमाणें शुभाशुभ फळ दायक आहे.

## मष (मस)

अवेदनंस्थिरंचैवयस्मिन्गात्रेप्रदृश्यते॥ माषव
त्कृष्णमुत्सन्नमनिलान्माषमादिशेत्॥ ३६॥ ॥

अर्थ— वायूनें शरीरावर उडदाप्रमाणें काळा, वेदनारहित, स्थिर, कठीण, किंचित् उचललेला डाग उत्पन्न होतो, त्याला **माष (मस)** ह्मणतात.

## तिलकालक (तीळ)

कृष्णानितिलमात्राणिनीरुजानिसमानिच॥ वा-
तपित्तकफोत्सेकात्तान्विद्यात्तिलकालकान्॥ ३७

अर्थ— वात, पित्त, कफांच्या कोपानें काळें, तिळायेवढें, नदुखणारें, त्वचे बरोबर असे आंगावर जे डाग उत्पन्न होतात त्यानां **तिलकालक (तीळ)** ह्मणतात्.

## न्यच्छ.

महद्वायदिवाल्पंशावंवायदिवासितम्॥नी
रुजंमंडलंगात्रेन्यच्छमित्यभिधीयते॥३७॥

अर्थ— तोंडा वांचून इतर ठिकाणीं शरीरावर मोठे किंवा लहान, काळे किंवा पांढरे, व रुजा रहित डाग पडतात, त्यांना न्यच्छ ह्मणतात.

## व्यंग (वांग)

क्रोधायासप्रकुपितोवायुःपित्तेनसंयुतः॥सुखमा
गत्यसहसामंडलंविसृजत्यतः॥ नीरुजंतनुकंशा
वंसुखेव्यंगंतमादिशेत्॥३८॥

अर्थ— क्रोध आणि श्रम ह्यांपासून कुपित झालेला वायु पित्ताशीं संयुक्त होऊन तोंडावर येऊन एकमंडल उत्पन्न करितो; तें दुखत नाहीं, तें पातळ व श्याम वर्ण असतें; त्याला व्यंग (वांग) ह्मणतात.

## नीलिका.

कृष्णामेवंगुणंगात्रे सुखेवा नीलिकां विदुः॥३९॥

अर्थ— वरसांगितल्या प्रमाणें जें काळें मंडळ आंगावर किंवा तोंडावर होतें त्याला नीलिका ह्मणतात.

## परिवर्तिका.

मर्दनात्पीडनाद्वापितथैवाप्यभिघाततः॥ मेंद्रच
र्मयदावायुर्भजतेसर्वतश्चरन्॥४०॥तदावातो-
पसृष्टत्वात्तच्चर्मपरिवर्तते॥मणेरधस्तात्कोशस्तु
ग्रंथिरूपेणलंबते॥४१॥सवेदनंसदाहंचपाकंच
व्रजतिक्वचित्॥परिवर्तिकेतितांविद्यात्सरुजांवा-
तसंभवाम्॥४२॥ सकंडूः कठिणावापिसैवश्ले
ष्मसमुत्थिता॥

अर्थ—शिश्न चोळल्यानें, किंवा रगडल्यानें, तसें च त्याला कांहीं लागल्यानें व्यान वायु कुपित होऊन त्याचे चर्मात शहून तें मागें सारतो, आणि शिश्नाचा कोश सजून मणीच्या खालीं गांठी सारिखा होऊन लोंबतो, त्याला ठणका लागतो; आग होते, व कधीं कधीं तो पिकतो, त्या पीडेला **परिवर्तिका** (उरफाटणें) ह्मणावें, ही वाता पासून होते, तीच कफा पासून झाली ह्मणजे कंडु युक्त व कठीण असते.

## अवपाटिका.

**अल्पीयःखांयदाहर्षाद्बलाद्गच्छेत्स्त्रियंनरः॥ हस्ताभिघातादथवाचर्मण्युद्वर्तितेबलात्॥ मर्दनात्पीडनाद्वापिशुक्रवेगविघाततः॥ ४४॥ यस्यावपात्यतेचर्मतांविद्यादवपाटिकाम्॥**

अर्थ—जीच्या योनीचें छिद्र बारीक आहे अशा स्त्रीशीं बळजोरीनें व कामुक होऊन गमन केलें असतां; अथवा हस्ताच्या अभिघातानें बळानें शिश्नाचें चामडें उलटें केलें असतां; किंवा चोळल्यानें, किंवा चेपल्यानें, अथवा शुक्राचा वेग कोंडल्यानें त्या पुरुषाचे शिश्नाचें चामडें फाटतें त्या पीडेला **अवपाटिका** ह्मणावें.

## निरुद्धप्रकाश.

**वातोपसृष्टेमेढ्रेतुचर्मसंश्रयतेमणिं॥ ४५॥ मणिश्चर्मोपनद्धस्तुमूत्रस्रोतोरुणद्धिच॥ निरुद्धप्रकशेतस्मिन्मंदधारमवेदनम्॥ ४६॥ मूत्रंप्रवर्ततेजंतोर्मणिर्विव्रियतेनच॥ निरुद्धप्रकशंविद्यात्सरुजंवातसंभवम्॥ ४७॥**

अर्थ—वायूच्या योगानें शिश्न पीडित झालें असतां चामडें सुजून-

मणि झांकला जातो; तो मणि चामड्यानें गुरफाटल्या मुळें मूत्राच्या मार्गाचा रोध होतो; ते वेळीं मूत्राचा थेंब थेंब गळतो; पण तिडीक लागत नाहीं; मणि बाहेर मोकळा होत नाहीं, या रुजा युक्त वातजन्य पीडेला निरुद्ध प्रकाश ह्मणतात.

## सन्निरुद्धगुद.

वेगसंधारणाद्वायुर्विहतोगुदसंस्थितः॥ निरुणद्धिमहास्त्रोतः सूक्ष्मद्वारंकरोतिच॥ ४८॥ मार्गस्यसौक्ष्म्यात्कृच्छ्रेणपुरीषंतस्यगच्छति॥ सन्निरुद्धगुदंव्याधिमेनंविद्यात्सुदारुणम्॥ ४९॥ ॥

अर्थ— मळ मूत्रादिकांचे वेगाचे धारण केल्यानें गुदाश्रित वायु कोंडून महा स्रोता (गुद) चा अवरोध करितो; आणि तें द्वार बारीक करितो; मग मार्ग बारीक झाल्या मुळें त्या पुरुषाचा मळ मोठ्या कष्टानें बाहेर निघतो, त्या भयंकर व्याधीला सन्निरुद्धगुद ह्मणतात.

## अहिपूतन.

शकृन्मूत्रसमायुक्तेधौतेपानेशिशोर्भवेत्॥ स्विन्नेवास्नाप्यमानेवाकंडूरक्तकफोद्भवा॥ ५०॥ ततः कंडूयनात्क्षिप्रंस्फोटास्त्रावश्चजायते॥ एकीभूतंव्रणैर्घोरंतंविद्यादहिपूतनम्॥ ५१॥

अर्थ— लेंकरूं हगल्या नंतर त्याचें गुद धुतलें नसतां, किंवा तें घामेजलें असतां, किंवा न्हाऊं घातलें असतां रक्त कफा पासून कंडु उत्पन्न होते, नंतर खाजवल्यानें लवकर फोड येतात, व ते चिघळून एक वटतात, त्या भयंकर व्याधीला अहिपूतन ह्मणतात, हा रोग बहुधा लेंकरांसच होतो.

नात्तनः क्षिप्रं स्फोटाः स्रावश्च जायते॥ प्राहुर्वृषेण कच्छूं तां श्लेष्मरक्तप्रकोपजाम्॥५३॥

अर्थ– जो मनुष्य स्नान करते वेळेस नीट मळ घुचून कादीत नाहीं त्याच्या अंडावर मळ सांचतो; आणि तो घामानें ओलसर झाला ह्मणजे कंड फार सुटते; आणि खाजवल्यानें तत्काळ फोड येऊन-निघळ तात, कफरक्तापासून होणाऱ्या त्या व्याधीला वृषणकच्छू ह्मणतात.

## गुदभ्रंश.

प्रवाहणातिसाराभ्यां निर्गच्छति गुदं बहिः॥ रूक्ष दुर्बल देहस्य गुदभ्रंशं तमादिशेत्॥५४॥ ॥

अर्थ– रूक्ष आणि अशक्त पुरुषाचें गुद कुंथल्यानें किंवा अतिसाराच्या योगानें बाहेर येतें; त्या रोगाला **गुदभ्रंश** (कुला बाहेर पडणें) ह्मणतात.

## सूकरदंष्ट्र.

सदाहो रक्तपर्यंतस्त्वक्पाकी तीव्रवेदनः॥ कंडूमान्ज्वरकारी च सः स्याच्छूकरदंष्ट्रकः॥५५॥ ॥

इति क्षुद्ररोगनिदानम्॥

अर्थ– दाहयुक्त, कडेला लाल, ज्याची त्वचा पिकली आहे, तीव्र वेदनायुक्त, कंडुयुक्त, व ज्वर करणारा असा शोथ किंवा व्रण होतो; त्याला **सूकरदंष्ट्र** (डुकरदाढ) ह्मणतात, इति क्षुद्ररोगनिदानं॥ ॥

मधुकोशांसनिर्मथ्यसारमाकृष्य यत्नतः॥ व्याख्याकृ-
तामहाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥ ॥

---

## मुखरोगनिदान.

### संख्या

दंतेषष्ठावोष्ठयोश्वमूलेषुदशपंचच॥ नवता-
लुनिजिव्हायांपंचसप्तदशामया:॥१॥ कंठेत्रय:
सर्वसराएकषष्टिचतु:परे॥

अर्थ– दंतरोग ८, ओष्ठरोग ८, दंतमूलरोग ८, टाळ्याचे ९, जिव्हेचे ५, कंठरोग १७, आणि सर्वसर ३, एकूण पांसष्ट ६५ मुखरोग आहेत.

### त्यापैकीं ८ ओष्ठरोगसं.

### संप्राप्ति.

आनूपपिशितक्षीरदधिमाषादिसेवनात्॥ मुख
मध्यंगदान्कुर्यु: क्रुद्धादोषा: कफोत्तरा:॥१॥ ॥

अर्थ– जलचर प्राण्यांचें मांस, दूध, दहीं, उडीद वगैरे पदार्थांच्या सेवनानें कुपित झालेले कफाधिकदोष, मुखामध्येंरोगउत्पन्नकरितात.

### वातिकओष्ठरोग.

कर्कशौपरुषौस्तब्धौ कृष्णौतीव्ररुजान्वितौ॥ दाल्येतेप
रिपाट्येते ओष्ठौमारुतकोपत:॥२॥

अर्थ– वायूच्या कोपानें ओठ कर्कश, खरखरीत, ताठ, काळे, होतात; त्यांना तीव्र पीडा होते, ते फुटतात, व त्यावरची त्वचा फाटते,

पैत्तिक

चीयेतेपिटिकाभिस्तसरुजाभिःसमंतत॥सदा
हपाकपिटिको पीताभासोचपित्तत॥३॥ ॥

अर्थ—पित्तानें ओंठावर सभोंवती पुळ्या येतात, त्या दुखतात, ओंठाची आग होते, व ते पिंवळट दिसतात.

श्लेष्मिक

सवर्णाभिस्तुचीयेतेपिटिकाभिरवेदनो॥ भवत
स्तु कफादोष्ठोपिच्छिलोशीतलोगुरु॥४॥ ॥

अर्थ— कफानें ओंठ त्वक्समान वर्ण पिटिकानीं व्याप्त होतात, किंचित् दुखतात, व बुळबुळीत, थंड, आणि जड होतात.

सान्निपातिक.

सकृत्कृष्णोसकृत्पीतोसकृच्छ्वेतोतथैवच॥स-
न्निपातेनविज्ञेयावनेकपिटिकान्वितो॥५॥ ॥

अर्थ— सन्निपातानें ओंठ, एकदा काळे, एकदां पिंवळे, तसेंच एक वेळ पांढरे, व अनेक प्रकारच्या पुळ्यानीं व्याप्त असे होतात.

रक्तज.

खर्जूरीफलवर्णाभिः पिटिकाभिर्निपीडितो॥ र
क्तोपसृष्टोरुधिरंस्रवतःशोणितप्रभो॥६॥ ॥

अर्थ—रक्तानें ओंठावर खारकेच्या रंगाच्या पुळ्या येतात; त्यांतून रक्त गळतें; व ते ओंठ रक्तासारिखे लाल दिसतात.

मांसज.

मांसदुष्टोगुरुस्थूलोमांसपिंडवदुन्नतो॥जंतव
श्चात्रमूर्छंतिनरस्योभयतोमुखात्॥७॥ ॥

अर्थ— मांस दुष्ट झाल्यानें, ओंठ जड, ढोसर होतात; मांसपिंडा

सारखे उचलून येतात; त्या रोगामध्यें मनुष्याच्या दोन्हीं ओंठाला किंवा ओष्ठ प्रांताला किडे पडतात.

मेदोज.

सर्पिर्मंडप्रतीकाशौ मेदसा कंडुरौ गुरू॥ स्वच्छं-स्फटिकसंकाशमास्रावं स्रवतो भृशम्॥ ८॥ न-योर्व्रणो न संरोहेन्मृदुत्वं च न गच्छति॥

अर्थ— मेदानें ओंठ तुपाच्या निवळीसारिखे, कंडुयुक्त, व जड होतात; व त्यांतून स्फटिका प्रमाणें स्वच्छ स्राव पुष्कळ होतो, त्यांवर पडलेला व्रण भरत नाहीं, व त्याला मृदुता येत नाहीं.

अभिघातज.

ओष्ठौ पर्यंच दीर्येते पीड्येते चाभिघाततः॥ ग्रथितौ च तदा स्यातां कंडूक्लेदसमन्वितौ॥ ९॥

अर्थ— अभिघातानें ओंठ सभोंवती चिरतात, ठणकतात, गांठाळतात, व त्यांना कंडू सुटून लस वाहाते.

दंतमूलगत १५ रोग सांगतो.

शीताद

शोणितं दंतवेष्टेभ्यो यस्याकस्मात् प्रवर्तते॥ दुर्गं-धीनि सकृष्णानि प्रक्लेदीनि मृदूनि च॥ १०॥ दंत-मांसानि शीर्यंते पचंति च परस्परम्॥ शीतादो नाम स व्याधिः कफशोणितसंभवः॥ ११॥

अर्थ— ज्याच्या हिरड्यांतून अकस्मात् रक्त वाहातें; आणि दांतांचें मांस दुर्गंधयुक्त, काळें, निघळलेलें व मृदु होऊन झडतें; आणि एक दांताची हिरडी पिकली ह्मणजे ती दुसरीला पिकवते; त्याचा हा-

व्याधि कफरक्तापासून होतो.

## दंतपुप्पुट.

दंतयोस्त्रिषुवायस्य श्वयथुर्जायतेमहान्॥ दंतपु
प्पुटकोनामसव्याधिः कफरक्तजः॥ १२॥

अर्थ— ज्याच्या दोन किंवा तीन दांताच्या मुळाला मोठी सूज येते, त्या
चा हा व्याधि कफरक्तापासून होतो.

## दंतवेष्ट.

स्त्रवंति पूयंरुधिरंचलादंताभवंतिच॥ दंतवेष्टः
सविज्ञेयोदुष्टशोणितसंभवः॥१३॥ ॥

अर्थ— रक्त दुष्ट झाल्यानें दांतावाटे रक्त व पू वाहातो, व दांत हाल
तात.

## सौषिर.

श्वयथुर्दंतमूलेषुरुजावान्कफरक्तजः॥ लाला-
स्त्रावीसविज्ञेयः सौषिरोनामनामतः॥१४॥

अर्थ— कफरक्तापासून दंताच्या मुळाशीं सूज येते, त्यामुळें लाळ-
गळते.

## महासौषिर

दंताश्चलंतिवेष्टेभ्यस्तालुचाप्यवदीर्यते॥ यस्मि
न्ससर्वजोव्याधिर्महासौषिरसंज्ञकः॥१५॥ ॥

अर्थ— त्या त्रिदोषज व्याधीनें हिरड्यापासून दांत हालतात, आणि-
टाळ्याला भेगा पडतात.

## परिदर.

दंतमांसानिशीर्यंतेयस्मिन्ष्ठीवतिचाप्यसृक्॥

पित्तासृक्कफजोव्याधिर्ज्ञेयःपरिदरोहिसः॥१६॥

अर्थ— त्यारोगानें दांताचें मांस गळतें, आणि थुंकीमध्यें रक्त पडतें; हा व्याधि पित्तरक्त कफापासून होतो.

## उपकुश.

वेष्टेषुदाहःपाकश्चताभ्यांदंताश्चलंतिच॥अघा
कृष्टताःप्रस्रवंतिशोणितंमंदवेदनाः॥१७॥आ-
ध्मायंतेस्रुतेरक्तेमुखेपूतिश्चजायते॥यस्मिन्नुप
कुशोनामपित्तरक्तकृतोगदः॥१८॥

अर्थ— त्यारोगामध्यें हिरड्यांचा दाह होऊन त्यापिकतात; त्यामुळें दांत हालतात, तोंड खाली केलें असतां थोडीशी ठुसठुस लागून रक्त गळतें, रक्त वाहून गेल्यावर हिरड्या पुनः फुगतात, आणि तोंडाला दुर्गंधि येते, त्यापित्तरक्त कृत विकाराला उपकुश म्हणतात.

## वैदर्भ.

घृष्टेषुदंतमूलेषुसंरंभोजायतेमहान्॥भवंतिच
चलादंताःसवैदर्भोऽभिघातजः॥१९॥

अर्थ—हिरड्या रगडून घांसल्यानें पुष्कळ सजतात, आणि दांत खिळखिळे होतात; हारोग अभिघातानें होतो.

## खल्लीवर्धन.

मारुतेनाधिकोदंतोजायतेतीव्रवेदनः॥खल्लीवर्ध
नसंज्ञोवैजातेरुक्चप्रशाम्यति॥२०॥

अर्थ— वायूच्या योगानें दांतावर एक नवा दांत उगवतो, त्यावेळेस ठणका लागतो; तो दांत पुरता वर आला म्हणजे वेदना शांत होते.

## कराल.

शनैः शनैः प्रकुरुते वायुर्दंतसमाश्रितः॥ करालान्
विकटान् दंतान् करालो न च सिध्यति॥२१॥ ॥

अर्थ— वायु दंत मूलाश्रित होऊन हळू हळू दांत वांकडे तिकडे करितो, हा व्याधि साध्य होत नाहीं.

## अधिमांसक.

हानव्ये पश्चिमे दंते महान् शोथो महारुजः॥ लाला
स्रावी कफकृतो विज्ञेयो ऽध्यधिमांसकः॥२२॥ ॥

अर्थ— शेवट ज्या दाढेच्या मुळाशीं मोठी सूज येते, ती फार ठणकते, व लाळ फार गळते, हा कफापासून होतो

## नाडीव्रण

दंतमूलगता नाड्यः पंच ज्ञेया यथेरिताः॥२३॥

अर्थ— नाडी निदाना मध्यें वात, पित्त, कफ, सन्निपात आणि आगंतु असे पांच प्रकारचे जे नाडी व्रण सांगितले आहेत ते दंतमूळामध्यें होतात असें जाणावें. पहिले ११ आणि ५ नाडी मिळून १६ दंतमूल रोग होतात, परंतु कराल हा सुश्रुताच्या मतीं अधीक आहे; आणि तो संग्रह कारानें आपल्या ग्रंथांत लिहिला आहे ह्मणून येथें ही घेतला आहे.

## दंतरोग ८ सांगतो.

## दालन.

दीर्यमाणेष्विव रुजा यस्य दंतेषु जायते॥ दालनो-
नाम स व्याधिः सदागतिनिमित्तजः॥२४॥ ॥

अर्थ— ज्याच्या दांतामध्यें फोडल्यासारिखी पीडा होते, त्याच्या वातजन्य व्याधीला दालन ह्मणतात.

## कृमिदंतक.

कृष्णाछिद्रश्चलस्रावीससंरंभोमहारुजः॥अ
निमित्तरुजोवातात्सज्ञेयःकृमिदंतकः॥२५॥ ॥

अर्थ— वायूच्या योगानें दांत काळीं छिद्रें पडलेला, व हालणारा, स्र घणारा, शोथ युक्त, उणका लागलेला, आणि कारणा वांचून दुखणा रा असा होतो; तो कृमिदंत ह्मणून समजावा, त्यांत काळीं छिद्रें प डण्याचें कारण असे आहे कीं; दुष्ट रक्तानें कृमि होऊन ते तोंडें करितात.

## भंजनक.

वक्त्रंवक्रंभवेद्यस्यदंतभंगश्चजायते॥कफवात
कृतोव्याधिःसभंजनकसंज्ञितः॥२६॥ ॥

अर्थ— त्या व्याधीनें तोंड वांकडें होऊन दांत फुटतात; हा व्याधि क- फ वातानें होतो.

## दंतहर्ष

शीतरूक्षप्रवाताम्लस्पर्शानामसहाद्विजाः॥पि
त्तमारुतकोपेनदंतहर्षःसनामतः॥२७॥ ॥

अर्थ— दांतांना थंड, रूक्ष, आंबट पदार्थ, आणि वारा हे लागले अस तां ते सळसळतात; हा रोग पित्त वायूच्या कोपानें होतो, त्याचें नांव दंतहर्ष; हा रोग वातज असतांही त्याला उष्ण सोसत नाहीं, हा व्या धि स्वभाव होय.

## दंतशर्करा.

मलोदंतगतोयस्तुपित्तमारुतशोषितः॥शर्करेव
खरस्पर्शासाज्ञेयादंतशर्करा॥२८॥ ॥

अर्थ— दांतावरचा मळ पित्त वायूनें शोषला जाऊन वाळूसारिखा

खर रवरीत होतो त्या रोगाला दंतशर्करा ह्मणावें.

### कपालिका.

कपालेष्विवदीर्णेषुदंतानांसेवशर्करा॥ कपालि
केतिसाज्ञेयासदादंतविनाशिनी॥२९॥ ॥

अर्थ— त्याच शर्करेचे पापुद्र्या प्रमाणें दांतापासून कपारे निघू लागले ह्मणजे तिला कपालिका ह्मणावें, त्यारोगानें दांत नासतात.

### श्यावदंत.

योसृङ्मिश्रेणपित्तेनदग्धोदंतस्त्वशेषतः॥श्याव
तांनीलतांवापिगतःसश्यावदंतकः॥३०॥

अर्थ— जो दांत रक्तयुक्तपित्तानें जळून सगळा काळा किंवा निळा होतो तो श्याव दंत.

### हनुमोक्ष

वातेनतैस्तैर्भावैस्तु हनुसंधिर्विसंहतः॥ हनुमो
क्षइतिज्ञेयोव्याधिरर्दितलक्षणः॥३१॥ ॥

अर्थ— वायू ज्यायोगानें त्यात्या अभिघाता दिकें करून हनुसंधिउखळतो, त्याला हनु मोक्ष ह्मणावें त्याचें लक्षण अर्दिता सारिखें होतें.

### जिव्हागत५रोगसांगतों.

जिव्हानिलेनस्फुटिताप्रसुप्ताभवेच्चशाकच्छदन
प्रकाशा॥

अर्थ— वायूनें जीभ फुटते, मेहरते, आणिसागाचे पानासारिखीखर खरीत होते.

### पित्तज.

पित्तेनपीतापरिदह्यतेचदीर्घैःसरक्तैरपिकंटकैश्च॥

अर्थ—पित्तानें जीभ पिंवळी होते, व तिला दाह होतो, व तीवर लांब लांब तांबडे कांटे येतात.

### कफज.

कफेनगुर्वीबहलाचिताचमांसोच्छ्रयैः शाल्मलि-
कंटकाभैः॥

अर्थ— कफानें जीभ जड वदडस होते, व सांवरीच्या कांट्या सारिखे मांसाचे अंकूर तिजवर उगवतात.

### अलास.

जिव्हातलेयः श्वयथुः प्रगाढः सोलाससंज्ञः क-
फरक्तमूर्तिः॥ जिव्हांसतुस्तंभयतिप्रवृद्धो मूले
चजिव्हाभृशमेतिपाकम्॥ ३३॥

अर्थ— जिभेच्या तळाशीं कफ रक्तामुळें भयंकर सूज येते, ती वाढल्यानें जीभ ताठते, व मुळाशीं पिकते, हा रोग असाध्य आहे.

### उपजिव्हा.

जिव्हाग्ररूपः श्वयथुः सजिव्हामुन्नम्यजातः क
फरक्तमूर्तिः॥ लालाकरः कंडुयुतः सचोषः सातू
पजिव्हाकथिताभिषग्भिः॥ ३४॥ ॥

अर्थ— कफरक्तानें जिभेच्या शेंड्या सारिखी सूज जिभेला खालीं दबून उत्पन्न होते, तिच्या योगानें लाळ फार वाहाते, व तिला कंडू सुटते, व आग होते, त्या रोगाला वैद्य उपजिव्हा ह्मणतात.

### तालुगत ९ रोग सांगतो.

### कंठशुंडी (पडजीभ)

श्लेष्मासृग्भ्यांतालुमूलात्प्रवृद्धो दीर्घः शोथोध्मा

तबस्तिप्रकाशः॥ तृष्णाकासश्वासकृत्तं वदंति-
व्याधिं वैद्याः कंठशंडीतिनाम्ना॥३५॥ ॥

अर्थ— कफ रक्ता पासून टाळ्याच्या मुळाशीं फुगलेल्या बस्ती प्रमाणें मोठी सूज येते व तिच्या योगानें तहान, खोकला, श्वास, हे होतात त्या रोगाला वैद्य **कंठशंडी** म्हणतात.

## तुंडिकेरी

शोथः शूलस्तोददाहप्रपाकी प्रागुक्ताभ्यांतुंडि-
केरीमतातु॥

अर्थ— कफ रक्ता पासून टाळ्याला रान कापशीच्या बोंडासारिखी सूज येते, तिला ठणका, टोंचणी आणि आग असून ती पिकते.

## अध्रुव.

शोथस्तब्धो लोहितस्तालुदेशेरक्ताज्ज्ञेयः सोध्रु
वोरुक्ज्वरश्च॥३६॥

अर्थ— रक्ता पासून टाळ्यावर तांबडी ताठर सूज येते, तिला ठणका लागतो, आणि ताप येतो.

## कच्छप.

कूर्मोत्सन्नोवेदनोशीघ्रजन्मारोगो ज्ञेयः कच्छ
पः श्लेष्मणावा॥

अर्थ— कफानें टाळ्यावर कासवाच्या पाठी प्रमाणें उचललेली सूज येते, तिला ठणका कमी असतो, ती लवकर वाढत नाहीं.

## अर्बुद.

पद्माकारंतालुमध्येतुशोथं विद्याद्रक्तादर्बुदं-
प्रोक्तलिंगम्॥३७॥

अर्थ— रक्तापासून टाळ्यामध्यें कमळाच्या वाटीसारिखा शोथ येतो; त्याचीं लक्षणें अर्बुद निदानांतील रक्तार्बुदाप्रमाणें जाणावीं

## मांससंघात

दुष्टंमांसंनीरुजंतालुमध्येकफाच्छूनंमांससंघातमाहुः॥

अर्थ— कफानें टाळ्यामध्यें मांस नासून सुजतें, तें दुखत नाहीं.

## तालुपुप्पुट.

नीरुक्स्थायीकोलमात्रःकफात्स्यान्मेदोयुक्तः पुप्पुटस्तालुदेशे॥३८॥

अर्थ— मेदयुक्त कफानें टाळ्यावर रुजारहित व स्थीर व बोरायेवढा असा शोथ येतो.

## तालुशोष.

शोषोत्यर्थंदीर्यतेचापितालुःश्वासश्चोग्रस्तालुशोषोनिलाच्च॥

अर्थ— वायूनें टाळा अत्यंत कोरडा पडून भेगा पडतात व भयंकर श्वास लागतो.

## तालुपाक.

पित्तंकुर्यात्पाकमत्यर्थघोरंतालुन्येवंतालुपाकंवदंति॥३९॥

अर्थ— पित्त कुपित होऊन टाळ्यावर अत्यंत भयंकर पाक (पिकलेल्या पुळ्या) उत्पन्न करितें.

## कंठगत१७ रोग सांगतो.

## त्यांपैकीं पांच रोहिणीचा सामान्य

संप्राप्ति.

गलेनिलःपित्तकफौचमूर्छितौप्रदूष्यमांसंचत थैवशोणितम्॥ गलोपसंरोधकरैस्तथांकुरैर्नि हंत्यसून्व्याधिरयंहिरोहिणी॥४०॥

अर्थ— गळ्यामध्यें वायु,पित्त,कफ, हे दुष्ट होऊन मांसाला वरक्ता ला दूषित करून गळ्यामध्यें अंकुरउत्पन्न करितात, त्यानीं गळादा टूनजातो, हा रोहिणी नामक व्याधि प्राणनाशक आहे.

वातजा.

जिव्हासमंतात्भृशवेदनास्त्कमांसांकुराः कंठनि रोधनाये॥सारोहिणीवातकृताप्रदिष्टावाता- त्मकोपद्रवगाढयुक्ता॥४१॥

अर्थ— जिव्हेच्या भोवताली अत्यंत वेदनायुक्त जेमांसांकुरउत्प- न्न होतात, ती हींकरून कंठाचा रोध होतो, तिच्यामध्यें कंप,विना- म,स्तंभादि वाताचे उपद्रव होतात.

पित्तजा.

क्षिप्रोद्गमाक्षिप्रविदाहपाकातीव्रज्वरापित्तनि- मित्तजातु॥

अर्थ— पित्तापासून झालेली रोहिणी लवकर वाढते,लवकरपि कते,तिच्यायोगानें तीव्रज्वर येतो.

कफजा.

स्रोतोनिरोधिन्यपिमंदपाकास्थिरांकुरायाकफ संभवासा॥४२॥

अर्थ—जीरोहिणी कंठमार्गाचा रोधकरिते व हळूहळूपिकते, व

जिचे अंकुर कठिण असतात, ती कफजन्य होय.

### त्रिदोषजा.

गंभीरपाकिन्यनिवार्यवीर्यात्रिदोषलिंगा त्रि-
तयोत्थिनासा॥

अर्थ— तीन दोषानीं उत्पन्न झालेली रोहिणी गंभीर पाकिनी (जी मध्येपूरवोल होते) तिज वर औषधाचा अमल चालत नाहीं, आणि तिन्ही दोषांच्या लक्षणानीं युक्त होते, ही तत्काळ प्राण घेते, हिला व्यवहारांत **कांदे धांवरें** ह्मणतात.

### रक्तजा.

स्फोटैश्चिता पित्तसमानलिंगासाध्याप्रदिष्टारु-
धिरात्मकातु॥ ४३॥

अर्थ— रक्त जन्य रोहिणी पित्तज रोहिणीसारिखी असते, व फोडानीं व्याप्त असते, ही साध्य आहे.

### कंठशालूक

कोलास्थिमात्रः कफसंभवोयोग्रंथिर्गले कंटक
शूकभूतः॥ खरः स्थिरः शस्त्रनिपातसाध्यस्तं कं
ठशालूकमितिब्रुवंति॥ ४४॥

अर्थ— कफापासून गळ्या मध्यें बोराच्या आंठोळी येवढी गांठ येते, तिजवर बारीक कांटे असतात व ती खरखरीत व कठीण असते; हा रोग शस्त्रानें साध्य होतो, त्याला **कंठशालूक** ह्मणतात.

### अधिजिव्ह.

जिव्हाग्ररूपः श्वयथुः कफात्तु जिव्होपरि स्यादपि
रक्तमिश्रात्॥ ज्ञेयोधिजिव्हः खलुरोग एषविवर्ज

येदागतपाकमेनम्॥ ४५॥

अर्थ— रक्तमिश्र कफापासून जिभेच्या अग्रासारिखा जिभेवर शोथ येतो, त्याला अधिजिव्ह म्हणतात, हा पिकला म्हणजे साध्य होत नाहीं म्हणून सोडावा.

## वलय.

बलास एवायतमुन्नतंच ग्रंथिंकरोत्यन्नगतिंनिवार्य॥ तंसर्वथैवाप्रतिवार्यवीर्यंविवर्जनीयंवलयंवदंति॥ ४६॥

अर्थ— कफानेंच उंच आणि लांब अशी गांठ घशांत उत्पन्न होते; तिच्या योगानें अन्न घशांत उतरत नाहीं, व ती वर कांहीं उपाय चालत नाहीं, त्या रोगाला वलय (लोकांत घाटसर्प) म्हणतात हा वैद्यानें सोडावा.

## बलास.

गलेतुशोथंकुरुतः प्रवृद्धौश्लेष्मानिलौश्वासरुजोपपन्नम्॥ मर्मच्छिदंदुस्तरमेनमाहुर्बलाससंज्ञंनिपुणाविकारम्॥४७॥

अर्थ— कुपित झालेले कफ वायू गळ्या मध्यें शोथ उत्पन्न करितात, तेणें करून दम लागतो व गळा दुखतो, त्या मर्म भेद करणाऱ्या दुस्तर व्याधीला वैद्य बलास असें नाव देतात.

## एकवृंद.

वृत्तोन्नतोंतः श्वयथुः सदाहः सकंडुरोपाक्यमृदुर्गुरुश्च॥ नाम्नैकवृंदः परिकीर्तितोसौ व्याधिर्बलासक्षतजप्रसूतः॥ ४८॥

अर्थ— गळ्यामध्यें वाटोळा, उंच, किंचित् दाहयुक्त, खाजणारा, असा शोथ येतो, तो किंचित् पिकतो, आणखी कांहींसा नरम व जड असतो, त्याचें नांव एकवृंद. हा व्याधि कफरक्तापासून होतो.

## वृंद.

समुन्नतंवृत्तममंददाहंतीव्रज्वरंवृंदमुदाहरंति॥
तंचापिपित्तक्षतजप्रकोपाद्विद्यात्सतोदंपवना
सकंतु॥ ४९॥

अर्थ— गळ्यामध्यें उंच वाटोळा, तीव्र दाह व ज्वरयुक्त जो शोथ येतो, त्याला वृंद म्हणतात, हाही पित्तरक्ताच्या कोपानें होतो, त्यांत वायूचा संबंध असला म्हणजे टोंचणी लागते, त्या व्याधीला वृंद म्हणतात, हा एक वृंदाचा अवस्था विशेषच आहे, म्हणून वेगळा गणूं नये.

## शतघ्नी.

वर्तिर्घनाकंठनिरोधनीयाचितातिमात्रंपिशित-
प्ररोहैः॥अनेकरुक्प्राणहरीत्रिदोषाज्ज्ञेयाश
तघ्नीतुशतघ्निरूपा॥५०॥

अर्थ— कंठामध्यें लांबोडी व कठीण सूज येते, तीणें करून गळा कोंडतो, त्या सूजेवर मांसाचे अंकूर पुष्कळ असतात, व तिला तोद, दाह, कंड्वादि अनेक वेदना होतात, ही प्राण हरण करणारी सूज शतघ्नी (लांबट व कांटेलावलेलें शस्त्र) सारिखी असते म्हणून हिलाही संज्ञा दिली आहे.

## गिलायु

ग्रंथिर्गलेत्वामलकास्थिमात्रःस्थिरोल्परुक्-

स्यात्कफरक्तमूर्तिः॥संलक्ष्यतेसक्तमिवाशनंचसश
स्त्रसाध्यस्तुगिलायुसंज्ञः॥५१॥ ॥ ॥

अर्थ– कफरक्तानें गळ्यामध्यें अवळ्याच्या अठोळी येवढी गांठ येते, ती कठीण व मंदवेदन असते; तिच्या योगानें अन्न अडकल्या सारखें वाटतें. हा व्याधि शस्त्र साध्य आहे.

## गलविद्रधि.

सर्वंगलंव्याप्यसमुत्थितोयःशोथोरुजःसंतिचयत्र
सर्वाः॥ससर्वदोषोगलविद्रधिस्तुतस्यैवतुल्यःखलु
सर्वजस्य॥५२॥ ॥ ॥

अर्थ– जो शोथ सर्व गळ्याभर होतो, व ज्यामध्यें सर्वप्रकारच्या वेदना होतात, तो विद्रधिनिदानोक्त त्रिदोष गलविद्रधि सारखा गलविद्रधि होय.

## गलौघ.

शोथोमहानन्नजलावरोधीतीव्रज्वरोवायुगतेर्निहंता॥
कफेनजातोरुधिरान्वितेनगलेगलौघःपरिकीर्त्यतेसौ॥५३॥

अर्थ– रक्तयुक्त कफानें गळ्यामध्यें मोठा शोथ येतो, त्याच्या योगानें अन्न पाणी बंद होतें, व वायूचा संचार होतनाहीं. त्याला गलौघ ह्मणतात.

## स्वरघ्न.

यस्ताम्यमानःश्वसितिप्रसक्तंभिन्नस्वरःशुष्कविमुक्त
कंठः॥कफोपदिग्धेष्वनिलायनेषुज्ञेयःसरोगःश्वसना-
त्स्वरघ्नः॥५४॥ ॥ ॥

अर्थ– वायूचे मार्ग कफानें लिप्त झाले असतां वारंवार डोळ्या पुढें अंधेऱ्या येऊन जो पुरुष श्वास टाकतो, ज्याचा अवाज बसतो, घसा कोर

डापडतो; आणि अवंढा गिळत नाहीं, त्याच्या त्या वातज रोगास-
स्वरघ्न ह्मणावें·

मांसतान·

प्रतानवान्यः श्वयथुः स्फ कण्ठेगलोपरोधंकुरुतेक्रमे
ण ॥ समांसतानेतिविभनिर्सिंज्ञांप्राणप्रणुत्सर्वकृ-
तोविकारः॥ ५५ ॥ ॥ ॥

अर्थ—जी सूज गळ्यामध्यें उत्पन्न होऊन क्रमानें पसरत पसरत
गळ्याचा अवरोध करिते, ती फार कष्ट देते· त्या त्रिदोषज विकारा
ला मांसतान ही संज्ञा दिली आहे, हा प्राण घातक आहे·

विदारी·

सदाहतोदंश्वयथुंसतीव्रमंतर्गलेपूतिविशीर्णमांसं
पित्तेनविद्याद्वदनेविदारींपार्श्वेविशेषात्सतुयेनशेते॥५६॥

अर्थ— पित्तानें गळ्यामध्यें सूज येते, तिणें करून दाह होतो, टोंच
णी लागते, व दुर्गंधि युक्त मांस सडून पडतें, आणि रोगी ज्या बाजू-
वर विशेषें करून निजतो त्या बाजू कडे हा रोग बहुधा होतो·

सर्वसर (मुखपाक, अगरु, तोंडयेणें,)

हा रोग ३ प्रकारचा आहे·

वातिक·

स्फोटैः सतोदैर्वदनंसमंताद्यस्याचितंसर्वसरः सवा
तात् ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ५७

अर्थ— वायूच्या योगानें तोंडांत चहूंकडे फोड येऊन चुणचुण तात्·

पैत्तिक·

रक्तैःसदाहैःपिडकैःसपीतैर्यस्याचितंचापिससर्पित्तकोपात्

अर्थ–पित्तानें तोंडांत तांबडे व पिंवळट फोड येतात व आग होते॰

### कफज॰

अवेदनैः कंडुयुतैःसवर्णैर्यस्याचितंचापिसवेकफेन॥५८॥

अर्थ–कफानें तोंडांत मंद वेदना, कंडुयुक्त, आणि त्वक्समान वर्ण असे चहूं कडे फोड येतात॰

### असाध्यमुखरोग॰

ओष्ठप्रकोपेवर्ज्याःस्युर्मांसरक्तप्रकोपजाः॥दंतमूलेषुव
र्ज्यौतुत्रिलिंगगतिसौषिरौ॥५९॥दंतेषुचनसिध्यंति-
श्यावदालनभंजनाः॥जिव्हानलेषलासश्चतालव्येप्यर्बुदं
तथा॥६०॥स्वरघ्रोवलयोवृंदोबलासश्चविदारिका,गलौ-
घोमांसतानश्चशतघ्नीरोहिणीगले॥६१॥असाध्याःकी
र्तितास्तेनरोगानवदशैवतु॥तेषुचापिक्रियांवैद्यःप्रत्या-
ख्यायसमाचरेत्॥६२॥ ॥इतिमुखरोगनिदानं॥ ॥७

अर्थ–ओष्ठरोगामध्यें मांसज, रक्तज, आणि त्रिदोषज; दंतमूलगतामध्यें संनिपात नाडी आणि सौषिर; दंतमूलामध्यें श्याव, दालन, आणि भंजन; जिव्हारोगामध्यें अलास, आणि ताल रोगामध्यें अर्बुद, आणि गलरोगामध्येंस्वरघ्र, वलय, वृंद, बलास, विदारिका, गलौघ, मांसतान, शतघ्नी, आणि रोहिणी; हे एकोणीस रोग असाध्य आहेत; त्यावरचिकित्सा करणें झाल्यास वैद्यानें प्रत्याख्यान (औषध नदिलें तर मृत्यु हा खचित आहे, दिल्यास कदाचित वांचेल असें सांगून) करून औषध द्यावें॰॥ ॥ इतिमुखरोगनिदानं॥ ॥ ॥७॥ ॥७॥

मुधकोशंस्कनिर्मथ्यसारमाकृष्यवैमया॥व्याख्याकृ
तामहाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥१॥ ॥ ॥

## कर्णरोगनिदान

### कर्णशूळ

समीरणःश्रोत्रगतोन्यथाचरन्समंततःशूलमतीवकर्ण-
योः॥ करोतिदोषैश्चयथास्वमावृतःसकर्णशूलःकथितो
दुरासदः॥ १॥ ॥ ॥

अर्थ– कानांतील वायू दोषांनी (कफपित्तरक्तानीं) आवृतहोऊन काना मध्यें उलटा फिरत असतां अत्यंत शूळउत्पन्न करितो; त्या रोगाला कर्ण शूळ ह्मणतात; हा कष्ट साध्य आहे·

### कर्णनाद·

कर्ण स्रोत स्थितेवातेश्रृणोतिविविधान्स्वरान्॥ भेरीमृ
दंगशंखानांकर्णनादःसउच्यते॥ २॥ ॥ ॥

अर्थ–वायू कर्ण विवरांत राहिला असतां नानाप्रकारचे स्वर; व नौबद, मृदंग, आणि शंख त्यांचे शब्द एकूं येतात; त्या रोगाला कर्णनाद ह्मणतात·

### बाधिर्य·

यदाशद्ववहंवायुःस्रोतआवृत्यतिष्ठति॥ शुद्धःश्लेष्मा
न्वितोवापिबाधिर्यतेनजायते॥ ३॥ ॥ ॥

अर्थ–जेव्हां केवळ वायु किंवा कफयुक्त वायु शद्ब वाहणाऱ्या स्रोतांत राहतो, तेव्हां त्याच्या योगानें कानानीं ऐकूं येत नाहीं·

### कर्णक्ष्वेड·

वायुःपित्तादिभिर्युक्तोवेणुघोषसमंस्वनं॥करोतिकर्णयोः
क्ष्वेडंकर्णक्ष्वेडःसउच्यते॥ ४॥ ॥ ॥

अर्थ–पित्तादि दोषानीं युक्त झालेला वायू कानांत वेणु वाद्या सारखा

शद्ब उत्पन्न करतो त्याला कर्ण क्ष्वेड ह्मणतात.

## कर्णस्राव.

शिरोभिघातादथवा निमज्जनाज्जलेप्रपाकादथवापिविद्रधेः
स्रवेद्धिपूयंश्रवणोनिलार्दितःसकर्णसंस्रावइतिप्रकीर्तितः॥५॥

अर्थ—डोक्याला कांहीं लागलें असतां अथवा पाण्यांत बुडी मारली असतां अथवा कानांत विद्रधि पिकला असतां वायुकुपित होऊन कानांतून पू गळतो. त्याला कर्णस्राव ह्मणतात.

कर्णकंडुः—मारुतःकफसंयुक्तःकर्णेकंडूंकरोतिच॥ ॥

अर्थ—कफानें युक्त झालेला वायु कानांत कंडू उत्पन्न करितो.

कर्णगूथकः—पित्तोष्मशोषितःश्लेष्माजायतेकर्णगूथकः॥

अर्थ—पित्ताच्या उष्णतेनें कफ सुकून जो कानांत मळ जमतो त्याला कर्णगूथक ह्मणावें.

## कर्णप्रतिनाह.

सकर्णगूथोद्रवतांयदागतोविलायितोघ्राणमुखंप्रपद्यते
तदासकर्णप्रतिनाहसंज्ञितोभवेद्विकारःशिरसोर्धभेदकृत्

अर्थ—तो कानांतला मळ पातळ झाला असतां, किंवा स्नेह स्वेदादिकानीं पातळ झाला असतां नाका तोंडांत येतो. तेव्हां त्याला कर्णप्रतिनाह ह्मणतात. त्या रोगानें अर्ध शिराचा विकार होतो.

## कृमिकर्ण

यदातुमूर्छंत्यथवापिजंतवःसृजंत्यपत्यान्यथवापिमक्षिकाः
तदंजनत्वाछ्रवणोनिरुच्यतेभिषग्भिराद्यैःकृमिकर्णकोगदः॥७॥

अर्थ—जेव्हां कानांत किडे पडतात, किंवा माशा अंडीं घालितात, तेव्हां कृमि लक्षणा करून त्या रोगाला कृमिकर्णक ह्मणतात.

## कानांतपतंगादिकीटकगे त्याचें लक्षण.

पतंगाःशतपदश्चकर्णस्रोतःप्रविश्यहि ॥ अरतिंव्याकुलत्वंच भृशंकुर्वंतिवेदनां ॥ ९ ॥ कर्णोनिस्तुद्यतेतस्यतथाफुरफुरायते ॥ कीटेचरतिरुक्तीव्रानिस्पंदेमंदवेदना ॥ १० ॥

अर्थ–पतंग, गोम, गोमाशा वगैरे कानांत गेल्या असतां चैन पडत नाहीं, जीव व्याकूळ होतो, आणि कानाला टणका लागतो, व कानांत टोंचल्या सारखें वाटतें, व फुरफुरतें; किडा फिरूं लागला ह्मणजे तीव्र वेदना होते, आणि तो स्तब्ध असला ह्मणजे वेदना कमी होते.

## कर्णविद्रधि.

क्षताभिघातप्रभवस्तुविद्रधिर्भवेत्तथादोषकृतोपरःपुनः सरक्तपीतारुणमस्रमास्रवेत्प्रतोदधूमायनदाहचोषवान् ॥ ११ ॥

अर्थ–काना मध्यें कोरल्यानें किंवा कांहीं लागल्यानें क्षत होऊन विद्रधि होतो, तसाच वातादि दोषांनीं दुसरा विद्रधि होतो, तो फुटल्यावर तांबुस, पिवळें रक्त वाहतें, टोंचणी लागते, धूर निघाल्या सारखें वाटतें, आग होते, आणि तुमडी लावल्या सारखें वाटतें.

## कर्णपाक.

कर्णपाकस्तुपित्तेनकोथविक्लेदकृद्भवेत् ॥ कर्णविद्रधिपाकाद्वाजायतेचांबुपूरणात् ॥ १२ ॥ ॥ ॥

अर्थ–पित्तानें, किंवा कर्णविद्रधि पिकल्यानें अथवा कानांत पाणी गेल्यानें कर्णपाक रोग होतो; त्यानें कान सडतो आणि चिघळतो.

पूतिकर्णः–पूयंस्रवतिवापूतिसज्ञेयःपूतिकर्णकः ॥ ॥

अर्थ–ज्या कानातून दुर्गंधि पू वाहतो त्याला पूतिकर्णक ह्मणावें.

## कर्णशोथ, कर्णार्बुद, कर्णार्श, त्यांचा हवाला देतो.

कर्णशोथार्बुदार्शांसिजानीयादुक्तलक्षणैः ॥१३॥ ॥

अर्थ–कानाला सूज, अर्बुद, आणि अर्श हे रोग होत असतां, त्यांचीं लक्षणें त्या त्या निदाना वरून जाणावीं.

## आतां चरकोक्त कर्णरोग चार आहेत ते सांगतो.

### वातज.

नादोतिरुक्कर्णमलस्यशोषःस्रावस्तनुश्चाश्रवणंचवातात् ॥

अर्थ–वायूच्या योगानें कानांत नाद होतो, ठणका लागतो, कानांतला मळ सुकून जातो, पातळ स्राव होतो, आणि ऐकूं येत नाहीं.

### पित्तज.

शोथःसरागोदरणंविदाहःसपीतपूतिस्रवणंचपित्तात् ॥१४॥

अर्थ–पित्ताच्या योगानें कान सुजून लाल होतो, चिरा पडतात, आग होते, आणि किंचित् पिंवळा दुर्गंध युक्त स्राव होतो.

### कफज.

वैश्रुत्यकंडूःस्थिरशोथशुक्लास्निग्धास्रुतिःश्लेष्मभवेतिरुक्‌ ॥

अर्थ–कफाच्या योगानें विरुद्ध ऐकणें, खाज, कठीण सूज, पांढरा व स्निग्ध असा स्राव, हे होतात.

### सन्निपातज.

सर्वाणिरूपाणिचसन्निपातात्स्रावश्चतत्राधिकदोषवर्णः ॥१५॥

अर्थ–सन्निपातानें सर्व लक्षणें होतात, व स्राव होतो तो जसा दोष अधीक असेल तसा व त्या वर्णाचा होतो.

## कर्णपालीचे रोग·

### कर्णशोथ·

सौकुमार्याच्चिरोत्सृष्टे सहसातिप्रवर्धिते ॥ कर्णे शोथो
भवेत्पाल्यां सरुजः परिपोटवान् ॥ ॥ ॥ ॥

अर्थ–सुकुमार पणानें उशिरानें वाढवायाचा कान एका एकीं वाढविला–असतां कानाच्या पाळीला सूज येऊन फुगा येतो, तो दुखतो·

परिपोटकः–कृष्णारुणनिभः स्तब्धः स वातात्परिपोटकः ॥ १६ ॥
अर्थ–वायूच्या योगानें काळा, तांबूस, वकठीण असा फुगा येतो, त्याला परिपोटक ह्मणतात·

### उत्पात·

गुर्वाभरणसंयोगात्ताडनाद्घर्षणादपि ॥ शोथः पाल्यां भ
वेच्छ्यावो दाहपाकरुजान्वितः ॥ १७ ॥ रक्तो वा रक्तपित्ता–
भ्यामुत्पातः स गदो मतः ॥ ॥ ॥ ॥

अर्थ– जड अलंकार घातल्याच्या योगानें, मारल्यानें, किंवा घासटल्यानें रक्त पित्त कुपित होऊन कानाच्या पाळीला हिरवी, निळी, किंवा तांबडी सूज येते, आग होते, ठणका लागतो, वती पुवाळते, त्या रोगाला उत्पात ह्मणतात·

### उन्मंथक·

कर्णं बलाद्वर्धयतः पाल्यां वायुः प्रकुप्यति ॥ १८ ॥ स क
फं गृहीत्वा कुरुते शोफं स्तब्धमवेदनं ॥ उन्मंथकः सकंडूको
विकारः कफवातजः ॥ १९ ॥ ॥ ॥

अर्थ– कान बळात्कारानें वाढवला असतां पाळी मध्यें वायू कुपित होऊन कफाला घेऊन कठीण व मंदवेदन सूज करितो· तिला खाज

स्फटने, त्या कफवातजन्य विकाराला उन्मंथक ह्मणतात.

दुःखवर्धन.

संवर्ध्यमानेदुर्विद्धेकंडूदाहरुजान्वितः ॥ शोफोभवति-
पाकश्चत्रिदोषोदुःखवर्द्धनः ॥२०॥ ॥ ॥

अर्थ- वाईटरितीनें टोंचलेला कान नसाच वाढविला तर कंडु, दाह, ठणका त्यांनीं युक्त असा शोथ येतो, तोपिकतो,त्यालादुःखवर्धनम्हणतात-

परिलेही.

कफास्रृक्कृमिसंभूतःसविसर्पन्नितस्ततः ॥ लिहेच्चशष्कु-
लींपालींपरिलेहीत्यसौस्मृतः ॥ २१ ॥इतिकर्णरोगनिदानं ॥

अर्थ- कफरक्त कृमी पासूनउत्पन्न झालेला व इकडे तिकडे फिरणारा असा जो शोथ कानाच्या पाळीला होतो तो तिला खातो, ह्मणजे तिजवरचें मांस झडतें. ॥ ॥इतिकर्णरोगनिदानं॥ ७ ७ ७

मधकोशं०

---

## नासारोगनिदानं.

### पीनस.

आनह्यतेयस्यविशुष्यतेचप्रक्लिद्यतेधूप्यतिचैवनासा॥
नवेत्तियोगंधरसांश्चजंतुर्जुष्टंव्यवस्येत्तंतुपीनसेन॥१॥
तंचानिलश्लेष्मभवंविकारंब्रूयात्प्रतिश्यायसमानलिंगं॥

अर्थ- ज्याचें नाक चोंदतें, कोरडेंपडतें, ओलसर होतें, धूरनिघाल्या साररवें होतें, व ज्याला गंध व रस समजत नाहींत, त्याला पडसें झालें ह्मणून समजावें, त्या वात जन्य विकाराला प्रतिश्याय (पडसें) ह्मणतात.

### पूतिनस्य.

दोषैर्विदग्धैर्गलतालुमूलेसंमूर्छितोयस्यसमीरणस्तु

निरेतिपूतिर्मुखनासिकाभ्यांतंपूतिनस्यंप्रवदंतिरोगं॥२

अर्थ-गळा आणि टाळा यामध्यें दुष्ट झालेल्या पित्त रक्तादि दोषानीं वायू मिश्र होऊन नाका तोंडावाटे दुर्गंध युक्त वहातो; त्या रोगाला पूतिनास ह्मणतात·

## नासापाक·

घ्राणाश्रितंपित्तमरूंषिकुर्याद्यस्मिन्विकारेबलवांश्चपाकः॥तंनासिकापाकमितिव्यवस्येद्विक्लेदकोथावथवापियत्र॥३॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ- पित्तनाकांत राहिल्यानें व्रण पडतो, आणि नाक आंतून पिकतें; त्याला नासिका पाक ह्मणतात; त्यामध्येंनासकीं लस वाहते·

## पूयरक्त·

दोषैर्विदग्धैरथवापिजंतोर्ललाटदेशेभिहतस्यतैस्तैः॥
नासास्रवेत्पूयमसृग्विमिश्रंतंपूयरक्तंप्रवदंतिरोगं॥४॥

अर्थ-दोष दुष्ट झाल्यानें अथवा कपाळावर अभिघात झाल्यानें नाकांतून पू आणि रक्त वाहातें, त्या रोगाला पूयरक्त ह्मणतात·

## क्षवथु·

घ्राणाश्रितेमर्मणिसंप्रदुष्टोयस्यानिलोनासिकयानिरेति
कफानुयातोबहुशोतिशब्दंतंरोगमाहुःक्षवथुंविधिज्ञाः॥५

अर्थ-घ्राणाश्रित मर्माचे (शृंगाटकमर्माचे) ठाईं वायू दुष्ट होऊन कफासहित मोठा शब्द करीत नाकांतून बाहेर येतो, त्याला क्षवथु (शिंक) ह्मणतात·

## आगंतुजक्षवथु·

तीक्ष्णोपयोगादतिजिघ्रतोवाभावान्कटूनर्कनिरीक्षणाद्वा

सूर्यादिभिर्वा तरुणास्थिमर्मण्युद्घाटिते न्यःक्षवथुर्निरेति ॥६

अर्थ- तीक्ष्ण किंवा निरवट पदार्थ ओढल्यानें, किंवा सूर्याकडे पाहिल्यानें, किंवा नाकांत काकडा घालून तरुणास्थि मर्म (फणामर्म) चलित झालें असतां आगंतुज क्षवथु येतो. आगंतुज आणि दोषज क्षवथु एकच गणावा.

## भ्रंशथु.

प्रभ्रश्यते नासिकयाहि यस्य सांद्रो विदग्धो लवणः कफश्च॥

प्राक्संचितो मूर्धनि सूर्यतप्तेनं भ्रंशथुं व्याधिमुदाहरंति ॥७॥

अर्थ- उन्हानें डोकें तापलें असतां पूर्वी सांचलेला, दाट, नासलेला, खारट, असा कफ नाकांतून पडतो. त्या व्याधीला भ्रंशथु ह्मणतात.

## दीप्त.

घ्राणे भृशं दाहसमन्विते तु विनिश्चरेद्धूम इवेह वायुः॥ नासा प्रदीप्तेव च यस्य जंतोर्व्याधिं तु तं दीप्तमुदाहरंति ॥८॥ ॥

अर्थ- नाक अत्यंत दाहयुक्त झालें असतां त्या मध्यें वायू धुराप्रमाणें संचार करितो, आणि नाक प्रदीप्त झाल्या प्रमाणें होतें. त्या व्याधीला दीप्त ह्मण०

## प्रतीनाह.

उच्छ्वासमार्गं तु कफः सवातो रुंध्यात्प्रतीनाहमुदाहरेत्तं ॥ ॥

अर्थ- वायु सहित कफ उच्छ्वा मार्गाला कोंडतो, तेणेंकरून नाक सूर चांगले वहात नाहींत, त्याला प्रतीनाह ह्मणावें.

## नासास्राव.

घ्राणाद्घनः पीतसितस्तनुर्वा दोषः स्रवेत्स्रावमुदाहरेत्तम्॥९

अर्थ- नाकांतून दाट, पिंवळा, किंवा पांढरा, पातळ दोष (कफ) स्रवतो, तो स्राव ह्मणावा.

नासापरिशोषसां·

घ्राणाश्रितेस्त्रोतसिमारुतेनगाढंप्रतप्तेपरिशोषितेच॥
कृच्छ्राच्छ्वसेदूर्ध्वमधश्चजंतुर्यस्मिन्सनासापरिशोषउक्तः

अर्थ– वायूनें नासिका द्वार अत्यंत तापवून शुष्क केलें असतां मनुष्य मोठ्या कष्टानें खालीं वर श्वास टाकतो· त्या रोगाला नासापरि शोष म्ह०

चिकित्साभेदार्थपीनसाचेंआमपक्व लक्षणसांगतो·

शिरोगुरुत्वमरुचिर्नासास्त्रावस्तनुःस्वरः॥क्षामःष्ठीव
त्यसौभीक्ष्णमामपीनसलक्षणम्॥११॥ ॥ ॥

अर्थ– मस्तकाला जडत्व, अरुचि, नाकांतून पातळ पाणी गळणें, स्वर अस्पष्ट होणें, आणि वारंवार नाकांतू शेंबूड गळणें, हें अपक्व पीनसाचें लक्षणें होय·

पक्वलक्षण·

आमलिंगान्वितःश्लेष्माघनःखेषुनिमज्जति॥स्वरव-
र्णविशुद्धिश्चपरिपक्वस्यलक्षणम्॥१२॥ ॥

अर्थ– वरसांगितलेल्या अपक्व लक्षणांनीं युक्त असा कफदाट होऊन नासादि स्त्रोतसांत राहतो, स्वर, वर्ण हे स्पष्ट उमटतात; हें पीनसाचें पक्व लक्षण जाणावें·

प्रतिश्यायरोग हा वात, पित्त, कफ, सन्निपात, आणि
रक्त ह्याभेदानीं पांचप्रकारचा आहे;
त्याची संप्राप्ति सांगतो·

संधारणाजीर्णरजोतिभाष्यक्रोधर्तुवैषम्यशिरोभि
तापैः॥प्रजागरस्वप्नवांबुशीतावश्यायकैमैथुनबाष्प

सेकैः ॥१३॥ संस्त्यानदोषेशिरसिप्रवृद्धोवायुःप्रति-
श्यायमुदीरयेत्तु ॥ ॥ ॥ ॥

अर्थ- मल मूत्रादि वेगांचे धारणानें, अजीर्णानें, धूळनाकांत गेल्यानें, पुष्कळ बोलल्यानें, रागानें, ऋतु पालटल्यानें, डोकें तापल्यानें, जागरणानें, दिवसा निजण्यानें, नव्यापाण्यानें, थंडानें, दवानें, मैथुनानें, फार असवें दाळल्यानें मूळचा कफ मस्तकांतघट्ट झालेला असतां वायु कुपित होऊन प्रतिश्याय रोग (पडसें) उत्पन्न करितो. हीं कारणें सद्योजनक (ह्मo तत्काळ पडसें आणणारीं होय.

## चयादिक्रमानेंत्याचेंदुसरेंनिदान.

चयंगतामूर्धनिमारुतादयःपृथक्समस्ताश्चतथैवशोणि
ते॥ प्रकुप्यमानाविविधैःप्रकोपनैस्ततःप्रतिश्यायकरा-
भवंति ॥१४॥ ॥ ॥ ॥

अर्थ- मस्तका मध्यें पृथग्वातादि दोष वसर्व दोष, तसेंच रक्त हीं सांचून नानाप्रकारच्या कारणानीं (बलवद्विग्रहादिदिवास्वप्नादि) कुपित होऊन प्रतिश्याय उत्पन्न करितात.

## पूर्वरूप.

क्षवप्रवृत्तिःशिरसोतिपूर्णतास्तंभोंगमर्दःपरिहृष्ट-
रोमता॥ उपद्रवाश्चाप्यपरेपृथग्विधान्नृणांप्रतिश्या
यपुरःस्सराःस्मृताः ॥१५॥ ॥ ॥ ॥

अर्थ- शिंकायेणें, मस्तकभरल्या सारखें वाटणें, अंग ताठणें, अंग मोडून येणें, अंगाला शहारे येणें, व दुसरे नाना प्रकारचे तत्काळीं होणारे रोग (घ्राणधूमायनादिक) पडसें येणार असलें ह्मणजे मनुष्यांना हे विकार होतात.

वातिकप्रतिश्याय.

आनद्धापिहिताना सातनुस्त्रावप्रसेकिनी ॥ गलता-
ल्वोष्ठशोषश्च निस्तोदः शंखयोरपि ॥ १६ ॥ भवेत्स्वरो
पघातश्च प्रतिश्याये निलात्मजे ॥ ॥ ॥ ॥

अर्थ–वातज प्रतिश्यायामध्यें नाक जरवडतें, चोंदतें, आणि त्यांतून पातळ पाणी गळतें; घसा, टाळा, आणि ओष्ठ हे कोरडे पडतात; आणि आंख वणकतात; आणि घसा बसतो.

पैत्तिकम्.

उष्णः सपीतकः स्त्रावो घ्राणात्स्रवति पैत्तिके ॥ १७ ॥
कृशोऽतिपांडुः संतप्तो भवेदुष्णाभिपीडितः ॥ सधूम
मग्निं सहसा वमतीव च नासया ॥ १८ ॥ ॥ ॥

अर्थ–पित्तप्रतिश्याया मध्यें नाकांतून करत पिंवळा स्त्राव होतो; त्या योगानें मनुष्य वाळतो, फिकट दिसतो, त्याला उष्ण सोसत नाहीं; नाकांतून धुरासकट अग्नि निघत आहे असें त्याला वाटतें.

श्लेष्मिकम्.

घ्राणात्कफः कफकृते श्वेतः शीतः स्त्रवेद्बहु ॥ शुक्लाव
भासः शूनाक्षो भवेद्गुरुशिरा नरः ॥ १९ ॥ कंठताल्वो-
ष्ठशिरसां कंडूभिरभिपीडितः ॥ ॥ ॥ ॥

अर्थ–कफप्रतिश्यायानें नाकांतून (पांढरा, थंड, व पुष्कळ) कफ पडतो त्या योगानें मनुष्य पांढराफिक्कट दिसतो, डोळ्यांना टापशी येते, डोकें जड होतें, गळा, टाळेहीं, खवखवतात, ओंठ आणि डोकें त्यांना खाज सुटते.

सन्निपातिक·

भूत्वाभूत्वाप्रतिश्यायोयस्याकस्मान्निवर्तते ॥ संपक्वो
वाप्यपक्वोवासतुसर्वभवःस्मृतः ॥२०॥ ॥ ॥

अर्थ– ज्या मनुष्याचें पडसें येऊन येऊन पिकून किंवा पिकल्या वाचून– अकस्मात जातें तें त्रिदोषज होय·

दुष्टप्रतिश्यायल·

प्रक्लिद्यतेपुनर्नासापुनश्चपरिशुष्यति ॥ पुनरानह्यतेचापिपुनर्विव्रीयतेतथा ॥२१॥ निश्वासोवातिदुर्गंधोनरोगंधंनवेत्तिच ॥ एवंदुष्टप्रतिश्यायंजानीयात्कृच्छ्रसाधनं॥२२

अर्थ– नाक वारंवार ओलसर होतें, पुनः कोरडें पडतें, पुनः कोंडतें, पुनः– मोकळें होतें, घाणेरडा उसासा निघतो. त्या रोग्याला वास कळत नाहीं· अशीं लक्षणें झालीं ह्मणजे तो दुष्टप्रतिश्याय ह्मणावा· हा कष्टानें साध्य होतो· हा प्रतिश्याय पांचाचाच अवस्थाभेद आहे ह्मणून साहवा गणूं नये.

रक्तप्रतिश्याय·

रक्तजेतुप्रतिश्यायेरक्तस्रावःप्रवर्तते ॥ ताम्राक्षश्च
भवेज्जंतुरुरोघातप्रपीडितः॥२३॥ दुर्गंधोच्छ्वासवदनो
गंधानपिनवेत्तिसः ॥२३॥ ॥ ॥ ॥

अर्थ– रक्त जन्य प्रतिश्याया मध्यें नाकांतून रक्त गळतें, डोळे तांबडे होतात, उरःक्षताच्या पीडे सारखी पीडा होते, उच्छ्वासाला व तोंडाला घाण– येते· वास कळत नाहीं·

असाध्यलक्षण सां·

सर्वएवप्रतिश्यायानरस्याप्रतिकारिणः ॥ दुष्टतांयांतिकालेनतदासाध्याभवंतिच ॥२४॥ मूर्छंतिकृमय

श्चात्रश्वेताःस्निग्धास्तथाणवः॥ कृमिजोयःशि रोरोगस्तुल्यंतेनास्यलक्षणम्॥२५॥ ॥ ॥

अर्थ– सर्वच प्रतिश्याय औषध उपाय न केले असतां कालें करून दुष्ट झाले म्हणजे असाध्य होतात. त्या मध्यें नाकांत किडे पडतात, ते पांदरे, स्निग्ध, व बारीक असतात. कृमिज शिरोरोगांच्या लक्षणासारखीं त्यांत लक्षणें होतात.

त्यापेक्षांअधिकप्रतिश्यायवादलेअ सतांजेविकारहोताततेसांगतो.

बाधिर्यमांध्यमघ्रत्वंघोरांश्चनयनामयान्॥ शो थाग्निसादकासादीन्वृद्धाःकुर्वंतिपीनसाः॥२६॥

अर्थ–पीनस वाढले असतां ऐकूं येतनाहीं, दृष्टी मंद होते, वास कळत नाहीं, भयंकर नेत्र रोग होतात. सूज, अग्नि मांद्य, खोकला इत्यादि विकार होतात.

शेषसंख्यापूरणार्थंदुसरेहीना सा रोग सांगतो.

अर्बुदंसप्तधाशोथाश्चत्वारोर्शश्चतुर्विधम्॥ च तुर्विधंरक्तपित्तमुक्तंघ्राणेपिनद्विदुः॥२७॥ ॥

इतिनासारोगनिदानं॥ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ–सात प्रकारचें अर्बुद, चार प्रकारचे शोथ चार प्रकारचे अर्श, आणि चार प्रकारचें रक्तपित, हीं जीं मागें सांगितलीं आहेत तीं नाकांत होतात, ह्मणून समजावें.॥ ॥इतिनासारोगनिदानम्॥ ॥

मधुकोशांक्तनिर्मथ्यसारमाकृष्यवैमया॥ व्याख्याकृता महाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥१॥ ॥ ॥

## कारण.

उष्णाभितप्तस्यजलप्रवेशाद्दूरेक्षणात्स्वप्नविपर्यया
च्च॥स्वेदाद्रजोधूमनिषेवणाच्चछर्देर्विघाताद्वमनाति
योगात्॥१॥द्रवान्नपानातिनिषेवणाच्चविण्मूत्रवात
क्रमनिग्रहाच्च॥प्रसक्तसंरोदनशोककोपाच्छिरोभि
घातादतिमद्यपानात्॥२॥तथाऋतूनांचविपर्ययेण
क्लेशाभिघातादतिमैथुनाच्च॥बाष्पग्रहात्सूक्ष्मनि-
रीक्षणाच्चनेत्रेविकारान्जनयंतिदोषाः॥३॥ ॥

अर्थ-उन्हानें अंग तापल्यावर थंड पाण्यांत शिरल्यानें (असें करण्या नें थंडीनें शरीर व्याप्त होऊन शरीरांतला उष्मा वर चढून नेत्राच्या ते जाचा पराभव केल्यानें नेत्र रोग होतो.) दुरवर पाहिल्यानें; स्वप्नविपर्ययानें (ह्मणजे दिवसास निजणें आणि रात्रीस जागणें), डोळ्याला वाफ लागली असतां; किंवा घाम येऊन तो तसाच डोळ्यांत जिरला असतां; किंवा धूळ गेली असतां; किंवा धूर लागला असतां; वांतीचा वेगरोध केला असतां; किंवा तिचा अतियोग झाला असतां; पातळ अन्न पानाचें सेवन केलें असतां; विष्टा, मूत्र, आणि अपान वायु त्यांच्या वेगाचा हळू हळू निग्रह (ह्मणजे वेग धारण) केला असतां; निरंतर रडण्यानें, शोकानें, कोपानें, मस्तकावर अभिघात झाल्यानें; अति मद्यपान केल्यानें; तसेंच ऋतूंचा विपर्यय (ह्मणजे शीतकाळीं उष्ण आणि उष्णकाळीं शीत) झाल्यानें; क्लेश ह्मणजे कामादि दुःख, त्यानें अभिघात ह्मणजे पीडा झाल्यानें; अथवा क्लेश ह्मणजे मनाला खेद तेणें करून अभिघात ह्मणजे दुःख झाल्यानें; आणि मैथुन केल्यानें; अश्रूचें वेग धारण केल्यानें, आणि सूक्ष्म पदार्थांच्या अवलोकनानें;

वातादि दोष नेत्रामध्यें रोग उत्पन्न करितात॰ सुश्रुतामध्यें नेत्र रोगांची संप्राप्ति लिहिली आहे, ती अशी; — "शिरानुसारिभिर्दोषैर्विगुणैरूर्ध्वमाश्रितैः॥ जायंतेनेत्रभागेषुरोगाःपरमदारुणाः॥" अर्थः — कुपित झालेले वातादि दोष डोळ्याच्या शिरांत शिरून डोळ्याचा भाग व्याप्त केला ह्मणजे त्याना भयंकर रोग होतात; हे नेत्र रोग वात, पित्त, कफ, रक्त, सन्निपात, आणि आगंतु त्या पासून होणारे असे ७६, शाहात्तर आहेत॰

## नेत्ररोगाला प्रायः अभिष्यंद (डोळे येणें) कारण आहेत म्हणून पहिल्यानें ते सांगतो॰

वातात्पित्तात्कफाद्रक्तादभिष्यंदश्चतुर्विधः॥ प्रायेणजायतेघोरः सर्वनेत्रामयाकरः॥४॥ ॥

अर्थ– वायु, पित्त, कफ, आणिरक्त त्यां पासून चार प्रकारचा अभिष्यंद होतो॰ त्याच्या वेदना सोसवत नाहींत; व हा सर्व नेत्ररोगाचें (अधिमंथादिक) उत्पत्ति स्थान होय॰

## वाताभिष्यंदल॰

निस्तोदनस्तंभनरोमहर्षसंघर्षपारुष्यशिरोभितापाः॥ विशुष्कभावःशिशिराश्रुताचवाताभिपन्नेनयनेभवंति॥५॥ ॥ ॥ ॥

अर्थ—वायूच्या योगानें डोळे आले असतां सुया टोंचल्या प्रमाणें पीडा होते, डोळे जड होतात, अंगाला शाहारे येतात, डोळ्यांतुन ख्डीफिरते; ते रूक्ष होतात; डोकें दुखतें॰ डोळ्यांतून स्राव होतो, पण ते हगत नाहींत व जें अश्रु वाहतें तें थंड असतें॰

पित्ताभिष्यंदल.

दाहप्रपाकौशिशिराभिनंदा धूमायनं बाष्पसमुच्छ्रयश्च॥
उष्णाश्रुतापीतकनेत्रताचपित्ताभिपन्नेनयनेभवंति॥६॥

अर्थ- पित्तानें डोळे आले असतां, त्यांची फार आग होते, त्या भोंवताली- पिकलेले फोड येतात, त्यांना थंड पदार्थ लावावा अशी इच्छा होते, आंतून धूर निघाल्या प्रमाणें व्यथा होते; डोळ्यानां एक सारखी गळ लागते, कढत पाणी निघतें, आणि पिंवळटी असते.

कफजाभिष्यंद ल.

उष्णाभिनंदागुरुताक्षिशोथःकंडूपदेहावतिशीतता
च॥ स्त्रावोबहुःपिच्छिलएवचापिकफाभिपन्नेनयने-
भवंति॥७॥ ॥ ॥ ॥

अर्थ- कफाच्या योगानें डोळे आले असतां त्याना उष्ण पदार्थ लावावा अशी वांछा होते (ह्मणजे डोळे शेकावे से वाटतात.), त्यानां जडत्व असतें, सूज येते, कंड सुटते; ते पिचपिचीत व थंड होतात; त्यांतून चिकट पाणी पुष्कळ स्रवतें.

रक्तजाभिष्यंदल.

ताम्राश्रुतालोहितनेत्रताचराज्यःसमंतादतिलोहिताश्च
पित्तस्यलिंगानिचयानितानिरक्ताभिपन्नेनयनेभवंति.

अर्थ- रक्ताभिष्यंदानें डोळ्यांतून तांबूस अश्रू येतात, ते लाल होतात, त्या च्या भोंवताली तांबड्या रेषा उमटतात, आणि पित्ताभिष्यंदाचीं जीं लक्षणें सांगितलीं आहेत तीं सर्व होतात.

अभिष्यंदापासून अधिमंथा

ची उत्पत्ति होते ह्मणून सां०

वृद्धैरेतैरभिष्यंदैर्नराणामक्रियावतां ॥ तावंतस्त्वधिमंथाः स्युर्नयने तीव्रवेदनाः ॥९॥ ॥ ॥

अर्थ- त्या अभिष्यंदावर कांहीं औषधोपचार न केला असतां ते वाढून त्यां पासून तितकेच (चार) अधिमंथ रोग डोळ्या मध्यें होतात, त्यानीं डोळ्याला तीव्र वेदना होते. हें अधि मंथाचे सामान्य लक्षण होय.

दुसरें सामान्य लक्षण सां०

उत्पाट्यत इवात्यर्थं नेत्रं निर्मथ्यते तथा ॥ शिरसोर्द्धं च तं विद्यादधिमंथं स्वलक्षणैः ॥१०॥ ॥ ॥

अर्थ- अर्धे डोकें वर फोडून काढल्या प्रमाणें वेदना होतात, आणि डोळ्यांला रवीनें घुसळल्या प्रमाणें अत्यंत वेदना होते. व्याधिप्रभावानें अर्धी मस्तकाला वेदना होते, त्या रोगाला अधिमंथ ह्मणावें, त्याचीं लक्षणें वात आद्यभिष्यंदा प्रमाणें जाणावीं.

दोषभेदानें कालमर्यादा सां०

हन्याद्दृष्टिं श्लैष्मिकः सप्तरात्राद्योधीमंथो रक्तजः पंचरात्रात् ॥ षड्रात्राद्वा वातिको वै निहन्यान्मिथ्याचारात्पैत्तिकः सद्यएव ॥ ११॥ ॥ ॥ ॥

अर्थ- श्लैष्मिक अधिमंथ सात दिवसांनीं दृष्टीचा नाश करितो; रक्तज अधि मंथ पांचां दिव सांनीं; वातिक अधिमंथ साहा दिवसांनीं, आणि पैत्तिक अधिमंथ मिथ्योप चारानें तत्काळ (तीन दिवसांनीं) दृष्टीचा नाश करितो. (ह्मणजे डोळे जातात.) येथें जो काला वधि सांगितला तो व्याधि स्वभावानें, व लंघन प्रलेपादि क्रिया करण्या साठीं, व अं

जन निषेधा सार्थी सांगीतला आहे.

## नेत्ररोगांचेंसामल.

उदीर्णवेदनंनेत्रंरागोद्रेकसमन्वितं ॥ घर्षनिस्तोद
शूलाश्रु युक्तमामान्वितंविदुः ॥ १२ ॥ ॥ ॥

अर्थ– ज्या नेत्राला वेदना फार होतात, लाली फार असून ते गदूळतात, त्यांतअह्ली फिरते, (वाळू घातल्या प्रमाणें खुप लागते;) सुईने टोंचल्या सारखें वाटतें, ठणका लागतो, आणि गळ लागते, तें नेत्र आम युक्त आहे असें समजावें. अंजना दिकांच्या निषेधा सार्थी व लघु-अन्न देण्या सार्गी हें लक्षण सांगीतलें.

## निरामलक्षण.

मंदवेदनताकंडूःसंरंभाश्रुप्रशांतता ॥ प्रसन्नवर्णता
चाक्ष्णोःसंपक्वंदोषमादिशेत् ॥ १३ ॥ ॥ ॥

अर्थ– डोळ्यांचा ठणका कमी झाला, कंड सुटू लागली, सूज वसरली, गळ बंद झाली, आणि डोळे निवळले म्हणजे दोष पक्व झाला म्हणूनजा॰

## शोथसहितअक्षिपाकाचेंल.

कंडूपदेहाश्रुयुतःपक्वोदुंबरसन्निभः ॥ संरंभीप-
च्यतेयस्तुनेत्रपाकसशोफजः ॥ १४ ॥ शोथहीनानि
लिंगानिनेत्रपाकेत्त्वशोथजे ॥ ॥ ॥ ॥

अर्थ–डोळ्याला सूज येऊन तो पिकतो, तिच्या सुळें कंडू, पिचपिचितपणा गळ लागणें, हीं होतात. शोथा वांचून जो नेत्र पाक होतो त्या मध्यें शोथा वांचून बाकीचीं लक्षणें होतात. हा व्याधि त्रिदोषजन्यजाणावा.

## हताधिमंथाचेंलक्षण.

उपेक्षणादक्षियदाधिमंथोवातात्मकःसादयतिप्र

सत्य ॥ रुजाभिरुग्राभिरसाध्यएषहताधिमंथःरव-
लुनेत्ररोगः ॥१५॥ ॥ ॥ ॥

अर्थ- वातज अधिमंथाची उपेक्षा केली असतां तो नेत्राला शोषून टा-
कितो, त्यानें तो दृष्टादि महत्पीडा होतात; हा **हताधिमंथ** नामक
नेत्र रोग असाध्यच आहे·

## वातपर्ययल·

वारंवारंचपर्येतिभ्रुवौनेत्रेचमारुतः॥रुजश्चविवि
धास्तीव्राःसज्ञेयोवातपर्ययः॥१६॥ ॥ ॥

अर्थ—वायुक्रमानें केव्हां केव्हां भृकुटींत येतो, केव्हां केव्हां नेत्रांत येतो; आणि नाना प्रकारच्या तीव्र पीडा करितो·त्या रोगाला वात पर्यय म्हणावें·

## शुष्काक्षिपाकल·

यत्कूणितंदारुणरूक्षवर्त्मसंदत्यतेचाविलदर्शनंच॥
सुदारुणंयत्प्रतिबोधनेचशुष्काक्षिपाकोपहतंतदक्षि॥१७

अर्थ- जें नेत्रउघडत नाहीं, ज्याची पापणी कठीण व रूक्ष होते, ज्याला आग फार होते, जें गढूळ दिसतें, व जें उघडण्यास कठीण पडतें, तें नेत्र-
शुष्काक्षिपाक नामक रोगानें पीडीत झालें ह्मणून समजावें - हा रोग-
रक्त सहीत वायूनें होतो ह्मणून **करालानें** सांगीतलें आहे·

## अन्यतोवातलक्ष·

यस्यावटूकर्णशिरोहनुस्थोमन्यागतोवाप्यनिलोन्य-
तोवा॥कुर्याद्रुजंवैभ्रुविलोचनेचतमन्यतोवातमुदा
हरंति॥१८॥ ॥ ॥ ॥

अर्थ- घाटी, कान, मस्तक, हनुवटी, मानेच्यामागल्या शिरा, या म
ध्यें किंवा इतर ठिकाणीं राहून वायू भ्रुकुटी मध्यें किंवा डोळ्या

सास्त्रावमम्लाध्युषितमम्लतः॥ १९॥ ॥ ॥

अर्थ–मध्यें किंचित् नीलवर्ण आणि आसपास लाल झालेलें असें सर्व नेत्र पिकतें म्हणजे त्यावर पिवळें फोड येतात, त्याला किंचित् दाह होऊन सूज येते, व पाण्याची गळ लागते; हा रोग अम्ल भोजनादि कारणा पासून होतो म्हणून त्याला अम्लाध्युषित म्हणतात.

शिरोत्पातल-

अवेदनावापिसवेदनावायस्याक्षिराज्योहिभवंतिताम्राः
मुहुर्विरज्यंतिचयाःसताहग्व्याधिःशिरोत्पातइतिप्रदिष्टः २०

अर्थ–ज्याच्या नेत्रांतल्या शिरा वेदना रहित किंवा वेदना सहीत असून तांबड्या होतात; आणि त्या वारंवार अधिकाधिक लाल होतात, त्याच्या त्या रोगाला शिरोत्पात असें म्हणतात. हा व्याधि रक्तजन्य होय.

शिराहर्षल-

मोहाच्छिरोत्पातउपेक्षितस्तुजायेतरोगस्तुशिराप्रहर्षः
ताम्राश्रुमच्छंस्रवतिप्रगाढंतथानशक्नोत्यभिवीक्षितुंच २१

अर्थ–अज्ञानानें शिरोत्पाताची उपेक्षा केली असतां शिराप्रहर्ष-रोग होतो; त्यामुळें डोळ्यांतून तांबडें स्वच्छ अश्रू गळतें, व रोग्याच्यानें डोळा उघडून पाहवत नाहीं. ॥ ॥ इति सर्वगताः ॥ ॥ ॥

आतांनेत्रामध्येंकाळ्याबुबुळावरजेरोगहोतातनेसांः

सव्रणशुक्रल-

निमग्नरूपंतुभवेद्धिकृष्णेसूच्येवविद्धंप्रतिभातियद्वै

स्त्रावंस्त्रवेदुष्णमतीवयच्चतत्सव्रणंशुक्रमुदाहरंति ॥२२

अर्थ—नेत्राच्या काळ्या भागावर फूल पडतें, वतें आंत बुडाल्या सारखें व मध्यें फ़ईनें भोंक पाडल्या सारखें दिसतें; व नेत्रांतून अति उष्ण व पुष्कळ स्त्राव होतो; त्या रोगाला **सव्रणशुक्र** म्हणतात· त्या मध्यें पीडा आंत होत असते असें जाणावें· क्षतांत पीडा होणें हें शुक्र च आहे, आणि डोळ्या सारखा सुकुमार ठिकाणीं तर विशेष पीडा होते असें भोजादिकांचें म्हणणें आहे·

## हें असाध्य असतां ही अवस्था भेदानें कदाचित् साध्यहोतेंतेंसांगतो·

दृष्टेःसमीपेनभवेत्तुयत्तुनचावगाढंनचसंस्त्रवेद्धि। अवेदनंवानचयुग्मशुक्रंतत्सिद्धिमायातिकदाचिदेव ॥२३॥

अर्थ—जें शुक्र (फूल) दृष्टीच्या जवळ होत नाहीं, खोल गेलेलें नसून फार स्त्रवत नाहीं, ज्याला ठणका नसतो, जें एका शेजारीं एक असें जुळें झालेलें नसतें, तसलें शुक्र कदाचित् साध्य होतें·

## अव्रणशुक्रल·

स्यंदात्मकंकृष्णगतंसचोषंशंखेंदुकुंदप्रतिमावभासं वैहायसाभ्रप्रतनुप्रकाशमथाव्रणंसाध्यतमंवदंति ॥२४॥

अर्थ—अभिष्यंदा पासून उत्पन्न होऊन डोळयाच्या काळ्या भागावर आलेलें, चोष (म्ह· शिंग किंवा तुमडीची पीडा) फक्त, शंख, चंद्र, कुंदाचें पुष्प त्या सारखें पांढरें, आकाशांतील ढगा प्रमाणें पातळ, असें जें व्रण रहित शुक्र असतें; तें सुखसाध्य म्हणून सांगतात·

गंभीरजातबहलंचशुक्रंचिरोत्थितंवापिवदंतिकृच्छ्रम्॥

अर्थ—जें शुक्र खोलगेलेलें, व जाड झालेलें, आणि फार दिवसांचें तें कृच्छ्र साध्य होतें.

## तेंच अवस्था भेदानें असाध्य होतें तें सांगतो.

विच्छिन्नमध्यंपिशितावृतंवाचलंशिरासूक्ष्ममदृष्टिकृच्च ॥२५॥ द्वित्वग्गतंलोहितमंततश्चचिरोत्थितंचापिविवर्जनीयम् ॥ ॥ ॥ ॥

अर्थ— जें शुक्र मधलें मांस झडल्या मुळें सच्छिद्र ह्मणजे मध्यें खळगा पडलेलें किंवा, त्याच्याउलट पिशिता वृत म्ह॰ भोंवताली मांस वाढलेलें, चंचल (म्ह. एकाठिकाणीं नटिकणारें) शिरांनीं व्याप्त झाल्यामुळें - बारीक झालेलें, दृष्टीनाश करणारें, (हें "दृष्टेःसमीपेनभवेत्" ह्याच्या उलट आहे) दोन पटलांत ह्म॰ पडद्यांतगेलेलें, भोंवताली तांबडें आणि मध्यें पांढरें; आणि फारदिवसांचें शुक्र असेल तें सोडून द्यावें.

## वरसांगितल्याप्रकारचेंच शुक्र केवळ असाध्य असतें असें नाहीं, तर दुसऱ्याप्रकारचेंही असाध्य असतें म्हणून सांग.

उष्णास्रुपातःपिडकाश्चनेत्रेयस्मिन्भवेन्मुद्गनिभंचशुक्रं ॥२६॥ तदप्यसाध्यंप्रवदंतिकेचिदन्यच्चयत्तित्तिरिपक्षतुल्यम्॥ ॥ ॥ ॥

अर्थ—ज्या डोळ्यांतून कढत अश्रु गळून, —— पुळी उत्पन्न होते (दो

न पटलांत शुक्र गेलें असतां हें लक्षण होतें ) व जेथें मुगायेवढें व-त्या सारखेंच शुक्र होतें, त्याडोळ्यांतलें तें शुक्र असाध्य होय· आणि जें शुक्र कुकुड कुंभ्याच्या पक्षाच्या रंगाचें (म्ह· काळयारंगाचें) असतें, तें ही कोणी असाध्य ह्मणून म्हणतात·

## अक्षिपाकात्यय·

श्वेतःसमाक्रामतिसर्वतोहिदोषेणयस्यासितमंडलंतु॥त
मक्षिपाकात्ययमक्षिपाकंसर्वात्मकंवर्जयितव्यमाहुः॥२७

अर्थ–डोळयाच्या कृष्ण भागावर दोषाच्या योगानें चहूंकडे श्वेत (शुक्र) पसरतो, हा सन्निपात जन्य **अक्षिपाकात्यय** नामक अक्षिपाक सोडावा, म्हणून सांगतात·

## अजकाजात·

अजापुरीषप्रतिमोरुजावान्सलोहितोलोहितपिच्छिलाश्रुः
विगृह्यकृष्णंप्रचयोभ्युपैतितच्चाजकाजातमितिव्यवस्येत्॥२८

॥इतिकृष्णजाः॥ ॥ ॥ ॥

अर्थ– कृष्ण भागावर शेळीच्या वाळलेल्या लेंडया सारखा, दुखणारा, किंचित तांबूस, तांबडें बुळबुळीत अश्रु ढाळणारा, असाजो प्रचय ह्म॰ टेंबुस (टीग) वाढतो त्याला **अजकाजात** म्हणून म्हणतात·

## दृष्टीचेरोग·

## पहिल्यापटलांतदोषगेलाअसतांत्याचेंलक्षण·

प्रथमेपटलेयस्यदोषोदृष्टिंव्यवस्थितः॥अव्यक्ता
निचरूपाणिकदाचिदथपश्यति॥२९॥ ॥ ॥

अर्थ–ज्याच्या पहिल्या पटलांत (सर्वांच्या आंतल्या) दोष जाऊन

कान्केशान्जालकानिचपश्यति ॥ ३० ॥ मंडलानि
पताकाश्चमरीचीन्कुंडलानिच ॥ परिप्लवांश्चविविधा
न्वर्षमभ्रंतमांसिच ॥ ३१ ॥ दूरस्थानिचरूपाणिमन्य
तेचसमीपतः ॥ समीपस्थानिदूरेचदृष्टेर्गोचरविभ्रमा
त् ॥ ३२ ॥ यत्नवानपिचात्यर्थंसूचीपाशंनपश्यति ॥ ॥

अर्थ—दुसऱ्या पटलांत दोष गेला असतां दृष्टि अत्यंत विव्हळ होते, ( म्हणजे पदार्थ पहाण्या विषयीं असमर्थ होते. ) तसेंच डोळ्यापुढें-माशा, डास, केंस, जाळी, मंडलें, पताका, किरण, कुंडलें, नानाप्रकारच्या पाण्याचें पर्जन्य, अभ्राळ आलेलें आणि अंधःकार, हीं नसतां दृष्टी स पडतात; मक्षिकादिक नसतां दृष्टीस पडतात हें तरी दृष्टि विव्हळ झाल्यानें होतें. आणि विषय भ्रांति मुळें दूरचे पदार्थ जवळ आणि जवळचे दूर आहेत असें वाटतें, आणि पुष्कळ प्रयत्न करीत असतां ही सुईचें नेडें दिसत नाहीं.

## तृतीयपटलगतलक्षण.

उर्ध्वंपश्यतिनाधस्तात्तृतीयंपटलंगते ॥ ३३ ॥ महांत्य
पिचरूपाणिछादितानीवचांबरैः ॥ कर्णनासाक्षिही
नानिविकृतानिचपश्यति ॥ ३४ ॥ यथादोषंचरज्येत
दृष्टिर्दोषेबलीयसि ॥ अधस्थेतुसमीपस्थंदूरस्थं-
चोपरिस्थिते ॥ ३५ ॥ पार्श्वस्थितेपुनर्दोषेपार्श्वस्थं
नैवपश्यति ॥ समंततःस्थितेदोषेसंकुलानीवपश्य

ति॥३६॥दृष्टिमध्यस्थितेदोषेमहद्भस्वंचपश्य
ति॥द्विधास्थितेद्विधापश्येद्बहुधावानवस्थिते॥
॥३७॥दोषेदृष्टिस्थितेतिर्यगेकंवेमन्यतेद्विधा॥३८॥

अर्थ—तिसऱ्या पटलांत दोषगेला असतां वर दिसतें, खाली दिस तनाहीं, मोठीं भव्य रूपें असली तरी वस्त्रांनीं आच्छादित केल्या सा रखीं दिसतात; कांन, नाक, व डोळे, नाहींत अशीं प्राण्यांचीं अंगें व वेडीं वांकडीं रूपें दृष्टीस पडतात; आणि ज्यावातादि दोषाला रक्तमास मेदादिकांचें सहाय्य असल्यानेंतोबलवान असतो त्याचें जें रूप ( रंग ) आहे त्यानें दृष्टि रंगते, ( म्हणजे त्यात्या दोषाचा वर्ण- त्यात्या दृष्टिला येतो· ) दोष अधो भागीं असलातर जवळचें दिस तनाहीं, दोष वर असला तर दूरचें दिसत नाहीं, बाजूकडे दोष अस लातर बाजूचा पदार्थ दिसत नाहीं, चहूं कडें पसरला असतां एक- मेकांत मिसळलेलीं रूपें दृष्टीस पडतात, दृष्टीच्या मध्यें दोष गेला असतां मोठा पदार्थ लहान दिसतो, दोन ठिकाणीं दोष राहिला अ- सतां दोन दोन पदार्थ दिसतात, आणि दोष अव्यवस्थित असला म्हणजे एक पदार्थाचीं अनेक रूपें दिसतात, दृष्टिगत दोष वांकडा असला तर एकाचे दोन तुकडे केल्या प्रमाणें दिसतात.

## चतुर्थपटलगततिमिरलक्षण.

तिमिराख्यःसवैरोगश्चतुर्थपटलंगतः॥रुणद्धिसर्व
तोदृष्टिंलिंगनाशमतःपरं॥३९॥अस्मिन्नपितमोभूते
नातिरूढेमहागदे॥चंद्रादित्यौसनक्षत्रावंतरिक्षेच
विद्युतः॥४०॥निर्मलानिचतेजांसिभ्राजिष्णूनि-
चपश्यति॥ ॥ ॥ ॥

... चंद्र, सूर्य, नक्षत्र, वि
द्युल्लता, आणिनिर्मळ दीप तेजें दिसतात.

## तृतीयपटलाश्रितकाचदोषाला दुसरी संज्ञा सांगतो.

**सएवलिंगनाशस्तुनीलिकाकाचसंज्ञितः॥ ४१॥ ॥**

अर्थ—तृतीय पटल गत काच (मोतिबिंदु) उपेक्षा केल्यानें तोच पुनः चौथ्या पटलांत आला म्हणजे त्याला **लिंगनाश** आणि **नीलिका** ही संज्ञा देतात. हा रोग असाध्य आहे.

## दोषविशेषानें रूपदर्शन कसें होतें तें सांगतो.

**तत्रवातेनरूपाणिभ्रमंतीवहिपश्यति॥ आविलान्यरुणाभानिव्याविद्धानीवमानवः॥ ४२॥ पित्तेनादित्यखद्योतशक्रचापतडिद्गुणान्॥ नृत्यतश्चैवशिखिनः सर्वंनीलंचपश्यति॥ ४३॥ कफेनपश्येद्रूपाणिस्निग्धानिचसितानिच॥ सलिलप्लावितानीवपरिजाड्यानिमानवः॥ ४४॥ पश्येद्रक्तेनरक्तानितमांसिविविधानिच॥ ससितान्यथकृष्णानिपीतान्यपिचमानवः॥ ४५॥ सन्निपातेनचित्राणिविप्लुतानिचपश्यति॥ बहुधाचद्विधावापिसर्वाण्येवसमंततः॥ ४६॥ हीनांगान्यधिकांगानिज्योतींष्यपिचपश्यति॥ ॥**

अर्थ—वायूनें रोगी गढूळ, तांबूस, वांकडीं, आणिजशीं कांहीं फिरत

आहेत अशीं रूपें पाहातो.

**पित्तानें**— तो सूर्य, काजवा, इंद्रधनुष्य, विद्युल्लता, त्याचीं रूपें;- आणि नाचणारे मयूर व सर्व वस्तु निळ्या रंगाच्या पहातो.

**कफानें**— स्निग्ध आणि पांढरीं पाण्यांत बुडवून काढल्या प्रमाणें मंद आणिजड अशीं रूपें तो पहातो.

**रक्तानें**— तांबडी व किंचित पांढरीं, काळीं, आणि पिवळीं अशीं रूपें तो रोगी पहातो.

**सन्निपातानें**— नानातऱ्हेचीं, विपरीत (म्ह. एकाचीं अनेक, दोन, किंवा अनेक रूपें चहूं कडे पहातो,) ही नांगाचीं किंवा अधिक अंगाचीं रूपें, आणि नानाप्रकारच्या ज्योती पहातो.

### पित्तानें दुसरें परिम्लायि संज्ञक तिमिरहोतें तें सांगतो.

**पित्तंकुर्यात्परिम्लायिमूर्छितंरक्ततेजसा॥ ४७॥पीतादिशस्तथोद्योतान्त्रविंचापिसपश्यति॥ विकीर्यमाणान्खद्योतैर्वृक्षांस्तेजोभिरेवच॥४८॥ ॥ ॥**

अर्थ— रक्ताच्या तेजानें मिश्र झालेल्या पित्ता पासून **परिम्लायि-**रोग होतो; त्याच्या योगानें रोगी दिशा, अकाश, आणि सूर्य हे पिवळे- आणि झाडें काजव्यानीं आणि तेजानीं भरलेलीं पहातो.

### रागभेदानें लिंगनाशाला षड्विधत्व सांग.

**वक्ष्यामिषड्विधंरागैर्लिंगनाशमतःपरं॥ रागोरुणोमारुतजःप्रदिष्टोम्लायीचनीलश्चतथैवपित्तात्॥ कफात्सितःशोणितजःसरक्तोसमस्तदोषप्रभवोविचित्रः॥४९॥ ॥ ॥ ॥**

... आणि सर्व दोषां नीं नाना तऱ्हेचा रंग होतो.

### वातिक रोगाचें विशेषलक्षण सांग.

अरुणंमंडलंदृष्ट्यांस्थूलकाचारुणप्रभं॥ परिम्लायिनि रोगेस्यान्म्लायिनीलंचमंडलं॥ ५०॥ दोषक्षयात्कदाचित् स्यात्स्वयंतत्रप्रदर्शनम्॥

अर्थ-परिम्लायि रोगाचे ठायीं दृष्टीवर जाड्या कांचे सारखें तांबडें मंडल होतें, तें म्लान, व निळें ही असतें. त्या मध्यें दोष कमी झाला असतां कदाचित् आपल्या आपण दिसतें. येथें दोष शब्दानें कोणी कोणी कफ घेतात.

### दृष्टिमंडलगतरोगलक्षण.

अरुणंमंडलंवातात्चंचलंपरुषंतथा॥ ५१॥ पित्तान्मंडलमानीलंकांस्याभंपीतमेवच॥ श्लेष्मणाबहलंस्निग्धं शंखकुंदेंदुपांडुरं॥ ५२॥ चलत्पद्मपलाशस्थःशुक्लोबिंदुरिवांभसः॥ मृद्यमानेचनयनेमंडलंतद्विसर्पति॥ ॥५३॥ प्रवालपद्मपत्राभमंडलंशोणितात्मकं॥ दृष्टिरागोभवेच्चित्रोलिंगनाशेत्रिदोषजे॥ ५४॥ यथास्वंदोषलिंगानिसर्वेष्वेवभवंतिहि॥ ॥ ॥ ॥

अर्थ—वायूनें दृष्टिमंडळ तांबडें, चंचल, आणि खरखरीत होतें; पित्तानें-दृष्टि मंडल किंचित निळें व कांशाइतकें पिवळें होतें; कफानें-जाड, स्निग्ध, शंख, कुंदाचें फूल आणि चंद्र यां सारखें पांढरें असतें; आणि डोळा चोळला असतां हलणाऱ्या कमलपत्रावरच्या पाण्या

ऱ्या बिंदु सारखें इकडे तिकडे पसरतें; रक्तापासून दृष्टि मंडळ, पोव-ळ्या सारखें किंवा रक्तकमला सारिखें तांबडें असतें; आणि त्रिदोषज लिंगनाशा मध्यें नऱ्हेनऱ्हेचें मंडल होतें; व सर्वांमध्यें त्या त्या दोषांचीं लक्षणें होतात.

## मागें सांगितलेले व पुढें सांगावयाचे अशा दृष्टिरोगांची संख्या.

षड्लिंगनाशाःषडिमेचरोगादृष्ट्याश्रयाःषट्चषडेवचस्युः॥५५

अर्थ– पूर्वी सांगीतलेले लिंगनाश ६, आणि पुढें विदग्ध दृष्ट्यादि सांगावयाचे ते ६ मिळून १२ दृष्टिरोग होतात.

## पित्तविदग्धदृष्टीचें लक्षण सां.

पित्तेनदुष्टेनगतेनदृष्टिंपीताभवेद्यस्यनरस्यदृष्टिः॥पी

तानिरूपाणिचतेनपश्येत्सवैनरःपित्तविदग्धदृष्टिः॥५६

अर्थ– पित्त दुष्ट होऊन वाढल्यानें ज्या मनुष्याची दृष्टि पिवळी होते; व त्या योगानें तो सर्व पदार्थ पिवळ्या रंगाचे पाहातो, त्याला पित्त विदग्ध दृष्टि ह्मणावें.

## दिवांध्यल. (दिवांधळें)

प्राप्तेतृतीयंपटलंचदोषेदिवानपश्येन्निशिवीक्षतेसः॥

रात्रौसशीतानुगृहीतदृष्टिःपित्ताल्पभावादपितानिपश्येत्॥५७

अर्थ– तिसऱ्या पटलांत दोष (पित्त) गेला असतां दिवसास रोग्याला दिसत नाहीं, रात्रीं गारव्या मुळें पित्त कमी झालें म्हणजे दिसतें.

## कफविदग्धदृष्टीचें लक्ष.

तथानरःश्लेष्मविदग्धदृष्टिस्तान्येवशुक्लानिहिमन्यतेतु॥

अर्थ– त्याप्रमाणेंच कफ विदग्ध दृष्टीचा पुरूष तींच रूपें पांढरीं पहातो.

## नक्तांध्य. (रातांधळें.)

त्रिषुस्थितोयःपटलेषुदोषोनक्तांध्यमापादयतिप्रसह्य ॥५८॥ दिवासमूर्यानुगृहीनदृष्टिःपश्येत्तुरूपाणिकफाल्पभावात् ॥ ॥ ॥ ॥

अर्थ-जो दोष (कफ) तिन्हीं पटलांत राहून, रातांधळें उत्पन्न करितो;- तो दिवसास सूर्याच्या तापानें कमी झाल्या मुळें दिवसास दिसतें.

## धूमदर्शिचेलक्ष.

शोकज्वरायासशिरोभितापैरभ्याहतायस्यनरस्यदृष्टिः॥५९ धूम्रांस्तथापश्यतिसर्वभावान्सधूमदर्शीतिनरःप्रदिष्टः॥ ॥

अर्थ-शोक, ज्वर, आयास, आणि मस्तक ताप त्यानीं पित्त कुपित होऊन ज्या ज्या दृष्टिला विकार होतो, त्याला तेणें करून सर्व पदार्थ धुरकट दिसतात. त्या रोगाला शोक विदग्ध दृष्टी ह्मणतात. त्या मुळें दिवसास मात्र धुरकट पदार्थ दिसतात; कारण; रात्रीं पित्त कमी असल्या मुळें निर्मळ दिसतें.

## ह्रस्वदृष्टीचेंल.

योह्रस्वजात्योदिवसेषुकृच्छ्राद्ह्रस्वाणिरूपाणिचतेनपश्येत्॥६०

अर्थ-जो ह्रस्वजात्य पुरुष असतो, त्याला दिवसास मोठे पदार्थ बारीक दिसतात; कारण, त्या वेळेस दृष्टि मध्यगत दोष असतो, हाही रोग पित्तजन्य आहे.

## नकुलांध्य.

विद्योततेयस्यनरस्यदृष्टिर्दोषाभिपन्नानकुलस्ययद्वत्॥चित्राणिरूपाणिदिवासपश्येत्सवैविकारोनकुलांध्यसंज्ञः॥६१

अर्थ-ज्या नराची दृष्टि दोषानीं व्याप्त होऊन मुंगसाच्या डुबळा सारखी चमकते, तो मनुष्य दिवसास नाना प्रकारचीं रूपें पहातो, त्या विकाराला- नकुलांध्य म्हणतात.

## गंभीरदृष्टि.

दृष्टिर्विरूपाश्वसनोपसृष्टासंकोचमभ्यंतरतश्चयाति ॥ रुजा
वगाढंचतमक्षिरोगंगंभीरकेतिप्रवदंतितज्ज्ञाः ॥ ६२ ॥ ॥

अर्थ–जी दृष्टि वायूनें विकृतहोऊन आंत संकोचित होते, व ठणकते, तिला गंभीरका म्हणतात.

## आगंतुजलिंगनाश.

बाह्योऽपरौद्वौविहसंप्रदिष्टौनिमित्ततश्चाप्यनिमित्तश्च ॥
निमित्ततस्तत्रशिरोभितापाज्ज्ञेयस्त्वभिष्यंदनिदर्शनःसः ६३

अर्थ–अभिघातज लिंगनाश दोनप्रकारचे होतात, एक निमित्त जन्य, व दुसरा अनिमित्तजन्य; त्या पैकीं शिरोभितापानें ( विषवृक्षाच्या फुलावरून आलेल्या वाऱ्याचा स्पर्श मस्तकास झाल्यानें ) होतो, तो निमित्त जन्य; त्या मध्यें रक्ताभिष्यंदाचीं लक्षणें होतात.

## अनिमित्ताचेंलक्ष.

सुरर्षिगंधर्वमहोरगाणां संदर्शनेनापिचभास्करस्य ॥
हन्येतदृष्टिर्मनुजस्ययस्यसलिंगनाशस्त्वनिमित्तसंज्ञः ॥ ६४ ॥
तत्राक्षिविस्पष्टमिवावभातिवैडूर्यवर्णाविमलाचदृष्टिः ॥

अर्थ–देव, ऋषि, गंधर्व, महासर्प, आणि सूर्य त्यां कडे टक लावून पाहिल्यानें ज्या मनुष्याची दृष्टी नष्टहोते, तिला अनिमित्त लिंगनाश म्हणतात. त्या रोगांत डोळा स्वच्छ दिसतो, आणि दृष्टि वैडूर्य मण्या सारखी स्वच्छ ( म्हणजे श्यामवर्ण ) असते. ॥ ॥इतिदृष्टिजाः॥ ॥ ६ ॥ ६ ॥

मयन्मांसंचीयतेसिते॥ एथक्मृदधिमांसार्मबहलंचय
कन्निभं॥६६॥ स्थिरंप्रस्तारिमांसाढ्यंशुष्कंस्नाय्व
र्मपंचमं॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ—डोळयाच्या पांढऱ्या भागावर पातळ, विस्तीर्ण, श्यामवर्ण, व नांबूस असें जें मांस वाढतें त्याला **प्रस्तारि** अर्म म्हणावें; शुक्लभागावर पांढरें, मृदु मांस फार दिवसांनीं वाढतें त्याला **शुक्लार्म** म्हणावें; कमला-प्रमाणें लाल व मृदु जें मांस वाढतें, त्याला **रक्तार्म** म्हणावें; जें मांस विस्तीर्ण, मऊ आणि काळजाप्रमाणें दिसतें, त्याला **अधिमांसार्म** म्हणतात; जें कठीण, व पसरणारें, स्राव रहित मांस वाढतें, त्याला **स्नाय्वर्म** म्हणावें.

## शुक्तिरोग.

श्यावाःस्युःपिशितनिभास्तुबिंदवो येशुक्त्याभाःसि
तनियताःसशुक्तिसंज्ञः॥६७॥ ॥ ॥ ॥

अर्थ—डोळयाच्या श्वेत भागावर श्यामवर्ण, मांसतुल्य, शिंपी सारखे जे बिंदू होतात; त्यांना **शुक्ति** म्हणतात.

## अर्जुन.(आहिरा)

एकोयःशशरुधिरोपमस्तुबिंदुःशुक्लस्थोभवति
तदर्जुनंवदंति॥ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ— शुक्ल भागावर सशाच्या रक्ता सारखा जो एक बिंदु उत्पन्न होतो, त्याला **अर्जुन** असें म्हणतात. व्यवहारांत आहिरा म्हणतात.

पिष्टक·

श्लेष्ममारुतकोपेनशुक्रेमांसंससुन्नतम्॥पिष्टव
सिष्टकंविन्द्यिल्लाक्कादर्शसन्निभम्॥६८॥ ॥

अर्थ– कफ वायूचा कोपानें शक्र भागावर पिठा सारखें जें मांस वाढतें, त्याला **पिष्टक** म्हणतात; तें मळकट अशी सारखें दिसतें·

जाल·

जालाभःकठिशिरोमहान्सरक्तःसंतानःस्मृतइह-
जालसंज्ञितस्तु॥ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ– शक्र भागावर शिरांचें मोठें दाट जाळ्या सारखें जाळें होतें,- त्याला **जाल** असें म्हणतात·

शिराजपिटिका·

शक्रस्थाःसितपिडकाःशिरावृतायास्ताब्रूयादसित
मर्मीपजाःशिराजाः॥६९॥ ॥ ॥ ॥

अर्थ– शक्र भागावर शिरानीं व्यापलेल्या पांढऱ्या पुळ्या होतात; त्याना **शिराजपिटिका** म्हणतात· त्या कृष्ण भागाच्याजवळ होत असतात·

बलास·

कांस्याभोऽमृदुरथवारिबिंदुकल्पोविज्ञेयोनयनसि
तेबलाससंज्ञः॥७०॥ ॥इतिशक्रुजाः॥ ॥ ॥

अर्थ– शक्र भागावर कांशा सारखा कठीण, अथवा पाण्याच्या बिंदु सारखा किंचित उचललेला जो ग्रंथि होतो त्याला **बलास** असें- म्हणतात·॥ ॥इतिशक्रुजाः॥ ॥६॥ ॥६॥ ॥६॥ ॥

पूयालस·

पक्कःशोथःसंधिजोयःसतोदःस्रवेत्पूयंपूतिपूया

लसाख्यः॥ ॥७॥ ॥७॥ ॥७॥ ॥७॥ ॥

अर्थ– नेत्राच्या संधीवर शोथ होऊन पिकून फुटतो; व त्यांतून दुर्गंध पू वाहतो; व त्याला ठसठस लागते. त्या रोगाला पूयालस असें म्हणतात.

## उपनाह.

ग्रंथिर्नाल्पोदृष्टिसंधावपाकीकंडुप्रायोनीरुजस्तूपनाहः ७१

अर्थ– नेत्र संधीवर मोठी गांठ येते; ती थोडी पिकते; तिला कंडू पुष्कळ असते; ती दुखत नाहीं. त्या ग्रंथीला उपनाह असें म्हणतात.

## स्रावकिंवानेत्रनाडी (त्यास्रुर)

गत्वासंधीनस्रुमार्गेणदोषाःकुर्युःस्रावान्लक्षणैःस्वैरुपेतान्॥ तंहिस्रावंनेत्रनाडीतिचैकेतस्यालिंगंकीर्तयिष्येचतुर्धा॥७२॥ ॥ ॥ ॥

अर्थ– वातादि दोष अश्रुमार्गानें संधींत जाऊन स्वकीय लक्षण युक्त स्राव उत्पन्न करितात. त्या स्रावाला कोणी नेत्रनाडी म्हणतात; ती चार प्रकारची आहे; तिचें लक्षण सांगतो.

पाकःसंधौसंस्रवेद्यस्तुपूयंपूयास्रावोसौगदःसर्वजस्तु॥ श्वेतंसान्द्रंपिच्छिलंसंस्रवेद्धिश्लेष्मास्रावोसौविकारोमतस्तु॥७३॥ रक्तास्रावःशोणिताद्योविकारःस्रवेदुष्णंनत्ररक्तंप्रभूतं॥ हारिद्राभंपीतमुष्णांजलंवापित्तास्रावःसंस्रवेत्संधिमध्यात्॥७४॥ ॥

अर्थ– पूयास्राव नेत्रसंधीवर सूज येऊन पिकते; व तिच्यांतून पू हतो;– हा रोग सान्निपातात्मक आहे.

**श्लेष्मास्राव**– ज्यांतून पांदरा, दाट, आणि चिकट पू वाहातो तो.

**रक्तास्राव**– ज्याविकारांतपुष्कळउष्ण रक्तस्रवतें तो,हो रक्तजहोय.

पित्तास्राव—ज्यामध्यें संधी मधून हळदवट पिवळें उष्ण पाणी वाहतें तो.

## पर्वणी व अलजी.

ताम्रातन्वीदाहपाकोपपन्नाज्ञेयावैद्यैःपर्वणी वृत्तशोथा॥जातासंधौसुक्लकृष्णेलजीस्यात्-तस्मिन्नेवमथितापूर्वलिंगैः॥७५॥ ॥ ॥

अर्थ—नेत्राच्या शक्लु कृष्ण संधीवर तांबडी, लहान, वाटोळी जी पिटिका होते; वजी दाह होऊन पिकते; तिला पर्वणी म्हणावें. आणि त्या च ठिकाणीं पांच लक्षणांनीं युक्त जी मोठी पिटिका होते, तिला अलजी असें ह्मणावें.

## कृमिग्रंथि.

कृमिग्रंथिर्वर्त्मनःपक्ष्मणश्चकंडूंकुर्युःकृमयःसंधिजाताः॥नानारूपावर्त्मशक्लांतसंधौचरंत्यतर्नयनंदूषयंतः॥७६॥ ॥ ॥ ॥

अर्थ—डोळ्याचें पोट आणि पांपण्या त्यांच्या संधी मध्यें उत्पन्न झालेले नानाप्रकारचे कृमि कंडू वगैरे उत्पन्न करितात; आणि डोळ्यांचें पोट वगैरे भाग यांचा जेथें संधी होतो तेथें जाऊन डोळयाच्या आंतल्या भागाला दूषित करून आंत फिरतात; त्या रोगाला कृमिग्रंथि म्हणतात.

## वर्त्मरोग. (पांपण्यांचे रोग)

## उत्संगपिटिका.

अभ्यंतरमुखीताम्राबाह्यतोवर्त्मनश्चया॥सोत्संगोत्संगपिटिकासर्वजास्थूलकंडुरा॥७७॥ ॥

अर्थ- तोंडआंत असून डोळ्याचा पोटावर उचलून आलेली, तांबडी, मोग, व कंडू फक्तजी पिटिका होते, तिला उत्संगपिटिका म्हणतात ही सन्निपा तात्मक आहे-

## कुंभिका-

वर्त्मांतेपिटिकाध्मानाभिद्यंतेचस्रवंतिच॥कुंभीकबी-
जसदृशाःकुंभीकाःसन्निपातजाः॥७८॥ ॥ ॥

अर्थ-पोटाच्या कडेवर कुंभीच्या बीजा सारख्या पिटिका होतात; त्या पिक ल्या असतां फुगतात आणि फुटून वाहातात, त्यांस कुंभिका म्हणतात; त्या सन्निपातात्मक आहेत;

## पोथकी-

स्राविण्यःकंडुरागुर्व्योरक्तसर्षपसन्निभाः॥रुजावंत्य
श्चपिटिकाःपोथक्यइतिकीर्तिताः॥७९॥ ॥ ॥

अर्थ-तांबड्या मोहोऱ्या सारख्या, रक्त स्रवणाऱ्या, कंडू फक्त, जड, खुप णाऱ्या ज्यापिटिका होतात त्यांस पोथकी (खुपऱ्या) म्हणतात.

## वर्त्मशर्करा-

पिडिकायाखरास्थूलासूक्ष्माभिरभिसंवृता॥वर्त्म-
स्थाशर्करानामसरोगोवर्त्मदूषकः॥८०॥ ॥

अर्थ-डोळ्याच्या पोटावर जी पिटिका कठीण, व मोठी असून सभोंव ती बारीक पिटिकानीं वेष्टिलेली असते; तिला वर्त्मशर्करा म्हणतात. त्या रोगानें पांपण्या नासतात.

## अर्शोवर्त्म-

एर्वारुबीजप्रतिमाःपिडिकामंदवेदनाः॥श्लक्ष्णाः-
खराश्चवर्त्मस्थास्तदर्शोवर्त्मकीर्त्यते॥८१॥ ॥

अर्थ— कांकडीच्या बियासारख्या, मंदवेदन, गुळगुळीत, कठीणशा पिटिका डोळ्याच्या पोटावर येतात, त्यांना अर्शोवर्त्म म्हणतात.

## शुष्कार्श.

दीर्घांकुरःखरस्तब्धोदारुणोभ्यंतरोद्भवः॥व्याधिरेषो
तिविख्यातःशुष्कार्शोनामनामतः॥८२॥ ॥ ॥

अर्थ—डोळयाच्या पोटाच्या आंत लांबट खरखरीत कठीण, दुःखदायक-असाजो मांसांकुर होतो; त्या व्याधीला शुष्कार्श म्हणतात. हा सन्निपातज आहे असें समजावें.

## अंजना.

दाहतोदवतीताम्रापिटिकावर्त्मसंभवा॥मृद्वीमंदरु
जासूक्ष्माज्ञेयासांजननामिका॥८३॥ ॥ ॥

अर्थ— दाह व टोंचणीनें फक्त, तांबडी, मऊ, लहान, मंद पीडाकारक पिटिका डोळ्याच्या पोटावर होते, तिला अंजना म्हणतात. हीहि सन्निपातजच आहे. हिलाच रांजणवाडी व अंजुली म्हणतात.

## बहलवर्त्म.

वर्त्मोपचीयतेयस्यपिडिकाभिःसमंततः॥सवर्णाभिः
स्त्रिराभिश्चविद्याद्बहलवर्त्मतत्॥८४॥ ॥ ॥

अर्थ—ज्याच्या डोळयाचें पोट त्वक्समान वर्ण व कठीण पिटिकानी चहूंकडून व्याप्त होतें; त्याच्या त्या रोगाला बहलवर्त्म म्हणावें; हें सन्निपातज आहे असें समजावें.

## वर्त्मबंध.

कंडूमताल्पतोदेनवर्त्मशोथेनयोनरः॥नसमंछादये
दक्षियत्रासौवर्त्मबंधकः॥८५॥ ॥ ॥ ॥

अर्थ– ज्याच्या डोळ्याचें पोट सुजल्यामुळें डोळा बरोबर झांकला जात नाहीं, त्याच्या त्या रोगाला वर्त्मबंधक म्हणावें; त्या सुजेला कंड सुटते व टोंचणी लागते, हा रोग त्रिदोषजन्य आहे.

## क्लिष्टवर्त्म.

मृद्वल्पवेदनंताम्रंयद्वर्त्मसममेवच ॥ अकस्माच्चभवेद्रक्तंक्लिष्टवर्त्मेतितद्विदुः ॥ ८६ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ– डोळ्याच्या खालचीं वरचीं दोन्हीं पोटें मृदु, अल्पवेदन, तांबूस, होऊन अकस्मात् लाल भडक होतात; त्या रोगाला क्लिष्टवर्त्म म्हणतात, हा रोग कफरक्तज आहे.

## वर्त्मकर्दम.

क्लिष्टंपुनःपित्तयुतंशोणितंविदहेद्यदा ॥ तदाक्लिन्नत्वमापन्नमुच्यतेवर्त्मकर्दमः ॥ ८७ ॥ ॥ ॥

अर्थ– क्लिष्टवर्त्मच पुनः पित्तयुक्त रक्तानें जे डांजळतें, तेव्हां तें हि दहिं दून चिखला सारखें होतें; त्या व्याधिला वर्त्मकर्दम म्हणावें. हा पित्ताधिक सन्निपातात्मक होय.

## श्याववर्त्म.

वर्त्मयद्बाह्यतोंऽतश्चश्यावंशूनंसवेदनम् ॥ तदाहुः श्याववर्त्मेतिवर्त्मरोगविशारदाः ॥ ८८ ॥ ॥ ॥

अर्थ– जें पोट बाहेरून व आंतून काळें होऊन सुजतें, व ठणकतें, त्याला श्याववर्त्म म्हणतात, हें वाताधिक त्रिदोषजन्य आहे.

## प्रक्लिन्नवर्त्म.

अरुजंबाह्यतःशूनंवर्त्मयस्यनरस्यहि ॥ प्रक्लिन्नवर्त्मतद्विद्यात्क्लिन्नमत्यर्थमंततः ॥ ८९ ॥ ॥ ॥

अर्थ- जें पोट अल्पवेदन, व बाहेरून सुजलेलें; आणि कडेला फार चिकचिकीत असतें; त्याला प्रक्लिन्नवर्त्म म्हणावें. हा कफजविकार आहे.

## अक्लिन्नवर्त्म.

यस्यधौतान्यधौतानिसंबध्यंतेपुनःपुनः॥वर्त्मान्यपरिपक्वानिविद्यादक्लिन्नवर्त्मतत्॥ १०॥ ॥

अर्थ- ज्याच्या डोळ्याच्या पांपण्या न धुतल्या किंवा धुतल्या तरी चिकट पाण्यानें पुनःपुनः एकमेकास चिकटतात; पोटें पिकून पुवानें चिकटतात असें नाहीं. त्यारोगाला अक्लिन्नवर्त्म म्हणतात.

## वातहतवर्त्म.

विमुक्तसंधिनिश्चेष्टंवर्त्मयस्यनमील्यते॥एतद्वातहतंवर्त्मजानीयादक्षिचिंतकः॥ ११॥ ॥ ॥

अर्थ- ज्याचा संधि सुटला आहे, व ज्याची उघड झांप होत नाहीं असें डोळ्याचें पोट मिटत नाहीं; त्याला वातहतवर्त्म असें म्हणावें.

## अर्बुद.

वर्त्मांतरस्थंविषमंग्रंथिभूतमवेदनं॥आचक्षतेर्बुदमितिसरक्तमवलंबितम्॥ १२॥ ॥ ॥

अर्थ- डोळ्याच्या पोटाच्या आंतल्या बाजूला वाटोळा, मंदवेदन, किंचित् तांबूस, जलद वाढणारा असा जो ग्रंथि होतो; त्याला अर्बुद म्हणतात. हें त्रिदोषात्मक होय.

## निमेष.

निमेषणीःशिरावायुःप्रविष्टोवर्त्मसंश्रयः॥प्रचालयतिवर्त्मानिनिमेषंनामतंविदुः॥ १३॥

अर्थ- वर्त्माश्रित वायु उघड झांप करणाऱ्या शिरा मध्यें शिरून पाप-

घ्या चाळवितो, त्या योगानें पांपण्या वरचेवर मिटतात; त्या रोगाला **निमेष** (डोळे मिचकावणें) म्हणतात.

## शोणितार्श.

वर्त्मस्थोयोविवर्द्धेतलोहितोमृदुरंकुरः ॥ तद्रक्तजंशोणितार्शश्छिन्नंछिन्नंप्रवर्धते ॥ १४ ॥ ॥ ॥

अर्थ– रक्ताच्या योगानें डोळ्याच्या पोटांच्या आंतल्या अंगास तांबडा, व मृदु अंकुर वाढतो, त्याला **शोणितार्श** म्हणतात; त्याला वारंवार कापले तरी पुनः वाढतो.

## लगण.

अपाकीकठिणःस्थूलोग्रंथिर्वर्त्मभवोरुजः ॥ सकंडूः पिच्छिलःकोलसंस्थानोलगणस्तकसः ॥ १५ ॥ ॥

अर्थ– डोळ्याचा पोटावर बोरायेवढा मोठा, कठीण, कंडुयुक्त, बुळबुळीत ग्रंथि होतो; त्याला **लगण** म्हणतात. हा कफजन्य आहे, म्हणून ठणकत व पिकत ही नाहीं.

## बिसवर्त्म.

त्रयोदोषाबहिःशोथंकुर्युश्छिद्राणिवर्त्मनोः ॥ प्रस्रवत्यंतरुदकंबिसवद्बिसवर्त्मतत् ॥ १६ ॥ ॥ ॥

अर्थ– तिन्ही दोष कुपित होऊन डोळ्यांचीं पोटें सुजतात, व त्यानां छिद्रें पडतात, त्यांतून कमळ तंतू प्रमाणें आंत पाणी झिरपतें; त्या रोगाला **बिसवर्त्म** म्हणतात.

## कुंचन.

वातायावर्त्मसंकोचंजनयंतियदामलाः ॥ तदाद्रष्टुंनशक्नोतिकुंचनंनामतद्विदुः ॥ १७ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ– वातादिक दोष जेव्हां पापण्यांचा संकोच करितात, तेव्हां मनुष्या-च्यानें डोळे उघडून पहावयत नाहीं; त्या रोगाला कुंचन (कुञ्चोन्मील न:) असें ह्मणतात·

## पक्ष्मकोप·(पडकेस)

प्रचालिता निवातेन पक्ष्माण्यक्षिविशंतिहि ॥ घृष्यं
त्यक्षिमुहुस्तानि संरंभंजनयंतिच ॥९८॥ असितेसि
तभागेच मूलकोशात्पतंत्यपि ॥ पक्ष्मकोपःसविज्ञेयः
व्याधिःपरमदारुणः॥९९॥ ॥ ॥ ॥

अर्थ– वायूनें डोळ्याच्या पापण्यां उरफाटून त्यांचे केंस डोळ्याच्या बुबुळा-ला वारंवार घासटतात; त्या मुळें बुबुळाचे काळे, पांढरे, भाग रूजतात; ते केंस मुळापासून रूटतात· त्या व्याधिला पक्ष्मकोप किंवा उपपक्ष्म म्हणतात· हा मोठा त्रास दायक आहे· व्यवहारांत पडकेंस म्हणतात·

## पक्ष्मशात·

वर्त्मपक्ष्माशयगतंपित्तंरोमाणिशातयेत् ॥ कंडूंदाहंच
कुरुतेपक्ष्मशातंतमादिशेत् ॥१००॥ ॥ ॥ ॥-
इतिनेत्ररोगनिदानंसमाप्तम् ॥ ॥श्रीः॥ ॥श्रीः

अर्थ– वर्त्म पक्ष्माच्या मूळाशीं राहाणारें पित्त कुपित होऊन केंस झडवितें; व डो-ळ्यांस कंड सुटते, आणि आग होते· त्या रोगाला पक्ष्मशात म्हणतात· पक्ष्म शात आणि कुंचन हे रोग सुश्रुतांत नाहींत, अन्यग्रंथांत आहेत, म्हणून सुश्रुतोक्त संख्येला बाध येत नाहीं· ॥ ॥इतिनेत्ररोगनिदानसमाप्तम् ॥

मधुकोशंसुनिर्मथ्यसारमाकृष्यवैमया ॥ व्याख्याकृतामहा
राष्ट्रीमाधवार्थप्रका– ——— –शिका ॥१॥ ॥ ॥

शिरोरोगाश्चजायंतेवातपित्तकफैस्त्रिभिः॥सन्निपातेन
रक्तेनक्षयेणक्रमिभिस्तथा॥१॥सूर्यावर्तानंतवातार्धाव
भेदकशंखकैः॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ– वात, पित्त, कफ त्यानीं ३,सन्निपातानें १,रक्तानें १,क्षयानें १,कृमीनीं १; सूर्यावर्त १,अनंतवात १,अर्धावभेदक १,आणि शंखक १ मिळून ११ प्रकारचे शिरोरोग (मस्तकशूळ) होतात-

वातज-

यस्यानिमित्तंशिरसोरुजश्चभवंतितीव्रानिशिचातिमात्रम्॥बंधोपतापैःप्रशमश्चयत्रशिरोभितापःससमीरणेन॥२॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ– ज्याचें मस्तक अकस्मात् दुखतें,व रात्रीस तर अधिकच होतें; बांधल्यानें किंवा शेकल्यानें उतरतें, त्याचा हा वातज शिरोरोग समजावा-

पैत्तिक-

यस्योष्णमंगारचितंतथैवभवेच्छिरोदह्यतिवाक्षिनासा॥शीतेनरात्रौचभवेच्छमश्चशिरोभितापःसतुपित्तकोपात्॥३॥

अर्थ–ज्याचें मस्तक अंगार ठेवल्या प्रमाणें तस होतें; व डोळे आणि नाक हीं जळजळतात; शीत पदार्थानें किंवा रात्रीं शांत होतें; त्याचा मस्तक शूळ पित्तकोपानें होतो असें जाणावें

श्लेष्मिक-

शिरोभवेद्यस्यकफोपदिग्धंगुरुप्रतिस्तब्धमथोहिमंच॥शूनाक्षिकूटंवदनंचयस्यशिरोभितापःसकफप्रकोपात्॥४॥

अर्थ– ज्याचें डोकें आंतून कफानें सारवल्यासारखें,जड, बांधल्या सारखें,

आणि थंड होतें; व डोळे स्जीर असून तोंडाला धोदरी येते; त्याचा हा मस्तक शूळ कफ जन्य जाणावाः—

## सन्निपातिक·

**शिरोभितापेत्रितयप्रवृत्तेसर्वाणिलिंगानिसमुद्भवंति॥५॥**

अर्थ-तिन्हीं दोषानीं उत्पन्न झालेल्या शिरोरोगामध्यें सर्व लक्षणें होतात·

## रक्तज·

**रक्तात्मकःपित्तसमानलिंगःस्पर्शासहत्वंशिरसोभवेच्च॥**

अर्थ-रक्तजन्यशिरोरोगांत पैत्तिकशिरोरोगाचीं लक्षणें होतात, व डोक्याला स्पर्श सहन होत नाहीं·

## क्षयज·

**असृग्वसाश्लेष्मसमीरणानांशिरोगतानामिहसंक्षयेण॥६॥क्षवप्रवृत्तिःशिरसोभितापःकष्टोभवेदुग्ररुजोतिमात्रम्॥संस्वेदनछर्दनधूमनस्यैरसृग्विमोक्षैश्चविवृद्धिमेति॥७॥ ॥ ॥ ॥ ॥**

अर्थ—मस्तकांतील रक्त, वसा, कफ, आणि वायू त्यांचा क्षय झाल्यानें अत्यंत भयंकर मस्तकशूळ होतो; त्यांत शिंका फार येतात, मस्तक तापतें; व त्यावर स्वेद, वांति, धूम पान, नस्य, आणि रक्तमोक्ष हे उपाय केले असतां तो वाढतो·

## कृमिज·

**निस्तुद्यतेयस्यशिरोतिमात्रंसंभक्ष्यमाणंस्फुरतीवचांतः॥ घ्राणाच्चगच्छेद्रुधिरंसपूयंशिरोभितापः-कृमिभिःसघोरः॥८॥ ॥ ॥ ॥ ॥**

अर्थ—ज्याच्या मस्तकाला अत्यंत टांकी लागते, व कृमी आंतून पोखर

## सूर्यावर्तः


सूर्योदयंयाप्रतिमंदमंदमक्षिभ्रुवंरुक्समुपैतिगाढा।
विवर्धतेचांशुमतासहैवसूर्यापवृत्तौविनिवर्ततेच॥९॥
शीतेनशांतिंलभतेकदाचिदुष्णेनजंतुःसुखमाप्नुयाद्वा
सर्वात्मकंकष्टतमंविकारंसूर्यापवृत्तंतमुदाहरंति॥१०॥

अर्थ– सूर्योदया बराबर कपाळ दुखण्यास हळूहळू आरंभ होऊन जसजसा सूर्य चढतो तसतसा तो शूळ डोळे आणि भ्रुकुटी (भिंवया) या मध्यें अधीक होऊं लागतो; आणि सूर्या बरोबर वाढून सूर्य मावळला म्हणजे नाहींसा होतो. शीत किंवा उष्ण उपचारानें मनुष्याला सुख होतें. त्या सान्निपातिक विकाराला **सूर्यापवृत** म्हणतात.

## अनंतवात.

दोषास्तुदुष्टास्त्रयएवमन्यांसंपीड्यगाढंसरुजांसु
तीव्राम्॥कुर्वंतिसाक्षिभ्रुविशंखदेशेस्थितिंकरोत्या
शुविशेषतस्तु॥११॥गंडस्यपार्श्वेचकरोतिकंपंहनु
ग्रहंलोचनजांश्चरोगान्॥अनंतवातंतमुदाहरंति–
दोषत्रयोत्थंशिरसोविकारम्॥१२॥ ॥ ॥

अर्थ– तिन्ही दोष दुष्ट होऊन मानेच्या मागल्या शिरांस बळकट जखडून डोळे, भिंवया, आणि आंख त्या ठिकाणीं राहून अत्यंत तीव्र वेदना करितात; व कानाच्या पुढल्या भागावर कंप होतो, हनवटी जखडते; नेत्ररोग होतात. त्या त्रिदोषजन्य मस्तक रोगाला **अनंतवात** असें म्हणतात.



## अर्धावभेदक- (अर्धशिशि)

रूक्षाशनात्यध्यशनप्राग्वातावश्यमैथुनैः॥ वेगसंधा
रणायासव्यायामैःकुपितोनिलः॥ १३॥ केवलःसक
फोवार्द्धंगृहीत्वाशिरसोबली॥ मन्याभ्रूशंखकर्णा-
क्षिललाटार्धेतिवेदनाम्॥ १४॥ शस्त्रारणिनिभांकु
र्यात्तीव्रांसोर्धावभेदकः॥ नयनंवाथवाश्रोत्रमभि
वृद्धोविनाशयेत् ॥१५॥ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ– रूक्षान्न, अतिभक्षण, अध्यशन, पूर्वदिशेकडचा वारा, दंव, मैथु
न, वेगधारण, अयास, व्यायाम, त्या कारणांनीं कुपित झालेला केवळ वायु
किंवा कफयुक्त वायु अर्धे मस्तक धरून मानेच्या शिरा, भिवयी, आंख, कान,
डोळा, ललाट, हीं सर्व एका बाजूचीं धरून कुऱ्हाडीनें घाव घातल्या सा
रखी किंवा रवीनें घुसळल्या सारखी वेदना करितो. त्याला **अर्धाव
भेदक** म्हणतात. हा रोग फार वाढला असतां त्या बाजूचा डोळा जा-
तो किंवा कान बहिरा होतो.

## शंखक.

पित्तरक्तानिलादुष्टाः शंखदेशेविमूर्छिताः॥ तीव्ररु
ग्दाहरागंहिशोथंकुर्वंतिदारुणम्॥ १६॥ सशिरो-
विषवद्वेगीनिरुध्यासुगलंतथा॥ त्रिरात्राज्जीवितंह
तिशंखकोनामनामतः ॥१७॥ त्र्यहाज्जीवतिभैष-
ज्यंप्रत्याख्यायास्यकारयेत्॥ इतिशिरोरोगनिदानं॥

अर्थ– दुष्ट झालेलें पित्त, रक्त, आणि वायु (येथें कफही दुष्ट आहे अ
सें समजावें) फारवाढून अखांवर भयंकर सूजउत्पन्न करितात; तिला
ठणका फार लागतो, आग फार होते, व ती लाल फार होते; ती विष वेगा

आणि ये अबल नर रोग जगतो- परंतु प्रत्याख्यान करून चिकित्सा करावी॥ ॥इतिशिरोरोगनिदानसमाप्तं॥ ॥छ॥छ॥छ॥छ॥छ॥छ॥
मधुकोशः—

---

# स्त्रीरोग-

## प्रदरनिदान-

विरुद्धमद्याध्यशनादजीर्णाद्गर्भप्रपातादतिमैथुनाच्च॥यानातिशोकादतिकर्शनाच्चभाराभिघाताच्छयनाद्दिवाच॥१॥तंश्लेष्मपित्तानिलसन्निपातैश्चतुःप्रकारंप्रदरंवदंति॥ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ—विरुद्ध, मद्य, अध्यशन, अजीर्ण, गर्भपात, अतिमैथुन, अतिगमन, अतिशोक, उपवासादिकानीं कर्शन, जड ओझें वाहाणें, काष्ठादिकांचा अभिघात, दिवानिद्रा; त्या कारणांनीं कफ, पित्त, वायु, आणि सन्निपात त्या भेदानीं चार प्रकारचा प्रदर रोग (धुपणी) होतो-

## प्रदरांचेंसामान्यरूप-

असृग्दरंभवेत्सर्वंसांगमर्दंसवेदनम्॥२॥ ॥

अर्थ—सर्वप्रदरांमध्यें आंग मोडून येतें, व हातापायांला कळा लागतात-

## उपद्रव-

तस्यातिवृत्तौदौर्बल्यंश्रमोमूर्छामदस्तृषा॥दाहःप्रलापःपांडुत्वंतंद्रारोगाश्चवातजाः॥३॥ ॥ ॥

अर्थ– तो प्रदर फार वाढला असतां शक्ति कमी होते, थकवा येतो, मूर्छी येते, गुंगी येते, तहान लागते, तलखी होते, रोगिणी बडबड करिते, अंग पांढरें फटफटीत पडतें, झांपड पडते, आणि वातज रोग (आक्षेपकादिक ) होतात.

## श्लैष्मिक.

आमंसपिच्छाप्रतिमंसपांडुपुलाकतोयप्रतिमंकफात्तु॥

अर्थ– कफा पासून, आमरसयुक्त, बुळबुळीत, किंचित् पांढरा कोंड्याच्या पाण्या सारखा स्राव होतो; त्यालाच श्वेतप्रदर किंवा सोमरोग म्हणतात.

## पैत्तिक.

सपीतनीलासितरक्तमुष्णंपित्तार्तियुक्तंभृशवेगिपित्तात्॥

अर्थ– पित्तानें– किंचित् पिंवळा, निळा, काळा, तांबडा, व कढत असा प्रदर वाहातो. त्यांत पित्ताच्या दाह चिमचिमादि पीडा होतात, व त्याचा वेग पुष्कळ असतो.

## वातिक.

रूक्षारुणंफेनिलमल्पमल्पंवातार्तिवातात्पिशितोदकाभं॥

अर्थ– वायूनें– रूक्ष, तांबूस, फेसाळलेला, मांस धुतलेल्या पाण्या सारखा, थोड थोडा प्रदर वाहतो; व त्यामध्यें वायूच्या पीडा होतात.

## त्रिदोषज.

सक्षौद्रसर्पिर्हरितालवर्णंमज्जप्रकाशंकुणपंत्रिदोषम्॥तच्चाप्यसाध्यंप्रवदंतितज्ज्ञानतत्रकुर्वीतभिषक्चिकित्साम्॥५॥ ॥ ॥ ॥

अर्थ– जो प्रदर मध, तूप, हरिताळ, आणि मज्जा त्यांचा रंगासारखा-

व दुर्गंध युक्त असतो, तो त्रिदोषज जाणावा; हा असाध्य आहे म्हणून त्या वर वैद्यानें चिकित्सा करूनये.

## विशुद्धार्तवलक्षण-

मासान्निःपिच्छदाहार्तिपंचरात्रानुबंधिच ॥ नैवाति बहुलंनाल्पमार्तवंशुद्धमादिशेत् ॥ ६ ॥ शशासृक्प्रति मंयच्चयद्वालाक्षारसोपमम् ॥ तदार्तवंप्रशंसंतिय- च्चाप्सुनविरज्यते ॥ ७ ॥ ॥ इतिप्रदरनिदानम् ॥ ॥

अर्थ— जें आर्तव (विटाळ) बुळबुळीत नसतें, व ज्यामध्येंदाह शूलादिक नसतात, व ज्याचा अनुबंध (महिन्यांतून) पांच दिवस पर्यंत असतो, व जें फारनसतें, व थोडेंही नसतें (मध्यम प्रमाणानें असतें) तें शुद्ध म्हणून समजावें; आणि जें सशाच्या रक्ता सारखें, किंवा अळिता सारिखें लाल असतें, आणि ज्यांत फडकें भिजवून धुतलें असतां फडक्याला डाग राहात नाहीं, तें आर्तव शुद्ध समजावें. ॥ इतिप्रदरनिदानम् ॥ ॥

## योनिव्यापत्तिनिदान-

विंशतिर्व्यापदोयोनेर्निर्दिष्टारोगसंग्रहे ॥ मिथ्याचारेणताःस्त्रीणांप्रदुष्टेनार्तवेनच ॥ १ ॥ जायंतेबीज दोषाच्चदैवाच्चशृणुताःपृथक् ॥ ॥ ॥ ॥

अर्थ— रोग संग्रहा मध्यें योनीचे वीस रोग सांगितले आहेत; ते मिथ्याहार विहारानीं, वदुष्टार्तवानें, बीजदोषानें, आणि दैवानें स्त्रियाना होतात; त्यांचीं वेगळीं लक्षणें सांगतो-

सापेनिलमुदावृत्तारजःकृच्छ्रेणमुंचति ॥ २ ॥ वध्यां दुष्टार्तवांविद्याद्विप्लुतांनित्यवेदनाम् ॥ परिप्लुतायां भवतिग्राम्यधर्मेणरुग्भृशं ॥ ३ ॥ वातलाकर्कशा-

स्तब्धाशूलनिस्तोदपीडिता॥ चतसृष्वपिचाद्यासुभवंत्यनिलवेदनाः॥ ४॥ ॥ ॥ ॥

अर्थ–ज्या योनीतून फेंसाळलेले आर्तव मोठ्या कष्टानें वाहतें, तिला **उदावृता** म्हणतात· जिचें आर्तव दुष्ट झालें आहे तिला **वंध्या** म्हणतात· जिला निरंतर वेदना होते, तिला **विप्लुता** म्हणतात· जिला मैथुनानें फार पीडा होते, तिला **परिप्लुता** म्हणतात· जी योनी कर्कश, स्तब्ध असून शूलतोद युक्त असते तिला **वातला** म्हणतात· पहिल्या च्यार योनी (उदावृता, वंध्या, विप्लुता, आणि परिप्लुता) मध्यें वात वेदना होतात·

सदाहंक्षीयतेरक्तंयस्याःसालोहितक्षया॥ सवातमुद्गमेद्बीजंवामिनीरजसान्वितम्॥ ५॥ प्रस्त्रंसिनीस्त्रंसतेतुक्षोभितादुःप्रजायिनी॥ स्थितंस्थितंहंतिगर्भंपुत्रघ्नीरक्तसंक्षयात्॥ ६॥ अत्यर्थंपित्तलायोनिर्दाहपाकज्वरान्विता॥ चतसृष्वपिचाद्यासुपित्तलिंगोछ्रयोभवेत्॥ ७॥ ॥ ॥

अर्थ—जा योनींतून कढत रक्त वाहातें, तिला **लोहितक्षया** म्हणतात· जिच्यातून रजोयुक्त शुक्र वायूबरोबर वाहातें, तिला **वामिनी** म्हणतात· जी योनि स्थान भ्रष्ट होते, तिला **प्रस्त्रंसिनी** (अंगबाहेर येणें) म्हणतात· ही मरद ल्यानें प्रसव नीट होत नाहीं· ज्या योनीमध्यें रक्तक्षय झाल्यानें गर्भ ठरत नाहीं, तिला **पुत्रघ्नी** म्हणतात· जी योनि अत्यंत दाह, पाक (पिकणें), आणि ज्वर यांनीं युक्त असते तिला **पित्तला** म्हणतात·—पहिल्या च्यारी (रक्तक्षया, वामिनी, स्त्रंसिनी, आणि पुत्रघ्नी) मध्यें पित्ताचीं लक्षणें अधिक होतात·

अत्यानंदानसंतोषंग्राम्यधर्मेणगच्छति॥ कर्णिन्यांक-
र्णिकायोनौश्लेष्मासृग्भ्यांप्रजायते॥ ८॥ मैथुनेचरणा
पूर्वंपुरुषादतिरिच्यते॥ बहुशश्चातिचरणातयोर्बीजं
नविंदति॥ ९॥ श्लेष्मलापिच्छिलायोनिः कंडूयुक्तातिं-
शीतला॥ चतसृष्वपिचाद्यासुश्लेष्मलिंगोच्छ्रयोभवेत्॥ १०॥

अर्थ- जी योनि कितीही मैथुन केलें तरी संतोष पावत नाहीं, तिला **अत्या नंदा** म्हणावें. जी मध्यें कफरक्तापासून कर्णिका (कमळाच्यादांडीसार खामांसकंद) होते, तिला **कर्णिनी** म्हणावें. जी योनि असम्यक् मैथुनानें पुरुषाच्या पूर्वींच द्रावते, तिला **चरणा** म्हणावें. म्हणजे जों पर्यंत पुरु षाला स्खलन होत नाहीं त्या पूर्वींच ही विराम पावून बीजग्रहण करीत ना हीं. जी योनि बहुवार मैथुनानें पुरुषाच्या मागून द्रवते, तिला **अतिचर णा** म्हणतात. त्या दोघी मध्यें गर्भधारण होत नाहीं. जी योनि बुळबुळी त, कंडुयुक्त, व अत्यंत थंड असते तिला **श्लेष्मला** म्हणतात. पहिल्या च्यारी (अत्यानंदा, कर्णिनी, चरणा, आणि अतिचरणा) या मध्यें क- फाचीं लक्षणें अधीक असतात.

अनार्तवाऽस्तनीषंढीखरस्पर्शाचमैथुने॥ अतिकाय
गृहीतायास्तरुण्यास्त्वंडिनीभवेत्॥ ११॥ विवृतातिं
महायोनिःसूचीवक्त्रातिसंवृता॥ सर्वलिंगसमुत्था
नासर्वदोषप्रकोपजा॥ १२॥ चतसृष्वपिचाद्यासुस
र्वलिंगनिदर्शनम्॥ पंचासाध्याभवंतीहयोनयःसर्व
दोषजाः॥ १३॥ ॥ इतियोनिव्यापन्निदानम्॥ ॥

अर्थ- ज्या स्त्रीला विटाळ येत नाहीं व जिला स्तन नसतात, व जिचें - भग मैथुनकाळीं खरखरीत लागतें तिला **षंढी** म्हणावें. ज्या तरुण

स्त्रीला मोठ्या शिश्नाच्या पुरुषाचा संग होतो, व तेणेंकरून तिची योनि अंडाप्रमाणें बाहेर पडते, तिला **अंडिनी** म्हणतात· जी योनि अत्यंत विवृत्त (वासलेली) असते तिला **महायोनि** म्हणतात· ज्या योनीचें द्वार अत्यंत संकुचित होतें, तिला **सूचीवक्त्रा** म्हणतात· सर्व दोषांच्या कोपानें सर्वांचीं लक्षणेंजींत होतात तिला **सन्निपातिका** म्हणावी· पहिल्या चारी (षंढी, अंडिनी, महायोनि, सूचिवक्त्रा) यांमध्यें सर्व दोषांचीं लक्षणें दिसतात· त्यां सर्व दोषजन्य पांच योनी असाध्य आहेत·॥ ॥ इति योनिव्यापन्निदानम्॥ ॥ ॥५॥ ॥५॥

## योनिकंदनिदान·

**दिवास्वप्नादतिक्रोधाद्व्यायामादतिमैथुनात्॥क्षताच्चनखदंताद्यैर्वाताद्याःकुपितामलाः॥१॥पूयशोणितसंकाशंलकुचाकृतिसन्निभम्॥उत्पादयंतेयदायोनौनाम्नाकंदःसयोनिजः॥२॥ ॥ ॥ ॥**

अर्थ– दिवसास झोंप घेतल्यानें, अत्यंत क्रोधानें, व्यायामानें, अति मैथुनानें, नखदंतादिकांनीं क्षत झाल्यानें, वातादि दोष कुपित होऊन योनीमध्यें पू आणि रक्त यांच्या रंगा सारखा क्षुद्र फणसाच्या आकृति येवढा वाटोळा (म्हणजे बोरा येवढा) कंद उत्पन्न होतो; त्याला **योनिकंद** असें म्हणतात·

### वातिकयोनिकंद·

**रूक्षंविवर्णंस्फुटितंवातिकंतंविनिर्दिशेत्॥ ॥**

अर्थ– जो कंद रूक्ष, विवर्ण, भेगाकलेला होतो, त्याला **वातिक** म्हणावें·

पैत्तिकयो·

दाहरागज्वरयुतंविद्यात्पित्तात्मकंतुतम्॥३॥ ॥

अर्थ–जो कंद दाह, लाली, आणि ताप ह्यानीं युक्त होतो त्याला पै-
त्तिक म्हणावें·

श्लेष्मिक·

नीलपुष्पप्रतीकाशंकंडूमंतंकफात्मकम्॥

अर्थ–जो कंद अळशीच्या फुला सारखा निळा व कंडु युक्त होतो, तो
कफात्मक समजावा·

सन्निपातात्मक·

सर्वलिंगसमायुक्तंसन्निपातात्मकंवदेत्

इतियोनिकंदनिदानम्॥४॥ ॥ ॥ ॥

अर्थ– जो कंद सर्व दोषांच्या लक्षणानीं युक्त असतो, त्याला सन्निपा
तात्मक म्हणावें·॥ ॥इति योनिकंदनिदानम्॥ ॥ ॥ ॥ ॥

---

## मूढगर्भनिदान·

गर्भपात·

भयाभिघाततीक्ष्णोष्णपानाशननिषेवणात्॥

गर्भेपततिरक्तस्यसशूलंदर्शनंभवेत्॥१॥ ॥

अर्थ– भय, अभिघात, तीक्ष्णोष्ण अन्नपाण्याचें सेवन; ह्या कारणा
नीं गर्भ पात होत असतां शूलयुक्त रजोदर्शन होतें·

स्राव आणि पातयांचाकाळ·

आचतुर्थात्ततोमासात्प्रस्रवेद्गर्भविद्रवः॥तत-

स्थिरशरीरस्यपातःपंचमषष्ठयोः॥२॥ ॥

अर्थ—चौथ्या महिन्या पर्यंत गर्भ पातळ अवस्थेंत असल्या मुळें तो स्रवतो; म्हणून त्याला स्राव म्हणतात; आणि तेथून पुढें पांचव्या स हाव्या महिन्या मध्यें शरीर बनल्यावर जो गर्भ पडतो; त्याला पात म्हणतात.

गर्भ अकालीं कशानें पडतो त्या विष यीं निदानपूर्वक दृष्टांत सांगतो.

गर्भोभिघातविषमासनपीडनाद्यैःपक्वंद्रुमादिवफलंपततिक्षणेन॥ ॥ ॥ ॥

अर्थ— अभिघात, विषम आसन, आणि पीडनादिक त्या कारणानीं जसें पिकलेलें फळ (जें केवळ देंठास लागलेलें असतें) अभिघातानें क्षणांत झाडावरून पडतें, तसा गर्भ तत्काळ पडतो.

प्रसूत होतेवेळीं मूढगर्भ कशानें होतो तो सांगतो.

मूढःकरोति पवनःखलु मूढगर्भंशूलंचयोनिजठरादिषुमूत्रसंगम्॥४॥ ॥ ॥ ॥

अर्थ-मूढ (कुंठितगति) वायु गर्भाला मूढ (अडवा) करितो, आणि योनि व पोट ह्यांच्या ठिकाणीं शूळ उत्पन्न करितो; व मूत कोंडतो.

मूढगर्भाच्या आठ प्रकारच्या गति.

भुग्नोनिलेनविगुणेनततःसगर्भःसंख्यामतीत्यबहुधाससुपैतियोनिम्॥द्वारंनिरुध्यशिरसाजठरेणकश्चित्कश्चित्शरीरपरिवर्तितकुब्जदेहः॥॥५॥एकेनकश्चिदपरस्तभुजद्वयेनतिर्यग्गतो-भवतिकश्चिदवाङ्मुखोन्यः॥पार्श्वापवृत्तगति

रेतिनथैवकश्चिदित्यष्टधागतिरियंहिपराचतुर्धा॥५॥सं
कीलकःप्रतिखुरःपरिघोथबीजस्तेषूर्ध्वबाहुचरणैःशि
रसाचयोनिम्॥संगीचयोभवतिकीलकवत्सकीलो-
दृश्यैःखुरैःप्रतिखुरःसहिकायसंगी॥७॥गच्छेद्भुज
द्वयशिराःसचबीजकाख्योयोनौस्थितःसपरिघःपरि-
घेनतुल्यः॥८॥ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ— विगुण वायूनें गर्भ विपरीत (अडवा) होऊन अनेक प्रकारानीं यो निद्वाराशीं येतो, त्या पैकीं मुख्य आठ प्रकार आहेत, ते येणेंप्रमाणें;-१ कोणी गर्भ मस्तकानें योनीचें द्वार बंद करून येतो, २ कोणी पोटानें योनी कडे येतो, ३ कोणी शरीर वळल्यानें कुबडा होऊन येतो, ४ एखादा गर्भ एक हात बाहेर काढून येतो, ५ दुसरा दोन्ही हात बाहेर काढुन येतो, ६ कोणी अगळा प्रमाणें आडवा येतो, ७ कोणी मान मोडल्या मुळें खाली तोंड होऊन येतो, ८ तसाच कोणी पार्श्व भंगानें दुमडून योनिद्वारा कडे येतो; त्या प्रमाणें गर्भाची आठ प्रकारची गति होते. दुसरी चार प्रकारची गति होते ती सांगतों, ती येणें प्रमाणें;- १ संकीलक, २ प्रतिखुर, ३ परिघ, ४ बीज. यां पैकीं जो गर्भ हात पाय वरती करून डोक्यानें योनीकडे येऊन खिळ्या सारखा अडकतो तो संकीलक, ज्या गर्भाचे हात पाय खुरा सारखे बाहेर दिसून शरीर अडकून राहातें तो प्रतिखुर, जो गर्भ दोन हात आणि मस्तक पुढें करून अडकतो तो बीजक, आणि जो परिघा प्रमाणें योनींत अडकून राहातो तो परिघ होय.

## असाध्यमूढगर्भआणिगर्भिणीचेंलक्षण.

अपविद्धशिरायातुशीतांगीनिरपत्रपा॥नीलोद्धत
शिराहंतिसागर्भंसचतांतथा॥१॥ ॥ ॥

अर्थ– ज्या गर्भिणीच्या मानेचा कांटा मोडल्या मुळें मान सांवरत नाहीं, अंग गार पडतें, व लज्जा रहात नाहीं, व जिच्या कुशीवर हिरव्या निळ्या शिरा उठतात ती गर्भिणी व तो गर्भ एकमेकांस मारतात.

पोटांतगर्भमेल्याचेंलक्षण.

गर्भास्पंदनमावीनांप्रणाशःश्यावपांडुता॥ भवेदु
च्छ्वासपूतित्वंशूनतांतर्मृतेशिशौ॥१०॥ ॥ ॥

अर्थ–गर्भाची हालचाल न राहाने, प्रसववेदना (वेणा) बंद होतात, अंग हिरवें निळें होतें, आणि उच्छ्वासाला दुर्गंधि येते, आणि आंत मेलेलें पोर कुगल्या मुळें पोटाला फुगवटी येते.

गर्भमरणहेतु.

मानसागंतुभिर्मातुरुपतापैःप्रपीडितः॥ गर्भोव्या
पद्यतेकुक्षौव्याधिभिश्चप्रपीडितः॥११॥ ॥

अर्थ– मातेच्या मानसिक व आगंतुक दुःखानीं किंवा रोगानीं गर्भाला पीडा होऊन तो गर्भा शयांत मरतो.

गर्भिणीचेंदुसरेंअसाध्यलक्षण.

योनिसंवरणंसंगःकुक्षौमक्कल्लएवच॥ हन्युःस्त्रि
यंमूढगर्भोयथोक्ताश्चाप्युपद्रवाः॥१२॥इ.मू.ग.नि.

अर्थ–वायूच्या योगानें योनीचा संकोच, कुशी मध्यें गर्भ अडकून राहाणें, आणि मक्कल्ल शूल, व आक्षेपक, कास, श्वासादिक उपद्रव, हे झाले म्हणजे ती गर्भिणी जगत नाहीं.॥ इतिमूढगर्भनिदानम्॥

मध्कोशंकनिर्मथ्यसारमाकृष्यवैमया॥ व्याख्याकृताम
हाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥१॥ ॥ ॥ ॥ ॥

## सूतिकारोगनिदान.

अंगमर्दोज्वरःकंपःपिपासागुरुगात्रता॥ शोथःशूला
निसारौचसूतिकारोगलक्षणम्॥ १॥ मिथ्योपचारा-
त्संक्लेशाद्विषमाजीर्णभोजनात्॥ सूतिकायाश्चयेरो
गाजायंतेदारुणास्तुते ॥२॥ ज्वरातिसारशोथाश्च-
शूलानाहबलक्षयाः॥ तंद्रारुचिप्रसेकाद्याःकफवा
तामयोद्भवाः॥ ३॥ कृच्छ्रसाध्याहितेरोगाःक्षीणमां
सबलाग्निनः॥ तेसर्वेसूतिकानाम्नारोगास्तेचाप्यु-
पद्रवाः॥४॥ ॥इतिसूतिकारोगनिदानम्॥ ॥

अर्थ— अंग मोडून येणें, ज्वर, कांपरें, तृषा, अंगाला जडत्व, सूज, शूळ, आणि दाळ हीं लक्षणें झालीं म्हणजे सूतिका रोग ( बाळंत रोग ) झाला आहे म्हणून समजावें. बाळंतिणीला मलत्या उपचारानें, किंवा दोष-जनक अन्नपान सेवन केल्यानें, अथवा विषमाशन, अजीर्ण भोजना दिकें करून जे रोग होतात ते मोठे भयंकर होतात; ते येणें प्रमाणें :— ज्वर, दाळ, सूज, शूळ, पोट फुगणें, आणि अशक्तता व कफवातजन्य रो गां पासून उत्पन्न होणारे; तंद्रा, अन्नद्वेष, आणि तोंडाला पाणी सुटणें, इत्यादि विकार अशक्तता व अग्नि मांद्य असल्या मुळें कृच्छ्र साध्य हो तात. त्या सर्व ज्वरादि रोगांना **सूतिकारोग** म्हणतात. त्या पैकीं ए-कादा रोग प्रधान होऊन बाकीचे उपद्रव रूपानें असतात. ॥इ. सू. रो. नि.

## स्तनरोगनिदान.

सक्षीरौवाप्यदुग्धौवादोषःप्राप्यस्तनौस्त्रियः॥ प्र
दूष्यमांसरुधिरेस्तनरोगायकल्पते॥१॥ पंचानाम
पितेषांहिरक्तजंविद्रधिंविना॥ लक्षणानिसमाना

निबाह्यविद्रधिलक्षणेः ॥ इतिस्तनरोगनिदानं ॥

अर्थ– वातादि दोष, गर्भिणी किंवा प्रसूत स्त्रीच्या सदुग्ध किंवा अदुग्ध स्तनांत येऊन मांस रक्त दुष्ट करून स्तन रोग उत्पन्न करितो. स्तनरोग (खांडूक) पांच प्रकारचे होतात; त्या पांचांचीं लक्षणें-रक्तविद्रधि खेरीज करून बाह्य विद्रधि लक्षणा सारखीं होतात. ॥

स्तन्यरोग-

गुरुभिर्विविधैरन्नैर्दुष्टैर्दोषैःप्रदूषितम् ॥ क्षीरंधात्र्याःकुमारस्यनानारोगायकल्पते ॥ १ ॥ ॥

अर्थ– गुर्वादि नाना प्रकारच्या अन्नांनीं दोष दुष्ट होऊन मातेचें दुग्ध नासतें, तेणें करून बाळकाला नाना तऱ्हेचे रोग होतात.

वातादिकांनीं दूषित दुग्धाचें लक्षण-

कषायंसलिलप्लावि स्तन्यंमारुतदूषितम् ॥ कट्वम्ललवणंपीतराजिमत्पित्तसंज्ञितम् ॥ २ ॥ कफदुष्टंघनंतोये निमज्जतिसपिच्छिलम् ॥ द्विलिंगंद्वंद्वजंविद्यात्सर्वलिंगंत्रिदोषजम् ॥ ३ ॥ ॥ ॥

अर्थ– जें दुग्ध तुरट व पाण्यावर तरंगणारें असतें तें वात दूषित होय. व जें तिखट, आंबट, आणि खारट असून ज्यावर पिवळ्या रेषा दिसतात तें पित्तदूषित समजावें. व जें दूध घट्ट व बुळबुळीत असून पाण्यांत टाकलें असतां तळीं बसतें तें कफदुष्ट जाणावें. दोन दोन दोषांचीं लक्षणें ज्यांत दिसतात तें द्वंद्वज जाणावें, आणि ज्यामध्यें तीन दोषांचीं लक्षणें दिसतात तें त्रिदोष दुष्ट जाणावें.

शुद्ध दुग्धाचें लक्ष·

अदुष्टंचांबुनिक्षिप्तमेकीभवतिपांडुरम्॥मधुरंचावि
वर्णंचतत्प्रसन्नंविनिर्दिशेत्॥४॥इतिस्तन्यरोगनि॰
इतिस्त्रीरोगनिदानम्॥ ॥७॥ ॥७॥ ॥

अर्थ- जें दूध पाण्यांत घालतें असतां त्याशीं मिळतें; व पांढरें आणि मधुर असून बेरंग नसतें तें शुद्ध म्हणून समजावें·॥ ॥इतिस्तन्यरोगनिदानम्॥ ॥इति स्त्रीरोगनिदानम्॥ ॥ ॥ ॥

मधुकोशाख्यनिर्मथ्यसारमाकृष्यवैमया॥व्याख्याकृतामहारा-
ष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥१॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

---

## बालरोगनिदान·

त्रिविधःकथितोबालःक्षीरान्नोभयवर्त्तनः॥स्वा-
स्थ्यंताभ्यामदुष्टाभ्यांदुष्टाभ्यांरोगसंभवः॥१॥ ॥

अर्थ– दूध पिणारा, आणि अन्न खाणारा, आणि नुसतें अन्न खाणारा असा तीन प्रकारचा बाळक असतो; तीं दुष्ट नसलीं तर बालक निरोगी असतो, आणि दुष्ट असलीं तर तो रोगी होतो·

वातदुष्टंशिशुस्तन्यंपिबन्वातगदातुरः॥क्षामस्वरः
कृशांगःस्याद्बद्धविण्मूत्रमारुतः॥२॥ ॥ ॥

अर्थ– वायूनें दुष्ट झालेलें दूध पिणाऱ्या बालकाला वात रोग होतात; ते असे कीं, त्याचा शब्द खोल जातो, शरीर कृश होतें, आणि मलमूत्र वायू हे बंद होतात·

स्विन्नोभिन्नमलोबालःकामलापित्तरोगवान्॥
तृष्णालुरुष्णसर्वांगःपित्तदुष्टंपयःपिबन्॥३॥ ॥

अर्थ– पित्त दुष्ट दूध पिणाऱ्या बालकाला घाम येतो, मळपातळ होतो, कावीळ होते, व पित्तरोग होतात ते:– ( तृषा लागते, व सर्वांगाला कडकी असते. )

कफदुष्टं पिबन्क्षीरं लालालुः श्लेष्मरोगवान् ॥
निद्रार्दितो जडः शूनः शुक्लाक्षश्छर्दनः शिशुः ॥ ४ ॥

अर्थ– कफ दुष्ट दूध पिणाऱ्या बालकांच्या तोंडांतून लाळफार वाहते, व कफ रोग होतात:– ( झोंप येते, अंग जड होतें, सूज येते, डोळ्यांना पांढुरकी असते, वांति होते. )

## लेंकराच्या अंतर्गत वेदना जाणण्याचा उपाय.

शिशोस्तीव्रामतीव्रां च रोदनाल्लक्षयेद्रुजं ॥ सयंस्पृशेद्भृशं देशं यत्र च स्पर्शनाक्षमः ॥ ५ ॥ तत्र विद्याद्रुजं मूर्ध्नि रुजं चाक्षिनिमीलनात् ॥ कोष्ठे विबंधवमथुस्तनदंशांत्रकूजनैः ॥ ६ ॥ आध्मानपृष्ठनमनजठरोन्नमनैरपि ॥ वस्तौ गुह्ये च विण्मूत्रसंगोत्रासदिगीक्षणैः ॥ ७ ॥ स्रोतांस्यंगानि संधींश्च पश्येद्यत्नान्मुहुर्मुहुः ॥ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ– मुलांच्या रडण्या वरून त्यांची कमजास्त पीडा समजावी. तो बाळ ज्या ठिकाणीं वारंवार हात लावील त्या ठिकाणीं, व जेथें आपणास हात लाऊं देणार नाहीं त्या ठिकणीं त्याचें कांहीं तरी दुखत आहे असें समजावें. डोळे मिटण्यावरून मस्तक दुखतें म्हणोन समजावें, मलावरोध, ओकारी, स्तन चावणें, व पोटांत गुरगुरणें, पोट फुगणें, पाठ नमणें, आणि पोट उचलणें, त्या लक्षणानीं

त्यांच्या कोठ्यांत पीडा आहे म्हणून समजावें. मळमूत्र कोंडणें, उचकणें, आणि चहूंकडे पाहाणें ईहींकरून त्याच्या वस्तींत आणि गुह्यस्थानीं पीडा होत आहे म्हणून समजावें. वैद्यानें त्याचीं स्रोतसें (नाक, तोंड, कान, वगैरे द्वारें) हातपाय वगैरे अवयव, आणि संधी वारंवार पाहावे.

## कुकूणक.

कुकूणकः क्षीरदोषाच्छिशूनामेववर्त्मनि ॥ ८ ॥
जायतेतेननेत्रंचकंडूरंचस्रवेन्मुहुः ॥ शिशुःकुर्या
ल्ललाटाक्षिकूटनासाविघर्षणम् ॥ ९ ॥ शक्तोनार्कप्र
भांद्रष्टुंनवर्त्मोन्मीलनक्षमः ॥ ॥ ॥ ॥

अर्थ—कुकूण (बाळखुपऱ्या) हा रोग मुलांनांच दुधाच्या दोषानें होतो. त्या योगानें त्यांचे डोळे खाजतात, आणि गळ लागते. डोळ्याला खूप आली म्हणजे लेंकरूं कपाळ, डोळे, आणि नाक चोळतें, त्याला उन्हाकडे पाहावत नाहीं, व डोळे उघडत नाहींत.

## पारिगर्भिक. (अवथणणें.)

मातुःकुमारोगर्भिण्याःस्तन्यंप्रायःपिबन्नपि ॥
॥ १० ॥ कासाग्निसादवमथुतंद्राकार्श्यारुचिभ्रमैः ॥
युज्यतेकोष्ठवृध्याचतमाहुःपारिगर्भिकम् ॥ ११ ॥
रोगंपरिभवाख्यंचदद्यात्तत्राग्निदीपनम् ॥ ॥

अर्थ— गर्भिणी मातेचें दूध लेंकरूं प्यालें असतां त्याला खोकला, अग्निमांद्य, वांति, झोंपड, अरुचि, आणि भ्रम हे होतात; व तें रोड होतें, व त्याचें पोट मोठें होऊन टिचटिचित दिसतें; त्या रोगाला पारिगर्भिक किंवा परिभव म्हणतात; त्यावर अग्निदीपन ओषध योजावें.

## तालुकंट (टाळूपडणें.)

तालुमांसे कफःक्रुद्धःकुरुतेतालु कंटकम्॥१२॥तेन
तालुप्रदेशस्यनिम्नतामूर्ध्निजायते॥तालुपातस्त
नद्वेषःकृच्छ्रात्पानंशकृद्रवम्॥१३॥तृडक्षिकंठास्यरु
जाग्रीवादुर्धरतावमिः॥ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ– टाळूच्या मांसा मध्यें कफ कुपित होऊन तालुकंटक रोग होतो; तेणें करून टाळूला खळगा पडतो, व टाळा खाली लोंबतो; लेंकरूं थान घेत नाहीं, पिऊं लागलें तर मोठ्या कष्टानें पितें; पातळ मळ होतो; ताहान लागते; डोळे, घसा, आणि तोंड हीं दुखतात; मान सावरत नाहीं, आणि जें दूध पितो तें ओकतो.

## महापद्मविसर्प (धांवरें.)

विसर्पस्तुशिशोःप्राणनाशनोवस्तिशीर्षजः॥१४
पद्मवर्णोमहापद्मोरोगोदोषत्रयोद्भवः॥ शंखाभ्यां
हृदयंयातिहृदयाद्वागुदंव्रजेत्॥१५॥ ॥ ॥

अर्थ– लेंकरांच्याडोक्याला किंवा बस्तीला धांवरें होतें, त्या मुळें लेंकरूं जगत नाहीं; तें धांवरें तांबड्या कमळाच्या पाना प्रमाणें लाल असतें; हा महा पद्म रोग त्रिदोषज आहे. हा शंखांवर उत्पन्न होऊन उरापर्यंत येतो, अथवा हृदया वर होऊन गुदा पर्यंत जातो.

## दुसरेविकारबाळकांस होतातनेसा.

क्षुद्ररोगेचकथितेअजगल्यहिपूतने॥ज्वराद्या-
व्याधयःसर्वेमहतांयेपुरेरिताः॥१६॥बालदेहे
पितेनदृष्टिज्ञेयाःकुशलैःसदा॥ ॥ ॥ ॥

अर्थ- क्षुद्र रोग निदानामध्यें अजगल्ली आणि अहिपूतना सांगीतल्या आहेत त्या व ज्वरादि सर्व रोग जे मोठ्यांस होतात म्हणून पूर्वी सांगितलें आहे, ते बालकांस देखील तसेच होतात; असें कुशल वैद्यानीं जाणावें.

## सामान्यग्रहजुष्टलक्षण.

क्षणादुद्विजते बालः क्षणात्त्रस्यति रोदिति ॥ १७ ॥
नखैर्दन्तैर्दारयति धात्रीमात्मानमेव च ॥ ऊर्ध्वं निरी
क्षते दंतान् खादेत्कूजति जृंभते ॥ १८ ॥ भ्रुवौ क्षिप-
ति दंतोष्ठं फेनं वमति चासकृत् ॥ क्षामो निनिशिजा
गति स्मूनांगो भिन्नविट् स्वरः ॥ १९ ॥ मांसशोणितगं
धिश्च न चाश्नाति यथापुरा ॥ सामान्यग्रहजुष्टानां
लक्षणं समुदाहृतम् ॥ २० ॥ ॥ ॥ ॥

अर्थ— लेंकराला कांहीं लागीर झालें म्हणजे तें क्षणांत विव्हळ होतें, क्षणांत त्रासतें, रडतें, नखांनीं व दांतांनीं आपल्याला व आईला ओरबाडतें व चावतें, वर पाहातें, दांत खातें, किंकाळी मारतें, जांभया देतें, कपाळाला अठ्या घालतें, दांत ओंठ चावतें, वारंवार तोंडांतून फेंस निघतो, तें रोड होतें व रात्रीचें निजत नाहीं; त्याच्या अंगाला थोंदरी येते, मळ पातळ होतो व घसा बसतो; त्याच्या अंगाला रक्त मांसाची घाण येते; पूर्वी प्रमाणें तें खात नाहीं; हें सामान्य ग्रहाचें लक्षण होय.

## स्कंदग्रहगृहीतलक्षण.

एकनेत्रस्य गात्रस्य स्त्रावः स्पंदनकंपनम् ॥ अर्ध-
दृष्ट्या निरीक्षेत वक्रास्यो रक्तगंधिकः ॥ २१ ॥ दंतान्
खादति वित्रस्तः स्तन्यं नैवाभिनंदति ॥ स्कंदग्रह
गृहीतानां रोदनं चाल्पमेव च ॥ २२ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ– लेंकरांच्या एका डोळ्यांतून पाणी येतें, एक बाजू फुरफुरते, व थरथर कांपने, तें अर्ध्या दृष्टीनें पाहातें, तोंड वांकडें होतें· रक्ताची दुर्गंधी येने, तें दांत खातें, अंगगळतें, तें थान घेत नाहीं, आणि थोडें रडतें· हें स्कंद ग्रह लागल्याचें लक्षण होय·

## स्कंदापस्मारलक्षण·

नष्टसंज्ञोवमेत् फेनंसंज्ञावानतिरोदिति॥ पूयशो
णितगंधित्वंस्कंदापस्मारलक्षणम्॥२३॥ ॥

अर्थ– लेंकरूं बेशुद्ध होतें, फेंस ओकतें, सावध झालें म्हणजे फार रडतें, त्याच्या अंगाला पू रक्ताची घाण येते, त्या लक्षणावरून स्कंदापस्मार ग्रहांची पीडा आहे म्हणून समजावें·

## शकुनिग्रहलक्षण·

स्रस्तांगोभयचकितोविहंगगंधिःसास्रावव्रणप
रिपीडितःसमंतात्॥ स्फोटैश्चप्रचिततनुःसदाह
पाकैर्विज्ञेयोभवतिशिशुःक्षतः शकुन्या॥२४॥ ॥

अर्थ– शकुनिग्रहानें पीडलेलें लेंकरूं गळून जातें, भयानें दचकतें, त्याच्या अंगाला पक्ष्याची घाणयेते, खवंदें पडून त्यांतून लस वाहाते; सर्व अंगावर फोड उठतात, ते पिकतात, दाह होतो·

## रेवतीग्रहलक्षण·

व्रणैःस्फोटैश्चितंगात्रंपंकगंधमसृक्स्रवेत्॥ भिन्न
वर्चाज्वरीदाहीरेवतीग्रहलक्षणम्॥२५॥ ॥

अर्थ– रेवतीग्रहाच्या पीडेनें लेंकराचें अंग व्रणांनीं व फोडांनीं आम होतें; त्यांतून जें रक्त वाहतें त्याला चिखलाची घाण येते· ढाळ होतात, तापयेतो, अंगाचा दाह होतो·

## पूतनाग्रहलक्षण.

अतीसारोज्वरस्तृष्णातिर्यक्प्रेक्षणरोदनम् ॥ नष्ट
निद्रस्तथोद्विग्न स्रस्तःपूतनयाशिसुः ॥२६॥ ॥

अर्थ- पूतना ग्रहाच्या पीडेनें ढाळ,ज्वर, तृषा, वक्रदृष्टीनें पहाणें, रडणें, झोंपनयेणें, व्याकूळ होणें,आणि गळून जाणें हीं लक्षणें होनात.

## अंधपूतनाग्रहलक्षण.

छर्दिःकासोज्वरस्तृष्णावसागंधोतिरोदनम् ॥ स्त-
न्यद्वेषोतिसारश्चअंधपूतनयाभवेत् ॥२७॥ ॥

अर्थ- अंधपूतना ग्रहाच्या पीडेनें लेंकरांस वांति, खोकला, ताप,ताहान, चर्बीची घाण,अतिरडणें, थान टांकणें, ढाळ,हीं लक्षणें होतात.

## शीतपूतनाग्रहलक्षण.

वेपतेकासतेक्षीणोनेत्ररोगोविगंधिता ॥ छर्यतीसा
रयुक्तश्चशीतपूतनयाशिशुः ॥२८॥ ॥

अर्थ- शीतपूतना ग्रहाच्या पीडेनें लेंकरूं कांपतें, खोकतें, क्षीण होतें, त्याच्या डोळ्याला विकार होतो, अंगाला घाण येते, वांति- होते, व ढाळ होतात.

## सुखमंडिकाग्रहलक्षण.

प्रसन्नवर्णवदनःशिराभीरिवसंवृतः ॥ मूत्रगंधिश्चब
व्हाशीसुखमंडिकयाभवेत् ॥२९॥ ॥ ॥ ॥

अर्थ- सुखमंडिका ग्रहाच्या पीडेनें लेंकरांच्या तोंडाला टवटवी येते, व शरिराची कांति सुंदर होते, शिरानीं जखडल्या सारखें होतें, त्या- च्या अंगाला मुताची घाण येते; तें लेंकरूं पुष्कळ खातें.

नैगमेयग्रहलक्षण·

छर्दिस्पंदनकंगस्यशोषमूर्छाविगंधिता॥ऊर्ध्वं
पश्येद्दशेदंतान्नैगमेयग्रहंवदेत्॥३०॥ ॥ ॥

अर्थ– ओकारी, कंप, घसा आणि नोंड त्यांना कोरड, मूर्छा, दुर्गंधि, वरपहाणें, आणि दांत खाणें, त्या लक्षणानीं नैगमेय ग्रहाची बाधा समजावी·॥ ॥इतिबालरोगनिदानम्॥ ॥ ॥

मधुकोशंक्तनिर्मथ्यसारमाकृष्यवैमया॥व्याख्या
कृतामहाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका॥१॥ ॥ ॥

---

## विषनिदान·

स्थावरंजंगमंचैवद्विविधंविषमुच्यते॥मूलात्म
कंतदाद्यंस्यात्सरंसर्पादिसंभवम्॥१॥ ॥ ॥

अर्थ–स्थावर आणि जंगम असे दोन प्रकारचें विषआहे· मूलात्मक जें विष तें स्थावर, आणि सर्पादिजन्य तें जंगम विषहोय· विषाद उत्पन्न करितें म्हणून विष म्हणतात· मूलादि विष दहाप्रकारचें आणि सर्पादि सोळा प्रकारचें सुश्रुतानीं सांगीतलें आहे· तेंअसें:–मूल, पान, फळ, फूल, साल, चीक, नार, डीक, धातु, आणि कंद· हीं १० मूलादि विषें· आणि दृष्टि, निश्वास, दंत, नख, मूत्र, पुरीष, शुक्र, लाळ, केंस, चिमटा, विशर्धित (गुदावाटेवारा सरतो तो·) (पाद) गुद, अस्थि, पित्त, शूक, आणि शव हीं १६ जंगमविषेंआहेत·

जंगमविषाचेंसामान्यलक्ष·

निद्रांतंद्रांक्लमंदाहमपाकंरोमहर्षणम्॥शोथंचै
वातिसारंचकुरुतेजंगमंविषम्॥२॥ ॥ ॥

अर्थ-जंगम विषानें झोंप, तंद्रा, क्लम, दाह, अन्नाचाअपाक, रोमांच, शोथ आणि दाळ हीं लक्षणें होतात.

स्थावरविषाचेंसामान्यल.

स्थावरंतुज्वरंहिक्कांदंतहर्षंगलग्रहम्॥ फेनच्छर्द्यरुचिश्वासंमूर्छांचकुरुतेभृशम्॥३॥ ॥ ॥ ॥

अर्थ-स्थावर विषानें ज्वर, उचकी, दांत सळसळणें, गळाधरणें फेसाची ओकारी, अरुचि, श्वास, आणि अत्यंत मूर्छा हीं लक्षणें होतात.

राजा किंवा दुसरा कोणी मोठा मनुष्य त्याजवळ-
जे चाकर असतात, ते कधीं कधीं त्यांस-
अन्नामध्यें विषचारतात, त्या-
विषाचा शोध लागावा
म्हणून विष देणाराचें
लक्षण सांगतो.

इंगितज्ञोमनुष्याणांवाक्चेष्टामुखवैकृतैः॥जानीयाद्विषदातारमेतेर्लिंगैश्चबुद्धिमान्॥४॥नददात्युत्तरंपृष्टोविवक्षन्मोहमेतिच॥अपार्थंबहुसंकीर्णंभाषतेचापिमूढवत्॥५॥हसत्यकस्मात्स्फोटयत्यंगुलीर्विलिखेन्महीम्॥वेपथुश्चास्यभवतित्रस्तश्चान्योन्यमीक्षते॥६॥विवर्णवक्त्रोध्यामश्चनखैःकिंचिच्छिनत्त्यपि॥आलभेतासनंदीनःकरेणचशिरोरुहम्॥वर्ततेविपरीतंचविषदाताविचेतनः॥७॥ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ-मनुष्याचा अभिप्राय जाणणाऱ्या वैद्यानें बोलणें, चालणें,

व मुखचर्या त्यांवरून, आणि पुढें सांगतों त्यां लक्षणां वरून विष घाल णारास ओळखावें. तें असें:- त्या विष घालणारास कांहीं विचारिलें असतां उत्तर देत नाहीं; आणि बोलावयास लागला तर त्यास कांहीं स्फ़ुरत नाहीं; यथा कथंचित् बोलूं लागला तर निरर्थक, व पुष्कळ, आणि अस्पष्ट बोलतो; व एकाएकीं हसतो; बोटें मोडतो; भुईवर रेघोट्या ओढतो; भयानें कांपतो; भिऊन लोकांकडे गरगरां पहातो, तोंड उतरून काळा ठिकर पडतो; नखांनीं कांहीं गवत वगैरे तोडतो; गरिबा सारखा एका जाग्यावर बसतो, डोक्यावरून हात फिरवितो; वारंवार इकडेति कडे बघून बसतो, त्याचें चित्त ठिकाणीं नसतें.

## मूलादिविषांचींलक्षणें.

उद्वेष्टनंमूलविषैःप्रलापोमोहएवच ॥ जृंभणंवेपनं श्वासोमोहःपत्रविषेणतु ॥ ८ ॥ मुखशोथःफलविषै र्दाहोन्नद्वेषएवच ॥ भवेत्पुष्पविषैश्छर्दिराध्मानंश्वास एवच ॥ ९ ॥ त्वक्सारनिर्यासविषैरुपयुक्तैर्भवंतिहि ॥ आस्यदौर्गंध्यपारुष्यशिरोरुक्कफसंस्रवाः ॥ १० ॥ फे नागमःक्षीरविषैर्विड्भेदोगुरुजिव्हता ॥ हृत्पीडनंधा तुविषैर्मूर्छादाहश्चतालुनि ॥ ११ ॥ प्रायेणकालघा तीनिविषाण्येतानिनिर्दिशेत् ॥ ॥ ॥ ॥

अर्थ—मूळविषांनीं:—हातां पायांला वांबयेतात; रोगी वडबड करितो; आणि त्याला भूल येते.

पत्रविषानें:—जांभया, कंप, श्वास, भूल, हीं होतात.
फलविषानीं:—तोंड सुजतें, दाह व अन्न द्वेष होतात.
पुष्पविषांनीं:—ओकारी, पोटाला फुगवटी, आणि श्वासहे होतात.

साल, नार, डीक } त्यांच्या विषानीं तोंडाला दुर्गंधी, आंगाला खरखरीतपणा, मस्तकशूळ, आणि तोंडावाटे कफाचा स्राव हे होतात·

क्षीरविषानें:– तोंडाला फेंस येतो, दाळ होतात, आणि जीभ जड होते·

धातुविषानीं:– ऊर दुखतो, मूर्छा येते, आणि टाळूपाचा दाह होतो·

हीं सर्व विषें बहुत करून कालांतर मारक आहेत असें जाणावें·

### विषलिप्त शस्त्रहताचें लक्षण·

सद्यःक्षतं पच्यते यस्य जंतोः स्रवेद्रक्तं पच्यते चाप्यभी
क्ष्णम् ॥ कृष्णीभूतं क्लिन्नमत्यर्थपूति क्षतान्मांसं शी-
र्यते यस्य चापि ॥ १२ ॥ तृष्णामूर्छाज्वरदाहोऽच यस्य
दिग्धाहतं मनुजं व्यवस्येत् ॥ लिंगान्येतान्येव कु-
र्यादमित्रैर्व्रणे विषं यस्य दत्तं प्रमादात् ॥ १३ ॥ ॥

अर्थ– ज्या मनुष्याची जखम तत्काळ पिकते; व तींतून रक्त वाहातें; व ती पुनःपुनः पिकते; त्या जखमेंतून काळें झालेलें, सडकें, दुर्गंधयुक्त असें मांस गळतें; व ज्यास तृषा, मूर्छा, ज्वर, आणि दाह हे होतात; त्यास विषविलिप्त शस्त्राची जखम लागली आहे असें जाणावें·

शत्रूनीं कपट करून ज्याच्या व्रणावर विष घातलें असेल त्याच्या व्रणाची ही अशींच लक्षणें होतात-

स्थावरविषापासून जंगमामध्यें सर्पवि
षहें अतितीक्ष्ण आहे म्हणून
पहिल्यानें सर्पाच्या जा
ती सांगतों–

वातपित्तकफात्मानो भोगिमंडलिराजिलाः ॥ यथा

क्रमंसमाख्याताद्धेनराद्वंद्वरूपिणः॥ १४॥ ॥

अर्थ– भोगी,मंडली, आणि राजिल हे सर्प अनुक्रमानें वात, पित्त, कफ;प्रकृति आहेतआणिजे अंतर (म्हणजे ज्यांत दोषांचा विशेष आहे असे;)उदाहरण; कृष्ण सर्पापासून मंडलिनी किंवा गोनसी (घोणस) चा ठाई झालेले, अथवा मंडलिनीच्ने ठाई घोणसा पासून झालेले, अथवा काळ्या नागिणीच्या ठाई घोणसा पासून झालेले, याप्रमाणें दुसऱ्याहि मिश्रजाती कल्पाव्या·) ते द्वंद्व प्रकृतीचे असतात· भोगी म्हणजे ज्या सर्पाला फणाआसून रंग काळा असतो तो· आणि राजिल म्ह॰ ज्यावर चित्र विचित्र रेषा असतात तो·

भोगिप्रभृतिसर्पानींकेलेल्यादं
शावरवातादिकांचेंलक्षणसां॰

दंशोभोगिकृतःकृष्णःसर्ववातविकारकृत्॥पी-
तोमंडलिजःशोथोमृदुःपित्तविकारवान्॥१५॥रा
जिलोत्थोभवेद्दंशःस्थिरशोथश्चपिच्छिलः॥पांडुः-
स्निग्धोतिसांद्रासृक्सर्वश्लेष्मविकारवान्॥१६॥

अर्थ–कृष्णसर्पानें केलेला डास काळा व सर्व वात विकार करणारा असतो· मंडलीचाडास पिवळा, शोथयुक्त, मऊ, आणि पित्त विकार करणारा असतो· आणि राजिलाचा डास बुळबुळीत, पांडुरवर्ण, व तुकतुकीत असतो; व त्याचा शोथ कठीण असतो; त्यांतून दाट रक्त निघतें; आणि सर्व कफविकार होतात·

विशिष्टदेशावरवविशिष्टनक्षत्रावरड
सल्याचेंअसाध्यलक्षणसांगतों

अश्वत्थदेवायतनश्मशानवल्मीकसंध्यासुचतुः

पथेषु॥ याम्येचदष्टाःपरिवर्जनीया ऋक्षेशिरामर्म सुपेचदष्टाः॥१७॥ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ– पिंपळाच्या पारावर, देवळांत, मसणांत, वारुळांवर, संध्याकाळीं, चव्हाट्यावर, भरणीनक्षत्रावर (चकारानें आर्द्रा, आश्लेषा, मघा, मूळ, कृत्तिका, ह्या घ्याव्या, आणि शिरामर्मांवर सर्पदंश झाला असतां मनुष्यें वांचत नाहींत·

उष्णाच्यायोगानेंविषाचा जोरहोतो·

दर्वीकराणांविषमाशुहंतिसर्वाणिचोष्णोद्विगुणीभवंति॥ ॥

अर्थ– नागाचें विष तत्काळ प्राण घेतें; आणि सर्व विषें उष्णाच्या योगानें दुप्पट कार्य करितात·

अजीर्णपित्तातपपीडितेषुबालेषुवृद्धेषुबुभुक्षितेषु॥ क्षीणक्षतेमेहिनिकुष्टदुष्टेरूक्षेबलेगर्भवतीषुचापि॥१८॥

अर्थ– अजीर्ण, पित्त, आणि सूर्यताप ह्यांनीं पिडलेले, बालक, वृद्ध, भुकेलेले, क्षीण झालेले, उरःक्षती, मेही, कुष्टी, रूक्ष, निर्बळ, आणि गर्भिणी ह्यांना सर्प दंश झाला असतां त्यांचा तत्काळ नाश होतो·

असाध्यलक्षण·

शस्त्रक्षतेयस्यनरक्तमस्तिराज्योलताभिश्चनसंभवंति॥ शीताभिरद्भिश्चनरोमहर्षोविषाभिभूतंपरिवर्जयेत्तम्॥१९॥ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ– ज्याला विषाचा अंमल चढला आहे· त्याला शस्त्रानें घाय केला असतां त्यांतून रक्त येत नाहीं; किंवा चाबूक मारल्यानें अंगावर वळ उठत नाहींत; अथवा थंड पाणी अंगावर ओतलें असतां रोमांच येत नाहींत; - त्याला उतार देण्याच्या खटपटीस पडूं नये·

## दुसरें असाध्य लक्षण-

जिह्मंमुखंयस्यचकेशशातोनासावसादश्चसकंठभंगः॥ रक्तःसकृष्णःश्वयथुश्चदंशेहन्वोःस्थिरत्वंचविवर्जनीयः॥२०॥ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ— ज्याचें तोंड वांकडें किंवा स्तब्ध होतें; केंस ओढतां क्षणींच उपटतात, नाकांचा शेंडा वांकडा होतो, मानेचा कांटा मोडल्या मुळें डोकें सांवरत नाहीं, आणि दंश स्थळीं सूज येते, आणि दाभाड बसतें. तो पुरुष सोडावा.

## दुसरें असाध्यलक्षण-

वर्तिर्घनायस्यनिरेतिवक्त्राद्रक्तंस्रवेदूर्ध्वमधश्चयस्य॥ दंष्ट्राभिघाताश्चतुरश्चयस्यतंचापिवैद्यःपरिवर्जयेत्तु॥ २१॥ उन्मत्तमत्यर्थमुपद्रुतंवाहीनस्वरंचाप्यथवाविवर्णम्॥ सारिष्टमत्यर्थमवेगिनंचजह्यान्नरंतत्रनकर्मकुर्यात्॥२२॥ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ— ज्याच्या तोंडा वाटे दाट लाळेचा लोंढा निघतो; आणि नाका तोंडां वाटे व गुदा वाटें रक्त स्राव होतो; व ज्याला च्यार दांत लागले असतात, तो सोडावा. अत्यंत उन्मत्त झालेला, किंवा ज्वरातिसारादि उपद्रवांनीं पीडित, बोलण्यास असमर्थ, काळाठिकर पडलेला, नासा भंगादि अरिष्ट लक्षण युक्त, ज्याला वेग(झेंडू)येत नाहींत असा; किंवा विण्मूत्रादि वेग रहित अशा विषार लेल्या पुरुषास सोडावें, त्यास उपचार करूं नये.

## दूषीविष-

जीर्णंविषघ्नौषधिभिर्हतंवादावाग्निवातातपशो

षितंवा॥स्वभावतोवागुणविप्रहीनंविषंहिदूषीविष
तामुपैति॥२३॥ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ-विषघ्न औषधानीं हतवीर्य झालेलें; किंवा वणवा, वारा, आणि ऊन त्यानीं शोषून टाकलेलें; किंवा जें स्वभावानेंच गुणानें कमी आहे, वसुनें झालेलें असें स्थावर जंगमात्मक विष दूषी विषत्वाप्रत पावतें.

## दूषीविषलक्षण-

वीर्याल्पभावान्ननिपातयेत्तत्कफान्वितंवर्षगणानुबं
धि॥तेनार्दितोभिन्नपुरीषवर्णोविगंधवैरस्ययुतःपि
पासी॥२४॥मूर्छाभ्रमंगद्गदवाग्वमित्वंविचेष्टमा-
नोरतिमाप्नुयाद्वा॥ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ-तें दूषी विष अल्पवीर्य असल्या मुळें मारक होत नाहीं; तें कफ-संबंध झाल्या मुळें उष्यादि गुण कमी होऊन वर्षानुवर्ष गर रूपानें रहातें, त्या गर विषानें पीडित झालेल्या पुरुषाला ढाळ होतात; त्याचा-वर्ण पालटतो; त्याच्या तोंडाला वाईट वास येतो, त्याचें तोंड बेचव होतें, त्याला तहान लागते, मूर्छा येते, भ्रम होतो, तो बोलतांना अक्षर खातो, त्याला वांति होते, तो वेडे वेडे चार करतो, आणि त्याला चैन पडत नाहीं.

## स्थानभेदाप्रमाणेंत्याचेंविशिष्टल०

आमाशयस्थेकफवातरोगीपक्वाशयस्थेनिलपित्त
रोगी॥भवेत्ससुद्ध्वस्तशिरोरुहांगोविलूनपक्षस्तक्य
थाविहंगः॥२५॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ-तें विष आमाशयांत गेलें असतां कफ वातजन्य रोग होतात; आणि पक्वाशयांत उतरलें असतां वातपित्तजन्य रोग होतात; व त्या रोग्याचा डोक्याचे व अंगावरचे केंस झडून पक्ष उपटून टाकलेल्या

पक्ष्या प्रमाणें तो लोळा दिसतो.

रसादिधातुगतविषाचेंसामान्यल०

स्थितंरसादिष्वथवायथोक्तान्करोतिधातुप्रभवा-
न्विकारान्॥ कोपंचशीतानिलदुर्दिनेषुयात्याशुपूर्वं
शृणुतस्यलिंगं॥२६॥ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ- रसादि धातूमध्यें हें विष गेलें असतां त्या त्या धातूचे वि-कार होतात. आणि थंडी, वारा, आणि मळभ असेल त्या वेळेस त्या-च्या लवकर कोप होतो. त्याचें लक्षण सांगतों.

निद्रागुरुत्वंचविजृंभणंचविश्लेषहर्षावथवांगमर्दः
॥ततःकरोत्यन्नमदाविपाकावरोचकंमंडलकोठजन्म
॥२७॥मांसक्षयंपादकरप्रशोथंमूर्छांतथाछर्दिमथा-
तिसारम्॥दूषीविषंश्वासतृषौचकुर्याज्ज्वरप्रवृद्धिंजठ
रस्यचापि॥२८॥उन्मादमन्यज्जनयेत्तथान्यदाहंतथा
न्यत्क्षपयेच्चशुक्रम्॥गाद्गद्यमन्यज्जनयेच्चकुष्ठंतांस्ता
न्विकारांश्चबहुप्रकारान्॥२९॥ ॥ ॥ ॥

अर्थ- दूषी विषाच्या योगानें झोंप, जडत्व, जांभया, अंग शिथिल होणें, रोमांच, अंगमोडणें, हीं पूर्वी होवून नंतर जेवल्यावर हर्ष वाटणें, अन्नपाचन न होणें, अरुचि, अंगावर चकांदळे व गांधी उठणें, मांसक्षय, हातापायाला सूज, मूर्छा, वांति, ढाळ, श्वास, तृषा, ज्वर, उदररोग, हे विकार होतात; व आणखी हीं नाना प्रकारचे विकार होतात, ते येणे प्रमाणेः— एकाद्या पासून उन्माद रोग होतो, एकाद्या पासून दाह होतो, दुसऱ्या पासून नपुंसकत्व येतें, तिसऱ्या पासून गद्गदत्व भाषण होतें; कोणा पासून कुष्ठ, विसर्प, विस्फोटादि अनेक प्रकारचे रोग होतात.

## दूषीविषाचीनिरुक्तिः

दूषितंदेशकालान्नदिवास्वप्नैरभीक्ष्णशः॥ यस्मात्सं
दूषयेद्धातूंस्तस्माद्दूषीविषंस्मृतम्॥३०॥ ॥ ॥

अर्थ- देश, काल, अन्न, आणि दिवानिद्रा त्यांनीं वारंवार दूषित झाले लें विष धातूंना दुष्टकरितें म्हणून त्याला दूषी विष म्हणतात.

दूषी विष हें दोन प्रकारचें आहे, एक कृत्रिम, आणि दुसरें गरसं ज्ञक. सविष पदार्थापासून जें केलेलें असतें तें कृत्रिम विष, आणि नि र्विष द्रव्याच्या संयोगापासून होतें, त्याला गर म्हणतात.

## तींदोन्हींविषेंसांगतों.

सौभाग्यार्थंस्त्रियःस्वेद रजोनानांगजान्मलान्॥
शत्रुप्रयुक्तांश्चगरान्प्रयच्छंत्यन्नमिश्रितान्॥३१॥
तैःस्यात्पांडुः कृशोल्पाग्निर्ज्वरश्चास्योपजायते॥
मर्मप्रधमनाध्मानंहस्तयोःशोथलक्षणम्॥ ३२॥
जठरंग्रहणीदोषोयक्ष्मगुल्मक्षयज्वराः॥ एवंविध-
स्यचान्यस्यव्याधेर्लिंगानिदर्शयेत्॥३३॥ ॥॥

अर्थ–अपल्या हातीं अधिकार व सर्व मालमत्ता यावी त्याकरितां- स्त्रिया आपल्या भर्त्याला घाम, आर्तव (विटाळ) व अंगावरचे ठि क ठिकाणचे मळ अन्नांत कालवून देतात; किंवा शत्रुकृत गरविषा- चा प्रयोग, ईहीं करून मनुष्य पांढरा फटफटीत, व कृश होऊन त्याचा अग्नि मंद होतो, व त्याला ज्वर येतो, आणि मर्माला पीडा होते, पोट फुगतें, हाताला सूजयेते उदररोग, ग्रहणीरोग, राजयक्ष्मा, गुल्म, क्षयजन्यज्वर, त्या व्याधीची व दुसऱ्या अशा प्रकारच्या व्याधीचीं- लक्षणें होतात.

त्याचें साध्यादि लक्षण.

साध्यमात्मवतः सद्यो याप्यं संवत्सरोषितम् ॥ दूषीविषमसाध्यं तु क्षीणस्याहितसेविनः ॥ ३४ ॥

अर्थ- दूषी विष पोटांत गेल्यावर तत्काळ उपाय केला आणि रोगी पथ्यानें वागला तर साध्य होतें; वर्ष लोटलें असलें तर याप्य होतें, आणि क्षीण व अपथ्य सेवणाराचें तें असाध्य होतें.

लूताविष.

यस्माल्लूनं तृणं प्राप्ता मुनेः प्रस्वेदबिंदवः ॥ तस्माल्लूताः प्रभाष्यंते संख्यया तास्तु षोडश ॥ ३५ ॥

अर्थ- विश्वामित्र राजा वसिष्ठाची कामधेनु बळात्कारानें नेत असतां वसिष्ठ ऋषीला राग आला, ते वेळेस त्याच्या ललाटापासून घामाचे बिंदू निघाले ते, जवळ कापलेलें गवत होतें, त्यावर पडले; त्याची लूता (कोळी) झाल्या. त्याच्या जाती सोळा आहेत.

त्यांचा दंशाचें सामान्यल०

ताभिर्दष्टे दंशकोथः प्रवृत्तिः क्षतजस्य च ॥ ज्वरो दाहोतिसारश्च गदाः स्युश्च त्रिदोषजाः ॥ ३६ ॥ पिडिका विविधाकारा मंडलानि महांति च ॥ शोथा महांतो मृदवो रक्तश्यावाश्चलास्तथा ॥ ३७ ॥ सामान्यं सर्वलूतानामेतद्दंशस्य लक्षणम् ॥ ॥ ॥

अर्थ- त्यांनीं दंश केला असतां डास सडतो; आणि त्यांतून रक्त वाहातें; ज्वर, दाह, अतिसार, आणि त्रिदोषज रोग, व नाना प्रकारचे फोड, मोठमोठालीं चकंदळें; मऊ, तांबडी, हिरवी, निळी, आणि चंचल अशी सूज इत्यादि लक्षणें होतात, यावरून सर्व लूतांचें सामान्य लक्षण जाणावें.

## दूषीविषलूतांचें दंशलक्ष-

दंशमध्येतुयत्कृष्णंश्यावंवाजालकावृतम्॥३८
उर्ध्वाकृतिभृशंपाकंक्लेदकोथज्वरान्वितम्॥ दूषी-
विषाभिर्लूताभिस्तद्दष्टमितिनिर्दिशेत्॥३९॥ ॥

अर्थ- ज्याडासाचा मध्यभाग काळा किंवा हिरवा, निळा, किंवा- जाळ्या सारखा उचललेला असून लवकर पिकतो, व त्यांतून सड की लस वाहाते; त्या मुळें ताप येतो, तो डास दूषी विषलूतानीं केला म्हणून जाणावें-

## प्राणहरलूता-

सर्पाणामेवविण्मूत्रशवकोथसमुद्भवाः॥ दूषीवि
षाःप्राणहराइतिसंक्षेपतोमताः॥४०॥शोथाःश्वे
ताऽसितारक्ताःपीताःसपिटिकाज्वराः॥प्राणां-
तिकाभिर्जायंतेदाहहिक्काशिरोग्रहाः॥४१॥ ॥

अर्थ- सर्पाच्यांच मलमूत्रा पासून अथवा मेलेला सर्पसडून त्यापासून जें दूषीविषाचेकिडे होतात, ते प्राण घेतात- त्यांचे डांस रूजतात, वते पांढरे, काळे, तांबडे, पिवळे, होतात, व त्यांना पुरळ येतो, आणि रोग्यास तापयेतो, दाह होतो, गुचकी लागते, मस्तकशूळ होतो-

## दूषीविषारवुलक्षण-

आदंशाच्छोणितंपांडुमंडलानिज्वरोरुचिः॥लो
महर्षश्चदाहश्चाप्याखुदूषीविषार्दिते॥४२॥ ॥

अर्थ-विषार लेला उंदीर डसला असतां दंशातून रक्तवाहातें; तें पांढुरकें असतें, अंगावर मंडळें उठतात, ताप येतो, अरुचि होते,- शहारे येतात, आणि दाह होतो-

### प्राणहरमूषकविषलक्ष.

मूर्छांगशोथवैवर्ण्यक्लेदोमंदश्रुतिर्ज्वरः ॥ शिरो
गुरुत्वंलालासृक्छर्दिश्चासाध्यमूषकेः ॥ ४३ ॥

अर्थ- प्राणहर मूषक डसल्यानें मूर्छा, मूषकाकार सूज, विवर्णत्व, क्लेद, ऐकूं न येणें, ताप. डोक्याला जडत्व, लाळ आणि रक्त त्यांची गुळणी, हीं लक्षणें होतात.

### कृकलासदष्टलक्षण.

कार्ष्ण्यंश्यावत्वमथवानानावर्णत्वमेवच ॥ भ्रा
मोहोवर्चसोभेदोदष्टेस्यात्कृकलासकेः ॥ ४४ ॥

अर्थ-सरडा डसला असतां अंगाचा काळा किंवा हिरवा निळा किंवा नानाप्रकारचा वर्ण होतो, व रोग्याला भ्रांति आणि अतिसार होतात.

### वृश्चिकविषलक्षण.

दहत्यग्निरिवादौतुभिनत्तीवोर्ध्वमाशुवै ॥ वृश्चि
कस्यविषंयातिपश्चाद्दंशेवतिष्ठति ॥ ४५ ॥ ॥

अर्थ-विंचू डसला म्हणजे पहिल्यानें विस्तवानें भाजल्या सारखी आग होते, मग तो वर चढतो, आणि मागून डसल्या जागीं फुण फुण रहातें.

### असाध्यलक्षण.

दष्टोऽसाध्यस्त्हृद्घ्राणरसनोपहतोनरः ॥ मांसैः
पतद्भिरत्यर्थवेदनार्तोजहात्यसून् ॥ ४६ ॥ ॥

अर्थ-हृदय, नाक, जीभ, त्या ठिकाणीं विंचू डसला असतां मांस गळून, अत्यंत वेदना होऊन मनुष्य मरतो.

कणभदष्टलक्षण-

विसर्पःश्वयथुःशूलंज्वरश्छर्दिरथापिवा॥लक्षणं
कणभैर्दष्टेदंशश्चैवविशीर्यते॥४७॥ ॥ ॥

अर्थ- कणभ (एकजातीचा किडा) डसला असतां, विसर्प, सूज, शूळ, ताप, ओकारी, हीं लक्षणें होतात; आणि डास सडतो-

उच्चिटिंगविषलक्ष-

हृष्टरोमोच्चिटिंगेनस्तब्धलिंगोभृशार्तिमान्॥दष्टः
शीतोदकेनेवसिक्तान्यंगानिमन्यते॥४८॥ ॥ ॥

अर्थ- उच्चिटिंग (इंगळी) डसला असतां अंगाला रोमांच येतात, शिश्न ताठतें, फार वेदना होतात, आणि सर्वांगावर गार पाणी ओतल्या सारखें वाटतें.उच्चिटिंगास उग्रधूम म्हणतात-

मंडूकविषलक्षण-

एकदंष्ट्रार्दितःशूनःसरुजःपीतकःसतृट्॥छर्दिंनि
द्रांचसविषैर्मंडूकैर्दष्टलक्षणम्॥४९॥ ॥ ॥ ॥

अर्थ- विखारी बेडूक डसला असतां त्याचा एक दांत लागतो,त्या ठिकाणीं पिवळी सूज येते, ती दुखते; तृषा, वांति,आणि निद्रा हीं लक्षणें होतात-

सविषमत्स्यदष्टलक्ष-

मत्स्यास्तुसविषाःकुर्युर्दाहंशोथंरुजंतथा॥

अर्थ- सविषमत्स्य डसले असतां दाह, सूज,आणि शूळ हीं होतात-

सविषजलौकादष्टलक्षण-

कंडूंशोथंज्वरंमूर्छांसविषास्तुजलौकसः॥५०॥

अर्थ- सविष जलवा डसल्याअसतां कंडू ,शोथ,ज्वर,आणि मूर्छा हीं होतात-

## गृहगोधिका (पाल) विषल.

विदाहंश्वयथुंतोदंस्वेदंचगृहगोधिका॥ ॥ ॥

अर्थ-पालीच्या विषानें विदाह होतो, सूज येते, टोंचणी लागते, आणि घाम येतो.

## शतपदी (गोम) विषल.

दंशेस्वेदंरुजंदाहंकुर्याच्छतपदीविषम्॥ ५१॥

अर्थ-गोम डसली असतां दंशस्थानीं घाम येतो, शूळ होतो, आणि आग होते.

## मशक (डास) दृष्टल.

कंडूमान्मशकैरीषच्छोथःस्यान्मंदवेदनः॥ ॥

अर्थ- डासडसल्यानें जी किंचित सूज येते तिला कंडू सुटते व थोडी पीडा होते.

## असाध्यमशकक्षताचें ल.

असाध्यकीटसदृशमसाध्यंमशकक्षतम्॥५२॥

अर्थ-पर्वतावर जे सविष डास असतात, त्यानीं केलेलें क्षत असाध्य कीटकांच्या क्षता प्रमाणें असाध्य होतें.

## सविषमक्षिकादंशाचेंलक्षण.

सद्यःप्रस्राविणीश्यावादाहमूर्छाज्वरान्विता॥

पिडकामक्षिकादंशेतासांतुस्थविकासुहृत्॥५३॥

अर्थ- सविष माशी डसल्या ठिकाणीं काळी पुळी येते; ती तत्क्षणीं वाहूं लागते; त्या ठिकाणीं आग होते; तिच्या योगानें मूर्छा आणि ज्वर येतो; त्या मक्षिका मध्यें स्थविका नामक जी मक्षिका आहे ती प्राण हरक आहे.

चतुष्पादादिकांचेंसाधारणविषल·

चतुष्पाद्भिर्द्विपाद्भिर्वानखदंतविषंचयत् ॥ शूयते-
पच्यतेचापिस्रवतिज्वरयत्यपि ॥ ५४ ॥ ॥ ॥

अर्थ- व्याघ्रादिचतुष्पाद, वनमनुष्यादि वानरादि द्विपाद त्यांच्या नखदंतांचें विष सूजतें, पिकतें, वाहतें, व त्याच्या योगानें ताप येतो·

विषउतरल्याचेंलक्षण·

प्रसन्नदोषंप्रकृतिस्थधातुमन्नाभिकांक्षंसममूत्र
विट्कम ॥ प्रसन्नवर्णेंद्रियचित्तचेष्टंवैद्योवगच्छेद-
विषंमनुष्यम् ॥ ५५ ॥ ॥ ॥ ॥ ॥

इतिविषनिदानंसमाप्तम् ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥

अर्थ- ज्या पुरुषाचे वातादि दोष निर्मळ झाले आहेत, रसरक्तादि धातु आरोग्यावस्थेंत जसे असतात तसे झाले आहेत, ज्याला अन्न-खाण्याची इच्छा होते, मळमूत्रें व्हावीं तशीं होतात, शरिराचा वर्ण, इंद्रियें, मन, आणि व्यापार हे ज्याचे शुद्ध होतात, त्याचें विष उतरून-गेलें आहे म्हणून वैद्यानें समजावें· ॥ ॥इतिविषनिदानंसमाप्तम् ॥ ॥

मधुकोशंस्फनिर्मथ्यसारमाकृष्यवैमया ॥ व्या-
ख्याकृतामहाराष्ट्रीमाधवार्थप्रकाशिका ॥ १ ॥

इतिमाधवनिदानंसमाप्तम्·

माधवाचार्यांनीं सांगितलीं नसून लोकांच्या फार उपयोगी पड णारीं अशीं कांहीं निदानें आहेत, तीं अन्य ग्रंथांतून काढून यथें लिहितों.

षंढयनिदान (सुश्रुतांतून)

आसेक्यनपुंसकाचेंल०

पित्रोरत्यल्पवीर्यत्वादासेक्यःपुरुषोभवेत्॥ सशुक्रं प्राश्यलभतेध्वजोच्छ्रायमसंशयम्॥१॥ ॥ ॥

अर्थ- माता पितरांच्या अति अल्प वीर्यापासून जो गर्भ राहतो, तो पुरुष आसेक्यनामा षंढ होतो. तो आपले सुखांत दुसऱ्या कडून मैथुन करवून पडलेलें शुक्र गिळतो; तेणें करून त्याला चेतना उत्पन्न होऊन त्याची मैथुना विषयीं प्रवृत्ति होते; त्याचें दुसरें नांव सुखयोनि.

सौगंधिकनपुंसकाचेंलक्षण.

यःपूतियोनौजायेत ससौगंधिकसंज्ञितः॥ सयोनिशेफसोर्गंधमाघ्रायलभतेबलम्॥२॥ ॥

अर्थ- जो पुरुष दुष्ट योनि पासून उत्पन्न होतो, त्याला योनि व शिश्न हुंगल्यानें चेतना होते; त्याला सौगंधिक म्हणतात; दुसरें नांव नासायोनि.

कुंभिकषंढाचेंलक्षण.

स्वेगुदेब्रह्मचर्याद्यः स्त्रीषुपुंवत्प्रवर्तते॥ कुंभीकः सतुविज्ञेयः॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ- जो पुरुष पूर्वी आपली ब्रहती दुसऱ्या कडून मारवून चेतना झाल्या वर पुरुषा प्रमाणें स्त्रीच्या गयीं प्रवृत्त होतो तो कुंभीकनपुंसक होय गुदयोनि हें त्याचें दुसरें नांव. त्याची उत्पत्ति काश्यपानें सांगि-

तली आहेती अशीः — ऋतुकाळीं अल्प रजस्क स्त्रीशीं श्लेष्म रेत्यापुरुषानें संभोग केला असतां त्या स्त्रीची कामशांति न झाल्यामुळें तिला अन्य पुरुषांशीं संभोग करण्याची इच्छा राहाते, तेव्हां कुंभिल होतो-

## ईर्ष्यकषंढाचें लक्षण-

ईर्ष्यकंशृणुचापरम् ॥३॥ दृष्ट्वान्यवायमन्येषांव्यवाये यःप्रवर्तते ॥ ईर्ष्यकःसतुविज्ञेयःदृग्योनिरयमीर्ष्यकः॥४॥

अर्थ- जो मनुष्य दुसऱ्याचें मैथुन पाहून आपण मैथुनास प्रवृत्त होतो, त्याला **ईर्ष्यक** म्हणावें, त्याचें दुसरें नांव दृग्योनि-

## महाषंढलक्षणसांगतों-

योभार्यायामृतौमोहादंगनेवप्रवर्त्तते ॥ तत्रस्त्रीचेष्टिताकारोजायतेषंढसंज्ञितः॥५॥ ॥ ॥ ॥

अर्थ- जो पुरुष ऋतुकाळीं मोहानें स्त्री प्रमाणें प्रवृत्त होतो म्हणजे आपण खालीं उताणा पडून तिजकडून मैथुन करवितो, त्याच बिजापासून जो गर्भ राहतो तो पुरुष स्त्री सारख्या चेष्टा करितो; व त्याचा आकार ही स्त्री सारखाच असतो- त्याला **महाषंढ** म्हणतात- त्या षंढाला वीर्य नसतें बाकिच्यांस असतें-

## नारीषंढसांगतों-

ऋतौपुरुषवद्वापिप्रवर्तेतांगनायदि ॥ तत्रकन्यायदिभवेत्साभवेन्नरचेष्टिता ॥६॥ ॥ ॥ ॥

अर्थ- ऋतु काळीं जर स्त्री पुरुषा प्रमाणें प्रवृत्त होईल, म्हणजे पुरुषास खालीं घालून आपण त्यावर चढून मैथुन करील, तर त्या पासून कन्या झाली असतां ती नरचेष्टित होते; म्हणजे पुरुषा सारखे व्यापार करिते-

## अलर्क (कुत्रा) विषनिदान· (वाग्भट्टांतून)

शुनः श्लेष्मोल्बणा दोषाः संज्ञां संज्ञावहाश्रिताः
मुष्णंतः कुर्वते क्षोभं धातूनामतिदारुणम् ॥ १ ॥
लालावानंध बधिरः सर्वतः सोभिधावति ॥ स्र
स्तपुच्छ हनुस्कंधः शिरोदुःखी नताननः ॥ २ ॥

अर्थ– कुत्र्याचे कफाधिक दोष संज्ञा वह स्रोतसांत राहून संज्ञाना-
हांशी करितात, आणि त्याच्या धातूचा क्षोभ करितात; त्या योगानें
त्याच्या तोंडा वाटें लाळ गळते, व तो अंधळा बहिरा होऊन इकडे तिक
डे धांवतो; त्याचें शेंपूट, हनुवटी, खांदे गळतात; डोकें दुखतें, व तोंड
खालीं होतें; त्याला पिसाळलेला कुत्रा म्हणतात·

### त्याच्या दंशाचें लक्षण·

दंशस्तेन विदष्टस्य सुप्तः कृष्णं क्षरत्यसृक् ॥ हृच्छि
रोरुक्ज्वरस्तंभस्तृष्णा मूर्छोद्भवोनुच ॥ ३ ॥ ॥

अर्थ– तो कुत्रा डसला म्हणजे डास मेहरतो, त्यांतून काळें रक्त वाह
तें, व त्या मुळें हृदय व मस्तक दुखतें, ताप येतो, अंग ताठतें, ताहान
लागते, व मूर्छा येते·

अनेनान्येपि बोद्धव्या व्यालादंष्ट्राप्रहारिणः ॥ शृ
गालाश्वतराश्वर्क्षद्वीपिव्याघ्रवृकादयः ॥ ४ ॥ ॥

अर्थ– त्या वर सांगितलेल्या लक्षणा वरून दंष्ट्रा प्रहार करणारे सर्प, को
ल्हे, खेंचर, घोडे, अस्वल, चित्ते, वाघ, लांडगे इत्यादिकांच्या दंशाचें ल
क्षण जाणावें·

### सविषनिर्विषदंशाचें लक्षण·

कंडूनिस्तोदवैवर्ण्यसुप्तिक्लेदज्वरभ्रमाः ॥ विदा

हृद्रागरुक्पाकशोफग्रंथिविकुंचनम्॥५॥दंशावद
रणास्फोटाःकर्णिकामंडलानिच॥सर्वत्रसविषेलिं
गंविपरीतंतुनिर्विषे॥६॥ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ– कंड, टोंचणी, वर्णबदलणें, मेहेरी, लस, ज्वर, भ्रम, आग, लाली, ठणका, पिकणें, सूज, गांठी आकुसणें, दंशालाचिरा पडणें, फोड, कर्णिका, मंडळें, हीं लक्षणें सविषदंशाचीं होत; त्यांच्याविपरीत लक्षणें दृष्टीस पडलीं नरतेनिर्विष आहेत म्हणून समजावें.

## असाध्यलक्षण.

दष्टोयेनतुनच्चेष्टारुतंकुर्वन्विनश्यति॥पश्यंस्त-
मेवचाकस्मादादर्शसलिलादिषु॥७॥ ॥ ॥

अर्थ– ज्या प्राण्याचा दंश ज्याला झाला आहे त्याच्या सर्व चेष्टा तो करतो, ओरडतो; आणि आरसा पाणी वगैरे पदार्थां मध्यें त्याचेंच प्रतिबिंब पाहातो; तो नाश पावतो.

## जलसंत्रासनामा.

योऽद्भ्यस्त्रस्येददष्टोपिशब्दसंस्पर्शदर्शनैः॥जलसं-
त्रासनामानंदष्टंतमपिवर्जयेत्॥८॥ ॥ ॥

अर्थ– जो पुरुष, पाण्याचा शब्द, स्पर्श, आणि अवलोकन ईहीं करून पाण्याला भितो, त्याला जलसंत्रासनामा म्हणतात तो, वैद्याने सोडावा.

---

## स्नायुकनिदान. (वृंदमाधवातून.)

शाखासुकुपितोदोषःशोथंकृत्वाविसर्पवत्॥
भिनत्तिक्षतेतत्रसोष्मामांसंविशोष्यच॥१॥

कुर्यात्तंतुनिभंजीवंवृत्तंसितद्युतिंबहिः॥शनैः
शनैःक्षताद्यातिछेदात्कोपमुपैतिच॥२॥तस्माता
च्छोफशांतिःस्यात्पुनःस्थानांतरेभवेत्॥सस्ना
युकेतिविख्यातःक्रियोक्तातुविसर्पवत्॥३॥बा
ह्वोर्यदिप्रमादेनजंघयोस्त्रुट्यतेक्वचित्॥संकोचं
खंजतांचैवछिन्नोजंतुःकरोत्यसौ॥४॥ ॥ ॥

अर्थ– हात पायामध्यें दोष कुपित होऊन विसर्पा सारखी सूज येते, ती फुटून क्षत पडतें, तेथें जळजळ फार होते; व मांस शुष्क होऊन- स्नना सारखा वाटोळा पांढरा दोरा बाहेर येतो· तो हळू हळू क्षताच्या बाहेर निघताना तुटला तर फार दुःख देतो, आणि सगळा बाहेर - निघाला म्हणजे सूज व सरते; त्यांत कांहीं अंश राहिला असला- तर पुनः दुसरे ठिकाणीं होतो; त्या रोगाला स्नायुक (नारू) म्ह णतात· त्यावर विसर्पा प्रमाणें चिकित्सा सांगितली आहे· कदाचि त् हाताला किंवा पायाला नारू होऊन ठणकू लागून तुटला असतां हात पाय अखडतात, आणि रोगी खुळा लुला होतो·

---

शुक्रार्त्तवदोषनिदान· (सुश्रुतांतून)

वातपित्तश्लेष्मशोणितकुणपगंध्यनल्पग्रंथि
पूतिपूयक्षीणरेतसःप्रजोत्पादनेनसमर्थाः॥
तत्रवातवर्णवेदनंवातेन, पीतवर्णवेदनंपित्तेन,
श्लेष्मवर्णवेदनंश्लेष्मणा, शोणितवर्णपित्तवे-
दनंरक्तेन, कुणपगंध्यनल्पंचरक्तेन, ग्रंथिभूतं
श्लेष्मवाताभ्यां, पूतिपूयनिभंपित्तश्लेष्मभ्यां,

क्षीणशुक्रंमारुतंपित्तवाताभ्यां,मूत्रपुरीषगं-
धिसर्ववर्णवेदनंसन्निपातेनेति॥तेषुकुणपग्रंथि
पूयक्षीणरेतसःकृच्छ्रसाध्याः॥मूत्रपुरीषरेतसः
असाध्याः॥ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ- वात,पित्त,कफ,रक्त,यांनीं दूषित झालेलें, शवगंधि,पुष्कळ,दुर्गंधि, आणि पुवासारखें,असें ज्या पुरुषाचें रेत असतें,त्यानें प्रजोत्पादन हो त नाहीं. जें शुक्र वायूनें दुष्ट होतें त्याचा वर्ण काळा नांवूस असा असतो,व त्यामुळें तोदादिक वेदना होतात; पित्तानें दुष्ट झालेल्या शुक्राचा पिंवळा निळा इत्यादि वर्ण होतात,व त्यामुळें उषाचोषादि वेदना होतात. कफ दुष्ट झालेल्या शुक्राचा वर्ण श्वेत असतोव त्यामुळेंमंदवेदना होतात. रक्तानें दुष्ट झालेल्या शुक्राचा वर्ण आरक्त असतो,आणि त्यामुळें उषा चोषादि पीडा होतात. वरक्तानें शुक्र प्रेत गंधि आणि पुष्कळ असें असतें; कफवातानीं दूषित झालेलें शुक्र गांठाळतें,पित्त कफानीं दूषित झालेल्या शुक्रास नासक्या पुवासारखा घाण येते; पित्तवायूच्या योगानें शुक्र क्षीण होतें. सन्निपातानें दूषित झालेल्या शुक्राला पूर्वी सांगितलेले सर्ववर्ण व वेदना असतात, व त्याला मूत्रपुरिषाची घाण येते. त्या मध्यें कुणप,ग्रंथि,पूय,क्षीण,रेतस हे चौघे कृच्छ्र साध्य, आणि मूत्र पुरीष रेतस असाध्य. बाकी राहिलेले अर्थात साध्य जाणावे.

---

## आर्तवदोष.

आर्तवमपित्रिभिर्दोषैःशोणितचतुर्थैःपृथक्द्वं
द्वैःसमस्तैश्चोपसृष्टमबीजंभवति॥तदपिदोष-

वर्णवेदनाभिर्ज्ञेयम् ॥ तेषु कुणपग्रंथिपूतिपूयक्षी
णमूत्रपुरीषप्रकाशमसाध्यम् ॥ साध्यमन्यच्चेति ॥

अर्थ— आर्तव म्हणजे स्त्रियांचें रज हेंही वातादि पृथक् दोष, रक्त, द्वंद्व, आणि सन्निपात ईहीं करून दुष्ट झालें असतां गर्भधारणास अयोग्य-होतें. तें हीं दोषांचे वर्ण आणि वेदना यांणीं जाणावें. त्या मध्यें कुणप, ग्रंथि, पूतिपूय, क्षीण, मूत्र पुरीषा सारखें जें असतें तें असाध्य होय; — बाकीचें साध्य जाणावें.

---

## मंथरकज्वर (मधुराज्वर) लक्ष
### ण. (योग रत्नांतून)

ज्वरोदाहोभ्रमोमोहोत्यतीसारोवमिस्तृषा ॥
अनिद्रामुखशोषश्चतालुजिव्हाचशुष्यति ॥ १ ॥
ग्रीवायांपरिदृश्यंतेस्फोटकाःसर्षपोपमाः ॥
घृताशनात्स्वेदरोधान्मंथरोजायतेनृणाम् ॥ २ ॥

अर्थ— तूप अधिक खाल्ल्यानें किंवा घामाचा रोध केल्यानें मनुष्यांस मधुराज्वर येतो, त्याचीं लक्षणें:— ज्वर, दाह, भ्रम, मूर्छा, अतिसार, वांति, तृषा, निद्रानाश, तोंडाला व टाळूला, आणि जिभेला कोरड पडणें, मानेवर पांढऱ्या मोहोऱ्या सारखे फोड येणें, त्या ज्वराचा माधवानें पित्तज्वरांत अंतर्भाव केला आहे म्हणून वेगळा सांगीतला नाही;— परंतु व्यवहारांत हा ज्वर वेगळाच मानतात. व कित्येक ग्रंथ कारानीं त्याचें नांव निराळें सांगून चिकित्सा ही पृथक् सांगितली आहे.

**विष्फगर्भाचें** (सल) **लक्षण**:- गर्भिणीनें अकाळीं भोजन केलें असतां, अथवा रूक्षादि पदार्थ खाल्ले असतां वायु कुपित होऊन गर्भ शुष्क करितो· तेणें करून त्याचें चलन वलन व वृद्धि बंद पडूं लागतात· आणि कालें करून त्याला वायूची पीडा होऊन त्याचा सल होतो·

---

**उपविष्टगर्भाचें** (सलाचा भेद) **लक्षण**:- गर्भिणी स्त्रीनें अत्यंत विदाही पदार्थांचें भक्षण केलें असतां रक्तस्राव फार होतो त्या मुळें तो गर्भ पुरा वाढत नाहींसा होतो· त्याला हालचाल मात्र असते· अशा गर्भास उपविष्ट म्हणतात·

---

## रोगानुक्रमणिका·

ज्वरातिसारो ग्रहणी अर्शोजीर्णविषूचिका ॥ अलसश्चविलंबीचकृमिरुक्पांडुकामलाः ॥१॥ हलीमकंरक्तपित्तंराजयक्ष्माउरःक्षतम् ॥ कासोहिक्कासहश्वासःस्वरभेदस्त्वरोचकम् ॥ २॥ छर्दिस्तृष्णाचमूर्छापानरोगाःपानात्ययादयः॥ दाहोन्मादावपस्मारःकथितोथानिलामयः ॥३॥ वातरक्तमुरुस्तंभआमवातोथशूलरुक् ॥ पक्तिजंशूलमानाहउदावर्तोथगुल्मरुक् ॥ ४ ॥ हृद्रोगोमूत्रकृच्छ्रंचमूत्राघातस्तथाश्मरी ॥ प्रमेहोमधुमेहश्चपिटिकाश्चप्रमेहजाः ॥५॥ मेदस्तथोदरंशोथोवृद्धिश्चगलगंडकः ॥ गंडमालापचीग्रंथिरर्बुदंश्लीपदंतथा ॥६॥ विद्र-

धिर्व्रणशोथश्चद्वौव्रणौभग्ननाडिके ॥ भगंदरोपदं
शोचशूकदोषस्त्वगामयः ॥७॥ शीतपित्तमुदर्दश्च
कोठश्चैवाम्लपित्तकम् ॥ विसर्पश्च सविस्फोटःस
रोमांत्योमसूरिकाः ॥ ८ ॥ क्षुद्रास्यकर्णनासाक्षि
शिरस्त्रीबालकग्रहाः ॥ विषंचेसयमुद्देशोरुग्वि-
निश्चयसंग्रहे ॥ ९ ॥ ॥ ॥ ॥

समाप्त